एम. ए. भाग १

इतिहास अभ्यासपत्रिका क्र. १

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास
(१८१८-१९२०)

© UNIVERSITY OF MUMBAI

डॉ. देवानंद शिंदे
प्रभारी कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. धनेश्वर हरिचंदन
प्रभारी संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रकल्प समन्वयक : **प्रा. अनिल बनकर,**
सहयोगी प्राध्यापक (इतिहास) व सहाय्यक संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

लेखक : **प्रा. अवकाश जाधव**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
सेंट झेविअर्स कॉलेज, चर्चगेट, मुंबई

: **डॉ. एस. के. भदरगे**
इतिहास विभाग प्रमुख,
बी. एन. एन. कॉलेज, भिंवडी

पुर्नसंपादन : **डॉ. प्रदिप वाघमारे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
रामनारायण रुईया महाविद्यालय,
माटुंगा, मुंबई

पुर्नमुद्रण - सप्टेंबर २०१७, एम. ए. भाग - १, इतिहास अभ्यासपत्रिका क्र. १, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८-१९२०)

प्रकाशक : प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

अक्षर जुळणी : अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

मुद्रण :

अनुक्रमणिका

क्रमांक	अध्याय	पृष्ठ क्रमांक
१.	ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीचा महाराष्ट्र (राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती)	०१
२.	ब्रिटीश राजवटीचा प्रभाव व स्थित्यंतर - अ	१५
३.	ब्रिटीश राजवटीचा प्रभाव व स्थित्यंतर - ब	२६
४.	सुधारणांचा प्रारंभ व त्यास प्रतिकार	३६
५.	धार्मिक असंतोष आणि सामाजिक विरोध	४८
६.	सामाजिक सुधारणा - (अ)	६३
७.	सामाजिक सुधारणा - (ब)	७६
८.	उदारमतवाद आणि राष्ट्रवादाचा विकास - (अ)	९०
९.	उदारमतवाद आणि राष्ट्रवादाचा विकास - (ब)	९८
१०.	संस्थात्मक राष्ट्रवाद	११०
११.	पुनरुज्जीवन आणि प्रखर राष्ट्रवाद	१२३
१२.	ब्रिटिशविरोधी प्रतिकार, बंड आणि उठाव	१३६
१३.	महाराष्ट्राचा आर्थिक विकास (इ.स. १८६१ ते १९२०)	१५१
१४.	स्वराज्याच्या दिशेने वाटचाल	१६६
१५.	महाराष्ट्रातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगती - (अ)	१७८
१६.	महाराष्ट्रातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगती - (ब)	१९०

M.A. PART - I PAPER - I : (OPTION A)

HISTORY OF MODERN MAHARASHTRA(1818-1920)

Syllabus

1. **Maharashtra on the Eve of British Conquest: Political, Economic and Socio cultural conditions.**
2. **New influences and Transition Under British Rule: (1818-1861)**
   a) Land Tenures, Revenue Settlements.
   b) Education and Press
   c) Law and Administration
   d) Transport and Communication ,
   e) Christian Missions.
   f) Student's Literary and Scientific -Society.

3. **Beginning of Reform and Resistance :**
   a) Bal Shastri Jambhekar: Pioneer of Maharashtra's Resistance
   b) Early Intellectual Resistance to British Colonial Rule, and the Rise of Nascent Economic Nationalism, Bhaskar Tarkhadkar, Ramkrishna Vishwanath, Bhau Mahajan.

4. **Religious Dissent and Social Protest:**
   a. Dadoba Pandurang and the Paramhansa sabha
   b. Lokahitwadi Gopal Hari Deshmukh
   c. Prarthana Samaj.

5. **Social Reform:**
   a) i) Issues concerning Emancipation of Women and the Efforts made towards it realization
      ii) Justice M.G. Ranade and the Indian National social conference.
   b) i) Mahatma Joytirao Phule and the Satyashodhak Samaj Universal Humanism
      ii) Gopalbaba Valankar and Anaryadosh parihar Mandal.
      iii) Vitthal Ramaji Shinde and Depressed Classes Mission of the India.
      iv) Shahu Maharaj and Vedokta Episode.

6. **Growth of Liberalism and Nationalism:** ,
   a) Promotion of Economic Nationalism : Dadabhai Naoroji, M.G. Ranade Ganesh Vyanktesh Joshi.

b) Triumvirate of Liberal School : Phirozeshah Mehta, Badruddin Tayabjeee, K.T. Telang.

c) Growth of Rationalism:: Gopal Ganesh Agarkar.

7. Institutionalized Nationalism:

a) The Bombay Association.
b) Poona Sarvajanik Sabha
c) Indian National Congress and Maharashtra.
d) Servants of India Society.

8. Revivalism and Militant Nationalism.

a) Vishnubava Brahmachari.
b) Vishnushastri Chiplunkar.
c) Arya Samaj, Theosophical Society, Ganapati and Shivaji Utsav.

9. Resistance and Insurrections

a) Ramoshi, Bhil and Koli Uprisings
b) 1857 in Maharashtra.
c) Revolt of Vasudev Balwant Phadke
d) Peasant Unrest.

10. Economic Development (1861-1920)

a) Agriculture
b) Transport and Communication.
c) Industry Rise of Labour Movements.
d) Trade and Commerce.

11. Towards Swarajya :

a) G. K. Gokhale and Moderates.
b) B.G. Tilak and Extremist Politics.
c) Revolutionaries.

12. Educational and cultural Developments :

a) Education and Literature
b) Press
c) Performing Arts

❖❖❖❖

M.A.I. HISTORY PAPER NO. I

OLD QUESTION PAPER- 2008

HISTORY OF MODERN MAHARASHTRA (1818-1920)

REVISED COURSE

(3 Hours) **Total Marks : 100**

N..B.: (1) Attempt any **four** questions,

(2) **All** questions carry **equal** marks.

1. Review the political and social conditions in Maharashtra on the eve of the British conquest of Maharashtra.
2. Analyse the emergence of early economic nationalism in Maharashtra with special reference to the thoughts of Ramkrishna Vishwanath.
3. Write an essay on Lokhitawadi Gopal Hari Deshmukh's critique of contemporary society as reflected in his writings.
4. Assess the role of Mahatma Jyotiba Phule and V. R. Shinde in emancipation of the downtrodden.
5. Describe the contribution of the servants of India Society in promoting the nationalism in Maharashtra.
6. What methods and programme was pursued by the Moderates towards attainment of Swarajya ?
7. What role did the press play in the promotion of nationalism ?
8. Comment on any two of the following :—

   (a) Students literary and scientific society

   (b) Universal Humanism

   (c) G. G. Agarkar

   (d) Vasudev Balwant Phadke

❖❖❖❖

१

ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीचा महाराष्ट्र (राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती)

घटक रचना :

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीची राजकीय परिस्थिती
१.३ ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीची आर्थिक परिस्थिती
१.४ ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीची सामाजिक परिस्थिती
१.५ समारोप
१.६ प्रश्न

१.० उद्दिष्ट्ये

१ ब्रिटीश राजवटीराजवटीच्या सुरुवातीची राजकीय परिस्थिती जाणून घेणे.
२. ब्रिटीश राजवटीपूर्वीच्या आर्थिक स्थितीचे आकलन करणे.
३. ब्रिटीश राजवटीपूर्वीच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषण करणे.
४. ब्रिटीश राजवटीपूर्वीची सांस्कृतिक स्थिती पडताळणे.

१.१ प्रस्तावना

पंधराव्या शतकात सागरी मार्गाचा शोध लागल्यानंतर, युरोपियन लोकांनी पूर्वेकडील सागरी मार्ग शोधून काढले. पोर्तुगीज, डच, फ्रेच आणि इंग्रज हे भारतामध्ये व्यापारउदीम विकसित करण्याच्या उद्देशाने येऊ लागले.

इ.स. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेनंतर, इंग्रजांनी भारतात, वेगवेगळ्या भागात आपली पकड घट्ट करायला सुरुवात केली. इंग्रजांकडे, सर थॉमस रो, कर्नल क्लोज, जनरल स्मिथ, एल्फिन्स्टन, ग्रॅण्ट डफ असे एकापेक्षा एक कर्तबगार लोक होते.

इंग्रजांनी, भारतीय राज्यकर्त्यांमधील दुहीचा अत्यंत कावेबाजपणाने फायदा घ्यायला सुरुवात केली. त्यांची कार्यपद्धती अत्यंत धोरणी होती. त्यांच्या दूरदर्शी कार्यप्रणालीमुळे, इंग्रजांनी महाराष्ट्रावर आपली पकड घट्ट करायला सुरुवात केली.

कंपनी सरकारने अनेक मराठा राज्यकर्त्यांना अटक केली. मराठ्यांबरोबर त्यांची ४३ वर्षांच्या कालावधीत, तीन महत्त्वाची युद्धे झाली (इ.स. १७७५ - इ.स. १८१८)

१.२ ब्रिटीश राजवटीपूर्वीचा महाराष्ट्राचा राजकीय इतिहास

एकोणीसाव्या शतकाच्या आरंभापासून, महाराष्ट्राच्या इतिहासातला नवीन अध्याय सुरु झाला आणि पर्यायाने भारतीय कंपनीचा नवीन गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीचे आगमन झाले. इ.स. १७९८ मध्ये, कंपनीच्या अध्यक्षाने, लॉर्ड वेलस्लीची, भारताचा गव्हर्नर-जनरल म्हणून नियुक्ती केली. ब्रिटीशांच्या भारतातील राजवटीचे रुपांतर भारत देश संपूर्णपणे ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली आणण्याच्या उद्देशाने लॉर्ड वेलस्लीची नियुक्ती झाली होती. परंतु, इ.स. १८०५ मध्ये, क्रूरता, दबावनीती आणि अफरातफर या आरोपांखाली त्याला परत बोलविण्यात आले. त्यांनी आतापर्यंत 'तैनाती फौज' (Subsidiary Alliance) या तंत्राचा वापर करून मराठा राज्यांना आपल्या वर्चस्वाखाली आणले होते.

जेव्हा कंपनीने ब्रिटीश सरकारकडून सतरा दशलक्ष पौंडांचे कर्ज घेतले होते तेव्हा युरोपमधील नेपोलियन विरुद्धची युद्धे, इजिप्तच्या लोकांचे नेपोलियन वर आक्रमण या सगळ्याच घटनांचा, भारतातील ब्रिटीश राजवटीवर परिणाम होत होता.

मराठ्यांचे राज्य हे अत्यंत कठीण परिस्थितीतून जात होते. इ.स. १७९५ मध्ये दुसरे माधवराव पेशवे (माधवराव नारायण) यांच्या देहांतानंतर त्यांना संतान नसल्यान, इ.स. १७९७ मध्ये महाराष्ट्रात बंडाळी उसळली. पेशव्यांच्या गादीसाठी, रघुनाथरावांचा दत्तक पुत्र (मयत पेशव्याचे आजोबा) आणि रघुनाथरावांच्या औरस पुत्र यांच्या कलहाला सुरुवात झाली. त्यात मराठा सरदार, शिंदे आणि होळकर सामील झाले. शिंदे आणि होळकरांमध्ये परंपरागत शत्रुत्व चालत आले होते. शिंदे यांनी रघुनाथरावांचा मुलगा बाजीराव द्वितीय याला पाठींबा दिला तर होळकरांनी रघुनाथरावांचा दत्तक मुलगा अमृतराव याला पाठींबा दिला. ह्या दोन वैमनस्य असलेल्या कुटुंबियांचे प्रतिभावान नेते, महादजी शिंदे आणि अहिल्याबाई होळकर(मल्हारराव होळकरांची सून) हे तेवढे कार्यरत नव्हते आणि त्यांचे वारसदार दौलतराव शिंदे आणि यशवंतराव होळकर हे ऐन विशीत होते. ऑक्टोबर इ.स. १८०२ मध्ये, यशवंतराव होळकरांनी, दुसरे बाजीराव आणि दौलतराव शिंदे यांच्या एकत्रित सैन्याला तोंड देऊन, पुणे येथील हडपसर येथे त्यांचा पराभव केला. पेशव्यानीं कोंकण सोडले आणि मुंबईतील कंपनी गव्हर्नर, जोनाथन डंकनला याचना केली. पेशव्यांना ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीकडून संरक्षण मिळाले. ३१ डिसेंबर इ.स. १८०२ मध्ये वसई येथे पेशव्यानी ब्रिटीशांबरोबर दुय्यम स्वरुपाचा तह केला. वसई येथे झालेल्या तहाच्या बदल्यात, इंग्रजांना मराठी मुलखाचे सार्वभौमत्त्व देण्यात आले, त्याबदल्यात इंग्रजांनी, पेशव्यांचे इतर सरदारांपासून संरक्षण करण्याचे वचन दिले.

१.२.१ लॉर्ड वेलस्लीचे धोरण (इ.स. १७९८-१८०५) :

गर्व्हनर जनरल, लॉर्ड वेलस्ली, (इ.स. १७९८-१८०५) ज्या पद्धतीने घटनाक्रम घडत होता ते पाहून वेलस्ली अत्यंत आनंदी झाला होता. कारण आता पेशव्यांच्या राज्यकारभारात कायदेशीर हस्तक्षेप करणे शक्य होते. पेशवे आता मराठा साम्राज्याचे नाममात्र (*defacto*) राजे होते. पेशव्यांच्या या राजकीय धोरणाची, मराठ्यांचे राजे यशवंतराव होळकर यांनी अत्यंत तीव्र

शब्दांत निर्भत्सना केली. ते म्हणतात, पेशव्यांनी मराठ्यांचे राज्य रसातळाला नेले, नष्ट केले. परंतु, नागपूरच्या दौलतराव शिंदे आणि रघुजी भोसले यांनी मात्र इंग्रजांच्या हस्तक्षेपाविरुद्ध प्रतिकार चालूच ठेवला. त्यांनी वसईच्या तहानुसार, स्वतःला इंग्रजांसमोर नतमस्तक व्हायला नकार दिला. लॉर्ड वेलस्लीच्या अत्यंत धोरणी डावपेचामुळे बडोद्याचे गायकवाड तटस्थ राहीले व यशवंतराव होळकर, युद्धसमाप्ती नंतर, परिस्थितीत काय बदल होतो ते पाहण्यासाठी थांबले व शिंद्यांनी मराठ्यांकडे आगेकूच केले. ह्या दोन्ही पक्षांनी ऑगस्ट इ.स.१८०३ मध्ये युद्ध आरंभ करण्याचा निर्णय घेतला. आपण इथे युद्धाचे, पेशव्यांच्या कारवायांचे आणि इतर मराठा सरदारांबद्दल संदर्भासहीत स्पष्टीकरण देणार नाही , कारण तो मराठा इतिहासाचा भाग आहे. तर इथे फक्त महाराष्ट्राच्या राजकीय पार्श्वभूमीचा अंदाज घेण्याच्या दृष्टीने, जितके संयुक्तिक आहे, तितक्याच भागावर प्रकाश टाकणार आहोत.

मराठामुलुखाची राजधानी पुणे, ह्या शहराची दुसरे माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतरच्या दोन दशकाच्या काळात अत्यंत दुर्दशा झाली. इंग्रजांच्या अधिपत्याखालील नाममात्र राजे पेशवे आणि दोन मराठा राजे शिंदे आणि भोसले यांच्यात युद्ध होऊन शिंदे-भोसलेंना पराभव पत्करावा लागला. हे युद्ध दोन भागात झाले. दक्षिणेचे जनरल आर्थर वेलस्ली आणि उत्तरेकडील लॉर्ड लेक द कंमाडर इन चीफ हे कंपनीच्या सेनेचे (सेनापती) म्होरके होते. पण ह्या विजयामागे, इंग्रजांचा कोणताही पराक्रम नव्हता तर अत्यंत दगाबाजीने मराठ्यांना हरविण्यात आले होते. अहमदनगर, सगळ्यात समर्थ किल्ला शिंद्यांनी जनरल आर्थर वेल्सलीला अर्पण केला. अलिगढमध्ये किल्ल्याच्या राखणदाराला सात लाखाची लाच देऊन इंग्रजांनी तो किल्ला काबीज केला. अनेक युरोपियन अधिकाऱ्यांनी त्यांचे मन वळविले.

उत्तरेमध्ये सुद्धा, युरोपियन अधिकाऱ्यांनी हीच युक्ती अवलंबली. शिंद्यांच्या सेनेचा सेनापती पेरॉन याने कोणताही लढा न करता अत्यंत शांतपणाने अलिगढचा किल्ला इंग्रजांच्या हवाली केला. गॅण्ट डफ ने आश्चर्य व्यक्त केले. तो म्हणाला, ज्या वेगाने हे युद्ध जिंकले जातेय, त्यामुळे संपूर्ण हिंदूस्थान आश्चर्यचकीत झाला आहे. परंतु त्या काळात त्याची माहिती संपूर्णपणे स्पष्ट स्वरुपात नव्हती. शिंदे आणि भोसले यांच्या पराभवानंतर आणि डिसेंबर इ.स.१८०३ मध्ये झालेल्या तहानंतर राजकारणाची समीकरणे बदलायला लागली. मोघलांचा सम्राट दुसरा शाह आलम, हा सुद्धा कंपनीला शरण आल्यानंतर इ.स.१८०३ मध्ये मुघल साम्राज्याचा अंत झाल्याची नोंद मिळाली. यशवंतराव होळकरांनी बहुमोल असा वेळ वाट बघण्यात घालवल्यावर जयपूरवर हल्ला चढविला. पण पुढे इ.स. १८०३ मध्ये कंपनीबरोबर त्यांची युती झाली. कंपनी गव्हर्नरने एप्रिल इ.स.१८०४ मध्ये होळकरांविरुद्ध युद्ध पुकारले. त्यांनी हे युद्ध दोन वर्ष लढले. साम्राज्यविस्ताराच्या अशा भयंकर युद्धाची परिणिती म्हणून इ.स.१८०५ मध्ये लॉर्ड वेलस्लीला परत बोलवण्यात आले. इ.स.१७९७ ते इ.स.१८०६ च्या दरम्यान कंपनीचे कर्ज १७ दशलक्षपासून, ३१ दशलक्ष एवढे वाढले. कंपनीने कार्यपद्धती बदलली आणि हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्विकारले.

१.२.२ माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनचे मुंबईतील (महाराष्ट्र) कार्य :

इंग्रजांच्या बदलेल्या धोरणामुळे इ.स.१८०५ ते इ.स.१८११ या कालावधीत दुसरा पेशवा बाजीराव यांनी शांतता अनुभवली. कर्नल क्लोजने इ.स.१८०३ मध्ये पेशव्यांबरोबर जाऊन पुन्हा पुण्याच्या पेशव्यांच्या गादीवर त्यांची पुनर्स्थापना केली. इ.स.१८११ पर्यंत तो पुण्यात राहीला. त्यानंतर इ.स.१८११ नंतर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन 'रेसिडेन्ट' म्हणून आला आणि

बाजीरावांच्या त्रासाला सुरुवात झाली. पेशव्यांच्या जाचाला कंटाळलेले जहागीरदार रेसिडेंटतर्फे ढवळाढवळ करायला लागले. एलफिन्स्टनने इ.स.१८१२ मध्ये पंढरपूरमध्ये जहागिरदारांना सनद देऊन त्यांना पूर्ण संरक्षण देण्यात आले. एलफिन्स्टनने कोल्हापूरातील आणि सावंतवाडीतील राज्यकर्त्यांना पेशव्यांच्या अधिपत्यापासून पूर्ण मुक्त केले.

एलफिन्स्टनचे पेशव्यांबाबतचे मत तितकेसे चांगले नव्हते. त्याच्या दृष्टीने पेशवे हे अत्यंत घाबरट व आळशी होते. दुसऱ्या बाजीरावाने आता हुजारत येथील सैन्य बळकट करावयास सुरुवात केली त्यासाठी त्याने गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो (इ.स.१८०७-इ.स.१८१३) यांची परवानगी मिळविली. त्याने कॅप्टन जॉन फोर्ड याला त्या सैन्याचा सेनापती बनवून त्याबद्दल्यात तो पेशव्यांशी प्रामाणिक राहील असे वचन दिले. पेशव्यांना अशा कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्याची गरज होती. त्यासाठी त्यांनी रक्कम उभी करण्यासाठी वेगळ्या पद्धती अवलंबायचे ठरविले. ह्या पद्धतीनुसार मोठ्या प्रमाणावर पैसा उभा राहीला. आता तो आत्मनिर्भर झाला आणि इंग्रजांपासून सुटका मिळविण्याचा मार्ग शोधू लागला. परंतु स्वकीयांपासूनच त्यांच्यावर सतत कारवाया होत होत्या. सामान्य माणसाची पिळवणूक अधिकच वाढली आणि राजकीय वातावरण हे संशय, द्वेष, भीती, कट-कारस्थान याने दूषित झाले. दुसरा पेशवा बाजीराव आता जास्तीत जास्त संदिग्ध व्यक्तिंवर विश्वास टाकायला लागला. जसे माणकेश्वर, रास्ते, मोदी, पिंगळे, त्रिंबकजी डेंगळे यांच्या कारवायांमुळे बाजीराव पेशव्यांच्या अधोगतीचा वेग वाढला.

१.२.३ गंगाधर शास्त्रींचा खून (इ.स.१८१५) व पेशव्यांची भूमिका

जुलै १८१५ मध्ये गंगाधर शास्त्रींच्या खूनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. त्यांची नियुक्ती बडोद्याचे संस्थानिक फतेहसिंग गायकवाड यांनी पेशव्यांच्या (विशेष वेतन अधिकारांचा) निकाल लावण्यासाठी म्हणून फेब्रुवारी १८१४ मध्ये केली होती. पेशव्यांनी, बडोदा संस्थानातून मोठ्या प्रमाणावर रक्कमेची मागणी केली होती. ही रक्कम १७५३ पासून भरावयाची होती. बडोद्यावरुन आलेल्या गंगाधर शास्त्र्यांना ह्या मागण्या अवाजवी वाटल्या व वाटाघाटीला वेळ लागू लागला. पेशव्यांनी जमीनदारांकडून मोठ्या प्रमाणावर कर लावून रक्कम उभारली होती. त्यामुळे, अधिक वेळ घालविणे त्यांना शक्य नव्हते. बाजीरांवाचा कावेबाज सल्लागार त्रिंबकजी जो इंग्रजांविरुद्ध, असंतुष्ट मराठ्यांना एकत्र करण्यात गुंतला होता, त्याने शास्त्रींपासून लवकरात लवकर मोकळे होण्याचा सल्ला दिला आणि जुलै १८१५ मध्ये गंगाधर शास्त्रींचा खून झाला. एलफिन्स्टनला ह्यात त्रिंबकजीचा हात असल्याची शंका आली. त्यांने पेशव्यांना ह्यांची चौकशी करण्याचे आदेश दिले. आधी पेशव्यांनी ही विनंती धुडकावून लावली परंतु नंतर अत्यंत दबाव आल्याने त्रिबकजींना वसंतगड च्या किल्ल्यात अटक केली व तेथून पुढे ठाण्याच्या किल्ल्यावर हलविले. १८१६ मध्ये त्रिंबकजी ठाण्याच्या किल्ल्यावरून सुटले. पेशवे इंग्रजांविरुद्ध मराठ्यांची आघाडी उभारण्यात अत्यंत व्यस्त होते.

जेव्हा दुसरे बाजीराव पेशवे इंग्रजांची सत्ता उधळून लावण्यासाठी गुप्त कारवाया करीत होते तेव्हा नागपूरचे दुसरे रघुजी भोसले यांचा मृत्यू झाला. त्यांच्या नंतर त्यांचा मुलगा गादीवर आला. रघुजींचा पुतण्या अप्पासाहेब नागपूरच्या भोसल्यांच्या गादीसाठी प्रयत्न करीत होता. तो काळजीवाहक शासक झाला. १८१३ मध्ये लॉर्ड मिंटो नंतर लॉर्ड हेस्टींग आला त्याने ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन १८१६ मध्ये आप्पासाहेबांना कंपनीबरोबर तह करण्यास भाग पाडले. ह्या तहानुसार भोसल्यांनी सार्वभौमता गमावली आणि मराठ्यांच्या एकजुटीमध्ये फूट

पडली. कंपनीविरुद्ध चळवळीसाठी पेशव्यांचा भोसल्यांवर खूप भर होता. त्रिबंकजीच्या अटकेसाठी कंपनीकडून दबाव वाढत होता. पेशव्यांच्या वाढत्या कारवायांमुळे जुलै १८१७ मध्ये एल्फिन्स्टनने पेशव्यांना नवीन तहावर सह्या करायला भाग पाडले. पुण्यातील ह्या नवीन तहानुसार पेशव्यांनी मराठ्यांच्या राज्यप्रमुखपदाचा त्याग केला. ह्या तहानुसार, पेशव्यांनी इंग्रजांना जवळजवळ चौतीस लाखाच्या किंमतीचा भूभाग, पूर्वी मान्य केल्याप्रमाणे सैन्य न पाठविल्याने भरपाईच्या स्वरुपात देण्यात आला. पेशवे एल्फिन्स्टन शिवाय दुसऱ्या कोणाशीही चर्चा करु शकत नव्हते. कंपनीने पेशव्यांना एकाकी पाडले आणि महाराष्ट्राबाहेरील सर्वभागावरील हक्क सोडून देण्यास सांगितले. ह्या तहानंतर महाराष्ट्रातील पेशव्यांचे पर्व खऱ्याअर्थाने संपुष्टात आले. बाजीरावांनी इंग्रजांचा विळखा सोडविण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. लॉर्ड हेस्टींगने पेंढारींच्या विरुद्ध मोहीम उघडली. जदुनाथ सरकार म्हणतात, ''१८ व्या शतकाच्या अखेरीस लाखो असहाय्य सैनिक, कोणत्याही सैन्यात जायला तयार होते.''

१.२.४. पिंडारी

पिंडारी हे लुटारु वृत्तीचे होते आणि त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नव्हते ते प्रामुख्याने उत्तर भारतातून होते. ग्रॅण्ट डफच्या मते, ''बेरोजगार मुस्लिम तरुण त्यांना जाऊन सामील होत. पेंढाऱ्यांना आर्थिक आमिषे दाखविली जात होती. ते पठाण प्रमुख अमिर खान ह्याच्या नियंत्रणाखाली होते. पेंढारी शिंदे आणि होळकर यांच्याशीही संबंधित होते आणि म्हणूनच पेंढाऱ्यांच्या विरोधातील कोणत्याही कारवाईचा उत्तर भारतातील मराठ्यावर परिणाम होणार होता आणि म्हणूनच लॉर्ड हेस्टींगने दौलतराव शिंदे बरोबर पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तह केला.

१.२.५ ब्रिटीशांविरुद्ध सशस्त्र उठाव

नोव्हेंबर १८१७ मध्ये कंपनीने शिंद्यांबरोबर तह केला. त्याच महिन्यात, पेशव्यांनी ब्रिटीशांची पुण्यातील रेसिडन्सी जाळली आणि खडकी येथील कॅम्पवर हल्ला केला. युरोपियन मुख्य सेनापती जॉन फोर्ड याने पेशव्यांची फसवणूक केली. फेब्रुवारी १८१८ मध्ये कंपनीने पेशव्यांना आष्टी (सोलापूर) येथे हरविले. पेशव्यांचे सेनापती बापू गोखले हे होते.

दरम्यानच्या काळात, अप्पासाहेब भोसल्यांनी पेशव्यांच्या बंडानंतर एक सर्वसामान्य कारण बनविले. त्यांनी ब्रिटीशांवर हल्ला केला. पण नोव्हेंबर १८१७ मध्ये सिताबर्डी येथे आणि पुन्हा डिसेंबर १८१७ मध्ये, नागपूर येथे त्यांना पराभव पत्करावा लागला. त्यानंतर तो उत्तरेकडे पळून गेला व १८४० मध्ये जोधपूर येथे मरण पावला. दुसरा मल्हारराव होळकर, याने सुद्धा पेशवे आणि भोसल्यांना सहानुभूती दाखवून, इंग्रजांविरुद्ध लढा पुकारला, त्याने अत्यंत निकराचा लढा दिला पण अत्यंत दगाबाजीने महीदपूर येथे डिसेंबर १८१७ मध्ये त्यास पराभव पत्करावा लागला.

पेशव्यांनी अक्षरक्षः जागोजागी मदतीची याचना केली. शिंदे आणि गायकवाड सोडता भोसले आणि होळकर हे मराठा सरदार स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी पेशव्यांना सामील झाले. जून १८१८ मध्ये, सर जॉन माल्कम यांना पेशवे शरण आले. तेथून पुढे बिठूर, कानपूर, उत्तरप्रदेश येथे त्यांना हद्दपार करण्यात आले आणि इ.स.१८५१ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे आजपर्यंतचे अपराध, पराभव, नाकर्तेपणा, व्यक्तिमत्त्वामधील त्रुटी ह्या त्यांच्या परकियांविरुद्धच्या शेवटच्या निकराच्या लढ्यामुळे धुवून निघाल्या. त्यांच्या नाकर्तेपणा बद्दल त्यांना अनेक दूषणे लावता आली असती. पण ज्यापद्धतीने परकीय साम्राज्याविरुद्ध त्यानी लढा

दिला तो पाहता असे करणे चुकीचे ठरेल. स्वातंत्र्यलढ्याच्या विझत चाललेल्या ज्योतीची ती शेवटची फडफड होती. कंपनीने त्यांच्या मातब्बर सरदार, राजकारण्यांना आता उभ्या महाराष्ट्राला बंदी बनवले होते. दरम्यानच्या काळात, जनरल ऑर्थर वेलस्लीला, ड्यूक ऑफ वेलिंग्टन च्या पदावर बढती देण्यात आली. त्याने फ्रेंच राज्यक्रांतीचा जनक नेपोलियन बोनापार्ट याला जून इ.स.१८१५ मध्ये वाटरर्लू येथे पराभूत केले होते. मराठ्यांचा ऱ्हास होण्यापूर्वी, युरोपमध्ये चाललेल्या क्रांतीच्या मार्गात तो अडथळे आणत होता. महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील सर्व जमीन ज्यावर मराठ्यांचे राज्य होते ते सर्व राजकीय स्वातंत्र्य गमावून बसले. तसेच भारतातील बहुतेक सर्व प्रदेश ही इंग्रजांनी पुढील चार दशकात काबीज केले.

१.२.६ महाराष्ट्रातील इतर राजकीय शक्ती केंद्रे

जेव्हा ईस्ट इंडीया कंपनी मराठ्यांच्या राज्याचा अंत करायचा प्रयत्न करीत होती. तेव्हा काही ठिकाणी, जुन्या राजघराण्यातील राजपुत्र जनतेवर आपला अधिकार चालवत होते. शिवरायांचे वंशज सातारा येथे अटक झाले. जरी पेशव्यांनी त्यांना सोडून दिले असले तरी त्यांच्या कुटुंबाला परंपरागत आदर व प्रतिष्ठा होती. पुण्या व्यतिरिक्त नागपूर, कोल्हापूर, सावंतवाडी आणि जंजिरा ही महत्त्वाची राजकीय शक्ती स्थळे होती.

जेव्हा इ.स.१८०४ पासून यशवंतराव होळकरांनी कंपनी विरुद्ध मोहीम उघडली तेव्हापासून कोल्हापूर आणि सावंतवाडी ही समुद्री चाच्यांची घरे बनली. ईस्ट इंडीया कंपनीचा व्यापार ह्या चाच्यांमुळे नुकसानीत जाऊ लागला. कोल्हापूरचा राजा हा मराठा मुलुखाच्या केंद्र सरकारपेक्षा वेगळे धोरण राबवित होता. सांगली येथे इ.स.१७४९ मध्ये झालेल्या संमेलनानंतर शिवाजीच्या घराण्यामधील वरीष्ठ आणि कनिष्ठ यांच्या अधिकारांची वाटणी झाली. कोल्हापूरातील मराठ्यांचे सरकार आणि पुण्यातील पेशव्यांचे सरकार यांच्यातील वैमनस्य सर्वख्यात होते.

जेव्हा कंपनी सरकार, दुसरा बाजीराव पेशव्यांबरोबर युद्ध करीत होते तेव्हा इ.स.१८१७ मध्ये सावंतवाडीचा कारभार राणी दुर्गाबाई सांभाळीत होत्या. त्या अत्यंत प्रभावी होत्या व इंग्रजी सत्तेला नतमस्तक होण्यास त्यांनी नकार कळविला. त्यांनी सावंतवाडीनजीकच्या भागात आक्रमण करण्याची धमकी इंग्रजी सरकारला दिली. कंपनीला हे आक्रमण थांबविण्यासाठी सर डब्लू, ग्रॅम्ट किर ला पाठवावे लागले. त्याने इ.स.१८१८ मध्ये यशवंतगड व निगटीचा किल्ला काबीज केला. इ.स.१८१९ मध्ये त्याच्या सैन्याने राणीला सर्व अटी मान्य करण्यास भाग पाडले. त्यानंतर, लवकरच तिचे देहांत झाले. तिसऱ्या खेम सावंतच्या विधवा बायका, संपत्तीवरचा त्यांचा मालकी हक्क सांगण्यात व्यस्त होत्या . शेवटी तेथील मराठा साम्राज्याचाही अंत झाला.

जंजिरा राज्यात सुद्धा हबशी आणि ॲबेसिनियन लोकांची राज्ये होती. त्यांच्या उत्तरेकडे रोहा नदी व दक्षिणेकडे सावित्री नदी होती. अहमदनगरच्या संस्थापकाने मराठ्यांना जंजिऱ्याचा ॲबेसिनियन सरसेनापती ह्यास अटकाव करण्यासाठी म्हणून नियुक्त केले होते. (इ.स.१४९०-इ.स.१५००) मध्ये ॲबेसिनियन आणि जंजिऱ्याचे सिद्दी पुढे जाऊन मुघलांना मिळाले. पश्चिम किनाऱ्यावरच्या मुघल नौदलाचे ते सरसेनापती बनले. मराठ्यांचे समुद्रावरील वाढते बळ आणि इंग्रजांचे वर्चस्व, यामुळे पश्चिम किनाऱ्यावरील चाचेगिरीला आळा बसला. इंग्रजांबरोबर सिद्धीचा सलोखा असल्यामुळे मराठ्यांविरुद्ध त्याचा उपयोग होत होता. मराठ्यांच्या दिडशे वर्षाच्या कारकीर्दीत त्यांची पश्चिम किनाऱ्यावर सत्ता असूनही त्यांना जंजीरा काबीज करता आला नाही.

परंतु जंजिऱ्याच्या सिद्धीने, इंग्रज व मराठ्यांच्या युद्धादरम्यान इंग्रजांना साथ देण्यास नकार कळविला. इ.स.१८३४ मध्ये जंजिरा इंग्रजांच्या अधिपत्या खाली आली.

इतर महत्त्वाचे भूभाग (प्रदेश) ज्यांना ऐतिहासिक महत्त्व होते. जसे आधुनिक रायगड जिल्हा जो कुलाबा म्हणून ओळखला जातो. मराठ्यांच्या नौदलाचे परंपरागत खलाशी आंग्रे होते. पुण्याच्या मराठ्यांच्या केंद्र सरकारचे नियम पाळायला आंग्रे तयार नव्हते. नौदलातील आंग्रेंच्या वादग्रस्त वारसाहक्कामुळे पुढे पुढे ते निष्प्रभ ठरु लागले. तथापि महाडला अत्यंत महत्त्वाचा असा दर्जा होता. नाना फडणीसने त्याची व्यक्तिगत मालमत्ता महाड येथे लपवून ठेवली होती. दुसरा बाजीराव पेशवा यशवंतराव होळकरांपासून वाचण्यासाठी इ.स.१८०२ मध्ये महाड येथे आश्रयाला आला होता. शिंद्यांचा सरसेनापती बाबुराव हा प्रदेश सांभाळत होता. पेशव्यांनी त्यांच्या पत्नीला खाजगी मालमत्तेसह महाडला पाठविले.

मानाजी आंग्रे इ.स.१८१७ मध्ये मृत्यू पावला. रघुजी त्याचा १४ वर्षांचा मुलगा त्याचा वारसदार बनला. लेफ्टनंट कर्नल प्रोथर आणि मेजर हॉलने त्या भागाचा ताबा घेतला. इ.स.१८२२ मध्ये आंग्र्यांचे मालकीहक्काचे प्रश्न मिटले आणि कंपनीने तो भाग त्यांच्या अधिपत्याखाली आणला.

नेपोलियनविरुद्धच्या युद्धा दरम्यान इंग्रज संपूर्ण पश्चिम किनारा सुरतेपासून गोव्यापर्यंत आपल्या अधिपत्याखाली आणण्याचा प्रयत्न करीत होते. ब्रिटीशांनी आतापर्यंत किनाऱ्याच्या संरक्षणासाठी चार युद्धांचा निकाल लावला होता. तोपर्यंत नेपोलियनने आयबेरियन द्विपकल्प (पोर्तुगाल-स्पेन) पार केले होते. खरे पहाता, पोर्तुगीज इंग्रजांबरोबरच्या बदललेल्या संबंधामुळे नाराज होते आणि सातारच्या राण्यांमुळे, पिंटो बंडामुळे गोवा धुमसत होता. इ.स.१८१५ पर्यंत इंग्रजांनी औगाडे (Augade) येथे आपले सैन्य नियुक्त केले. त्याचा परिणाम बाजूचा प्रदेश सावंतवाडी व वेंर्गुल्यावर झाला. परिस्थिती गंभीर व तणावग्रस्त बनली आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले.

अशी अनेक ठिकाणे होती, लहान राज्ये, तीर्थस्थळे, जुन्या काळातील महत्त्वाची ठिकाणे जी राजकीय चर्चेत आली नव्हती पण ती लोकांच्या मनात घर करुन बसली होती. उदा. सांगली, मिरज, मुधोळ, अकल्लकोट, औध, जथ, फल्टन, भोर, जव्हार, डोग इ.अशी संस्थाने नाशिक, थेऊर, पंढरपूर जेथे पेशवा आणि त्यांच्या सरदारांनी भेटी दिल्या होत्या. अहमदनगर, औरंगाबाद, खानदेश, कल्याण, ठाणे, वसई अशी एके काळची नावाजलेली ठिकाणे पण काळाच्या ओघात राजकीय शक्ती कमी पडल्याने, पडद्याआड गेली.

पुण्यातील पेशवे सरकारच्या धाडसी मोहीमा आणि आर्थिक संकटे यांचा परिणाम त्यांच्या राजकीय बळावर झाला. पेंढाऱ्यांच्या कारवायांमुळे उत्तर महाराष्ट्रात बंडाळी माजली होती आणि पश्चिम किनाऱ्यावर समुद्री चाच्यांनी घबराट निर्माण केली होती. मराठ्यांचे पेशवे सरकार आणि अनेक राजकीय सत्तास्थानांमधील रस्सीखेच आणि इतर कारणांनी जनतेचे दु:ख कोणीही कमी करू शकत नव्हते. पुण्याच्या शहरी राज्यकारभाराची शोकांतिका होती तर इतर राजकीय दृष्ट्या कमी महत्त्वाच्या ठिकाणी काय परिस्थिती असेल, याची कल्पनाच केलेली बरी.

१.२.७ पेशवाईचा राज्यकारभार

पेशव्यांची राजधानी पुणे होती. मध्ययुगीन काळात राजधान्यांची जी दुरावस्था होती, त्याचे प्रत्यंतर पुण्यात येत होते. राज्यभरात लुटमार, नासधूस चालूच होती. बाजीराव आणि अमृतराव यांच्या झालेल्या युद्धामुळे, राज्यव्यवस्था पूर्ण विस्कळीत झाली होती. यशवंतरावांनी भावाच्या खूनाचा सूड घेण्यासाठी जो थरार घडवून आणला होता त्याची आठवण अजून ताजी होती. इ.स. १८०० मध्ये नाना फडणीस वारल्यानंतर उत्तर भारतातील अरब आणि पठाण सैनिकांनी पुणे काबीज केले. ती घटना आणि आधी पगार दिल्याशिवाय मृत शरीर न हलवण्याची अट अरब सैनिकांनी घातली होती.

पुण्याचे कोतवाल (पोलिस संरक्षक) यांना मानाचा हुद्दा होता. ते पेशव्यांच्या नियंत्रणाखाली काम करीत होते. पहिल्या माधवराव पेशव्यांनंतर केंद्र सरकारचे नियंत्रण कमी झाले आणि नाना फडणीस यांनी काही बेजबाबदार अशा व्यक्तींची नियुक्ती केली. अशा दोन वाह्यात कोतवालांपैकी एक औरंगाबादचा घाशीराम सवाईदास आणि त्यांचा भाऊ आनंदराव यांनी पुण्यात इ.स.१७७७ ते १७९८ पर्यंत कारभार केला. प्रा. अ.रा. कुलकर्णी यांनी त्यांच्या कामासंबंधी अधिक माहिती दिली आहे.

कोतवाल साधारणत: पुढील कामे करीत असत :-

अ) लहान स्वरुपाचे तंटे सोडविणे.
ब) सरकारला मनुष्यबळ पुरविणे.
क) रोजच्या कामाचे दर ठरविणे आणि नोंद ठेवणे.
ड) पेंढारी आणि बाजेकऱ्यांकडून कर वसुली करणे.
इ) वजनावर स्टॅम्प लावणे.
फ) लोकसंख्येची नोंद ठेवणे.
ह) शहराच्या आर्थिक व्यवहाराची नोंद ठेवणे व दर महिन्याला फडणीसांकडे सोपविणे.
ई) घराच्या खरेदी-विक्रीची नोंद ठेवणे.
ज) कार्यालयाच्या सांस्कृतिक व मनोरंजनाच्या कार्यावर खर्च करणे.
क्ष) रस्त्यावरील दिवे लावणी करणे.
य) महत्त्वाच्या व्यक्तींच्या मनोरंजनावरील खर्च करणे.

कोतवालाच्या हाताखाली लेखनिक, घोडेस्वार, निरोप्या, हेर आणि रक्षक असत. वर नमुद केलेले दोन कुविख्यात कोतवाल यांनी जवळजवळ दोन दशके दबावनिती अवलंबून कारभार केला. ऑगस्ट १७९१ मध्ये पुण्याच्या नागरीकांनी घाशीराम कोतवालाच्या दुष्कृत्याबद्दल आवाज उठविला, ज्याने संपूर्ण मराठा राज्यात खळबळ माजली. त्यांचे कारण म्हणजे, बावीस तेलंग ब्राह्मण घाशीराम कोतवालाच्या पोलिस ठाण्यात मृत पावले तेव्हा पेशवे सरकारचा नाममात्र राजा नाना फडणीस, ज्याने घाशीरामाच्या दुष्कर्मांना खतपाणी घातले होते त्याने त्याला बदलून त्याचा भाऊ आनंदराव याला कोतवाल बनविले. आनंदराव घाशीरामापेक्षा अघोरी होता. ह्या सगळ्या घटना, ब्रिटीश राजवटीपूर्वी राजकीय दृष्ट्या पुढारलेल्या प्रांतात काय स्थिति होते याचे दर्शन करतात.

आपली प्रगती तपासा :-

१) कोतवालाची काय कामे होती ?

१.३ ब्रिटीश राजवटीपूर्वीच्या सुरुवातीची महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती

मराठ्यांच्या राज्यात बहुतांश जनतेचा शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. काहींनी सैनिकी व्यवसाय निवडला होता. परंतु सैन्यात असतानाही सैनिक शेती व्यवसायापासून दूर गेले नव्हते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात प्रथम शेतकरी मग सैनिक असा भाग होता. शिवाजींनी सैनिकी कार्यक्रम 'मुलुखगिरी' अशा पद्धतीने आखला होता की शेतकऱ्यांचे भले व्हावे. सैनिक दसऱ्याच्या दिवशी (ऑक्टोबर महिन्यात) मोहीमांवर निघायचे आणि होळीला (एप्रिल मे मध्ये) परतायचे ही पद्धत पुढील काळात सुद्धा कायम राहीली.

१.३.१ कृषी अर्थशास्त्र

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था इतर राज्यांप्रमाणे मुख्यत्वे शेतीवर अवलंबून होती. शेती करण्याची पद्धत जुनी व परंपरागतरित्या बैलांनी नांगरण्याचीच होती. पाणी सिंचनाची पद्धत, धान्य, बी-बियाणे, साठवून ठेवण्याची पद्धत व बाजारात विकण्याची पद्धत परंपरागत होती.

सातारा, पुणे, अहमदनगर, सोलापूर येथील मोठ्या प्रमाणावरची जमीन नापीक असल्याने पडून होती. चांगल्या शेती व्यवसायाच्या धोरणाचा अभाव आणि उभ्या पिकांचा नाश होत होता. एकतर खानदेशातील दरोडेखोर वृत्तीचे पेंढारी किंवा अँग्लो-मराठा युद्ध आणि गादीसाठी भांडणे इत्यादी कारणांवरुन उभ्या पिकात सैन्य घालण्याच्या प्रवृत्तीमुळे दख्खनची शेती व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली. इ.स.१८०२-०३ च्या काळातील उत्तर दख्खनमधील ओला दुष्काळ आणि त्याचे इतर भागातील प्रत्यंतर याने जनतेचे हालहाल झाले. अँग्लो-मराठा युद्धानंतरच्या राजकीय अस्थैर्यामुळे शेती व्यवसाय पूर्णपणे विस्कळीत झाला.

कंपनीने बनविलेल्या तैनाती फौजेला पेशव्यांनी स्विकारले आणि शेतकऱ्यांच्या हालात अजूनच भर पडली . पेशव्यांनी शेतकऱ्यांकडून कर वसूल करुन राज्याच्या सैन्यासाठी (जे कॅप्टन फोर्डच्या नियंत्रणाखाली होते) हातभार लावण्याच्या विविध युक्त्या शोधून काढल्या. ज्यात सगळ्यात जास्त बोली लावणाऱ्याला इतर शेतकऱ्यांकडून कर वसुली करण्याचा अधिकार प्राप्त होई. अहमदनगरमध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी, अधिक करवसुलीसाठी, शेतकऱ्यांना नापिक जमीनही कसायला भाग पाडली. पेशव्यांच्या काळामध्ये जहागीरदारांवर भयंकर दबाव आणण्यात आला होता. वंशपरंपरागत मिळालेली संपत्ती पेशव्यांना देण्यास जहागीरदारांनी नकार दिला. बहुतेक जहागिरदारांकडे 'सरंजाम' ही पद्धती होती (सरंजाम म्हणजे काही ठराविक काळासाठी राजकीय अधिकार आणि फायदे) आणि जवळजवळ १०,००० ते २०,००० किंमतीची जमिन होती. पेशव्यांच्या कार्यपद्धतीमुळे, देशमुख, देशपांडे आणि इनामदार यांच्या अधिकारांवर मोठ्या प्रमाणावर गदा आली.

पेशव्यांच्या अत्यंत वाईट अशा शेती व्यवस्थेच्या कारभारामुळे सगळेच दु:खी झाले होते. पण ब्रिटीश राजवटीपूर्वीच्या महाराष्ट्राची शेती व्यवस्था एवढी काही वाईट नव्हती, जरी तिच्यावर अनेक संकटे आली तरीही त्यामध्ये एक प्रकारची छुपी शक्ती होती. सह्याद्रीचे खोरे, अहमदनगरचा दक्षिणी भाग, पटवर्धनांच्या अधिपत्याखाली असलेला महाराष्ट्राचा दक्षिणी भाग हे चांगल्या प्रकारे सुपिक व अधिक लोकसंख्येचे प्रदेश होते.

१.३.२ अन्नधान्यांचे बाजारभाव

महाराष्ट्राच्या सरहद्दीवरुन छत्तीसगढ़ मधून जाताना एलफिन्स्टनने महाराष्ट्रासंर्भात पुढील वर्णन केले, ''देश समृद्ध होता. एका रुपयाला सात ते आठ किलोग्रॅम घी, साठ किंलो तांदूळ, ऐंशी किलो गव्हाचे पिठ मिळत होते.''

हे एकोणीसाव्या शतकातील देशाचे वर्णन आहे.

दुसरा बाजीराव पेशव्याच्या पराभवानंतर धान्यांच्या किंमती एकदम घसरल्या. धान्यांचे उत्पादन अत्यंत कमी होते त्याचे कारण अचानक कमी झालेली मागणी हे होय. दुकानदारांनी भाववाढीच्या उद्देशाने धान्याची साठेबाजी केली. परंतु मागणीच नसल्याने किंमती घसरल्या. शेतकऱ्यांचे हाल यामुळे अधिकच वाढले. शेतकऱ्यांना त्यामुळे एका बाजूने घसरलेल्या किंमतीमुळे उत्पन्नात घट आणि दुसरीकडे वाढीव कर, अशा दुहेरी प्रश्नांना सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांना शेतजमिनी विकाव्या लागल्या आणि कर्ज फेडण्याची वेळ आली. या सगळ्या प्रकारामुळे ग्रामीण जनजीवन भयंकर अशा समस्येतून जात होते. गोदावरीच्या पूर्वेकडचा भाग आणि संपूर्ण खानदेशात ओला दुष्काळामुळे प्रश्न अधिक गंभीर झाला होता. शहरातील परिस्थिती ग्रामीण भागापेक्षा अधिक कठीण होती. विस्कळीत परिस्थिती आणि स्वार्थी कोतवालांसारखे अधिकारी यामुळे परिस्थिती चिघळली होती. अगदी राजकीय दृष्ट्या सक्षम असलेल्या कोल्हापूर, सांगली, मिरज किंवा जंजिरा, सावंतवाडी आणि इतर लहानमोठी शहरे सुद्धा वस्तुच्या खरेदी-विक्री करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या ढवळाढवळी पासून सुटू शकली नव्हती. पैठण, पुणे, ठाणे किंवा कल्याण मधील व्यापाऱ्यांचे ग्रामीण भागाशी संबंध होते. परंतु विस्कळीत परिस्थितीमुळे व्यापारावर विपरीत परिणाम झाला होता. भौगोलिक परिस्थितीमुळे वस्तुंच्या दळणवळण व वाहतुकीवर परिणाम झाला होता. मधल्या दलालांनीही अनेक प्रश्न निर्माण केले होते. उत्तर महाराष्ट्रातील श्रीमंत वस्त्यांवरील, पेंढाऱ्यांनी घातलेल्या दरोड्यामुळे तेथील जनजीवन अधिकच हालाखीचे झाले होते.

१.३.३ आपली प्रगती तपासा :-

१) ब्रिटीश राजवटीपूर्वीची महाराष्ट्रातील शेतीचे अर्थकारण कसे होते ?

२) अन्नधान्यांचे बाजारभाव यांवर टीप लिहा.

_____

_____

_____

_____

_____

१.४ ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीची सामाजिक परिस्थिती

महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करताना, आपण हिंदू समाजावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करणार आहोत. मुस्लिम वस्त्याही होत्या पण त्या फक्त जिथे मुस्लीम राजे होऊन गेले अशा प्रदेशापुरत्या मर्यादित होत्या. उदा. खानदेश, दौलताबाद, अहमदनगर, जंजिरा आणि पश्चिम किनारपट्टीवरील बंदरे परंतु योग्य आणि सविस्तर माहीतीच्या अभावी महाराष्ट्रातील सामाजिक जडणघडणीविषयी (प्रामुख्याने मराठ्यांच्या राजवटीच्या अंतास) भाष्य करणे चुकीचे ठरेल.

१.४.१ महाराष्ट्राची लोकसंख्या :

मुंबई सरकारचा सांख्यिकी पत्रकार साईक्स याने खानदेश, पुणे, अहमदनगर आणि धारवाड येथील एकूण लोकसंख्या इ.स.१८२८ मध्ये २७ लाख इतकी दर्शविली. यावरुन आपल्याला एकूण लोकसंख्येविषयी अंदाज येऊ शकतो. जर आपण अमराठी लोकसंख्या गाळून टाकली आणि केवळ सोलापूर, कोल्हापूर आणि कोकण या भागांचा विचार केला तरी सुद्धा ३५ ते ४० लाखापर्यंत आकडा जातो. जर आपण मराठी भाषिक संस्थानांचा विचार केला तर ही संख्या पन्नास लाखाच्या वर जात नाही. हा फक्त दिडशे वर्षापूवी असलेल्या लोकसंख्येचा जुजबी अंदाज आहे. धार्मिक पातळीवर लोकसंख्येचा विचार करता ते अधिक कठीण जाईल. मुस्लिम अधिपत्त्याखाली असलेल्या भागांमध्ये मुसलमान लोकसंख्या कमी होती. त्यामुळे मुस्लिम जनसंख्या संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेली होती आणि जवळपास तीन ते चार लाखाच्या आसपास असू शकेल.

१.४.२ महाराष्ट्रातील धार्मिक स्थिती :

हिंदू समाज हा परंपरागत चालत आलेल्या रिती-रिवाजांना धरुन आहे. जसजसे आपण मराठ्यांच्या अंताच्या जवळ जातो आहोत तसतसा हा समाज अधिकच धार्मिक दृष्ट्या दृढ बनत गेला. आध्यात्मिक आणि वैचारिक पातळीवर त्याचा ऱ्हास व्हायला सुरुवात झाली. पुराणातील ज्ञानावर जनतेचा अटळ विश्वास होता. फारच कमी लोकांना 'शास्त्र' वाचायला जमायचे. बाहेरच्या जगाविषयीचे त्यांचे अज्ञान अगाध होते. साधू महात्म्यांच्या शिकवणुकीमुळे प्रारब्धावर जनतेचा विश्वास बसला होता. किर्तन अभंगातच सर्व समाज रममाण झाला होता. पेशवे आणि मराठ्यांच्या राजाश्रयामुळे धार्मिक कर्मकांडांना उत आला होता. पेण, पुणे येथील मराठ्यांचे पेशवे सरकार, विरोधी व्यक्ती, मुत्सद्दी सैनिक आणि पेंढाऱ्यांच्या संपर्कात आले. 'गारदी' नावाचे अमहाराष्ट्रीय लोक महाराष्ट्रात नोकरीच्या निमित्ताने आले.

गो.स. सरदेसाई यांनी त्यावेळेची परिस्थिती पुढील शब्दांत मांडली आहे. वरीष्ठ जातीतील जनता ही धार्मिक कर्मकांडातून अंधश्रद्धेच्या दिशेने झुकत होती. जाति-व्यवस्था अधिक घट्ट होत चालली होती आणि प्रगतीशील समाजाच्या कोणत्याही खाणाखूणा त्यावेळच्या परिस्थितीत आढळत नव्हत्या. कनिष्ठ जातीत सुद्धा भागवतधर्माच्या प्रचाराखाली हीच प्रवृत्ती आढळून येते. संपूर्ण समाज अंधश्रद्धेने पोखरला गेला होता आणि जातीनुसार काम करण्याच्या पद्धतीवर ठाम होता. वरीष्ठ जातींकडून महार-मांग अशा कनिष्ठ जातींवर अन्याय होत होता. त्यावेळची परिस्थिती 'पेशवेकालीन दलित समाज' या प्रबंधात मांडली आहे.

१.४.३ महाराष्ट्रातील जातीव्यवस्था :

मराठ्यांच्या ऱ्हासाच्या काळात, जातिवादाने उच्चांक गाठला. तराळ, रामोशी, चांभार, महार, मांग, बेरड यांसारखे अस्पृश्य जाती व्यवस्थेत होरपळले गेले. ह्या जातीतील लोकांनी काही अपराध केल्यास मोठा दंड आकारला जाई व त्यांना अमानुष अशी शिक्षा होई. बहुतेक अस्पृश्य येत होते. जमातींना गुन्हेगारी जातीच म्हणून ओळखण्यात जातीव्यवस्थेतील तफावत हेच समाजाचे प्रतिक बनले होते. न्यायदेवतेसमोर सर्वजण समान नव्हते. उच्च जातीमध्ये सुद्धा अनेक पोटजाती होत्या. हिंदू धर्म हा विभाजित धर्म आहे. काही वैदिक धर्मगुरुंनी तर फक्त दोनच जाती आहेत असे घोषित केले, ब्राह्मण आणि शूद्र, क्षत्रिय आणि वैश्य हे शूद्रांतीलच पोटजाती आहेत, असे त्यांचे म्हणणे होते. परंतु ब्राह्मणांना कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य होते. त्यांची नियुक्ती सनदी आणि सैनिकी कार्यालयात करण्यात आली. काहींचा सोन्या-रुप्यांचा धंदा होता. काही ब्राह्मण हे अतिशय श्रीमंत होते की ते पेशवे-मराठा सरदारांनाही कर्ज द्यायचे.

१.४.४ महाराष्ट्रातील ग्रामीण समाजव्यवस्था :

ग्रामीण समाज हा सुसंघटीत आणि सुव्यवस्थित असा होता. एलफिन्स्टन आणि मेटकाफने ह्या स्वयंचलित ग्रामीण व्यवस्थेची स्तुती केलेली आहे. जात आणि कुटुंब यांना अतिशय महत्त्व देण्यात येई. कोणत्याही व्यक्तिंला स्वतंत्र अस्तित्व नव्हते. प्रत्येक जण कुठल्यातरी जातीचा कुटुंबाचाच भाग म्हणून ओळखला जाई. जातीव्यवस्थेची पकड घट्ट होती.

परंपरागत चालत आलेल्या वस्तुविनिमय पद्धतीनुसार शेतकरी धान्य द्यायचे त्याच्या बदल्यात समाजातील विविध थरातील व्यक्ती त्यांच्या जवळच्या वस्तू द्यायचे. ब्राह्मण आणि इतर प्रतिष्ठित व्यक्ती सोडल्यातर सगळ्यांना काम करणे गरजेचे होते. त्यांच्या कामाच्या मोबदल्यात त्यांना सुगीच्या दिवसात शेतकऱ्यांकडून ऐच्छिक मोबदला मिळत असे. धान्य किंवा वस्तूंच्या स्वरुपात मोबदला घेणाऱ्यांना बलुतेदार म्हणत गावाच्या आकार आणि लोकसंख्येच्या प्रमाणात बारा बलुतेदार असत. त्यापैकी महत्त्वाचे बलुतेदार पुढील प्रमाणे आहेत. सुतार, चांभार, लोहार, महार, गुरव, कुंभार, न्हावी, सोनार, कोळी इ. (ह्या संदर्भात अधिक माहिती पुढील अध्यायात). त्यांच्या बलुत्याप्रमाणे म्हणजे नियुक्त केलेल्या कामाप्रमाणे त्या जातीप्रमाणे त्यांना कार्य करणे गरजेचे होते. अस्पृश्यांमध्ये म्हणजे महार किंवा गावाचे नोकर यांना दोन महत्वाची कामे देण्यात यायची. त्यांची एकतर खाजगी नोकर म्हणून किंवा गावाचा नोकर म्हणून सरकारी नोकरीवर नियुक्ती व्हायची. गावाची रखवाली करणे किंवा मिरासदार किंवा प्रतिष्ठित व्यक्तिंच्या शेतात रखवाली करणे त्यांना भाग होते. युद्धामध्ये महारांनी स्वतःच्या प्राणावर उदार होऊन शौर्य गाजविले पण त्याबदल्यात मिळणारी बक्षिसाची रक्कम अत्यल्प असे १७९५ च्या खर्ड्याच्या लढाईत निझामाच्या विरुद्ध असलेल्या सैन्याचा सेनापती सिदनाक महार होता. इंग्रजांनी त्यांना आपल्या सैन्यात सैनिक म्हणून नियुक्त केले.

१.४.५. महाराष्ट्रातील स्त्रियांचे स्थान व पुरुषप्रधान समाज :

एकोणिसाव्या शतकाच्या पहील्या दशकात स्त्रियांची परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. उच्च जातीतील आणि श्रीमंत घराण्यातील स्त्रिया वगळल्यास इतरांची स्थिती अत्यंत दयनीय होती. सैनिकांच्या विधवा बायका, वेश्या, देवाच्या नावाखाली बनवलेल्या देवदासी, नृतिका यांचा लोकनाट्यात उल्लेख होता. या सगळ्यांची स्थिती भयंकर होती. समाज नैतिक अध:पतनाच्या रसातळाला गेला होता. व्यभिचारी ठरलेल्या स्त्रीला वेश्या बनविण्यात येई व तिला होणारे स्त्री

अपत्य हे समाजाची दासी म्हणून ओळखण्यात येई. ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या काळात स्त्रियांची स्थिती हलाखीची होती. त्यांच्यावर अनेक प्रथा, परंपरा लादल्या होत्या.

१.४.६ महाराष्ट्रातील न्यायव्यवस्था :

अठराव्या शतकामध्ये महाराष्ट्रातील न्यायव्यवस्था प्रामुख्याने संस्कृती व धार्मिक ग्रंथावर आधारीत होती. ब्राह्मणांना क्षुल्लक शिक्षा आणि खालच्या जातीच्या लोकांना भयंकर शिक्षा असा कायद्याचा प्रकार होता. आर्थिक दुरावस्था आणि राजकीय अस्थिरता याने स्त्रियांवरचे अत्याचार अधिकच झाले. काही ठिकाणी, खुलेआम स्त्रियांचा बाजार सुरु झाला. कैद्यांना देण्यात येणारी शिक्षा भयंकर असे. कुलाबा येथे भूमिगत अशा काळकोठड्या आहेत. इतर अनेक ठिकाणी अशा काळकोठड्या आहेत. कैद्यांचे हातपाय तोडणे, अवयव छिन्नविछिन्न करणे, हातपाय बांधून सह्याद्रीच्या उंच कड्यावरुन खाली फेकणे किंवा तोफेच्या तोंडी देणे. इत्यादी क्रूर प्रकार चालत. ह्या अशा भयंकर शिक्षांमुळे सामाजिक बंड आणि चळवळीचे प्रमाण कमी होते. परंतु धार्मिक ग्रंथांत नमूद केलेल्या कायद्यांचे जर पालन केले नाही तर त्याहीपेक्षा भयंकर शिक्षा - नरक यातना भोगाव्या लागतील या कल्पनेने सामान्य जनतेला भेडसावून सोडले होते. लाचखोरीमुळे तर सामान्य जनतेचे हाल टोकास पोहचले होते. परंतु लाचखोरी हा गुन्हा समजला जात नव्हता.

१.४.७ महाराष्ट्रातील सांस्कृतिक स्थिती :

समाज जितका अज्ञानी आणि गरीब तितकी राजकीय शक्ती जास्त. सांस्कृतिक कलेच्या ऱ्हासाचा तो काळ होता. संत एकनाथ, तुकाराम, रामदास यांच्यासारखे संत महात्मेही त्या काळात निर्माण झाले नाहीत. कोणतीही व्यक्तिगत काव्य स्मृती झालेली नाही. अठराव्या शतकात फक्त महीपती आणि मोरोपंत व राम जोशी सारखे गीतकार सोडले तर कोणाची नावे आढळत नाहीत. कोणत्याही प्रकारचे अभिजात सर्जनशील साहित्य दिसून येत नाही. आर्थिक दुरावस्था टोकाला पोहचली होती. मध्यम वर्ग व्यापारी आणि सावकार हे नालायक अशा सत्ताधारी आणि दरोडेखोर यांच्यामध्ये तावून सुलाखून निघत होते. एकूण परिस्थिती फक्त तीन शब्दांत माडण्यात येऊ शकते, 'लढाई, पुंडाई आणि बंडाई.'

ब्रिटीश राजवटीपूर्वी मराठ्यांच्या राजसंस्थेच्या कारभाराची पद्धती आणि सांस्कृतिक पद्धतीवर, उत्तर भारतीयांचा प्रभाव दिसून येतो. पेशव्यांचे महाराष्ट्रातील भूभागावर, तर उत्तर भारतातील भूभागावर सरदारांचे नियंत्रण होते. शिंदे आणि होळकरांवरही आधुनिक मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशाचा प्रभाव दिसून येतो. महादजी शिंदेनी फाल्गून महिन्यातील रंग-पंचमीचा उत्सव सुरु केला. पेशवा नाना साहेब यांनीही अनेक कलावंतांना प्रोत्साहन दिले. त्यातूनच पेशवा, महादजी शिंदे, नाना फडणीस आणि इत्यादींची रंगचित्रे साकारली गेली. परंतु युद्धाच्या आणि पेंढारींच्या लुटालुटीच्या कारणाने अनेक भव्यदिव्य इमारतींची, देवळांची नासधुस झाली. आता फक्त मराठ्यांच्या भव्यदिव्य उदात्त ऐश्वर्याच्या भग्न खूणा राहील्या आहेत.

हळूहळू मराठी भाषा, राज्यभाषा म्हणून विकसित होऊ लागली आणि मोडी भाषा फक्त महत्त्वाच्या कागदपत्रामध्ये वापरली जाऊ लागली. मराठी भाषेवर उर्दू आणि पर्शियन भाषेचा प्रभाव होऊ लागला कारण ह्या भाषा मोघलांच्या दरबारात वापरल्या जात. तरीही संस्कृतचा प्राधान्याने वापर होई. इंग्रजांच्या अधिपत्याखाली सुद्धा सांस्कृतिक पातळीवर फारसा बदल होऊ शकला नाही. परंतु पाश्चिमात्य विचार आणि संस्थांचा परिणाम विविध शहरांमध्ये उदा. पुणे,

नाशिक, नागपुर, कोल्हापूर आणि मुंबई येथे आढळतो. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्मप्रचाराचा परिणाम अठराव्या शतकात हळूहळू सुशिक्षित वर्गात दिसून येतो आणि मराठी समाज पाश्चिमात्य संस्कृती आणि सामाजिक संस्कृतीचा परिणाम व्हायला लागला.

१.४.८ आपली प्रगती तपासा :-

१) ब्रिटीश राजवटीपूर्वीच्या, महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचे वर्णन करा.

१.५ समारोप

ब्रिटीशांनी इ.स. १७६४ मध्ये मुघल सम्राट व बंगालचा व औंधचा नवाब याला हरविले. त्यानंतर इ.स.१७९९ मध्ये मैसूरच्या सुलतानाला नमविले व शेवटी इ.स.१८१८ मध्ये मराठ्यांना हरविले. नंतर पेशवा, भोसले आणि होळकरांनी इंग्रजांविरुद्ध बंड उठविले पण शिंदे आणि गायकवाड तटस्थ राहीले. त्याचकाळात महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती अडचणीची होती. जाति व्यवस्थेमुळे हिंदू आणि धार्मिक भेदभावामुळे मुस्लिमांचे हाल वाढले. लोक हे गरीब आणि अज्ञानी होते परंतु गावे मात्र अजूनही स्वावलंबी होती.

१.६ प्रश्न

१) ब्रिटीश राजवटीपूर्वीची राजकीय परिस्थिती मांडा
२) ब्रिटीश राजवटीपूर्वीची आर्थिक परिस्थिती स्पष्ट करा.
३) ब्रिटीश राजवटीपूर्वीच्या सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश टाका.

❖❖❖❖

२

ब्रिटीश राजवटीचा प्रभाव व स्थित्यंतर - अ

घटक रचना :

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ जमिन धारणा पद्धती
२.३ महसूल पद्धती आणि प्रशासन
२.४ पेशव्यांच्या उत्तर कारकीर्दीतील महसूल पद्धती
२.५ ब्रिटीश कारकीर्दीतील स्थित्यंतर
२.६ वृत्तपत्र आणि शिक्षण
२.७ समारोप
२.८ प्रश्न

२.० उद्दिष्ट्ये

१. 'जमिन धारणा कालखंड' समजून घेणे.
२. महसूल पद्धती आणि प्रशासन यांचे विश्लेषण करणे.
३. ब्रिटीश कारकीर्दीतील स्थित्यंतर अभ्यासणे.
४. शिक्षणातील नवीन बदल समजून घेणे.
५. वृत्तपत्र संस्था यांवर प्रकाश टाकणे.

२.१ प्रस्तावना

मराठा साम्राज्याचा ऱ्हास ही महाराष्ट्रीयन जनतेसाठी अती दु:खद घटना होती. त्यामुळे राजकारणातील अनेक स्थित्यंतरे त्यांना अनुभवयाला मिळाली. पानिपतच्या आरिष्टाची आठवण जुन्यापिढीच्या मनात अजूनही ताजी होती. नवीन पिढी अजूनही मराठा साम्राज्याच्या विस्ताराचे सोनेरी क्षण विसरली नव्हती. त्यांचे सैन्य संपूर्ण देशात आगेकूच करीत होते. पेशव्यांचे सैन्य इंग्रजांपुढे हरले आणि जनतेमध्ये काही काळ शांतता पसरली.

ईस्ट इंडीया कंपनीने त्यांच्या विजयाच्या काळात जनतेला कोणत्याही प्रकारचा त्रास दिला नाही. मध्ययुगीन काळात पराभूत राजाच्या प्रजेवर अत्याचार करायची पद्धत होती. परंतु हे इंग्रजी सैन्य जे मुळात व्यापारी होते त्यांच्या मनात मानवतावाद, स्वातंत्र्य आणि शास्त्रीय

दृष्टिकोन होता. त्यांनी सदैव मुक्त व्यापार, पाश्चिमात्य शिक्षण आणि 'गोऱ्या माणसांची जबाबदारी' (White Man's Burden) या गोष्टींचा पुरस्कार केला. त्यांचा असा विश्वास होता की पौर्वात्य देशातील लोक स्वराज्य करण्यास असमर्थ आहेत आणि त्यांचा धर्म फक्त अंधश्रद्धा आहे आणि राष्ट्रीयत्त्वाच्या भावनेचा त्यात पूर्ण अभाव आहे.

कंपनीच्या सुदैवाने चांगल्या हुशार लोकांची भरती त्या काळात कंपनीत झाली. त्यांचे काम ते एक मिशन म्हणून करत. परंतु वसाहतीतील पिळवणूक आणि मानवी हक्क नाकारणे जे त्यांनी त्यांच्या देशातील लोकांना देऊ केले होते अशा तुच्छ उद्दीष्टांपेक्षा अधिक ते काही साध्य करु शकले नाही. आपण आता ब्रिटीशांनी स्थानिक जनतेला त्यांच्या आदर्शानुसार, मूल्यांनुसार कसे बदलायचे ठरविले, ते पाहूया.

२.२ जमीन धारणा पद्धती

इंग्रज हे मूलतः व्यापारी होते व नंतर ते राज्यकर्ते झाले.त्यांच्यावर मानवतावाद, स्वातंत्र्य आणि शास्त्रीय दृष्टीकोन ह्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी जमीन धारणा कालखंडाची जुनी पद्धत काही काळासाठी तशीच ठेवली. मराठा मात्र जमीन महसूल निश्चित करण्यासाठी मलिक अंबर यांची पद्धत वापरत होते. जमिनीचे प्रकार ठरलेले होते आणि त्यानुसार त्यावरील कर सुद्धा नियमित कालाने ठरलेला होता. महसूल गोळा करण्याचे काम गावाचे पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे आदि करीत.

ब्रिटीशांनी महाराष्ट्रामध्ये रयतवारी पद्धत अवलंबली. जमीनीवरील कराचे प्रमाण जास्त होते आणि त्यामुळे रयतेला कर्ज काढावे लागे. ज्यामुळे गरीब शेतकऱ्यांचे पूर्णपणे नुकसान झाले.

'गोऱ्या माणसांची जबाबदारी' या संज्ञेनुसार, लॉर्ड एल्फिन्स्टनने स्थानिक लोकांना शिक्षण देण्याचे ठरविले. ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी आधीपासूनच स्थानिक भाषा आणि संस्कृत शिकावयास सुरुवात केली होती.

चार्टर ॲक्ट इ.स.१८१३ आणि बॉम्बे एज्युकेशन सोसायटी यांनी महाराष्ट्र आणि मुंबई येथे शिक्षणासाठी पुढाकार घेतला.

शिक्षणाच्या दोन पद्धती होत्या. एक पौर्वात्य आणि एक पाश्चिमात्य. चार्टर ॲक्ट इ.स.१८५३ आणि 'वुडचा खलिता' यानुसार शिक्षणाच्या प्रसारणाचे कार्य केले.

पाश्चिमात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे अनेकजण सामाजिक कार्याने प्रेरीत झालेले होते. त्यांमध्ये जगन्नाथ शंकर शेठ, जमशेदजी जीजीभॉय, जांभेकर, लोकहीतवादी यांनी जनजागृतीसाठी वृत्तपत्रकारिता सुरु केली.

२.२.१ मराठेकालीन जमीन धारणा पद्धती :

जमीन धारणा कालखंडाची आणि महसूल वाटाघाटीच्या दोन पद्धती मराठ्यांच्या वापरात होत्या. एक स्वतःच्या जमिनीसाठी आणि दुसरी इतऱ्यांच्या जमिनीसाठी. पहिलीला ते 'स्वराज्य'

म्हणायचे आणि दुसरीला 'साम्राज्य' असे म्हणत असत. प्रा. आर. व्ही. उतेकर यांनी या संदर्भात महत्त्वाची माहीती दिलेली आहे.

१) १७ व्या शतकातील तोडरमल पद्धती मलिक अंबरने अहमदनगरच्या निजामशाहीसाठी थोडी दुरुस्ती करुन घेतली होती. तीच पद्धती कालानुसार थोडेफार फेरफार करुन वापरण्यात आली.

२) सगळ्यात जास्त महत्त्व हे शेतकऱ्यांचे हित जपण्यावर होते कारण तेच अर्थशास्त्राचे महत्त्वाचे आधारस्तंभ होते.

३) जमीन धारणा कालखंड प्रामुख्याने दोन प्रकारत मोडत आला होता. १) स्थळ आणि २) वतन. स्थानिक लोकांनी कसलेल्या जमिनीला 'स्थळ' म्हणत आणि राजाने त्यांची राज्याप्रती कामगिरी बघून, जी भूमी कर मुक्त स्वरुपात दिली होती, त्याला ते 'वतन' म्हणत. ह्या बक्षिसपात्र जमिनी वंशपंरापरागत चालायच्या आणि त्याबरोबर अनेक फायदे आणि उच्च दर्जाही मिळायचा.

४) मिरास आणि उपरी - ग्रामीण विभागणीचा दूसरा प्रकार. मूळ मालकाला, राज्याने दिलेल्या जमिनीला 'मिरास' म्हणायचे आणि नवीन व्यक्तीस कसावयास दिलेल्या जमिनीला उपरी म्हणायचे. साधारणतः नवीन जमीन करणाऱ्याला ते वापरलेली ओसाड किंवा नापिक जमिन द्यायचे आणि जर ते समाधानकारक भाडे देऊ शकले नाही तर त्यांना त्यावरील अधिकार गमवावा लागे. त्यांना भाडेकरु म्हणत. याउलट मिरासदारांना आदराने वागविले जाई, कारण संपूर्ण गावाचा महसूल देण्याची जबाबदारी त्यांची असे.

५) छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात जागीरदार पद्धत हाणून पाडण्याचा प्रयत्न केला गेला तर छत्रपती शाहू महाराजांच्या काळात हीच पद्धत प्रसिद्ध झाली होती. खरेतर या पद्धतीमुळे राज्य विस्ताराचा एक नवा मार्गच उघडा झाला होता. कारण जागिरदार महाराष्ट्राबाहेरही राजाच्या वतीने 'चौथ किंवा सरदेशमुखी' वसूल करु शकत होते. महाराष्ट्रामध्ये, जमिनदारांना मुलकी आणि राजकीय दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत होत्या.

२.३ महसूल प्रशासन

आधीच नमूद केल्याप्रमाणे मराठे कालपरत्वे चालत आलेली मलिक अंबरची महसूल पद्धत वापरात होती. जमिन मोजून मापून, विभागणी केली जाई आणि जमिनीचा करही नियमित ठरविला जात असे. मराठा सरकारला शेती उत्पन्न अधिक कसे होईल आणि मोठ्या प्रमाणावर जमिन कशी कसली जाईल याचीच जास्त चिंता असायची. दुष्काळामध्ये शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे किंवा त्यांना 'तगाई' कर्ज देणे अशा प्रकारे मदत केली जाई. महसूलाचा कारभार गावाचा मुख्य किंवा हिशेबनीसाकडे असे ज्यास पाटील किंवा पटेल वा कुलकर्णी म्हणत. जिल्हा पातळीवरचे अधिकारी देशमुख आणि देशपांडे जे 'सुरसुभा' म्हणजे प्रांतिक राज्यपाल हाताखाली येत. आर्थिक घडामोडींवर अर्थमंत्री म्हणजे फडणीस यांचे लक्ष असे.

शेतकऱ्यांना वस्तूच्या स्वरुपात तसेच गावातील 'बलुतेदार' किंवा 'अलुतेदार' यांनाही वस्तूच्या स्वरुपात, त्यांच्याकडून घेतलेल्या सेवेची परतफेड करावी लागे. हा ग्रामीण अर्थशास्त्राचा अंतर्गत भाग होता.

२.४ पेशव्यांच्या उत्तर काळातील महसूल

दुसरा बाजीराव पेशवा यास पैशांची अत्यंत निकड होती. कंपनी सरकारविरुद्ध त्यास फौजा उभ्या करायच्या होत्या, त्यांनी शेतीचा संबंध जमिन -कराशी लावला. त्या अंतर्गत खाजगी दलालाना कमिशन (दलाली) देण्यात येई ज्याची बोली सर्वाधिक असे. या पद्धतीमुळे मोठ्या प्रमाणावर महसूल गोळा झाला पण महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांची धुळधाण झाली.

२.५ ब्रिटीश कारकीर्दीतील स्थित्यंतर

ईस्ट इंडीया कंपनीचा शेवटचा विजय हा अत्यंत निर्णायक होता कारण नागपूर, बरोडा, इंदौर आणि ग्वाल्हेर येथील मराठ्यांनी आधीच वेलस्लीची 'तैनाती फौजेची' योजना स्विकारली होती. शांततेच्या मार्गात अनेक अडथळे होते. पेशव्यांची खाजगी संपत्ती शोधून काढायची होती आणि त्यांच्या पुढील कारवाया रोखायच्या होत्या. कंपनीचे अधिकारी ही कामगिरी स्विकारायला उत्सुक होते कारण त्याच्या बदल्यात त्यांना काही हिस्सा द्यायला खुद्द पेशवे आणि त्यांचे आश्रित तयार होते. कॅप्टन रॉबर्टसन आणि कर्नल प्रोटर यांना अनेक लाख मोलाच्या मोहरा सापडल्या. 'हाव' फार मोठी होती. ब्रिग आणि रींड या दोन अधिकाऱ्यांमध्ये पेशव्यांच्या खजिन्याच्या शोधानंतर मारामारी झाली.

प्रो. आर.डी.चोकसी, राज्याची हालाखीची परिस्थिती मांडताना म्हणतात, ''नवीन राज्यकर्त्यांनो, पराभूत जनतेवर राज्य करण्यापूर्वी स्वतःलाच शिस्त लावून घ्यायची गरज आहे.''

२.५.१ महसूलाची पुनर्रचना :

नवीन राज्यकर्ते परक्या मुलुखात सशक्त आणि भक्कम राज्य उभारण्याच्या जुन्या कल्पनेंवर विश्वास ठेवणारे नव्हते. त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. ते फार दूरच्या प्रदेशातून आले होते आणि स्थानिक भाषा त्यांना अवगत नव्हती. ते व्यापारी कंपनीचे प्रतिनिधी होते पण शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचे प्रश्न त्यांना सोडवायचे होते. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन जो कंपनीचा कमिशनर होता त्याने काही निष्ठावान लोकांचे पथक तयार केले. त्यांनी अनेक निर्बंध घातले व दबावनीतीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. इ.स.१८१९ ते इ.स.१८२७ च्या दरम्यान, गव्हर्नर ऑफ बॉम्बे म्हणून नियुक्ती झाली असताना, त्यांने जास्तीत जास्त वेळ उत्पन्न, महसूलाचे प्रशासन, शिक्षण व कायदा आणि सुव्यवस्था यावर घालविला.

२.५.२ जमीन महसूल पद्धती :

नवीन राज्यकर्त्यांना, महाराष्ट्रातील जमीन धारणा पद्धती आणि उत्पन्नाचे वाटप या गोष्टींना जास्त महत्त्व द्यावे लागे. कारण शेती हा महत्त्वाचा व्यवसाय उद्योग होता.

ह्या बाबतीतले यश, नवीन विचारधारेशी मुख्यत्वे मानवतावाद, स्वातंत्र्य आणि आधुनिक विज्ञान यांच्याशी मेळ बसणारे होते. पुर्नरचनेच्या कार्यक्रमाच्या नवीन तत्त्वापैकी काही महत्त्वाची तत्वे म्हणजे :-

१) जमीन धारणा जूनी पद्धत काही काळासाठी तशीच वापरायची.

२) 'उत्पन्नाचे कायमस्वरुपी वाटप' ही पद्धती अजून स्विकारली नव्हती. मद्रासची रयतवारी पद्धत जी थॉमस मन्रोने अवलंबली होती ती थोडाफार फेरफार करुन महाराष्ट्रासाठी वापरायचे ठरविण्यात आले.

३) कंपनी सरकारचा विश्वास होता की इंग्लिश अधिकारी हे अधिक कार्यक्षम आहेत व भ्रष्टाचारी नाहीत. याउलट भारतीय महसूल अधिकारी हे फक्त पैशांची अफरातफर करण्यातच हुशार आहेत. म्हणून त्यांच्या पगाराची रक्कम कमी ठेवण्यात यावी व त्यांच्यावर बारीक लक्ष ठेवण्यात यावे.

४) जमिन भाडेतत्त्वावर द्यायची पद्धत आणि संपत्तीचा अधिकार यासाठी पाश्चिमात्य पद्धतीचा अवलंब व्हावा.

५) महसूलाची मोजणी करताना, जमिनीचा जो भाग शेतकऱ्याने कसली नाही, तिथे भाडे कापून घेतले जाईल. एका वर्षांचे नुकसान, दुसऱ्या वर्षींच्या उत्पन्नातून भरुन घेतले जाई आणि फारच कठीण प्रसंगी रयतेला काही दिलासा देण्याचे काम होई.

२.५.३ महसूलाच्या बाबी व त्यातील बदल :

नवीन राज्यपद्धतीत संसाधनांच्या एकत्रीकरणावर भर देण्यात आला. अधिकारी शेतकऱ्यांकडे अविश्वासाच्या नजरेने पाहायचे. म्हणूनच कर ठरवताना, वाढीव कर लादीत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली. याचे कारण, जनतेची पिळवणूक करणे हा नव्हता तर पूर्वीच्या मराठ्यांच्या महसूल वाटपाच्या पद्धतीमध्ये आणि नवीन पद्धतीमध्ये झालेला गोंधळ हा होय. जमिनीबाबतच्या समान हक्क पद्धतीमुळे गोऱ्या लोकांचा गोंधळ उडाला. सर्व संपत्ती ही एकाच प्रकारची आणि जमिन हे उत्पन्नाचे साधन होते. मराठ्यांच्या जमिन महसूलाच्या पद्धतीत मिरासदार आणि जागीरदार यांच्यावर नियंत्रण होते तर रयतवारी पद्धतीत रयतेला कर भरण्यासाठी कर्ज काढावे लागे.

करांच्या बाबतीतील काही सवलती ह्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांवरील दडपण काही प्रमाणात कमी करण्यासाठी देण्यात येत होत्या. परंतु भारतीय हिशेबनीसांचे पगार वाढवण्याची काहीही गरज नाही. याउलट त्यांच्यावर जास्त लक्ष ठेवले पाहीजे असे गोऱ्या अधिकाऱ्यांना वाटे. म्हणूनच इ.स.१८८४ च्या ओल्या दुष्काळात, शेतकऱ्यांचे कर कमी करण्याची वा रद्द करण्याची मागणी फेटाळण्यात आली आणि त्यासंदर्भात डेक्कन कमिशनरने कलेक्टर्सना सूचना दिली.

जर एका शेतातले पिक तसेच असेल आणि दुसऱ्या शेतातले पिक केवळ पावसाअभावी आले नसेल तर त्यास दुसऱ्या शेतासाठी पूर्ण करमाफी द्यावी. पण दुसऱ्या शेतातील पिक केवळ कसायला गुरे नसल्याच्या कारणावरुन किंवा केवळ दुर्लक्ष झाल्यामुळे कसायचे राहीले असेल तर त्याची पूर्ण भरपाई कराच्या स्वरुपात केली जावी लागत असे.

२.५.४ इनाम कमिशनच्या सूचना :

जस जसा वेळ जाऊ लागला तसतसा, कंपनीच्या कर-गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांचा विश्वास वाढू लागला. इ.स.१८२० ते इ.स.१८५० चा मंदीचा काळ शेतकऱ्यांच्या कसल्याही बंडाखेरीज व्यवस्थित पार पडला. व्यापारी कंपनीचा भर मुख्यत्वे करुन नगदी पिकांवर होता आणि म्हणूनच ऊस, कापूस, यासारख्या पिकांसाठी जास्तीत जास्त जमीन वापराखाली येऊ लागली. वतनदार सुद्धा सेवेच्या स्वरुपात सरकारला पैसे देणे पसंत करीत होते. महसूल

खात्यालाही परंपरागत वतनातून महसूल भरावा लागे. म्हणून इ.स.१८५० मध्ये सरकारने इनामदारांच्या उपाधी संबंधी चौकशी सुरु केली. अनेक जमिनदारांना पुराव्याअभावी त्यांच्या जमीनी गमवाव्या लागल्या.

२.५.५ रयतवारी पद्धती :

स्वातंत्र्यापासून ब्रिटीश वसाहतीच्या राजवटीपर्यंतचा प्रवास अत्यंत त्रासदायक होता. बदललेल्या कारभाराचे स्वरुप नवीन राज्यकर्ते आणि प्रजा या दोघांनाही मानवत नव्हते. इ.स.१८१८-१९ चा काळ अत्यंत वाईट हंगामाचा होता. इ.स.१८२० या वर्षी कोरडा दुष्काळ पडला. आर्थिक मंदीच्या पाठोपाठ कॉलरा (पटकीची) साथ आली. रयत पूर्णपणे हवालदील झाली होती. आर.डी. चोकसी लिहितात,

''परंपरागत वारसा हक्काची पायमल्ली आणि अधिकाधिक जमिन कसण्यासाठी चाललेली घाई यामुळे जनतेमध्ये असुरक्षितता निर्माण झाली. परंपरागत महसूल वसूल करण्याऱ्या अधिकाऱ्यांना याची माहीती होती. कारण ते त्यांच्याबरोबर राहीले होते. गोऱ्या साहेबाला अधिकाधिक महसूल हवा होता. कंपनीच्या नगदी पिकांच्या मागणीमूळे सावकार आणि वकील यांच्या संख्येत वाढ झाली. कारण जमिनीच्या खटल्यांमध्ये वाढ झाली. ज्यामुळे गरीब शेतकऱ्यांचे पूर्ण हाल झाले.''

२.५.६ आपली प्रगती तपासा :-

१) नवीन ब्रिटीश राजवटीमधील जमीन धारणा पद्धती आणि महसूल प्रशासन यांवर थोडक्यात लिहा :-

_____

_____

_____

_____

_____

२.६ शिक्षण आणि वृत्तसंस्था यांतील बदल

ब्रिटीश राजवटीचा प्रभाव शिक्षण आणि वृत्तपत्रसंस्थेवर स्पष्ट दिसून येतो. कंपनीचे अधिकारी स्वातंत्र्य, माणुसकी या विचारांनी प्रभावित झालेले होते. त्यांनी शक्यतोपरी बदल घडविण्याचे प्रयत्न केले. माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन हा या बदलाच्या काळातील एक आदर्श उदाहरण होता. इ.स.१८१९ ते इ.स.१८२७ च्या दरम्यान बॉम्बे प्रेसिंडेंसीचा तो गव्हर्नर होता. त्याच्या मते, ''अज्ञानी जनतेवर सत्ता गाजविणे फार सोपे आहे पण नंतरच्या काळात त्यांना शिक्षण देणे व जागृती निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे राज्य जरी धोक्यात आले तरी चालेल.'' त्याला सर्व धोक्यांची आणि त्रुटींची माहीती होती. ख्रिश्चन मिशनऱ्यांना धर्मांतराच्या कार्यापासून वंचित ठेवण्यासाठी त्याने विशेष प्रयत्न केले. मराठ्यांच्या धार्मिक कार्यात ढवळाढवळ न करण्याचे आदेश त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिले होते.

२.६.१ शिक्षण :

१८१३ च्या चार्टर ॲक्टनुसार ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतामध्ये धर्मप्रसाराचे व शिक्षण प्रसाराचे स्वातंत्र्य देण्यात आले. अमेरीकन ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतामध्ये प्रवेश मिळविण्यात यश आले होते. आणि संस्कृत भाषेबरोबरच स्थानिक भाषा शिकण्यास त्यांनी सुरुवात केली होती. इ.स.१८१५ मध्ये मुंबई येथे हिंदू मुलांसाठी अमेरिकन मिशनऱ्यांनी शाळा सुरु केली. पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीवर आधारीत ती पहीली शाळा होती. कोकणात बाणकोट आणि हर्णे येथे मुलामुलींसाठी त्यांनी शाळा उघडल्या. पाश्चिमात्य पद्धतीवर आधारीत सुधारणा त्यांनी विद्यार्थ्यांना द्यायला सुरुवात केली.

२.६.२ चार्टर कायदा, १८१३ व त्याच्या सूचना :

इ.स.१८१३ चा 'चार्टर ॲक्ट'च्या अंतर्गत वसाहतीत राहणाऱ्यांसाठी वैज्ञानिक शिक्षणाच्या आणि ज्ञानाच्या पुढाकारावर काही आर्थिक मदत देण्यात आली होती. अशाप्रकारे ब्रिटीश वसाहतीत रहाणाऱ्या प्रामुख्याने बंगाल आणि मुंबई येथील लोकांसाठी शिक्षणासाठीची काही पावले उचलण्यात आली. आधीच नमूद केल्याप्रमाणे माऊंट स्टुअर्ट एलफिन्टन मुंबईचा गव्हर्नर होण्यापूर्वी ब्रिटीश मिशनऱ्यांनी शिक्षणाच्या कार्याला सुरुवात केली होती. त्याला पाश्चिमात्य शिक्षणाची सुरुवात अत्यंत सावधगिरीने करायची होती. इ.स.१८२० मध्ये पुण्यात संस्कृत पाठशाळा त्यांच्या प्रयत्नामुळे सुरु झाली. त्यांनी त्यांच्या अधिकाराखाली असलेल्या भागाची पाहणी करुन त्या त्या भागाच्या मुलभूत गरजांची माहीती काढण्याचे आदेश जिल्हा कलेक्टरला दिले. त्या संबंधीचे चौकशी पत्र इ.स.१८३२ मध्ये तयार झाले. पण त्याआधीच पाच वर्षे एल्फिन्स्टन इंग्लंडला परतला होता.

२.६.३ बॉम्बे नेटीव्ह एज्यूकेशन सोसायटीचे कार्य :

ही अशासकीय संस्था होती. परंतु तिची स्थापना सरकारी अधिकारी, चॅप्लेन ऑफ बॉम्बे, मुंबईचे उद्योगपती आणि धर्मप्रमुख यांनी एकत्र येऊन केली होती. इ.स.१८२० मध्ये माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टनने तिचे उद्घाटन केले आणि तिचे नाव 'बॉम्बे नेटीव्ह एज्यूकेशन सोसायटी' असे ठेवले. शाळांना मदत करणे शालेय पुस्तके छापण्यासाठी, नवीन शाळा सुरु करण्यासाठी, फंड उभारणे अशी कामे ही संस्था करी. ईस्ट इंडीया कंपनीच्या संचालक मंडळाने, पुस्तके छापण्यासाठी आणि शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी ५०००डॉलर (५०,००० रु.) इतकी रक्कम संस्थेला देऊ केली. संस्थेने १६ वर्षे काम केले आणि इ.स.१८३६ मध्ये आर्थिक निधी अभावी काम बंद करावे लागले.

हिंद शाळेत शालेय पुस्तकांची सोसायटी एल्फिन्स्टनच्या पुढाकाराने सुरु झाली. सोसायटीने लिथोप्रेस आणि छापील शालेय मराठी पुस्तके विकत घेतली. घरी जाताना त्याने मराठी पुस्तके आपल्याबरोबर घेतली. बॉम्बे प्रेसिडेंसीच्या लोकांच्या शिक्षणासाठी त्यानी उत्साह दाखवलाच परंतु पूणे येथे महाविद्यालय सुरु करण्यासाठी कंपनीच्या संचालकांनाही राजी केले. त्याचबरोबर परंपरागत शिक्षणासाठी 'दक्षिणा' ही शिष्यवृत्तीही सुरु केली. आतापर्यंतच्या मराठा राज्यकर्त्यांच्या ऐतिहासिक दस्तऐवज व पुरावे यांचे त्याला जतन करावयाचे होते. ग्रँड डफ, एल्फिन्स्टनचा अनुयायी, याने 'मराठ्यांचा इतिहास' हे पुस्तक लिहून त्याचे इंग्रजीमध्ये रुपांतर करुन स्वत:च्या खर्चाने ते छापले.

२.६.४ शिक्षण आणि सरकारी अनुदान :

चार्टर ॲक्ट इ.स.१८१३ नंतर कंपनीच्या संचालकांनी भारतीय लोकांना कोणत्या प्रकारचे शिक्षण व कुठल्या माध्यमातून देण्याची आवश्यकता आहे यावर विचार करावयास सुरुवात केली. त्यातही मतभेद होते. एका समुहाला असे वाटे की पौवार्त्य शिक्षण घ्यावे ज्यात संस्कृत व पर्शियनवर अधिक भर होता. तर दुसऱ्या समुहाला असे वाटे की पाश्चिमात्यपद्धतीने इंग्रजीमधून विज्ञान शिकवावे. पहिल्या समुहाला पौर्वात्य (Orientalists) आणि दुसऱ्या समुहाला पाश्चिमात्य (Anglicists) म्हणून ओळखले जाई. एल्फिन्स्टनचा दुसऱ्या विचारांवर भर होता. ७ मार्च इ.स.१८३५ मध्ये गर्व्हनर जनरल विल्यम बेंटीक यांने लॉर्ड मेकॉलेच्या शिफारसीनुसार युरोपियन साहित्य व विज्ञान इंग्रजी माध्यमातून देण्यास सुरुवात केली.

चार्टर ॲक्ट इ.स.१८५३ नुसार भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला. सर चार्ल्स वुड, प्रेसिडेंट ऑफ द बोर्ड याने १७ जुलै, १८५४ मध्ये सर्वकष शिक्षण पद्धती बाबतचा खलिता पाठविला. त्याला भारतामध्ये पाश्चिमात्य विज्ञान आणि साहित्याचा प्रसार करायचा होता. स्थानिक भाषांचा विकास आणि स्थानिक लोकांच्या मागणीनुसार इंग्रजी भाषेतून शिक्षण अशी त्यात पद्धत होती. लोकांच्या माहीतीसाठी शिक्षण विभाग सुरु झाला. इ.स.१८५५ मध्ये मुंबईच्या लोकांच्या माहीतीसाठी संचालकाची नियुक्ती झाली आणि इ.स.१८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली.

२.६.५ वैद्यकीय शिक्षणाच्या तरतूदी :

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्यास त्याच्या कारकीर्दीत फार काही करता आले नाही. परंतु पाश्चिमात्य विज्ञानासाठी अनुकूल वातावरण निर्मिती मात्र त्याने केली. इ.स.१८२८ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजची स्थापना ही बॉम्बेच्या लोकांनी त्यांच्या आवडत्या गव्हर्नरला वाहिलेली आदरांजली होती. त्याच्या उदाहरणावरुन प्रभावित होऊन बॉम्बे एस्टॅब्लीशमेंटचा (Bombay Establishment) सर्जन डॉ. जॉन मॅक्लॅरॉनने इ.स.१८२८ मध्ये नेटीव्ह मेडीकल स्कूल मुंबई येथे सुरु केले ज्यात पाश्चिमात्य वैज्ञानिक शिक्षण मराठीतून दिले जाई. आरोग्यशास्त्रासंबंधी अशी सहा पुस्तके त्यांने मराठीत रुपांतरीत केली. परंतु त्यांचा प्रयोग फसला व इ.स.१८३२ मध्ये शाळा बंद करावी लागली.

इ.स.१८३५ मध्ये सर रॉबर्ट ग्रॅण्ट हा बॉम्बे प्रेसिडेंसीचा गव्हर्नर बनला. त्याने वैज्ञानिक शिक्षणासाठी पुढाकार घेतला. त्याने भारतीय पुढाऱ्यांबरोबर ज्यात जगन्नाथ शंकर शेठ, प्रेमजी कावसजी, सर जमशेदजी जीजीभॉय यांच्यासोबत दीर्घ चर्चा केली. इ.स.१८३८ मध्ये रॉबर्ट ग्रॅण्टचा अचानक मृत्यू झाला परंतु जगन्नाथ शंकर शेठ आणि इतरांनी त्यांचे कार्य चालू ठेवून १ नोव्हेबर, १८४५ मध्ये मेडीकल कॉलेजची स्थापना करुन, त्यास स्वर्गीय गव्हर्नर रॉबर्ट ग्रॅण्टचे नाव दिले.

२.६.६ ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य :

मराठा साम्राज्याच्या अस्तानंतर दोन दशके बदलाच्या काळात विशेष सुधारणा होऊ शकली नाही. परंतु त्यानंतर मात्र महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील आधुनिक सुधारणांवर भर दिला. माऊंट स्टुअर्ट आणि त्यानंतरच्या गव्हर्नरनी वैज्ञानिक दृष्टीकोन व आधुनिक सुधारणांसाठी अनुकुल वातावरण निर्मिती केली. अमेरिकन व स्कॉटिश मिशनने बॉम्बे प्रेसिडेंसीमधील जनतेच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न दर्शविले. परंतु त्यांचा खरा रस

ख्रिश्चनधर्माच्या प्रसारावर होता. कंपनीच्या राज्यकारभाराने आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्याने अनेक लोक प्रभावित झाले होते. ज्यात जगन्नाथ शंकर शेठ सर जमशेदजी जीजीभॉय, सामाजसुधारक बाळ शास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख (लोकहीतवादी) आणि इतरांनी या बदलाचे स्वागत केले.

२.६.७ वृत्तपत्रसंस्था :

चौकशी आणि सामाजिक जागृतीची खरी सुरुवात वृत्तपत्र वाचणाऱ्या व्यक्तींपासून सुरु झाली आणि आजपर्यंत शिक्षणापासून वंचित राहीलेल्या लोकांच्या मनात शिक्षणाचे महत्त्व हळूहळू रुजू लागले जे ब्रिटीशांपूर्वी महाराष्ट्रात नव्हते. मौखिक शिक्षणाची परंपरा महाराष्ट्रात होती परंतु छापील पुस्तके किंवा लिखित कागदपत्रे, वृत्तपत्रे, दैनिके यांचा अभाव होता.

२.६.८ छापखाने :

इ.स.१८१३ मध्ये अमेरिकन मिशनने भेंडी बाजार, मुंबई येथे प्रिंटिग प्रेस सुरु केली. त्यांनी मराठी आणि गुजरातीमध्ये ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी पुस्तके छापायला सुरुवात केली. रत्नागिरी जिल्ह्यात हर्णे येथे अमेरिकी लोकांनी लिथोप्रेस सुरु केली. अमेरिकन प्रेस, भेंडीबाजार येथे एक भंडारी तरुण गणपत कृष्णाजीने लिथोप्रेसचे तंत्र शिकून बोरीबंदर येथे स्वतःची प्रेस सुरु केली. त्याने पंचाग आणि इतर धार्मिक पुस्तके मराठी आणि गुजराती मधून छापली. ब्राम्हण छापील कागदपत्रांना स्पर्श करीत नसत. छापखान्यातील शाईमध्ये जनावरांची चरबी वापरली जाते अशी शंका त्यांना होती. गणपतने चरबीच्या ऐवजी घी वापरुन स्वतःच छापे बनविण्यास सुरुवात केली. त्याच्यापासून इतरांनी प्रेरणा घेतली.

२.६.९ पत्रकारीता व त्यातील प्रगती :

१८ व्या शतकाच्या मध्यावर ईस्ट इंडीया कंपनीने बंगालमध्ये स्वतःचे राजकीय बस्तान मांडले. अनेक ब्रिटीश वृत्तपत्रकारांनी, साप्ताहिक, मासिकामधून सद्य परिस्थितीवर व घटनांवर लिहावयास सुरुवात केली. मुंबईमध्ये टेलिग्राफ, कुरीअर, बॉम्बे गॅझेट, बॉम्बे टाईम्स आणि टाईम्स ऑफ इंडीया अशा प्रकारचे वृत्तपत्रे इंग्रजीमध्ये छापली जायची परंतु, मराठी दैनिक मात्र प्रचलित नव्हती. इ.स.१८३२ मध्ये पहीले आंग्ल (अँग्लो)-मराठी नियतकालीक बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर, (ज्यांना बाळशास्त्री जांभेकर म्हणून ओळखले जाई), यांनी सुरु केले. त्या नियतकालीकाचे नाव होते 'बॉम्बे दर्पण'. त्यानंतरच्या दोन दशकांच्या काळात अनेक नियतकालीके, मासिके आणि पुस्तके छापली गेली. पहिले मराठी मासिक इ.स.१८४० 'वसईकर' राघोबा जनार्दन गवाणकर यांनी छापले. इ.स.१८४१ मध्ये गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' हे साप्ताहीक सुरु केले. हे साप्ताहीक दर रविवारी प्रसिद्ध व्हायचे आणि त्यांनी महत्त्वाचे स्थान प्राप्त केले.

२.६.१० महत्वाची वृत्तपत्रे आणि नियतकालिकांचे महत्त्वाचे कार्य :

साप्ताहिक 'प्रभाकर' हे अधिक प्रसिद्ध झाले. जेव्हा गोपाळ हरी देशमुख (लोकहीतवादीनी) त्यात शंभर पत्रांची मालिका (शतपत्रे) सुरु केली ज्यात त्यांनी ब्राह्मण समाजाचा दांभिकपणा आणि चुकीच्या चालीरीतीवर प्रकाश टाकला. भाऊ महाजन यांनी सुद्धा कमी किंमतीचे साप्ताहीक 'धुमकेतू' सुरु केले जे भवानी विश्वनाथ कानदेशांच्या वर्तमानपत्र 'दिपिका'साठी स्पर्धात्मक ठरले. ज्यात अत्यंत प्रभावीपणे समाजातील वाईट चालीरीतींवर प्रकाश टाकण्यात आला. भाऊ महाजनांना अत्यंत नाजूक विषयांवर उदा. ख्रिश्चन धर्मांतराविषयी

विचार मंथन करावयाचे होते. त्यांनी बाबा पद्मनजी, शब्द कोषकार आणि साहित्यिक ज्यांनी ख्रिश्चनधर्म स्विकारला होता त्यांना स्वतःची बाजू मांडण्याची परवानगी 'धूमकेतू'द्वारे देण्यात आली. हे त्या काळात फार मोठे धाडसाचे काम होते.

बाळशास्त्री जांभेकरांच्या जनजागृतीचे प्रयत्न भाऊ महाजनांनी त्यांच्या मासिक 'दिग्दर्शन' मधून प्रकाशित केले आहे. या मासिकाने अनेक विषयांवर प्रकाश टाकला. हे मासिक म्हणजे ज्ञानकोष झाला होता आणि त्याचा मुख्य उद्देश वाचकांमध्ये जागृती घडवून आणण्याचा होता. इ.स.१८५४ मध्ये त्यांनी 'ज्ञानदर्शन' नावाचे त्रैमासिक सुरु केले. ते ख्रिश्चन मिशनऱ्यांचे मुखपत्र होते. 'ज्ञानोदय' इ.स. १८४२ मध्ये सुरु झाले आणि २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत चालू राहीले. ख्रिश्चनाच्या धर्मप्रसारासाठी काही नियतकालिके चालू होती. पण ती फार काळ टिकाव धरु शकली नाहीत. मराठी नियतकलिकांचा मुख्य उद्देश ज्ञान प्रसारणाचा होता आणि सरकारला जनतेच्या हितासाठी उद्युक्त करणे असा होता.

२.६.११ वृत्तसंस्थांचे स्वातंत्र्य :

इ.स.१८१८ पूर्वी इग्रजांनी छापलेल्या अनेक इंग्लिश वृत्तपत्रांमधून सरकारी अधिकाऱ्यांवर जाहीर टीका झाली. सर्वोच्च न्यायालयाने अशा टिका ज्या प्रामुख्याने इंग्लिश वृत्तपत्रांमधून छापल्या जायच्या (कलकत्ता, मद्रास आणि मुंबई येथून) यावर नियंत्रण आणले. इ.स.१८३५ मध्ये गव्हर्नर जनरल सर चार्ल्स मेटकाल्फ याने वृत्तपत्रांना स्वातंत्र्य दिले, जे पुढील चाळीस वर्षे टिकले. पहील्या पन्नास वर्षात ब्रिटीश राजवटीत महाराष्ट्रातील सुशिक्षित मध्यमवर्ग सामाजिक सुधारणांच्या बाबतीत जागरुक झाला. पाश्चिमात्य साहित्य आणि विज्ञान यांविषयी त्यांना फार आदर व कुतूहल होते. परकीय सत्तेविरुद्ध त्यांनी तसा प्रतिकार केला नाही.

२.६.१२ आपली प्रगती तपासा :-

१) पाश्चिमात्य शिक्षण आणि वृत्तपत्रांचे महत्त्वाचे कार्य लिहा.

२) शिक्षण आणि सरकारी अनुदान यावर एक टीप लिहा.

२.७ समारोप

मराठी सत्तेच्या अंतानंतर नवीन राज्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील जमिन महसूलाच्या नवीन पद्धती आणि आधुनिक सुधारणांच्या दृष्टीने पावले उचलावयास सुरुवात केली. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन आणि त्यांच्या अनुयायींनी स्कॉटीश मिशनची स्थापना केली. ज्याद्वारे बॉम्बे प्रेसिडेंसीमधील लोकांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. इ.स.१८१३ मध्ये अमेरिकन मिशनने भेंडी बाजारात प्रिंटींग प्रेस सुरु केली आणि मराठी आणि गुजरातीमध्ये पुस्तके छापावयास सुरुवात केली. जनजागृतीच्या उद्देशाने अनेक मराठी वृत्तपत्रे व नियतकालीके सुरु

झाली. त्यांचे महत्त्वाचे कार्य ज्ञान वृद्धी व सरकारला जनतेच्या हितासाठी कार्यप्रवृत्त करणे हे होते.

२.८ प्रश्न

१) ब्रिटीश कारकीर्दीतील जमिन धारणा पद्धती व जमिन महसूलांच्या पद्धती विशद करा.
२) ब्रिटीश राजवटीच्या शेवटच्या काळातील, पाश्चिमात्य शिक्षण व प्रेस यांचा महत्त्वाचा कार्यभाग स्पष्ट करा.
३) पाश्चिमात्य शिक्षण व प्रेस यांचे महत्त्वाचे कार्य स्पष्ट करा.

❖❖❖❖

३

ब्रिटीश राजवटीचा प्रभाव व स्थित्यंतर - ब

घटक रचना :

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ कायदा आणि सुव्यवस्था
३.३ दळण वळण आणि वाहतूक
३.४ ख्रिश्चन मिशनरी : ख्रिश्चन धर्माचा प्रतिवाद
३.५ समारोप
३.६ प्रश्न

३.० उद्दिष्ट्ये

१) महाराष्ट्रामधील ब्रिटीश ईस्ट इंडीया कंपनीची कायदा आणि सुव्यवस्थेची सखोल माहीती जाणून घेणे.
२) दळणवळण आणि वाहतुक याची माहिती अभ्यासणे.
३) ख्रिश्चन मिशनरी आणि त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेची माहिती समजून येते.

३.१ प्रस्तावना

मराठेशाही पडल्यानंतर ईस्ट इंडीया कंपनीने खूप मोठा प्रांत ताब्यात मिळविला. महाराष्ट्रातील प्रशासकीय घडामोडींमध्ये त्यांची मक्तेदारी होऊ लागली. मुख्यतः मुंबई प्रांतात त्यांनी प्रत्येक ठिकाणी खूप बदल सुचविले. बरेचसे गव्हर्नर जे हे काम करीत असत ते सुद्धा याला जबाबदार आहेत. गव्हर्नर जनरल लॉर्ड कॉर्नवालीस, याने (इ.स.१७८६-९३) कायदा आणि सुव्यवस्थेचा पाया तयार केला. नवीन संकल्पना आणि उदारमतवादी धोरण यामुळे कायद्याची तरतूद आणि दळण वळणाची साधने यांची चांगली आखणी केली. अमेरिका आणि स्कॉटलंडमधील पाश्चिमात्य ख्रिश्चन मिशनऱ्यांनी तळागाळातील आणि निरक्षर लोकांसाठी समाज कल्याणकारी कार्य केले.

लॉर्ड कॉनवालीस ने कायद्याची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करता यावी म्हणून आधुनिक यंत्रणा तयार केलेली होते. ज्यावेळेला ते गव्हर्नर-जनरल होते त्यावेळी त्यांच्या कारकिर्दीत ही अंमलबजावणी बंगाल मध्ये करण्यात आली. पूर्वीपासून चालत असलेल्या पद्धती प्रमाणे जिल्ह्याच्या महसूल अधिकाऱ्यांना दिवाणी आणि महसूल न्यायालयाचे अधिपत्य दिलेले

असे त्यांना फौजदारीची कामे, गुन्हा न्याय व्यवस्थेसह चालविण्याचे अधिकार दिले होते. कॉर्नवालीस कायदा संहितेच्या अंतर्गत जिल्हाधिकारी या जबाबदारीतून मुक्त झाले आणि दिवाणी न्यायालये जिल्हा न्यायधिशाच्या आदेशावर चालविण्यात येऊ लागली. प्रत्येक शहरी आणि जिल्ह्याच्या न्यायालयामध्ये महसूल व दिवाणी कामकाज पाहण्यासाठी इंग्रजी न्यायाधीश स्थानापन्न झाला.

३.२ कायदा आणि सुव्यवस्था

३.२.१ इंग्लंडमधील ब्रिटीश कायदा पद्धतीचे स्वरुप :

इंग्रजांची कायद्याची घटना अशी बनवली गेली नव्हती पण कोर्टाचे निर्णय आणि सामान्य कायदे यातूनच त्यांची कायदा प्रणाली खूप चांगल्या प्रकारे तयार झाली. चांगल्या आधुनिक पद्धतीची यंत्रणा ही कायदा पद्धती अंमलात आणण्यासाठी तयार केली. तसेच प्रशिक्षित अनुभवी वकीलांचे एक मंडळ कोर्टाच्या कामात कायद्याचा वापर कसा करावा हे सांगण्यासाठी तयार केलेले होते. या सर्व गोष्टींमुळे त्यांची कायदा प्रणाली एकदम चांगल्या प्रकारे तयार झाली होती आणि म्हणून तेथील लोकांना आपली तक्रार प्रथम कुठे प्रस्तुत करावी आणि अपील कुठे करावे याची माहीती योग्य प्रकारे होत होती. या कायदा प्रणाली आणि त्यांच्या कार्यपद्धतीचा वापर जेवढा महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे झाला तेवढा भारताच्या अन्य भागात तो अविकसीत राहीला.

३.२.२ महाराष्ट्रातील प्रचलित हिंदू कायदाचे स्वरुप :

हिंदु कायदा पद्धतीची पुस्तके ही विषमतेवर आधारित असलेल्या मनुकृतीवर आधारलेली होती. पण जात पंचायत पद्धतीमुळे माऊंट स्टुअर्ट एलफिस्टन कडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. हिंदू जातीं-समाजांमधील असमान न्याय व्यवस्था जाती व्यवस्थेवर आधारलेली होती. शिक्षा व अधिकार हे प्रत्येकाच्या जातीनुसार दिले जात होते. त्यामुळे कायद्यापुढे समानता हे तत्त्व महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात नव्हते.

३.२.३ एलफिन्स्टन संहिता :

माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन जेव्हा दख्खनचे कमीशनर होते तेव्हा महसूल पद्धती आणि त्यांच्या व्यवस्थापनात खूप अडचणींचा सामना करावा लागत होता. इ.स.१८१९ मध्ये जेव्हा ते गव्हर्नर होते तेव्हा त्यांना कायदा व त्याचे नियम हे तयार करुन अंमलात आणावयाचे होते. ते सुद्धा त्यांच्या अखत्यारीत असलेल्या परकीय जमिनीवर म्हणजेच महाराष्ट्रात आणायचे होते. त्यामुळे त्यांना येथील पैशाची ताकद आणि लोकसंख्येची तपासणी करायची होती. त्याकरीता त्यांनी श्री. बोराडीयाले नावाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणुक केली. त्यामध्ये त्यांनी हिंदू कायद्याची प्रकरणे न्यायालयाकडून विचारार्थ पाठविली जातात. त्यांचा कॅटलॉग तयार करणे आणि साक्षीदारांची विधाने जी हिंदू पद्धतीवर अथवा जातीभेदावर आधारित असतील ती पुस्तकात नमूद करणे असे काम त्यांना करायचे होते. तसे त्यांना सदर न्यायालयाकडून या वरील कामाचा संग्रह करण्यास सांगितलेले होते.

माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी एक मंडळ तयार करण्यास सांगितले आणि त्याचा सचिव म्हणून श्री. स्टील यांची नेमणूक केली. सर्व कायद्याचे एकत्रीकरण संक्षिप्त रुपात तयार करण्याचे काम या मंडळातर्फे करण्यात येणार होते. या नेमलेल्या कमीटी मंडळाने सदर

न्यायालयाच्या सहाय्याने इ.स.१८२७ मध्ये कायद्याचा ठराव मांडला. पुढे तो एलफिन्स्टन कायदा म्हणून ओळखला जाऊ लागला. हा कायदा १ जानेवारी इ.स.१८२७ मधे प्रसिद्ध केला गेला त्यामध्ये २६ कायदे मांडण्यात आले होते. ते खालील प्रमाणे.

प्राथमिक - १, दिवाणी न्याय कायदा - ९, फौजदारी गुन्हा कायदा - ५, महसुल मंडळ कायदा- ६, मिलीटरी कायदा - १, अन्य विविध कायदा - १ एकुण २६ कायदे होते.

हा कायदा इ.स.१८२७ ते इ.स.१८३५ या दरम्यान प्रचलित होता. त्यानंतर त्यात थोडे बदलत्या परिस्थितीनुसार नवीन बदल करण्यात आले.

पूर्वीच्या काळात म्हणजे इ.स.१८१८ पासून ते इ.स.१८२८ पर्यंत राज्यकर्त्यांचे लक्ष शांतता प्रस्थापित करणे आणि नियमानुसार महाराष्ट्राचे राज्य चालविणे या प्रकारचे होते. ग्रामीण भागात महसूल गोळा करताना येणारी समस्या व कोर्टाचे खटले यांचा संबंध जास्त येत होता. त्यामुळे कंपनीने असा एक समूह तयार ठेवला होता की कोणत्याही अडचणींना तोंड देऊन आपले काम पुढे नेऊ शकेल. हे नवीन कायदे, त्यांची न्यायालये आणि सामान्य व्यवस्था शांततेने आणि नियमानुसार चालविण्यासाठी बनवलेले होते.

३.२.५ आपली प्रगती तपासा :

१) एल्फिन्स्टन कायदा संहिता म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

_____

३.३ वाहतूक आणि दळणवळण यातील प्रगती

मराठ्यांच्या राज्यात नवीन राज्यकर्त्यांनी दळणवळण अधिक जलद आणि सुलभ होण्यासाठी नवीन प्रक्रिया प्रस्तुत केल्या तेव्हा पासून सुधारणेचे वारे वहायला सुरुवात झाली. अठराव्या शतकाच्या मध्यावर इंग्लंड मध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. त्यामुळे इंग्रजांचा आत्मविश्वास वाढला. युरोपमधील नेपोलियनविरुद्धच्या युद्धातून इंग्रज विजयी होऊन बाहेर आले. तेव्हा सर्व सागरावर मालकी हक्क त्यांनी प्रस्थापित केला. नेपोलियनला पराभूत केल्यानंतर त्यांनी आपली सत्ता बळकट करण्यास सुरुवात केली. अमेरिकेतील त्यांच्या जुन्या वसाहतीबरोबर म्हणजेच युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका बरोबर काही करार केले. जलमार्ग, रेल्वे, आणि तार सेवा यांचा स्वत:च्या देशात गतीने विस्तार केला आणि त्यामुळे औद्योगिक निर्मितीचा विस्तार होऊ लागला. नवीन राज्यकर्ते, व्यापारविषयक फायद्याची वाढ आणि आपले राजकीय बळ वाढविण्याकरीता त्यांना मिळणाऱ्या फायद्यातून काही भाग उदा. त्यांनी लावलेले शोध, नवीन संरचना, यंत्रणा नवीन विषयांसह जे महाराष्ट्रातून आणणे त्यांच्या फायद्याचे होते ते त्यांनी तेथे सुरू केले.

३.३.१ जलवाहतूक :

इंग्रज आणि अमेरिकन संशोधक व अभियंत्यांनी बोट चालविण्यासाठी बाष्प शक्तीचा उपयोग केला. वाफेवर चालणाऱ्या बोटी, इंजिनामुळे झालेली प्रगती १९ व्या शतकातील पहिल्या एक चतुर्थांश शतकाच्या शेवटी ठळकपणे दिसून आली. नौकापर्यटन हे भारतामधे अगदी प्राथमिक पातळीवर होते. इ.स.१८१७ मध्ये वाडीया बंधुनी त्रिमाली नावाची बोट तयार केली आणि उपलब्ध असलेल्या जुन्या तंत्राच्या आधारावरच भारतीय किती चांगल्या प्रकारची बोट तयार करू शकतात हे सिद्ध करुन दाखविले. हे असे एकमेव जहाज होते की, जे ब्रिटीश सरकारने एकोणीसाव्या शतकातील उत्तम कारागिरीचा नमुना म्हणून नौदलातील पोर्टस्माऊथ (इंग्लंड) येथे ठेवले.

पूर्वी लंडन ते मुंबई हा प्रवास बोटीने करण्यास पुष्कळ महिने लागत असत. इ.स. १८२८ मधे मुंबई बंदरामध्ये वाफेवर चालणारे पहिले जहाज सुरु झाले. इ.स.१८३१ मध्ये वाफेच्या जहाजातुन प्रवास करुन मुंबईला आले ते (Earl of Clare) अर्ल-ऑफ क्लेअर, मुंबईचे गव्हर्नर होते. ब्रिटीशांना यामुळे लंडन आणि पूर्वेकडील इतर बंदराशी आपला संपर्क प्रस्थापित करणे सोयीचे झाले. या वाफेच्या शक्तीवर चालणारी जहाजे नावारुपाला आल्यानंतर भारताची स्थिती प्रथम दर्जाची झाली. भारत फक्त पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्यावरीलच नव्हे तर ते व्यापाराचे मोठे केंद्र म्हणून मानले जाऊ लागले.

३.३.२ रस्ते वाहतूक :

समूहांची हालचाल, दारुगोळा, वहाणारे ट्रक, मालवाहू ट्रक इत्यादींच्या दळणवळणाकरीता रस्त्यांची दुरुस्ती करुन ते नीट ठेवणे तसेच रस्ते जोडणीचे काम या दोन्ही गोष्टी अत्यंत आवश्यक होत्या. दख्खनच्या पठारावर शहरांशी आणि मुंबईशी जोडणी करण्यासाठी बऱ्याच अडचणी होत्या. सह्याद्री पर्वत जो मुख्यालयाचे अध्यक्षस्थान भुषविणारा कोकण आणि महाराष्ट्राच्या मुख्य भुमीमध्ये अडथळा बनून राहीला होता. इ.स.१८२४ मध्ये थळ आणि पिंपरी घाटादरम्यान दळणवळणासाठी रस्ते योजनेच्या संदर्भात अहमदनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना मुंबई डेक्कनच्या आयुक्तांनी बोलणी करण्याकरीता बोलविले. या विषयामध्ये पुण्याच्या आयुक्तांना कल्याण ते थळ घाट या दरम्यान रस्ते बांधणी करावयाची इच्छा होती. त्याचबरोबर धुळे जवळ रस्ते बांधणीची त्यांची इच्छा त्यांनी दर्शविली. या सर्वांमुळे जवळ जवळ २० हून अधिक जोडणीतून सह्याद्रीतून कोकणाकडे जोडणारा मार्ग उरलेल्या महाराष्ट्रासह बांधला गेला. त्यातील घाटातील महत्त्वाचे जोडणी रस्ते पार, माळशेज, दिवा, रामघाट, नाना, थळ, बोर आणि बाळाघाट या दरम्यान होते. पुण्याच्या आयुक्तांना थळ आणि बोरघाटा दरम्यान दळणवळण सुरू करायचे होती. या सर्व रस्त्यांची वेळोवेळी दुरुस्ती, निगराणी करणे महत्त्वाचे होते. पावसाळी दिवसात रस्त्यांच्या अधिक वापरामुळे खड्डे पडत असत. रस्त्यांची दुरुस्ती, धातू व डांबर वापरुन बनविलेले रस्ते या गोष्टी युरोपमधे केव्हापासूनच अस्तित्वात होत्या. पण त्या फारच दूर होत्या. मुंबईच्या सरकारने वर्तमानात या दृष्टीने फारच थोडीशी सुधारणा रस्त्यांच्या बाबतीत केली. लष्कराच्या सामानाची जलद गतीने ने आण आणि त्याचा वापर करता यावा यासाठी माल डोक्यावरून वाहून नेणे अथवा खटारा किंवा गाडीने माल घेऊन जाण्याची सेवा उपलब्ध करुन घेतली.

३.३.३ रेल्वे वाहतूक :

ब्रिटीशांनी त्यांच्या स्वतःच्या देशात इ.स. १८३० मध्ये वाफेवर चालणाऱ्या उत्पादनांची यशस्वीपणे प्रगती केली. पुढील दहा वर्षाच्या काळात ८०० मैल लांबीचे रेल्वे मार्ग इंग्लंडमध्ये बांधण्यात आले. बहुतेक युरोपियन देशात इंग्लंड देशाची प्रगती आपल्याही देशात यावी असे प्रयत्न सुरु होते. भारतामधील व्यापारी समाजही अशा प्रकारच्या दळणवळणाच्या क्रांतीसाठी अतिशय उत्सुक होता. पण ब्रिटीश सरकार मात्र त्याबाबतीत उत्साही नव्हते. हे सरकार नफा आणि तोटा या दृष्टीकोनातून त्याचा विचार करीत होते. ह्या सुधारणेकरीता खूप मोठे भांडवल गुंतवावे लागेल म्हणून त्यांची तयारी होत नव्हती. इ.स.१८४० मध्ये जगन्नाथ (नाना) शंकर शेट आणि इतर व्यापारी मंडळीनी जनमत घेतले आणि काही ब्रिटीश व्यापाऱ्यांबरोबर या विषयावर चर्चासत्र घेतले. त्यातून त्यांनी एक आराखडा तयार केला आणि भारत सरकारवर जलद गतीने मालवाहतुक आणि प्रवास करण्यासाठी रेल्वे सुरू करण्यासाठी दबाव आणला. जर रेल्वे सेवा सुरु केली तर भारतातील लोकांना त्याची प्रचंड मदत होईल. तसेच ईस्ट इंडीया कंपनीच्या सरकारलाही खूप मदत होईल. इ.स.१८४३ मध्ये ''ग्रेट इस्टर्न रेल्वे कंपनी भारतामध्ये स्थापन झाली. या प्रस्तावाला पुढे नेण्यासाठी सर्व व्यापाऱ्यांमध्ये सर्वोत्तम असे दोन व्यापारी होते ते म्हणजे नाना शंकरशेट आणि जमशेटजी जिजीभॉय होते.

भारतामधील रेल्वे सेवा सर्वार्थाने येण्याचे पक्के झाले तेव्हा कंपनीच्या सर्वोच्च न्यायालय मुख्य न्यायाधीश अस्स्कीम पेरी यांनी जाहीरनामा सादर करण्याचे नेतृत्त्व केले. हा जाहीरनामा ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारला १३ जुलै १८४४ रोजी सादर केला गेला. त्यामुळे ब्रिटीश भांडवलदाराचे आणि मुत्सद्यांचे लक्ष या गोष्टीकडे वेधले. भांडवलदारांना आपल्या शिल्लक रक्कमा योग्य ठिकाणी वापरल्या जाव्यात असे वाटत होते. रेल्वे मार्ग सेवा भारतामधील कंपनी राज्याच्या विस्ताराला बळकटी आणण्यासाठी वापरली जावी. इंग्रजी भांडवलदारांनी इंग्लंडमध्ये 'ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वे' ही कंपनी स्थापन केली होती. त्यांनी ईस्ट इंडीया कंपनीच्या संचालकांवर आणि भारताच्या राज्यकर्त्यांवर दबाव आणला जे ह्या प्रस्तावाला मंजुरी देत नव्हते आणि राज्यकर्ते आपली संमती अशा प्रस्तावा करीता राखून ठेवू इच्छित होते. मुंबई ते कल्याण दरम्यान ५७ किलोमीटर (३५ मैल) अंतराचा रेल्वे मार्ग जुलै १८४८ मध्ये बांधण्याच्या प्रस्तावाला सरकाने मंजुरी दिली. पण प्रत्यक्षात बांधकाम ३१ ऑक्टोबर १८५० मध्ये सुरू झाले.

कुठलाही भारतीय कंत्राटदार या मोठ्या कामाची जबाबदारी घेऊ शकत नाही म्हणून इंग्लंडच्या एका सुप्रसिद्ध 'फेबील ॲण्ड फॉउलर' या कंपनीने हे काम हाती घेतले. मुंबई ते ठाणे या दरम्यानचा रेल्वे मार्ग १६ एप्रिल १८५३ मध्ये सुप्रसिद्ध अभियांत्रिक जेम्स बर्कले यांच्या देखरेखीखाली पूर्ण झाला.

ठाणे ते कल्याणच्या दरम्यानचा रेल्वे मार्ग १ मे १८५४ मध्ये पूर्ण झाला. श्री. जी.डी. मडगांवकर यांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईचे गव्हर्नर श्री. लॉर्ड एलफिन्स्टन (माऊंटस्टुअर्ट एलफिन्स्टन यांचा पुतण्या) यांनी अधिकारी, व्यावसायिक आणि काही प्रसिद्ध नागरीक यांच्यासह २८ डब्यांची गाडी जी वाफेच्या इंजिनावर चालविली गेली अशा गाडीतून प्रवास केला जो ऐतिहासिक प्रवास म्हणून प्रसिद्ध पावला.

नंतर मुंबईला रेल्वे मार्गाद्वारे पुणे शहर जोडण्याची योजना आखली गेली. आधी सांगितल्याप्रमाणे शहरी भागाला रस्ते बांधणीतून कोकण जोडण्यात आले होते. जी अतिशय

कठीण अशी गोष्ट होती. तसेच डोंगर खणून बोगदे करुन त्यामधून रेल्वे मार्गाचे बांधकाम करणे ही खूप जिकीरीची आणि मोठी गोष्ट होती. ह्या पद्धतीने बोरघाटाचे काम इग्लंडचे अभियांत्रिकी तंत्रज्ञ आणि भारतीय मजूरांच्या पूर्ण सहकार्याने पूर्ण करण्याचा चंग बांधला आणि २३ मार्च १८६४ रोजी पहिली रेल्वे गाडी मुंबई ते पुणे दरम्यान चालविली. दळणवळण आणि वाहतुकीच्या क्षेत्रात प्रगतीचे एक नवे पर्व सुरू झाले. मुंबई आणि पुणे दरम्यान व्यापार आणि दळणवळणाची गती प्रचंड प्रमाणात वाढली. रेल्वे मार्ग बांधून होण्याआधी माल वहातुक अतिशय धिम्या गतीने होत होती. नंतर पुणे हे एक मालाची ने-आण करणारे एक मोठे बंदर म्हणून गणले जाऊ लागले. ही मालवाहतुक अहमदनगर आणि साताऱ्यावरुन केली जात असे. ह्या सर्व गोष्टींमुळे मुंबई आणि पुणे दरम्यान रेल्वे मार्ग तयार झाल्यामुळे सारे चित्र एकदम पालटून गेले. अगदी सुरुवातीला काही व्यावसायिकांनी शंका व्यक्त केली होती की त्यांचा व्यापार करण्याचा रस अशा जोडणीमुळे नाहीसा होणार पण ते चुकीचे होते. काही वर्षांनी जलदगतीने होणारी माल वहातुक पुणे, त्याच्याशेजारची शहरे, गावे या दरम्यान होत असल्यामुळे सर्व उद्योगधंद्याची भरभराट मोठ्या प्रमाणात होऊ लागली.

३.३.४ संदेशवहन :

मराठ्यांच्या काळात पेशवे आणि मराठ्यांच्या मुख्यालयाचा व्यवहार टपाल पत्रांद्वारे चालत असे. व्यक्तिगत राहणी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागातून असली तरी त्यांच्यातील व्यवहार फारच कमी प्रमाणात होता. पण इंग्रजाच्या आगमनाने मुंबई आणि इंग्लंडमधील दळणवळण खूप वाढले. इंग्रजाचे हे बळ भारतामध्ये सरकारी स्तरांवर तसेच उद्योजकांच्या दरम्यान दळणवळणाचे सामर्थ्य वाढवू लागले. रस्त्यांची दुरुस्ती सर्व शहरातून, गावातून रस्ते जोडणी आणि साप्ताहिकातून त्यांची प्रसिद्धी यामुळे समाजाच्या सर्व स्तरांवर सर्व भागातून दळणवळणाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात वाढली. पश्चिम मार्गावरील टपाल सेवा तयार होण्याच्या मार्गावर होती. तारयंत्राची संकल्पना ही मोर्स लिपीच्या क्रांतीकारी संपर्क योजनेवर आधारीत होती. तो एक असा बिनातारी संदेश होता कि इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाच्या अपयशाचे एक कारण ठरला होता.

आपली प्रगती तपासा :-

१) रेल्वेच्या बांधणी आणि विस्ताराबाबत थोडक्यात माहिती लिहा.

_____

_____

_____

_____

_____

३.४ ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य :

सोळाव्या शतकात गोवा आणि वसई मधल्या लोकांना पोर्तुगिजांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या भारताच्या पश्चिम दिशेकडील प्रांतात ख्रिश्चन धर्म स्वीकारायला लावला. बरेचसे लोक त्यामुळे त्या प्रातांतून पळून गेले. सोळाव्या शतकातील पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेल्या पश्चिम किनाऱ्यालगत, गोव्याच्या आजुबाजुच्या गावातील लोकांच्या मनात या गोष्टींमुळे भिती निर्माण

झाली होती. सतराव्या आणि अठराव्या शतकात मराठा राज्यकर्त्यांनी जबरदस्तीचा धर्मबदल तपासून पाहीला. महाराष्ट्रातील लोकांच्या धार्मिक गोष्टींमध्ये हस्तक्षेप करण्यापासून ब्रिटीश सोयिस्करपणे दूर राहिले. त्यांच्या मनात असे होते की भारतीय सैनिकांनी त्यांच्याबरोबर प्रामाणिक व्यवहार ठेवला पाहीजे. त्यांच्या सामाजिक किंवा धार्मिक गोष्टींमध्ये हस्तक्षेप करणे म्हणजे त्यांच्याच शक्तीला धक्का दिल्यासारखे आहे.

३.४.१ सुरुवातीच्या ख्रिश्चन संस्था :

पूर्वी ख्रिश्चन धर्म प्रसारक परदेशी हल्ले खोरांना भारतामधे घेऊन आले. परदेशी हल्लेखोर म्हणजे पोर्तुगीज, ब्रिटीश, फ्रेंच, डच हे होत. यांच्या धार्मिक गरजा पूर्ण करण्याकरीता त्यांना भारतात घेऊन आले. भारतामधील मागास वर्गाच्या दु:खदायक परिस्थीतीचे आकलन जेव्हा या धर्म प्रचारकांना झाले तेव्हा त्यांचे मन त्यांना स्वस्थ बसू देईना. समाजातील गरजू आणि गरीब लोकांना त्यांनी मदत करायला सुरुवात केली. त्यांनी केलेल्या मदतीमुळे म्हणजेच शिक्षण आणि आरोग्य सेवा दिल्यामुळे समाजातील तळागाळातील लोकांची परिस्थिती सुधारली.

हे धर्म प्रसारक सतीपद्धत, बालविवाह, बालहत्या आणि इतर चुकीच्या प्रथा या विषयी टीका करत असत. त्यांनी बऱ्याचशा शाळा सुरु केल्या आणि त्याद्वारे उपयुक्त ठरणारे ज्ञान व माहिती मिळण्याची व्यवस्था केली. या सर्व धर्मांच्या समान सुधारणा होत्या. त्याच्या धर्मात काही धर्म प्रसारकांनी कॅथोलिझमचा प्रसार केला होता आणि एकदा लोकांनी तो धर्म स्वीकारला की त्यांचे समाधान होत असे आणि धर्मबदलानंतर त्यांना त्यांच्या दैवावर सोडून दिले जात असे. ते लोक ज्या धर्माचे असत तेथुन त्यांना वगळले जात असे. हिंदु धर्मांमध्ये त्यांना येण्यास बंदी केली जात असे. हिंदु धर्माच्या चाली रीती, पद्धतीपासून हे धर्मांतर केलेले लोक आपली या सर्व रुढीपासून सुटका करुन घेत असत.

प्रोटेस्टंट धर्मप्रचारक ईस्ट इंडीया कंपनीच्या भूभागामध्ये फारसे काम करु शकले नाहीत. इ.स.१७९३ मध्ये विल्यम कॅरी बंगालमध्ये आला. तो बाप्टीस्ट मिशनरी सोसायटीचा सदस्य होता. जरी तो नंतर मुंबईला प्रत्यक्षात आला असला तरी नंतरच्या काळात त्याचे कार्य मुंबई प्रांतामध्ये कार्य करणाऱ्या मिशनऱ्यांसाठी आदर्श ठरले. त्यांनी अनेक स्थानिक भाषा अवगत केल्या. त्यापैकी एक 'मराठी' होती. त्यांनी इंग्लिश आणि मराठी शब्दकोष छापून प्रसिद्ध केले होते. त्यांनी 'न्यू टेस्टामेंट' मराठी आणि बंगाली भाषेमध्ये भाषांतरीत केले होते. इतर धर्मप्रचारकांना आणि राज्यकर्त्यांना मराठी भाषेचे ज्ञान विविध उद्देशांसाठी उपयोगी वाटू लागले.

३.४.२ एकोणिसाव्या शतकातील ख्रिश्चन संस्था :

इ.स.१८१३चा चार्टर ॲक्ट हा महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा होता. कंपनी सरकारने त्यांच्या अखत्यारीतील भूभागात ख्रिश्चन मिशनऱ्यांना काम करण्यास परवानगी दिली. एकोणीसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात दोन मिशनरी मुंबईला आले. इ.स.१८१३ मधली पहीली प्रोटेस्टंट मिशन अमेरिकन होती. इ.स.१८१७ मध्ये इंग्लिश मेथोडीस्ट मिशनरी आले. त्यानंतर इ.स.१८१९ मध्ये अँग्लिकन चर्च मिशनरी आले. इ.स.१८२३ मध्ये स्कॉटीश मिशनने त्यांच्या अनुयायांना पाठविले आणि इ.स.१८४१ मध्ये आयरीश प्रेसबेटेरियन आले. अशाप्रकारे ब्रिटीश आणि अमेरिकन मिशनऱ्यांनी त्यांचे काम सुरु केले. लोकांच्या शिक्षणाबरोबरच धर्मप्रसाराचे कामही चालू होते. जनसामान्यांबरोबर संपर्क वाढविण्यासाठी त्यांनी

स्थानिक भाषा शिकण्यास सुरुवात केली. त्यांनी शहरामध्ये शाळा आणि महाविद्यालये सुरु केली आणि इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. ग्रामीण भागामध्ये त्यांनी मराठी माध्यम वापरले.

इ.स.१८१५ मध्ये पहिली ख्रिश्चन शाळा हिंदू मुलांसाठी उघडण्यात आली. इ.स.१८२४ मध्ये अमेरिकन मिशनने पहिली मुलींची शाळा उघडली. इ.स.१८२९ आणि इ.स.१८४० च्या दरम्यान श्रीमती एम. विल्सन यांनी भारतीय मुलींसाठी सहा शाळा सुरु केल्या. त्यांनी उच्च कुलीन हिंदू मुलींसाठी पुण्याच्या आत-बाहेर पाच शाळा सुरु केल्या. त्यांनी शालेय वाचनाची पुस्तके स्वतःच्या प्रेसमध्ये छापली. विज्ञान व साहित्यावरील अनेक युरोपियन पुस्तके भाषांतरीत करण्यात आली. मराठी आणि गुजरातीमध्ये बायबलचे रुपांतरण झाले. त्यात अनेक भौतिक आणि तात्विक विषयांवर माहिती सांगितली होती.

ख्रिश्चन मिशनरी असल्यामुळे समाजकार्य अपरिहार्य होते. त्यासाठी त्यांनी अनेक दवाखाने सुरु केले, वैद्यकिय मदत देऊ केली. मानवतेची सेवा हा या मिशनऱ्यांचा उद्देश होता. काही विद्वान धर्मप्रचारकांनी उदा. डॉ. जॉन विल्सन आणि लेफ. कर्नल वान्स केनेडी यांनी संस्कृत आणि इतर साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. त्यांच्या विचारांच्या प्रसारासाठी त्यांनी वृत्तपत्रे सुरु केली.

३.४.३ ख्रिश्चन धर्माविषयी वादप्रतिवाद :

राजकीय स्वातंत्र्य गमावलेल्या महाराष्ट्रीयन जनतेला ख्रिश्चन मिशनरी त्यांच्या दृष्टीकोनातून आकार देऊ पाहत होते. राज्यकर्त्यांना राज्यात कायदा आणि सुव्यवस्था हवी होती आणि मिशनऱ्यांनाही येशू ख्रिस्ताप्रती सामाजिक कार्य करायचे होते. त्यातच मुक्ती आहे असे त्यांचे मत होते. त्यामुळे अशा अनेक धार्मिक, सामाजिक विरोधाभासाच्या गोष्टींमुळे लोकांमध्ये एकच गोंधळ उडू लागला.

३.४.४ मिशनऱ्यांच्या पद्धत्ती :

एकोणिसाव्या शतकातील मिशनऱ्यांपेक्षा १७ व्या शतकातील मिशनऱ्यांची पद्धत ही मनावर अधिक परिणाम करणारी होती. सतराव्या शतकातील 'फादर रॉबर्टो डी नोबिली' हा भारतीय पद्धतीतील ख्रिस्तीधर्माविषयी समाधानी होते. १७ व्या शतकातील पद्धतीनुसार ख्रिश्चन हिंदू धर्मात राहून ख्रिस्ती नियमांचे व शिकवणीचे पालन करु शकत होता. परंतु १९ व्या शतकातील मिशनऱ्यांची उदा. डॉ. विल्सन यांची पद्धती पश्चिमात्यांकडे झुकणारी होती. त्यांनी हिंदू, मुस्लिम आणि पारसी धर्माची अवहेलना केली. १९ व्या शतकातील मिशनऱ्यांच्या मनात अशी भावना झाली की ह्या असंस्कृत काळ्या लोकांना सुसंस्कृत बनविण्याचे ओझे त्यांच्या खांद्यावर आहे. (Whiteman's Burden) हिंदू धर्मातील अनेक चुका आणि त्रुटी ते दाखवू लागले. त्यांच्या रुढी परंपरांवर ते बोट ठेऊ लागले आणि हिंदू धर्मामध्ये त्यांना काहीही तथ्य नसल्याचे जाणवू लागले. यामुळे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्यासंबंधी समाजात खटके उडू लागले.

३.४.५ प्रतिक्रिया आणि विधायक चळवळी :

हिंदूंच्या धार्मिक जीवनात ढवळाढवळ केल्याचे दोन परिणाम झाले. हिंदू धर्मातील उद्योगशील घटक धर्माची तत्त्वे व सामाजिक रुढी यांचा अभ्यास करावयास लागले. डॉ. जॉन विल्सन याने त्यास 'चुकांची धर्मपद्धत' (a system of error) असे संबोधले तर श्रीमती एम. विल्सन यांनी 'हास्यास्पद' अशी संभावना केली. त्यांच्या मते, या धर्माची स्थापना अशा काही

दुर्विचारांवर आधारीत आहे ज्यामुळे एखाद्याची समजून घेण्याचीच वृत्ती मारली जाते आणि हृदयातील प्रेम, औदार्य कधीही व्यक्त केले जाऊ शकत नाही.

ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या हिंदू धर्मावरील सरळसरळ आघाताला कर्मठ हिंदूंनीही प्रत्युत्तर दिले. त्यामुळे कर्मठ हिंदू ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या हालचालीकडे संशयाने बघू लागले. विष्णूबुवा ब्रह्मचारी आणि विष्णू शास्त्री चिपळूणकरांनी त्यांच्या वृत्तपत्रातून सार्वजनिकरित्या द्वेषपूर्ण टीका केली.

मिशनऱ्यांच्या कार्य करण्याची पद्धती आणि त्यांचे आवेगपूर्ण संवाद याचा नव्याने इंग्लिश शिक्षित झालेल्या दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहीतवादी गोपाळ हरी देशमुख आणि डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांच्या 'एकेश्वरवाद' या संकल्पनेवर झाला. परमहंस सभा आणि प्रार्थना समाजाची स्थापना हिंदू धर्माचे मूळ शुद्ध रुप दाखविण्यासाठी झाली. ज्याप्रमाणे बंगालमध्ये राजा राम मोहन राय आणि गुजरात आणि पंजाबमध्ये दयानंद सरस्वती यांनी अशाच प्रकारचे प्रयत्न केले.

३.४.६ भारतविषयक अभ्यासक :

मिशनरी विद्वान आणि भारतीय प्राचीन इतिहासाचा कला आणि पुराणवस्तु संशोधन अभ्यास करणारे शास्त्रज्ञ यांचे सहाय्य खरोखरीच मोलाचे होते. डॉ. जॉन विल्सन यांनी वैदीक साहित्याचा अभ्यास केला व भारतातील पारसी धर्म झोरोस्ट्रीयन यावर पुस्तक लिहिले. लेफ्टनंट कर्नल बान्स केनेडी यांनी वेदान्तावर प्रबंध लिहीला. विल्यम जोन्सने कालिदासाचे प्रसिद्ध नाटक 'शाकुंतल'चे इंग्रजी भाषांतर केले. एच. टी. कोलब्रुक आणि एच. एच. विल्सन यांनी संस्कृत भाषा आणि भारतीय पुराण संस्कृतीचा अभ्यास केला. भारतीय विद्वानांना स्वतःच्या इतिहास व संस्कृतीचा अभ्यास करायला त्यांनी प्रवृत्त केले.

रॉयल एशियाटीक सोसायटीची मुंबई शाखा ही मुंबईत सामाजिक जागृती करण्यास कार्यशील ठरली. इ.स.१८३५ ते इ.स.१८४२ च्या काळात डॉ. जॉन विल्सन तिचा अध्यक्ष होता. सोसायटीच्या वृद्धीबरोबर मुंबई पुण्याच्या विद्वानांना एकत्र येण्याची संधी मिळाली आणि स्वतंत्र अभ्यासाची संधी मिळाली. बाळ शास्त्री जांभेकरांनी इ.स.१८३६ च्या 'बॉम्बे दर्पण'मध्ये आशा व्यक्त केली होती की एशियाटीक सोसायटीचे सभासदत्त्व स्थानिक लोकांना नाकारले जाणार नाही.

प्राचीन भारताचा उज्वल इतिहास आणि वैदीक आणि पुराणिक हिंदू धर्माच्या सखोल अभ्यासानंतर महाराष्ट्रीयन जनतेच्या मनात समानतेची व स्वाभिमानाची भावना रुजली. इतर देशांच्या तुलनेत, अगदी राज्यकर्त्यांच्याही तुलनेत आता त्यांना समानता भासू लागली. मिशनऱ्यांचा अभ्यास आणि ब्रिटीश अधिकारी आणि भारतीय विद्वान यांनी स्थानिक जनतेमध्ये राष्ट्रीयत्त्वाची भावना जागृत केली. त्यावेळच्या महाराष्ट्रातील राज्यकर्ते स्वतःची टिका करीत असताना इंग्रजी राज्यकर्त्यांच्याही चुकांवर बोट ठेवू लागले आणि सामाजिक धार्मिक चुकीच्या समजुती व चालीरीती यांच्याविरोधात आवाज उठवू लागले.

आपली प्रगती तपासा :-

१) ख्रिश्चन मिशनऱ्यांचे शैक्षणिक कार्य सांगा.

३.५ समारोप

या पाठात आपण कायदा आणि सुव्यवस्था अभ्यासली. वाहतुक, दळणवळण आणि ख्रिश्चन धर्माविरोधी वादविवाद पाहिले. जिथे जिथे ब्रिटीश राज्यकर्ते आणि मिशनऱ्यांनी कार्य केलेले आहे तिथे तिथे बदल झालेला दिसतो. भारतातील परिस्थितीवर सक्षम आणि प्रामाणिक ब्रिटीश अधिकारी सतत लक्ष ठेऊन होते आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांनी गरीब आणि अज्ञानी लोकांपर्यंत धर्मप्रसारणाचे कार्य सुरु केले होते. परंतु महाराष्ट्रात त्यांची अरेरावी मूकपणे सहन केली गेली नाही. रामोशी कोळी आणि गरीब शेतकऱ्यांच्या बंडाने ब्रिटीश सैन्यातील त्रुटी स्पष्ट दिसून आल्या. मिशनऱ्यांना विष्णूशास्त्री आणि विष्णुबुवांकडून तोडीसतोड उत्तर मिळाले. मिशनऱ्यांना हिंदू समाज सहज बदलणे शक्य झाले नाही. तरीही मिशनऱ्यांनी हिंदू समाजामध्ये एक नवीन प्रकारची जिज्ञासा, शास्त्रीय अभ्यास करण्याची वृत्ती आणि राष्ट्रीयत्वाची भावना रुजवली हे नाकारता येणार नाही.

३.६ प्रश्न

१) ब्रिटीशांनी महाराष्ट्रामध्ये त्यांचे कायदे व व्यवस्थापन कसे अमलात आणले ?
२) ब्रिटीश राज्यकर्त्यांनी महाराष्ट्रामधील वाहतूक आणि दळणवळ व्यवस्था कशी सुधारली ते लिहा.
३) ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य व चळवळी स्पष्ट करा.

❖❖❖❖

४

सुधारणांचा प्रारंभ व त्यास प्रतिकार

घटक रचना :

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ बाळ गंगाधर शास्त्री जांभेकरांचे कार्य
४.३ बौद्धिक प्रतिकार आणि आर्थिक राष्ट्रवाद
४.४ भास्कर पांडुरंग तर्खडकर
४.५ रामकृष्ण विश्वनाथ यांचे कार्य
४.६ भाऊ महाजन यांचे कार्य
४.७ समारोप
४.८ प्रश्न

४.० उद्दिष्ट्ये

१) बाळ शास्त्री जांभेकर यांच्या काळातील सुधारणा अभ्यासणे.
२) ब्रिटीश वसाहतवादाला केल्या गेलेल्या बौद्धिक विरोधाची माहीती करुन देणे.
३) आर्थिक राष्ट्रवादाच्या चळवळीचे आकलन करणे.
४) भास्कर तर्खडकर, रामकृष्ण विश्वनाथ आणि भाऊ महाजन यांच्या कार्याचे विश्लेषण करणे.

४.१ प्रस्तावना

या प्रकरणातून आपण, एकोणीसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धकात मुंबईतील सुशिक्षित मध्यम वर्गीय नेत्यांकडून लोकांसमोर मांडण्यात आलेले विचार, कल्पना यांचा मागोवा घेणार आहोत. एक गोष्ट आधीच लक्षात घेतली पाहीजे की, मुंबई आधीपासूनच ईस्ट इंडीया कंपनीच्या व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठिकाण होते. पाश्चिमात्य लोकसंस्कृतीशी संपर्कात आल्याने, मुंबईतील जनजीवनात, संस्कृतीत झालेले बदल आणि महाराष्ट्रातील अन्य भागातील संस्कृती यात तफावत जाणवत होती.

पाश्चिमात्य विचारांच्या आणि संस्कृतीच्या संपर्कात आल्याने प्रामुख्याने दोन विचार प्रवाह दिसतात. एक म्हणजे सामाजिक बदलाचा व पुनर्स्थापनेचा आणि पाश्चिमात्य देशांशी बरोबरी

करण्याचा. दुसरा म्हणजे पश्चिमात्य शक्तीचा प्रतिकार करुन लोकांचे हाल थांबविण्याचा आणि महाराष्ट्रातील धन संपत्ती आणि मानवसंपत्ती यांचा उपयोग परकीय देश श्रींमंत होण्यासाठी करताहेत आणि म्हणूनच ही पिळवणूक बंद करण्याच्या उद्देशाने पहिल्या विचार प्रवाहामध्ये बाळ शास्त्री जांभेकर आणि दुसऱ्या विचार प्रवाहामध्ये भास्कर पांडुरंग तर्खडकर, रामकृष्ण विश्वनाथ आणि भाऊ महाजन हे कार्यरत होते.

४.२ बाळ शास्त्री जांभेकरांचे कार्य

त्यांचा जन्म देवगड, जुनी रत्नागिरी (आता सिंधुदुर्गात येते) इथला. त्यांचे समकालीन दादोबा पांडुरंग आणि भाऊ महाजन प्रमाणेच त्यांचेही शिक्षण एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमधून झाले.जसजसा पश्चिमात्य संस्कृती आणि विचारांचा त्यांचा अभ्यास वाढत गेला, तस तशी महाराष्ट्रात सामाजिक बदलाची गरज आहे असे त्यांना वाटू लागले. लवकरच त्यांना 'आधुनिक मराठीचे जनक' आणि पश्चिम भारतातील 'विद्येच्या पुनरुज्जीवनाचे आद्यप्रवर्तक' म्हणून ओळखले जाऊ लागले.

पश्चिमी संस्कृतीला पूर्णपणे नतमस्तक होण्याच्या बाबतीत राम मोहन रॉय यांचे वर्तन जांभेकरांना मान्य नव्हते. हे प्रत्यक्षदर्शनी तरी संयुक्तिक वाटत नाही. कारण जांभेकर यांचे भाऊ महाजन (गोविंद विठ्ठल महाजन) आणि दादाबा पांडुरंग तर्खडकर यांच्याशी घनिष्ठ संबंध होते आणि दोघांनाही हिंदू धर्मात सुधारणा व्हावी याची जाणीव होती. परंतु धार्मिक बाबतीत दांभिकपणा जांभेकरांना मान्य नव्हता. धर्माच्या बाबतीत प्रतिगामी व्यक्तींच्या विरोधात त्यांनी वेळोवेळी टिकास्त्र सोडले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी हिंदू धर्मात चालवलेल्या ढवळाढवळीबाबत त्यांनी उघडपणे विरोध केला. इ.स.१८४३ मध्ये १८ वर्षांचा नारायण गोविंद परळीकर या ब्राह्मण मुलाने, ख्रिश्चन धर्माची दिक्षा घेतली आणि तो रेव. रॉबर्ट नेसबिट बरोबर राहू लागला. त्याने त्याच्या १२ वर्षाच्या भावाला श्रीपतीलाही बरोबर ठेऊन घेतले. नारायणला वाटले की त्याचा भाऊ ख्रिश्चनांबरोबर राहीलाय, जेवलाय आता त्याला हिंदू धर्मात स्विकारणार नाहीत. परंतु, नारायणच्या वडीलांना त्यांचा धाकटा मुलगा श्रीपत परत हवा होता. पण रेव्ह नेसबिट त्याला सोडेनात. तेव्हा बाळ शास्त्री जांभेकरांनी त्यावेळचे अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे व्यापारी श्री. जगन्नाथ शंकर शेठ यांना बरोबरीस घेऊन या प्रकरणाचा तडा लावायचे ठरविले. अनेक ब्राह्मणांनी या कृतीस विरोध जाहीर केला. त्यापैकी अत्यंत श्रीमंत व्यापारी शेठ साकाजी दादाजी जांभेकर यांनी श्रीपतीस घेऊन वाराणसीला जाऊन शुद्धीकरण करुन आणले. परंतु ब्राह्मण समाजाने जांभेकरांविरुद्ध बहिष्कार पुकारला आणि श्रीपतीला पूर्णपणे हिंदू धर्मात स्विकारण्यात आले नाही. परंतु, जांभेकरांनी ब्राह्मण समाजाविरोधात प्रतिकार केला नाही. जांभेकरांना पाच वर्षांसाठी समाज बहिष्कृत करण्यात आले.

दुसऱ्या एका घटनेमध्ये त्यांना ब्राह्मण समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागले ती म्हणजे जेव्हा त्यांनी ग्रहणाची प्रक्रीया समजावून सांगितली ग्रहणामागचे शास्त्रीय कारण ब्राह्मण समाजातील प्रतिष्ठितांना मान्य नव्हते. जांभेकरांनी समाजाच्या रोषाची, राग लोभ किंवा बहिष्काराची कधीही पर्वा केली नाही. त्यांनी सदैव स्वतःचा सदसदविवेकबुद्धी जागृत ठेवला.

४.२.१ धर्माविषयी जांभेकरांचा दृष्टीकोन :

महाराष्ट्रातील आणि पर्यायाने भारतवर्षात झालेले विद्येचे, ज्ञानाचे पुनरुज्जीवन (Renaissance) या मागचे कारण हे धर्माविषयी बदललेला दृष्टीकोन हे होय. धर्माच्या बाबतीतील कोणताही बदल हा बदललेल्या विचारप्रवृत्तीचे प्रतीक असतो. जर असा बदल सहजपणे स्विकारला तर चांगलेच पण जरी त्यास विरोध झाला तरी त्यामागच्या कारणांची मिमांसा करुन, त्यावर तोडगा काढण्याचे प्रयत्न चालूच राहीले. जांभेकरांना कोणाच्याही धर्मभावना दु:खावायच्या नव्हत्या. गीतेमधील श्रीकृष्णाचे वचन त्यांना पूर्ण मान्य होते. स्वत:च्या धर्मातच मरण आलेले बरे. (स्व धर्मे निधनम् श्रेया:) त्यांनी कधीही देवाच्या अस्तित्वाबाबत दुमत दर्शविले नाही किंवा मंत्रांचा अर्थ समजून घेतल्याशिवाय त्यावर टीका टिप्पणी केली नाही. त्यांचे फक्त एवढेच म्हणणे होते की धर्म ग्रंथांतील प्रत्येक शब्द आणि त्याचा अर्थ सामान्य जनतेपर्यंत पोहोचला पाहीजे. कोणतेही धार्मिक कार्य करताना, त्यात वापरण्यात येणाऱ्या मंत्राचा अर्थ, ब्राह्मण आणि धर्मकार्य करणाऱ्या व्यक्तीला या दोघांनाही सुस्पष्ट समजला पाहीजे. नाहीतर निव्वळ शब्दांना काही अर्थ राहत नाही. त्यांनी धर्मकार्ये अधिकाधिक सोपी व सुस्पष्ट असावीत, व्हावीत यावर भर दिला जेणे करुन अनेक गैरसमज दूर होतील.

४.२.२ सुधारणांचा त्रिमितीय दृष्टीकोण :

मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रात सुधारणांचे बीज पेरण्याचे श्रेय बाळ गंगाधर शास्त्री जांभेकरांना जाते. त्यांचा दृष्टीकोन त्रिमितिय होता. १) धार्मिक २) सामाजिक ३) माणुसकीला धरुन धार्मिक क्षेत्रात त्यांनी ब्राह्मण समाजामध्ये अधिकाधिक शास्त्रीय दृष्टीकोन ठेवण्याबाबत भर दिला. सामाजिक क्षेत्रामध्ये विधवांचा पुर्नविवाह स्त्रियांचे हाल कमी करण्याच्या दृष्टीने त्यांनी पावले उचलली. बहिष्कृत महिलांसाठी त्यांनी आश्रम बांधून देवून माणूसकीचे एक नवे प्रत्यंतर दिले. जांभेकर हे कोणी क्रांतीकारी नव्हते व या तिन्ही क्षेत्रात त्यांनी दाखविलेल्या प्रयत्नांत त्यांना म्हणावे तसे यशही आले नाही. त्यांना महाराष्ट्रातील जनतेची परिस्थिती बदलायची होती. त्यांच्याकडे प्रभावी माध्यमापैंकी एक होते. दर्पण नावाचे साप्ताहीक आणि दिग्दर्शन नावाचे मासिक. ह्या बाबतीत ते अग्रभागी होते. परंतु त्यांचे समाज प्रबोधन फक्त मासिक-साप्ताहिक वाचण्यापुरतेच मर्यादीत होते. सामाजिक बदलाचा जो अभिनव दृष्टीकोन पर्याय त्यांनी अवलंबलेला होता. तो खरोखरच प्रभावी होता. स्त्रियांची दुरावस्था धार्मिक दांभिकपणा अंधश्रद्धेचा धुमाकूळ यावरचे त्यांचे विचार सुशिक्षित तरुण वर्गाना जागृत करु लागले.

पाश्चात्य विद्येने प्रभावित झालेल्या नवीन पिढीमध्ये नवीन विचारांचे वारे जांभेकरांना अपेक्षित होते. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग समाजाला व्हावा असे त्यांना वाटे. इ.स.१८०४ मध्ये सर जेम्स मॅकिनटॉश यांनी लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बेची स्थापना केली आणि इ.स.१८३०मध्ये रॉयल एशियाटीक सोसायटीच्या मुंबई शाखेमध्ये विलीन झाली. ह्या संस्थेचा मुंबईच्या बौद्धिक प्रगतीमागे खूप मोठा वाटा आहे. जांभेकरांना सतत वाटे की, आपल्या देशातील तरुणांनी पश्चिमात्य देशांकडून विद्वानांकडून खूप काही शिकावं, देशाला पुढे न्यावे. ७ मे, १८३६ मध्ये त्याने 'दी बॉम्बे दर्पन' लिहिले.

ते म्हणतात, ''आपल्या लोकांना इतिहासाच्या गतखूणांमध्ये जास्त रस आहे परंतु हे जे परकीय आपल्यामध्ये काही काळ वास्तव्य करण्यासाठी आले आहेत त्यांच्याकडून जिज्ञासावृत्ती, सतत काम करीत राहण्याची संशोधन करण्याची जी प्रवृत्ती आहे ती खरोखरीच स्तुत्य आहे.'' ते पुढे म्हणतात, ''आता कोणतीही शंका नाही की मुंबई ऐशियाटीक सोसायटीचे सदस्यत्व

(मेंबरशिप), सुशिक्षित, हुशार स्वदेशी माणसाला दिले जाईल आणि काही लोक त्याचा खरोखरीच विधायक कामासाठी उपयोग करतील.''

जांभेकरांना नवीन शिक्षणपद्धतीवर नितांत विश्वास होता. ते स्वतः चांगले प्रशिक्षक होते. मुंबईतील एलफिन्स्टन कॉलेजमध्ये ते गणिताचे प्राध्यापक म्हणून काम करीत आणि त्यानंतर त्यांनी दक्षिण महाराष्ट्राचे एज्युकेशन इनस्पेक्टर म्हणून काम केले. त्यांचा अभ्यास त्यांच्या विषयापुरता मर्यादित नव्हता तर त्यांना अनेक रहस्यांची उकल करायची होती. पश्चिमी ज्ञानाने ते भारावले होते आणि जितके शक्य आहे तितके त्यांना आत्मसात करावयाचे होते. त्यांच्या पस्तीस वर्षाच्या अल्प आयुष्यात ते एक व्यासंगी, मेहनती विद्यार्थी राहीले. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन त्यांचा आदर्श होता. एल्फीन्स्टन बद्दल त्यांच्याच शब्दात मांडायचे तर ''भारताने एल्फिन्स्टन इतका महान मुत्सद्दी, मुक्त विचारांचा माणूस बघितलेला नाही.'' या वाक्याचे श्रेय दोघांनाही जाते.

आपली प्रगती तपासा :-

१) बाळ शास्त्री जांभेकरांचे धर्मविषयक मत काय होते ?

२) एल्फिन्स्टनबद्दल जांभेकरांनी काय म्हटले आहे ?

४.३ बौद्धिक प्रतिकार आणि आर्थिक राष्ट्रवाद

सुरुवातीलाच नमुद केल्याप्रमाणे या अध्यायाचे पूर्ण नाव सुरुवातीचा ब्रिटीश वसाहतवादाला होणारा बौद्धिक विरोध आणि आर्थिक राष्ट्रवादाच्या चळवळीची सुरुवात हे आहे. यातील संज्ञांचा आपण विस्ताराने विचार करु बौद्धिक विरोध म्हणजे इंग्रजांच्या कार्य करण्याच्या पद्धतीवर, त्रुटींवर वा चुकांवर भाष्य करणे, विचार व्यक्त करणे होय. राष्ट्रवाद म्हणजे एका ठराविक भूभागातील लोकांची ज्यांची संस्कृती, इतिहास व सरकार एकच आहे, अशा व्यक्तीची एकमेकांबाबत वाटणारी एकात्मता होय. त्याचप्रमाणे आर्थिक राष्ट्रवाद म्हणजे देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी एकत्र येण्याची वृत्ती, आर्थिक सामर्थ्याबद्दल अभिमान आणि आर्थिक नुकसानीबद्दल एकत्रितपणे वाटणारी खंत होय.

आता, ब्रिटीश वसाहतवाद फक्त खिलजी किंवा तुघलकच्या मध्ययुगीन इतिहासातील केवळ राजकीय आणि सैनिकी छावण्या नव्हत्या तर एक सुनियोजित, सुव्यवस्थापित अशी यंत्रणा होती. ज्याद्वारे भूमिपूत्रांचे आणि नैसर्गिक संपत्तीचे शोषण होऊन परकीय देशाच्या प्रगतीसाठी त्याचा हातभार लागणार होता.

भारत हा ब्रिटीशांची एक वसाहत झाला होता. एक अशी व्यापारी कंपनी जी स्वतःची आणि स्वतःच्या देशाची प्रगती भारताच्या आर्थिक, सामाजिक पिळवणूकीवर करणार होती.

मुक्त व्यापार आणि कामगारांचे विभाजन या कार्यप्रणालीने ईस्ट इंडीया कंपनीने स्वतःची पाळेमुळे भारतात घट्ट रोवली होती. ब्रिटीश सरकार दर वीस वर्षांनी कंपनीचे अधिकार पत्र अथवा सनद यांचे नुतनीकरण करीत असे.

महाराष्टातील जनतेला ब्रिटीश राजवटीतील जुलुम, पिळवणूक, दडपशाहीला त्याप्रमाणात फारसे सामोरे जावे लागले नाही. कारण मुंबई प्रांताचा गव्हर्नर माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन होता. सर रॉबर्ट ग्रॅण्ट गव्हर्नर झाल्यापासून वादाला सुरुवात व्हायला लागली. लॉर्ड विल्यम बेंटींक नंतर लॉर्ड ऑकलंड इ.स.१८३६ मध्ये मुंबईचा गव्हर्नर म्हणून आला आणि वैचारिक खटके उडायला सुरुवात झाली.

४.४ भास्कर पांडुरंग तर्खडकर (इ.स.१८१६-१८४७) व त्यांचे कार्य

ईस्ट इंडीया कंपनीच्या भारतातील सरकार विरोधी टिकेची झोड ब्रिटीश पत्रकारांनीच उठविली. इ.स.१८२३ ते इ.स.१८३५ च्या काळात काही वृत्तपत्रांवर बंदी घालण्यात आली. सर चार्ल्स मेटकाल्फ या कंपनीच्या गवर्नर जनरलाने वृत्तपत्रे अनेक प्रकारच्या बंधनातून मुक्त केली. वृत्तपत्रांचे हे स्वातंत्र्य पुढील चाळीस वर्षांपर्यंत टिकले. मुंबईतील सुशिक्षित वर्गाला त्याचा उपयोग करता आला. इ.स.१८१६ पर्यंत मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर युरोपियन आणि भारतीय ख्रिश्चनांचे प्रमाण वाढले होते. एकूण १,६५,००० लोकसंख्येपैकी १० टक्के लोक ख्रिश्चन होते. 'बॉम्बे गॅझेटीअर' हे साप्ताहीक इंग्लिश लोकांकडून चालविण्यात येई. पुढे त्याचे रुपांतर दैनिकात झाले. बॉम्बे गॅझेटीअरच्या मुक्त विचारांच्या संपादकाच्या मताप्रमाणे मुंबईतील लोकांनी त्यांच्या समस्या दैनिकात मांडाव्यात असे त्यांना वाटे. भास्कर तर्खडकरांनी या संधीचा फायदा घेऊन या वृत्तपत्रामध्ये 'एक हिंदू' या टोपण नावाने लिखाणास सुरुवात केली.

भास्कर हे दादोबा पांडुरंग यांचे लहान बंधू होत ज्यांचा उल्लेख डी.पी. तर्खडकरांचे आत्मचरित्र वाचताना होतो. दादोबा आणि डॉ. आत्माराम बंधूप्रमाणे त्यांचे शिक्षणही एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट मधून झाले. कंपनी सरकारकडे नोकरी न पत्करता त्यांनी जमशेटजी जीजीभॉय यांच्याकडे ते काम करु लागले. इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व होते आणि त्या भाषेत सहजतने आपले विचार प्रकट करु शकत होते. त्यांच्या लिखाणामधून त्यांची संशोधक वृत्ती आणि विषयाचे सुस्पष्ट उत्खनन करण्याची प्रतिभा दिसून येते.जुलै ते ऑक्टोबर १८४१ च्या दरम्यान त्यांनी बॉम्बे गॅझेटीअर मध्ये आठ लेख लिहीले आणि जनमनात खळबळ माजविली.

भास्कर तर्खडकरांनी 'एक हिंदू' या टोपण नावाने लिखाणास सुरुवात केली. मग ब्रिटीश सत्तेविषयी मतप्रदर्शन 'हिंदू दोन' या नावाने सुरुवात केली मग 'हिंदू तीन' आणि 'हिंदू चार'. 'हिंदू -चार'ने लिहीलेल्या लेखात ब्रिटीश सत्तेवर स्तुतीसुमने उधळण्यात आली होती आणि आधीच्या तीन हिंदूंची मते रद्दबादल ठरविण्यात आली होती. मग त्यांनी विरोधाभासात्मक लेख लिहिला आणि म्हटले की हिंदू चार ला स्वतःला हिंदू म्हणून घ्यायला शरम वाटली पाहीजे कारण कोणताही हिंदूमातेपोटी जन्माला आलेला मुलगा इंग्रजांकडे लाचारी करुन त्यांच्यावर खोटी स्तुतीसमने उधळणार नाही. प्रत्यक्षात हिंदू - चार हा एक इंग्रज माणूस होता ज्याला आधीच्या हिंदू तीनची मते खोडून काढायची होती. पुढे इंग्लिश समाजाकडून दबाव झाल्याने वृत्तपत्र बंद पाडण्यात आले आणि संपादकाला राजीनामा द्यावा लागला.

४.४.१ तर्खडकरांची राष्ट्रीयत्त्वाची भावना :

भास्कर तर्खडकरांचे आठही लेख ब्रिटीश सरकारचा खरा उद्देश दाखवण्याच्या हेतूने लिहिले गेले होते. एका लेखामध्ये त्यांनी जेम्स मिलच्या इ.स.१८१७ मध्ये इंग्लंडमध्ये प्रकाशित झालेल्या 'ब्रिटीश इंडियाचा इतिहास' या पुस्तकात हिंदूविषयी अपमानास्पद लिखाण केल्याबाबत कानउघडणी केली होती. जेम्स मिलने हिंदूंचा 'जंगली' आणि 'गुलामगिरी प्रवृत्तीची सवय असलेले' असा उल्लेख सरळसरळ केला होता.

४.४.२ ब्रिटीश सरकारविरुद्ध आक्षेप :

त्यांनी ब्रिटीश सरकारच्या भारतातील काही मूलभूत कायद्यासंबंधी संशोधन केले पण काहीही आढळले नाही. कंपनीने मांडलेल्या अनेक मतांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांच्या राजकीय आणि आर्थिक विकृतनीती त्यांनी उघड्यावर आणण्याचा प्रयत्न केला.

कंपनीच्या संचालक मंडळ, ब्रिटीश सरकारचे चार्टर ॲक्टस् नुसार धोरण आणि भारतातील त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यात तफावत जाणवते. संचालक मंडळाविषयी ते म्हणतात, ''खरेतर कंपनीने देशाच्या धार्मिक बाबीत ढवळाढवळ करु नये, स्वकीयांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी काही रक्कमही दिली जाते पण हा सर्व पैसा मिशनरी शाळा आणि पुढे धर्मांतराच्या कामासाठी वापरला जाई.''

कंपनीचे सर्व दाखले भारताची प्रगती दाखवतात परंतु ते खोटे आहेत. वाहतूक आणि दळणवळणामधील सुधारणा ही जनतेच्या हितासाठी नसून युद्धकामासाठी आहे.

गव्हर्नरच्या कटकारस्थानाविरुद्ध त्यांनी टिकेची झोड उठवली आणि साताऱ्याच्या रेसिडेंट विरुद्धही त्यांनी आवाज उठविला. साताऱ्यांच्या राजाला, प्रतापसिंहला त्याच्याच स्वत:च्या अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. कंपनीच्या संचालकांनी साताऱ्याच्या राजाला दत्तक घेण्यास मंजुरी दिली होती. परंतु गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रॅण्ट आणि साताऱ्याचा रेसिडेंट चार्ल्स ओव्हनने त्यास बंदी बनवून, तडीपार केले.

इ.स.१८३८-३९ मध्ये विनाकारण झालेल्या अफगाण युद्धाविरुद्धही त्यांनी ब्रिटीश सरकारला दोषी ठरविले. लॉर्ड ऑकलंडने केवळ राज्यविस्ताराच्या भीतीपोटी अफगणिस्तानासारख्या तटस्थ राष्ट्राच्या अंतर्गत भानगडींमध्ये ढवळाढवळ करायला सुरुवात केली. लॉड ऑकलंडच्या फसलेल्या योजना आणि अफगाणिस्तानवरचे विनाकारण युद्ध, कंपनी सरकारचे दृष्ट हेतूच उघडकीस आणतात.

म्हणून भास्कर तर्खडकर शेवटी लिहीतात की कंपनी सरकारच्या योजना आणि कार्य, दुसरे तिसरे काही नसून देवाचा शाप आहे. त्यांच्या सरकारविषयी प्रतिक्रिया अत्यंत कडव्या होत्या आणि त्यांनी त्या सतत ठामपणे, निर्भयपणे मांडल्या.

भास्कर तर्खडकरांनी ब्रिटीश सरकारची पेशवा आणि मोगल सरकारांबरोबर तुलना केली. लुटमार आणि दरोडेखोरीच्या काळात सुद्धा, शेतकऱ्यांच्या जमिनी शाबूत होत्या. मुस्लिम राजांनी हिंदूवर कदाचित जास्त कर लादला असेल पण नोकरी देण्याच्या बाबतीत हिंदू-मूस्लिम

हा भेद नव्हता. पण ब्रिटीशांचे राज्य म्हणजे सगळ्या कायद्यांचे उल्लंघन, विटंबन आहे असे त्यांचे मत होते.

४.४.३ भारताचे आर्थिक दुर्बल्य त्याविषयी तर्खडकरांचे विचार :

कंपनीच्या व्यापारी धोरणांबाबत त्यांनी त्यांच्या लेखात अनेक वेळा लिहले. सगळ्यात खेदाची गोष्ट म्हणजे ब्रिटीशांच्या व्यापार धोरणात भारतीय वस्तू आणि व्यापारी यांचा सतत अपमान होत आलेला आहे. त्यांना वेळोवेळी गौण समजण्यात आले आहे. फक्त त्यांच्या स्वार्थासाठी मुक्त अर्थव्यवस्थेचा, व्यापाराचा पुरस्कार केला जातो. इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या आयातीवर कमी कर आणि भारतीय वस्तू मुख्यत्वे कापड उद्योगातील वस्तूंच्या वाहतूकीवर बरीच बंधने होती व त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात कर आकारण्यात आला होता.

यांत्रिकदृष्ट्या प्रगत असलेल्या इंग्लंडने भारताची यंत्रिक व तांत्रिक प्रगती कधीही अपेक्षिली नाही. भारतीय हस्त उद्योग (Handicraft) जे प्रत्येक गावागावामधील उत्पन्नाचे साधन होते ते बंद पाडून इंग्लंडमधील यंत्रावर बनविण्यात आलेला पक्का माल भारतीय बाजारपेठेत ओतण्यात येऊ लागला. अनेक शेतकरी भूमीहीन झाले आणि कारागीर बेरोजगार झाले. देश प्रत्येक दिवसांगणिक गरीबीकडे झुकू लागला.

इ.स.१८८९ मध्ये इंग्लड येथे, एका भाषणात दादाभाई नौरोजीनी भारताच्या आर्थिक निःसरणाची तत्त्वे (Drain Theory) मांडली. त्यांचा विषय होता इंग्रजांची भारतातील कर्तव्ये. भास्कर तर्खडकरांसारख्या अर्थतज्ञांच्या सहाय्यांने त्यांनी सखोल अभ्यास करुन ही तत्त्वे मांडली होती.

आर्थिक विमोचनाच्या चळवळीवर उत्स्फूर्तरित्या वक्तव्य करणारा हा वक्ता लवकरच काळाच्या पडद्याआड गेला. कंपनी सरकारच्या महाराष्ट्रातील सुरुवातीच्या दशकांत मराठी लोकांनी मूकपणे हाल सोसले. रामोशी, कोळी आणि भिल्ल यांनी लढा पुकारला. परंतु काळाची गरज ही सशस्त्र लढ्याची नसून बौद्धिक वैचारीक विरोधाची होती. भास्कर तर्खडकर, रामकृष्ण विश्वनाथ, भाऊ महाजन आणि लोकहितवादी आदींनी राष्ट्रीयत्त्वाची ज्योत तेवत ठेवली.

४.५ रामकृष्ण विश्वनाथ यांचे कार्य

रामकृष्ण विश्वनाथ हे भास्कर तर्खडकरांचे समकालीन होते. त्यांचे हिंदुस्थानाची प्राचीन वा सांप्रतची स्थिती वा पुढे काय होणार या विषयी विचार त्यांनी पुस्तकांतून मांडले आहेत.मुंबई आणि भारतातील आर्थिक सामाजिक परिस्थितीवर अनेक विचारवंतांचे विचार त्या पुस्तकांतून प्रगट होतात. पुस्तकाच्या आवृत्या डी.के.बेडेकर यांनी संपादीत केल्या. त्यात चार अर्थतज्ञांचे विचार घेण्यात आले. १) रामकृष्ण विश्वनाथ, २) लोकहीतवादी गोपाळ हरी देशमुख, ३) हरी केशवजी पाठारे, ४) कृष्णाशास्त्री चिपळूणकर.

एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटच्या या विद्वानांचे विचार हे ॲडम स्मिथ आणि जेरेमी बेन्थम यांच्या (Utilitarian Philasophy) आणि मुक्त व्यापार पद्धतीविषयक विचारांनी प्रभावीत

होते. अनेक सुशिक्षित भारतीय तरुणांमध्ये या आर्थिक तत्त्वनीतीच्या बाबतीत उलटसुलट चर्चा व्हायची.

रामकृष्ण विश्वनाथ यांच्या विचारांवर जॉन स्टुअर्ट मिलचा प्रभाव आढळून येत नाही. कारण फार साधं आहे. जॉन मिलचे 'प्रिन्सिपल्स ऑफ पॉलिटिकल इकॉनामी' हे पुस्तक इ.स.१८४८ मध्ये प्रकाशित झाले तर रामकृष्ण यांचा मोनोग्राफ इ.स.१८४३ मध्ये भाऊ महाजन यांच्या प्रभाकर प्रेस मध्ये प्रकाशित झाला.

लोकहीतवाद्यांचे 'लक्ष्मी ज्ञान', पाठारेंचे 'देशव्यवहार व्यवस्था' आणि कृष्णशास्त्रीचे 'अर्थशास्त्रीय परिभाषा' या सर्वांवर ॲडम स्मिथ आणि मिलचा प्रभाव दिसून येतो. रामकृष्ण विश्वनाथांना कंपनीच्या वसाहतवादाचे सगळे कानेकोपरे, त्यांचे दुष्परिणाम माहीत होते. लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम त्यांनी केले.

ईस्ट इंडीया कंपनीच्या कारभाराविषयी रामकृष्ण विश्वनाथ सडेतोड बोलायचे. ब्रिटीश सरकारच्या वसाहतवादाच्या प्रवृत्तीची त्यांनी निर्भत्सना केली. भारतातून कमी दरात कापूस घेऊन त्याचे कापड बनवून तेच कापड जास्त दरात भारतीयांना विकण्याची इंग्रजांची अर्थशैली लोकांच्या निदर्शनास त्यांनी आणून दिली. कंपनी एका पौंडाला एक आणि या दराने कापूस विकत घेते (१ आणि - १.२५ पैसे). कापड बनल्यानंतर एक पौंडला दोन रुपये पेक्षा जास्त दराने ते विकण्यात येई. (१ आणा = १.२५ पेन्स, १२ पेन्स = १ शिलींग आणि २० शिलींग = १ पौंड) आणि वजनात १ पौंड = ०.४५४ किलोग्रॅम. म्हणजे २० पैसे किंमतीचा कापूस ८ रु. किलो ग्रॅम किंमतीचा कापड बनवू शकत होता.

४.५.१ इंग्लंडची भरभराट आणि भारताची वाताहत :

त्यांनी त्यांच्या मोनोग्राफ मध्ये नमूद केले की, इंग्रजांची आर्थिक प्रगती ही इंग्लंडमध्ये बनविण्यात येणाऱ्या वस्तूंच्या विक्रीवर निर्भर होती. इंग्लंडमधील यांत्रिक क्रांतीने इतर युरोपियन राष्ट्रांपेक्षा इंग्लंडला वरचढ बनविले होते. इंग्लंडच्या वसाहती ह्या अशा वस्तूंच्या मालकी बाजारपेठा होत्या. ब्रिटीश सरकारने मुद्दामच भारतीय उद्योगधंदे बंद पाडले. त्यांच्या मताप्रमाणे भारतीय कापूस प्रक्रीया केल्यानंतरच उत्तम दर्जाचे कापड बनू शकते. अमेरिकेमधील स्थानिक कापड गिरण्या स्वतः कापसावर प्रक्रिया करीत व इंग्लंडला पाठवित असत.

कंपनी सरकारने भारतीय निर्यातीवर मोठ्याप्रमाणावर बंधने लादली. भारतीय कापडावर मोठ्याप्रमाणावर करआकारणी करुन जागतिक स्तरावरील त्याची मागणी कमी करुन टाकली आणि स्वतःच्या इंग्लंडमधून आलेल्या कापडावर मात्र शून्य कर. ब्रिटीशांच्या या व्यापारधोरणाने, भारतीय उद्योगधंदे कोलमडून गेले.

४.५.२ आर्थिक शोषण व भेदभाव :

रामकृष्ण यांच्या मते, ''कंपनीने केवळ स्थानिक हस्त व्यवसाय बंदच केले नाहीत तर इ.स.१८३३ मध्ये चार्टर ॲक्टमध्ये नमूद केलेल्या बाबींचीही पूर्ण पायमल्ली केली. कंपनी आता मीठ आणि अफूचा अनधिकृत व्यापार ही करु लागली. भारतीयांना नोकरी व न्याय देताना, दुटप्पीपणा होऊ लागला. गोऱ्या माणसांना वाढीव वेत्तन आणि भारतीयांना अत्यंत कमी वेतन, भारतीयांना बढतीचे कोणतेही पर्याय नाहीत. पूर्वी सरकारी दरबारी असलेल्या कारकूनाला ५०

रु. प्रति माह मिळायचे आते ते १२ रु. प्रति महा मिळताहेत आणि हाच जर प्रकार चालू राहीला, तर त्याला पुढे ५ रु. प्रति माह मिळतील'' अशीही शंका त्यांनी व्यक्त केली. या उलट गोऱ्या व्यक्तींचा पगार दरमाह भराभर वाढत होता. कंपनीचा गव्हर्नर जनरल प्रतिमाह ४०,००० रु. वेतनावरही समाधानी नव्हता.

४.५.३ आर्थिक शोषणावर उपाय :

रामकृष्ण विश्वनाथ हे स्वतः आरामखुर्चीत बसून दुसऱ्यांना तत्त्वज्ञान शिकविणाऱ्यापैकी नव्हते. त्यांनी दक्षिणेकडे प्रवास केला आणि उत्तर अक्षास ९ आणि १३ मधील सोन्यांच्या खाणी संदर्भात अभ्यास केला. त्यांनी लोकजागृतिस सुरुवात केली आणि काही चुकीच्या पूर्वग्रहामुळे आपल्या पूर्वजांनी जे व्यवसाय नाकारले, त्या व्यवसायात लक्ष घालण्यास, तरुणांना उद्युक्त केले. मराठी माणसांनी, कापसाची मोठ्या प्रमाणावर लागवड करावी, असे त्यांना वाटे. यंत्रवादाचा त्यांनी पुरस्कार केला. परकीय मालाला जर थोपवायचे असेल तर तोच एक मार्ग होता. आपल्या लोकांनी एकत्र येऊन संस्था उभारुन भांडवल उभे केले पाहीजे. एका समभाग २००० रु. किंमती पर्यंतचा असू शकतो. संपूर्ण एक समभाग घेणे शक्य नसल्यास, अर्धा किंवा पाव समभाग विकत घ्यावा.

दूरदर्शी अर्थतज्ञ आणि राष्टभक्त या नात्याने त्यांना मराठी माणसाने औद्योगिक क्षेत्रात स्वावलंबी व्हावे असे सतत वाटे. कंपनी वसाहतवादावर त्यांनी टिकास्त्र सोडले. ते एक सुस्पष्ट विचारांचे समाज सुधारक होते. लोकांनी निर्भय आणि कष्टाळू व्हावे असे त्यांना वाटे. त्यांच्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल फारच कमी माहीती उपलब्ध आहे. पण त्यांची पुस्तके मात्र आर्थिक प्रगतीची द्योतक आहेत.

४.६ भाऊ महाजन (इ.स.१८१५-१८९०) यांचे कार्य

त्यांचे पूर्ण नाव गोविंद विठ्ठल महाजन पण ते भाऊ महाजन म्हणूनच जास्त प्रसिद्ध होते. त्यांचे कुटुंबाचे आडनाव कुंटे होते. ते जुन्या कुलाबा जिल्ह्यातील (आता रायगड) पेण येथील रहिवासी होते. ते मुंबईतील उच्चकुलीन छत्रे कुटुंबीयांशी संबंधित होते. त्यांनी शालेय दिवस बाळ शास्त्री जांभेकर आणि दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या सहवासात घालविले. काशिनाथ उर्फ बापू छत्रे हे छत्रे कुटुंबाचे प्रमुख इ.स.१८३० मध्ये वारले आणि भाऊंच्या आर्थिक समस्यांना सुरुवात झाली. काही काळाच्या अंतराने त्यांनी इ.स.१८३७ मध्ये एलफिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला.

भाऊंच्या शैक्षणिक कारकीर्दीपेक्षा बापू छत्रेंच्या घरी असताना विविध क्षेत्रातील त्यांचा अनुभव जास्त महत्त्वाचा आहे. त्यांनी त्यांच्या मुलाला शिकविण्यासाठी सर्वोत्कृष्ट अशा संस्कृत, पर्शियन आणि अरेबिक भाषा तज्ञाना नेमले होते. तसेच मौखिक आणि वाद्यसंगीत प्रकार शिकविणारे संगीत तज्ञ सुद्धा होते. त्यांचा भाऊंनी पूर्ण उपयोग करुन घेतला. त्यांचे संस्कृतवर प्रभुत्त्व होते आणि त्यांनी हिंदू संस्कृतीचे पूर्ण आकलन केले होते. त्यांनी सदैव स्वतःचे मन उघडे ठेवले आणि कधीही कोणत्याही प्रकारच्या पूर्वग्रहाला स्थान दिले नाही. ब्रिटीशांच्या वरवरच्या आशिर्वचनांना ते कधीच भुलले नाहीत. त्यांचे सतर्क मन सतत ब्रिटीशांच्या वसाहतवादाच्या वृत्तीचे आकलन करीत होते. त्यांना जगाविषयी अधिक माहीती करुन घ्यावयाची होती.

इंग्लंडमधील प्रचलित तत्त्वे आणि कार्यप्रणाली यांचा त्यांना अभ्यास करावयाचा होता. त्यांच्या विचारांच्या खोलीमुळे आणि स्वतंत्र विचार पद्धतीमुळे ते एक विशिष्ट प्रकारचे समाज सुधारक आणि राष्ट्रीय पत्रकार होऊ शकले.

४.६.१ भाऊ महाजन - एक पत्रकार :

एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वाधात भाऊ महाजन यांनी पत्रकार म्हणून इतरांना मागे टाकले. बाळ शास्त्री जांभेकरांनी पहिले अँग्लो-मराठी साप्ताहिक 'मुंबई दर्पण' सुरु केले होते. पहिले मराठी मासिक राघोबा जनार्दन वसईकरांनी सुरु केले. मासिकाचे नाव होते 'दिग्दर्शन'. इ.स.१८४० मध्ये विजयालक्ष्मीच्या दिवशी मासिकाचे काम सुरु झाले. पत्रकारीतेविषयी त्यांचे विचार फार व्यापक होते. २८ ऑक्टोबर १८४१ मध्ये जेव्हा त्यांनी मराठी साप्ताहीक 'प्रभाकर' सुरु केले तेव्हा त्यात देशाविषयी व परदेशाविषयी अनेक माहिती वाचकांपर्यंत पोहचविण्याचा त्यांचा उत्साह आणि निश्चय होता. बाळ शास्त्री जांभेकरांप्रमाणे वाचकांपर्यंत अनेक भौतिक व सामाजिक शास्त्रांचे ज्ञान पोहचावे असे त्यांना वाटे. त्यांचा पवित्रा मात्र शिक्षकाचा नसून राष्ट्रीय भावनेने प्रेरीत झालेल्या सच्च्या समाजसुधारकाचा होता. स्वतःचा व्यक्तिगत दृष्टिकोन मांडता यावा या उद्देशाने त्यांनी कधीही सरकारी नोकरी पत्करली नाही. प्रभाकर साप्ताहीकाचे प्रकाशन सुरुच ठेवले. सुरुवातीला गणपत कृष्णाजी पाटील यांच्या लिथोप्रेस मधून ते छापून घेत असत. नंतर इ.स.१८५३ मध्ये 'धूमकेतू' नावाचे दूसरे साप्ताहीक सुरु केले आणि इ.स.१८५४ मध्ये 'ज्ञानदर्शन' नावाचे त्रैमासिक सुरु केले.

४.६.२ वसाहतवादी राज्यास बौद्धिक-वैचारीक प्रतिकार :

भाऊ महाजन हे एक स्वतंत्र विचारांचे व्यक्ती होते आणि त्यांनी तब्बल बावीस वर्ष इ.स.१८४१ ते इ.स.१८६३ पर्यंत ब्रिटीश राजवटीविरुद्ध वैचारीक संघर्ष केला. त्यांनी स्वतःवरच राष्ट्रीयत्वाची चळवळ लादून घेतली. जेव्हा आजूबाजूची परिस्थिती झपाट्याने बदलत होती तेव्हा लोकांमध्ये राष्ट्रवाद जागृत करण्याचे प्रयत्न केले. इ.स.१८३० पासून 'पी ॲण्ड ओ स्टिमशिप' कंपनी सुरु झाली. वाहतूक आणि दळणवळणांच्या माध्यमातून झपाट्याने प्रगती होत होती. त्याचे पर्यावसन इ.स.१८५३ मध्ये मुंबई ते ठाणे रेल्वे मार्गात झाले. इंग्लंड ते अलेक्झांड्रीया आणि मुंबई ते सुएझ दरम्यानचा समुद्रमार्ग वाहतुकीसाठी खुला होता. त्या दरम्यान टेलिग्राफची लाईन टाकण्यात आली.

या सुधारणांबरोबरच पश्चिम तत्त्ववेत्ते जेरेमी बेंथम आणि जॉन स्टुअर्ट मिलने राजकीय आणि आर्थिक तत्त्वज्ञानामध्येही मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणलेला दिसतो. भाऊ महाजन यांच्या सतर्क नजरेतून जगाच्या पाठीवर घडणारे हे बदल सुटले नाहीत. भारतीय अर्थव्यवस्थेवर त्यांचा त्वरीत परिणाम होणार होता. ब्रिटीशांची वसाहत निती दिवसागणिक घट्ट होत जात होती आणि देश अधिकाधिक गरीब होत जात होता. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती आणि वाहतुक आणि दळणवळण क्षेत्रातील मूलगामी सुधारणा, यांचा प्रत्यक्ष परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत होता. त्यांनी त्यांच्या साप्ताहिकात इंग्लंडच्या श्रीमंतीचे आणि भारताच्या गरीबीचे कारण विचारले. इ.स.१८७० मध्ये दादाभाई नौरोजीनी मांडलेल्या 'डेन थेअरीचे' (आर्थिक ऱ्हास मागचे तत्त्व) भाऊ महाजन, भास्कर तर्खडकर आणि रामाकृष्ण विश्वनाथ हे अग्रदूत होते. भाऊ महाजन यांनी इ.स.१८३०-४० दरम्यानचे विनाकारण घडवून आणलेले अफगाण युद्ध व त्यामुळे झालेला आर्थिक अपव्यय याचा ऊहापोह केला. लॉर्ड ऑकलंड हा भारतीय संपत्तीच्या ऱ्हासाला

कसा कारणीभूत आहे यावरही त्यांनी प्रकाश टाकला. ही एक अशी घटना आहे ज्यामुळे भारतीयांची हालाखी अधिकच वाढली.

४.६.३ कंपनी सरकारची विश्वार्साहता व भाऊ महाजन यांचे विचार :

कंपनी सरकारच्या मुंबईतील कारभाराविषयी भाऊ महाजन आणि त्यांचे सहकारी नाखुष होते. साताऱ्याचे राजा छत्रपती प्रतापसिंह यांच्या सत्तेवरुन हुसकावून लावण्याच्या कामात गवर्नर सर रॉबर्ट ग्रॅण्ड आणि रेसिडंट चार्ल्स ओव्हन यांचे वर्तन अत्यंत धोकादायक होते. अफगाण युद्धानंतरच्या दिवाळीनंतर तर कंपनी सरकारचे नाकर्तेपणाचे आणि अकार्यक्षम धोरण अगदीच स्पष्ट झाले. इ.स.१८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याचा भाऊंवर काहीही प्रभाव पडला नाही. त्यात विशेष ते काय? असा सरळ प्रश्न त्यांनी विचारला आणि त्याची तुलना इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात औंधच्या बेगमने काढलेल्या जाहीरनाम्याशी केली.

४.६.४ भाऊ महाजन यांच्या इतर कार्याविषयी माहिती :

भाऊंचे महत्त्व फक्त ब्रिटीश सत्तेविरुद्धच्या वैचारिक संघर्षात नव्हते तर अनेक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सामाजिक धार्मिक सुधारणांमध्येही त्यांनी पुढाकार घेतला होता. इ.स.१८४८ ते इ.स.१८५२ दरम्यान त्यांनी लोकहीतवादींची शतपत्रे 'प्रभाकर'मध्ये छापली. त्यांनी बाबा पद्मजीना ज्यांनी ख्रिश्चन धर्मांतर केले होते 'धुमकेतू' (दिनांक १८-८-१८५४) मध्ये स्वत:ची बाजू मांडण्याची परवानगी दिली. त्यांनी त्यांच्या 'ज्ञानदर्शन' या त्रैमासिकात नेपोलियन बोनापार्ट याचे आत्मचरीत्र छापले. भारतीय पत्रकाराचे ते एक धाडस म्हणावे लागेल. इ.स.१८६३ मध्ये ते निवृत्त झाले आणि इ.स.१८९० मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांचे वृत्तपत्रातील कार्य त्यांच्या स्वत:च्या लोकांपासून बराच काळ अंधारातच राहीले.

आपली प्रगती तपासा :-

१) भास्कर तर्खडकरांनी कंपनीच्या संचालक मंडळाविषयी काय म्हटले आहे?
२) रामकृष्ण विश्वनाथ यांनी कोणते आर्थिक उपाय सुचविले?
३) भाऊ महाजन यांनी वसाहवादाला कशाप्रकारे विरोध केला?

४.७ समारोप

पाश्चिमात्य शिक्षणाच्या संपर्कात आल्याने एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वाधात भारतात वैचारिक क्रांतीस सुरुवात झाली. जांभेकर आधुनिक मराठीचे प्रवक्ते होते. त्यांनी अनेक धार्मिक, सामाजिक आणि माणुसकीच्या दृष्टीने योग्य अशा सुधारणांवर भर दिला. पश्चिमी ज्ञानाचे विचारांचे ते कडवे समर्थक होते. पण त्याचबरोबर ब्रिटीश वसाहतवादाचा त्यांनी कडाडून विरोध केला.

वैचारिक विरोधातूनच आर्थिक नियोजनाची चळवळ सुरु झाली. तर्खडकरांनी ब्रिटीशांचा शहाजोगपणाचा बुरखा फाडून टाकला आणि कंपनी सरकारचे खरे रुप त्यांच्या आठ लेखातून उघडकीस आणले. रामकृष्ण विश्वनाथांनी इंग्लंडची भरभराट आणि भारताचे दारिद्र्य यावर प्रकाश टाकला. भाऊ महाजन यांनी समाजजागृतीसाठी स्वतःच्या 'प्रभाकर' या मासिकात अनेक लेख लिहिले.

४.८ प्रश्न

१. 'बाळशास्त्री जांभेकरांना आधुनिक मराठीचे जनक म्हटले जाते' चर्चा करा.
२. 'आर्थिक राष्ट्रवादाची चळवळ ही संज्ञा स्पष्ट करा आणि महाराष्ट्रातील वैचारिक चळवळीबद्दल विस्ताराने लिहा.
३. भास्कर पांडुरंग तर्खडकर यांचे ब्रिटीश सत्तेविरुद्ध महत्त्वाचे कार्य लिहा आणि आर्थिक राष्ट्रवादाच्या चळवळीतील त्यांचे कार्य स्पष्ट करा.
४. रामकृष्ण विश्वनाथ आणि भाऊ महाजन यांच्या कार्यावर प्रकाश टाका.

❖❖❖❖

५

धार्मिक असंतोष आणि सामाजिक विरोध

घटक रचना :

५.० उद्दिष्ट्ये
५.१ प्रस्तावना
५.२ दादोबा पांडुरंग तर्खडकर (इ.स.१८१४-इ.स.१८८२) व परमहंस सभा
५.३ लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख (इ.स.१८२३-इ.स.१८९२)
५.४ प्रार्थना समाजाचे कार्य
५.५ समारोप
५.६ प्रश्न

५.० उद्दिष्ट्ये

१) दादोबा पांडुरंग आणि 'परमहंस सभा' यांचे कार्य समजून घेणे.
२) लोकहीतवादींचे विचार अभ्यासणे.
३) प्रार्थना समाजाच्या कार्याचे विश्लेषण करणे.

५.१ प्रस्तावना

पाश्चिमात्य शिक्षण मिशनरी लोकांचा धर्मप्रसार यामुळे भारतीय सुशिक्षित तरुण त्यांच्या स्वत:च्या धर्माचा तटस्थपणाने विचार करु लागले. पाश्चिमात्याप्रमाणेच ते स्वत:च्या धर्माची पाश्चात्य धर्मविचारांबरोबर तुलना करु लागले. बंगाली लोकाप्रमाणेच महाराष्ट्रातील सुशिक्षित लोक सुद्धा मूर्तिपूजा व जातिवाद विरोधी उघडपणाने टीका करु लागले. हिंदुत्वामध्ये एकेश्वरवाद आणि मानवतावादासंबंधी सुधारणांचे वारे वाहू लागले.

सुशिक्षित तरुण ज्यांनी सुधारणांसाठी पुढाकार घेतला ते स्वत:ला सुधारक म्हणून घ्यायला थोडेसे घाबरत होते. कारण सुधारकाचा अर्थ असा घेतला जाई की, ज्याने धर्म-जातीची उल्लंघने केलेली आहेत. दारु प्यायलेला आहे, मटण खाल्लेला आहे आणि अत्यंत मुक्त, स्वच्छंदी जीवन जगत आहे, असा तो. दादोबा पांडुरंग आणि त्याचे सहकारी यांना फार काळजीपूर्वक गुप्तपणाने काम करणे भाग होते. आधी आपण दादोबा पांडुरंग यांचे कार्य पाहू.

५.२ दादोबा पांडुरंग तर्खडकर (इ.स.१८१४-१८८२)

दादोबा पांडुरंग हे बाळशास्त्री जांभेकरांचे अतिशय जवळचे होते. कारण ते एकत्र शिकले होते व बापू छत्रेंच्या घरीही एकत्र राहीले होते. बाळ शास्त्रींपेक्षा ते ३६ वर्षे अधिक जगले. चाळीशीच्या आधीच्या आणि ऐंशीच्या कालखंडातल्या दोन्ही सुधारकांमधील ते महत्त्वाचा दुवा होते. राजा राम मोहन राय आणि ब्राह्मो समाजाच्या कार्याने ते प्रभावित झाले होते. बाळ शास्त्रीं प्रमाणे ते मुळात शिक्षण तज्ञ होते. त्यांच्या व्याकरणावरील पुस्तकाला महाराष्ट्रात व्यापक प्रसिद्धी मिळाली होती. आधी ते सुरत येथील शाळेत प्राध्यापक होते त्यानंतर ते मुंबई प्रांतासाठी कार्य करु लागले. मुंबई प्रांतामध्ये त्यांची भेट दयाराम मंच्छाराम यांच्याशी झाली. ते स्वतः शिक्षक व सुधारक होते.

इ.स.१८४४ मध्ये त्यांनी मानवधर्मसभेची स्थापना केली. त्यांच्या धर्मविवेचना (१८४३) मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात त्यांनी तत्त्वे व विचार प्रणाली प्रामुख्याने 'असोसिएशन ऑफ दी रीलीजन ऑफ मॅनकांईड' यापासून घेतली होती. ही संस्था जागतिक पातळीवर व्यापक होती. या नवीन धर्माने 'वस्तुनिष्ठतेवर' भर देण्यात आला. इ.स.१८४६ मध्ये दादोबांनी सुरत सोडल्यावर ही असोसिएशन फार काळ टिकू शकली नाही. नवीन धर्माची स्थापना करणे हा काही दादोबा पांडुरंगांचा मुख्य उद्देश नव्हता. कारण धर्म हा विषयच मुळात वादग्रस्त आहे. पण धर्माची वाटचाल जास्तीत जास्त वस्तुनिष्ठतेकडे शास्त्रीय दृष्टीकोनातून व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती. जांभेकरांनी आधीच धर्मातील मूर्ख समजूती व अंधश्रद्धांचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न सुरु केले होते. दादोबांनी एक पाऊल पुढे टाकले आणि सामाजिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा विषयावर जास्त लक्ष केंद्रीत करावयास सुरुवात केली.

एक गोष्ट मात्र स्पष्ट होती की, धार्मिक हिंदू रितीरिवाजांवर या सुधारणांचा किंवा मर्तीपूजेवर किंवा समाजाच्या रचनेवर त्याचा काहीही परिणाम होणार नव्हता. सर्वांसाठी एकच देव ही कल्पनाच महाराष्ट्रातील लोकांच्या समजण्यापलिकडील होती. याचेच प्रत्यंतर पुढे १८५० मध्ये परंमहंस सभेच्या स्थापनेत झाले.

दादोबांच्या वस्तुनिष्ठतेचा प्रभाव पाश्चिमात्य शिक्षित मुंबईतील आणि महाराष्ट्रातील शहरातील तरुणांवर झाला. टाळकुटेपणा करणाऱ्यांच्या विरोधातील त्यांची मते आणि महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुणांनी अंधश्रद्धांची जाळीजळमटे धुवून काढावीत यासाठी त्यांनी आवाहन केले. परमंहंस सभेच्या स्थापनेने इतरांसाठी मार्गदर्शन केले. धर्म हा परमहंस सभेसाठी महत्त्वाचा मुद्दा नव्हता. पण धर्मातील अशास्त्रीय, दांभिक विचारांचे उच्चाटन करुन त्याविरुद्ध जनजागृती करणे हा होता.

त्या काळात असे अनेक सुशिक्षत तरुण होते, ज्यांना हिंदू धर्मामध्ये सुधारणा हव्या होत्या व समाजातील हा दांभिकपणा दूर व्हावा असे त्यांना वाटे. धर्म आणि सामाजिक सुधारणा याबाबत ऐक्य असणाऱ्यामध्ये दादोबांचे धाकटे बंधू डॉ. आत्माराम पांडूरंग तर्खडकर, राम बाळकृष्ण जयकर, मोरोबा विनोबा, तुकाराम तात्या, बाळुभाऊ शिंत्रे, सखाराम शास्त्री, लक्ष्मीशास्त्री हालवे, भिकोबा लक्ष्मण आणि सखाराम लक्ष्मण चव्हाण होते.

५.२.१ दादोबा पांडूरंग व परमहंस सभा :

माणसामाणसामधील समानता व स्त्री पुरुषामधील समानता ही वरवर जरी मान्य असली तरी भारतीय समाजास ती मान्य नव्हती. ब्रिटीश राजवट आणि पाश्चिमात्य शिक्षण पद्धती ही वस्तुनिष्ठतेवर आधारीत होती. ज्यात मानवतावाद होता. महाराष्ट्रामध्ये एकोणिसावे शतक हे धार्मिक व सामाजिक सुधारणांचे एक नवे पर्व घेऊन आले. परमहंस सभा, प्रार्थनासभा, आर्यसभा आणि थिऑसोफिकल (Theosophical) सोसायटी या सर्वांची स्थापना याच काळात झाली.

इ.स.१८३६ मध्ये, आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी पहिले आंग्ल-मराठी साप्ताहीक 'बॉम्बे दर्पण' सुरु केले. त्याचा मूळ उद्देश आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोन वाचकामध्ये वाढावा असा होता. त्यांच्या मनात राजा राम मोहन रॉय यांचे 'समाचार दर्पण' होते. महाराष्ट्रातही तशाच प्रकारच्या सुधारणा व्हाव्यात अशी त्यांची अपेक्षा होती. गणिताचे एल्फिन्स्टन कॉलेजमधील नामवंत प्राध्यापक व समाजसुधारक या नात्याने त्यांनी हे दाखवून दिले की, केवढ्या अल्प कालावधीतच ब्रिटीशांच्या राजवटीत बंगाली लोकांनी त्यांच्या चुकीच्या समजुती टाकून देऊन, प्रगतीच्या मार्गाने वाटचाल केली आहे. बंगाली लोकांसारखे आपणही उद्यमशील व्हावे असे त्यांना वाटे. त्यांनी अंधश्रद्धा, चुकीच्या समजुती, दांभिकपणाचा त्याग करुन आधुनिकतेच्या दिशेने त्यांची वाटचाल चालू करावी. इ.स.१८३०पर्यंत त्यांचा अचानक देहांत होईपर्यंत जांभेकरांनी पेन आणि पेपर घेऊन महाराष्ट्रातील जनतेला ज्ञानी करावयाचे काम चालूच ठेवले आणि याची त्यांना मुंबईमध्ये फलश्रुती मिळाली.

समाजाकडून कमाल अवहेलना व तिरस्कार होऊन सुद्धा जांभेकरांनी समाजजागृतीचे काम अखंड सुरु ठेवले. हिंदू समाजाला चुकीच्या धार्मिक जातीय रुढींपासून मुक्त करण्यासाठी त्यांनी अखंड लिखाण केले. सामाजिक हितासाठी स्वत:ला वाहून घेतलेली अजून एक व्यक्ती म्हणजे दादोबा पांडुरंग तर्खडकर. ते आधी एल्फिन्स्टनमध्ये विद्यार्थी होते. मग ते तिथे शिक्षक म्हणून काम करु लागले. संस्कृतचे विख्यात अभ्यासक आणि ख्रिश्चन शिक्षण पद्धती आणि तत्त्वज्ञान यांचा त्यांनी जवळून अभ्यास केला. त्यांच्या अथक शिक्षण व वाचना पुढे त्यांना हे प्रकर्षाने जाणवले की हिंदु धर्मातील जाती व्यवस्था ही संपूर्ण समाजाच्या हिताची नाही. त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने इ.स.१८५० मध्ये परमहंस मंडळाची स्थापना करुन जाती व्यवस्था झुगारुन देण्याचे अथक प्रयत्न केले. रेव्हरंट बाबा पद्मजींच्या मते, परमहंस मंडळ वा सभा जातीव्यवस्था झुगारुन देण्या बरोबरच विधवा विवाह, मूर्ती पूजा नाकारणे, इतर धर्म जाती पंथांना संप्रदायांना समजून घेणे आणि समाजात एकता व बंधुता नांदण्यासाठी प्रयत्न करणे आदी उपक्रम करीत. जरी दादोबा पांडुरंग यांचे आद्य सदस्य असले तरी त्यांची स्वत: कधीही मिटींग किंवा चर्चेला हजर राहीले नाहीत. तरीसुद्धा मॅसलोस म्हणतात, ''दादोबांचा उत्साह स्पर्शजन्य होता. अशाने सुशिक्षित लोकांमध्ये एकता समानता व बंधुतेची भावना घर करु लागली.''

गुप्तपणे काम करुन सभा आणि मंडळांच्या बंद दारामागे चर्चासत्र होत राहिली. त्यात समाजातील टाकाऊ चालीरीती कशा झुगारुन द्यावात, ज्यात जातीभेद, विधवा विवाह, मूर्तीपूजा याविषयी चर्चा होत असे. चर्चासत्राची सुरुवात व अंत मराठीतील प्रार्थना व श्लोकांनी होई. जी प्रामुख्याने दादोबा पांडुरंगांनी रचली होती. एस्. डी. जावडेकर लिहीतात, ''सुरुवातीच्या काळातील समाजसुधारकांना राजकीय क्रांतीकारकांप्रमाणे गुप्ततेत राहून काम करणे गरजेचे होते. कारण समाजातील दांभिक व कठोर धर्मगुरु किंवा नेत्यांकडून बहीष्कृत होण्याची भिती होती.'' ही गोष्ट नमूद करणे गरजेचे आहे की मंडळात मुस्लिम व ख्रिश्चन दोन्ही

धर्माचे लोक होते व मंडळाची व्याप्ती मुंबईबाहेरही होती. काही समाजविघातक लोक मुद्दामच, मंडळाला बदनाम करण्यासाठी मंडळात घुसले होते.

एकूण परिस्थितीत, परमहंस सभा, केवळ चर्चासत्र घडवून आणण्यापलिकडे जास्त काही करु शकले नाही. ख्रिस्तीन डॉबीन (Christine Dobbin) लिहीतात की, या सभेने अशा लोकांना आश्रय दिला ज्यांना पाश्चिमात्य शिक्षण आणि भारताची सामाजिक परिस्थिती यात जमीन आस्मानाचा फरक आढळला. इ.स.१८६० पर्यंत सभेची सदस्य संख्या मुंबई व इतरत्र मिळून ५०० पर्यंत पोहचली. पुण्यातही आणि अहमदनगर येथे त्याच्या शाखा उघडल्या. पुण्याची शाखा ही जास्त पुरोगामी व नास्तिक होती. परंतु पन्नास आणि साठच्या दरम्यान जेव्हा त्याच्या कामगिरी प्रकाशात आल्या तेव्हा त्याच्या नेत्यांना भयंकर जननिंदेला तोंड द्यावे लागले व त्यांच्यावर अनेक निंदाजनक लेख लिहिण्यात आले. याचा परिणाम म्हणून सभेचे अनेक सदस्य सभेपासून दूर राहू लागले. अत्यंत निर्भिड नेतृत्त्व नसल्या कारणाने लवकरच सभा कोसळली व विखुरली. त्यानंतर मुंबईच्या समाजसुधारकांनी हिंदू पद्धती व रीतीरिवाजांवर सरसकट टिका करण्याचे टाळले व त्याऐवजी समाजविघातक अशा एखाद्या रुढीवर लक्ष केंद्रीत करावयाचे ठरविले. विधवा-विवाहावर जास्त लक्ष केंद्रीत करण्याचे ठरविले.

परमहंस सभा नामशेष झाल्यानंतर आत्मपरिक्षणाचा कालावधी सुरु झाला. अनेक समाजसुधारक प्रामुख्याने लोकहीतवादींच्या संघामधील सत्यशोधक व सत्याचा पाठपुरावा करणारे, ख्रिश्चन धर्माकडे झुकू लागले. ह्या प्रक्रीयेत, ते समाजाच्या मुख्य धारेपासून दूर गेले. बाकीचे लोक, पाश्चिमात्य शास्त्रीय दृष्टीकोन आणि हिंदू समाजात काही सुवर्णमध्य साधता येतो का ? याचे काळजीपूर्वक परिक्षण करु लागले.दुसऱ्या पिढीतील सुशिक्षित पदवीधर यांचा त्यांच्या वर्तुळापलिकडेही जनसंपर्क होता. ''या शोधकार्याची फलश्रुती इ.स.१८६७ मध्ये, प्रार्थना समाज व प्रार्थना चर्चासत्रात झाली'' असे न. र.फाटक म्हणतात.

आपली प्रगती तपासा :-

१) दादोबा पांडुरंग तर्खडकरांचे कार्य लिहा.
२) परमहंस सभेचे कार्य थोडक्यात लिहा.

५.३ लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख (इ.स.१८२३-१८९२)

बाळ शास्त्री जांभेकरांनी स्वतंत्रतेच बीज मुंबई येथे पेरले होते आणि त्याचा प्रभाव हळूहळू शिक्षणक्षेत्रात इतरत्र दिसून येऊ लागला. दुसरी एक व्यक्ती ज्याने शिक्षणाच्या सामर्थ्यांवर श्रद्धा ठेवली. अंधश्रद्धा व अज्ञानाचे धुके दूर करण्यासाठी प्रयत्न केले त्यांचे नाव होते गोपाळ हरी

देशमुख. त्यांना सर्वजण लोकहीतवादी म्हणत. 'लोकहीतवादी' म्हणजे लोकाच्या हितासाठी अग्रेसर असणारा.

जांभेकरांनी त्यांचे विचार मांडण्यासाठी वृत्तपत्राचा वापर केला. त्यासाठी त्यांनी साप्ताहीक व मासिक सुरु केले. देशमुखांना सुदैवाने भाऊ महाजनांच्या 'प्रभाकर' मध्ये सामाजिक जागृती करण्यासाठी वाव मिळाला. तसेच, अजून दोन वृत्तपत्रे 'इंदूप्रकाश' व 'वृत्तवैभव' यांमध्ये त्यांनी लिहावयास सुरुवात केली. लिखाणाची त्यांना देणगी होती. त्यांच्या वादविवादातील संयुक्तिकपणापेक्षा, लोकांच्या भावनेला त्यांनी ज्या आवेशाने आवाहन केले होते ते जास्त प्रभावी होते. इतर समाज सुधारकांप्रमाणेच त्यांनी तेच विषय हाताळले. अज्ञान आणि अंधश्रद्धेवर त्यांनी आघात केला. ब्राह्मणांच्या विचित्र, अशास्त्रीय वागणुकीविरुद्ध त्यांनी विडंबन केले. क्रूर पद्धतीचा त्यांनी अव्हेर केला. महाराष्ट्रातील चालीरीती, परंपरा यात काहीही तथ्य नसल्याचे त्यांनी निक्षून सांगितले. उच्च जातीतील लोकांची त्यांनी केलेली टीका यामुळे ते युरोपियन लोकांमध्ये प्रिय ठरले. परंतु त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीत मात्र दूरदूष्टीपणा व योग्य-आयोग्याची जाण अचूक होती. त्यांनी इंग्लिश राज्यकर्त्यांवरही टीकेची झोड उठवली व त्यांच्या राज्यकारभारातही त्यांना दुष्टप्रवृत्ती आढळली. इंग्रजांनी आणि मिशनऱ्यांनी जे मुक्त विचारांचे आणि स्वतंत्र्य व्यक्तिमत्वाचे दार उघडले होते, ते त्यांच्या विचारशक्तीची प्रेरणा होते.

भारताच्या इतिहासाचे, युरोपातील अनेक देशांच्या इतिहासापेक्षा अनेक पैलू पडतात. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्यांच्या प्रजेला अधिक मोकळेपणाने वागणूक दिली जी तेराव्या शतकात ब्रिटीश येईपर्यंत मुस्लिम राज्यकर्ते देऊ शकले नाही. मुस्लिमांपेक्षा कमी जाचक अशा ब्रिटीश राजवटीमुळे ज्यात स्वातंत्र्य व वस्तुनिष्ठतेवर जास्त भर देण्यात आला होता त्यामुळे समाजातील अनेक वर्गाचे त्यांनी हृदय जिंकले. गव्हर्नर मांऊटस्टुअर्टनी मराठी लोकांना पाश्चिमात्य शिक्षण व व्यक्तिस्वातंत्र्याचे बाळकडू फार खुबीने पाजले. त्यांच्या सहानुभुतीपूर्वक दृष्टीकोनामुळे अनेक प्रभावी विरोधकही निष्प्रभ ठरले.

५३.१ अल्पपरिचय :

गोपाळचे वडील पेशव्यांच्या काळात इनामदार होते. पेशव्यांच्या पराभवानंतर सरदार हरी देशमुख यांना शेवटच्या पेशव्यांनी पुण्याचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले. 'ईनाम' ही पदवी शाबूत राहीली. परंतु ते जिवंत असे पर्यंतच. इ.स.१८२३ मध्ये गोपाळचा जन्म झाला आणि पुण्यात अत्यंत परंपरागत पद्धतीने त्यांना वाढविण्यात आले. त्यांच्या आईवडीलांना नवीन कार्यपद्धती अवलंबणे भाग होते. वयाच्या सातव्या वर्षी इ.स.१८३० मध्ये गोपाळचे लग्न झाले. त्याचे वडील इ.स.१८३६मध्ये मरण पावले आणि आधीच्या वाटाघाटीनुसार गोपाळना ईनाम ही पदवी वंशपरंपरागत मिळाली नाही. परंतु सरकारने काही मानधन त्यांना व त्यांच्या आईला देऊ केले. ते गोपाळ स्वतः कुटुंबासाठी उत्पन्न कमवेपर्यंत. इ.स.१८४१ ते १८४४ पर्यंत गोपाळ पुणे सरकारी इंग्लिश शाळेत शिकले व नंतर सरकारी नोकरीत रुजू झाले. त्यांनी कायदे व महसूल खात्यात, अनेक ठिकाणी कामे केली. पुणे, वाई, मुंबई, नाशिक, अहमदाबाद आणि मुंबई प्रांतामधील अनेक ठिकाणे त्यांनी नाशिक व अहमदनगर येथे लघू न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केले. निवृत्ती नंतर इ.स.१८८० मध्ये मुंबईच्या संसदीय परिषदेचे ते सदस्य बनले. आयुष्याची शेवटची वर्षे त्यांनी पुण्यात काढली व इ.स.१८९२ मध्ये त्यांचे निधन झाले.

त्यांच्या आयुष्याचा वरवरचा धावता आढावा घेतला तरी त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते. लोकहीतवादीच्या सरकारी नोकरीत प्रवेश घेण्यापासून ते इ.स.१८८० मध्ये निवृत्तीपर्यंत त्यांच्या आयुष्यातील अनेक पैलूंचा आणि अनुभवांचा आढावा येतो. जांभेकर व तर्खडकर हे पेशाने आणि मनाने शिक्षक होते तर देशमुख हे नोकरशहा होते. इ.स.१८७७ मध्ये त्यांना 'जस्टिस ऑफ पीस' व मुंबई विद्यापीठाचे 'फेलो' म्हणून सन्मानित करण्यात आले होते. तसेच कायदेमंडळाचे ते सदस्य होते.

लोकहीतवादी अत्यंत मोकळ्या मनाचे होते. ब्रिटीशांनी त्यांच्या कुटुंबाची इनाम ही पदवी काढून घेतली म्हणून त्यांना त्याचा शोक नव्हता. खरेतर त्यांच्या दृष्टीने ब्रिटीशांचे राज्य हे भारतासाठी वरदान होते. ब्रिटीशांच्या स्वातंत्र्यवादी मुक्त विचारांचा व सामाजिक प्रगतीचा त्यांच्या मनावर खोल परीणाम झाला. जेरेमी बेंथमच्या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर फार प्रभाव होता. समाजाच्या सुधारणेत त्यांना फार रस होता. त्यांनी लेखणीच्या आधारे, सामाजिक व धार्मिक त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात, त्यांनी सामाजिक प्रश्नांवर अनेक पुस्तके लिहिली. त्यांची शतपत्रे नावाचे लेख इ.स.१८४८ ते इ.स.१८५० च्या दरम्यान 'प्रभाकर' या साप्ताहिकात प्रसिद्ध झाली आणि इ.स.१८६० मध्ये लोकहीतवादीकृत निबंध संग्रहात संकलित करण्यात आले. इ.स.१८६६ मध्ये हा संग्रह पुस्तकाच्या स्वरुपात प्रकाशित झाला. तसेच त्यांनी स्वाध्याय अथवा आर्यविद्याच्या कर्म, विचार आणि परिक्षण हे पुस्तक इ.स.१८८० मध्ये प्रकाशित केले. ह्या पुस्तकाद्वारे त्यांनी त्यांचे परंपरागत शिक्षणसंबंधी विचार मांडले.

५.३.२ लोकहितवादींची शतपत्रे :

एन. आर. इनामदारांच्या मते इ.स.१८४८ ते इ.स.१८५० च्या दरम्यान 'प्रभाकर'मध्ये लिहली गेलेली शतपत्रे, (एकूण १०८ लेख) पुढील भागात विभागली जाऊ शकतात.

अ) प्रस्तावना - एक लेख
ब) शिक्षण (कर्म) - तेवीस लेख
क) ब्राह्मणे - पंधरा लेख
ड) धर्म - आठ लेख
इ) सामाजिक प्रश्न - पंचवीस लेख
फ) राजकारण - पंधरा लेख
न) स्थानिक अधिकारी - सतरा लेख
इ) अर्थशास्त्र - चार लेख

स्वाध्यायाचा उहापोह करता असे दिसते की बहुतेक सर्व प्रश्न धार्मिक असून त्यात काही तत्त्वज्ञानाशी सामाजिक आणि नितीमत्तेशी संबंधित होते आणि ३१ पैकी फक्त दोनच प्रश्न राजकीय प्रश्नांशी संबंधित होते. वरील सर्व लेखांचा पाठपुरावा करता लोकहीतवादींने सर्वंकष प्रश्नांची हाताळणी केल्याचे दिसते. त्यांचे पुरोगामी विचारांचे दर्शन त्यांच्या प्रभाकर मधील लघुलेखांमधून दिसून येते. एकोणिसाव्या शतकाच्या उतरार्धात त्यांच्या सामाजिक विषयावरील मुक्त विचारांना महत्त्व प्राप्त झाले. त्यांच्या लेखांमध्ये सामाजिक दृष्प्रवृत्तीवर आघात केला होता धर्माच्या नावाखाली माणूसकीला काळीमा फासणारे कृत्य कसे घडत आहे. याचे यथांग चित्रण त्यांनी केले व त्यावर उपायही सुचविले. एकोणिसाव्या शतकाच्या उतरार्धात आपण त्यांचे

सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचारांमुळे महाराष्ट्रात काय बदल घडले ते पाहणार आहोत.

५.३.३ लोकहितवादी व ब्राह्मणांची कृष्णकृत्ये :

लोकहीतवादींनी ब्राह्मणांची कृष्णकृत्ये चव्हाट्यावर आणली. मराठीभाषेतून त्यांच्यावर घाणाघाती हल्ला केला जो पूर्वी कोणीही केला नव्हता. त्यांच्या १०४ लेखामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की ब्राह्मणांची निष्ठुर वृत्ती ही खाटीकालाही लाजवेल अशी आहे. अनेक लहान मुली, स्त्रियांना नरक यातना भोगाव्या लागत आहेत आणि जर कोणी त्यांना वाचवायचा प्रयत्न केला तर त्यास राक्षस (Devil) असे संबोधण्यात येते. जगात कुठेही इतकी शिकलेली माणसे पण अमानूष (Inhume) आढळणार नाहीत.

त्यांनी सांगितले की ह्यात कोणताही धर्म, तत्व, सिद्धांत किंवा विचार नाही जे इतके वर्षानुवर्ष यंत्रवत परंपरांचे पालन करीत आले आहेत. अशा रुढींची सीमारेषा कुठे आहे हे त्यांना समजायला हवी होती. हजारो स्त्रिया जेव्हा अशा क्रुर रुढी-रिवाजांमुळे बळी जात होत्या, तेव्हा हे ब्राह्मण त्यातून आसूरी आनंद मिळवत होते. लोकहीतवादींचे हृदय पिळवटून गेले जेव्हा त्यांनी असहाय्य स्त्रिया आणि बहीष्कृत लोकांचे प्रश्न पाहीले. त्यांनी ब्राह्मणांविरुद्ध अत्यंत कडवेपणाने पंधरा लेख लिहिले. ब्राह्मणांविरुद्ध कोरडे मारल्यामुळे, त्यांच्यावर स्वकीयांचा रोष होणे स्वाभाविक होते कारण ते स्वतः जातीने ब्राह्मण होते. लोकहीतवादीच्या शतपत्रांना विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी त्यांच्या निबंधमाला ह्या लेखातून इ.स.१८८४ नंतर प्रत्यूतर देण्यास सुरुवात केली. विष्णुशास्त्री जे मराठीचे गाढे अभ्यासक होते त्यांनी लोकहीतवाद्यांना निरुत्तर केले आणि लोकहीतवाद्यांच्या स्वातंत्र्यवादाला प्रत्युत्तर म्हणून चोख लेख लिहिले. परंतु तोपर्यंत लोकहीतवादी निवृत्त झाले होते.

५.३.४ लोकहितवादींचे अध्ययनविषयक विचार :

जांभेकरांप्रमाणे त्यांनी परंपरागत हुशार लोकांचे वाभाडे काढले. ज्यांनी केवळ आळशीपणात वेळ घालाविला. पुजारी हे केवळ भिकारी आहेत, अशा धर्माच्या नावाखाली पैसा उकळणाऱ्या लोकांना आश्रय देणारे आहेत आणि अशा मूर्ख समजुतींना खतपाणी घालणारेही आहेत अशी टीका त्यांनी केली.

लोकहीतवादी अंधश्रद्धेबद्दल लिहीतात, ''काही लोक म्हणतात, पृथ्वी कमळासारखी आहे. तर दुसरे म्हणतात की यवन (ग्रीक) हे आधीपासूनच पृथ्वीतलावर राहतात पण त्यांना स्वतःचा देश नसल्याने ते एका बेटावर राहतात. पृथ्वीचे शेवटचे टोक हिमालयाशेजारी आहे आणि पृथ्वीभोवती सात बेटे आहेत आणि दुध आणि घीचे समुद्र आहेत.'' त्यांनी सांगितले की, ''आपले पूर्वज अत्यंत मूर्ख होते आणि असल्या अशास्त्रीय, निर्बुध्द वक्तव्यामुळे मनुष्य आणि प्राणी यात काही फरकच राहत नाही.''

''अशा परिस्थितीत, असल्या कट्टर धर्माभिमानी फाजील लोकांना जर बाहेर काढायचे असेल तर इंग्लिश लोकांप्रमाणे यांना खऱ्या ज्ञानाचे धडे दिले पाहीजेत. जेव्हा सर्व लोक एकमताने ठरवतील व अशा अमानुष चालीरिती धुडकावतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने विकास शक्य आहे.'' लोकहीतवादींनी सदैव वस्तुनिष्ठतेवर भर दिला. त्यांनी दाखवून दिले की रुढी आणि शास्त्र यांमध्ये वाद निर्माण झाल्यास, रीतीरीवाज, रुढीला आधी प्राधान्य दिले पाहीजे असे

आपले पूर्वज म्हणतात. पण लोकहीतवादींच्या मते अशा प्रकारचे वाद हे सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेऊन शास्त्रीय दृष्टीकोनातून हे वाद मिटविले पाहीजेत.

५.३.५ लोकहितवादी व सामाजिक प्रश्न :

व्यक्तीस्वातंत्र्यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच अस्पृश्यता त्यांना मान्य नव्हती. ब्राह्मणांनी महारांना सदैव नीच लेखलेले त्यांना सहन होत नव्हते. ते म्हणतात, नीच जातीतील लोकांच्या केवळ सावलीनेही ज्यांचा धर्म भ्रष्ट होतो अशांना युरोपियनांबरोबर सलगी करताना काहीच वाटत नाही. खरेतर, युरोपियनांपेक्षा महारच त्यांच्या अधिक जवळ असले पाहीजेत. ते लिहीतात, ''देवासाठी सर्व लेकरे सारखीच आहेत आणि अशा प्रकारचा भेदभाव त्वरीत मिटविला पाहीजे.'' त्यांनी सदैव स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. विधवांचा पुनर्विवाह आणि स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार हिंदू धर्मातील सर्व जाती धर्मातील लोकांना समान वागणूक, शिक्षण आणि व्यवसायाच्या बाबतीत समान अधिकार ब्राह्मणांची धार्मिक आणि तात्त्विक क्षेत्रांतील मक्तेदारी त्यांना कमी करायची होती. धार्मिक दृष्ट्या निषिद्ध गोष्टी मध्ये बदलेल्या परिस्थितीत थोडा फार फेरफार करण्याची विनंती त्यांनी केली आणि सामाजिक नीती तत्त्वे बदलताना केवळ वस्तुनिष्ठ व शास्त्रीय आधारावरच बदलली गेली पाहिजेत असे त्यांना वाटते.

५.३.६ लोकहितवादींचे अर्थकारणावरील विचार :

लोकहीतवादींना महाराष्ट्रातील अनेक भागात काम करताना, अनेकाविध अनुभव आले होते, मुख्यतः अहमदाबाद येथे जो मुंबई प्रांताचा भाग आहे. त्यांच्या तात्त्विक विवेक बुद्धीला समाजातील विसंगत, अशास्त्रीय आणि विचित्र चालीरिती खटकल्या. हिंदू धर्मातील चुकीच्या सामाजिक स्थितीवर भाष्य करतानाच करांच्या बाबतीत स्थानिक आणि इंग्लिश अधिकाऱ्यांनी जो अन्याय चालविला होता त्यालाही त्यांनी वाचा फोडली. दारुवरील करामुळे सरकारला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळत होते आणि म्हणूनच दारु पिण्यास अजूनच पाठींबा देण्यात आला. जेणेकरुन अधिक कर लादून, उत्पन्न वाढेल आणि म्हणूनच स्वतःचे खिसे भरण्यासाठी सरकारने जे धोरण अवलंबले होते त्यांचा धिक्कार केला. त्यांच्या मते, सरकारने जनतेच्या आरोग्याचा विचार न करता दारुस अधिक प्रोत्साहन दिले तर कालांतराने गरीबी अधिक वाढेल व त्याचा परिणाम सरकारच्या तिजोरीवर होईल.

इ.स.१८९४ मध्ये त्यांनी गुजरातचा इतिहास लिहीला त्यात त्यांनी 'राज्यतुला'ही अजून एक अनुक्रमणिका घातली. त्यात त्यांनी स्थानिक व परकीय राज्यव्यवस्थेतील फायदे-नुकसानीवर प्रकाश टाकला. त्यांच्या मते, ब्रिटीशांच्या राजवटीत कर, अलंकारी कर आणि इतर कर हे पूर्वीच्या सरकारच्या तुलनेत अधिक होते. त्यात त्यांनी ईस्ट इंडीया कंपनीने रयतेला सुख देण्याच्या बाबतीत काहीही कामगिरी न केल्याचे म्हटले आहे. त्यापेक्षा या सरकारने मराठ्यांनी जनतेच्या हितासाठी जे संकल्प राबविले होते ते राबविले असते तर बरे झाले असते. त्याचप्रमाणे स्थानिक आणि युरोपियन यांच्यामध्ये जो वेगवेगळ्या बाबतीत भेदभाव व उचनीचपणा चालतो त्याचा त्यांनी धिक्कार केला. त्यांच्या सरकारी नोकरीच्या निमित्ताने महाराष्ट्रीयन लोकांच्या विरुद्ध केला जाणारा भेदभाव व आर्थिक अन्याय त्यांना स्पष्ट दिसून आला.

५.३.७ लोकहितवादींचे स्वदेशी आणि बहिष्कार याबाबतची मते :

पाध्ये आणि टिकेकर हे लोकहीतवादींना स्वदेशीचे अग्रप्रमुख समजायचे. त्यांनी बहिष्काराची चळवळ नंतरच्या काळात सुरु केली. महाराष्ट्रातील लोकांची गरीबी आणि

बेरोजगारीचे कारण तपासता, त्यामागे इंग्लंडवरुन आलेला माल भारतीय बाजारपेठ ओतल्याने, ह्यासर्व समस्या निर्माण झाल्या आहेत असे त्यांचे मत होते. आपली माणसे त्यांच्या वस्तू घेतात कारण त्या स्वस्त असतात. पण त्यामुळे आपल्या व्यापारीवर्गाला रास्त नफाही होत नाही. त्यामुळे परकीय वस्तूंवर बहिष्कार टाकून स्वदेशी वस्तू जरी त्या कमी प्रतीच्या असल्या तरी विकत घेतल्या पाहीजेत. कापूस उत्पादकांनीही परकीयांना कापूस न विकता भारतीय कापड उद्योगधंद्यासाठीच दिला पाहिजे. त्यांनी परकीयांच्या तयार वस्तूंवर बहीष्कार व स्वदेशीचा पुरस्कार हा संदेश दिला. लोकहीतवादींनी, सरकारी नोकरीत असतानासुद्धा, अत्यंत मुश्किल क्षणी सरकारविरुद्ध जो उद्धटपणा दाखविला, त्या धैर्याला तोड नाही. परंतु त्यांचे कार्य व दृष्टीकोन थोडेसे नवशिक्यासारखे होते.

५.३.८ लोकहीतवादी व राजकीय घडामोडी :

लोकहीतवादींचे ब्रिटीश राजकारण, न्यायव्यवस्था व स्वातंत्र्यवादावरील प्रेम सर्वज्ञात होते. त्यांच्या वृत्तपत्रकारीतेच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी स्वकीयांना, इंग्रजी लोकांकडून, त्यांची सेवा करुन अनेक गोष्टी शिकण्यास उद्युक्त केले. त्यांची सरकारी नोकरी व बढती यामुळे सरकारच्या राजकीय डावपेचांबाबत व वैचारीक सामर्थ्याबाबत त्यांचे मत अनुकुल होते. इ.स.१८५६ ते इ.स.१८६१च्या दरम्यान इनाम कमिशनच्या दुय्यम स्तरावर काम केले. त्यावेळी त्यांची मानसिक स्थिती विचलित झाली. कारण अनेक इनामदारांना त्यांच्या हक्काच्या जमिनी गमवाव्या लागल्या. त्यामुळे त्यांचे स्वतःचे लोक, ब्राह्मण आणि इतर उच्चकुलीन लोकांनी, त्यांना सरकारचे गोडवे गायलेले त्यांना खपत नसत. त्याच्या वस्तुनिष्ठपणावरील विश्वासामुळे त्यांनी अनेक आधुनिक बदलांचा पुरस्कार केला. त्यांनी त्यांच्या लेख क्र. २५ मध्ये अशी आशा व्यक्त केली की, भारतीय गरीब व श्रीमंत लोकांनी राणी व्हिक्टोरीयाला एक विनंती अर्ज करावा की, भारतीय व इंग्रजी यांच्यामधील असमानता दूर करावी. तसेच संसदेत दोन्ही पक्षाचे प्रतिनिधी असावेत. इंग्रजांसाठी तो निर्णायक क्षण होता. कारण भारतीय लोक आता इंग्लंडमधील संसदीय राज्यपद्धतीची मागणी करु लागले होते. जर इंग्रजांनी अतिरेकीपणा केला असता तर भारतीय लोक सुद्धा अमेरिकन्सच्या पावलांवर पाऊल ठेवून निर्णय घेणार हे दिसत होते.

जेव्हा त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्याची मागणी केली तेव्हा फ्रेंच राज्यक्रांतीचाही इतिहास त्यांच्या मनात होता. त्यांनी पुढे असे म्हटले की, अज्ञानी लोकांच्या देशात, लोकांना सरकार म्हणजे मायबाप वाटते. याउलट सुधारित देशात सरकार हे जनतेचे मित्र असते. तर अतिशय प्रगत देशात सरकार जनतेचे नोकर असते.

५.३.९ लोकहितवादींचा तात्त्विक दृष्टिकोन :

लोकहितवादींचा तात्त्विक दृष्टीकोन हा प्रार्थना समाजाच्या तत्त्वावर आधारित होता. त्यांच्या मते मनुष्याचा आत्मा व पूर्णतत्त्व यात फरक आहे. मनुष्याचा आत्मा हा कनिष्ठ स्वरुपाचा आहे. तसेच माणसाची बुद्धी इतकी समर्थ आहे की तो परमेश्वरापर्यंत पोहचू शकतो.

राजकीय तत्त्वज्ञान त्यांनी जेरेमी बेंथम, व जे.एस. मिल कडून मिळविले. स्वाध्यायाचा तात्विक ऊहापोह करताना त्यांना सरकारचे उपयोगवादी तत्त्व सापडले. तसेच जनतेचे आणि त्याच्या हक्काचे संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे असेही ते म्हणाले.

लोकहीतवादींचा रस फक्त एका क्षेत्रापुरता मर्यादीत नव्हता. आधीच नमूद केल्याप्रमाणे त्यांची बुद्धी ही अनेक विषयात पारंगत होती. माणसांच्या जीवनातील अनेक वृत्ती-प्रवृत्तींचा त्यांना अभ्यास होता. इंग्रजांबद्दल प्रेम याचा अर्थ गुलामी नव्हता तर सतराव्या शतकातील अमेरीकन वसाहतीने ज्या पद्धतीने स्वातंत्र्य मिळवून स्वराज्य स्थापन केले होते ते स्वप्न त्यांच्याही मनात होते. त्यांचा वस्तुनिष्ठतेवरील विश्वास हा एका ठराविक मर्यादेपर्यंत होता. त्यांचा पुरातन वेद ग्रंथांवर विश्वास होता. परंतु नंतरच्या काळात वेदांमध्ये वैचारिक भ्रष्टाचार केला गेला याची त्यांना चीड होती. त्या वेळच्या विद्वानांकडून त्यांनी ब्रिटीशांबरोबर काही प्रमाणात नमते घेतले. त्यांच्या मते ब्रिटीश सरकार हे एक दैवी वरदान आहे. अशा प्रकारच्या विचारांमुळे त्यांनी स्वतःच्याच वस्तुनिष्ठतेशी तडजोड केली. ते क्रांतीकारी नव्हते. तसेच समाजातील दृष्टविचारांच्या आणि वाईट चालीरितींच्या विरुद्ध एकदम टोकाची भूमिका घेणेही त्यांना शक्य नव्हते. समाजातील दांभिकपणाबाबत खरडपट्टी काढल्याने त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला. पण शेवटी त्याचे त्यांनी प्रायश्चित केले. अशा व अनेक कमकुवत वागण्यामुळे समाजातील त्यांचे स्थान डळमळीत झाले व फार कमी लोकांपुरता त्यांचा प्रभाव मर्यादीत राहिला.

जांभेकर, तर्खडकर व देशमुख हे त्रिकूट अतिशय बुद्धीमान परंतु समाजाच्या विरुद्ध जाऊन एखादे कार्य निर्भीडपणे करण्याचे त्यांचे तितकेसे सामर्थ्य नव्हते. जांभेकर कर्मठपणाला श्रीपत प्रकरणात शरण गेले. तर्खडकरांनी परमहंस मिशन अत्यंत गुप्तपणे सुरु केली. देशमुखांची सद्सद्विवेकबुद्धी त्यांना समाजाच्या बंधनापलिकडे जाण्यास खुणावत होती पण त्यांना ते धाडस शेवटपर्यंत जमले नाही. एकोणिसाव्या शतकातील हे नामवंत विचारवंत, जनमानसात विचारांची लाट म्हणाव्या तितक्या प्रमाणात उंचावू शकले नाहीत. त्यांचा प्रभाव फक्त पाश्चात्य शिक्षित वर्गापुरताच मर्यादीत राहीला.

आपली प्रगती तपासा :

१) लोकहितवादींच्या शतपत्रावर प्रकाश टाका.
२) ब्राह्मणांची कृष्णकृत्ये यावर लोकहितवादींनी कशी टीका केली ?

५.४ प्रार्थना समाजाचे कार्य

राजा राम मोहन रॉयनी आणि त्यांच्या ब्राह्मो समाजाने भारतात सामाजिक बदलासाठी फार मोठे आघाडीचे काम केले. ब्राह्मो समाजाचे महत्त्वाचे काम म्हणजे अज्ञानी जनतेला अंधश्रद्धेच्या कचाट्यातून बाहेर काढून त्यांना खऱ्या ज्ञानाचा प्रकाश दाखविणे. धर्माच्या नावाखाली, सती व अस्पृश्यतासारख्या हीन चालीरीतींचे पाश्चिमात्यांकडून वाभाडे काढण्यात आले. कर्म आणि अनेक देवतांच्या गोंधळामुळे हिदू माणूस पूर्णपणे गोंधळून गेला होता. ब्राह्मो

समाजाच्या अनुयायांना सामाजिक सुधारणा हवी होती. त्यांनी जाती-व्यवस्थेविरुद्ध प्रखर टीका केली, स्त्रियांच्या समाजातील स्थानाविषयी त्यांना अधिक चिंता होती. त्यामुळे सतीचे निर्मूलन झालेच पाहिजे याविषयी त्यांचे ठाम मत होते. त्यामुळे घटनात्मक बदल घडवून हिंद समाजात काही बदल आणावेत याबाबत त्यांना आशा होती.

परंतु इ.स.१८३३ मध्ये राजाराममोहन रॉय यांच्या निधनानंतर ब्राह्मो समाजाचे दोन भाग पडले. सभेतील वयाने लहान असलेले सदस्य केशवचंद्रासेन यांच्या अध्यक्षतेखाली इतर सदस्य जमले. एवढेच नव्हे तर समाज सुधारणेचा लढा अधिक प्रखर करुन धार्मिक दांभिकतेवर सडेतोडपणाने कोरडे ओढले. पाश्चिमात्य व ख्रिस्ती विचारांनी प्रभावित झालेले केशवचंद्र सेन यांनी जातीव्यवस्थेवर हल्ला चढविला. समाजातील अनेक दृष्प्रवृत्ती त्यातूनच निर्माण झाल्या आहेत असा त्यांना विश्वास होता. हिंदू समाजासाठी, कुटुंबासाठी एकूण समाजस्वास्थ्यासाठी ह्या सुधारणा गरजेच्या आहेत आणि पुढील नैतिक व धार्मिक प्रगतीसाठीही सुधारणांची गरज आहे. यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. केशवचंद्रानां बंगालच्या जनतेकडून खूप प्रेम मिळाले. परंतु त्यांच्या पुरोगामी आधुनिक विचारांमुळे ते समाजाचे आघाडीचे नेते देवेंद्रनाथ टागोर यांच्यापासून दुरावले. तसेच त्यांचा मिशनऱ्यांसारखा उत्साह आणि समाजसुधारणेसाठी त्यांनी पूर्णपणाने वाहून घेतले होते. त्यांचे केवळ बंगालमधील शिक्षित वर्गाकडूनच नव्हे तर मुंबई व मद्रास प्रांतामध्येही कौतुक झाले. हळूहळू ब्राह्मोसमाजाची पाळेमुळे बंगालच्या बाहेर जाऊन वाढू लागली. पण त्याला खतपाणी मात्र फक्त महाराष्ट्रातच मिळाले.

केशवचंद्र सेन मुंबईमध्ये इ.स.१८६४ मध्ये आले पण ते जनतेचे म्हणावे तसे लक्ष वेधून घेऊ शकले नाहीत. ख्रिस्तिन डॉबीनने (Christine Dobbin) म्हटल्याप्रमाणे इ.स.१८६७ मधील त्यांच्या दुसऱ्या भेटीनंतरच त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. पूर्वीच्या परमहंस सभेचे सदस्य आर. जी. भांडारकर, केशवचंद्र सेन यांच्या सामाजिक-धार्मिक विचाराने भारावून गेले होते.केशवचंद्र सेन यांच्या भेटीपूर्वी मुंबईतील समाजसुधारकांना धार्मिक बदलांशिवाय सामाजिक बदल अशक्य वाटे. त्यांच्या भेटीनंतर त्यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. तसेच मेरी कारपेंटर या इंग्लिश समाजसुधारक ज्यांनी त्याच दरम्यान मुंबईला भेट दिली त्यांनीही वैचारीक मंथन केले. परिणामी इ.स.१८६७ मघ्ये प्रार्थना समाजाची स्थापना झाली.

मॅथ्यू लेडर्ले (Lederle) आणि जेम्स मॅसलोज यांनी नमूद केल्या प्रमाणे प्रार्थना समाजाच्या स्थापनेमागे केशवचंद्र सेन नसून डॉ. आत्माराम पांडुरंग, दादोबा पांडूरंगाचे भाऊ व मेरी कारपेंटर यांचा महत्त्वाचा भाग आहे. मॅसलोज म्हणतात, जरीं केशवचंद्र सेन यांनी राजा राम मोहन रॉय यांच्या विचारांतून व ब्राह्मोसमाजाच्या सहाय्याने पश्चिम भारतात भरपूर नाव कमाविले. परंतु त्यांचे कार्य हे धर्मांतराच्या भीतीने अविश्वासानेच पाहिले जायचे.

विचारवंतांमध्ये एक एकेश्वरवाद अधिक लोकप्रिय झाला होता. हिंदू धर्मातील दांभिकतेवर आघात व ख्रिश्चन धर्मातील जी नितीतत्त्वे सांगितली होती त्यावर विश्वास असे एकूण चित्र होते आणि हे सर्व ब्राह्मो समाजाशिवाय शक्य नाही असे त्यांना वाटे. पण असे करणे म्हणजे हिंदूधर्मापासून परावृत्त होणे, बहीष्कृत होणे, शत्रूत्व निर्माण करणे आणि प्रांतामधील जनतेवर काहीही प्रभाव नसणे असे होते. लेडर्ले लिहीतात, ''खरेतर डॉ.आत्माराम पांडुरंगांनी जी एकेश्वरवादी संघटना सुरु केली होती, तिलाच प्रार्थना समाज म्हणून नाव पडले. ह्या धार्मिक विचारांच्या डॉक्टरांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अशा प्रकारचा धर्म हवा होता जो त्यांची

बौद्धिक व आर्थिक भूक भागवू शकेल. तरीही त्यासाठी त्यांना हिंदू धर्मापासून परावृत्त व्हायचे नव्हते.''

५.४.१ प्रार्थना समाजाची शिकवण :

प्रार्थना समाजाची तत्त्वे ब्राह्मो समाजाप्रमाणेच होती. ती एक आस्तिक चळवळ होती. पाश्चिमात्य शिक्षण व पुरातन वैदीक साहीत्य व तत्त्वज्ञान यांचा तो परिपाक होता. त्यांनी परमेश्वरास आपला पिता व प्रत्येक व्यक्तीस आपला बंधू मानले. तसेच एका परमेश्वरापेक्षा जास्त देवांची उपासना, वेद, मूर्तीपूजा व बलिदान यासही विरोध केला. तसेच एकच धर्मग्रंथ व जातीव्यवस्थेचे निर्मूलन यावरही भर दिला. परंतु सभेच्या सदस्यांनी सदैव स्वतःला पुरोगामी विचारांचे हिंदूच मानले. उदा. प्रोटेस्टंट प्रमाणे हिंदू धर्मातील टाकाऊ चालीरिती बदलून, नवीन शुद्ध स्वरुपाचा धर्म स्थापन करावा असे त्यांना वाटे.

समाजास अनेक सामाजिक सुधारणा अपेक्षित होत्या उदा. बालविवाह प्रतिबंध, विधवा पुर्नविवाह,स्त्रियांच्या शिक्षणासाठी पुढाकार आणि जाती व्यवस्थेचे पुर्ण उच्चाटन. परंतु समाजामधील नेते मंडळींनी धार्मिक मुद्दे उचलून धरले. कारण सामाजिक मुद्यांपेक्षा धार्मिक बदल त्यांना अधिक महत्त्वाचे वाटले. त्यातूनच सामाजिक विकास आपसूकच शक्य आहे असे त्यांना वाटे. प्रार्थनासमाजाच्या धार्मिक विधीमध्ये रविवारची सेवा, रविवार शाळा, तरुण आस्तिक संघ आणि पोस्टल मिशन ज्याद्वारे ते धार्मिक साहीत्य पोस्टाने पाठविणे. या कार्याचा अंतर्भाव होता. 'सुबोध पत्रिका' त्यांचे मुखपत्र होते. वार्षिक आस्तिक परिषद दरवर्षी घेतले जाई. ज्याद्वारे ब्राह्मो व प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते एकत्र येत.

५.४.२ महादेव गोविंद रानडे (इ.स.१८४२-१९०१) आणि रा.गो. भांडारकर (इ.स.१८३७-१९२५)

महादेव गोविंद रानडे व रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे प्रार्थना समाजाचे आदर्श आधारस्तंभ होते. त्यांनी समाजाची तात्त्विक बैठक व धार्मिक श्रद्धास्थाने व्यवस्थित मांडली होती. रानडेंच्या 'Atheist's Confession of God' या निबंधात समाजाला धर्मशास्त्रा पलिकडले ज्ञान त्यांनी देऊ केले. त्यांनी भांडारकरांच्या बरोबरीने तुकाराम महाराजांच्या भक्ती ज्ञानाच्या आधारे समाजाच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली.

त्याच काळात त्यांनी समाजातील अतीउत्साही समाजसुधारकांना कठोर पण मार्मिक उपदेश केला. त्यांच्या मते, भारतीय समाजाला सर्वांगिण सर्वकष बदलांची आत्यंतिक गरज आहे. केवळ एकाच प्रकारच्या विकासाची गरज नाही, केवळ भावनेच्या आहारी जाऊन क्रांती होत नसते तर तळागाळापासून सर्व लोकांचा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय विकास कसा होईल हे पाहणे जास्त जरुरीचे आहे. त्यांना कळून चुकले होते की, आता समाजात बदल हा अपरिहार्य आहे. परंतु त्यांना बदल म्हणजे नवीन काहीतरी शोधून काढणे असे नव्हे तर आपल्या समृद्ध प्राचीन इतिहासाची पुनरावृत्ती करणे असे अपेक्षित होते. रानडेच्या मते, सुधारकांनी समाजापासून दूर जाऊन, उच्च स्थानी जाऊन बसणे नव्हे तर स्वतःच्या खाजगी जीवनाबाबत तडजोड करुन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करणे.

प्रार्थना समाजामध्ये जरी इंग्रजी शिक्षित उच्चजातीय व्यक्ती असल्यातरी त्यांनी त्यांची चर्चासत्रे ही नेहमी मराठीतच ठेवली जात, इंग्रजी किंवा संस्कृतमध्ये नव्हे हे महत्त्वाचे आहे.

डॉबिन म्हणतात :

''.... मराठी भाषिक वक्ते हे स्वाभाविकरित्या संत तुकारामांच्या अभंगाकडे झुकले कारण त्यात व्यक्त केलेली व्यक्तिमधील भक्ती, प्रार्थना समाजात दिसून येत होती.'' रानडे त्यानंतर स्पष्ट करतात की, भक्ती मार्गातील संतांवरची श्रद्धा हे दाखवून देते की प्रार्थना समाज ही केवळ इंग्रजी, शिक्षित, शहरी भागातली चळवळ नाहीये तर देशाच्या भूतकाळाशी तिचे दृढ नाते आहे आणि कोणत्याही ठरावीक धर्म वा जातिशी कोणताही संबंध नाही.

एन. जी. चंदावरकर या प्रार्थना समाजाच्या अध्यक्षांनी एक एकेश्वरवादावर भर दिला आणि व्यक्तीव्यक्तीतील बंधू प्रेम व मानवतावादी तत्त्वांचा पुरस्कार यांस आधुनिक प्रगतिची गुरुकिल्ली मानली. इ.स.१९०९ मध्ये ते लिहीतात,

''ज्यांनी ह्या प्रार्थनासमाजाची स्थापना केली, त्यांना जाणवले की जोपर्यंत आपण माणसामाणसातील ऐक्यभावना वाढवत नाही तोपर्यंत आपण सारे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. ह्या नात्याने बांधव आहोत ही भावना वृद्धिंगत होणार नाही. भारत हा इतर देशांच्या मानाने कमी प्रगत, विभागलेला, दुभंगलेला, स्वतःचा कारभार स्वतः करण्यास असमर्थ आणि भारतीय मात्र जगातील सर्वश्रेष्ठ वंशाचे लोक, अशी विसंगती पहावयास मिळते.''

५.४.३ प्रार्थना समाजाचा ऱ्हास :

अनेक दशके, प्रार्थना समाजाचा विकास होत राहीला. अनेक हिंदू व बिगर हिंदू प्रार्थना समाजाकडे आकर्षित झाले. इ.स.१८६८ मध्ये मुंबईचा पेपर 'हिंदू सुधारक' (Hindu Reformer) यांनी म्हटले की प्रार्थना समाजाचा धर्म हा वैश्विक धर्म होण्या इतकाच समर्थ होता.

अशा अतिशयोक्तीपूर्ण आशयाव्यतिरिक्त प्रार्थना समाज हा इंग्लिश शिक्षित ब्राह्मणांचाच प्रांत राहीला. डॉ. आत्माराम पांडुरंग सोडले तर समाजाचे इतर सदस्य एकतर चित्पावन किंवा सारस्वत ब्राह्मण होते. त्यांच्या सुबोध पत्रिकेमधून ब्राम्हणांचा वरचष्मा दिसून येईल. त्यात असे लिहले होते की, भारतातील वैचारिक पुढारलेली जात ही ब्राम्हणांची होय. राजकीय दृष्ट्या त्यांचे प्राधिक्य कमी झाले. परंतु सामाजिक व बौद्धिक पातळीवर ते इतर जनतेपेक्षा श्रेष्ठच आहेत. वृत्तपत्राने समाज सुधारकांना ब्राह्मणेतर लोकांच्या इतर भौतिक गरजांवर (शिक्षणाखेरीज) लक्ष देण्यास सांगितले.

त्यामुळे प्रार्थना समाज कधीच मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होऊ शकला नाही. इ.स.१८७२ पर्यंत त्यात ६८ सदस्य व १५०-२०० सहानुभूति देणाऱ्या पैकी होते. परंतु प्रत्यक्ष कार्यवाही काही विशेष नव्हती. आर. जी. भांडारकरांना हे शेवटी मान्य करावे लागले की, सहा वर्षांच्या काळात सभेने काहीही साध्य केलेले नाही. रानडे, भांडारकर व इतर नेत्यांनी समाजाला उद्देशून जी विनंती केली होती, त्याचा काहीही उपयोग झाला नाही. समाजामध्ये एकोपा नांदावा, विचारांची देवाण-घेवाण व्हावी, या उद्देशाने अनेक प्रयत्न करण्यात आले तरीही इंग्रजी शिक्षित लोकांना पश्चिम भारतातील लोकांपासून दुरावाच वाटला. एम.एम. कुंटे १८६९ मध्ये म्हणतात मराठी समाज तीन भागात विभागला गेला. इंग्रजी-शिक्षित व शास्त्री ज्यांचे पुरातन संस्कृत विद्येवर श्रद्धा होती आणि अशिक्षित गरीब जनता, व स्त्रीया आणि पुरुष. समाजातील ह्या तीन स्तरांवरील तणाव वाढत गेला. एकोणिसशे साठच्या दशकाच्या शेवटी शेवटी समाजसुधारणेचा

हा वाद अधिकच गंभीर व जहाल बनला. प्रामुख्याने विधवा पुनर्विवाहावरुन अनेक उच्चकुलीन, प्रतिभावंत ब्राह्मण व मराठा सरदारांना समाजात बदल नको होता. तसेच साधे ब्राह्मण व मराठा समाजातील लोक पुजाऱ्यांचेच ऐकत. इंग्रजी शिक्षित लोकांनी हे पटवून देण्याचा प्रयत्न केला की, विधवा विवाह हा काही सामाजिक बदल नसून खरा अर्थ आहे.

५.४.४ प्रार्थना समाजाचे महत्त्व :

एकूण विचार करता प्रार्थना समाज म्हणावी तशी सुधारणा करु शकला नाही. केवळ सुशिक्षित उच्चकुलीन लोकांची संमेलने या व्यतिरिक्त काही साध्य झाले नाही. तरीही एम.जी. रानडे व आर. जी. भांडारकरांच्या काळात समाज खूप प्रभावी होता. त्यांच्या सदस्यांमुळे समाजामध्ये नव जागृती झाली आणि मानवतेच्या विविध अंगांचा आणि हिंदू समाजातील प्रामुख्याने महाराष्ट्रातील तळागाळातील लोकांपर्यंत विचारांची गंगोत्री जाऊन पोहचली. सभेच्या आश्रयाखाली विधवा पुनर्विवाहाची चळवळ चालूच राहीली. परंतु पुनर्विवाहांवर अनेक आघात होतच राहीले. समाजसुधारणेच्या उत्साहाच्या भरात समाजाने इ.स.१८८१ मध्ये पंढरपूर येथे एक संस्थापक निवास व अनाथाश्रम ताब्यात घेतला. तसेच गर्भवती स्त्रियांसाठी दवाखाना व अनाथांसाठी घरे ही स्थापन केली. इ.स.१८८२ पासून त्यांनी स्त्रियांसाठी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कार्य केले. तसेच स्त्री सहाय्यकास शास्त्रीय ज्ञान देण्याचीही व्यवस्था केली.

समाजाने पुणे, अहमदाबाद, सुरत, कराची आणि इतरत्र शाखा उघडल्या. सदस्यांनी स्वत:च्या नावाने समाजातील सामाजिक व धार्मिक वाईट चालीरितींवर टिका केली आणि हिंदूधर्मात काही सुधारणा करुन स्वाभिमान जागृत ठेवण्यासाठी प्रयत्न केले. त्यांचा जागतिक धर्मवाद हा बदलत्या काळाचे प्रतिक होता आणि त्याचबरोबर ख्रिश्चनमिशनऱ्यांनी जो हिंदूत्वावर हल्ला केला होता, त्यास प्रतिरोध करण्याचा प्रयत्न होता. ह्या जागतिक धर्माबाबत लेडर्ले म्हणतात,'' कर्मठ धर्माच्या कोणत्याही बेड्यांना न जुमानता, केवळ व्यक्ती, वस्तुनिष्ठता आणि सद्सद्विवेकबुद्धीवर तो आधारीत होता.''

प्रार्थना समाजाच्या कार्यकर्त्यांनी वास्तविकता ओळखली होती. इ.स.१८७२ मध्ये आर.जी. भांडारकरांच्या अध्यक्षतेखाली 'थेईस्ट' आस्तिक ही सोसायटी स्थापन केली होती.त्याचा मूळ उद्देश धर्माचा खरा दृष्टीकोन प्रकाशात आणणे, वास्तवतावादी सुधारणा व योग्य वर्तणूक हा होता. असोसिएशनने अनेक समित्यांची स्थापना केली, ज्यादुारे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये ते शिक्षणाचा प्रसार करु शकतील. जरी प्रार्थना समाजाच्या आणि थेईस्ट असोशिएशनच्या कल्पना ह्या कृतीपेक्षा जास्त महत्त्वाकांक्षी होत्या. त्यांचे सदस्य हे कमी प्रमाणात वा कमी वेगात का असेना, पण त्यांचा वास्तवतावादी सुधारणांवर जास्त भर होता. त्यांनी सामाजिक सुधारणांना धार्मिक पाठबळ देण्याचा प्रयत्न केला. १८८७ मध्ये रानडेंनी भारतीय सामाजिक परिषदेची स्थापना केली. प्रार्थना समाजाचे सदस्य भांडारकर व चंदावरकरांनी परिषदेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली.

आपली प्रगती तपासा :-

१) प्रार्थना समाजाच्या त्रासाची कारणे सांगा.
२) प्रार्थना समाजाच्ये महत्त्व थोडक्यात सांगा.

५.५ समारोप

पाश्चिमात्य शिक्षणाने भारतीय समाजाचे पुनरुज्जीवन (Renaissance) झाले. या काळात अनेक सामाजिक-सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात भारतात बदल झाले.

भारतीय विचारवंत भारतातील, समाजातील दुष्ट चालीरितीचा व प्रवृत्तींचा नव्याने विचार करु लागले. त्यांना जाणीव झाली की भारताचे मागासलेपण हे मुख्यतः दुष्ट चालीरीती, धार्मिक व सामाजिक रुढी व परंपरा आहेत.

५.६ प्रश्न

१. परमहंस सभेचा संदर्भ देऊन, दादोबा पांडूरंग ह्यांचे कार्य विशद करा.
२. गोपाळ हरी देशमुख यांच्या कार्याची मिमांसा करा.
३. समाजातील दुष्टचालीरितीचे निर्मूलन करण्यासाठी प्रार्थना समाजाने केलेल्या कार्यावर प्रकाश टाका.

❖❖❖❖

६

सामाजिक सुधारणा - (अ)

घटक रचना :

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ स्त्रियांविषयक सुधारणा
६.३ न्यायमूर्ती रानडे आणि सामाजिक परिषद
६.४ समारोप
६.५ प्रश्न

६.० उद्दिष्ट्ये

१) स्त्रियांच्या सामाजिक, सांस्कृतिक बदला मागच्या घटना जाणून घेणे व त्यासाठी जे प्रयत्न करण्यात आले, ते जाणून घेणे.
२) न्यायमूर्ती रानडे यांचे भारतीय सामाजिक परिषदेच्या संदर्भात कार्य समजावून घेणे.

६.१ प्रस्तावना

स्त्रियांच्या सामाजिक, सांस्कृतिक स्तरावरील बदलाचे संपूर्ण विवेचन या अध्यायात केले आहे. समाजसुधारकांनी ज्या धैर्याने स्त्रियांच्या अन्यायाला वाचा फोडली, त्या काळातील परिस्थिती लक्षात घेता, हे केवळ अशक्य होते. रानडे सारख्या नामवंत व्यक्ती ज्यांना या कार्यासाठी पूर्ण वेळ देता येत नव्हता त्यांनी सामाजिक सभा स्थापन केल्या, जेणेकरुन अधिक जनसमूह आकर्षित होईल. समाजसुधारकांचे विषयक सुधारणांचे कार्य या प्रकरणात समजून घेणार आहोत.

६.२ स्त्रियांविषयक सुधारणा

पश्चिम भारतातील सामाजिक परिस्थिती, आधीच नमूद केल्याप्रमाणे, प्रवाहहीन झाली होती. शंभर वर्षात पेशव्यांच्या कारकीर्दीत जनतेची सामाजिक स्थिती बदलण्यासाठी काही उपक्रम राबविले गेले . आर्थिकदृष्ट्या महाराष्ट्र बंगालपेक्षा गरीब होता. शेती, व्यापार, उद्योगधंदे या सगळ्यातच तो मागासलेला होता. जरी राज्यकर्ते व प्रजा यांच्यात साम्य असले तरी महाराष्ट्र इतर भारतातील प्रांताप्रमाणेच जाती व्यवस्थेने पोखरला होता. संत तुकाराम व नामदेव यांसारख्या संतांच्या शिकवणी व्यतिरिक्तही, महाराष्ट्रातील जनता अंधश्रद्धाळू व परंपरा रुढींनी

जखडलेली होती. विचारांमध्ये काहीही बदल नव्हता. महाराष्ट्राच्या बऱ्याच भागात भागात वैचारिक मागासलेपणा होता. फक्त धार्मिक बाबतीत कर्मठ आणि सनातनी व्यक्तीच समाजसुधारणेच्या विरुद्ध होत्या असे नव्हे तर प्रत्येक जाती समूहातील व्यक्ती जी ब्रिटीशांच्या अधिपत्याखालील मुंबईत येऊन आर्थिक दृष्ट्या संपन्न झाली होती अशी व्यक्ती समाज सुधारणेच्या विरुद्ध होती. स्त्रियांची परिस्थिती फारच हलाखीची होती. एस. नटराजनने दाखवून दिल्या प्रमाणे, लग्न, कुटुंब-संपत्ती, वारसाहक्क, विधवेचे स्थान असे अनेक मुद्दे स्त्रियांच्या विरोधात लादले गेले होते. समाजामध्ये सगळ्यात जास्त छळ स्त्रियांचा व्हायचा.

स्त्रियांच्या या प्रश्नांना काही युरोपियन ख्रिश्चन मिशनरी, पाश्चात्य शिक्षित ब्राह्मण व पारसी लोकांनी वाचा फोडली. मुंबईने सर्व महाराष्ट्राचे पुढारीपण केले. नामवंत समाजसुधारक महादेव गोविंद रानडे , बी.एम. मलबारी, एस.एस. बेंगाली, करसनदास मुळजी, ज्योतिबा फुले, पंडीता रमाबाई आणि डी.के. कर्वे यांनी स्त्रियांच्या उत्थानासाठी आयुष्य वेचले. उदा. रानडे आणि त्यांच्या भारतीय सामाजिक परिषदेने काही महत्त्वाचे प्रश्न जसे बालविवाह आणि विधवा विवाह हे उचलून धरले व त्यात त्यांना काही प्रमाणात यशही आले.स्त्रियांच्या सामाजिक सांस्कृतिक स्थानाच्या बदलाच्या निमित्ताने अनेक प्रश्नांचा ऊहापोह करता येईल. एकोणिसाव्या शतकात, स्त्रियांचे शिक्षण, विधवा पुर्नविवाह, आणि बालविवाह हे प्रश्न अत्यंत गंभीर झाले होते.

६.२.१स्त्रियांचे शिक्षण :

इ.स.१८४८ मध्ये महात्मा जोतिराव फुलेंनी मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. 'असोशिएशन ऑफ इंडीया यंगमेन' ने मुंबई प्रांताच्या दख्खन प्रभागात मुलींच्या शाळा उघडल्या. कॅप्टन लेस्टर, तेव्हाचे शिक्षण निरीक्षक (दख्खन प्रभाग) लिहीतात, ''मुलींच्या शाळा मुलांच्या बरोबरीने सुरू करण्यात कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही.''

प्रार्थना समाजाच्या स्थापनेने समाज सुधारणेला चालना मिळाली. आर.सी. मजुमदारांनी लिहील्याप्रमाणे, बॉम्बे प्रेसिडेंसीच्या स्त्रिया इतर प्रांतापेक्षा जास्त स्वतंत्र होत्या. मराठा स्त्रियांनाही पडद्याची पद्धत नव्हती. याउलट पश्चित भारतातील स्त्रियांना शिक्षणाचीही परवानगी नसे. साहजिकच काही इंग्रजी-शिक्षित निश्चयी तरुणांनी मुंबई व पुणे येथे स्त्रियांसाठी शिक्षणाची चळवळ सुरु केली. त्यांच्या या प्रयत्नांना एलफीन्स्टन इस्टिट्यूट मुंबईच्या प्राध्यापकांनी मदत केली. या उत्साही तरुणांनी 'स्टुडंटस् लिटररी ॲण्ड सायन्टिफीक सोसायटी' स्थापन केली. सोसायटीने स्त्रियांच्या शिक्षणाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला. त्या बाबती गुजराथी ज्ञान प्रसारक मंडळींनी पुढाकार घेतला. पारशी समाजसुधारक, दादाभाई नौरौजींना कळले होते की, केवळ शेठ व्यापारी लोकांकडूनच स्त्रियांच्या शिक्षण संस्थांसाठी पैसा उभा राहू शकतो. एफ. सी.बानाजी आणि कामा कुटुंबियांनी स्वत:च्या मुलींना शिक्षण देऊन व मुलींच्या शाळांसाठी पैसा पुरवून एक आदर्श उभा केला. यासाठी कर्मठ पारश्यांकडून विरोध केला गेला. इ.स.१८५२ पर्यंत चार शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यात ३७१ विद्यार्थी होते. इ.स.१८५७ मध्ये एस.एस बेंगाली आणि त्यांच्या मित्रांनी 'स्त्री बोध'ही पुस्तिका सुरु केली.

पारशी शाळांना मिळालेल्या यशाकडे पाहून मराठी आणि गुजराथी माध्यमाच्या शाळा इ.स.१८४९ मध्ये जगन्नाथ शंकर शेठ यांच्याकडून आर्थिक मदत घेऊन सुरु करण्यात आल्या. पारशी आणि गुजराथी समुदायातील मुलींना त्यांच्या श्रीमंत शेठ लोकांकडून आर्थिक मदत होई. परंतु मराठी समुदायात मात्र कुणी श्रीमंत शेठ नसल्याने पैशा अभावी मराठी शाळांचे हाल होत.

तथापी जगन्नाथ शंकर शेठ सोडले तर काही एल्फिन्सटन इन्स्टिट्यूटच्या सदस्यांनी जसे भाऊ दाजी वगैरेनी मासिक वर्गणी गोळा करुन शाळांनी आर्थिक मदत देऊ केली. अशाच प्रकारे अडखळत का होईना पण स्त्री-शिक्षणाला सुरुवात झाली.

एकोणिसाव्या शतकाच्या उतरार्धात भारत सरकारने स्त्रियांच्या शिक्षणासाठी अतिशय लक्ष पुरविले. इ.स.१८८२-८३ च्या दरम्यान शिक्षण मंडळाने (Education Commission) मुलींच्या शिक्षणाच्या संदर्भात अनेक सुधारणा केल्या.

मुलींच्या उच्च शिक्षणासाठी, मुंबई किंवा पुण्यात कोणतीही संस्था नव्हती. तरीसुद्धा मुंबईतील नामवंत महाविद्यालये उदा. एल्फिन्स्टन, विल्सन, सेंट झेविअर्स, पुण्याचे फर्ग्युसन, तर सांगलीचे वेलिंग्डन महाविद्यालय मुलींसाठी खुली होती. एम. जी. रानडे, डी. के. कर्वे, पंडीता रामाबाई यांनी महाराष्ट्रात मुलींच्या शिक्षणासाठी अथक प्रयत्न केले, त्यांनी मोठा हातभार लावला. जी. के. गोखलेंच्या भारत सेवक समाजाने स्त्री शिक्षणासाठी फार मोठ्या प्रमाणावर निधी उभारणी केली.

विपीन चंद्र पाल यांनी इ.स.१८८१ मध्ये म्हटलेले वाक्य नमूद करणे गरजेचे आहे. ''मुंबई बंगालपेक्षा स्त्री शिक्षणाच्या सामाजिक व सांस्कृतिक स्तरावर स्त्रियांच्या बाबतीत फारच आघाडीवर होती. स्त्रियांचा समाजात वावरताना मोकळेपणा माझ्या लक्षात आला.'' परंतु एस.डी. जावडेकरांनी म्हटल्याप्रमाणे पुणे आणि इतर अंतर्गत भागात अगदी शिकलेल्या लोकांमध्येही व सरदार व ब्राह्मण जातीतही अतिशय कर्मठपणा व अंधकार ओतप्रोत भरला होता. याचे प्रत्यंतर 'प्रभाकर'मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात येते. रानडे, आगरकर आणि फुले यांसारख्या समाजसुधारकांना, 'सार्वजनिक सभा' सारख्या संदर्भामार्फत समाजामध्ये जी अंधश्रद्धा, जातीयातीची जाळीजळमटे चिकटली होती, मुख्यतः स्त्रियांच्या सामाजिक स्थिती संदर्भात, त्या विषयी अथक प्रयत्न करावे लागले. तरीसुद्धा त्या काळात पुण्याला मुंबई प्रांताची राजकीय व सांस्कृतिक राजधानी समजले जायचे.

६.२.२ विधवा पुनर्विवाह व स्त्री मुक्ती :

हिंदू एकत्रित कुटुंबपद्धती ही अत्यंत सुनियोजित अशी व्यवस्था होती. ज्यात व्यक्तीपेक्षा कुटुंबाची ओळख जास्त होती. त्यामुळे वारसाहक्कावर स्त्रियांचा काहीच अधिकार नव्हता. बहुतेक सर्व नियम त्यांच्या विरुद्धच होते. हिंदू विवाहासंस्था अशा प्रकारे बनवली होती की कुटुंबाची संपत्ती ही कुटुंबाकडेच राहील. त्यामुळे सगळ्यात जास्त हाल विधवांचे व्हायचे.

हिंदूंसाठी विवाह हे एक पवित्र बंधन होते. त्यामुळे ते काडीमोड किंवा पतीचे निधन यापैकी कोणत्याही कारणाने तुटू शकत नव्हते. जरी अशा प्रकारच्या चालीरीती, नियम उच्चजातीसाठी होत्या. पण त्यांचे अवलंबन नीचजातीतील लोकही पर्यायाने करीत. विधवा पुनर्विवाहास बंदी ही यापैकीच एक अट होती. या संदर्भात ब्रिटीश न्यायालयाने, 'हिंदू सिव्हील कोड' अपील केले. हिंदू शास्त्रानुसार मुलगा झाला नसल्यास पुरुषाला दुसरे लग्न करण्याचा अधिकार आहे. परंतु कालांतराने जरी पत्नीस मुलगा असेल तरीदेखील दोन किंवा जास्त बायका करण्यास पतीला परवानगी देण्यात आली.

परंतु पतीने अरेरावी करुन दुसरी पत्नी वा स्त्री केल्यास, त्या संदर्भात पत्नीस कोणतेही संरक्षण देण्यात येत नसे आणि जरी तिचा नवरा नसेल तरी देखील तिला पुर्नविवाहास परवानगी मिळत नसे. विधवेशी किंवा विवाहीत स्त्रीशी विवाह हा सामाजिक अपराध समजला जाई. या असल्या विचित्र व क्रूर चालीरितींतून सुटण्याचा मार्ग म्हणजे इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्म पत्करणे. या असल्या विचित्र चालीरीतींमुळे पाश्चिमात्य शिक्षणामुळे प्रभावित झालेल्या तरुणांनी समाजसुधारणांचे जोखड उचलले. जसे ब्राह्मो समाजाने बंगालमध्ये कार्य केले.

मुंबईत एलफीन्स्टन इन्स्टिट्यूटच्या सदस्यांनी जसे दादाभाई नौरोजी, दादोबा पांडुरंग, बाळ शास्त्री जांभेकर, करसनदास मुळजी, बाबा पदमनजी, विष्णूबुवा ब्रह्मचारी अशा समाजसुधारकांनी विधवा विवाहाचा मुद्दा उचलून धरला. पुण्यात लोकहीतवादी गोपाळ हरी देशमुख, विष्णु शास्त्री पंडीत, एम. जी. रानडे यांनी ही चळवळ अतिशय प्रखर बनविली. विधवा विवाहासाठी त्यांनी हिंदू शास्त्रांतील वेदांनादेखील आव्हान दिले. 'इंदू प्रकाश' सारख्या वृत्तपत्रातून विधवा-विवाहावर प्रकाश टाकण्यात आला. इ.स.१८६६ मध्ये, सुधारकांनी 'विधवा विवाहोतेजक मंडळींची' स्थापना केली. परंतु या मंडळाचा उद्देश मर्यादीत होता. उच्च जातीतील विधवांचा पुर्नविचार करणे इतपतच तो मर्यादीत होता.

विधवा-पुर्नविवाहाचा विरोधही तेवढाच वाढत होता. पुण्यातील काही स्थानिक लोकांनी सरकारला, इ.स.१८५६ च्या विधवा विवाहास मान्यता देणाऱ्या कायद्याचा विरोध करणाऱ्या दोन याचिका पाठविल्या. हिंदू धर्माच्या संरक्षणासाठी संस्थेची स्थापना करण्यात आली. शास्त्री, पंडीत आणि इतर कर्मठ लोक विधवाविवाह नामंजूर करण्यासाठी एकत्र आले. परंतु सुधारक त्यांना ऐकेनात. विष्णू शास्त्रींनी ईश्वरचंद विद्यासागर यांचे लेख मराठीत रुपांतरीत केले व 'इंदू प्रकाश'मध्ये छापले. तसेच दख्खन प्रांतातील सभांमध्ये विधवा-विवाहाविषयी कर्मठांवर घणाघाती आरोप केले. विधवा पुनर्विवाहासाठी कर्मठांना त्यांनी जाहीर आवाहन केले. मार्च १८७० च्या पुणे येथील जाहीर सभेत शंकराचार्य व राकेश्वर यांच्यावर सुधारकांनी धर्माचे खरे रुप समाजापुढे न आणता केवळ कर्मठांच्या दबावाला बळी पडून धर्माचे भ्रष्ट रुप पुढे केल्याचा आरोप केला. तरी सुद्धा विधवा पुनर्विवाह मंडळाने नैतिक विजय घोषित केला. तो या अर्थाने की वेदांतानेच विधवा-पुनर्विवाहास मंजुरी दिली आहे आणि तोही कोणत्याही पाश्चिमात्य विचारसरणीचा आधार न घेता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे इ.स.१८७० मध्ये या चळवळीचा अंत एका विचित्र घटनेत झाला. गोपाळ हरी देशमुखांनी अहमदाबाद येथे प्रायश्चित घेऊन परत जातीत प्रवेश मिळविला. विधवा विवाह सभेच्या अध्यक्षांच्या या वर्तणुकीमुळे सभेच्या कार्याला फार मोठा धक्का बसला. इ.स.१८७६ मध्ये विष्णू शास्त्री पंडीतांच्या निधनाने सभेला दुसरा धक्का बसला. त्यानंतरच्या एक दशकाच्या काळात ही चळवळ शांत झाली. तरीही मुंबई येथे ही चळवळ एका गुजराती समाजसुधारकाने, माधवदास रघुनाथदास व प्रार्थना समाजाने चालू ठेवली. महर्षी धोंडो केशव कर्वेंनीही विधवा पुनर्विवाहासाठी अथक प्रयत्न केले. त्यांनी स्वतः मित्राच्या विधवा बहीणीशी गोंदुबाईशी विवाह करुन सर्व कर्मठ हिंदू आणि त्यांच्या वृत्तपत्रांपुढे आदर्श उदाहरण ठेवले. आर.जी. भांडारकर व इतर मित्रांच्या मदतीने त्यांनी विधवा विवाह सभेची पुनर्स्थापना केली. त्यांनी त्यांच्या सुट्टीचा उपयोग समाजामध्ये विधवाविवाहासंबंधी जागृती निर्माण करण्यासाठी केला. इ.स.१८९६ मध्ये पंडीता रमाबाईंच्या 'शारदा सदन' वरुन प्रेरणा घेऊन विधवा गृह संस्था सुरु केली. न्यायमूर्ती रानडे व भांडारकर ही त्यात सामील होते. आधीही त्यांनी विधवा गृह संस्था काढली होती ज्याचा मुख्य उद्देश विधवा स्त्रियांना व्यवसाय मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आली. उदा., परिचारीका, शिक्षिका आणि शिक्षण घेऊन स्वतःला

आर्थिक दृष्ट्या सबल बनविणे. त्याच्या स्थापनेपासून इ.स.१८८९ ते १९१५ पर्यंत विधवा गृह संस्थेने २५ महाराष्ट्रीयन विधवांचे पुनर्विवाह केले.

अशा प्रकारे मुंबई-पुणे येथील समाज सुधारकांचे अथक प्रयत्न, 'इंदूप्रकाश' सारखे वृत्तपत्र, विधवा पुनर्विवाह संस्था आणि विष्णुशास्त्री आणि महर्षी कर्वे यांचे कार्य या सर्वांचा परीपाक म्हणजे महाराष्ट्रात घडून आलेले बदल. विसाव्या शतकाच्या सुरुवाती पर्यंत समाजसुधारकांना हिंदू धर्मातील विधी, अशास्त्रीय दृष्टीकोन ज्याला वेदामध्ये कसलाही शास्त्रीय आधार नाही मुख्यतः विधवा पुर्नविवाहाच्या बाबतीत हे समाजाला पटवून देण्यात काही प्रमाणात यश आले.

६.२.३ बाल विवाह निर्मूलनाचे प्रयत्न :

बाल विवाहासारखी अत्यंत क्रूर पद्धत भारतात अनादी कालापासून चालत आलेली आहे. प्राचिन काळापासून ही एक समाजाची रुढी बनली. जरी बाल विवाहमुळे काही सामाजिक व आर्थिक प्रश्न सुटत असले तरी समाजासाठी ती अत्यंत घातक अशी परंपरा होती. मुख्यत्वे करुन स्त्रियांचे त्यात खूप हाल व्हायचे. लहान मुली परिपक्व होण्याआधीच लग्न करण्याची पद्धत भारतात सर्वच भागात चालायची. केवळ एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला बी.एम. मलबारी, एम. जी. रानडे, डॉ. आर. जी. भांडारकर यांनी असल्या सामाजिक नैतिक दृष्ट्या अघोरी पद्धतीला आव्हान दिले आणि ती बंद करण्याविषयी जिकरीचे प्रयत्न केले. बंगालमध्ये होत असलेल्या सामाजिक बदलाची परिणती म्हणून ब्रिटीश सरकारने इ.स.१८७२ मध्ये पारित केला ज्यानुसार बालविवाह विरोध तसेच विधवा पुनर्विवाहावर परवानगी देण्यात आली. कायद्याच्या अंमलबजावणीनंतर सुद्धा, बाल विवाहासारख्या दृष्ट चालीरिती महाराष्ट्र आणि इतर प्रातांत चालूच राहील्या. बालविवाहाचा मुद्दा इ.स.१८८० मध्ये पारशी समाजसुधारक आणि इंडीअन स्पेक्टेटरचे (Indian Spectator) संपादक बेहरामजी एम. मलबारी यांनी प्रकाशात आणला. समाजातील या दुहेरी दुष्कृत्यांना आळा घालण्यासाठी त्यांनी सनदी व सरकारी अधिकाऱ्यांसमोर स्वतःचे मत मांडले. त्यानुसार विवाहीत विद्यार्थ्यांस विद्यापीठाच्या परीक्षेस बसण्याची अनुमती नाकारण्यात यावी आणि बाल विवाहाच्या दुष्ट चालीरीती व त्यांच्या विघातक परिणामांविषयी पाठ्यपुस्तकात माहीती छापावी. त्यामुळे बाल विवाहास आपोआपच आळा बसेल. त्यांचे हे विचार डॉ. भांडारकर, रानडे, के.टी. तेलंग, आगरकर, चंदावरकर यांना मान्य झाले. रानडेंनी सरकारला, मुलामुलींचे विवाहयोग्य वय कायद्याने ठरविण्याविषयी विनंती केली (मुलांसाठी १६-१८ व मुलींसाठी १० ते १२). तसेच १४ वर्षांखालील मुलींवर शारीरिक संभोग हा बलात्कार समजण्यात यावा यासंबंधी भारतीय दंडसंहितेमध्ये बदल सुचविण्यात आले. तसेच ४५वर्षांवरील पुरुषांना कुमारिकांशी विवाह नामंजूर करण्यात यावा. तसेच, मुली मुलांपेक्षा वयाने मोठ्या ही पद्धतसुद्धा बंद करावी. त्यांच्या मते, अशा प्रकारचे विवाह अनैसर्गिक व हास्यास्पद आहे. रानडेंनी सरकारने मुलींचे विवाहाचे वय वाढवावे (१० ते १२ च्या दरम्यान) यासाठी विशेष प्रयत्न केले.

मलबारींच्या नोंदी आणि रानडेंचे विचार यामुळे लोकमान्य टिळक अत्यंत संतप्त झाले होते. टिळक हे अत्यंत प्रगल्भ विचारवंत व महाराष्ट्राचे प्रभावशाली नेते होते. त्यांचा या सामाजिक बदलास विरोध नव्हता. परंतु परकी सरकारने हिंदू धर्मात ढवळाढवळ करणे त्यांना मान्य नव्हते. ब्रिटीश सरकारने मात्र समाजसुधारकांनी सुचविलेल्या पर्यायांवर कोणताही कायदा पास केला नव्हता. कारण भारतीयांविषयी त्यांनी तटस्थ धोरण स्विकारले होते. त्यामुळे

मलबारींना इंग्लंडला तीनदा भेट द्यावी लागली व इंग्लंडच्या जनतेला अपील करावे लागले की त्यांनी ब्रिटीश सरकारवर दबाव आणून भारतात बालविवाह कायद्याने रद्द करावा. समजाकडून कितीही कडवा प्रतिकार होत असतानाही मलबारी व त्यांच्या सहाय्यकांनी, बालविवाहासंबंधी आपल्या धोरणांत काहीही बदल केला नाही. शेवटी इ.स.१८९१ मध्ये बालविवाह संमती वयाचा कायदा सरकारने मान्य केला.

आर. सी. मुजुमदारांच्या मते, ''हा कायदा अत्यंत तकलादू होता आणि त्यावेळच्या परिस्थितीचा आढावा घेता त्याचा समाजावर काही फारसा परिणामही होणार नव्हता.'' तरीदेखील मुलींचे विवाह योग्य वय १२ केल्यामुळे समाजामध्ये बाल-विवाह विषयी जागरुकता पसरली. विवाहयोग्य वयाच्या १८९१ च्या कायद्यामुळे मानवतेला काळीमा फासणाऱ्या बालविवाहासारख्या अघोरी प्रथेला काही प्रमाणात का होईना, आळा बसला व समाजातील स्त्रियांचे दुःख काही प्रमाणात कमी झाले.

तरीही असल्या प्रथेचे समूळ उच्चाटन शक्य नव्हते. कारण समाजातील जुन्या चालीरीती पार मुश्किलीने नष्ट होतात. त्यातच ३७ वर्षाच्या रानडेंचे ११ वर्षाच्या कुमारिकेबरोबर त्यांच्या इच्छेविरुद्ध लग्न झाल्यामुळे त्यात अधिकच भर पडली. रानडेंनी त्यांच्या स्वतःच्या वडीलांना आणि मुलींच्या वडीलांना मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला. पण व्यर्थ, शेवटी त्यांना लग्नासाठी होकार द्यावाच लागला. परंतु लग्नानंतर मात्र त्यांनी आपल्या अल्पवयीन पत्नीला आधुनिक विचाराने प्रेरित करुन शिक्षित केले. हळूहळू तिचा आत्मविश्वास वाढला आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात त्या आघाडीच्या समाजसुधारक बनल्या त्या म्हणजे 'रमाबाई रानडे' होत.

सामाजिक रोष आणि सरकारच्या सहाय्याने राजकीय पातळीवर विघ्न आणू पाहणाऱ्यांना न जुमानता मलबारी, रानडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्रामध्ये, समाज सुधारणेची लाट पसरवून दिली. विवाह संमती वयाचा (Age of Consent) चा कायदा पारित झाल्याने स्त्रियांच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडणाऱ्या अनेक समाज सुधारकांना अत्यानंद झाला. नवीन आशा पल्लवित झाल्या.

पंडीता रमाबाईच्या संदर्भाशिवाय, स्त्रीमुक्ती चळवळीच्या कार्याला पूर्णत्व येत नाही. स्त्रियांच्या उत्थानाच्या दृष्टीने त्या अत्यंत अग्रेसर होत्या. जातीबाहेर विवाह केल्याने, समाजाचा रोष त्यांना पत्करावा लागला. पतीच्या निधनानंतर आई वडील व भावाबरोबर त्या पुण्याला परतल्या. स्त्रियांना बंदीवासात ठेवण्याच्या आरोपावरुन त्यांनी पुरुषांवर टीकेची झोड उठवली. त्यांचे जाती बाह्य लग्न व हिंदुत्वाला त्यांनी आव्हान केल्याने कर्मठ ब्राह्मणांचे डोके फिरले. टिळक व इतर हिंदू जरी त्यांच्या विरुद्ध असले तरी, त्यांच्या बुद्धीमत्तेचा त्यांनी आदरच केला. त्यांनी इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरु केला. पुण्यात त्यांनी प्रार्थना समाजाच्या आधाराने आर्य महीला समाज ही संस्था स्त्रियांसाठी सुरु केली. जरी रानडे आणि भांडारकरांचा त्यांना पूर्ण पाठींबा होता तरी आर्य समाजाच्या संपूर्ण महाराष्ट्रात शाखा काढण्याच्या प्रयत्नांत त्यांना अल्प यश मिळाले.

समाजाकडून दुरावले गेल्यामुळे चिडलेल्या रमाबाईनी शेवटी ख्रिश्चनमिशनऱ्यांकडे मदतीसाठी आवाहन केले. त्या इंग्लंड व अमेरिकेला गेल्या व शिक्षण क्षेत्रात मदत करण्याचे वचन

घेऊन त्या परतल्या. त्या दरम्यानच्या काळात त्या ख्रिश्चन धर्मात परावर्तीत झाल्या आणि हिंदू धर्मावर आरोपपत्र ठेवणारे पुस्तक त्यांनी लिहले. इ.स.१८८९ मध्ये त्यांनी मुंबईत शारदा सदन स्थापन केले जे त्यांनी पुढील वर्षी पुण्यात हलविले. रानडे आणि भांडारकरांनी त्यांच्या सर्व कार्याचे समर्थन केले.

परंतु रमाबाईंना कठोर सामाजिक रोषाला सामोरे जावे लागले. टिळकांनी तर त्यांना ख्रिश्चन धर्माची प्रसारक असे आरोपपत्र दिले. शिक्षण व समाज सुधारणेच्या बुरख्याखाली हे धर्मांतराचे प्रयत्न चालले आहेत. परंतु रमाबाईंनी स्वतःच्या धर्मांतराचे कारण समाजाचा नाकर्तेपणा व अन्याय, अपमानग्रस्त वागणूक हे होय असे स्पष्ट केले आणि त्यामुळेच त्यांना ख्रिश्चन मिशनऱ्यांकडे मदतीसाठी जावे लागले. परंतु त्यानंतर त्यांना हे मान्य करणे भाग पडले की ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या सांगण्यावरुन त्या धर्मांतराचे काम करीत आहेत. अशा प्रकारे काही धर्मांतराविषयी बोलण्यानंतर रानडे व भांडारकरांचे रमाबाईंबरोबरचे जिव्हाळ्याचे संबंध संपुष्टात आले. तरी सुद्धा आर्य महिला समाजाचे स्त्रियांच्या संपूर्ण प्रगतीचे कार्य चालूच राहीले.

आपली प्रगती तपासा :-

१) स्त्रियांच्या शिक्षणविषयक प्रसाराबाबत माहिती लिहा.

२) बालविवाह संमती वयाच्या कायद्याबाबत कोणी प्रयत्न केले ?

६.३ न्यायमूर्ती रानडे आणि समाजिक परिषद (इ.स.१८४२ ते १९०१)

राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात दादाभाई नौरोजी हे आघाडीचे कार्यकर्ते होते. परंतु त्याचे सामाजिक कार्य हे प्रामुख्याने मुंबईपर्यंतच मर्यादीत होते. महादेव गोविंद रानडे एल्फिन्स्टन कॉलेजचे प्राध्यापक असल्यामुळे यांना मात्र संपूर्ण देशभरातून पाठींबा होता. सगळ्यात वयोवृद्ध माणसाचे इंग्लंडला प्रस्थान झाल्यानंतर स्टुडंटस लिटररी ॲण्ड सायंटिफीक सोसायटीचे पुनर्जीवन महादेव गोविंद रानडेनी केले. इ.स.१८५९ नंतर, अनेक वर्षे ते या सोसायटीचे उमेदीचे कार्यकर्ते होते आणि दादाभाई नौरोजींनी उच्च दर्जाची तत्त्वे आखली होती त्यास ते प्रामाणिक राहीले.

१८ जानेवारी, १८४२ मध्ये महादेवांचा जन्म नाशिक जिल्ह्यात निफाड येथे कोकणस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. इ.स.१८६२ मध्ये ते पदवीधर झाले. परंतु पदवीच्या शेवटच्या वर्षाला असतानाच समाजातील खालच्या स्तराच्या मुलांना शिकवावयास सुरुवात केली. इ.स.१८६४ मध्ये ते इतिहासातून एम.ए. झाले आणि त्याच वर्षी एम.ए.ला. शिकविण्यास सुरुवात केली. इ.स.१८६६ मध्ये ते एल.एल.बी प्रथम वर्गातून पास झाले त्याचवर्षी 'मुंबई सरकारचे पौर्वात्य भाषांतरकार', 'पदवीधारकांचे युवराज' अशी त्यांची ख्याती झाली.

६.३.१ स्टुडंटस् लिटररी ॲण्ड सायन्टिफीक सोसायटी आणि रानडे :

विद्यार्थी असताना त्यांनी अनेक लघुप्रबंध सादर केले. उदा. शिक्षित तरुणांची कर्तव्ये (इ.स.१८५९), बंगाली व मराठ्यांचे तुलनात्मक भवितव्य (इ.स.१८६३) आणि लोकसंख्येची तत्त्वे (इ.स.१८६४) या शीर्षकांवरुन त्यात ख्रिस्ती आणि उपयोगतापर त्यांचे लिखाण जास्त होते याची कल्पना येते. त्यांच्या आधीच्या एलफिन्स्टन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी समाज सुधारणेत ज्यांना रस आहे , त्यांच्यासाठी आधीच मार्ग आखणी केली होती. इ.स.१८६२ मध्ये रानडेनी 'इंदूप्रकाश' ह्या वृत्तपत्राचा आधार घेतला. दर्पण प्रमाणेच इंदूप्रकाशही द्विभाषिक वृत्तपत्र होते. लोकहीतवादींनी रानडेना इंग्रजी वृत्तपत्राचे संपादन करण्यासाठी पाचारण केले आणि मराठीचे संपादक होते विष्णु शास्त्री पंडीत ज्यांनी नंतरच्या काळात रानडेंच्या विधवा पुनर्विवाह विवादात आणि इतर समाज सुधारणेच्या कार्यात पाठींबा दिला.

६.३.२ पुस्तक समिती आणि साहित्य परिषद :

स्टुडन्टस् लिटररी ॲण्ड सायंटीफीक सोसायटीने पाश्चिमात्य व संस्कृत पुस्तकांचा मराठी अनुवाद करणाऱ्यांच्या दोन स्थानिक समित्या स्थापन केल्या. लोकहीतवादींनीही त्या धर्तीवर काही समित्या पुण्यात उघडल्या. पुण्यात कृष्णाशास्त्री चिपळूणकरांनी त्यांच्या प्रभावी व सहज मराठी भाषेत अनेक भाषांतरे केली. इ.स.१८६६ मध्ये मुंबई सरकारने रानडेंना मराठी भाषांतरकार म्हणून नियुक्त केले. मराठी भाषेतील साहीत्य सरकारी अनुदानाच्या सहाय्याने छापण्याची जबाबदारी त्यांची होती. त्यांच्या महाविद्यालयीन दिवसांपासूनच त्यांना माहीत होते की समाजात असे काही लोक आहेत ज्यांना महाविद्यालयात मराठी व गुजरातीची सुविधा असल्याची फार मोठी अडचण होते. परंतु मराठी भाषेच्या सामर्थ्याबद्दल त्यांना पूर्ण विश्वास होता. रानडेंनी लोकहीतवाद्यांच्या मदतीने इ.स.१८७८ मध्ये मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीची व भाषांतरकारांच्या सोसायटीची स्थापना केली. लोकांकडून पैसे जमा करुन मराठी साहीत्यातील विविध अंगांवर प्रकाश टाकावा अशी त्यांची योजना होती. पुढील पाच वर्षे सोसायटीने अत्यंत जोमाने काम केले. यात अनेक बाधा आल्या. परंतु सामाजिक जाणीवेने प्रेरित झालेल्या सामाजिक लोकांनी, महाराष्ट्रात मोठ्याप्रमाणावर जनजागृती केली.

त्या काळापासूनच या संस्थेचे वार्षिक संमेलन घ्यावयास सुरुवात केली होती आणि महाराष्ट्रातील वैचारिक जनजागृतीसाठी एक प्रकारचा मंच या संस्थेने पुरविला. ग्रंथोत्तेजक मंडळी कालपरत्वे नामशेष झाली परंतु परिषद आणि त्यांचे संस्थापक हे महाराष्ट्राचे आधारस्तंभ बनले.

६.३.३ प्रार्थना समाज आणि रानडे :

रानडे हे फक्त शैक्षणिक प्रगतीवर समाधानी नव्हते. त्यांना समाजात बदल घडवायचा होता. ते त्यांचे समकालीन लोकहीतवादी व दादोबा पांडुरंग प्रमाणेच समाज सुधारणेच्या भावनेने प्रेरित झाले होते. हिंदुत्वाच्या सुधारणेच्या बाबतीत त्यांची द्वीधा अवस्था झाली होती. बेंथमच्या स्वातंत्र्यवादी विचारांचा प्रभाव आणि त्यांच्या स्वतःच्या हिंदू धार्मिक विधींवरील विश्वास यांच्यात वाद होत होता. त्यांना माहीत होते की आधुनिक जगातील सर्वधर्मव्यापी शिक्षण आणि हिंदू धर्मातील कर्मठ विचारांचे खटके उडणार आहेत. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी हिंदू धर्मासमोर जे आव्हान उभे केले होते आणि हिंदू धर्मात काय-काय बदल येऊ केलेत त्याची त्यांना पूर्ण जाणीव होती. समाजातील दुष्प्रवृत्ती आणि अंधश्रद्धा यांच्यावर उघडउघड आरोप करणे सुद्धा त्या काळात कठीण होते. इ.स.१८६७ मध्ये स्थापित झालेली प्रार्थना समाज ही सोसायटी इतर संस्थांच्या

मानाने अधिक जहाल आहे असे त्यांना वाटे. बंगालच्या ब्राह्मो समाजापेक्षा ही संस्था सर्वार्थाने वेगळी होती आणि जेव्हा रानडे आणि इतर तरुण पदवीधर या संस्थेला येऊन मिळाले, तेव्हाच या संस्थेस समाजाची सहानुभूती मिळाली. त्यांनी नवीन मूलगामी, आधुनिक विचारांची सांगड जुन्या शाश्वत विचारांशी घालण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या 'आस्तिकाचा कबुलीजबाब' (A Theist's Confession) या पुस्तकात आहे. त्यांनी हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, परमेश्वर हा पारलौकीक अनुभवातीत आहे.

६.३.४ न्या. रानडे व विधवा पुनर्विवाह वाद :

इ.स.१८५६ मध्ये पंडीत ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या अथक प्रयत्नांमुळे इंग्रजांनी बंगालमध्ये विधवा पुर्नविवाह कायदा पास केला. ते वेदांचे गाढे अभ्यासक होते आणि स्वतःचा मुद्दा खरा ठरविण्यासाठी वेदामधून अनेक पुरावे त्यांनी गोळा केले. विधवांचा पुर्नविवाह मान्य करावा यासाठी त्यांनी बंगाल सरकारला अपील केले. इ.स.१८२९ पासून सरकारने सतीची पद्धत कायद्याने बंद केली होती. त्यापासून प्रेरित होऊन महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी स्त्रियांचे विविध प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने उचल खाल्ली. स्टुडंटस् लिटररी ॲण्ड सायंटिफीक सोसायटीचे काम हाती घेतले. प्रार्थना समाजाने कोणतेही कार्य उघडपणाने किंवा जाहीररीत्या हाती घेतले नाही कारण आधीच त्यांच्या कार्यकर्त्यांवर ख्रिस्ती धर्मांतरावरुन संशय व रोष होता. याउलट, समाजाने विधवा पुनर्विवाहासाठी त्यांच्याच अनुयायांना पुढाकार घेण्यास सांगितले.

इ.स.१८६४ मध्ये केशव चंद्र सेन हे ब्राह्मो समाजाचे नेते मुंबईच्या भेटीस ब्राह्मो समाजाची शाखा सुरु करण्याच्या उद्दीष्टाने आले. त्यांच्या उद्देशाला थोडाफार प्रतिसाद मिळाला. परंतु त्यांच्या भेटीनंतर इ.स.१८६६ मध्ये विष्णू शास्त्री पंडीत व त्यांचे मित्र विधवाविवाहोत्तेजक मंडळीची स्थापना करण्यासाठी प्रेरीत झाले. विष्णू शास्त्री हे पुण्याचे आधुनिक विचारांचे अग्रगण्य पंडीत होते. मंडळाकडे विद्यापिठाचे पदवीधर व समाज सुधारक आकर्षित होऊ लागले. रानडे हे विष्णूशास्त्रींना लोकहीतवाद्यांचे 'इंदूप्रकाश' हे वृत्तपत्र सहसंपादीत करण्याच्या काळापासून ओळखत होते.

रानडे यांनी या कामात जीव ओतला. कारण त्यांना माहीत होते की मुलींचे बालविवाह म्हणजे आयुष्याचा बराच काळ वैधव्यात व्यतित करावा लागतो. एखाद्या अत्यंत लहान बाळाचे लग्न, दुसऱ्या बाळाबरोबर लावून देऊन जर त्या बाळास (मुलास) अकाली मरण आले, तर ती लहान मुलगी जन्मभरासाठी विधवा व्हायची. रानडेंची स्वतःची दहा वर्षाची बहीण काही वर्षातच विधवा बनली. तिचे तिच्या सासरी अत्यंत हाल व्हायचे. रानडे आणि विष्णुशास्त्रींनी केवळ सामाजिक न्यायाच्या आधारावर नव्हे तर धर्म ग्रंथांतच अशा प्रकारची सोय आहे हे सिद्ध करुन दाखविले होते. कर्मठ लोकांनी समाजसुधारकांना कमी लेखण्यासाठी आधीच हिंदू धर्म व्यवस्थापक मंडळींची स्थापना केली होती.

विद्यासागर यांचे पुस्तक इंदूप्रकाशमध्ये लेखांच्या मालिकेच्या स्वरुपात प्रकाशित होऊ लागले. त्यामुळे अधिकच गोंधळ निर्माण झाला. त्यातून निर्माण झालेला वाद इ.स.१८६८ ते इ.स.१८७१ पर्यंत चालू राहीला. विष्णूशास्त्री हे जनजागृतीच्या निमित्ताने नाशिक व पुण्याला दौऱ्यावर गेले. त्याचबरोबर विधवा विवाहावर ते इंदूप्रकाशमध्ये निबंध लिहीत होते. त्यानंतर इ.स.१८६९ मध्ये विधवा विवाहासाठी त्यांनी एक जाहीरात दिली. त्यांनी एक विधवा, जिचे कुटुंब विवाहास मुंजुरी देत आहे व एक शिक्षक, जो विधवेशी विवाह करण्यास तयार आहे त्यांची

सांगड घालून दिली. मुंबईत १५ जून १८६९ रोजी ठाकूरद्वार येथे पूर्ण पारंपारीक पद्धतीने विवाह संपन्न झाला. कर्मठांनी विवाहास उत्तेजन देणाऱ्यांना बहीष्कृत करण्याची धमकी दिली. त्यानंतर शास्त्राला पणाला लावण्यात आले. करवीर च्या शंकराचार्यांनी या संदर्भात निकाल लावण्याची तयारी दर्शविली. कर्मठ लोकांनी शंकराचार्यांवर अत्यंत दबाव आणला व निर्णय स्वतःच्या बाजूने वळविला. रानडेंनी त्या काळात विधवांचा पुनर्विवाह हिंदू कायद्यानुसार कसा योग्य आहे या विषयी पुस्तिका छापली आणि विधवा पुनर्विवाहासंबंधी वेदांचे महत्त्व या विषयी लेख लिहीला. त्यांच्या लेखामुळे, समाज सुधारणेस पुढील काळात अधिक वेग चढला. इ.स.१८६९ मध्ये त्यांना बहीष्कृत करण्यात आले. परंतु त्यांच्या समाजातील स्थानामुळे आणि त्यांच्यासारख्याच मुक्त विचारांच्या सहकाऱ्यांमुळे त्यांना फारसा फरक पडला नाही.

६.३.५ सुधारणा चळवळीस घरघर :

समाज सुधारणेच्या कामाची मोठ्या प्रमाणावर पीछेहाट एका कारणावरुन झाली व ती म्हणजे एका समाजसुधारकाने ब्रिटीश कोर्टाचा आधार घेऊन एका हिंदू कर्मठाची बदनामी केली. पुणे कोर्टाने त्यास बावीस दिवसांची कोठडी दिली आणि दुसऱ्या सुनावणीच्यावेळी तीन महीन्यांची कोठडी दिली. सुधारकांच्या वर्तणुकीचे समाजाकडून स्वागत झाले नाही. याउलट सुधारक ब्रिटीश कोर्टाचा आधार घेऊन प्राचीन चिरंतन रुढींचे जतन करणाऱ्यांनाच कैद करीत आहेत याबाबत समाजात नाराजी पसरली. त्यासंबंधी, त्यांना सरकारच्या तकलादू योजनांचाही सुगावा यायला लागला. त्यांच्या मते सरकार बरोबरची ही युती किंव खल हा केवळ शाश्वत हिंदू धर्माचा नाश करण्यासाठीच आहे याबाबत त्यांची ठाम खात्री निर्माण झाली. दुसऱ्या एका घटनेने सुधारकांची चळवळ क्षीण झाली. लोकहीतवादींनी समुद्र लंघन करण्यास धर्माने बंदी असतानासुद्धा, स्वतःच्या मुलासोबत कुष्णराव बरोबर समुद्र पार यात्रा केली. त्यानंतर मुंबईत एका विधवेच्या विवाहास पाठींबा देण्यावरुन लोकहीतवादी व त्यांचा मुलगा, या दोघांनाही बहिष्कृत करण्यात आले. आता कृष्णराव परत आले तरी त्यांनी व त्यांच्या वडीलांनी प्रायश्चित केल्याशिवाय हिंदू धर्मात त्यांना परत घेणार नाही असे सांगितले. रानडेंनी या गोष्टीस विरोध करुन सुद्धा लोकहितवादींनी जाहीररित्या प्रायश्चित केले. अत्यंत महत्त्वाच्या क्षणी लोकहीतवादींनी कच खाल्ल्याने सुधारकांच्या चळवळींची शक्तीच निघून गेली.

इ.स.१८७३ मध्ये, रानडेंची प्रथम पत्नी सखुबाई वारल्या. त्यामुळे रानडेंच्या जीवनात एक नवीनच संकट उभे राहीले. बदलासाठी म्हणून त्यांना युरोपला जायचे होते. परंतु युरोपियन आचार -विचारांचा दुष्परिणाम त्यांच्यावर होईल म्हणून रानडेंच्या वडीलांनी त्यांना जाण्यास नकार दिला. तसेच आता पत्नीच्या निधनानंतर रानडेंनी एकटे राहू नये असे त्यांना वाटे आणि रानडे आता विधवेशी विवाह करतील की काय? ही भीती तर होतीच आणि म्हणून त्यांनी रानडेंवर दबाव आणण्यास सुरुवात केली. साताऱ्याच्या कुर्लेकर कुटुंबातील अल्पवयीन 'रमाबाई' हिच्याशी विवाहासंबंधी त्यांच्यावर दबाव आणण्यात आला आणि त्यात त्यांना यश आले. रानडेंनी दुसरा विवाह केला तोही एका अल्पवयीन कुमारिकेशी विधवेशी नाही या घटनेचा मुंबई - पुणे समाज सुधारणेच्या चळवळींवर फार गंभीर परिणाम झाला.

६.३.६ न्या. रानडे व भारतीय राष्ट्रीय सामाजिक परिषद :

इ.स.१८८० च्या दरम्यान, सुशिक्षित उच्चकुलीन लोकांमध्ये आधी सामाजिक की आधी राजकीय या विषयावरुन वादास तोंड फुटले. त्यापैकी अनेकांना असे वाटे की सामाजिक सुधारणेस प्रथम प्राधान्य मिळाले पाहीजे. याउलट दुसऱ्याबाजूस राजकीय पातळीवर अतिशय

प्रभावी असणाऱ्या बाळ गंगाधर टिळकांना, भारताच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने राजकीय आघाडी जास्त महत्त्वाची वाटत होती. दादाभाई नौरोजींसारख्या व्यक्तींचा संस्था वगैरे पेक्षा व्यक्तिगत समाजसुधारणेस जास्त पाठिंबा होता. डिसेंबर १८८५ मध्ये प्रार्थनासमाज मुंबई येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने चर्चासत्र घडविल्यानंतर लगेचच त्याच हॉलमध्ये सामाजिक विषयांवरुन दुसरे चर्चासत्र घडविण्यात आले. त्यानंतर इंडियन नॅशनल कॉग्रेसच्या जिथेजिथे चर्चासत्र होत, तिथे तिथे त्या त्या ठिकाणी, लगेचच सामाजिक विषयांवरुन चर्चासत्र घडवून आणण्याची पद्धतच पडली.

सुरुवातीपासूनच, बहुतेक कॉग्रेसच्या व्यक्तीना राजकीय विषयात जास्त रस होता आणि सामाजिक प्रश्नांचे निराकरण करण्याची जबाबदारी रानडे, आर. रघुनाथराव, मलबारी शेठ आणि इत्यादी यांच्यावर सोडली होती. डिसेंबर १८८७ मध्ये सामाजिक संमेलन घडविण्यात आले. मार्च १८८७ मध्ये रानडेंनी, स्वातंत्र्याची चळवळ हाती घेण्यापूर्वी, सामाजिक सुधारणा आधी व्हाव्यात, या विषयी कळकळीचे आवाहन केले. त्याच्या मते राजकीय जिव्हाळ्याच्या विषयांवर भाषणे करुन, अनेक जण अल्पावधीतच प्रसिद्धीच्या प्रकाश झोतात येतात. पण अशाच व्यक्ती समाजिक हिताच्या गोष्टींवर दुबळ्या होतात, क्षीण भासतात. सामान्य जनतेला सुद्धा राजकीय गोष्टींमध्ये जास्त रस आहे. राजकीय पुढाऱ्यांच्या क्षुल्लक यशाचे मोठे प्रस्ताव मागविले जाते आणि समाजसुधारकांच्या क्षुल्लक चुकांना महान गुन्हा असल्याचे भासविले जाते आणि वेळोवेळी त्यांना नकारात्मक दृष्टीकोनातून बघितले जाते.

रानडेंना असे प्रकर्षाने वाटत होते की स्वराज्य येण्यापूर्वी सामाजिक सुधारणा झाल्याच पाहिजेत. राजकीय चळवळीबाबत अती उत्साही असणाऱ्याना त्यांनी वेळोवेळी ताकीद दिली. समाजाच्या स्वास्थ्यासाठी राजकीय-सामाजिक विविध अंगांमध्ये एकोपा असला पाहिजे असे त्यांना वाटे. ते म्हणत, तुम्ही एक आदर्श समाज व्यवस्था स्थापन करु शकत नाही, जेव्हा तुम्ही राजकीयदृष्ट्या क्षीण असता त्याचप्रमाणे तुम्ही तुमची राजकीय हक्क ही बजावू शकत नाही. जर तुमची समाज व्यवस्थाच तकलादू आणि कमकुवत असेल तर तुमची अर्थव्यवस्थाही समर्थ होऊ शकत नाही. तोपर्यंत अर्थव्यवस्थेची तत्त्वे पोकळ असतील आणि नुसतेच भावनेच्या आहारी जाऊन सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक प्रश्न सोडविता येत नाही.

इ.स.१८७१ मध्ये रानडे प्रथम दर्जाचे सहाय्यक न्यायमूर्ती म्हणून पुण्यात नियुक्त झाले होते. परंतु त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्यामुळे त्यांना उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बनायला, तब्बल तेवीस वर्षे लागली. रानडे हे पदवीधारकांचे युवराज म्हणून प्रसिद्ध होते. अनेक सामाजिक-राजकीय संस्थांशी ते निगडीत होते. एकोणिसाव्या शतकात, सरकारी कर्मचाऱ्यांवर, सामाजिक क्षेत्रात काम करण्यास वा सरकारच्या विविध धोरणांवर मत प्रदर्शित करण्यास कोणताही अटकाव नव्हता. रानडेंनी या सवलतीचा उपयोग करुन अनेक सामाजिक विषयांवर मुक्तपणे टिकाटिप्पणी केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ते एक संस्थापक होते. प्रार्थना समाजाचे आघाडीचे कार्यकर्ते होते. त्यांनी विवाहयोग्य संमती वयाच्या मुद्दयावर टिळकांसोबत कार्य केले. औद्योगिक संमेलन आणि औद्योगिक प्रदर्शन यांच्याशी ते संबंधित होते. त्याही पेक्षा सामाजिक परिषदे (Social Conference)चे ते आघाडीचे नेते व सामाजिक सभेचे पुरस्कर्ते होते. इ.स.१८७४ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी रानडे ही अशी एक व्यक्ती होती, जिने भारतात जबाबदार सरकारची मागणी केली. त्यांच्यासाठी समाजसुधारणा हा एकमेव जिव्हाळ्याचा विषय होता.

६.३.७ न्या. रानडेंचा उदारमतवाद :

न्यायमूर्ती रानडे, सत्येन्द्रनाथ, रविंद्रनाथांचे जेष्ठ बंधू लालशंकर आणि उमिया शंकर आणि इतर यांनी भारतीय समाजातील बत्तीस मुद्द्यांची यादी बनवली. जे त्यांच्यासाठी फार महत्त्वाचे वाटत होते आणि सुशिक्षित व्यक्तिमध्ये त्या यादीचे वाटप केले व त्यांच्या विचारांची मागणी केली. त्या यादीमध्ये सामाजिक, शैक्षणिक प्रतिक्रीयांचे धार्मिक व मानवतावादासंबंधी मुद्दे होते.

एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाज व्यवस्थेचे चित्रच त्यात उमटले होते. त्या यादीत स्त्री शिक्षण, दारु व व्यसन मुक्ती व बंदी, हिंदु मस्लिम दंगे, बालविवाह, विधवांचे दारुण प्रश्न, हुंडा बंदी, मागासलेल्या व्यक्तीचे शिक्षण, समुद्रयात्रा आणि त्याच प्रकारच्या बंदी इ. होते. परंतु यादीत मुलभूत मुद्दे उदा. जाती-व्यवस्थेचे निर्मूलन, अस्पृश्यता निर्मूलन आणि स्त्रियांसाठी समान हक्क इ. नव्हते. त्यांमध्ये धाडसी दृष्टीकोन नव्हता. परंतु महाराष्ट्रीयन लोकांची गेल्या शतकातील अगदी क्षुल्लक सामाजिक दुष्टप्रवृत्तीच्या बाबतीतील सुधारणाही निराशाजनकच होती.

रानडेंच्या स्वातंत्र्यवादाने समाजावर फार मोठा परिणाम केल्याचे दिसून येते. प्रा. डि. के. कर्वे आणि डॉ. बी. आर. आंबेडकरांना समाजकार्यासाठी प्रवृत्त करु शकले. रानडेंच्या १०१ व्या जयंतीच्या निमित्ताने, पुणे डेक्कन सभेत, डॉ. आंबेडकर बोलले होते की रानडेंच्या कार्याचे महत्त्व हे त्यांनी ज्याप्रकारे सामाजिक हिताच्या मुद्द्यांची निवड केली व त्याना साध्य करण्यासाठी, ज्या मार्गाचा अवलंब केला, त्यात आहे. इतिहासकार किंवा शिक्षण तज्ञ म्हणून नव्हे तर ते एक समाज सुधारक म्हणून जास्त प्रसिद्ध होते. रानडे महान समाजसुधारक होते कारण त्यांनी सारे आयुष्य समाज सुधारणेच्या कार्यास वाहून घेतले.

६.३.८ दख्खन सभा आणि रानडेंचा उदारमतवाद :

इ.स.१८९६ मध्ये एम.जी. रानडेंनी डेक्कन सभेची स्थापना केली तेव्हा भारतीय उदारमतवादाने ठराविक आकार घेण्यास सुरुवात केली होती. त्यांना आधुनिक व मुक्त विचारांवर, सभेची स्थापना करावयाची होती आणि इ.स.१८७० मध्ये स्थापित झालेल्या सार्वजनिक सभेशी कोणत्याही प्रकारचा वाद घालायचा नव्हता. ते लिहितात, उदारमतवाद आणि आधुनिकता हे असोसिएशनचे कानमंत्र राहतील. उदारमतवाद याचा अर्थ कोणत्याही जाती-धर्म संप्रदायाच्या पूर्व संकल्पनांपासून मुक्ती आणि व्यक्तीच्या विकासासाठी पूर्ण समर्पित आणि न्यायप्रविष्टता किंवा न्यायव्यवस्थेचा आदर. परंतु कायद्यासमोर सर्वजण एकच आहेत. राजकीय घडामोडींना महत्त्व आणि हे सर्व मुद्दे प्राप्त झाल्यावर शिक्षणावर भर देणे. त्यासाठी समाजात जागृती करणे. विकासाचा वेग खूपच मंद होता. परंतु प्रत्यक्षात सुधारणा होण्यासाठी विकासाची गती मंदच हवी. हे थोडक्यात पण महत्त्वाचे असे रानडे व त्यांच्या सहकाऱ्यांचे सुधारणा प्राप्त करावयाचे मुद्दे.

आपली प्रगती तपासा :-

१) प्रार्थना समाजाबाबत रानडेंचे कार्य लिहा.

२) काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनातील सामाजिक परिषदचे कार्य सांगा ?

६.४ समारोप

दलितांप्रमाणेच,स्त्रियांची परिस्थितीही अत्यंत हालाखीची होती. शिक्षणाच्या अभावी व पुरुष प्रधान संस्कृतीमुळे, त्यांच्यावर अनेक अत्याचार होत. महाराष्ट्र ब्रिटीश राजवटीच्या अखेरीस स्त्रियांवरचे अन्याय शिगेला पोहचले होते. वाईट चालीरिती, अंधश्रद्धा यांना त्या बळी पडत होत्या.

स्त्रियांवरील अन्याय कमी करण्याच्या कामी ख्रिस्ती मिशनरी व पाश्चिमात्य शिक्षित सुधारकांनी फार महत्त्वाची कामगिरी बजावली.

महादेव गोविंद रानडेंच्या विधवा पुनर्विवाहाच्या मुद्यावरुन अत्यंत वाद उसळला. प्रार्थना समाजाचे ते आघाडीचे कार्यकर्ते होते. सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सामाजिक परिषद (Social Conference) भरविली व महत्त्वपूर्ण योगदान भारताच्या समाजसुधारणा चळवळीत दिले.

६.५ प्रश्न

१) स्त्रियांच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्रात कोणकोणत्या प्रकारच्या सुधारणा झाल्या याचे विश्लेषण करा.

२) एम. जी. रानडेंनी कोणते महत्त्वाचे सामाजिक बदल घडविले त्याबाबत परिक्षण करा.

❖❖❖❖

७

सामाजिक सुधारणा - (ब)

घटक रचना :

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ महात्मा जोतीराव फुले
७.३ गोपाळबाबा वलंगकर
७.४ विठ्ठल रामजी शिंदे
७.५ शाहू महाराज
७.६ समारोप
७.८ प्रश्न

७.० उद्दिष्ट्ये

१. महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य, सत्यशोधक समाज आणि सार्वत्रिक मानवतावाद समजून घेणे.
२. गोपाळबाबा वलंगकर यांचे कार्य आणि अनार्य दोष परीहार मंडळ यांचा अभ्यास करणे.
३. 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन ऑफ इंडीया' आणि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे आकलन करणे.
४. वेदोक्त प्रकरण आणि शाहू महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकणे.

७.१ प्रस्तावना

दलित समाजाच्या उद्धारासाठी महात्मा फुले हे अग्रेसर होते. गोपाळबाबा वलंगकर, वि.रा. शिंदे, शाहू महाराज यांनी जाति व्यवस्थेविरुद्ध काम केले. समाजातील भेदभाव अंधश्रद्धा आणि निरक्षरता यांचे त्यांना उच्चाटन करावयाचे होते. विविध संस्थांशी ते निगडीत होते आणि थोड्या फार फरकाने सर्वांनीच त्यांचा उद्देश साध्य केला होता.

७.२ महात्मा ज्योतीराव फुले (इ.स.१८२७-१८९०)

महाराष्ट्रातील समाजसुधारकांमध्ये महात्मा फुले यांचे स्थान वरचे आहे. इ.स.१८२७ मध्ये माळी समाजात जन्मलेल्या फुलेंना सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांना तोंड द्यावे लागले. स्कॉटीश मिशन हायस्कूलमध्ये शिकत असताना ते ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या संपर्कात आले आणि थॉमस पेनच्या 'मानवी हक्क' (Rights of Man) या पुस्तकाने ते भारावले. इ.स.१८४७

मध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर सरकारी नोकरी न करता, स्वतंत्रपणे भवितव्य घडवायचा त्यांनी निर्णय घेतला.

इ.स.१८४८ मध्ये समाजातील विषमता मुख्यत्त्वे ब्राह्मणांनी चालवलेली छळवणूक आणि मानहानी यांनी ते व्यथित झाले. त्यांच्या एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या मिरवणुकीत त्यांना अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळाली. केवळ ते खालच्या जातीतले असल्यामुळे ही वागणूक मिळाली होती. ह्या घटनेनंतर ज्योतीराव फुल्यांनी समाजातील जातिव्यवस्थेची विषवल्ली उखडून टाकण्याचा निर्णय घेतला. समाजातील दलित आणि स्त्रियां यांच्यावर वर्षानुवर्षे अन्याय, अत्याचार होत आला होता. त्यांच्या पुनर्उत्थानासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले. त्या दलित, मागासलेल्या समाजाला जोपर्यंत शिक्षण मिळत नाही. तोपर्यंत त्यांची सुधारणा होणार नाही, याची त्यांना जाणीव होती. म्हणून काही पुरोगामी मित्रांच्या मदतीने, सामाजिक रोषाला न जुमानता इ.स.१८४८ मध्ये पुण्यात सर्वधर्मांच्या मुलींसाठी शाळा सुरु केली. भारतामध्ये शाळा उघडण्याचे श्रेय आपण ख्रिश्चन मिशनऱ्यांना देतो. परंतु मुलींसाठी शाळा सुरू करणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा ज्योतीराव फुले होते. त्यांनी स्वतःच्या पत्नी सावित्रीबाई यांनाही शिकवायला सुरुवात केली जेणेकरुन, त्या ह्या कार्यात हातभार लावू शकतील. इ.स.१८५१ मध्ये त्यांनी अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरु केली आणि दुसऱ्या वर्षी, महार, मांग आणि इतर दलित जाती-जमातींच्या शिक्षणासाठी संस्था उभारली.

जातीव्यवस्थेमुळे समाजात पराकोटीची विषमता पसरली आहे, एखाद्याची जात ही त्यांच्या कर्माने ठरावी जन्माने नव्हे असे त्यांचे ठाम मत होते. ब्राह्मण, मराठ्यांनाही शूद्र लेखायचे पण मराठे इतर जाती-जमातींना अति-शूद्र लेखायचे. परंतु फुल्यांना जाती-जातींमधील कोणत्याही प्रकारचा भेदभाव एक प्रकारचा सामाजिक शापच वाटे आणि म्हणूनच ब्राह्मणेत्तर जातीजमातीतील लोकांना, ज्ञानाच्या आणि विकासाच्या मार्गापासून वंचित ठेवणाऱ्या ब्राह्मण समाजाविरुद्ध त्यांनी उघडउघड बंड पुकारले. ब्राह्मण समाजाला त्यांनी धोकेबाज आणि दांभिक म्हटले आणि ब्राह्मणेतर समाजाने एकत्रितपणे या अन्यायाला तोंड दिले पाहीजे असे सांगितले.

हिंदू धर्मशास्त्राचा आपल्या सोयीनुसार विपर्यास केल्याचा आरोप फुल्यांनी ब्राह्मणांवर लावला आणि अज्ञानी अशिक्षित लोकांना नको त्या समजुती आणि अंधश्रद्धेत जखडून टाकले. खरेतर शूद्रच या मातीचे खरे पुत्र आहेत आणि ब्राह्मण हे परकीय आहेत. ज्यांनी शुद्रांची वर्षांनुवर्षे छळवणूक व पिळवणूक चालवलेली आहे. त्यांनी 'ब्राह्मणाचे कसब' पुस्तक आणि 'गुलामगिरी' या पुस्तकातून, ब्राह्मणांच्या अत्याचाराचे पाढे वाचले. त्यांनी सगळ्या ब्राह्मणांच्या पुस्तकांचा बहीष्कार केला. ज्यामध्ये शूद्रांना ब्राह्मणांचे सेवक, गुलाम म्हटले आहे. जो कोणी त्यांना बंधुत्वाने वागणूक देईल, मग तो परकीय असला तरी चालेल, तो त्यांचा बंधू ठरेल असे त्यानी सांगितले.

७.२.१ सत्यशोधक समाज :

इ.स.१८५७ चा उठाव होईपर्यंत ज्योतिबा फुले यांचा ब्रिटीश संसदीय कार्यपद्धतीला पाठींबा होता आणि सामाजिक बदल लवकर होतील असाही विश्वास होता. परंतु इ.स.१८५७ च्या उठावानंतर ब्रिटीशांनी सामाजिक क्षेत्रात तटस्थ राहण्याची भूमिका घेतली आणि सामाजिक सुधारणांचाही वेग कमी होऊ लागला. अनेक समाजसुधारक गरीब शेतकरी कारागीरांबद्दल उदासीनच होते. त्या सगळ्या परिस्थितीचा अभ्यास करता समाजातील दुर्लक्षित घटकांना ज्ञान मिळवून देऊन आणि त्यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी संख्या उभी करावी असा

विचार त्यांच्या मनात आला. इ.स.१८७३ मध्ये शूद्रांच्या उत्थानासाठी हजारो वर्षापासून ब्राह्मणांच्या गुलामगिरीची कल्पना त्यांच्या मनातून काढून टाकण्यासाठी आणि क्षुद्र जातींसाठी घालण्यात आलेली अनेक धार्मिक सामाजिक बंधने झुगारुन देण्यासाठी एक नवीन संस्था उभारावी असे त्यांना वाटू लागले. त्यानुसार २४ सप्टेंबर १८७३ रोजी फुले आणि त्यांचे सहाय्यक यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या संस्थेचा उद्देश, शूद्र आणि अतिशूद्र यांना ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा होता. संस्थेच्या सर्व सभासदांनी, सर्वजण देवाची लेकरे आहेत आणि त्या देवाची प्रार्थना करायला कुठल्याही मध्यस्थाची जरुरी नाही अशी कल्पना बिंबवली. संस्थेचे सभासदत्व कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्तीसाठी खुले होते. सत्यशोधक समाज फक्त माणूसकी धर्म मानतो. सत्यावर विश्वास ठेवतो आणि धर्मग्रंथ हे अतीपवित्र आहेत अशी समजूत पूर्णपणे नाकारतो. मूर्तीपूजा ही संस्थेला अमान्य होती आणि चातुर्वर्णांचा सत्यशोधक समाजाने जाहीरपणे धिक्कार केला.

सामाजिक आणि धार्मिक कार्यात, स्त्री-पुरुष हे समान असायला पाहिजेत. केवळ लिंगानुसार माणसांमध्ये भेदभाव करणे हे पाप आहे. समाजामध्ये एकोपा नांदावा आणि समाजामध्ये एकमेकांविषयी बंधुत्व, समानता आणि स्वातंत्र्याची भावना निर्माण व्हावी असे त्यांना वाटे. धार्मिक दांभिकपणा आणि आक्रमक राष्ट्रीयत्त्वाची भावना या दोघांच्याही ते विरुद्ध होते. अशा प्रवृत्तींमुळे कोणताही विकास साधणार नाही उलट नुकसानच होईल असे त्यांना वाटे.

इ.स.१८७४ च्या सुरुवातीला फुलेंनी संस्थेची एक शाखा मुंबई येथे सुरु केली आणि तीन वर्षानंतर 'दीनबंधू' नावाचे साप्ताहीक सुरु केले. नारायण मेघाजी लोखंडे, फुलेंचे अत्यंत जवळचे मित्र व सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते या साप्ताहीकाचे संपादक होते. या साप्ताहिकाच्या माध्यमातून कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या समस्या व त्यावर उपाय मांडण्यात येऊ लागले. ते एक अग्रणी कामगार नेते होते.

इ.स. १८७७ मध्ये फुलेंनी पुण्याच्या महानगरपालिकेतील नियुक्त सदस्य म्हणून महाराष्ट्रातील ओल्या दुष्काळाने ग्रस्त असलेल्या भागास मदत केली. सत्यशोधक समाजाच्या कृपेने व्हिक्टोरीया अनाथाश्रम सुरु झाले. दीनबंधूच्या माध्यमातून, गरीब शेतकऱ्यांचे कामगारांचे प्रश्न सतत मांडले जायचे. खरेतर ज्योतीराव फुले आणि त्यांचे मित्र लोखंडे हे गरीब शेतकऱ्यांना व कामगारांना एकत्र करुन त्यांचे प्रश्न सोडविण्याच्या कार्यात अग्रेसर होते.

सत्यशोधक समाजाचे मूलतत्त्व ब्राह्मणांच्या विरोधी होते. कर्मठ ब्राह्मणांनी याविरुद्ध आवाज उठविला. विष्णूशास्त्री चिपळूणकर सारखा जहाल टिकाकार त्यांना मिळाला. चिपळूणकरांनी त्यांच्या निबंधमालेत फुलेनां कुत्सितपणे क्षुद्र धर्म गुरु, शूद्रांचा धर्मसंस्थापक, शूद्रांचा जगत् गुरु असे संबोधले व जो केवळ ब्राह्मणांविरुद्ध लिखाण करुन पाने भरतो आहे असे म्हटले. परंतु फुलेंची चळवळ ही राजकारणापासून दूरच राहीली. इ.स.१८८५ मध्ये फुलेंनी ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, सार्वजनिक सभा आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस हे समाजातील तळागाळातील माणसांचे प्रश्न सोडविण्यास असमर्थ आहेत असा आवाज उठविला आणि फुलेंचे बंड अधिक प्रखर झाले. त्यांच्या मते, अशा संघटनांमध्ये फक्त ब्राह्मणांचेच वर्चस्व असल्याने संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करण्यास त्या लायक नाहीत असे त्यांचे ठाम मत होते. तसेच सरकारविरोधातही ते निर्भीडपणे टीका करीत. उदाहरणार्थ, लिटनचे, स्थानिक भाषेतील

वृत्तपत्रावरील निर्बंधांविरुद्ध त्यांनी निर्भीडपणे प्रतिकार केला आणि पुणे महानगरपालिकेतर्फे होणारा व्हाईसरॉयचा सार्वजनिक सत्कार सोहळा रद्द केला.

सत्यशोधक समाजाचा ब्राह्मणांविरुद्धचा लढा हा कोण्या एका ब्राह्मणाविरुद्ध नव्हता तर संपूर्ण धर्मव्यवस्थेविरुद्ध होता ज्यात ब्राह्मणांना सर्व सामाजिक, सांस्कृतिक कार्यात वर्चस्व बहाल केले होते. फुलेंचे संबंध ब्राह्मण समाजसुधारक मुख्यत्वे न्यायमूर्ती रानडे यांच्याशी अत्यंत सलोख्याचे होते. ते त्यांच्या सर्व कार्यक्रमात भाग घ्यायचे. ते अत्यंत न्यायनिष्ट होते. ब्राह्मण आणि श्याहाण्णव कुळी मराठा जातींच्या लोकांनी समाजातील इतर जाती जमातींची चालवलेली पिळवणूक त्यांना मान्य नव्हती. श्याहाण्णव कुळी मराठा जातीच्या लोकांनी कुणबी समाजाची परवड केली होती. मॅथ्यू लेडर्ले (Mathew Lederle) याने म्हटले आहे, ''ज्योतिबा फुलेंचा जातिविरोधी लढा आणि त्यांचा दृष्टीकोन अत्यंत व्यापक होता कारण जातिविषयी भेदभाव फक्त ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर असाच नव्हता तर मराठा, शूद्र, अतीशूद्र, अस्पृश्य असाही होता. परंतु जातीव्यवस्थेचा पगडा जनमानसावर इतका घट्ट होता की सत्यशोधकच्या अंतर्गत त्याचे प्रत्यंतर जाणवू लागले. जर आपण सर्व एकाच देवाची लेकरं आहोत तर ठराविक जातीचे लोक श्रेष्ठ आणि ठराविक जातीची लोक शूद्र असा भेदभाव का? असा प्रश्न ते विचारीत.''

एक सामाजिक आणि धार्मिक संस्था म्हणून सत्यशोधक समाजाची तेव्हाच्या प्रतिष्ठित संघटनांशी तुलना होऊ लागली. गेल ऑम्वेट (Gail Omvedt) म्हणतात की ब्राह्मो समाज आणि प्रार्थना समाज हे सर्वधर्म समावेशक आणि तर्कशुद्ध विचारसरणीचे होते. आर्य समाज हा समाजातील सर्व स्तरांना घेणारा असा होता. सत्यशोधक समाजामध्ये वरील सर्व गुण होते पण त्याचे स्वरुप हे तळागाळातील दलित समाज जास्त आणि उच्चभ्रू ब्राह्मण समाज कमी असे होते. तसेच फक्त मराठी भाषिकांपुरताच तो मर्यादीत होता. सत्यशोधक समाजाच्या मूलगामी विचारधारेमुळे समाजामध्ये असंतोष पसरु लागला मुख्यत्वे सुशिक्षित ब्राह्मणेतर समाजामध्ये.

त्यांच्या समकालीन समाजसुधारकांप्रमाणे उदा. दादोबा पांडुरंग, जांभेकर, लोकहितवादी, भांडारकर, रानडे, विष्णुशास्त्री पंडीत आणि आगरकर या प्रमाणे ज्योतिबा फुले हे कर्ते सुधारक होते. अनेक शतकांपासून चालत आलेले, समाजातील तळागाळातील दलित जनतेचे हाल, त्यांची पिळवणूक, शोषण हे थांबविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अतुलनीय होते. त्यांचे मुख्य कार्य हे दलित जनतेला जागृत करुन वर्षांनुवर्षे जे असंबंध, अशास्त्रीय धर्मग्रंथातील नियम पुढे करुन जे दलितांवर अत्याचार चालले होते त्याचे उच्चाटन करणे हे होते. व्यक्तीमधील अस्मिता जागृत करुन समाजामध्ये सामाजिक, धार्मिक बाबतीत एकोपा, समानता आणण्याचे त्यांचे प्रयत्न असाधारण होते. आजपर्यंत विविध जाती जमातीत विभागलेला हिंदू समाज हळूहळू एक व्हायला लागला होता. त्यातच त्यांच्या कार्याचे महत्त्व आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे २८ नोव्हेंबर १८९० मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर ज्यांनी संपूर्ण आयुष्यभर समाजातील तळागाळातील लोकांच्या उत्थानासाठी कार्य केले त्यांच्या कार्याची संभावना 'हिंदू धर्म विभाजक' अशी करण्यात आली. समाजातील दांभिकतेवर त्यांनी जे टिकास्त्र उभारले होते, त्याची जराही कदर करण्यात आली नाही. अगदी नंतरच्या काळात सुद्धा, समाजात एकोपा आणि बंधुत्व नांदण्यासाठी आयुष्यभर त्यांनी जे प्रयत्न केले ते दुर्लक्षितच राहीले. परंतु सद्य अभ्यासाअंती असे निष्पन्न होते की महात्मा जोतीराव फुले हे

समाजसुधारणेच्या अनेक क्षेत्रात अग्रगण्य होते. त्यांच्या समकालीन समाजसुधारकांमध्ये, महात्मा फुल्यांचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे. त्यांचे सत्या प्रती आणि न्याया प्रती प्रेम वादातीत होते.

महात्मा जोतीराव फुले हे प्रथम भारतीय होते ज्यांनी आधुनिक भारताच्या इतिहासात अतिसामान्य माणसांसाठी आणि स्त्रियांसाठी प्रगतीचे, विकासाचे नवे दालन उघडले. जोतीराव फुलेंनी महाराष्ट्रामध्ये अस्पृश्यासाठी आणि मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. धनंजय कीर म्हणतात, ''फुलेंची प्रामाणिकपणावर अखंड श्रद्धा होती. समाजासाठी आयुष्य वेचणारी आधुनिक भारतातील अशी ती पहिली व्यक्ती होती. माणुसकी, सत्य आणि समानता या त्रिसुत्रींवर त्यांचा भर होता. महाराष्ट्राच्या ह्या महान समाजसुधारकांने भारताच्या इतिहासात एक सुवर्णपान लिहले आहे.''

७.२.२ महात्मा फुलेंचा सार्वत्रिक मानवतावाद :

महात्मा फुले यांचा मानवतावाद त्यांच्या कार्यातून व ग्रंथातून प्रतित होतो. त्यांना त्यांचे कार्य, विचार जनतेपर्यंत पोहोचवायचे होते. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकाद्वारे त्यांनी सत्याचा खरा अर्थ आणि तर्कशुद्ध अनुमान काढण्याची पद्धत विशद केली. महाभारतातील तर्कहीन अशास्त्रीय विचारांवर त्यांनी टिकेची झोड उठविली ज्यांनी सामान्य जनतेची विचार करण्याची प्रक्रीया अगदी ठप्प करुन टाकली होती. त्यांना फक्त शास्त्रीय कारणमीमांसा करायची होती.

फुलेंच्या दृष्टीने धर्म म्हणजे मनुष्य आणि देव यांचे परस्परामधील स्वच्छ पारदर्शक नाते होय. देवासाठी सर्वजण समान. परंतु काही दांभिक लोकांनी, स्वतःच्या फायद्यासाठी देवाच्या नावाखाली समाजात भेदभाव सुरु केले, ज्यामुळे समाजात विषमता पसरली आणि सत्य नष्ट झाले. तेव्हा खरे सत्य प्रकाशात आले पाहीजे म्हणजे समाजाला लागलेली ही जाती व्यवस्थेची विषवल्ली आपोआपच उखडून टाकली जाईल, असे त्यांना वाटे.

फुलेंनी वर्ण-धर्म या पद्धतीवर टिका केली. एखाद्याचा व्यवसाय त्याच्या जातीनुसार वर्णानुसारच ठरतो ही पद्धती त्यांना मान्य नव्हती. त्यांच्या मतानुसार समाज खऱ्या अर्थाने तेव्हाच सुधारेल जेव्हा आपणाला खरा धर्म समजेल. धर्मामधील त्यांची आवड ही धर्माची शिकवण किंवा तत्त्वप्रणाली जाणून घेण्यासाठी नव्हती तर तळागाळातील दलित समाजाचा विकास कसा साधता येईल यासाठी होती.

देशासंबंधीच्या त्यांच्या कल्पना विचार यांवर ख्रिश्चन धर्माचा प्रभाव दिसतो तर देवाच्या अद्वैताविषयीचा विचार प्रार्थना समजातून घेतलेला दिसतो. सर्व स्त्रीपुरुषांसाठी त्यांनी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. माणसाला गुलाम आणि स्त्रियांना हलक्या दर्जांची वागणूक देणाऱ्या धर्माच्या चुका आणि त्रुटींवर त्यांनी कडक टिका केली. अशा अनिष्ठ चालीरितींच्या विरोधात त्यांनी प्रतिकार केला. ते म्हणतात, शूद्रांसाठी प्रत्येक गावागावात शाळा पाहीजे. फक्त शिक्षणच त्यांना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करु शकतो.

आपली प्रगती तपासा :-

१) सत्यशोधक समाजाचे महत्व थोडक्यात सांगा.

७.३ गोपाळबाबा वलंगकर व अनार्यदोष परिहार मंडळ

महात्मा ज्योतिबा फुले, गोपाल गणेश आगरकर, न्यायमूर्ती म.गो. रानडे यांच्या प्रमाणेच गोपालबाबा वलंगकर हे सामाजिक कार्याने भारावले. ते समाजसुधारक होते. हिंदू समाजातील जाती-व्यवस्था, अनिष्ठ चालीरितींना आळा बसावा असे त्यांना वाटे. त्यांच्या कार्यासंबंधीची माहीती आपणाला एकोणीसाव्या शतकाच्या मध्यानंतर प्रसिद्ध झालेल्या नियतकालीकांमधून आणि विशेषत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखाणातून मिळते.

रत्नागिरी जिल्ह्याच्या दापोली तालुक्यात त्यांचा जन्म झाला. महाराष्ट्राच्या भक्ती साहित्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यांना आदराने हरीभक्त परायण असे संबोधले जाई. सामान्य जनतेत त्यांना गोपाळबाबा किंवा गोपाळ बुवा असे संबोधले जायचे. बाबा आणि बुवा यांच्या अर्थ एकच होतो. जरी त्यांचा जन्म अस्पृश्य महार जातीत झाला असला तरी समाजामध्ये त्यांच्या वाट्याला कधीही अपमान किंवा नामुष्की आली नाही. त्यामुळे जातीव्यवस्थे विरुद्ध कडक टीका करण्याची वेळही आली नाही. त्यांची समाजात ओळख एक 'संत' म्हणूनच होती. मनपरिवर्तन आणि विचार विनिमय यातूनच अस्पृश्यतेचा कलंक जाऊ शकतो असे त्यांना वाटे.

गोपाळबुवांनी अनार्यदोष परीहार मंडळाची स्थापना केली. मंडळाच्या नावाची निवड समपर्क होती. अनार्य होण्याच्या नात्याने जो कलंक, डाग त्यांना लागलेला होता तो त्यांना धुवून काढायचा होता. त्या काळात ऐतिहासिक शोध हा अगदी नवीन होता. महात्मा फुलेंनी त्यांच्या गुलामगिरी या पुस्तकात आर्यांचे पूर्वज हे भारताबाहेरील आहेत ज्यांना ब्राह्मण म्हटले जाते असे विश्लेषण केले होते.

७.३.१ गोपाळबुवांचे कार्य :

डॉ. आंबेडकर म्हणतात, की समाजसुधारणेच्या अनेक संस्थांपैकी, अनार्यदोष परिहार मंडळ ही महाराष्ट्रातील आद्यसंघटना आहे. गोपाळबुवांनी मुंबई प्रांतामध्ये फिरुन या मंडळाच्या अनेक शाखा उघडल्या. त्यांचा मुख्य उद्देश हा दलित समाजाला जागृत करणे होता. अनेक स्तरांमध्ये ते फिरले वावरले, त्यांच्या कार्याची ओळख लोकांपर्यंत पोहचली. मुंबई पुण्यामध्ये फिरताना ते समाज जागृतीची एकही संधी सोडत नसत. संस्थेच्या स्थापनेनंतर त्यांनी एक प्रश्नावली बनवून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला पाठविली. त्यांच्या मतानुसार, ''कोणताही सामाजिक बदल न करता कोणत्या आधारावर कॉग्रेस राजकीय बदल अपेक्षिते ?''

पुण्यात, ज्योतिबा फुल्यांच्या 'दीनबंधू' आणि गो. ग. आगरकरांच्या 'सुधारक' या साप्ताहीकांतून गोपाळबुवा लिखाण करीत. त्यांनी पन्नास प्रश्नांची यादी बनवून विविध संस्थांना आणि व्यक्तींना पाठविली व त्यावर विचारविनिमय करावयास भाग पाडले. त्यांनी त्यावेळच्या महाराष्टाच्या सर्वात उच्च धर्मगुरु शंकराचार्य आणि इतर धर्मगुरुंनाही सार्वजनिक वादविवादासाठी आवाहन केले. इ.स.१८८८ मध्ये विजयादशमीच्या दिवशी त्यांनी एक छोटी पुस्तिका छापली. त्यांचे लिखाण 'अखंड' या नावाने कालांतराने प्रकाशित झाले.

इ.स.१८९३ नंतर कंपनी सरकारने अस्पृश्यांना नोकरीवर घेण्याचे बंद केले. इ.स.१८१८ मध्ये कंपनीच्या नोकरीत असलेल्या महार बटालियनने दुसऱ्या बाजीरावास हरविण्यात फार मोलाची कामगिरी बजावली होती. परंतु आता कंपनीने स्वत:चा पवित्रा बदलला होता व अस्पृश्यांची सैन्य भरती बंद केली होती. गोपाळबुवांनी तातडीने न्यायमूर्ती रानडे यांच्याकडे या विरोधात धाव घेतली. सरकारनेही ह्या बाबतीत लक्ष घातले.

दुसऱ्या बाबतीत गोपाळबुवा दलितांचे नेते होते. अशा अर्थाने की, उच्चकुलीन लोकांनी कधीही त्यांना प्रत्यक्षात जरी पाठींबा दिला नसला तरी अप्रत्यक्षपणे त्यांच्या कार्याला संमतीच होती. तसेच अडीअडचणीला, न्यायमूर्ती रानडेकडे त्यांची बाजू मांडायला गोपाळबुवांचीच मदत होई. गोपाळबुवांच्या मंडळाला सरकारची मान्यता होती. इ.स.१८१८ मध्ये, हिंदूच्या चालीरीती, रुढीपरंपरा या संबंधी माहीती गोळा करताना सर हर्बट रिझले ने गोपालबुवांच्या मंडळालाही एक प्रश्नावली पाठविली होती. डॉ. आंबेडकर गोपाळबुवांना आदराने श्रद्धांजली वाहताना म्हणतात, की दलितांच्या उत्थानाची खरी सुरुवात कोकणातूनच झाली. गोपालबुवांच्या मार्गदर्शनाखाली दलितांमध्ये खऱ्या अर्थाने जनजागृती झाली. त्यांच्या कार्याविषयी अधिक माहिती फुलेंच्या 'दिनबंधू'च्या जुन्या कागदपत्रांमध्ये सुद्धा मिळतात. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना दलित चळवळीतील महत्त्वपूर्ण सुधारक मानले जाते.

आपली प्रगती तपासा :-

१) गोपाळबाबा वलंगकरांचे कार्य थोडक्यात लिहा.

_____

_____

_____

_____

_____

७.४ विठ्ठल रामजी शिंदे (इ.स.१८७३-१९४४)

आतापर्यंत आपण बघितले की, महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी उदा. बाळशास्त्री जांभेकर, लोकहीतवादी गोपाळ हरी देशमुख,भांडारकर, न्यायमूर्ती रानडे आणि ज्योतिबा फुले, गोपाळबाबा वलंगकर यांनी राजकीय बदलापेक्षा सामाजिक बदलावर जास्त भर दिला. फुले आणि आगरकरांनी राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर ते टिकवून ठेवण्यासाठी समाजामध्ये सामाजिक, वैचारिक फेरफार होणे फार गरजेचे आहे असे त्यांना वाटे. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्यानंतरही राजकीय सत्ता जर काही ठराविक उच्चभ्रू लोकांच्या हातात एकवटली तर सद्य परिस्थितीत

काडीचाही फरक पडणार नाही आणि आतापर्यंतचा दुर्लक्षित समाज अजून रसातळाला जाईल म्हणून फुलेंनी दलितांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न सुरु केले. टिळकांचा मात्र या सगळ्याला विरोध होता. त्यांच्या मते, ''अशा प्रकारचे समाजसुधारक हे केवळ परकी सत्तेच्या हातातल्या कळसूत्री बाहुल्या आहेत. ज्यामुळे बहुसंख्य समाज हा राजकीय उत्थानापासून अलिप्त राहीला.'' भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सुरुवातीच्या काळात बहुतेक नामवंत समाजसुधारक उदा. रानडे वगैरे, स्वातंत्र्य चळवळीचा भाग होते. पण जसजशी राष्ट्रीयत्वाची चळवळ ही काहीशी कर्मठ होत गेली. उदा. लोकमान्य टिळकांसारख्या व्यक्तींच्या हातात एकवटली जाऊ लागली तसतशी १९ व्या शतकाच्या अंतास राजकीय नेते आणि समाजसुधारक यांच्या मधील संबंधामध्ये तेढ येऊ लागली.

महात्मा गांधीच्या राष्ट्रीय पटलावरील आगमनापर्यंत सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रीयत्वाची चळवळ समांतर धावत होत्या आणि हळूहळू शूद्र आणि अतीशूद्र, अस्पृश्य यांच्या हिताचे मुद्दे मागे सारले जाऊ लागले. परंतु एक समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे याने मात्र समाजसुधारक आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना बांधून ठेवण्यासाठी सतत प्रयत्न केले. अखेर, सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा हा वाद मिटवण्यात त्यांना यश मिळाले आणि राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यांचाही प्रश्न हाती घ्यावा, असे ही मत त्यांनी सुचविले.

२३ एप्रिल १८७३ मध्ये शिंदे यांचा जन्म झाला. त्यांचे कुटुंब पुरोगामी विचारांचे होते. स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि पडदा पद्धतीबाबत त्यांचे विचार पुरोगामी होते. कला शाखेतून ते पदवीधर झाले. त्यासाठी त्यांना पुण्याचे वकील गंगाराम म्हस्के यांनी आर्थिक मदत केली आणि त्यानंतर त्यांच्यावर खूष झालेल्या बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी आर्थिक मदत केली. त्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात, त्यांच्यावर जे.एस.मिल, हर्बट स्पेन्सर, आगरकर यांच्या विचारांचा पगडा होता. पदवीनंतर प्रार्थना समाजाचे समाजसुधारक रानडे आणि भांडारकर यांच्या प्रभावामुळे ते प्रार्थना समाजात दाखल झाले. इ.स.१९०१ मध्ये परदेशातून आल्यावर प्रार्थना समाजाची सेवा करेन या अटीवर ऑक्सफर्डला जावयास त्यांना शिष्यवृत्ती मिळाली. ऑक्सफर्ड येथे धर्माधर्मांचा तुलनात्मक अभ्यास त्यांनी केला. परत आल्यावर मुंबई येथे प्रार्थना समाजाचा धर्मगुरु म्हणून सात वर्षे कार्य केले.

७.४.१ भारतीय डिप्रेस्ड क्लासेस मिशन :

प्रार्थना समाजाचे काम करीत असतानाच शिंदे यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'भारतीय डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली. समाजातील अस्पृश्यांचे राहणीमान बदलावे, त्यांना सामाजिक दर्जा मिळावा असा या मिशनचा हेतू होता. प्रार्थना समाज आणि मुंबई प्रांत समाज सुधारणा संघटनेच्या कृपाछत्राखाली ही चळवळ कमी वेळातच महाराष्ट्रात पसरली. शिंदे, त्यांचे कुटुंबिय आईवडील आणि बहीण जनाबाई या सर्वानीच अस्पृश्यांसाठी काम करण्यासाठी शपथ घेतली होती. परंतु प्रार्थना समाजातील कार्यामुळे त्यांना अस्पृश्यांच्या विकासासाठी पुरेसा वेळ मिळत नव्हता. इ.स.१९१० मध्ये शिंदे आणि प्रार्थना समाजाच्या नेत्यांमध्ये अनेक बाबींवरुन खटके उडू लागले आणि त्याचे पर्यवसान शिंदेना कामावरुन कमी करण्यात झाले. त्यानंतर त्यांनी आपल्या मिशनसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

त्याचबरोबर जातिच्या वादामुळे, समाजाच्या एकीला तडा जाऊ नये म्हणून 'सामाजिक न्यायावर' ते जास्त भर देऊ लागले. त्याशिवाय देशाच्या स्वातंत्र्याची लढाई यशस्वी होणे अशक्य

होते. मुंबई प्रांतामध्ये मराठ्यांची संख्या जास्त होती म्हणून मराठा समाजात ऐक्य टिकून राहण्यासाठी मराठा राष्ट्रीय संघाची त्यांनी स्थापना केली. परंतु एवढे प्रयत्न करून सुद्धा मराठ्यांचे दोन गट पडले. एक राष्ट्रवादी मराठा आणि दुसरा सत्यशोधक मराठा, ज्यांना ज्योतिबा फुलेंच्या विचारावर श्रद्धा होती. म्हणून शिंदेनी 'अखिल भारतीय अस्पृश्यता संघ' ही नवी संस्था सुरु केली ज्याद्वारे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी प्रयत्न करता येतील.

इ.स.१९१७ मध्ये श्रीमती ॲनी बेझंट यांच्या मदतीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यता निवारणांचा ठराव पास केला. इ.स.१९१९ मध्ये गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट खाली मुस्लिमांना स्वतंत्र प्रतिनिधित्व दिले. त्याच्या आधारे दलित वर्गासाठीही स्वतंत्र प्रतिनिधित्व असावे यासाठी त्यांनी याचिका सादर केली. अस्पृश्यांमध्ये नव्याने राजकीय पातळीवर जागरुक झालेल्या लोकांना शिंदेची मवाळ मते पटत नव्हती आणि संस्थेच्या हक्क अधिकारासाठी त्यांच्यात कुरघोडी सुरु झाली. म्हणून त्यांनी संस्थेचा कार्यभार अस्पृश्य समाजाच्या नेत्यांना सोपविला.

जेव्हा राष्ट्रीय पटलावर गांधीजींची प्रतिमा एक राष्ट्रीय नेता म्हणून तयार व्हायला लागली होती तेव्हा शिंदे गांधींजींच्या सामाजिक आणि राजकीय विचाराने प्रभावित झाले होते. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कार्याचा त्याग केल्यावर इ.स.१९२३-२४ च्या दरम्यान त्यांनी ब्राह्मो समाजाचा धर्म प्रचारक म्हणून काम बघितले आणि केरळ मधील वायकूम येथे अस्पृश्यांना मंदीर प्रवेशबंदी विरोधात भाग घेतला. त्यानंतर त्यांनी जेधे बंधूच्या इ.स.१९२८ च्या शेती महसूलात वाढ करण्यासाठी, गरीब शेतकऱ्यांवर जो अन्याय होतो त्या विरोधात मदत केली. गांधीजींच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. त्यांना अटक झाली व सहा महीन्यांची शिक्षाही झाली. परंतु त्यांच्या मनाची शांती होत नव्हती. कारण अस्पृश्यांच्या नवीन नेत्यांनी त्यांच्याशी फारकत घेतली होती. २ जानेवारी १९४४ मध्ये देहांत होण्यापूर्वी एक दशक शिंदे हे मनाने, शरीराने, आर्थिकदृष्ट्या पूर्ण खचले होते. ज्यांच्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्याचा सगळा मौल्यवान वेळ खर्ची घातला तेच लोक त्यांना विसरले होते.

विठ्ठल रामजी शिंदे हे महात्मा फुलेंचे खरे अनुयायी होतो. जरी हिंदूं धर्माविषयीच्या काही तत्वांबाबत मतभेद होते, तरीही हिंदू समाजाच्या रचनेमध्ये ब्राह्मण किंवा आर्यांचा वरचष्मा होता, हे त्यांना मान्य होते आणि म्हणून जाति व्यवस्था नष्ट व्हावी यासाठी त्यांचे प्रयत्न होते. तळागाळातील समाजाचे भले व्हावे यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. कुठल्याही इतर कामापेक्षा, दलितांच्या उद्धारावर त्यांचे अधिक लक्ष होते आणि म्हणूनच त्यांनी दलित समाजासाठी दिवस-रात्र शाळा, उपहारगृहे, आरोग्यकेंद्रे सुरु केली. दलितांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक जागृती व्हावी आणि सद्य परिस्थितीला त्यांनी शह द्यावा असे त्यांना वाटे.

डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या अनेक शाखा मुंबई प्रांताबरोबरच मद्रास प्रांतातही सुरु केल्या. एस. नटराजनच्या मताप्रमाणे, ''शिंदेच्या या मिशनने नवीन पिढीसाठी एक वहीवाट बनविली होती.ज्यापासून ते प्रेरणा घेऊन दलित समाजाच्या प्रगतीसाठी खरोखर काही विधायक करु शकतील.''

आपली प्रगती तपासा :-

१) भारतीय डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे कार्य थोडक्यात सांगा.

७.५ शाहू महाराज व वेदोक्त प्रकरण

ब्रिटीश काळातील ५६३ संस्थांनिकांपैकी छत्रपती शाहू महाराज हे एक असे संस्थानिक राजे होते, ज्यांनी सामाजिक सुधारणांचे सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे वंशपरंपरागत चालत आलेली जाति व्यवस्था मोडकळीस काढणे आणि दलितांच्या उत्थानासाठी प्रयत्न करणे. त्यांच्या सुधारणावादी प्रयत्नांमुळे ज्योतिबा फुले आणि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रयत्नांना पाठबळ मिळाले आणि महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ अधिक बळकट व प्रभावी झाली. फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचे आणि मराठा-शूद्र आणि अति शूद्रांच्या उत्थानासाठी चाललेल्या प्रयत्नांचे खरे आधारस्तंभ शाहू महाराजच होते. पण त्यांनी कधीही या दोघांची पूर्ण जबाबदारी स्विकारली नाही. एका लेखकाच्या मते, ''शाहू महाराज कधीही या चळवळीत पूर्णपणे गुंतले नाहीत. या उलट एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात आणि विसाव्या शतकाच्या पहील्या दशकांत त्यांनी ब्राह्मणेतर चळवळीवर जाहिर टिका केली.''

तथापी ही टीका वगळता, शाहू महाराजांनी समाजातील स्त्रिया, दलित, मागासलेल्या वर्गासाठी जे कार्य केलेले आहे ते उल्लेखनीय आहे. धनंजय कीर म्हणतात, त्यांच्या राज्यातील अस्पृश्य आणि काही आदीवासी जातीच्या लोकांना वर्षानुवर्षे गुलामी करावी लागायची. ती पद्धत बंद करुन, त्यांनी त्यांना समान हक्क देऊ केले. स्वतःच्या मानमर्यादेचा विचार न करता, शाहू महाराज अस्पृश्यांबरोबर बसून जेवले आणि समाजासमोर नवा आदर्श मांडला. त्यांना समाजातील भेदाभेद जाती व्यवस्था, असमानता नष्ट करायची होती. त्यांच्या मते जातीव्यवस्थेमुळेच हिंदू समाज दुभंगला होता. मॅथ्यू लेडर्ले म्हणतात ''शाहू महाराज हे फुल्यांने आदर्श मानणारे होते जे दलित मागासलेल्या जनतेसाठी अहोरात्र प्रयत्न करीत होते. शिक्षणाची गंगोत्री तळागाळापर्यंत पोहचविण्याचा ते प्रयत्न करीत होते.''

त्यांच्या राज्यभिषेकाच्या इ.स.१८९४ मध्ये पहील्याच वर्षी त्यांनी गुलामगिरीची पद्धत बंद पाडली. ब्राह्मणेतर समाज शिक्षणाच्या अभावी ब्राह्मणांची मक्तेदारी मोडीत काढू शकत नाही, हे जाणून त्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी खास प्रयत्न सुरु केले. मागास दलित वर्गाला समान हक्क देण्याचा त्यांचा निर्णय पक्का होता म्हणूनच त्यांनी जातीनिहाय वसतिगृह सुरु करण्याच्या निर्णयाला पाठींबा दिला.

इ.स.१९०२ मध्ये त्यांनी इंग्लंड मधून, सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के जागा मागास वर्गासाठी राखीव ठेवण्याविषयी आज्ञापत्र मागविले जेणेकरुन ब्राह्मणांची मक्तेदारी आपसूकच

कमी होईल. उदाहरणार्थ इ.स.१८९४ मध्ये जनरल ॲडमिनिस्ट्रेटीव डिपार्टमेंट मध्ये ७१ पैकी ६० ब्राह्मण होते तर राखीव जागांमुळे इ.स.१९१२ मध्ये ९५ पैकी ३५ ब्राह्मण होते.

जाती व्यवस्थेची पाळंमुळं खणण्याचा आणि ती उखडून टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आयुष्याच्या शेवटी त्यांनी ही जाति-व्यवस्थाच नष्ट झाली तर बरं होईल असे म्हटले आहे. संपूर्ण प्रगतीला आळा घालणारी अशी ती महत्त्वाची धोंड आहे. जातिव्यवस्थेचा पुरस्कार हा एक सामाजिक अपराध आहे असे ते म्हणत. त्यांच्या समकालीन समाजसुधारकांच्या मताप्रमाणे, हिंदू धर्मातील असमानता जर दूर करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे त्यांना वाटे. त्यांनी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या अनेक संस्था सुरु केल्या. शिक्षणातील सुधारणांचे पडसाद ते हयात असतानाच उमटायला लागले होते. उदा. इ.स.१८९४ कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये फक्त ९७ विद्यार्थी होते त्यापैकी फक्त सहा ब्राह्मणेतर होते. इ.स.१९२२ मध्ये २६५ पैकी १०० विद्यार्थि ब्राह्मणेतर होते. त्यांच्या काळात, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण १०,८८४ वरुन २७,८३० पर्यंत वाढले आणि ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांचे प्रमाण ८,०८८ वरुन २१०२७ वर पोहचले. त्यापैकी २,१६२ अस्पृश्य होते. ह्या सर्व आकड्यांवरुन, छत्रपतीशाहूंचे मागासलेल्या व्यक्तीसाठी, शिक्षणाच्या महत्त्वाच्या क्षेत्रासाठी परिणामकारक बदल दिसून येतात. त्यांच्या सरकारकडून ज्या ज्या सरकारी किंवा खाजगी शाळांना अर्थसहाय्य मिळत असे त्यांनी जातीच्या आधारे विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव करु नये, अशा सूचना होत्या.

तसेच सार्वजनिक दवाखान्यात अस्पृश्यांपासून सर्वांना समान वागणूक व उपचार दिले जातील अशी ताकीद दिली होती. अंशतः सत्यशोधक समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज आणि मुख्यत्वे आर्य समाज यांच्या प्रभावामुळे त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या काळात महत्त्वपूर्ण असे सामाजिक कार्य केले. विहीरी आणि पाण्याच्या टाक्या यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा बंद करुन उच्च जातींच्याच मुलांबरोबर त्यांच्याच शाळेत बसण्यास सांगितले.अस्पृश्यांना न्यायशास्त्राचा अभ्यास करण्यास परवानगी देण्यात आली आणि त्यांना वकिलपत्र देऊन आजपर्यंत फक्त उच्च जातींसाठी राखीव असलेल्या जागांवर त्यांची नेमणूक करण्यात आली. त्यांच्या सरकारात कुलकर्ण्यांना (गावाचे हिशेबनीस) बदलून तलाठ्यांना ठेवण्यात आले आणि काही नवीन पदे निर्माण करुन, अस्पृश्यांना नियुक्त करण्यात आले.

ब्राह्मणांनी सहाजिकच या बदलास तीव्र विरोध केला. पण राज्यव्यवस्थेची पाळेमुळे पार ग्रामीण भागापर्यंत जाऊन पोहचली होती. कोल्हापुरच्या या राजाने परंपरागत चालत आलेली वतने आणि बलुते या पद्धतीही बंद करविल्या ज्या द्वारे गावातील उच्चकुलीन जातीतील लोकांकडून महारांना गुलाम म्हणून वागविले जायचे. छत्रपतींनी महार वतनेही बंद करविली आणि ज्या कोणाला प्रतिरोध करावयाचा असेल त्यास दंड होईल किंवा कारावास होईल असे फर्मान सोडले.

शाहू महाराजांच्या कार्याचा फायदा ब्राह्मणेतर आणि मुख्यत्वे मराठा आणि अस्पृश्यांना झाला. ज्योतिबा फुले आणि शाहू महाराजांचे कार्य हे मुख्यत्वे ब्राह्मणांच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेपेक्षा सामाजिक सुधारणा आवश्यक असल्याचे दिसते. परंतु दोघांच्याही कार्यामध्ये फरक होता. गैल ऑमवेड्रट (Gaill Omvedt) च्या मतानुसार, एकाचा दृष्टीकोन हा सामान्य-अती सामान्यांशी निगडीत होता तर दुसऱ्याचा मुख्यत्वे मराठ्यांकडे झुकणारा होता. फुले हे संपूर्णपणे

धर्म-जाति निरपेक्ष होते आणि सामाजिक समानतेचे पुरस्कर्ते होते तर शाहू महाराजांच्या चळवळीला समाजातील उच्चभ्रू लोकांचाही पाठींबा होता.

७.५.१ वेदोक्त व शाहू महाराजांची भूमिका :

वेदोक्त म्हणजे वैदीक-धार्मिक विधी जे फक्त द्विज म्हणजे दोनदां जन्म घेणाऱ्या ब्राह्मणांसाठी किंवा क्षत्रियांसाठी असतात.याउलट, पौराणिक किंवा पुराणोक्त विधी हे सर्वशूद्रांसाठी असतात. (जुन्या काळात वैश्य सुद्धा द्विज म्हणून ओळखले जायचे). या वादाची पार्श्वभूमी, ही ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यातील वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी पूर्वापार चालत आलेला संघर्ष आहे. परंतु, जागेच्या अभावी आपण आपले संवाद फक्त ह्या वादाचे रुपांतर चळवळीत कसे झाले यापुरतेच मर्यादित ठेवूया.

इ.स.१८३७ मध्ये, म्हणजे एकोणिसाव्या शतकात, या वादाला सुरुवात झाली. जेव्हा प्रतापसिंह हे साताऱ्यांचे राजे होते तेव्हा या वादाचे निवारण करण्यासाठी त्यांनी दोन्ही जातीच्या वरीष्ठ मान्यवरांना पाचारण केले. ब्राह्मणांच्या मताप्रमाणे वैदिक धार्मिक विधी, हवन करण्याचे व करवून घेण्याचे अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहेत. उच्चकुलीन मराठा घराणी जशी भोसले, घाडगे, पालकर, जाधव, मोहीते, माने, महाडीक जे जाहीरपणे क्षत्रिय म्हणून ओळखले जातात. त्यांचे वैदिक विधी करण्याचे अधिकार जुन्या दस्तावेजाच्या आणि कागदपत्रांच्या आधारे सिद्ध झाले.

हा वाद पुन्हा इ.स.१८९६ मध्ये बडोदा येथे उत्पन्न झाला जेव्हा महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या महालात होणारे विधी हे पुराणोक्त आहेत हे सिद्ध झाले. ज्योतिबा फुल्यांच्या प्रभावामुळे आणि राजपुतांना येथील काही राजघराण्यात ज्याप्रमाणे वैदिक धार्मिक विधींचा अवलंब करण्यात आला होता. त्याप्रमाणे १५ ऑक्टोबर १८९६ पासून फक्त वेदोक्त विधींचाच अवलंब व्हावयास हवा, अशी आज्ञा महाराजांनी दिली. त्याचे पर्यावसन ब्राह्मणांचा रोष आणि शूद्र आणि अती शूद्र जातींचे सामाजिक, सांस्कृतिक, वैचारीक मंथन होण्यात झाले.

छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा आवाका फक्त कोल्हापूरा पुरताच मर्यादित राहील. परंतु, अस्पृश्यांच्या, शूद्रांच्या विकासासाठी आणि त्यांना वंशपंरापरागत गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी, त्यांच्यात वैचारीक-सांस्कृतिक जागृती निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न या सर्वांचा उपयोग येथे जवळकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या पुढच्या कार्यात झाला आणि म्हणूनच छत्रपती शाहू महाराज हे एक क्रांतीकारी व्यक्तीमत्त्व होते.

७.५.२ वेदोक्त प्रकरण व कोल्हापूरातील घटना :

जेव्हा बडोद्यामध्ये वेदोक्त विधी वरुन वाद उसळता होता त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक ब्राह्मण प्रक्षोभित झाले होते आणि त्यांचे मत सयाजीराव गायकवाडां विरोधी झाले होते. त्याच काळात, तशाच प्रकारची पण त्याहून गंभीर घटना कोल्हापूरात घडली. इ.स.१९०० मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या हे लक्षात आले की, त्यांचा पिढीजात ब्राह्मण केवळ पुराणोक्त मंत्र म्हणतो, वेदोक्त नाही. याबाबत विचारणा करता, ते ब्राह्मण म्हणाले की, ''तुम्ही शूद्र असल्याने तुमच्यासाठी पुराणोक्तच वेदपठण होऊ शकते.'' त्यांच्या असल्या ऊर्मट वक्तव्यामुळे आणि महाराजांना शूद्र म्हटल्यामुळे संतप्त होऊन, त्यांनी यापुढे फक्त वेदोक्तच विधी करावयाची

आज्ञा दिली. यामुळे आंतर-जातीवाद अधिकच उसळला आणि महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ अधिकच प्रखर होऊ लागली.

परंतु शाहू महाराजांच्या पुरोहिताने, महाराजांची आज्ञा पाळण्यास नकार दिला तेव्हा त्यांनी त्याची ईनाम जमीन जप्त केली. शंकराचार्यानेही राजोपाध्यायांना पाठींबा दिला. तेव्हा कोल्हापूरातील शंकराचार्यांची वंशपरांगत वारसा जमिनही जप्त करण्यात आली.

वेदोक्त वादाच्या पाठीमागे राजकीय व सामाजिक समतेचा ज्वलंत यक्ष प्रश्न होता. मराठ्यांच्या मताप्रमाणे, ब्राह्मण आता मराठ्यांमध्येच वादाला सुरुवात करावयास पाहत होते. राजघराणी आणि सामान्य मराठे यांच्यात एकमेकांबाबत असूया, मत्सर याचे बीजारोपण सुरु झाले होते.

ब्राह्मणांनी आपापसातील वाद मिटविला पण कोल्हापुरातील मराठ्यांचे वाद मिटेनात. त्याचा परिणाम सर्वांवर होऊ लागला. शाहू महारांजांनी वेदोक्त-पुराण वाद लवकरात लवकर मिटावावा नाहीतर त्याचे परिणाम चांगले होणार नाहीत आणि संपूर्ण भारतवर्षात याचे पडसाद उमटतील अशी धमकी वजा सूचनाही ब्राह्मणांनी देऊन सुद्धा शाहू महाराजांनी त्यांना दाद लागू दिली नाही आणि याबाबतीत कोणत्याही प्रकारच्या तडजोडीला ते तयार नव्हते.

वादाला नवीन तोंड फुटले. तेव्हा लोकमान्य टिळकांनी असे म्हटले की, शाहू महाराज छत्रपती आहेत या नात्याने त्यांना वेदोक्त विधीस परवानगी मिळेल पण त्यांच्या अन्य कुटुंबिय किंवा संबंधिताना नाही आणि ते केवळ मराठा आहेत म्हणूनही त्याना वेदोक्त विधीस परवानगी मिळू शकत नाही. ह्याचा अर्थ टिळकांच्या मते, मराठाही शूद्रच. शेवटी महाराजांनी ब्राह्मणांना त्यांना वैदिक विधींचे अधिकार आहेत ते मान्य करण्यास भाग पाडले. राजोपाध्याय आणि शंकराचार्य दोघेही जप्त केलेली इनामे वतने जमीन मिळण्यासाठी शरण आले. पण त्यांचा शाहू महाराजांवर काहीही परिणाम झाला नाही. ब्राह्मण्यांविरोधीचे त्यांचे मत अधिकच प्रखर होत गेले.

म्हणूनच, वेदोक्त वादाच्या नंतर, शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर लोकांना राज्यकारभारात आणण्यास सुरुवात केली आणि ब्राह्मणांचे वर्चस्व मोडकळीस काढले. शाहू महाराजांच्या तडाख्याखाली ब्राह्मणांचे जे हाल चालले होते ते पाहून मराठ्यांना फार आनंद झाला. परंतु, गेल ऑम्वेट (Gail Omvedt) म्हणतात, ''नवीन मराठा, जो राज्यकारभारात उतरला होता, जो उच्चकुळातून नव्हता ते समाजामध्ये एकात्मता आणि समानता आणण्यासाठी प्रयत्न करु लागले. जे सत्यशोधक समाजाच्या विचाराने प्रेरित झाले होते. परंतु एका दशकाच्या आतच कोल्हापूर संस्थानात, वेदोक्त विधींबाबतीत अनेक तडजोडी करण्यात आल्या आणि क्षत्रियांनाही जानवे घालण्यास सुरुवात करण्यात आली. पण, तडजोडी व्यतिरिक्त ह्या विधी अत्यंत महत्वाच्या होत्या कारण ह्या ब्राह्मणांनी नव्हे तर ब्राह्मणेतर पुजाऱ्यांनी केलेल्या होत्या.''

आपली प्रगती तपासा :-

१) वेदोक्त प्रकरण म्हणजे काय ते थोडक्यात सांगा.

७.६ समारोप

अशा प्रकारे इ.स.१९०० ते १९२० च्या दरम्यान, तळागाळातील समाजाच्या उत्थानासाठी प्रयत्न करणाऱ्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीने वेग घेतला.

गोपाळबाबा वलंगकर यांनी दलित चळवळीमध्ये भरीव असे योगदान त्यांच्या संस्थेमार्फत दिले. विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या माध्यमातून अस्पृशोद्धाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले. वेदोकतो प्रकरणाचा प्रभाव महाराष्ट्राच्या संपूर्ण राजकिय व सामाजिक पटलावर पडलेला दिसतो. पुढे शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीचा पाया रोवला.

७.७ प्रश्न

१. महात्मा फुले आणि त्यांचा सत्यशोधक समाज यांच्या कार्याचे विश्लेषण करा.
२. गोपाळबाबा वलंगकरांचे कार्य विशद करा.
३. वि.रा. शिंदे आणि त्यांच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कार्याचेचे परीक्षण करा.
४. 'वेदोक्त प्रकरणावर' टीप लिहा.
५. शाहू महाराजांचे ब्राह्मणेत्तर चळवळीचे महत्त्व स्पष्ट करा.

❖❖❖❖

८

उदारमतवाद आणि राष्ट्रवादाचा विकास - (अ)

घटक रचना :

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ दादाभाई नौरोजी यांचे कार्य
८.३ म.गो. रानडे आणि त्यांचा उदारमतवाद
८.४ गणेश वासुदेव जोशी व त्यांचे योगदान
८.५ समारोप
८.६ प्रश्न

८.० उद्दिष्ट्ये

१ आथिक राष्ट्रवादाच्या चळवळीचे स्वरुप समजावून घेणे.
२ दादाभाई नौरोजींच्या कार्याचा अभ्यास करणे.
३ एम. जी. रानडेंचा आर्थिक राष्ट्रवाद अभ्यासणे.
४ जी.व्ही. जोशी आणि त्यांचा आर्थिक राष्ट्रवाद याचे विश्लेषण करणे.

८.१ प्रस्तावना

आपण आतापर्यंत महाराष्ट्राच्या वैचारीक सांस्कृतिक क्रांतीचे प्रवर्तक जांभेकर यांचे कार्य समजावून घेतले. तर्खडकर हे दुसरे समाज सुधारक होते आणि हिंदू धर्मातील सुधारणांवर त्यांनी अधिक लक्ष केंद्रीत केले. देशमुख उर्फ लोकहीतवादींनी केवळ एखाद दुसऱ्या मुद्यावर भर न देता, सर्वच महत्त्वाच्या प्रश्नांवर लक्ष घालण्याचा प्रयत्न केला. परंतु अनेक वर्षानुवर्षे रुढी परंपरांनी बुरसटलेल्या समाजाने हे नवीन बदल सहजासहजी आत्मसात केले नाहीत. तसेच पारंपारीक मराठा घराण्यांना तर सर्व हिंदूस्थानात राजकीय वर्चस्वाची जाणीव होती. यामुळे मुंबई- पुण्याच्या लोकांना ब्रिटीशांनी अंमलात आणलेले नवीन बदल नकोच होते.

एकोणिसाव्या शतकाच्या उतरार्धात मुक्त विचारांच्या अशा तीन नेत्यांनी जनमनावर राज्य केले होते व ते म्हणजे दादाभाई नौरोजी, महादेव गोविंद रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले. त्यांच्या आधुनिक विचारांनी फक्त महाराष्ट्राच नव्हे तर सबंध देश भारावला.

प्रा.जे.व्ही. नाईक म्हणतात की, रानडे, आगरकरांच्या आधींच्या समाजसुधारकांनी, ब्रिटीश राजवटीत, समाजाच्या सामाजिक आर्थिक उत्पन्नाच्या दृष्टीने महत्त्वाचे भरीव कार्य केले होते. त्यामुळे आगरकर-रानडेंना महाराष्ट्रात मूलभूत वैचारीक क्रांती करावयास परिस्थिती तयार झाली. कारण बहुतेक समाजसुधारकांचे कार्य शहरा पुरते मर्यादित होते. महाराष्ट्रातील त्यांचे मूलभूत कार्य, त्यांचा महाराष्ट्रातील जनतेवरचा प्रभाव हा त्यांनी स्थापन केलेल्या संस्थांच्या कार्यांवरून येतो. आता आपण दादाभाई नौरोजी, महादेव गोविंद रानडे आणि गणेश वासुदेव जोशी यांचे कार्य समजावून घेऊया.

८.२ दादाभाई नौरोजींचे कार्य (इ.स.१८२५ - १९१७)

भारताच्या अनुभवाने आणि कार्याने वृद्ध परिपक्व झालेल्या दादाभाई नौरोजींचे विविधांगी कार्य काही पानांत आटपता येणे अशक्य आहे. त्यांच्या दीर्घकालीन आयुष्यात, भारताच्या इतिहासाची अनेक पाने लिहीली गेलेली आहेत. त्यांचे अत्यंत साधे परंतु चळवळीने भरलेले आयुष्य, अखेरपर्यंत मानवतेची सेवा करण्यात गेले. केवळ कॉलेजच्या फूलपंखी दिवसांचे वर्णन करुन त्यांच्या कार्याची खोली लक्षात येणार नाही आणि म्हणूनच त्यांच्या स्टुडंटस् लिटररी व सायंटीफीक सोसायटीच्या कार्याची व अनुभवाच्या महत्त्वाच्या घटनांची ओळख करुन देणे महत्त्वाचे आहे.

८.२.१ स्टुडंटस् लिटररी ॲण्ड सायंटीफिक सोसायटी :

दादाभाईंचा जन्म ४ नोव्हेंबर, १८२५ रोजी मुंबई येथे एका पारशी घराण्यात झाला. नेटीव्ह ऐज्युकेशन सोसायटीच्या मुक्त शाळेत त्यांचे शिक्षण झाले. त्या शाळेच्या दोन शाखा होत्या. १) इंग्लिश, २) मातृभाषा. सरकारच्या अनुदानाखाली शाळा चालविण्यात येत असे. एल्फिन्स्टन मधून त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण झाले. एल्फिन्स्टन कॉलेज व नेटीव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळेने एकत्रितपणे एल्फिन्स्टन इंस्टिट्यूट सुरु केली होती. त्यांना इ.स.१८४० मध्ये क्लेर (Clare) शिष्यवृत्ती मिळाली आणि इ.स.१८४२ मध्ये सर्वसाधारण हुशार मुलांसाठी नव्याने सुरु करण्यात आलेल्या वर्गात त्यांना प्रवेश मिळाला.

महाविद्यालयीन काळात दादाभाई अतिशय सक्रीय होते. इ.स.१८४८ मध्ये नेटीव्ह लिटररी सोसायटीचे काही सदस्य एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या हॉलमध्ये जमले व त्यांनी नवीन संस्थेची स्थापना केली. तिचे नाव स्टुडंटस् लिटररी ॲण्ड सायंटीफिक सोसायटी असे ठेवण्यात आले. दादाभाई त्या संस्थेचे खजिनदार बनले आणि प्रा.पड्टन हे अध्यक्ष. त्या क्षणापासून दादाभाईंनी सर्व वेळ हा शिक्षण व सामाजिक सुधारणांसाठी घालविला.

८.२.२ सोसायटीचे नियम :

संस्थेचा महत्त्वाचा उद्देश साहित्यिक व शास्त्रीय ज्ञानामध्ये तरुणांची रुची वाढावी हा होता. हा उद्देश समोर ठेऊन संस्थेच्या सचिवांनी, दोन व्यक्तींची नियुक्ती शास्त्रीय व सामाजिक विषयांवरचे प्रबंध वाचण्यासाठी करणे क्रमप्राप्त होते. संस्थेची मिटींग महिन्यातून दोनदा होत असे. संस्थेच्या सदस्यांनी स्वतंत्ररित्या सामाजिक, शास्त्रीय विषयांवर काम करावे अशी अपेक्षा होती. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या खांद्यावर समाजाला सुशिक्षित बनविण्याची जबाबदारी होती

आणि म्हणूनच सद्य परिस्थितीचा सखोल अभ्यास करण्याची गरज होती. परंतु राजकीय किंवा धार्मिक बाबतीत ढवळाढवळ करण्याचे संस्थेने शक्यतो टाळले.

संस्थेने अत्यंत कडक शिस्त पाळली होती आणि म्हणूनच निरुद्योगी किंवा केवळ प्रसिद्धीसाठी सभासद झालेल्यांना काढून टाकण्याचे ठरले. पहिल्या प्रथम ज्यांना प्रबंधाचे वाचन करता आले नाही त्यांना एक रुपया दंड आकारण्यात आला. दुसऱ्या प्रयत्नाला अपयश आल्यास दोन रुपये दंड आणि देण्यात आलेल्या विषयांवर लेख प्रबंध लिहिण्यास तिसऱ्यांदाही अपयश आल्यास संस्थेतून हाकालपट्टी करण्यात येई.

सोसायटीच्या मिटींगमध्ये विषय व त्यासंबंधीचे विविध प्रश्न यांवर चर्चा होई. त्यात होत असलेल्या चर्चा फक्त चार भिंतींपुरत्याच मर्यादीत न राहता त्यावरील विचारमंथन दैनिक वृत्तपत्रांमधून प्रकाशित केले जाई. त्यापैकी एक होते गुजराती ज्ञान प्रसारक मंडळी आणि दुसरे मराठी ज्ञान प्रसारक मंडळी. गुजराती वृत्तपत्र दादाभाई नौरोजी संपादित करीत व त्यामध्ये चर्चा, वादविवाद, विचार मंथनास प्रसिद्धी दिली जाई.

दादाभाई नौरोजींच्या हाताखाली, ज्ञान प्रसारक मंडळीने हाती घेतलेले कार्य कौतुकास्पद होते. इ.स.१८४९ मध्ये स्त्री शिक्षणावर बेहरामजी खरशेतजी गंठबी यांनी लेख प्रस्तुत केला. याविषयावर झालेल्या चर्चा सत्रामुळे कार्याला दिशा मिळाली. विद्यार्थी स्वतः अनेक हिंदू व पारशी घरांमध्ये जाऊन त्यांच्या मुलींना शिकवू लागले. अनेक दिवस चाललेल्या ह्या विचार मंथनामुळे व सामाजिक जागृतीमुळे पालकही स्वखुशीने मुलींना शिकवू लागले. सात शाळांमध्ये ४४ पारशी मुली व २४ हिंदू मुलींनी प्रवेश घेतला. स्त्री शिक्षणाच्या ह्या चळवळीने मुंबईमधील काही नेत्यांचे लक्ष वेधून घेतले. जगन्नाथ शंकर शेठ यांनी मुलींच्या शिक्षणासाठी छोटी घरवजा जागा दिली. ह्यामुळे इतरांनाही ह्या कार्यात पुढाकार घ्यावयास प्रोत्साहन मिळाले. खेरशेदजी नासाववानजी कामा यांनी सोसायटीसाठी मोठी देणगी देऊ केली. त्यामुळे सोसायटीला हिंदू व पारशी मुलींसाठी शाळा सुरु करण्यास सवलत मिळाली.

सोसायटीने हाती घेतलेल्या समाज सुधारणेच्या मोहीमेमुळे पारशी समाजानेही अशास्त्रीय-असंबंध चालीरिती बदलण्यास सुरवात केली. इ.स.१८५१ मध्ये नौरोजी फर्दुनजी यांनी पुढाकार घेऊन रहनूमा माझद्यासनाम सभा (Rahmumae Mazdayanamsabha) ची स्थापना केली. त्याला च माझदयासनाम पाथचा सारथी असेही म्हणतात. नौरोजी फर्दूनजी हे त्या संस्थेचे अध्यक्ष आणि दादाभाई सचिव बनले. काही समाजसुधारक अतिशय उत्साही होते. त्यांना जुन्या झोरोस्ट्रीयन धर्माची आखणी पाश्चिमात्य तत्त्वावर करावयाची होती. रहनूमा सभेने मात्र प्राचीन धर्माची पवित्रता टिकवून ठेवण्याचे कार्य केले.

दादाभाई सोसायटी व ज्ञान प्रकाश मंडळीचे हिरक महोत्सवापर्यंत जिवित होते. सोसायटीने मराठी व गुजराती भाषेत भाषांतराचे काम हाती घेतले. सोसायटीच्या कार्यालाही प्रसिद्धी मिळू लागली. कारण एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या पहिल्या पिढीलाही वृत्तपत्रिकेत बराच रस होता. मराठी भाषिक विद्यार्थ्यांमध्ये तर समाज सुधारणेच्या दृष्टीने पत्रकारीतेला बराच प्रतिसाद मिळाला. दादाभाईंनाही एका स्वतंत्र वृत्तपत्राची गरज भासू लागली. दादाभाई आणि खरशेदजी कामा यांनी एक 'रास्त गोफ्तार' (सत्य कथन करणारा) नावाचे मासिक सुरु केले. कामांनी आवश्यक आर्थिक मदत करावयाचे ठरविले आणि दादाभाईंनी कोणताही आर्थिक

मोबदला न घेता ते सुरु करण्याचे ठरविले. १५ नोव्हेंबर १८५१ मध्ये नवीन वृत्तपत्र सुरु करण्यात आले. हे गुजराती भाषेतील सहावे वृत्तपत्र होते. परंतु स्वतःचे स्वतंत्र विचारशैली असलेले पहिलेच वृत्तपत्र ७ ऑक्टोबर १८५१ मध्ये, मुस्लिम-पारशी दंग्यांच्या पार्श्वभूमीवर सुरु करण्यात आले होते. दोन महीन्यांतच वृत्तपत्राला आकर्षक प्रतिसाद मिळू लागला आणि इ.स.१८५२ मध्ये मासिकाचे रुपांतर साप्ताहिकात झाले. सोसायटीच्या मुलांकडून दादाभाईना पूर्ण प्रतिसाद मिळत होता आणि वृत्तपत्रांशी त्यांचे नाते इ.स.१८५५ मध्ये त्यांनी भारत सोडल्यावर व इंग्लंडला स्वतःचे घर बनविल्यावरही राहीले.

विद्यार्थ्यांच्या या सोसायटीला समाजाकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आणि दादाभाईंच्या अध्यक्षतेखाली, सोसायटीच्या कामाची व्याप्तीही वाढू लागली. २ सप्टेंबर १८५२मध्ये एल्फिन्स्टन महाविद्यालयामध्ये, फ्रामजी कावासजी बेनजी, समाजसुधारक शिक्षणधुरीण यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सभा ठेवण्यात आली होती. मिटिंग मध्ये इराणमधील झोरोस्ट्रीयनसाठी गोळा करण्यात आलेला फंड आता स्टुडंटस् लिटररी आणि सायंटीफीक सोसायटीच्या संग्रहालयासाठी वापरण्यात यावा, असा ठराव झाला. दादाभाई स्वतः एक प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांसाठी आदर्श उदाहरण होते. एल्फिन्स्टनच्या अनेक विद्यार्थ्यांनी या कार्यासाठी हातभार लावायचे ठरविले. आर. पी. मासानी लिहीतात, ''हे खऱ्या शिक्षकाचे कार्य आहे की मुलांना केवळ शिक्षणच नव्हे तर स्वकृत्यांनी विद्यार्थ्यामध्ये समाज सुधारणेची ज्योत होय.'' दादाभाईंनी त्यांचे जिवितकार्य खऱ्या अर्थाने जगले. केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपुरतेच नव्हे तर त्यांच्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ते आदर्शस्तंभ होते.

८.२.३ आयुष्यातल्या महत्त्वाचा घडामोडी :

त्यांच्या आयुष्यातील काही महत्त्वाच्या घटनांचा इथे उल्लेख केला तर वावगे ठरु नये. कारण संपूर्ण नव भारताच्या निर्मितीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि स्थानिक महाराष्ट्राचा इतिहास ह्या सगळ्यांचा संबंध अंततः त्यांच्याशी येतो. इ.स.१८५२ मध्ये त्यांची गणित व नैसर्गिक तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. सुविख्यात कॉलेजमध्ये अशा महत्त्वाच्या पदी नियुक्ती झालेले ते प्रथम भारतीय होते. इ.स.१८५५ मध्ये त्यांनी इंग्लंड येथे स्थानिक होण्यासाठी देश सोडला व ते कॅम्प कंपनीवर रुजू झाले आणि नंतर त्यांनी स्वतःची व्यापारी कंपनी सुरु केली. प्रथम दशकामध्ये त्यांनी सिव्हील सर्विस परिक्षेसंबंधी ब्रिटीश जनतेचे मत वळविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी संस्कृत व अरबी या शास्त्रीय भाषावर भर दिला. त्यामुळे लंडन इंडियन सोसायटीने ब्रिटीश सरकारवर दबाव आणला ज्या योगे ब्रिटीश सरकारचा या भाषा ऐच्छिक ठरवून भारतीय विद्यार्थ्यांचे गुण कमी करण्याचा विचार होता.

फेब्रुवारी १८६६ मध्ये जॉन क्रॉफर्ड, अध्यक्ष, एथनॉलॉजिकल सोसायटी, लंडन यांनी आशियाई वंशाचे लोक, युरोपियनांपेक्षा कनिष्ठ दर्जाचे आहेत असे मत मांडले. पुढच्याच महीन्यात, दादाभाईंनी क्रॉफर्डला सडेतोड उत्तर दिले. दादाभाईंचे आशियाई लोकांचे साहीत्य व विज्ञान क्षेत्रातील योगदानावर खुलासा करता, युरोपियन वंशाबाबत अभिमान बाळगणाऱ्यांना शांत बसविले.

दादाभाईचे राजकीय क्षेत्रातील योगदान फार महत्त्वाचे होते. ते ब्रिटीश संसदेचे सदस्य होणारे पहिले भारतीय होते. त्यांनी बडोद्याच्या संस्थानांत दिवाणाचे काम बघितले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासूनचे कार्य त्यांनी केले. त्यांत ते तिनदा अध्यक्ष म्हणून निवडून

आलेले आहेत. त्यांच्या बौद्धिक कार्यापैकी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे 'गरीबी आणि भारतातील अ-ब्रिटीश राज्य' (Poverty and Un British Rule in India) इ.स.१९०१ मध्ये हे पुस्तक प्रकाशित झाले. इ.स.१८७६ मध्ये ते मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक झाले. तेव्हा त्यांनी भारतातील गरीबीवर ईस्ट इंडीया असोशिएशनच्या मुंबई शाखेसमोर एक लेख प्रस्तुत केला.

दादाभाई नौरोजींच्या कार्याचा थोडक्यात आढावा आपल्याला लोकमान्य टिळकांच्या वक्तव्यावरुन घेता येतो. जेव्हा इ.स.१९०६ मध्ये, कलकत्ता काँग्रेसचे ते अध्यक्ष झाले तेव्हा त्यांना काँग्रेसमधील मवाळ नेत्यांकडून त्रास होऊ लागला. ते लिहीतात ''आपण दादाभाईंना इतके महत्त्व का देतो? स्व. मंडलिक, भाऊ दाजी लाड आणि नौरोजी फर्दुनजी यांचे कार्य दादाभाईंपेक्षा कमी दर्जाचे नक्कीच नाही. जरी दादाभाई हे ब्रिटीश संसदेचे प्रथम भारतीय सदस्य असले तरी श्री. भावनगरींनाही ते पद काही काळाने मिळाले. ह्या घटनांमुळे दादाभाई काही भारतीयांच्या हृदयात विराजमान होत नाहीत.'' या सगळ्याचा अर्थ अगदी सरळ होता. त्यांचे महत्त्व त्यांनी किती संस्था सुरु केल्या किंवा किती व्याख्याने दिली किंवा किती विषयांवर लेख लिहिले यावर नक्कीच नव्हते त्यांचे महत्त्व किंवा महात्म्य त्यांच्या Theory of Economic Drain मुळे अधिक होते. ज्यासाठी त्यांनी केवळ तर्क शास्त्राचा आधार घेतला नव्हता तर व्यवस्थित सखोल सांख्यिकी अभ्यास करुन निष्कर्ष काढले होते. पेशव्यांच्या ऱ्हासानंतर ब्रिटीश राजवटीत दादाभाई अशी एक धाडसी व्यक्ती होती की ज्यांनी भारताच्या आर्थिक अध:पतनाला व गरीबीला ब्रिटीशांचे राज्यच जबाबदार असल्याचे बिनदिक्कत सांगितले. त्यांनी जनतेच्या डोळ्यावरची पट्टी काढण्याचा प्रयत्न केला. वरुन जरी ब्रिटीश सरकार कितीही साजिरे-गोजिरे दिसत असले तरी आतून ते एक रोगाप्रमाणे भारताला पोखरत आहे, असे त्यांनी ठामपणे सिद्ध केले.

त्यांच्या 'आर्थिक नि:सारण सिद्धांताने'सुशिक्षित भारतीयांमध्ये नव जागृती निर्माण झाली. संपूर्ण देशामध्ये स्वराज्याला पर्याय नाही याची जाणीव झाली. जरी त्यांचे बहुतांशी आयुष्य इंग्लंडमध्ये गेले तरी तेथेही भारताच्या हीताची एकही संधी त्यांनी सोडली नाही. चांगले आयुष्य जगण्यासाठी, त्यांच्याकडे भरपूर संपत्ती होती. पहील्या विश्वयुद्धाच्या वेळेला ब्रिटीशांकडून चांगल्या राजकीय फायद्याची संधी मिळू शकत होती. परंतु पहिल्या महायुद्धानंतरच्या संविधानात्मक घडामोडी बघण्यास, दादाभाई जिवंत राहीले नाहीत.

आपली प्रगती तपासा :-

१) स्टुडंटस् लिटररी आणि सायंटीफीक सोसायटीच्या कार्याची थोडक्यात माहीती सांगा.

२) दादाभाईंनी भारतातील ब्रिटीशांच्या शोषणाबाबत कोणता सिद्धांत मांडला?

_____

_____

_____

_____

_____

८.३ म. गो. रानडे आणि आर्थिक राष्ट्रवाद

मागील अध्यायात आपण या विद्वान व्यक्तीचे सामाजिक क्षेत्रातील कार्य बघितले. तथापि, त्यांचा इतर क्षेत्रातही तितकाच प्रभाव होता. त्यांचे 'मराठी सत्तेचा उदय' (The Rise of Maratha Power) या ग्रंथामध्ये एकेकाळच्या श्रीमंत इतिहास करणारे आपण मराठी लोक, ब्रिटीशांच्या दळभद्री राज्यव्यवस्थेखाली भरडले जात आहोत हा विचार मांडला. तसेच ब्रिटीश राजवटीत सामान्य माणसाची जी पिळवणूक होत आहे, याची जाणीव त्यांनी व्यक्त केली.

रानडे हे स्वतंत्र विचारांचे व्यक्ती होते. त्यांनी समाजाला रसातळाला जाण्याची प्रक्रीया जवळून बघितली होती. भास्कर तर्खडकर, भाऊ महाजन आणि इतरांनी भारताच्या संपत्तीच्या शोषणासंबंधी जनतेचे लक्ष वेधून घेण्यास सुरुवात केली. ते अकल्लकोट या लहान संस्थानात कारभारी म्हणून काम करीत असताना, तसेच विष्णूशास्त्री पंडीत आणि गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका) यांच्या संपर्कात आल्यावर आर्थिक सुधारणांवर त्यांचे लक्ष गेले. त्यांच्या लक्षात आले की, ब्रिटीश व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठी 'मुक्त व्यापार पद्धती' होती. परंतु भारतीय कपड उद्योगातील व्यापाऱ्यांनी जर ब्रिटीश बाजारपेठेत शिरकाव करण्याचा प्रयत्न केला तर 'बंदीस्त व्यापार पद्धती' असा दुटप्पी खेळ ब्रिटीश सरकार खेळत आहे. त्यामुळे त्यांचे लेख व भाषणे यावर ब्रिटीश सरकारची संशयित नजर पडली. या कारणाने त्यांना तेवीस वर्षे पूर्णपणाने न्यायमूर्तीचे पद मिळण्यास लागली. तोपर्यंत त्यांना दुय्यम दर्जाच्या पदावर कामे करावी लागली.

८.३.१ वेल्बी कमिशन आणि रानडे :

दादाभाई नौरोजी, वेडरबर्न, केर्न यांना न्यायमूर्ती रानडे यांनी भारताची बाजू 'इंडियन एक्सेपेंडीचर कमिशन' (भारतीय खर्च आयोग) समोर लॉर्ड वेल्बीच्या अध्यक्षतेखाली मांडावी असे वाटे. परंतु त्यासाठी रानडेंना मुंबई सरकारने सवलत दिली नाही. त्यामुळे ते काम त्यांनी जी. के. गोखलेंना दिले. त्यांनी ते काम गणेश वासुदेव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करावयास सांगितले. अशाप्रकारे त्यांनी भारताच्या आर्थिक राष्ट्रवादाच्या चळवळीला हळूहळू सुरवात केली.

८.४ गणेश वासुदेव जोशी व आर्थिक राष्ट्रवाद (इ.स.१८५१-१९११)

जी. व्ही. जोशी हे लेखक, प्रगल्भ अर्थतज्ञ आणि मुक्त विचारवंत होते. त्यांनी कधीही ब्रिटीश सरकारच्या बाबतीत भावनांना महत्त्व दिले नाही. जरी त्यांचा जन्म अशा कुटुंबात झाला होता ज्यांनी पेशव्यांची इमाने इतबारे सेवा केली होती. परंतु, ब्रिटीशांचीही तशाच प्रकारची सेवा करण्यात यावी अशा विचारांच्या ते विरुद्ध होते. इ.स.१८५१ मध्ये मिरज ह्या लहान संस्थानात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील संस्थानात पोतनिस होते. त्यांचे आजोबा दुसरा बाजीराव पेशव्याच्या काळात दरबारातील मंत्री होते आणि ईस्ट इंडीया कंपनीबरोबरच्या, पेशव्यांच्या शेवटच्या युद्धात सामील झाले होते. परंतु त्यांच्या वडीलांनी इंग्रजी शिक्षणापासून त्यांना परावृत्त केले नाही.

गणेश जोशी हे अत्यंत हुशार विद्यार्थी होते. पदवी परीक्षेत ते तर्कशास्त्रात प्रथम आले. इ.स.१८७३ मध्ये पदवीनंतर सरकारी नोकरीत शिक्षणखात्यात ते रुजू झाले. त्यांच्या समकालीन समाजसुधारकांप्रमाणे सरकारी नोकरीत राहून त्यांनी समाज सुधारणेस सुरुवात

केली. त्यांनी नाशिक, रत्नागिरी, मुंबई, पुणे, सोलापूर व सातारा येथे काम केले. ते अतिशय हाडाचे शिक्षक होते आणि त्यांची ख्याती पूर्ण मुंबई प्रांतामध्ये पसरली होती. टाईम्स ऑफ इंडीया मध्ये ते विविध विषयांवर लेख लिहीत व त्यांचे लेख सुशिक्षित वर्गाकडून मोठ्या आवडीने वाचले जात. ते 'द' या टोपण नावाने लिहीत असत. ते अत्यंत शिस्तप्रिय होते. कोणताही शैक्षणिक किंवा वास्तविक प्रश्न समजावून घेताना ते प्रयत्नांची शर्थ करीत. ज्या विषयांचा अभ्यास चालू असेल त्याचे त्यांना पूर्णज्ञान असे आणि अल्पअवधीतच त्यांनी सांख्यिकीतज्ञ (Statistician) अशी पदवी मिळविली.

८.४.१ ग.वा.जोशींचे सामाजिक, राजकीय व आर्थिक कार्य :

हा अभ्यासक अत्यंत शांतपणे काम करी आणि सदैव सामाजिक व आर्थिक प्रश्नांमध्ये गुंतलेला असे. ते मुक्त विचारांचे सुधारक होते आणि सर्वांगिण सामाजिक सुधारणांवर त्यांचा भर होता. ते अतिशय अर्थपूर्ण आणि अभ्यासपूर्ण बोलत. त्यांनी अनेक दैनिक व मासिकांमध्ये लिखाण केले. उदा. मराठा, सार्वजनिक सभा, त्रैमासिक इंडीयन रिव्ह आणि टाईम्स ऑफ इंडिया.

सर्वांसाठी शिक्षण असा त्यांचा विचार होता. आर्थिक प्रश्न पद्धतशीर मांडण्याची पद्धत तसेच त्यासाठी आवश्यक संख्याशास्त्राचा आधार घेण्याची पद्धत यामुळे इंडियन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांचे लक्ष त्यांच्याकडे वळले. तसेच या व्यतिरिक्त ते न्यायमूर्ति रानडे, सुरेंद्र नाथ बॅनर्जी आणि आर.सी. दत्त यांच्याशी सल्लामसलत करीत.

८.४.२ वेल्वी कमिशन व ग.वा.जोशी :

गणेश जोशींना 'भारत हा एक गरीब देश आहे' हे वाक्य खटकत होते. त्यांनी अतिशय मेहनत घेऊन, भारत सरकारच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या अहवालांवरुन भारताची व इतर देशांची तुलना करुन भारत हा गरीब झालेला आहे किंवा गरीब करण्यात आलेला आहे या विचारांवर सर्वांचे लक्ष वेधले. दादाभाईंनी याच धर्तीवर Drain Theory 'निःसारण' सिद्धांत मांडला. परंतु जोंशीनी तो संख्याशास्त्राच्या आधारे आधीच सिद्ध केला होता.

न्यायमूर्ती रानडेंनी गणेश जोशींना संबंधित माहीती गोळा करुन जी. के. गोखलेंना, वेल्बी कमिशन पुढे भारताची बाजू मांडावयास मदत करण्यास सांगितले. गोखलेंनी जोशींच्या कामाची स्तुती केली. त्यांनी ज्या पद्धतीने माहीती गोळा करुन प्रस्तुत केली होती ते कार्य खरोखरीच उल्लेखनीय होते. रानडेंचा सल्लाही फार महत्त्वाचा ठरला ज्यामुळे ही सर्व मेहनत फलद्रूप ठरली.

गणेश जोशींना राजकीय नेते आणि ब्रिटीश सरकार दोघांचाही विश्वास लाभला. त्यांची बॉम्बे लेजिस्लेटीव्ह कॉन्सिलवर नियुक्ती झाली. इ.स.१९०८ मध्ये धुळे येथील प्रादेशिक संमेलनात त्यांच्या ज्ञानाची प्रशंसा करण्यात आली. इ.स.१९०७ मध्ये सरकारी नोकरीतून ते निवृत्त झाले. इ.स.१९११ मध्ये त्यांचे निधन झाले. नंतरच्या काळात त्यांच्या मुलाने त्यांचे लेख, भाषणे, पुस्तकाच्या स्वरुपात छापली.

८.५ समारोप

दादाभाईंच्या 'आर्थिक नि:सारण' सिद्धांताने सुशिक्षितांमध्ये जागरुकता निर्माण झाली. एम. जी. रानडेंच्या मार्गदर्शनाखाली गणेश जोशींनी संख्याशास्त्राच्या आधारे, भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचा वेध घेतला.

८.६ प्रश्न

१) आर्थिक राष्ट्रवादाच्या चळवळीत दादाभाई नौरोजींचे कार्य स्पष्ट करा.

२) न्यायमूर्ती रानडेंनी कोणत्या प्रकारे देशाची आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला ?

३) भारताच्या आर्थिक व्यवस्थेसाठी गणेश वासुदेव जोशींनी कोणत्याप्रकारे हातभार लावला ते स्पष्ट करा.

❖❖❖❖

९

उदारमतवाद आणि राष्ट्रवादाचा विकास - (ब)

घटक रचना :

९.० उद्दिष्ट्ये
९.१ प्रस्तावना
९.२ उदारमतवादाची त्रिमूर्ती
९.३ फिरोजशहा मेहता
९.४ बद्रुद्दिन तैयबजी
९.५ न्या. के. टी. तेलंग
९.६ गो.ग.आगरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद
९.७ समारोप

९.० उद्दिष्ट्ये

१) फिरोजशहा मेहता व बद्रुद्दिन तैयबजी यांचे कार्य समजावून घेणे.
२) न्या. के.टी. तेलंग यांचे कार्य विशद करणे.
३) गो.ग. आगरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद अभ्यासणे.

९.१ प्रस्तावना

पाश्चिमात्य शिक्षणाने प्रभावित झालेले, अनेक उच्च व मध्यम वर्गीय त्यांच्या सामाजिक व धार्मिक जीवनात बदल घडवून आणू इच्छित होते. ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीच्या काळात, इंग्रजी शिक्षित तरुणांनी उदारमतवाद, मानवतावाद व बुद्धिप्रामाण्यवाद उचलून धरला होता. त्यांचे विचार हे आदर्श तत्त्वज्ञान व आधुनिक विज्ञानाच्या कामगिरीमुळे भारावलेले होते. प्रथम पिढीतील विचारवंत व उच्च शिक्षित उच्चभ्रू बाळ शास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर आणि गोपाळ हरी देशमुख इ. नी हिंदू समाजातील वाईट चालीरितींवर दैनिक वृत्तपत्रांतून किंवा सार्वजनिक सभांतून परखडपणे आपले विचार मांडले होते. ह्या तीन व्यक्ती अतिशय हुशार होत्या परंतु आपल्या विचारांचे कृतीमध्ये रुपांतर करण्याइतके सामर्थ्य यांच्याकडे नव्हते. नंतरच्या पिढीतील रानडे व भंडारकरांसारखे समाजसुधारक अतिशय दूरदृष्टी ठेवून व सावधगिरीने वागले. मुंबईचे नेते १९ व्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात, फक्त सामाजिकच नव्हे तर राजकीय राजकारभारा संबंधीही अतिशय निसंःकोचपणे बोलू लागले. उदारमतवाद व राष्ट्रवादी पुढारी फिरोजशहा मेहता, बद्रुद्दिन तैयबजी, के. टी. तेलंग राष्ट्रनेते म्हणून उदयास

आले. मेहता आणि तैयबजी हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अनुक्रमे १८९० आणि १८८७ मध्ये अध्यक्ष होते.

९.२ उदारमतवादी त्रिमूर्ती

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात उदारमतवादाचा पुरस्कार व विकास करण्यात फिरोजशहा मेहता, बद्रुद्दिन तैयबजी आणि न्या. के.टी. तेलंग यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे त्यांना 'उदारमतवादी त्रिमुर्ती' असे विरूद लावले जाते. विष्णुबुवा ब्रह्मचारी, विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि एस.एम. परांजपे यांनी हिंदू धर्माच्या पुनरुत्थानासाठी सर्वांना जागतिक धर्माच्या रांगेत स्थान मिळाले. अशी त्यांची इच्छा होती. त्यांची भाषणे व लिखाण हे राष्ट्रवादाने भारलेले व ब्रिटीश विरोधी होते. काही वेळेस तर स्वातंत्र्यवादाच्या विरोधी व पुराण हिंदू परंपरांशी निगडीत असे . तथापि इतरही त्यांच्या तोडीचे प्रसिद्ध राष्ट्रीय नेते होते ज्यांना स्वातंत्र्य व आधुनिकतेचे वेड लागले होते. उदा. लोकहीतवादी, जांभेकर, दादोबा पांडुरंग, रानडे, फुले आणि आगरकर, यांचे विविधांगी कार्यक्रम व अनेक संस्थांशी त्यांचा संबंध यामुळे हिंदू समाजावर आधुनिकता, उदारमतवाद इ. विचारांचा प्रभाव पडू लागला. मुंबईमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, प्रसिद्ध त्रिकुट फिरोजशहा मेहता, के.टी. तेलंग, बद्रुदीन तैयबजी यांनी स्वातंत्र्य, समानता, आधुनिकता, उदारमतवाद यांचे बाळकडू भारतीयांना पाजले.

९.३ फिरोजशहा मेहता व उदारमतवाद (इ.स.१८४६ - १९१५) -

फिरोजशहा मेहता हे पाश्चिमात्य शिक्षित पारशी वकील होते आणि मुंबई शहरातील प्रसिद्ध नेते होते. मुंबई शाखेच्या ईस्ट इंडीया असोसिएशनचे ते सेक्रेटरी होते. मुंबई (बॉम्बे) असोसिएशनचे सदस्य, वेस्टर्न इंडीया असोसिएशन आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या मवाळ गटाचे ते नेते होते. इ.स.१८८४ ते इ.स. १८८५ मध्ये ते बॉम्बे म्युनसिपल कॉर्पोरेशनचे चेअरमेन होते. इ.स.१८७० नंतर मेहता व के.टी.तेलंगनी त्यांचे राजकीय शक्तीस्थान बळकट करण्याकडे लक्ष वळविले. एक दशकाच्या आतच, मुंबईतील नेतेपद मिळिवण्यात त्यांना यश आले. मेहतांसाठी ईस्ट इंडिया असोसिएशनचे नेतेपद ही फार महत्त्वाची व गौरवाची बाब होती. शतकाच्या अखेरपर्यंत ते गोपाळकृष्ण गोखलेंच्या बरोबरीने राजकीय क्षेत्रात ओळखले जाऊ लागले.

फिरोजशहा मेहता हे मुक्त विचारांचे होते. ते सुधारणावादी होते. प्रामुख्याने मुंबई महानगरपालिकेच्या घडामोडीसंदर्भात सुधारणा व्हाव्यात असे त्यांना वाटे. ते मुंबईचा कमिशनर आर्थर टी कॉफर्डचे समर्थक होते. ते मुंबई महानगरपालिकेच्या निर्वाचित मंडळाचे (Elected body) सदस्य बनण्यासाठी विशेष लढले. व्हि. एम. मांडलिक, बद्रुद्दिन तैयबजी, के.टी. तेलंग आणि इतर बुद्धीवाद्यांप्रमाणेच फिरोजशाह मेहतांनी निवडणूक पद्धती सुधारीत व्हावी, यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या मते, 'Justice of Peace' (J.P.) या पदासाठी आयुष्यभरासाठी, कायमस्वरुपी नियुक्ती, चुकीची होती आणि म्हणूनच त्यांनी प्रसिद्ध व जबाबदार मंडळाची (corporation) मागणी केली. ज्यात कर भरणारेच निवडून येतील.

एप्रिल १८८३ मध्ये सार्वजनिक मिटींग झाली. तैयबजी, तेलंग, मंडलिक आणि दादाभाई नौरोजी यांनी जनतेला आवाहन केले की फक्त स्थानिक पातळीवरचे नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर सुद्धा निवडणुकीत भाग घ्यावा. त्यांनी इंग्लिश शिक्षित लोकांना एकत्र येण्यास विनंती केली. एकत्र येऊन परकीय शक्तींना उदा. अँग्लो इंडीयन्सना तोडीसतोड उत्तर द्यावे, अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांनी पुढे म्हटले की, लोकांनी त्याग व लढा या दोहोंसाठी तयार राहावे. जोपर्यंत ते समानतेचा अधिकार प्राप्त करीत नाहीत. परंतु पी.एच. मोदींनी लिहील्यानुसार नौरोजींप्रमाणे, मेहतांचाही ब्रिटीश सरकारच्या न्यायप्रिय आणि पारदर्शक कारभारावर विश्वास होता. फिरोजशहा मेहता हे मुक्तविचारांचे आणि मवाळ राजकारणी होते. त्यांचा ब्रिटीशांच्या न्यायप्रिय व पारदर्शी कारभारावर विश्वास असला तरी, भारतीय जनतेच्या विरोधात ज्या ज्या योजना आखल्या गेल्या त्यांस त्यांनी परखडपणे विरोध केला. त्यांचे कोणत्याही विषयाचे शीघ्र आकलन, बुद्धीमत्ता, स्वतंत्र आणि निर्भीड स्वभाव निवाडा करण्याची पद्धत या सर्वांमुळेच, मुंबईच्या जनमानसात त्यांचे मानाचे स्थान निर्माण झाले. मुंबईच्या संसदीय सल्लागार मंडळात अँग्लो-इंडियन्सना त्यांनी सडेतोड उत्तर दिले.

फिरोजशहा मेहतांनी महानगरपालिकेचे सदस्य व महापौर असताना उल्लेखनीय कार्य केले. जी.के. गोखलेंच्या मतानुसार, पन्नास वर्षाहून अधिक काळ जनतेची आणि शहराची सेवा केल्याने महानगरपालिकेत आणि पर्यायाने राष्ट्रीय पातळीवर मेहतांनी स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले होते.

मेहतांनी 'इंडीयन सिव्हिल सर्विस'वर अतिशय टीका केली आणि खुद्द भारतीयांना त्यापासून वंचित ठेवणाऱ्या ब्रिटीश सरकारचीही त्यांनी संसदीय विवादाच्या प्रसंगी सिव्हील सर्व्हीसचा भारतीय जनतेशी दुजाभाव व नाकर्तेपणा दाखवून दिला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा अध्यक्ष या नात्याने, त्यांनी विनंती केली की उघडपणाने निवडणूक व संसदीय सल्लागार मंडळाची व्याप्ती वाढवणे महत्त्वाचे आहे, जेणेकरुन जनतेचे असल्या नाकर्त्या, सिव्हील सर्व्हंट्सकडून हालतरी होणार नाहीत.

फिरोजशाह मेहता हे मुक्त वृत्तपत्रकारितेचे पुरस्कर्ते होते आणि म्हणूनच, त्यांनी इ.स.१८७८ चा देशीभाषा वृत्तपत्र कायदा जो देशातील वृत्तपत्रांवर बंधनकारक होता त्यांची प्रखर टीका केली. त्यांनी लॉर्ड लिटनची ह्या संदर्भात, संकुचीत मनोवृत्तीचा, दडपशाहीचा पुरस्कर्ता अशी निर्भत्सना केली. त्यांनी पुढे जाऊन सार्वजनिक सभेविरोधातील प्रस्तावास आणि निवृत्त होणाऱ्या मुंबई प्रांताचे गव्हर्नर सर रीचर्ड टेम्पल यांचे स्मृती स्मारक यांस विरोध करणाऱ्या प्रस्तावास जाहीरपणे विरोध केला.

भारतीयांच्या विविध संस्थेमध्ये उमेदवार म्हणून कार्य करण्याच्या क्षमतेवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. त्यांचा असाही विश्वास होता की, जनतेचे मत, कशाही प्रकारे व किती काळापर्यंत ब्रिटीश सरकारने मोडून काढावे किंवा रोखून ठेवण्याचा काळ आता निघून गेलेला आहे. ईस्ट इंडीया असोसिएशनची शाखा, बॉम्बे असोसिएशन, वेस्टर्न इंडीया असोसिएशन आणि मुंबई प्रांत असोसिएशनचे संस्थापक सदस्य या नात्याने मेहता यांनी जनतेच्या दुःखांना विविध मार्गानी वाचा फोडली. उदा. सार्वजनिक सभा, प्रस्ताव मांडणे व पास करणे, स्मारके इ. ज्यामुळे सरकारचे लक्ष, जनतेच्या समस्यांवर केंद्रीत होईल.

फिरोजशहा मेहता हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक सदस्यांपैकी एक होते आणि लवकरच ते त्यांचे आधारस्तंभ झाले. मवाळ वृत्तीचे आणि संसदीय कार्यपद्धतीवर श्रद्धा असणारे, मेहता इ.स.१८९० मध्ये काँग्रेसचे निर्वाचित अध्यक्ष झाले. काँग्रेसची भूमिका त्यांनी संक्षिप्त पणे अशी मांडली की राजद्रोह आणि अप्रामाणिकपणाच्या सर्व आरोप, प्रत्यारोप, अटकही इत्यादींना ती पुरून उरली आहे. तथापि, गोखलें प्रमाणे ते इतर जहाल मतवाद्यांपेक्षा (उदा. टिळक) खूप वेगळ्या विचारसरणीचे होते. टिळक व इतर जहाल मतवाद्यांची विचार करण्याची व कार्य करण्याची पद्धती परस्पर विरोधी होती. मेहतांच्या मता प्रमाणे :

''अजूनपर्यंत तळागाळातील सामान्य जनतेला, त्यांच्या मागण्या व गरजा, स्पष्ट, स्वच्छ व व्यवस्थितपणे, त्यांच्या शिकलेल्या व समाजकार्याने भारावलेल्या उमेदवारांकडे किंवा प्रतिनिधींकडे न मांडता आल्याने त्यांनाही प्रश्नांचा उहापोह करुन त्यावर तोडगा काढणे किंचीत कठीण भासत आहे.''

इ.स.१८९० पर्यंत फिरोजशहा मेहतांचे महाराष्ट्रातील आणि पर्यायाने राष्ट्रीय पातळीवरील स्थान, वादातीत होते. इ.स.१८९० मध्ये ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले. इ.स.१८८७ ते इ.स.१८९३ च्या दरम्यान ते बॉम्बे लेजिस्लेटीव असेंब्लीचे (संसदीय मंडळाचे) सदस्य होते. इ.स.१८९३ च्या दरम्यान ते मुंबई विधी मंडळाचे सदस्य होते. इ.स.१८९३ मध्ये ते व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळावर निवडून आले. त्यांनी जे. एन. पंडीत, मुंबईचे नामवंत उद्योगपती यांच्याशी खाजगी संबंध तोडले. अशा प्रकारे मुंबई शहरावर त्याचे वर्चस्व होते आणि 'मुंबईचा सिंह' या नावाने ते ओळखले जाऊ लागले.

इ.स.१९०७ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सुरत अधिवेशनात, जहाल व मवाळ असे उघडउघड दोन भाग पडले. ही दुही इ.स.१९१५ पर्यंत म्हणजे फिरोजशहा मेहता, जी.के. गोखले आणि सुब्रमण्यम अय्यर यांच्या निधनापर्यंत टिकून राहीली. मेहता आणि गोखलेंच्या मवाळ मतवादी धोरणानुसार काँग्रेस स्वतंत्रपणे कारभार न करु शकल्याने इ.स.१९१६ मध्ये, जहाल मतवाद्यांबरोबर लखनौ अधिवेशनात युती झाली.

फिरोजशहा मेहता हे खंबीर राष्ट्रवादी होते. त्यांचा विश्वास होता की, भारतात अनेक प्रकारचे वैविध्य असले तरी एक राष्ट्र म्हणून निर्मिती व्हावयास जी राजकीय निष्ठा लागते ती भारतीय जनतेकडे आहे आणि म्हणूनच त्यांचा काँग्रेसवर त्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर, इच्छा शक्तीवर विश्वास होता.

आपली प्रगती तपासा :-

१) फिरोजशहा मेहता यांच्या कार्या थोडक्यात सांगा.

_____

_____

_____

_____

_____

९.४ बद्रुद्दिन तैयबजी व त्यांचे कार्य (इ.स.१८४४-१९०६)

बद्रुद्दिन तैयबजी हे मुंबईचे राष्ट्रीय पातळीवरचे आघाडीचे नेते होते. अरब वंशाच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. प्रथम ते मद्रासमध्ये शिकले, त्यानंतर मुंबईच्या एल्फिन्स्टन इंस्टिटयूटमध्ये शिकले. पाश्चिमात्य शिक्षणामुळे राजकीय स्वातंत्र्य, समानता यांचे विचार त्यांच्या मनात फिरु लागले. त्यातूनच त्यांचा सामाजिक व राजकीय प्रवास सुरु झाला.

लिटनच्या इ.स.१८७८च्या देशी वृत्तपत्र विरोधी कायद्यामुळे ते राजकारणाकडे ओढले गेले. लवकरच फिरोजशहा मेहता, के.टी. तेलंग, आर.जी. भंडारकर आणि व्ही.एन. मंडलिक यांच्या सहवासात त्यांना मोलाचे स्थान मिळाले. आर.सी. मुझुमदार म्हणतात, ''काशिनाथ त्र्यंबक तेलंग, फिरोजशहा मेहता आणि बद्रुद्दिन तैयबजी ह्या त्रिकुटामुळे मुंबईत राजकीय विचारमंथनास व संघटनेस एक वेगळी दिशा व चालना मिळाली.''

मुस्लिमांना संघटीत करण्यात तैयबजींचा महत्त्वाचा वाटा होता. तसेच त्यांचे भाऊ कामरुद्दीन यानी 'सारेमाया ए-जमात ए - सुलेभाई' ही संस्था स्थापन करुन, एलफिन्स्टन हायस्कूलपर्यंत पोहचू शकलेल्या त्यांच्या जमातीतील मुलांसाठी अन्न वस्त्राची सोय करी. तसेच त्यांनी अंजूमन ए- इस्लामची, मुंबई येथे स्थापना करुन इ.स.१८७७ पर्यंत ते तिचे ते सेक्रेटरी होते.

बद्रुद्दीन तैयबजीना याची जाणीव होती की जोपर्यंत देशातील मुसलमान एक होत नाही, तोपर्यंत त्यांना काहीही साध्य होणार नाही. त्यांच्यात एकता आणण्याचे एक साधन होते उर्दू भाषा आणि म्हणूनच अंजुमन - ए-ईस्लामने भारतीय मुस्लिमांमध्ये उर्दू ही त्यांची भाषा आहे ही जाणीव निर्माण करावयास सुरुवात केली. तसेच बद्रुद्दिन हे मुस्लिमांमध्ये पांथिक भेदभाव कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करीत होते आणि शिया आणि सुन्नी ह्या पंथांत बंधुत्व निर्माण व्हावे म्हणून ही त्यांनी प्रयत्न केले.

त्यांची राजकारणातील सहभाग (जरी ते बॅरिस्टर या नात्यांने अतिशय व्यस्त असले तरी) इल्बर्ट बिलावरील वादाच्यावेळी (१८८१-१८८२) जास्तच वाढला. मुंबई शाखेच्या 'ईस्ट इंडीया असोशिएशन'चे सदस्य म्हणून त्यांनी अँग्लो इंडीयनस् च्या विरुद्ध लॉर्ड रिपन व बिल यास पाठींबा दिला. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, के.टी. तेलंग, व्ही. एन. मांडलीक यांच्या बरोबरीने, सार्वजनिक सभा आयोजित करणे आणि बिलाला पाठिंबा मिळण्यासाठी स्वाक्षऱ्या गोळा करणे यांमध्ये त्यांनी सहभाग घेतला. त्यांची भारतीयांसाठी असलेली एकनिष्ठता यामुळे त्यांची प्रतिमा सार्वजनिक जीवनात तसेच वकीली व्यवसाय या दोन्हींकडे उंचावली.

इ.स.१८८२ मध्ये, बद्रुद्दिन यांची नियुक्ती बॉम्बे लेजिस्लेटीव्ह कौन्सिलवर अतिरिक्त सदस्य म्हणून (इ.स.१८८२-८६) दरम्यान चार वर्षांसाठी म्हणून झाली. त्या काळात लोकांमध्ये त्यांना वक्तृत्वामुळे व वकीली ज्ञानाच्या प्रभावामुळे अधिकच प्रसिद्धी मिळाली. इंडियन कॉन्सिलचे इतर भारतीय सदस्य रानडे, तेलंग आणि मेहता यांनी सुद्धा कायद्याच्या अंमलबजावणीत प्राण ओतले. त्यांच्या बुद्धिमत्ता व कर्तृत्वामुळे सर्वच अंचबित झाले ज्यामुळे मुंबई सरकार व भारत सरकार दोन्ही अस्वस्थ झाले.

३१ जानेवारी, १८८५ मध्ये बद्रुद्दिन तैयबजी, फिरोजशहा मेहता आणि के.टी. तेलंग यांनी बॉम्बे प्रेसिडेंसी असोशिएशनची स्थापना केली. त्याच्या उद्घाटनादिवशी, जाहिर सभेत, त्यांनी स्वत:ची राजकीय मते माडली. ते म्हणतात :

''मला असे वाटते, देश आणि त्यातील जनतेबरोबरच नवीन राजकीय संवेदनांची जाणीव व वाढ होते आणि या संवेदना मुक्त करायला एखाद्या संस्थेची गरज असते. अशी संस्था जी त्या संवेदनांवर लक्ष ठेऊ शकेल, नियंत्रण ठेऊ शकेल, मार्गदर्शन करु शकेल आणि प्रोत्साहन देऊ शकेल. आपण आता आपल्या राजकीय हक्काबाबत जागृत झालेलो आहोत. दुर्दैवाने वंश, रंग, संप्रदाय इ. नी आपल्यातील एकीचे विभाजन झाले परंतु शिक्षणाच्या प्रभावामुळे ही कटुता हळूहळू कमी प्रभावी होत गेली.''

तैयबजींनी, डिसेंबर १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत सक्रीय पाठींबा दिला आणि त्यांच्या मृत्यूपर्यंत इ.स.१९०६ मध्ये ते या संस्थेशी निगडीत राहले. मुस्लिमधर्मीय या नवीन संघटनेच्या बरोबर नाहीत हा आरोप त्यांनी खोडून काढला आणि असा विश्वास दिला की, मुस्लिमसुद्धा देशातील इतर संप्रदाय व बांधवांबरोबर देशाच्या राजकीय स्थित्यंतरात सामील आहेत. त्यांनी मुंबई सरकारचे feeler आणि सैय्यद अहमद खान यांच्या कॉग्रेसपासून दूर राहण्याच्या सूचना फेटाळल्या. तसेच त्यांनी मुस्लिम कॉन्फरन्सही काँग्रेसला प्रतिपक्ष म्हणून स्थापना करण्याची सूचनाही फेटाळली. त्यांनी मुस्लिम बांधवांना काँग्रेसमध्ये यावयास विनंती केली व त्याच्या कार्यात भाग घ्यावा अशी इच्छा व्यक्त केली.

डिसेंबर इ.स.१८८७ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या मद्रास अधिवेशनात बद्रुद्दिन तैयबजी अध्यक्ष म्हणून निवडून आले. डॅनिल आरगॉन (Danil Argon) यांच्या मताप्रमाणे, ''तैयबजी यांची निवडणूक अशा प्रकारे आखण्यात आली होती की काँग्रेस ही मुस्लिम धार्जिणी आहे, हे दाखवून द्यावयाचे होते.'' तैयबजींनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात ह्या मुद्द्यावर भर दिला की, मुस्लिमांनी हिंदूना सहकार्य करुन, सामाजिक हिताच्या दृष्टीने पावले उचलली पाहीजेत. त्यांच्या मतानुसार भारताच्या राजकीय हिताच्या दृष्टीने, सुशिक्षित सामाजिक जाणीवेने प्रेरित झालेल्या लोकांनी धर्म, वंश, जात-पात हे भेदभाव टाकून एकत्र येण्याची गरज आहे.

अनेक वर्षे तैयबजी काँग्रेसच्या कार्यवाहीमध्ये महत्त्वाचे घटक होते. मुस्लिमांच्या धार्मिक मुक्ततेबाबत त्यांनी आवाज उठविला, त्यांनी मुस्लिमांना आवाहन केले की देशाच्या हिताच्या चळवळीसंदर्भात एक भारतीय या नात्याने भाग घ्या. त्यांनी इतरांच्या बरोबरीने चांगले सरकार, भारतीय म्हणून चांगली वागणूक आणि चांगल्या शिक्षणाची सर्वच संप्रदायांसाठी व्यवस्था यासाठी प्रयत्न केले पाहीजेत. त्यांनी मुस्लिमांच्यामध्ये जी भीती होती की काँग्रेससारख्या प्रतिनिधी संस्थेस पाठींबा दिल्यास हिंदूचे वर्चस्व वाढेल याचे खंडन केले.

बद्रुद्दिन त्यांच्या जीवनात एक सच्चे मुसलमान म्हणून पण त्यांचबरोबर अत्यंत व्यापक दृष्टीकोन ठेवून जगले. देशासाठी त्यांची निष्ठा आणि भक्ती शब्दातीत होती आणि ते निर्भिडपणे सरकारच्या व सय्यद अहमदखान यांच्या रोषाला सामोरे गेले आणि शेवटपर्यंत काँग्रेसचे नेते राहीले. तथापि, इ.स.१८९५ मध्ये मुंबईचे न्यायमूर्ती झाल्यानंतर मात्र त्यांनी सामाजिक जीवनातील अंग काढून घेतले. बद्रुद्दिन तैयबजी, फिरोजशहा मेहता आणि के.टी तेलंग हे काँग्रेसमधील महत्त्वाचे आधारस्तंभ होते. त्यांचा मुंबईतच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रभाव होता.

सर पी.एच. मोदी म्हणतात, ''हे हुशार त्रिकुट, राजकारभाराच्या प्रत्येक अंगाची सुधारणा करण्यासाठी अथक प्रयत्न करीत होते. वेगवेगळ्या मंचावरुन व विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक सुधारणांचा प्रयत्न केला.''

परंतु, ज्याप्रमाणे मॅस्लोस म्हणतो, ''त्याप्रमाणे बद्रुद्दिन तैयबजींची सामान्यजनांवर जरी चांगली प्रतिमा असली तरी त्यांच्या स्वकीयांवर मात्र त्यांची पकड ढिली पडली इतकेच नव्हे तर त्यांचे स्थानही डळमळीत झाले.''

आपली प्रगती तपासा :-

१) बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या विविध सभेत तैयबजींनी कोणते मत मांडले ?

_____

_____

_____

_____

_____

९.५ न्या. के.टी. तेलंग व त्यांचे विचार (इ.स.१८५०-१८९३)

आधीच म्हटल्याप्रमाणे फिरोजशहा मेहता, बद्रुद्दिन तैयबजी, काशिनाथ त्रिंबक तेलंग ह्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, मुंबईच्या राजकीय क्षेत्रात 'त्रिकूट' तयार केले. त्यांच्या स्वकर्तृत्वावर बौद्धिक सामर्थ्यावर व सामाजिक क्षेत्रातील उत्साह व कामगिऱ्यांमुळे त्यांनी मुंबईतच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर देशभावनेला खतपाणी घातले. ते सुशिक्षित पिढीचे नेते होते ज्यांचे विचार त्यांच्या जुन्या पिढीपेक्षा खूप वेगळे होते.

तेलंग हे लेखक, समाज सुधारक आणि मुंबई उच्च न्यायालयात वकील होते. इ.स.१८८६ ते १८८९ च्या दरम्यान ते बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कॉन्सिलचे ते सदस्य होते. आणि इ.स.१८८९ पासून उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होते ते इ.स.१८९३ मध्ये त्यांच्या मृत्यूपर्यंत ते ईस्ट इंडीया कंपनीच्या मुंबई शाखेशी खूप जवळून निगडीत होते आणि बॉम्बे प्रेसिंडेंसी असोशिएशनचे सहसंस्थापक होते.

न्या. तेलंग यांच्यावर दादाभाई नौरोजींचा खूप प्रभाव होता. मुख्यत्वे त्यांचे भारतीय अर्थशास्त्रावरचे विचार ह्यांचे स्पष्टीकरण त्यांनी इ.स.१८९६ मध्ये वाचलेल्या पेपरमध्ये आहे. त्यामध्ये मुक्त व्यापार आणि संरक्षण याचा भारताच्या संदर्भात आढावा घेण्यात आला आहे. न्या. तेलंग यांनी भारतीय उद्योगधंद्यास संरक्षणाची गरज आहे याची कारणमीमांसा नौरोजींनी आधी मांडल्याप्रमाणेच केली.

तेलंग हे संस्कृतचे गाढे अभ्यासक होते आणि हिंदू समाज सुधारक. त्यांनी त्यांच्या वैचारीक लेखात हिंदू वेदांचे संपादन केले तसेच हिंदू धर्मातील चांगल्या गोष्टींना पाठींबा दिला. त्यांचे लेख आणि भाषणांचा हिंदू समाजावर फार मोठा प्रभाव होता. एक पत्रकार म्हणून व बॉम्बे

असोसिएशनचे माजी सेक्रेटरी म्हणून सुशिक्षित वर्गात त्यांचा खूप प्रभाव होता. त्यांना मुख्यत्वे करुन हिंदू धर्मीयांमध्ये अत्यंत आदराने वागवले जायचे.

मेहता आणि तैयबजीप्रमाणे, न्या. तेलंग यांनी सुद्धा देशी वृत्तपत्रबंदी कायदा विरुद्ध सक्रीय भाग घेतला होता. त्यांचे इ.स.१८८३ मध्ये इलबर्ट बिल संबंधीच्या भाषणांमुळे मुंबईतील लोकांची मते रिपन व बिलाच्या बाजूने गेली. त्यांचा इ.स.१८८८ मध्ये महानगरपालिका कायदा पास होण्यात मोलाचा वाटा होता.

इ.स.१८८० च्या दरम्यान आणि त्यानंतर तेलंग, मेहता, नौरोजी आणि तैयबजी भारताच्या राजकीय घडामोडीत अत्यंत सक्रीय झाले आणि राष्ट्रीय पातळीवर नावारुपास आले. इ.स.१८७९ च्या सुरुवातीला न्या. तेलंग यांनी एका लेखात जनतेला सुचित केले होते की संसदेच्या सल्लागार मंडळाने एकदा पास केलेल्या कायद्यामध्ये, नव्याने भर टाकण्याचा अधिकार सरकारच्या कार्यकारी मंडळाच्या शाखेस असल्याचे सांगितले. हे नवीन नियम, कायद्याप्रमाणे अंमलात आणले जातात हे खरोखरीच भयानक आहे. अशा प्रकारची पद्धती ही एक प्रकारे व्यक्तीच्या अधिकारांची पायमल्लीच करणारी आहे. इ.स.१८८० मध्ये अशा प्रकारच्या यंत्रणेविरुद्धचा लढा अधिकच पेटला.

इ.स.१८८५ च्या सुरुवातीला, तेलंग यांनी फिरोजशहा मेहता, तैयबजी, दादाभाई नौरोजी, व्ही. एन. मंडलिक आणि नौरोजी फर्दुनजी यांनी बॉम्बे प्रेसिडेंसी असोसिएशन स्थापन करण्यास सहाय्य केले. मेहता आणि दिनशॉ वाच्छा यांच्याबरोबर त्यांची नेमणूक सेक्रेटरी म्हणून झाली. डिसेंबर १८८५ मध्ये, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, मुंबई येथे स्थापन करण्यात त्यांनी सहाय्य केले. त्यांनी राष्ट्रीय संघटनांशी १८८९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होईपर्यंत संबंध ठेवले. त्यानंतर, त्यांनी सामाजिक जीवनातून स्वतःचे अंग काढून घेतले.

के.टी. तेलंग हे संस्कृतचे अभ्यासक होते. त्यांचा हिंदू कायद्याचा अभ्यास खोलपर्यंत झाला होता. त्याचा त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना हिंदू धर्मामध्ये अनेक सुधारणा आत्मविश्वासाने करण्यासाठी उपयोग झाला. उदा. स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह इत्यादी. त्यांचे संस्कृतवरचे प्रेम आणि सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी जी निष्ठा होती त्याचे प्रत्यंतर त्यांच्या अनेक लेखातून, भाषणातून दिसून येते. न्या. तेलंग यांचे उज्ज्वल भवितव्य इ.स.१८९३ च्या आकस्मिक मृत्यूने संपुष्टात आले, ते केवळ ४३ वर्षांचे होते. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे मुंबईचे आणि पर्यायाने देशाचे खूप मोठे नुकसान झाले.

आपली प्रगती तपासा :-

१) के.टी. तेलंग यांच्या कार्याचा थोडक्यात आढवा घ्या.

_____

_____

_____

_____

_____

९.६ गोपाळ गणेश आगरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद (इ.स.१८५६-१८९६)

गोपाळ गणेश आगरकर हे एक आघाडीचे समाजसुधारक होते आणि महाराष्ट्रातील आधुनिक विचारांचे बुद्धिप्रामाण्यवादी होते. तरुण आगरकर अतिशय कुशाग्र बुद्धीमत्तेचे होते आणि शिष्यवृत्ती व प्रांसगिक लेखाच्या अनुदानावर स्वतःचे शिक्षण त्यांनी घेतले. डेक्कन कॉलेजमध्ये पदवी शिक्षण घेत असताना त्यांचे बाळ गंगाधर टिळकांबरोबर अतिशय जवळचे संबंध निर्माण झाले. त्यांचे पदवी व पदवीत्तुर (बी.ए. आणि एम.ए.) ला असताना आवडीचे विषय इतिहास व तत्त्वज्ञान होते. ते कायद्याचीही परीक्षा पास झाले होते. त्यांचे आवडीचे लेखक होते - जे. एस्. मिल, हर्बट स्पेन्सर, गिबन, व्हॉल्टेअर, रुसो, दिदराँ, तुर्गो, कन्डोरसेल इ. या विचारवंतांच्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक लिखाणामुळे आगरकराच्या विचारांवर व कल्पनांवर मोठ्या प्रमाणावर परिणाम केला. आगरकर त्यांच्या तरुणपणापासूनच निर्भय आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे होते. बाल - विवाहाची परंपरा झुगारुन त्यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी विवाह केला. तथापि, संपत्ती हाही एक प्रश्न लावलेल्या विवाहामागे असू शकतो. विचारांचे साधर्म्य आणि तत्त्वप्रणाली जुळल्याने आगरकर व टिळकांमध्ये घनिष्ट संबंध निर्माण झाले. इ.स.१८८० मध्ये विष्णुशास्त्री चिपळुणकरांबरोबर आणि ना.म.जोशींबरोबर भागीदारी करुन त्यांनी कॅथलिक मिशनरी सोसायटी ऑफ जिझसच्या तत्त्वांवर आधारीत न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. त्याच वर्षी, आगरकर, टिळक, ना.म. जोशी, चिपळूणकर, आपटे आणि गद्रे यांनी दोन वर्तमानांची योजना आखली. केसरी मराठीमध्ये आणि मराठा इंग्लीशमध्ये. ह्या वृत्तपत्रांचा खरा उद्देश जनजागृती करणे आणि सामाजिक, राजकीय घडामोंडीवर मार्गदर्शन करणे की जे पूर्णपणे बुद्धीप्रामाण्यवादी असेल.

आगरकरांनी केसरीच्या संपादनाची जबाबदारी स्विकारली साप्ताहिकांनी केवळ बातम्याच नव्हे तर सामाजिक हिताच्या ज्वलंत विषयांवर विचार मंथनास सुरुवात केली. आगरकरांनी लिहीलेल्या बहुतेक लेखांत बाल विवाह विरुद्ध व विधवा पुनर्विवाहा संबंधी प्रकर्षाने विचार मांडले जात. इ.स.१८८२ मध्ये टिळक व आगरकर यांना अटक झाली. खटला लढवला गेला व शिक्षा झाली. आरोप होता कोल्हापूरच्या तरुण महाराजाच्या ब्राह्मण दिवाणाची बेअदबी आणि दोन ब्रिटीश ऑफिसर्स ज्यांनी महाराजांचा छळ चालविल्याचा. ते तुरुंगातून बाहेर आले तेव्हा त्यांचे अगदी जाहिर स्वागत झाले आणि मुंबई, पुण्याचे मान्यवर व्यक्ती व मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचा सत्कार केला. अशा प्रसंगी आगरकरांची भेट गो.कृ.गोखलेंबरोबर झाली. ज्यांच्यावर वर्तमानपत्रातून आरोप करणाऱ्या लेखकांचा जास्त प्रभाव होता. त्याच माध्यमातून त्यांची राजकीय कारकीर्द सुरु झाली.

इ.स.१८८४ मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली आणि दुसऱ्या वर्षी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. आगरकर आणि टिळक ह्यांनी प्रोफेसर म्हणून शिकविले. पुढे इ.स.१८९२ मध्ये, आगरकर प्राचार्य झाले. तथापि दरम्यानच्या काळात सामाजिक प्रश्नांवरुन दोन मित्रांमध्ये खटके उडायला लागले. या मतभेदामुळे इ.स.१८८७ मध्ये आगरकरांना केसरी सोडावे लागले. नंतरच्या वर्षी, त्यांनी स्वतःचे नियतकालीक 'सुधारक' सुरु केले. ज्याद्वारे त्यांनी स्वतःचे विचार मांडता येतील व दांभिक हिंदू समाजातील क्रूरता, राग-द्वेष, आहे त्या परिस्थितीत समाधान मानण्याची वृत्ती यावर आसूड ओढता येईल.

एम. आर. लेडर्ले म्हणतात की, आगरकरांना महाराष्ट्रात स्वतःचे असे वेगळे स्थान होते. कारण ते अशी एक व्यक्ती होते की पाश्चिमात्यांचे विचार, नव कल्पना, तत्त्वे त्यांनी जशी आहे तशी स्विकारली होती.

१ ऑगस्ट १९८८ मध्ये ते आणि गोखले यांनी सुधारकास वर्गणीदार मिळवून देण्यासाठी वा होण्यासाठी जनतेला आवाहन केले. पुढील सारांश हा त्या जनतेला केलेल्या आवाहनाचा एक भाग आहे ज्याद्वारे आगरकरांच्या विचार व तत्त्वप्रणालीवर प्रकाश टाकता येईल.

''केवळ शारीरिक बल, राजकीय, सामाजिक किंवा नैतिकदृष्ट्या बळजबरी करायचे एक माध्यम म्हणून, आता अस्तित्वात नाहीये. आता बौद्धिक वा मन वळविण्याचे, वैचारीक सामर्थ्याचे दिवस आहेत. वृत्तपत्राचे नावच त्याचे स्वरुप व उद्देश स्पष्ट करते. अगदी चीन सारख्या, अतिशय पुराणमतवादी देशाला सुद्धा ही जाणीव झालीये की जातिय लढाईत जर आपणास जिंकायचे असेल तर युरोपियन लोकांची काम करण्याची पद्धत, महत्त्वाची तत्त्वे आत्मसात करणे अतिशय गरजेचे आहे.''

भारतीय समाजाच्या विषयी बोलताना, आगरकर आणि गोखलेंनी ही खंत व्यक्त केली आहे की, इतक्या वर्षांच्या मुक्त इंग्रजी शिक्षणा नंतर आपल्यात ही जाणीव आशियातील कोणत्याही लोकांपेक्षा आधी निर्माण व्हावयास हवी होती. परंतु, दुर्दैवाने आपल्यातील एक वृत्ती उशिरा का होईना पण उजेडाला आली आहे. ती अशी की स्वतःच्या राष्ट्रीय पराभवावर पांघरुण घालून पाश्चिमात्य संस्कृतीचे विडंबन करणे वा चुकीचा अर्थ लावणे.

सुधारकचा खरा उद्देश असा की ते खंबीरणे सांगतात.या वृत्ती विरुद्ध लढा देणे, आपल्या चुकांवर बोट ठेवणे, आणि आपल्या देशबांधवांच्या मनावर हा विचार बिंबवणे की पाश्चिमात्य संस्कृतीचे सुधारीत रुपच आपल्याला पापापासून परावृत्त करु शकते.

इ.स. १८९५ मध्ये आगरकरांचे देहांत झाले. परंतु शेवटपर्यंत ते एक खरे हिंदू राहीले ते लिहीतात की हिंदू धर्मीयांकडून कितीही प्रखर टिका होऊ देत, खऱ्या, सच्च्या कार्यकर्त्याला कशालाही घाबरण्याची गरज नाहीये. तथापि त्यांनी एक गोष्ट ठामपणाने सांगितली की भारताने ख्रिश्चनधर्म पत्करावा ही बाब ही त्यांना अमान्य होती. आगरकरांच्या धर्माकडे बघण्याचा दृष्टीकोन बुद्धीप्रामाण्यवादी व वस्तुनिष्ठ होता. सुधारणा म्हणजे त्यांच्यासाठी फक्त धर्म नव्हे तर निधर्मी सेवा होती आणि ती प्रामाणिक आणि राज्य तत्त्वावर आधारीत असावी असे त्याचे मत होते. स्वतःची मते ते अत्यंत निर्भयपणे व्यक्त करायचे.

निधर्मी राष्ट्र, अंधश्रद्धेवर मात, मनुष्य जातीच्या अमर्याद प्रगतीवर विश्वास, सहिष्णुता, विचारांचे स्वातंत्र्य, न्यायाच्या दृष्टीने कायद्यामध्ये बदल, दयाळूपणा आणि दातृत्त्व, तळागाळातील जनतेचे शिक्षण हे आगरकरांचे जिव्हाळ्याचे विषय होते आणि म्हणूनच त्यांच्या 'गुलामांचा देश' या लेखात त्यांनी स्वकीयांच्या अनेक अवगुणांबद्दल जसे धैर्याचा अभाव, प्रतिकारशक्तीची कमतरता, अज्ञान, निरुत्साही, कठीण श्रम करण्याचा कंटाळा, असत्य कथन, इ. बद्दल निर्भत्सना केली आहे. या असल्या अवगुणांमुळे देश प्रगती करुच शकत नाही. त्यांनी हे दाखवून दिले की फारच कमी भारतीय निर्भयपणे, जे त्यांना योग्य वाटते अशा सत्याबाबत बोलू

शकतात. त्यांनी बोलणे आणि कृती मधील दरी दाखवून दिली आणि सूचना दिली की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुद्धा नवीन प्रकारचे गुलाम निर्माण होतील.

आगरकरांच्या मनात संपूर्ण पुनर्रचनेवर आधारीत अशी भारतीय राज्य व्यवस्था होती. ज्यात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना महत्त्व दिले गेले होते. स्त्रियांच्या उत्थानासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले, बाल विवाह आणि विधवा केशवपनास त्यांनी कडाडून विरोध केला. त्यांनी खंबीरपणाने सांगितले की प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे असले पाहीजे. त्यात स्त्री-पुरुष असा लिंग भेद होता कामा नये तसे लिंगानुसार शिक्षणाचे प्रकार सुद्धा असता कामा नये. एकच सामायिक शिक्षण सर्वांना दिले पाहिजे.

गो.ग. आगरकर नेहमीच उच्च आदर्शासाठी लढले, जगले. त्यांचा कार्य करतानाचा प्रामाणिकपणा, सत्यप्रेम, शिस्तप्रिय हे सर्वच गुण त्यांच्या अभेद्य अशा धैर्य व इच्छाशक्ती एवढेच समर्थ होते. त्यांच्या खाजगी जीवनात ते अत्यंत साधे व सभ्य होते. आगरकरांनी हिंदूच्या अंत्यसंस्कारावेळच्या काही अर्थहीन व हास्यास्पद विधींचे विडंबन केले. म्हणूनच त्यांची आई वारली तेव्हा, घरच्या कुटुंबियांनी बळजबरी करुन सुद्धा डोक्यावरचे केस व मिशी काढून टाकण्यास त्यांनी नकार दिला.

आगरकरांचे आयुष्य अत्यंत त्रासाचे व हालाखीचे गेले. त्यांचे विचार त्यावेळच्या, हिंदू धर्मीय रक्षकांना रुचले नाहीत आणि याची त्यांना पूर्ण जाणीव होती. परंतु ह्या महान समाजसुधारकाला त्याची जाणीव होती की, जर समाजसुधारणा करायची असेल तर सामाजिक रोष अपरिहार्य आहे आणि म्हणूनच त्यांनी समाजातील वाईट चालीरितींवर उदा. जाती-व्यवस्था, अस्पृश्यता, बाल-विवाह आणि विधवाना वाईट वागणूक, यावर तीव्र टीका केली. त्याचा परीणाम म्हणजे टिळकांचे आणि त्यांचे वैमनस्य वाढत गेले. त्यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांवर केलेल्या आघांतामुळे त्यांची पुण्यातील पुराणमतवाद्यांची जिंवतपणी प्रेतयात्रा काढली व त्यांच्या विचांरास विरोध केला.

अत्यंत एकाकीपणाने त्यांनी हिंदू धर्मातील टाकाऊ व जुनाट रीतीभाती, सुधारण्याचा विडा उचलला होता. त्यांनी शतकानुशतके चालत आलेल्या जुन्या समजुती, क्रूर सामाजिक परंपरा आणि धार्मिक विधी यांपासून समाजाची मुक्तता करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मृत्यूपर्यंत, गोपाळ गणेश आगरकर त्यांच्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहीले आणि त्यांना जे योग्य वाटते. त्याचाच त्यांनी पाठपुरावा केला. आधुनिक महाराष्ट्रातील ती एक आदर्श आणि एकमेवाद्वितीय व्यक्ती होती. एक सशक्त आणि निरोगी व्यक्तीच एक निरोगी समाज घडवू शकतो. हा त्यांच्या क्रांतीकारक विचारांचा मुख्य विचार प्रवाह होता. त्यांनी समाजाला डोळे उघडे ठेवून, बुद्धीप्रामाण्यवादी दृष्टीकोन ठेऊन समाजातील चालीरिती, परंपरेकडे पाहावयास सांगितले. त्यांनी जगाकडे 'बघण्याचा दृष्टीकोन बदला व अंधश्रद्धा, ज्यांवर कोणतीही वस्तुनिष्ठ, तत्त्वनिष्ठ चर्चा होऊ शकत नाही अशा झुगारुन द्या' असे आवाहन केले.

आपली प्रगती तपासा :-

१) गोपाळ गणेश आगरकरांचे आधुनिक महाराष्ट्रातील एक बुद्धीप्रामाण्यवादी समाजसुधारक म्हणून कार्य विशद करा.

९.७ समारोप

मेहता, तैयबजी आणि तेलंग हे राष्ट्रीय पातळीवरचे अत्यंत प्रभावी व लोकप्रिय नेते होते. ज्यांनी समाजाला आधुनिकतेचे व मुक्ततेचे बाळकडू पाजले. त्यांना 'त्रिकूट' असे ओळखले जाते.

जांभेकर, लोकहीतवादी, दादोबा पांडुरंग, रानडे, फुले यांच्याप्रमाणेच आगरकरांनीही, अनेक प्रकारच्या कार्यांतून, संस्था, मंडळातून कार्यरत राहून, समाजाला आधुनिकतेचे मुक्ततेचे आणि माणुसकीचे धडे देण्याचे कार्य केले. त्यांच्या आधुनिक दृष्टीकोनाने, एक आधुनिक राष्ट्राच्या निर्मितीची प्रक्रिया सुरु केली.

९.८ प्रश्न

१) फिरोजशहा मेहतांचे कार्य स्पष्ट करा.
२) बद्रुद्दिन तैयबजींचे एक मुक्त विचारांचे नेते म्हणून कार्य सांगा.
३) के.टी. तेलंग यांचे कार्य विशद करा.
४) गो. ग. आगरकरांचे एक बुद्धिप्रामाण्यवादी म्हणून महत्व स्पष्ट करा.

❖❖❖❖

१०

संस्थात्मक राष्ट्रवाद

घटक रचना :

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रस्तावना
१०.२ बॉम्बे असोसिएशन
१०.३ पुना सार्वजनिक सभा
१०.४ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि महाराष्ट्र
१०.५ भारत सेवक समाज
१०.६ समारोप
१०.७ प्रश्न

१०.० उद्दिष्ट्ये

१) बॉम्बे असोशिएशनची (इ.स.१८५२) माहिती समजावून घेणे.
२) पुना सार्वजनिक सभेचे (इ.स.१८७०) कार्य अभ्यासणे.
३) महाराष्ट्रातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महत्त्व समजावून घेणे.
४) भारत सेवक समाजाचे योगदान स्पष्ट करणे.

१०.१ प्रस्तावना

सतराव्या शतकापासून महाराष्ट्र राजकीयदृष्ट्या कार्यशील आहे. दख्खन किंवा देश (पुणे, पंढरपूर आणि नाशिक) राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राचे महत्त्वाचे भूभाग होते. तथापि शिक्षणाच्या अभावी तळागाळातील जनतेचे राजकीय ज्ञान मर्यादीतच राहीले. त्यास अजून एक कारण म्हणजे राजकारणापेक्षा आर्थिक आणि तात्त्विक ज्ञानावर जास्त भर होता. पर्यायाने जरी ब्राह्मण लोक राजकीयदृष्ट्या जागृत असले तरी सर्वसामान्य जनता राजकीयदृष्ट्या तटस्थ किंवा अकार्यक्षमच होती. जरी मराठ्यांची राज्ये ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली गेली तरीसुद्धा एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतरच पुण्यात राजकीय घडामोडींना सुरुवात झाली.

मुंबई शहरात राजकीय जागृतीला एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच आरंभ झाला. इ.स.१८४१ मध्ये भास्कर पांडुरंग तर्खडकरांनी ब्रिटीशांच्या साम्राज्यावादी योजनांवर घाणाघाती हल्ला केला. इ.स.१८४८-४९ च्या दरम्यान, लोकहीतवादी गोपाळ हरी देशमुख यांनी सुद्धा

मराठी पेपर 'प्रभाकर' मधून ब्रिटीशांच्या साम्राज्यावादी धोरणांवर टीकात्मक अनेक लेख लिहिले. ह्या सगळ्या सामाजिक क्रांतीची परिणिती अखेर इ.स.१८५२ मध्ये पहीली राजकीय संघटना मुंबई शहरात स्थापन झाली. तिचे नाव होते 'बॉम्बे असोसिएशन'.

१०.२ बॉम्बे असोसिएशनचे कार्य

सगळ्यात प्रथम राजकीय पुढाकार मुंबई शहरातील व्यापाऱ्यांनी व शेठ लोकांनी घेतला. इतर वर्गांप्रमाणे शेठ समुहात जाती बंधन नव्हते. त्यांच्यामध्ये एक सामायिक उद्देश, राहण्याची पद्धत आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे समाजातील स्थान. अनेक जाती-धर्मांचे लोक व्यापार धंद्याच्या उद्देशाने उद्योग मोहीमांचे भागीदार म्हणून एकत्र आले. जशा त्यांच्या व्यापार मोहीमा यशस्वी होऊ लागल्या, तसे ते एकमेकांना एका वेगळ्याच उच्च वर्गाचे प्रतिनिधी ज्यांचे आर्थिक उद्दीष्ट एकच आहेत असे समजू लागले. तसेच त्यांचे स्वत:चे असे स्वतंत्र राजकीय विचार, दर्जा होता आणि ते स्वत:ला मुंबईचे स्वयंघोषित नेते समजू लागले.

त्यांचे सुरुवातीचे युद्ध हे ब्रिटीश नियंत्रित व्यवस्थेत स्वत:चे स्थान भक्कम करणे ह्यासाठी होते. सरकारने लवकरच त्यांना जनतेचे प्रतिनिधी म्हणून स्विकारले. त्यांनी स्वत:चे असे एक मंडळ बनविले. ज्यामधून सरकारने विविध कार्यालयीन व बिगर कार्यालयीन कामासाठी, कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करण्यास सुरुवात केली.

इ.स.१८४० पर्यंत, मुंबई शहराने, पाश्चात्य शिक्षित अशा नव्या तरुण वर्गाचा उदय होताना पाहीला जो एल्फिन्स्टन कॉलेजची निर्मिती होती. ह्या सगळ्या तरुण मंडळीची एकच ओळख व एकच उद्देश होता. त्यांचे वेगवेगळ्या गोष्टींवर प्रभुत्व होते. ज्याद्वारे ते एकाच दृष्टीकोनातून एक सामाजिक उद्देश प्राप्त करु शकत होते. तसेच इ.स.१८५० पासून त्यांनी शेठजी वर्गाबरोबर हात मिळवणी करुन त्यांच्या समाजात सुधारणा आणण्याचे प्रयत्न करु लागले. त्यांचे राजकीय क्षेत्रातील सुधारणांसंबंधी सहकार्य फार मोलाचे होते. बौद्धिकदृष्ट्या अत्यंत कुशाग्र समजल्या जाणाऱ्या आणि राजकीय क्षेत्रात सक्रीय असलेल्या या नव्या तरुण वर्गाने, सामाजिक बदलासाठी शेठजी लोकांबरोबर काम करावयास सुरुवात केली.

इ.स.१८५० पासून धार्मिक उत्साह, वांशिक भेदभाव व पिळवणूक आर्थिक व राजकीय अस्वस्थता संपूर्ण भारतात पसरत चालली होती. मुंबई व्यतिरिक्त कलकत्ता व मद्रास येथे शिक्षणाचा प्रसार सातत्याने होत होता आणि थोड्या प्रमाणात का होईना परंतु सामाजिक परिवर्तनाने आता वेग पकडला होता. तसेच देशाची एकात्मता वाढीस लागली होती. अशा या परिस्थितीत ईस्ट इंडीया कंपनी चार्टर ॲक्टच्या नूतनीकरणाने देशामध्ये विविध राजकीय सुधारणांचा वेग वाढला होता. इ.स.१८५१ मध्ये कलकत्ता येथे ब्रिटीश इंडीया असोसिएशनची आधीच स्थापना झाली होती. पुण्यात जानेवारी इ.स.१८५२ मध्ये डेक्कन सभेची स्थापना झाली. परंतु मुंबईचे नेते त्यांच्याच कामामध्ये व्यस्त होते.

त्यामुळे काही ठराविक लोकांच्या खांद्यावर ही जबाबदारी पडली की मुंबईचे स्वत:चे हक्क शाबूत ठेवायला, मुंबईलाही स्वत:ची अशी स्वतंत्र संस्था गरजेची आहे. नौरोजी फर्दूनजी, नारायण दिनानाथजी, डॉ. भाऊ दाजी लाड आणि दादाभाई नौरोजी हे त्यापैकी सगळ्यात बौद्धिक पातळीवर कार्यरत असलेल्यापैकी आहेत. परंतु एक गोष्ट स्पष्ट होती ती म्हणजे

शेठलोकांच्या आर्थिक मदतीशिवाय काहीही शक्य नव्हते. शेवटी त्यांनी काही शेठजी लोकांचे मन वळविण्यात यश मिळविले. त्यापैकी एक हो ते खरशेतजी नसरवानजी आणि दुसरे होते जगन्नाथ शंकरशेठ. अशाप्रकारे २६ ऑगस्ट १८५२ रोजी बॉम्बे असोसिएशनची स्थापना झाली. तिचे बहुतेक सदस्य हे मुंबईचे नामवंत व्यापारी व उद्योगपती होते. जगन्नाथ शंकरशेठ तिचे अध्यक्ष बनले. भाऊ दाजी आणि विनायकराव जगन्नाथजी हे असोसिएशनचे सचिव बनले.

स्थापना झाल्यानंतर लगेचच असोसिएशनच्या नेत्यांनी जनतेच्या मागण्या व गरजांसंबंधी माहीती गोळा करुन ब्रिटीश सरकारास सुपूर्द केल्या. त्यांनी त्या सर्व कारवाया पडद्यामागे राहून केल्या व शेठजी लोकांना प्रकाशझोतात ठेवले. असोसिएशनने एक याचिका तयार केली. भाऊ दाजजींनी तिचे संकलन व संपादन केले जे ब्रिटीश संसदेत मांडण्यात येणार होते. इतर गोष्टींपैकी, त्यामध्ये ईस्ट इंडीया कंपनीच्या न्यायिक राजकारभारासंबंधी अनेक तक्रारी होत्या ज्यात ईस्ट इंडीया कंपनीचे भारतीय राज्यकर्ते व पोलिस दल यांच्याही अरेरावी कारवायांसंबंधी उल्लेख होता. त्यात देशी भाषेतून शिक्षण व भारतीय संस्कृतीचा विकास हे ही मुद्दे होते.

याचिकेतील पहिला आराखडा काही शेठ लोकांकडून संमत झाला नाही, ज्यांना ब्रिटीशांच्या आणि ब्रिटीश व्यापाऱ्यांच्या खपामर्जीची भिती वाटली. याचिकेचा दुसरा सुधारित मसुदाही त्यांना विशेष आवडला नाही. म्हणून भाऊ दाजींनी असोसिएशनचे सचिव पदाचा राजीनामा दिला. याचा परिणाम म्हणून असोसिएशनमध्ये बुद्धीवादी आणि भांडवलदार अशी दुही पडली. इ.स.१८५६ मध्ये असोसिएशनमध्ये जास्ती करुन धनाढ्य असणाऱ्यांनाच प्राधान्य होते.ज्यांना सरकारच्या धनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन करणे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जे विभाग आहेत, त्यांच्या कार्यक्षमतेविषयी जागृत राहणे यात ज्यांना रस होता अशाच व्यक्ती असोसिएशनमध्ये होत्या.

थोडक्यात म्हणजे असोशिएशनचा एकूण पवित्रा सरकार समर्थकच होता. त्यांच्या अनेक लोकांनी तर ब्रिटीश सरकारला खंडणी दिली होती जेणेकरुन ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली भारतीयांच्या स्वातंत्र्याचे व विकासाचे काही हक्क उपभोगता येतील. त्यामुळे ब्रिटीशांच्या विरोधात असोशिएशन काही कार्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. क्रिस्तीन डॉबीनने म्हटल्याप्रमाणे, ''अत्यंत सौम्य, मवाळ सल्ला, सरकारला जनतेच्या भावना लक्षात घेऊन देण्यात येई आणि सरकारचा मुद्दा आणि विचित्र नियमांचे त्यांना समजतील असे अर्थ लावून जनतेला सांगण्यात येई. त्यांचा हेतू हा ब्रिटीश संरंजामशाहीला सहाय्य करणे व त्यातून स्वहीत साधणे हा होता. तसेच सरकारला माहीती पुरवून राजकारभार सुव्यवस्थित करण्यास हातभार लावणे त्यापैकी एका आघाडीच्या शेठने असे उघडपणे जाहीर केले की भारतीयांना यापेक्षा अधिक सवलतींची व आश्रयांची गरज नाही. जितकी सवलत आता मिळते तितकी पुरेशी आहे.'' असोसिएशनच्या शेठलोकांचा काहीच पाठींबा मिळत नसल्याचे लक्षात येऊनही, न डगमगता, भाऊ दाजी आणि नौरोजी फरदुनजीने असोसिएशनचे सेक्रेटरी या नात्याने त्यांचे भारताच्या राजकीय गरजांविषयीचे विचार अत्यंत स्वच्छपणे चुका न करता त्यांना शक्य होईल तितके मांडायचे ठरविले आणि म्हणूनच त्यांची संसदेला निवेदन पाठविले. त्यामधील मुद्दे थोड्याफार फरकाने कलकत्ता व मद्रास असोसिएशनच्या तत्त्वांवर आधारित होते. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे असे.

अ) भारतीय द्विदल पद्धती व सरकारची अत्यंत टोकाची केंद्रीकरणाची भूमिका यामुळे भारतीयांना अतिशय त्रास होत आहे.

ब) राज्यकारभार अतिशय खर्चिक आहे. संसदेच्या सल्लागार मंडळाच्या व्यक्ती ह्या प्रामुख्याने वशिल्यावर निवडून दिल्या जातात गुणांनुसार नाही. सदर प्रतिनिधींना कोणत्याही ठराविक जबाबदाऱ्या नाहीत कारण बहुतेक वेळा गव्हर्नरच सर्व बाबतीत निर्णय घेतो.

क) निवेदनात संसदेला नमूद केले होते की, सरकारच्या कारभाराच्या बाबतीत अतिशय गुप्तता बाळगण्यात येते जी सरकारी अधिकाऱ्यांना अत्यंत जाचक आहे. तसेच सध्याची सरकारची कारभारपद्धती ही वंशवादास खतपाणी घालणारी आणि सर्वसामान्यांना नुकसानकारक आहे. तसेच सामाजिक हिताने प्रेरीत झालेल्या काही संस्थांनी किंवा व्यक्तींनी केलेल्या जनहितयाचिका धुडकावून दिल्या जातात.

म्हणून असोसिएशनच्या निवेदनामध्ये इंडीयन सिव्हील सर्विसमध्ये सुधारणांची आवश्यकता आहे असे सूचित केले. इंडीयन सिव्हील सर्विसेसमध्ये ईस्ट इंडीया कंपनीच्या न्यायालयांची कायदेपद्धती, तसेच कार्यकारी सरकारमध्ये अनुभवी, प्रशिक्षित व्यक्ती जी इंग्लंडच्या कार्यालयामधून तयार झाली असेल, अशी व्यक्ती, जी लोकांचे प्रश्न समजावून घेऊ शकेल, लोकांपर्यंत ज्ञान पोहचवू शकेल, जिचे विविध बाबतीत सखोल, सर्वव्यापी विचार असतील, अशा व्यक्तींची गरज आहे. याउलट सद्य:यंत्रणा अशा व्यक्तीकडून चालविली जाते ज्यांचे बालपण इंग्लंडच्या, अप्रशिक्षित व्यवस्थेत जाते आणि अशा इंग्लंडच्या सद्गृहस्थांना न स्वत:च्या लायकीबद्दल जाणीव असते, न ती सुधारावी याविषयी चिंता.

निविदनामध्ये, इतर गोष्टींबरोबरच शिक्षण पद्धती सुधारावी शिक्षणासाठी अनेक सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशा मागण्या होत्या. त्यांनी सामाजिक कामाची गती वाढविण्याविषयी विनंती केली जेणेकरुन उत्पादन वाढेल. तसेच त्यांनी, भारतीय संघटनांची मागणी केली जी भारताविषयी संसदीय सल्ले घेऊ शकेल.

तथापि, हे अत्यंत महत्त्वाचे आहे की असोशिएशनच्या नेत्यांना ब्रिटीश सरकारवर मुख्यत्वे संसदेवर अतिशय विश्वास होता. तसेच दादाभाई नौरोजी आणि नौरोजी फरदूनजींना ब्रिटीश सरकारला मुक्त विचारांचे आणि ज्ञान प्रसारक असे सरकार म्हणण्यात काही वाटले नाही. दादाभाई नौरोजींना असे वाटे की ब्रिटीश सरकारने भारतास अनेक फायदे करुन दिले आहेत त्यामुळे हे सरकार कायम टिकून राहो.

असोसिएशनने बुद्धीवाद्यांचा कोणताही मुद्दा उचलून धरला नाही आणि भाऊ दाजींच्या राजीनाम्या नंतर तर असोसिएशन फक्त शेठजी लोकांचीच मालकी सत्ता झाली. तसेच शेठजींना सरकारच्या विरुद्ध किंवा त्यांच्या कार्याविषयी काहीही वक्तव्य करावयाचे नसल्याने, असोसिएशनच्या सभा कमी प्रमाणात व्हायला लागल्या. म्हणूनच, इ.स.१८६१ मध्ये नौरोजी फरदूनजींनी अत्यंत रोषाने असोसिएशनचा राजीनामा दिला. त्यामुळे असोसिएशन राजकीयदृष्ट्या पूर्णपणे अकार्यक्षम बनली. इ.स.१८६५ मध्ये, मुंबई शेअर बाजार कोसळल्यावर शहरातल्या सर्व राजकीय घडामोडी बंद पडल्या.

इ.स.१८६७ मध्ये बॉम्बे असोसिएशनचे पुनर्जीवन झाले जेव्हा नौरोजी फरदूनजी तिचे सचिव बनले. प्रामुख्याने ८७ सदस्य हे शेठजीवर्गातील होते. पुनर्जीवन झालेल्या असोसिएशनने सार्वजनिक सभांद्वारे त्यांचे कार्य सुरु केले. इ.स.१८६८ मध्ये त्यांची पहीली सार्वजनिक सभा झाली. बॉम्बे असोशिएशनने सिव्हील सर्विस परीक्षा इंग्लंड व भारतात एकाच वेळेस व्हावी अशी मागणी केली आणि अशा परीक्षांमध्ये, सहभागी होण्यासाठी भारतीयांच्या वयात वाढ करावी अशीही मागणी केली.

इ.स.१८६९ मध्ये डॉ.आर.जी.भंडारकर, एम.जी.रानडे आणि इतर नामवंत लोकांनी असोसिएशनमध्ये प्रवेश केला. इ.स.१८५७ च्या महान लढानंतर भारताची आर्थिक स्थिती अतिशय डबघाईस आली होती. तिच्यावर पुनर्विचार करणे, अत्यंत गरजेचे होते. इ.स.१८७० च्या उत्पन्न कर कायद्याच्या विरोधात बुद्धिवादी आणि शेठजी एकाच मंचावर आले. सभेस दोन हजाराच्या वर शेठजी, शेअर बाजारातील दलाल, तसेच असोशिएशनचे सदस्य हजर होते. ह्या सभेच्या दरम्यान, नामवंत उद्योगपती सर जमशेदजी जीजीभॉय आणि जगन्नाथ शंकरशेठ यांनी सरकारला सल्ला दिला की यापुढे जनतेशी संबंधित कोणताही कायदा उदा. उत्पन्न कर कायदा किंवा तत्सम, पास करण्यापूर्वी, जनतेशी सल्लामसलत करणे गरजेचे आहे. एन. व्ही. दाभोळकरांनी, सरकारच्या वाढत्या लष्करी खर्चाविषयी जाहीर निर्भत्सना केली. दाभोळकरांनी पुढे जाऊन भारतातील इंग्लिश संस्थांच्या बुद्धी विषयीही प्रश्न उभा केला आणि असे स्पष्टपणाने म्हटले की सध्याची संसदीय प्रतिनिधिक पद्धती हे निव्वळ थोतांड आहे, मृगजळ आहे.

तथापि शेठजीवर्ग व बुद्धीवादी अधिक काळापर्यंत एकत्र काम करु शकले नाहीत. ऑक्टोबर इ.स.१८७२ च्या असोसिएशनच्या मिटींगमध्ये त्यांचे दोन भाग पडले. शेठजी लोकांनी नौरोजी फर्दूनजीला असोसिएशनचा सचीव म्हणून दूर करण्याचा प्रयत्न केला. पण ते अयशस्वी ठरले. म्हणून दाभोळकर, शंकरशेठ, जीजीभॉय आणि आर.एन. खोत यांनी असोसिएशनचा राजीनामा दिला आणि ही पोकळी कायमस्वरुपी झाली जेव्हा असोसिएशनने, ब्रिटीश इंडीया असोसिएशन ऑफ कलकत्ता स्थापन केले. भारतीय अर्थसंकल्पाच्या निवेदनावर आणि अन्य एका निवेदनावर जी व्हाईसरॉयला पाठवायची होती जी भारतीय सनदी सेवांशी निगडीत होती, ह्या बाबतीत असोसिएशन सहाय्य केले.

त्या दरम्यानच्या काळात असोसिएशनने त्यांचे सक्रीय कार्यकर्ते गमावण्यास सुरुवात केली होती. इ.स.१८७४ मध्ये भाऊ दाजी लाड वारले. दादाभाई नौरोजींनी आपले बस्तान लंडनला हलविले. रानडेंनी पुण्यास स्थलांतर केले. भांडारकर आणि आत्माराम पांडुरंग यांनी त्यांचे लक्ष प्रार्थना समाजावर केंद्रीत केले. त्यांच्या आघाडीच्या सदस्यांपैकी फक्त फरदुनजी आणि व्ही.एन.मंडलिक राहीले. इ.स.१८७६ मध्ये फरदूनजीने बॉम्बे असोशिएशनचे पुनर्जीवन करण्याचा प्रयत्न केला आणि वादग्रस्त महानगरपालिका उपविधींनी सामाजिक बंड किंवा तत्सम प्रतिकारास मान्यता मिळाली. परंतु इ.स.१८७८ नंतर असोसिएशन पुन्हा एकदा अकार्यक्षम झाली, निष्प्रभ ठरली आणि इ.स.१८७९ मध्ये तिचे कार्य पूर्णपणे ठप्प पडले.

जरी बॉम्बे असोसिएशनने काही प्रमाणात उल्लेखनीय कामगिरी केली असली तरी तिच्याद्वारे काही महत्त्वाच्या व्यक्ती प्रकाशझोतात आल्या ज्यांनी केवळ मुंबई पुरतीच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची कामगिरी केली. आर.सी.मुझुमदार लिहीतात. ''... बॉम्बे असोसिएशनने मुंबईच्या राजकीय विचारवंतांपैकी अत्यंत आघाडीच्या नेत्यांचे प्रतिनिधित्व केले.''

आपली प्रगती तपासा :

१) बॉम्बे असोसिएशनचे कार्य थोडक्यात लिहा.

१०.३ पुना सार्वजनिक सभा (इ.स.१८७०) व तिचे कार्य

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आधीच अभ्यासल्याप्रमाणे महाराष्ट्रास देशाच्या सामाजिक व राजकीय जीवनात सहजपणे प्रवेश अपेक्षित होता. बंगालबरोबरच भारतीय समाजाच्या आधुनिक परिवर्तनासाठी अनेक यशस्वी चळवळी, मोहीमा राबविल्या गेल्या. त्यांचे आघाडीचे महान नेते होते न्यायमूर्ती रानडे, दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, गो. कृ. गोखले आणि बाळ गंगाधर टिळक. वैचारिक बौद्धिकदृष्ट्या आघाडीवर असलेल्या शहरात पुणे हे महाराष्ट्राचे मुख्य ठाणे होते. या नेत्यांच्या स्वतःच्या स्वतंत्र संस्था होत्या. पहिली संस्था होती डेक्कन असोसिएशन जिची स्थापना झाली जानेवारी इ.स.१८५२ मध्ये. परंतु ती जास्त काळ टिकू शकली नाही. नंतरची महत्त्वाची संस्था होती सार्वजनिक सभा. ती १८६७ मध्ये अस्तित्वात आली आणि रानडेंच्या महत्त्वाकांक्षी आश्रयाखाली, मार्गदर्शनाखाली वाढली. तिचे सेक्रेटरी होते. जी. व्ही. जोशी आणि नामवंत राजकीय नेते गोपाळ कृष्ण गोखले. सभेने सुरुवातीपासूनच चळवळीचे धोरण अंगिकारले. पुण्याच्या ओल्या दुष्काळात आणि दख्खनच्या दरोडेखोरी (इ.स.१८७५) दरम्यान, सभेने अत्यंत मोलाची कामगिरी पार पाडली.

सभेचा मुख्य उद्देश दख्खनच्या जनतेच्या गरजा व इच्छा व्यक्त करणे हा होता. त्यासाठी प्रसिद्ध निवडणूक पद्धती किंवा व्यवस्थेद्वारे नियुक्त होणे हाही होता. सभेच्या सदस्यांनी मुंबई प्रांतात मराठी बांधवांना व्यापक प्रतिनिधित्व मिळावे म्हणून विशेष प्रयत्न केले. सभेने मराठी जनतेचे, जी स्वतःची मते मोकळेपणाने मांडू शकत नाही अशा समाजाचे प्रतिनिधित्व केले. तसेच अधिकाऱ्यांसमोर, जनतेच्या हिताचे मुद्दे मांडू लागले मुख्यत्वे करुन, सुशिक्षित वर्गाच्या मागण्या आणि समाजाच्या काय गरजा आहेत व काय परिस्थिती आहे, याचेही विवरण करण्यात येऊ लागले.

पुना सार्वजनिक सभेचे सदस्य होते सरदार, जहांगिरदार, इनामदार, सावकार आणि समाजातील सुशिक्षित उच्चभ्रू. सभेने लवकरच राष्ट्रीय व राजकीय पातळीवर सक्षम व सक्रीय होण्यास सुरुवात केली. सरकारला स्मरणपत्रिका आणि निवेदने पाठविण्याच्या व्यतिरिक्त त्यांनी राजकीय पातळीवर अभिनव प्रयोगांस सुरुवात केली. त्यापैकी एक म्हणजे स्वदेशी चळवळ ज्याद्वारे देशी उद्योगांना पुनर्जीवन मिळेल, चालना मिळेल. दख्खनमध्ये शाखांचे जाळे विणण्यात आले आणि संपूर्ण महाराष्ट्रात मोहीम उघडली ज्याद्वारे गरीब शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांच्या जमिनीविषयक काय काय जाचक नियम आहेत, यावर संशोधन करण्यात येईल. जी.व्ही.जोशींच्या (ते सार्वजनिक काका म्हणून जास्त प्रसिद्ध होते) अथक आणि समर्थ

सचिवपदाखाली सभा ही एक समर्थ माध्यम झाली ज्याद्वारे, सरंजामशाहीखाली सामान्य जनता कशी भरडली जातेय याचा प्रत्यय जनतेला आला.

सभेने इ.स.१८७० च्या जमिन महसूल कराच्या विरोधात लढा पुकारला. त्यांनी कमी करासाठी चळवळ सुरु केली. जेव्हा इ.स.१८७३ मध्ये गरीब शेतकऱ्यांनी कर भरण्यास नकार दिला. तेव्हा सरकारला त्यामागे सभेचा हात असल्याचा संशय आला. सार्वजनिक सभेने इ.स.१८७५-१८७७ च्या ओल्या दुष्काळा दरम्यान जनतेला मदत केली. त्यांनी मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवकांना पाठविले, तसेच झालेल्या आर्थिक नुकसानीचा व जीवितहानीचा अंदाज घेतला. त्यांच्या अहवालानुसार, मुंबई सरकारने जनतेला ह्या भीषण प्रसंगातून बाहेर काढण्यासाठी अत्यंत दुर्दैवी प्रयत्न केले आहेत. त्यासंबंधी सभेने सरकारची खरडपट्टी काढली. सभा स्थानिक वृत्तपत्रांच्या आधारे सरकारचे नाकर्तेपणाचे धोरण, जनतेच्या त्रासासंबंधी कानाडोळा करण्याची वृत्ती यासंबंधी आवाज उठवित असे.

दख्खनचे दरोडे वासुदेव बळवंत फडकेंनी इ.स.१८७९ मध्ये आखले होते. तसेच इतर काही घटनांचा दाखला देऊन सर रिचर्ड टेंपलने ह्या दरोड्याचे वर्णन 'ब्रिटीशविरोधी गुप्त कारस्थान' असे हास्यास्पदरित्या केले आहे. रिचर्ड टेंपल हा तेव्हाचा गव्हर्नर जनरल होता. त्यांनी सुशिक्षित चित्पावन ब्राह्मण हे ब्रिटीश सरकारशी एकनिष्ठ नाहीत असे नमूद केले तसेच फडकेंचे बंड आणि सभेचा निकटचा संबंध असावा असेही भाकीत केले. टेंपलचे प्रत्युतर हे ब्रिटीश सरकारमधील उच्च पदस्थ अधिकारी सभेची कशी कुचेष्ठा करु इच्छित होते ते दाखवून दिले. परंतु त्यांच्या प्रतिक्रिया त्यांच्या मर्यादीत ज्ञानाप्रमाणेच फसव्या ठरल्या हे रानडेंनी लवकरच सिद्ध केले. रानडेंनी जरी मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या योजनांवर उदा. जमिन महसूल आणि ओल्या दुष्काळाशी संबंधित योजना यांच्यावर टीका केली असली तरी रानडे हे मवाळमतवादी होते आणि सरकारच्या चांगल्या धोरणांचे त्यांनी सदैव स्वागतच केले होते ही बाब ब्रिटीश स्वकार करावयास विसरले.

सभेची एक महत्त्वाची बाब अशी की, सभेने सदैव मुक्त पुरोगामी आणि लोकशाही विचारांचे समर्थन केले. तिच्या सुरुवातीपासूनच सभेने घटनेमध्ये निवडणूक पद्धती नमूद केली होती. सुरुवातीलाच खूप काळजी घेऊन ती एक निवडून आलेल्या व्यक्तींची सभा म्हणून स्थापना केली होती. म्हणून असे म्हणावे लागते की, निवडणूकांची तत्त्वप्रणाली ही भारतीयांच्या मनात आधीपासून रुजली होती. ती परकीयांची भेट आहे किंवा परकीयांची देन आहे असे मुळीच नव्हते.

रानडे आणि जोशींच्या अथक प्रयत्नांमुळे पुना सार्वजनिक सभा, भारतातील अग्रगण्य सभा बनली. खरेतर सभेने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सुरुवातीच्या सभा आयोजित केल्या. त्यानंतर तिला वर्गणीसुद्धा मिळवून दिली. गोखलेंचा वाढता दबदबा यामुळेही संस्थेस भारतातील इतर संस्थांच्या बरोबरीचे स्थान मिळाले. त्यांचे त्रैमासिक वृत्तपत्र, सदस्यांच्या अनेक मतांसंबधी, महत्त्वाच्या विषयांविषयी, सामाजिक हिताच्या बाबींविषयी, व्यवस्थित व योग्यरितीने माहिती प्रसिद्ध करीत. शेती आणि अर्थ विषयक प्रश्नांविषयी, अभ्यासात्मक विचार वृत्तपत्रांमध्ये सदैव येतात. जरी मुंबई सरकारने सभेचे मान्यतापत्र रद्द केले तरी सभेच्या वृत्तपत्रातून छापून आलेल्या लेखांचा विचार केला जायचा. हळूहळू सभेच्या कारवायांकडे दुर्लक्ष करणे सरकारला कठीण जाऊ लागले.

इ.स.१८९५ मध्ये सार्वजनिक सभेतील राजकीय वादंग टोकाला पोहचल्यामुळे सभेमध्ये दोन गट पडले. मवाळ विचारांचे नेते जसे न्यायमूर्ती रानडे, जी. के. गोखले आणि त्यांचे अनुयायी यांनी सभेचा त्याग केला आणि सभेचे नेतृत्त्व बाळ गंगाधर टिळकांकडे आले. इ.स.१८९७ मध्ये सरकारने एक आज्ञापत्र काढले. त्यानुसार पुना सार्वजनिक सभेला, सद्य:परिस्थितीत ज्या पद्धतीने तिचा कारभार चालतो त्याचा विचार करता जनतेच्या प्रश्नांवर सरकारला सुनावण्याचा कोणताही अधिकार, एक स्वंतत्र संस्था म्हणून राहत नाही असे जाहिर केले. ही सरकारची एक चाल होती. त्यानुसार त्यांच्या कर्मठ टीकाकारांना थोडा आळा बसेल अशी त्यांना अपेक्षा होती. परंतु, सभेचे उच्चाटन झाले तरी त्यांच्या कारवाया व चळवळी बिनबोभाट चालूच राहील्या.

न्यायमूर्ती रानडे यांचे शिष्य गोखले, जी. व्ही. जोशी आणि लोकमान्य टिळक, यासारख्या अद्वितीय पुढाऱ्यांमुळे सार्वजनिक सभा भारतातील एक महत्त्वाची प्रभावी अशी संघटना बनली. त्यांची मते आणि विचारांचे जनतेकडून कायम स्वागतच झाले. त्या कारणाने सभेविषयी ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मनात भीती निर्माण झाली. सभेने अनेक राजकारण्यांना, गोखले व टिळकांना धरुन राजकारणाचे बाळकडू पाजण्यापासून घडविण्यापर्यंत सर्व प्रयत्न केले. ज्यांनी पुढे जाऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी विशेष योगदान दिले.

आपली प्रगती तपासा :-

१) पुना सार्वजनिक सभेसंबंधी थोडक्यात टीप लिहा :

_____

_____

_____

_____

_____

१०.४ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि महाराष्ट्रातील कार्य

राजकीय जागृती आणि संघटनांची परिणती अखेरीस इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या स्थापनेत झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना २८ डिसेंबर १८८५ मध्ये झाली. त्यांच्या अधिकृत स्थापनेनंतर तात्पुरत्या स्वरुपाचे गट पाडण्यात आले. ज्याद्वारे देशातील विविध भागातून भारतीयांना एकत्र आणता येईल व सामायिक उद्देशासाठी लढा देता येईल. संघटनात्मक प्रगती एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून मुंबई, पुणे, कलकत्ता व मद्रास ह्या भागात होऊ लागली. ज्याचा उपयोग, विविध कल्पना, सूचना यांचे संकलन करुन उत्साही कार्यकर्त्यांना देण्यात येई. इ.स.१८७५ मध्ये संपूर्ण भारतभर चळवळ सुरु झाली. मुंबई, पुणे आणि बंगालच्या नेत्यांच्या कारवायामुळे देशातील चळवळींना प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे संपूर्ण भारत अभियानास ह्या सर्व राजकीयदृष्ट्या कार्यरत असणाऱ्या ठिकाणांपासून प्रोत्साहन व पाठींबा मिळत होता.

आधी पुण्यास प्राधान्य देण्यात आले. परंतु त्यानंतर, इंडीअन नॅशनल काँग्रेसचा जन्म मुंबई शहरात होण्याचे नक्की झाले. ॲलन ऑक्टेव्हियन ह्युम जो डिसेंबर १८८४ मध्ये मुंबईला आला होता, त्यांने मुंबई व पुण्याच्या नेत्यांबरोबर, राजकीय चर्चासत्राची मालिकाच सुरू केली.

त्यांत सुशिक्षित भारतीयांचे राजकीय योगदान काय असावे, यावर चर्चा रंगली. आधी लॉर्ड रिपनने व्यक्त केल्याप्रमाणे, मुंबईप्रांतील हुशार लोक हे भारतातील उत्कृष्ठ लोक आहेत असे म्हटले होते. त्याने मुक्त कंठाने मुंबईचे नेते व्ही.एन.मंडलिक, फिरोजशहा मेहता, बद्रुद्दिन तैयबजी, के.टी.तेलंग, जे.मु.याज्ञिक यांची स्तुती केली. रिपनने हे ही मान्य केले की पुना सार्वजनिक सभा ही एक अतिश समर्थ अशी हुशार माणसांनी चालवलेली संस्था आहे.

ह्या विचारांचा ह्युमवर परिणाम झाला आणि म्हणून मुंबई प्रांतातील सदस्यांवर त्याचा कलकत्याच्या लोकांपेक्षा, जास्त भर होता. त्याला त्याची 'अखिल भारतीय संघटना' (All India Association of India) ही संकल्पना अंमलात आणावयाची होती. तसेच, मुंबईचे सामाजिक जीवन हे कलकत्त्यापेक्षा जास्त मुक्त, वर्गहीन व व्यापक होते. मुंबईच्या नेत्यांचे विचार, देशासंबंधीचे विचार हे अधिक मुक्त, मवाळ व व्यापक होते. मुंबईत अँग्लो इंडीयन्सना कलकत्त्यापेक्षा जास्त चांगली वागणूक मिळे. तसेच मुंबईने संपूर्ण देशाला आवाहान केले की लॉर्ड रिपनला इल्बर्ट बिल तडजोडीवरुन आता अधिक खजिल करु नये व त्यांच्या सन्मानार्थ एक मोठा निरोप समारंभाचा कार्यक्रम त्याने आखला.

अशा कारवायांमुळे मुंबईच्या नेत्यांचा वरचष्मा कायम राहीला. त्यामुळे मुंबई व पुणे ही दोन ठिकाणे भारताच्या विविध भागाच्या प्रतिनिधींच्या संमेलनासाठी नक्की करण्यात आली.त्यामागचा उद्देश होता. अ) देशातील राजकीय घडामोंडीवर नियंत्रण ठेवणारी राष्ट्रीय संस्था उभारणे, ब) संसदेला सादर करण्यात येणाऱ्या मागण्यांचा मसुदा - आराखडा तयार करणे या निमित्ताने ही अत्यंत महत्त्वाची अशी सभा होती. या सभेला ह्यूम, विल्यम वेडरबर्न, दादाभाई नौरोजी, एम.जी. रानडे, नौरोजी फरदूनजी, फिरोजशहा मेहता, के.टी. तेलंग आणि मुबंईचे इतर नामवंत नेते (जानेवारी इ.स.१८८४) हजर होते. एक केंद्रीय समिती स्थापण्यात आली जी लंडनच्या एखाद्या दैनिकाला भारतातील माहीती गोळा करुन टेलिग्राफद्वारे माहीती पाठवू शकेल. त्या समितीमध्ये मेहता, दादाभाई नौरोजी, तेलंग आणि बद्रुद्दिन तैयबजी होते. तसेच सभेमध्ये अजून एका नॅशनल इंडीयन असोसिएशनची मागणी पास झाली. ज्यात जनतेच्या दु:खाविषयी व त्यावरील उपायांविषयी पद्धतशीररित्या कार्यवाही करता येईल. मेहता, तेलंग आणि तैयबजी यांना नामवंत मंडळीकडून संस्थेसाठी आर्थिक व सामाजिक हातभार लावण्याचे वचन मिळाले.

पुणे सुद्धा राजकीय दृष्ट्या आघाडीवर होते ज्यांचे संपूर्ण श्रेय एम. जी रानडे, जी.वी. जोशी, चिपळूणकर आणि जी.के.गोखले यांना जाते. पुणे सार्वजनिक सभा अतिशय प्रभावी व समर्थ अशी संघटना बनली. तसेच इ.स.१८८० च्या सुमारास मुंबईच्या नेत्यांमध्ये आणि असोसिएशनच्या कार्यकर्त्यांमध्ये अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते आणि म्हणूनच सभेचे नेते ह्यूमच्या ऑल इंडिया असोसिएशनशी अतिशय जवळून संबंधित होते.

डिसेंबर, १८८४ च्या आधी रघुनाथ रावांच्या घरी एक सभा घेण्यात आली, जे मद्रासचे फार मोठे धर्म विद्वान होते. त्या सभेत असे ठरले की, देशातील विविध संघटनांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने पुण्यात एक संमेलन भरविण्यात येईल. संमेलनाला नाव दिले जाईल 'कॉन्फरन्स ऑफ इंडीयन नॅशनल युनियन'. त्यानंतर असे ठरविण्यात आले की सार्वजनिक सभेच्या नियंत्रणाखाली २८,२९ व ३० डिसेंबरला १८८५ मध्ये कॉन्फरन्स भरविण्यात येईल.

दुर्दैवाने, पुण्यामध्ये पटकीची साथ पसरल्याने सभेला कॉन्फरन्ससाठी आवश्यक तयारी करताच आली नाही आणि पर्यायाने कॉन्फरन्स मुंबईला हलविण्याचे ठरविले. एस.आर.मेहरोत्रा म्हणतात, ''नियतीने पुण्याला इंडीयन नॅशनल कॉंग्रेसच्या पहील्या समेलनाचे मानकरी होण्यापासून परावृत्त केले.'' मेहता, तेलंग व तैयबजी या त्रिकुटाच्या सर्व साधनयुक्ततेमुळे तसेच गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजचे आणि बोर्डींग ट्रस्टचे मॅनेजर ज्यांनी गवालिया टँकच्या वरील इमारती असोसिएशनला वापरायला दिल्या आणि तेथील दिवाबत्ती, खुर्च्या इत्यादींची सर्व आवश्यक तयारीची जबाबदारी उचलली. त्यामुळे काँग्रेसला नियोजित वेळेनुसार संमेलनाची कार्यवाही सुरु करता आली. मुंबईच्या विद्वानांनी ह्या कार्यक्रमासाठी अत्यंत महत्त्वाची कामगिरी पार पाडली.

इ.स.१८८५ ते १९१५ च्या दरम्यान आणि त्यानंतर महाराष्ट्रातील नेत्यांनी काँग्रेसच्या प्रगतीसाठी आणि त्यास आकार देण्याऱ्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी केली. काँग्रेसच्या पहिल्या ४० वर्षांत अनेक कार्यकर्ते व पाठींबा देणारे हे प्रामुख्याने मुंबई - पुण्याचे असत. काँग्रेसचा मुंबई प्रांताशी जवळचा संबंध असल्याने अनेक फायदे झाले. गॉडर्न जॉन्सन म्हणतात, ''अखिल भारतीय चळवळ, भारताच्या अन्य कोणत्याही भागात अशा प्रकारे विकसित झाली नसेल.'' अशा संबंधामुळे, महाराष्ट्रातील नेत्यांना राष्ट्रीय पातळीवरुन, घडामोडींमध्ये लक्ष घालता आले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची अनेक अधिवेशने मुंबई व पुण्यात झाली उदा. इ.स.१८८९, इ.स.१८९५, इ.स.१९०४, इ.स.१९१५ आणि विशेष अधिवेशन इ.स.१९१८. दादाभाई नौरोजी, बद्रुद्दीन तैयबजी, फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक यांनी काँग्रेसच्या कार्यात अत्यंत महत्त्वाचे योगदान दिले आणि अनेक योजना पार पाडावयास मदत केली.

इ.स.१९०५ पर्यंत, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही फक्त धनाढ्य व्यक्तींची निवेदने किंवा मागण्या करणारी संस्था होती. त्यांचे आधारस्तंभ नौरोजी, मेहता, गोखले आणि इतर हे राजकीय बाबतीत मवाळ परंतु मुक्त विचारांचे होते. इ.स.१९०० पर्यंत त्यांच्या कारवाया ह्या अत्यंत नम्र विनंत्या, निविदा, सन्माननीय प्रतिनिधित्व या स्वरुपाच्या होत्या. थोडक्यात म्हणजे, अतिशय नम्रपणा हाच मूळच्या मावाळ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा काम करण्याचा पवित्र होता.

इ.स.१८९० नंतर मात्र महाराष्ट्रमध्ये कॉंग्रेसच्या अंतर्गत गंभीर आर्थिक संकट ओढले. स्थानिक राजकीय वाद टोकाला पोहचले. गोखले, मेहता, नौरोजी हे मवाळ मतवादी एका बाजूला व टिळक व इतर जहाल मतवादी दुसऱ्या बाजूला. अशा वादांमुळे राष्ट्रीय पातळीवर राजकारणावर परिणाम झाला. पर्यायाने एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात व इ.स.१९०८ च्या सुमारास राष्ट्रीय चळवळीमध्ये असंतोषाचेच वातावरण होते. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये विभाग पडल्याने, राष्ट्रीय पातळीवर त्याचा परिणाम झाला कारण महाराष्ट्रातील काँग्रेसच देशाचे राजकारण चालवित होती. त्यामुळे जहाल व मवाळ हा संघर्ष तीव्र झाला. केवळ फिरोजशहा मेहता व गोपाळ कृष्ण गोखलेंच्या मृत्यूनंतर व पहिल्या महायुद्धास सुरूवात झाल्यामुळे, काँग्रेसमधील वादळ शांत झाले.

इ.स.१८९० पर्यंत मवाळमतवादी नौरोजी, गोखले, मेहता ज्यांच्यावर पाश्चिमात्य विचाराचा प्रभाव होता असेच नेते, काँग्रेसची दिशा ठरवित होते. जरी त्यांनी काही प्रमाणात, ब्रिटीशांचे मन वळवून, काही सुधारणा घडवून आणल्या तरी सामान्य जनतेला सर्वार्थाने समावून

घेण्यास ते यशस्वी ठरले. लोकमान्य टिळकांना ब्रिटीशांच्या मनाचा अचूक अभ्यास होता. त्यांनी फार कुशलतेने सामान्य जनतेला राजकारणात आढून घेतले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करुन मराठ्यांचे मन ब्रिटीशांच्या दुष्ट राजकारणाविरोधात करण्याचा प्रयत्न केला. मवाळमतवाद्यांना मात्र ते जमले नाही.

ब्रिटीशांचा अरेरावीपणा व उद्दामपणामुळे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्य करण्याच्या पद्धती हळूहळू बदलायला लागल्या नम्र मागण्या व निवेदनांची जागा, ब्रिटीशांशी उघडपणाने असंतोष, बंड यांनी घ्यायला सुरुवात झाली. टिळक गर्जले : ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.'' या उलट, महाराष्ट्रातील अतिरेकी कारवायांमुळे ब्रिटीशांनी बंड चिरडून काढण्यासाठी अधिक कडक पावले उचलली. तसेच शांतपणाने प्रतिकार, मुख्यत्वे, स्वदेशीची चळवळ, असहकार, सत्याग्रह अशा प्रकारच्या माध्यमामुळे काहीच न करु शकणाऱ्या असहाय्य जनतेकडे ब्रिटीशांशी झुंजण्यासाठी एक शस्त्र मिळाले.

मुंबईतील मुस्लिमांनी मात्र भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला कोणतीही मदत केली नाही. समकालीन वर्तमानपत्रे व लेखकांनी नमूद केले आहे की इंडिअन काँग्रेसला पाठींबा देण्याच्या बाबतीत मुसलमानांचा एकूण दृष्टीकोन नकारात्मकच होता. एकतर ते तटस्थ राहीले किंवा त्यांनी विरोध केला. फक्त काही बोटावर मोजता येण्यासारखे मुस्लिम उदा. तैयबजी इ.स.१८८७ मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यांनी पाठींबा दिला आणि राजकारणाद्वारे देशासाठी कार्य केले.

इ.स.१९०० नंतर मात्र टिळक व त्यांचे महाराष्ट्रातील अनुयायी आणि अरबिंदो घोष व बिपिन चंद्र पाल, बंगाल मधील नेत्यांबरोबर संबंध वाढीस लागले. फाळणी विरुद्ध व स्वदेशी चळवळीच्या निमित्ताने ते अधिक जवळ आले व बंगाल व मुंबईमधील राजकीय संबंध अधिक दृढ झाले. त्यानंतर इ.स.१९२० पर्यंत लोकमान्य टिळक हे आघाडीचे नेतृत्व होते. टिळक हे काँग्रेसचे सर्वात जास्त प्रतिभावान नेते होते. सगळ्या राष्ट्रीय चळवळीत त्यांचा सहभाग होता. परंतु इ.स.१९१५ पर्यंत गोखले व मेहताही काँग्रेसचे प्रतिभाशाली नेते होते. मेहतांनी प्रामुख्याने त्यांच्या मृत्यूपर्यंत मुंबईकरांचे नेतृत्व टिकवून ठेवले.

अशा प्रकारे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व महाराष्ट्र यांचे फार जवळचे नाते निर्माण झाले. महाराष्ट्रातील नेत्यांनी, व्यक्तिगत पातळीवर कितीही भेदभाव असले तरी पहिल्या तीन दशकांमध्ये काँग्रेसच्या उभारणीसाठी मोलाचे सहाय्य केले. त्यांच्या लेखांतून, भाषणांतून आणि कारवायांमधून दादाभाई नौरोजी, एम. जी. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता व बाळ गंगाधर टिळक व अनेक महाराष्ट्रीयन नेत्यांनी इंडीअन नॅशनल काँग्रेसच्या उभारणीसाठी, विकासासाठी महत्त्वाचे योगदान दिले.

१०.४.१ आपली प्रगती तपासा :-

१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महाराष्ट्रातील कार्य थोडक्यात सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१०.५ भारत सेवक समाज व योगदान

इ.स.१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उभारणी नंतर, महाराष्ट्रातील जुन्या पद्धतीच्या स्थानिक संस्था खऱ्या अर्थाने लोप पावल्या. तसेच राजकारणातील अंतर्गत, वैचारिक वाद, नेतृत्त्वपदासाठी भांडणे या कारणाने त्या संस्था कमकुवत ठरल्या. कालांतराने काही नेत्यांनी स्वत:च्या स्वतंत्र संघटना उभारण्यास सुरुवात केली. ज्याद्वारे त्यांना विशिष्ट उद्दिष्ट्ये व हेतू साध्य करता येईल. संघटनेच्या कार्याला ठराविक दिशा देता येईल. भारत सेवक समाज ही अशाच प्रकारची एक संघटना होती.

इ.स.१९०५ मध्ये गोपाळ कृष्ण गोखलेंनी, सर्वंटस् ऑफ इंडिया ही संस्था स्थापन केली. त्या मागचा हेतू हा, ज्या ज्या व्यक्तींना देशाच्या हिताच्या दृष्टीने, देशाची आर्थिकता आबाधित ठेवून, घटनात्मक मार्गाने प्रयत्न करावयाची इच्छा आहे अशांना प्रशिक्षण देणे. संस्थेत प्रवेश करते वेळी सभासदांना सात शपथा घेणे, बंधनकारक होते. त्या शपथा होत्या :

१) देशाला सर्वात चांगले द्यायचे व देशाच्या हिताचाच विचार करावयाचा.
२) देशातील सर्वांना स्वत:चे बांधव समजून, जात पातीची बंधन झुगारुन, एकत्रितपणे कार्य करायचे.
३) देशाची कुठलाही स्वार्थ वा मोबदल्याची अपेक्षा न करता, अत्यंत निरपेक्षभावाने सेवा करायची.
४) सोसायटीने जे काही, सदस्यांना व त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येईल, त्यातच समाधान मानावयाचे, स्वत: वेगळी मिळकत करण्याचा प्रयत्न करु नये.

जरी हि सोसायटी पूर्वीच्या सामाजिक संस्थांच्या तत्त्वावर काम करीत असली तरी, तिने कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांचे सदसत्त्व अत्यंत बारकाईने निवडलेल्या लोकांपुरते मर्यादित राहील, ज्यांना खरोखरीच राष्ट्राच्या हितासाठी प्रयत्न करावयाचा होता. त्यांनी स्वत:च्या सदस्यांसाठी काहीही कारवाया केल्या नाहीत. उदा. राजकीय, शैक्षणिक, आर्थिक वा सामाजिक त्यांचे सदस्य हे केवळ मातृभूमीची ठराविक प्रकारची सेवा करण्यासाठी प्रशिक्षित झाले होते. सोसायटीने तीन लेख प्रसिद्ध केले. १) सर्व्हन्टस् ऑफ इंडिया २) ज्ञान प्रकाश (मराठीतून) आणि ३) हितवाद (साप्ताहीक).

सोसायटीची अनेक कार्ये होती व त्यांचे कार्यक्रमही कौतुकास्पदच होते. त्यांच्या पाच नामवंत सदस्यांच्या कामगिऱ्या (जी.के.गोखले, श्रीनिवास शास्त्री, एन.एम.जोशी, एच.एन.कुंजरु, राम बाजपाई) ह्या सोसायटीचे राष्ट्रकार्यातील योगदान स्पष्ट करण्यास समर्थ आहेत. गोखले आणि शास्त्रींनी राजकारणात उडी घेऊन, फार मानाचे स्थान पटकाविले.

जोशींनी इ.स.१९११ मध्ये सोशल सर्विस लिगची मुंबईमध्ये स्थापना करुन सामान्य जनतेच्या हितासाठी अनेक पावले उचलली. केवळ पंधरा वर्षातच लिगने सतरा रात्रशाळा सातशे प्रौढांसाठी, अर्धवेळ काम करणाऱ्या गिरणी कामगारांसाठी तीन दिवसशाळा, अकरा वाचनालये व वाचण्याच्या खोल्या आणि दोन अंगणवाड्यां सुरु केल्या. तसेच लिगने शंभर पेक्षा जास्त सहकारी पतसंस्था, मुलांसाठी व्यायामशाळा सुरु केल्या. बाजपाईंनी बॉईज क्लब व स्काऊट कॉर्पस् सुरु केले.

सोसायटीने झोपडपट्टीवासीयांसाठी मोलाची कामगिरी पार पाडली. भारताच्या इतर भागातही त्यांनी शाखा उघडल्या. त्याचे अतिशय सक्रीय कार्यकर्ते यांनी मोलाचे सामाजिक कार्य केले. त्यांच्या काही शाखा व कार्यकर्ते अनेकविध प्रकारच्या कार्यात सामील होते. उदा. ग्रामीण भागाचा विकास व पुनरर्चना, भिल्लाचे पुनर्वसन स्त्रियांचे शिक्षण व विकास इ.

१०.६ समारोप

जरी बॉम्बे असोसिएशनने, मर्यादित स्वरुपाचे काम केले तरी शहराच्या व विशेषतः देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या व्यक्तींना प्रकाशझोतात आणले. सार्वजनिक सभा, ही राष्ट्रीय पातळीवरची आघाडीची संघटना होती ज्यात अनेक राजकीय सामाजिक विचारांना खतपाणी घालण्यात आले. महाराष्ट्रातील नेत्यांनी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या विकासासाठी फार मोलाचे योगदान दिले. भारत सेवक समाजाने स्त्रिया व सामाजिकदृष्ट्या मागसलेल्या भिल्लांसाठी विशेष प्रयत्न केले.

१०.७ प्रश्न

१) बॉम्बे असोशिएशनचे उद्दिष्ट्ये व हेतू याबद्दल सविस्तर लिहा.
२) पुना सार्वजनिक सभेचे, महाराष्ट्रातील व राष्ट्रीय चळवळीतील योगदान स्पष्ट करा.
३) राष्ट्रवादाला पाठींबा देण्याच्या उद्देशाने, भारत सेवक समाजाचे योगदान विशद करा.
४) थोडक्यात टीपा लिहा :
   अ) महाराष्ट्र आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस.
   ब) सार्वजनिक सभा.

❖❖❖❖

११

पुनरुज्जीवन आणि प्रखर राष्ट्रवाद

घटक रचना :

११.० उद्दिष्ट्ये
११.१ प्रस्तावना
११.२ विष्णुबुवा ब्रह्मचारी
११.३ विष्णुशास्त्री चिपळूणकर
११.४ आर्य समाज
११.५ थिऑसॉफिकल सोसायटी
११.६ गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव
११.७ समारोप
११.८ प्रश्न

११.० उद्दिष्ट्ये

१) विष्णुबुवा ब्रह्मचारींचे कार्य समजावून घेणे.
२) विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या कार्याचा अभ्यास करणे.
३) आर्य समाज, थिओसॉफिकल सोसायटी यांच्या योगदानावर प्रकाश टाकणे.
४) गणेशोत्सव व शिवजयंती यांचा चळवळ म्हणून अभ्यासणे.

११.१ प्रस्तावना

आतापर्यंत तुम्हाला कळलेच असेल की एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत सामान्यपणे भारत आणि विशेषतः महाराष्ट्र दोहोंची अधोगती होण्यास सुरुवात झाली होती. जेव्हा समाज अशा स्थितीत असतो, तेव्हा तो तीन मार्गांचा अंगीकार करतो. १) बंड २) बदल ३) पुनरुत्थान. या तीन प्रवृत्ती आपण लक्षात घेतल्या पाहीजेत की त्या कधीही वेगवेगळ्या राहू शकत नाही. त्या एकमेकांस मिसळल्या जातात. एकीचा प्रभाव दुसरीवर पडतो परंतु त्या प्रवृत्ती संपूर्णपणे भिन्न विचारांच्या व कृतींच्या आहेत. पहिले बंड हे सध्याच्या पारंपारिक व जुनाट पद्धती आणि दृष्टीकोनाविरुद्ध होता. बंडाचा उद्देश जुन्या पारंपारीक कल्पनांना बदलून नवीन कल्पना व मूल्यांची जोपासना करणे, समाज सुधारकांना, क्रांतीकारकांप्रमाणेच, सध्य परिस्थितीचा विचार करता अस्वस्थ व्हावे लागले झाले आणि बदल अपरिहार्य आहे याची जाणीव झाली. तथापि क्रांतीकारकांप्रमाणे भूतकाळाशी त्यांचे भांडण नव्हते. त्यांनी समाजामध्ये बदल, हा नवीन

कल्पना, मूल्ये यांची समाजाला ओळख करुन देऊन अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले. जरी तो एक समर्थ बंडखोर असला तरी समाजात राहूनच जुन्या विचारांची जाळीजळमटे दूर करण्याचे काम तो करी. उदाहणार्थ, एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील काही बुद्धीवादी मुक्त विचारांचे सुधारक हे त्यांच्या सांस्कृतिक, पारंपारीक वातावरणातच वाढले होते. त्यांनी कुटुंबाचे पारंपारिक वातावरण टिकवून ठेवले. गतकाळातील कवी-संतांशी भावनिक नाते कायम ठेवले. तसेच भूतकाळातील व पुराणातील शूर व्यक्तींपासून त्यांना सदैव प्रेरणाच मिळत राहीली. एम.जी.रानडे म्हणतात, ''एक सुधारक हा जुन्या काळाला व नवीन काळाला धरुनच चालत असतो. तो सुधारक पुरोगामी विचारांचा असतोच पण त्याच वेळेस जुन्या, पारंपारीक मुल्यांचे जतन सुद्धा करतो.''

पुनुरुत्थान करणारे हे इतर दोघांपेक्षा वेगळे असतात. तो धर्म वेडा असतो. पुराणिक रीतीरिवाज, परंपरा, सामाजिक धार्मिक रितीरीवाज बदलू नयेत असे त्यास वाटते. भूतकाळातील गोष्टींपासून त्याला प्रेरणा मिळते. नवीन संकल्पनांचा तो धिक्कार करतो. पुनुरुत्थापन करणारा काही क्षेत्रात पुरोगामी असू शकतो. परंतु त्यांची मूल्यमापन करण्याची पद्धती पुराणमतवादी असते. बुद्धीवादी नसते. तथापि पुनुरुज्जीवन करणाऱ्याचा नवीन बदलांना पूर्णपणे विरोध नसतो आणि ते पूर्णपणे पुराणमतवादीही नसतात. उदा. भूतकाळास विनाकारण अवास्तव महत्त्व देताना तो फक्त, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबतीत स्वतःची मते व्यक्त करतो. थोडक्यात म्हणजे पुनुरुत्थान म्हणजे भूतकाळातील नीती-मूल्यांची, परंपरांची जोपासना करणे ज्याशिवाय समाजाचे एक वेगळे, स्वतंत्र अस्तित्त्वच राहत नाही. उदाहरणार्थ लोकमान्य टिळकांनी त्यांची सामाजिक तत्त्वे, सामाजिक बदलांसाठी आवश्यक असणारा दृष्टीकोन हा वेदांत तत्त्वज्ञानातून आणि महाराष्ट्राच्या परंपरातून विकसित केला होता. तरीही त्यांनी सामाजिक बदल व पुनरुत्थान घडवून आणले व त्याचा पुरस्कार केला.

११.२ विष्णुबुवा ब्रह्मचारी व जहाल राष्ट्रवाद (इ.स.१८२५-१८७१)

महाराष्ट्रामध्ये पुनरुत्थानाची प्रक्रिया ही ख्रिश्चन धर्माचा आणि पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीकोनातून झाली. अनेक हिंदूना असे वाटत होते की परकीय शक्तींचा वाईट प्रभाव त्यांच्या धार्मिक व सामाजिक संस्थांवर पडत आहे. पहीले पुनरुज्जीवन करणारे महाराष्ट्रातील विचारवंत होते विष्णू भिकाजी गोखले, जे विष्णुबुवा ब्रह्मचारी (इ.स.१८२५ - १८७१) म्हणून जास्त प्रसिद्ध पावले. त्यांना लहानपणापासून धार्मिक गोष्टींची आवड होती. विवेक सिंधू, ज्ञानेश्वरी, एकनाथी भारुड, भगवत गीता इ. चे त्यांचे वाचन झाले होते. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी पंढरपूर येथे वैदीक धर्मांचे पारायण करावयास सुरुवात केली आणि लवकरच महाराष्ट्राच्या इतर भागात प्रवचनास सुरुवात केली. मुंबई येथे त्यांनी मिशनऱ्यांचे आव्हान स्विकारले. त्यासाठी त्यांनी भाषणे, वादविवाद आणि वृत्तपत्रांद्वारे ज्ञानप्रबोधनास सुरुवात केली. इ.स.१८५६ ते १८७१ पर्यंत, ब्रह्मचारींनी, मिशनऱ्यांच्या हिंदू विरोधी धर्म प्रसाराला सडेतोड उत्तर दिले. हे अतिशय महत्त्वाचे आहे की इ.स.१८५७ मध्ये १५ जाने. ते जून १८५७ तब्बल सहा महीने त्यांनी चौपाटी समुद्र किनाऱ्यावर ख्रिश्चन मिशनऱ्यांबरोबर वादविवाद केला. हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चनांनी मोठ्या प्रमाणावर या वाद संवादास हजेरी लावली होती. या साप्ताहीक वादविवादाचे प्रत्यंतर जनमानसाच्या मनावर इतके खोलवर रुजले की इ.स.१८५७ मध्ये मुंबई सरकारने विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांना यापुढे प्रवचन करण्यास व धार्मिक प्रवचन करण्यास मनाई केली. विष्णुबुवांच्या कार्यप्रसारामुळे, धार्मिक भावना भडकतील अशी भीती सरकारास वाटली.

नंतर त्यांनी भारताच्या विविध भागात प्रवास करुन, वेदांचे सार्वभौमत्व व सर्वव्यापकता, श्रेष्ठता यांवर प्रवचने दिली. त्यांच्या मते, वेद म्हणजेच ज्ञान. ते प्रत्यक्षात देवाचा अंश आहेत. त्यांचा विश्वास होता की वेदांच्या अभ्यासाने माणसाचा नैतिक व तात्त्विक विकास होतो. त्यांच्या मते, वैदीक काल हा फक्त तात्त्विक दृष्ट्याच नव्हे तर शास्त्रीय व तांत्रिक दृष्ट्याही फार प्रगत होता. त्यात रसायनशास्त्र व भौतिकशास्त्राचा सखोल अभ्यास होता. ते म्हणतात की, संपूर्ण जगातील लोकांनी वैदीक धर्माचा पुरस्कार केला आहे आणि त्यासंबंधीच्या धार्मिक सूचना संस्कृत भाषेतून देण्यात आल्या आहेत. ब्रह्मचारींचे इतर धर्मांबाबत चांगले मत नव्हते. ख्रिस्ती धर्माबाबत त्यांना वाटे की, हा धर्म म्हणजे क्रूर जातीच्या लोकांनी दांभिक पद्धतीने निर्माण केलेला धर्म आहे.

विष्णूबुवा ब्रह्मचारी ब्राह्मणी हिंदुत्त्वाच्या बाबतीत अतिशय धर्मपरायण होते. उदा वैदीक विधी, शाकाहार, पूर्वजन्मावर विश्वास इ. त्यांच्या मते, हिंदू आणि इतर धर्म जसे ज्यू, ख्रिश्चन मुस्लिम आणि इतर यांच्यामधील महत्त्वाचा भेद हा होता की, त्यांना वाटे की फक्त मनुष्यातच आत्मा आहे, प्राण्यात नाही, याउलट हिंदू धर्म विश्वातील कणाकणात आत्मा आहे असे मानतो. पुनर्जन्मावर इतर धर्मांचा विश्वास नाही आणि मृत्यूसमयी शेवटी सगळ्यांना एकाच पद्धतीने न्याय मिळतो असा इतरांचा समज होता .

आश्चर्य असे की पुराणातील आणि पारंपारिक रितीरिवाजांविषयी इतकी आत्मियता असताना सुद्धा त्यांनी मोकळ्या मनाने अनेक चुकीच्या रुढी, रितीरिवाज नाकारले. त्यांच्या मते, व्यक्तीची जात ही त्यांच्या कर्माने ठरावी, जन्माने नाही. त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. वर निवडताना, मुलींच्या आवडीनिवडींना प्राधान्य द्यावे. त्यांनी असे म्हटले की बारा वर्षाखाली त्यांचा विवाह व्हावा. त्यांनी सतीची पद्धत चुकीची ठरवून त्याविषयी निंदा केली. विधवा पुनर्विवाहास पाठींबा दिला.

ते अत्यंत हाडाचे लेखक होते. विष्णुबुवांच्या प्रसिद्ध साहित्यापैकी एक म्हणजे 'वेदोक्त धर्मप्रकाश,' इ.स.१८६४ मध्ये ते प्रकाशित झाले. त्यातील 'एक रुचक फायदेशीर सरकार' या लेखात एकच घर आणि सर्व नागरीक हे त्यांचे कुटुंबिय असा विचार त्यांनी मांडला. त्यांनी असे म्हटले की, प्रजेचे हित सांभाळणे, ही सरकारची जबाबदारी आहे आणि राजाच्या आज्ञेचे पालन करणे हे जनतेचे कर्तव्य तसेच, सर्वजण एकाच कुटुंबाचे प्रतिनिधी असल्याने, सर्व जमिन ही कोणा एकाची मालकीसत्ता न ठेवता सर्वांनी ती सर्वांसाठी कसायला हवी आणि एकमेकांच्या गरजा पूर्ण करावयास हव्यात.

सामाजिक बाबीत त्यांनी कायदेशीर विवाह (Civil Marriages) आणि घटस्फोटांना परवानगी दिली. त्याच्या मते, मुले फक्त पाच वर्षापर्यंत आईवडीलांकडे राहू शकतात. त्यानंतर सरकारकडे सुपूर्द केली पाहिजेत. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीस त्यांच्या कार्यक्षमतेनुसार काम दिले पाहिजे आणि त्यांच्या व्यवसायानुसार, पाच जातींमध्ये विभाजन केले पाहीजे. सरकारने वृद्ध लोकांची काळजी घेतली पाहिजे आणि प्रत्येक विभागाचा प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक केली पाहीजे आणि ही संस्था संसदेसारखी कार्यरत झाली पाहिजे.

ब्रह्मचारींनी संपत्तीचा अभाव असलेल्या अर्थव्यवस्थेचा विचार केला होता आणि अशी व्यवस्था ज्यात धर्मदायी सस्थांचाही अभाव आहे. परंतु, लोकांच्या चारीत्र्याविषयी व

व्यक्तिमत्त्वाविषयी ते आश्वासक होते. अनेक भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांमुळे एकूण समाजाचे चारित्र्यच भ्रष्ट झाले आहे. परंतु यातूनही चांगले होईल आणि जनतेची पिळवणूक व भ्रष्टाचार अधिक काळापर्यंत चालणार नाही.जनता अतिशय चांगुलपणाने राहील. इ.स.१८७९ मध्ये त्यांनी या लेखाच्या १०,००० प्रती छापून भारतातील नामवंत लोकांकडे तसेच ब्रिटीश संसदेस, मंत्र्यांना, राणी विक्टोरिया, प्रिन्स एडवर्ड यांना पाठविल्या.

विष्णुबुवा ब्रह्मचारीसारख्या धार्मिकदृष्ट्या कर्मठ व्यक्तीने अव्यवहार्य चालीरितींना विरोध केला. लेडर्ले म्हणतो की, ''त्यांचे हे विचार वैदांतिक, ऋषिमुनींचे विचार ज्ञानेश्वरांचे लिखाण ज्यांनी तेराव्या शतकात भगदवद्गीतेचे भाषांतर केले होते त्या सर्वांपासून प्रेरित होते.'' लेडर्ले पुढे म्हणतो की, ''त्यांचे समाजाचि तात्त्विक बैठक मांडताना विष्णुबुवा ब्रह्मचारी हे भारतीय वेदांतिक तत्त्वज्ञान व परंपरांशी एकनिष्ठ राहिले.''

विष्णुबुवा ब्रम्हचारी हे पुनरुत्थान प्रवृत्तीचे अग्रेसर व्यक्ती होते. सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अग्रगण्य होते.पाश्चिमात्य संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. आणि म्हणूनच भारतीयांनी वेदांवर विश्वास ठेवून त्यापासून प्रेरणा घेतली पाहीजे, या विचारांचे ते होते. त्यांचे सामाजिक विचार हे बंधुत्व व समाजकल्याणावर आधारित होते. आर.सी. मुजुमदार त्यांना 'आदर्श समाज वादाचे जनक' असे संबोधतात व त्यांची तुलना युरोपच्या ख्रिश्चन मिशनऱ्यांबरोबर करतात. एक लेखक म्हणतो, ''ते सामाजिक बंधुत्ववादी, राजकीयदृष्ट्या समाजवादी, मनाने मुक्तविचारांचे किंवा स्वातंत्र्यवादी आणि नैतिकदृष्ट्या शूर, आत्मविश्वासू आणि माणूसकीप्रिय होते.''

विष्णुबुवा ब्रह्मचारी जरी कट्टर हिंदू असले तरी ब्राह्मणांचा वरचष्मा त्यांना मान्य नव्हता. असे करत असताना उच्च वर्गात आणि तळागाळातील समाजात दरी पडली. त्यांची परिणती काही चुकीच्या घटनांमध्ये झाली. (मुंबई प्रांत) मुंबईचे वृत्तपत्र 'इंदू प्रकाश' ने त्यांच्या मृत्यूनंतर, २० फेब्रुवारी १८७१ मध्ये लिहीले की,

''विष्णुबुवा ब्रह्मचारीसारखा व्यक्ती सापडणे कठीण आहे. ते एक असमान्य विचारवंत होते. त्यांनी स्वत:चे बोल कृतीत उतरवले. समाजाच्या हितासाठी जे जे आवश्यक आहे ते ते करुन दाखविण्याचे असामान्य धाडस त्यांच्याकडे होते आणि म्हणूनच, विष्णुबुवांच्या मृत्यूने केवळ मुंबईचे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे नुकसान झाले.''

११.२.१ आपली प्रगती तपासा :-

१) विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे विचार व कार्य थोडक्यात सांगा.

_____

_____

_____

_____

_____

११.३ विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा राष्ट्रवाद व पुनरुज्जीवनवाद (इ.स.१८५० - १८८२)

आपण बघितले की एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वाधात महाराष्ट्रात अनेक विचारवंतांची मालिकाच तयार झाली. उदा. बाळशास्त्री जांभेकर, डॉ. भांडारकर इ. त्यांच्या विचार व कल्पनांचा महाराष्ट्रावर खोलवर परीणाम झाला. शतकाच्या उतरार्धातही समान योग्यतेच्या व्यक्ती निर्माण झाल्या. उदा. विष्णु शास्त्री चिपळूणकर, गोपाळ कृष्ण गोखले, गोपाळ गणेश आगरकर आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. परंतु चिपळूणकरच असे आहेत की त्यांच्या तेहतीस वर्षाच्या इतक्या कमी कालखंडात ते एक पत्रकार, लेखक, निर्भीड हिंदू देशभक्त व पुनुरुत्थानकार म्हणून नावारुपास आले. त्यांची 'निबंधमाला' व 'केसरी'मधील लेखांनी केवळ त्यावेळच्या लोकांवरच नव्हे तर पुढील पिढीतील लेखक, पत्रकार व टिळकांसारख्या सामाजिक कार्यासाठी आदर्श ठरली. त्यांना 'आधुनिक मराठीचे जनक' समजले जाते. त्यांना एकोणिसाव्या शतकाच्या महाराष्ट्राचे प्रवक्ते आणि प्रतिनिधी समजले जाते. तर काही लोक त्यांना महान साहित्यिक व हिंदू धर्मीयांचे नेते समजतात. विष्णुशास्त्रींचा जन्म २० मे १८५० मध्ये पुण्यात झाला. त्यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर हे अत्यंत प्रसिद्ध व्यक्ती होते. इ.स.१८६५ मध्ये वयाच्या पंधराव्या वर्षी ते मॅट्रीकची परीक्षा पास झाले. नंतर चार वर्षांनी, त्यांनी 'शाळापत्रक' नावाचे वृत्तपत्र संपादीत केले. इ.स.१८७० मध्ये मुंबई विद्यापीठातून ते पदवीधर झाले आणि दोन वर्षांनी त्यांनी स्वतःचे 'निबंधमाला' हे नियतकालिक सुरु केले. त्यानंतर त्यांनी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली, ज्यामधून महाराष्ट्राचे नामवंत नेते मंडळी जन्माला आली. थोडक्यात म्हणजे, वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षापासून त्यांनी सामाजिक कार्यास वाहून घेतले. त्यांचा मृत्यू १७ मार्च १८८१ मध्ये झाला. परंतु मृत्यूपूर्वी त्यांनी महाराष्ट्राच्या हृदयात स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले. मुंबई प्रांताचे साहित्यिक आणि सामाजिक जीवन त्यांनी समृद्ध केले.

११.३.१ विष्णुशास्त्री एक लेखक आणि पत्रकार :

त्यांच्या वडीलांच्या प्रभावाखाली तरुण विष्णुशास्त्रींनी मराठी व संस्कृत भाषा व साहीत्यात रुची निर्माण केली. त्यांच्या महाविद्यालयीन दिवसातील व्यापक वाचनाने भारतीय तत्त्वज्ञान, इतिहास व साहित्यांची त्यांना ओळख झाली. पाश्चिमात्य साहीत्य व इतिहासाच्या अभ्यासाने त्यांचे विचाराचे क्षितिज अजून व्यापक झाले, त्यांचे साहित्य अजून प्रगल्भ झाले. त्यांचे मराठी वरचे प्रभुत्व तर एवढे वाढले की ते स्वतःच 'स्वतःला मराठीचे शिवाजी' समजत.

विष्णुशास्त्री हे पहिले मराठी लेखक होते ज्यांनी शास्त्रीय साहित्यिक टीकाशास्त्र अस्तित्वात आणले. त्यांनी जुन्या काळातील महान लेखक कालिदास, बाण सुबांशू, दंडीज इ. च्या साहित्यावर टीका केली. शाळापत्रक, निबंधमाला, केसरी मधील त्यांचे लेख हे त्यांचे मराठीवरचे असामान्य प्रभुत्व, स्वतंत्र विचारसरणींचे दर्शन घडवितात. लेख लिहीत असतानाच ते शाळेत शिकवित होते. निबंधमालेचे संपादन करीत होते. जी त्यांनी इ.स.१८७४ मध्ये सुरु केली. जोपर्यंत बहुतेक सर्वच लेखक संस्कृत किंवा इंग्रजीचे भाषांतर करीत. परंतु , मराठी भाषेत स्वतंत्र असे फारच कमी साहित्य निर्माण झाले होते. निबंधमालेच्या माध्यमातून विष्णूशास्त्रींनी हे दाखवून दिले की ज्ञान, इतिहास राजकारण, अर्थकारण आणि तत्त्वज्ञान अशा विविध क्षेत्रात मराठी भाषा कुठल्या पातळीपर्यंत भरारी घेऊ शकते. त्यांच्या लेखांनी विचारवंतांच्या मतानुसार, आतापर्यंत परकीय विचारांच्या जोखडात अडकलेल्या अनेक

सुशिक्षितांना मुक्त केले. तथापि, त्यांनी पूर्वीच्या लेखकांचे, कादंबरीकारांचे, संशोधनकारांचे व पत्रकारांचे मराठी भाषेतील योगदान त्यांनी दृष्टीआड केले नाही.

इ.स.१८८० मध्ये चिपळूणकरांनी टिळक, आगरकर आणि ना.म.जोशी यांच्याशी सहभागी करुन पुण्यात न्यू इंग्लीश स्कूल स्थापन केले जे कॅथलिक जेयूईट मिशनऱ्यांच्या आधुनिक तत्त्वप्रणालीवर आधारीत होते. त्याच वर्षी त्यांनी दोन मराठी पेपर छापायचे ठरविले. 'केसरी' मराठीतून आणि 'मराठा' इंग्रजीमधून. या मागचा उद्देश हा होता की लोकांमध्ये सामाजिक व राजकीय विषयांसंबंधी जागृती निर्माण करावयाची आणि या दोन वृत्तपत्रांसाठी त्यांनी आर्यभूषण प्रेस स्थापन केली.

विष्णुशास्त्रींचे सुरस व प्रभावी लिखाण हे इतर लेखकांसाठी स्फूर्तीदायकच होते. त्यांच्या 'निबंधमाला' या पेपरमधून साहित्यिक टीका व राजकीय लेख या दोहोंवर प्रकाश टाकला जाई. १८८२ मध्ये, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची मराठी साहित्याची गंगोत्री आगरकर, टिळक, एस.एम. परांजपे आणि इतरांनी वाहत ठेवली. अशा प्रकारे एक लेखक, पत्रकार, प्रिंटींग प्रेसचे जनक, शिक्षणतज्ञ म्हणून चिपळूणकर हे अतिशय प्रसिद्ध होते.

११.३.२ चिपळूणकरांचे सामाजिक व राजकीय विचार :

चिपळूणकर हे धार्मिक बाबतीत संवेदनशील होते. परंतु सामाजकि क्षेत्रात मात्र तेवढे पुराणमतवादी नव्हते. जरी ते अत्यंत व्यापक विचारांचे असले तरी, तरुण, सुशिक्षितवर्ग आपले प्राचीन चिरायु संस्कृतीची विचार तत्त्वे, मातृभाषा व सामाजिक नीती मूल्यांच्या त्याग करुन, पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करतात हे त्यांना मुळीच मान्य नव्हते. त्यांच्या मते, असे वर्तन म्हणजे स्वतःची संस्कृती व मातृभाषेवर अविश्वास दाखविण्यासारखे आहे. त्याच वृत्तीमुळे, भारत सदैव परकीय शक्तीच्या अंमलाखाली गुलामगिरी करीत राहीला म्हणूनच त्यांनी तरुण सुशिक्षितांमध्ये जी नवीन पाश्चात्य अंधानुकरणाची प्रवृत्ती वाढीस लागत आहे तिचा त्यांनी धिक्कार केला. त्यांनी तरुणांना आवाहन केले की महान नेते जांभेकर, भांडारकर, विष्णूबुवा ब्रह्मचारी आणि रानडे ज्यांनी महाराष्ट्रातील जनतेचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला त्यांच्या कार्याला विसरु नका.

चिपळूणकरांनी त्यांच्या प्रभावी लेखणीचा उपयोग स्वार्थी आणि राजकीयदृष्ट्या मागासलेल्या आणि ब्रिटीशांना मदत करणाऱ्या महाराष्ट्रीयन लोकांचे न्यून उघडे पाडण्यासाठी केला. त्यांना असे वाटे की अनेक समाजसुधारकांना, ते जे ज्ञान लोकांना देतात, ते स्वतः अंमलात आणण्याचे धैर्यच नसते. तसेच जनतेच्या सुखदु:खाशीही त्यांचा काहीही संबंध नसतो, याची त्यांना खंत वाटली. हे अतिशय विरोधाभासात्मक आहे की अनेक समाजसुधारक त्यांच्या भाषणात जुन्या परंपरा रुढी, पद्धती यांच्या विरुद्ध बरेच अवसान आणून बोलतात. परंतु प्रत्यक्षात मात्र स्वतःच्या मुलांचे उपनयन समारंभ मात्र अतिशय पुरातन पद्धतीने करतात. स्वतःच्या लहान मुलांची लग्ने लावतात. चिपळूणकरांना या अशा दांभिकतेचा तिटकारा होता आणि त्यांनी त्यांच्या लेखामध्ये त्यावर निक्षून प्रहार केले. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे एक धाडसी विद्वान होते. न वाकणारे न झुकणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांनी हिंदू धर्माच्या चिरंतन मूल्यांचे रक्षण करण्यासाठी ख्रिश्चन मिशनरी व पाश्चिमात्य संस्कारांच्या विरोधात बंड पुकारले. त्यांच्या शब्दाप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्त्वही विविधांगी होते. जेव्हा त्यांच्या अनेक मित्रांनी समाजसुधारणे विरोधात पाठ फिरवली, तेव्हा त्यांनी धाडसीपणाने इ.स.१८७४ मध्ये आपली पत्नी वारल्यानंतर,

एका विधवेशी विवाह केला. ह्यावरुन असे सिद्ध होते की ते सामाजिक बाबतीत अजिबात पुराणमतवादी नव्हते जो आरोप त्यांच्यावर लावण्यात येत होता. खरंतर त्यांच्या शाळापत्रक, निबंधमाला आणि केसरी या वर्तमानपत्रातील लेखांचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर त्यांचे विचार अतिशय आधुनिक व त्यावेळच्या कोणत्याही समाजसुधारकांपेक्षा पुरोगामी होते. त्यांनी समाजसुधारकांचे कौतुकच केले. परंतु या सुधारकांच्या काम करण्याच्या पद्धती, त्यांच्या आयुष्यातील अग्रक्रमांच्या बाबी, आणि इंग्रजी व पश्चिमीदेशांविषयी अमर्याद आकर्षण व प्रेम या गोष्टींचा त्यांना तिटकारा होता.

चिपळूणकर त्यांच्या बालपणात पेशवा राज्याविषयी भावूक होते. जस जसे ते मोठे होत गेले, तसतसा त्यांच्यातील ब्रिटीशांविषयीचा तिरस्कार वाढत गेला आणि भारतीयांना ब्रिटीशांच्या विरुद्ध तयार करावयाचे, असे त्यांनी मनोमन ठरविले. हा उद्देश मनात ठेऊन, त्यांनी त्यांच्या लेखाद्वारे ब्रिटीशांविरोधीचा तिरस्कार, इतर सुशिक्षित तरुणांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न केला. या कामात त्यांना यश आले आणि अनेक महाराष्ट्रीयन तरुण मुले मातृभूमीसाठी स्वातंत्र्यासाठी प्रतिकार करावयास तयार झाली. परंतु त्यांचा भर हा भारताच्या भव्यदिव्य भूतकाळावर व भारताच्या समृद्ध व्यवस्थेवर होता. त्यांनी हिंदू धर्म, संस्कृती आणि परंपरांविषी, ज्यांनी कोणी अपशब्द वापरले त्यांच्या विरुद्ध ते उभे ठाकले. भारताच्या भव्यदिव्य इतिहासाने भारावून गेलेले विष्णूशास्त्री, हिंदू धर्मातील चुकीच्या पद्धतींवर उदा. बालविवाह,स्त्रियांचे प्रश्न आणि त्यांच्यावरचे अत्याचार, क्षुद्र आणि अतिक्षुद्रांची पिळवणूक ह्या सर्वाबाबत त्यांनी टीकास्त्र उचलले. परंतु भारताच्या सामाजिक धार्मिक, आर्थिक परिस्थितीत आता काही अपरिहार्य बदल अटळ होते याची त्यांनी विशेष दाद घेतली नाही.

चिपळूणकर स्वतंत्र भारताचे स्वप्न खरे होताना पाहू इच्छित होते ज्यातील जनता ही सार्वभौम असेल ते निबंधमालेमध्ये लिहीतात, ''ब्रिटीश राजवटीमुळे आमचे स्वातंत्र्य नष्ट झाले आहे. स्वातंत्र्याचा अंत म्हणजे सगळ्याचा अंत. परंतु सगळ्यात दुर्दैवी बाब म्हणजे स्वातंत्र्या अभावी आमच्या संस्कृतीचे अध:पतन झाले आणि आमचे व्यक्तिमत्व पूर्णपणे भ्रष्ट झाले.''

म्हणूनच, त्यांनी महाराष्ट्रीयन जनतेमध्ये राष्ट्रप्रेम व ब्रिटीश सरकार विरुद्धचा तिरस्कार बिंबवला. त्यांना असे स्पष्ट वाटे, जर भारतीयांना विकास साधायचा असेल तर परकीय साम्राज्य संपविले पाहीजे. या कारणासाठी त्यांनी सामाजिक सुधारणांपेक्षा राजकीय सुधारणांना अधिक महत्त्व दिले. उदाहरणार्थ त्यांच्या 'आपल्या देशांची स्थिती' या लेखात भारताच्या अध:पतनाला इंग्लंड जबाबदार आहे. कारणीभूत आहे. तेव्हा या पाश्चिमात्य आर्यन बांधवांना म्हणजे ब्रिटीशांना त्यांच्या मायदेशी पाठविणे गरजेचे आहे. एक वेळच्या अत्यंत समृद्ध, सुपिक, हुशार व्यक्तींनी नावाजलेल्या भारताचे हे हाल व्हावेत (एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात) या विषयी त्यांना खूप खंत वाटे. त्यांच्यावर वर्षांनुवर्षे इतके अन्याय अत्याचार झाले की ते आता स्वत:चे अधिकारच विसरलेत आणि त्यांच्यामध्ये व प्राण्यांमध्ये काहीही फरक नाही आहे असे ते खेदाने लिहीतात.

चिपळूणकरांना या विषयी खूप खंत वाटते की, सुशिक्षित स्वत:स खूप हुशार समजणारे तरुण स्वत:च्या ज्ञानाचा उपयोग, स्वकीयांचे प्रश्न व दु:ख कमी करण्याऐवजी, ब्रिटीश अधिकाऱ्यांची मर्जी जिंकण्यातच जास्त मश्गुल आहे. त्यापैकी काही विदेशी दारुच्या नशेत इतके बुडालेत की स्वत:ची संस्कृती, परंपरा याचीही त्यांना शुद्ध राहीली नाहीये. काहींनी स्वत:ची लाज लज्जा वाऱ्यावर सोडली आहे व परकीयांच्या चरणांशी लीन झाले आहेत. टी.व्ही. पर्वते

म्हणतात, ''चिपळूणकरांनी ही शिकवण दिली की भारताची भव्यदिव्य प्रतिष्ठा जर परत मिळवायची असेल तर स्वतःच्या पायावर उभे राहून, आत्मविश्वास वाढविला पाहीजे.''

'मराठी साहीत्याचे शिवाजी' चिपळूणकर, भारताची शेती, उद्योग, व्यापार सगळ्याच बाबतीतील अधोगती पाहून फार चिंतीत होतात. या सगळ्यांस ब्रिटीशच जबाबदार आहेत असे त्यांना वाटे. तथापि, त्यांनी धर्म किंवा सामाजिक चाली, रुढी उदा. बालविवाह किंवा जातीय भेदभाव या गोष्टी ज्या समाजसुधारकांनी उचलून धरल्या होत्या त्या काही भारताच्या अधोगतीस कारणीभूत नाहीत. त्यांच्या चरीत्राचा अभ्यास करणारे लिहीतात की याचा अर्थ असा नव्हे की वाईट गोष्टींना त्यांचा प्रतिकार नव्हता. परंतु त्यांची भावना मात्र संपूर्ण देशाने एक व्हावे, स्वावलंबी, सेवा परायण आणि निरपेक्ष भावनेने देशाच्या स्वातंत्र्यासाठी, प्रगतीसाठी लढावे असे त्यांना वाटे.

विष्णूशास्त्री चिपळूणकर हे निसंदिग्धपणे भारतमातेचे महान सुपुत्र होते आणि महाराष्ट्राला त्यांचा अतिशय अभिमान आहे. त्यांना 'मराठी साहीत्याचे बृहस्पती' असे संबोधण्यात येई. परंतु त्यांनी इंग्रजी भाषेचे सामर्थ्य ओळखले होते व त्यांस ते 'वाघीणेचे दुध' असे संबोधित. परंतु त्यांचा पाश्चिमात्याचे अंधानुकरणास विरोध होता. आधीच नमूद केल्याप्रमाणे पेशवेकालीन महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि संस्थांचा त्यांना अतिशय आदर होता.

चिपळूणकरांनी अथक प्रयत्न करुन, मराठी माणसामध्ये लपलेला राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम बाहेर काढण्याचे मोलाचे कार्य केले. परंतु हाच राष्ट्रवाद संपूर्ण राष्ट्रीय पातळीवर जागृत करणे किती गरजेचे आहे याची जाणीव त्यांना झाली नाही. हे काम लोकमान्य टिळकांवर आले आणि त्यांनी ते समर्थपणे निभावले. परंतु चिपळूणकरांनी अनेक राष्ट्रभक्तांचे या बाबतीतील लक्ष या गोष्टीकडील वळविले की ब्रिटीशांचे राज्य म्हणजे वरदान आहे हे संपूर्णपणे खोटे आहे. त्यांनी हे दाखवून दिले की ब्रिटीश आणि त्यांची संस्कृती भारतात येण्यापूर्वीपासून भारतीय व्यवस्था ही समृद्ध व समर्थ होती. त्यांनी परत परत पाश्चिमात्य संस्कृतीवर श्रद्धा ठेवणाऱ्यांना निक्षून सांगितले की ब्रिटीशांनी भारतात सभ्य संस्कृती आणली हे पूर्णपणे चूकीचे आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यात काहीही ठोस पुरावा नाही, हे केवळ अर्धसत्य आहे, असे ते म्हणत. त्यांनी भारतीयांना विनंती केली की अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेऊ नका.

१८ मार्च १९०१ मध्ये चिपळूणकरांच्या पुण्यतिथी प्रसंगी जे भाषण देण्यात आले त्यात टिळकांनी, चिपळूणकरांचे विशेष आभार मानले. कारण त्यांनी सदैव भारतीय संस्कृतीचे अधःपतन करणाऱ्या इंग्रजी शिक्षण पद्धतीला विरोध केला होता. हरी नारायण आपटे, एस.एम. परांजपे, एस.के.कोल्हटकर, एन.सी.केळकर व इतर नामवंत लेखकांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या लिखाणातून आम्हाला प्रेरणा मिळाली हे कबूल केले.

आपली प्रगती तपासा :-

१) विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे एक लेखक व पत्रकार म्हणून महत्व सांगा.

_____

_____

_____

_____

_____

११.४ दयानंद सरस्वती आणि आर्य समाजाचे कार्य

ख्रिश्चनधर्म आणि आधुनिक विज्ञान यांच्या प्रभावामुळे हिंदू समाजात, एक प्रकारची जागृती निर्माण झाली होती. समाजाच्या विविध भागातून, त्यांच्या संकल्पना, श्रद्धा यांच्याविषयी मतमतांतरे समोर येत होती. कर्मठ ब्राह्मण समाजाने सनातन-धर्माचा पुरस्कार केला. तर काहींनी प्रार्थना समाजाची स्थापना केली.

दयानंद सरस्वतींनी आर्य-समाजाची निर्मिती यासाठी केली की इतर धर्मांच्या बरोबरीने हिंदू धर्म येईल व ज्याची उभारणी ही वेदीक तत्त्वांवर आधारीत असेल. दयानंद सरस्वतींनी (इ.स.१८२४-इ.स.१८८३) हिंदू धर्माचे वैदीक तत्त्व प्रणालीच्या सहाय्याने पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे मूळ नाव मुळ शंकर असून त्यांचा जन्म गुजराथ राज्यात मोरवी येथे झाला. मुळशंकवर सुरुवातीच्या काळात जैन धर्माच्या 'स्थानकवासी' पंथाच्या प्रभावाखाली होते. त्यांना याची खात्री झाली होती. की मूर्ती पूजा करुन काहीही साध्य होत नाही. त्यांनी घर सोडले व तात्त्विक ज्ञानाच्या शोधात वणवण भटकू लागले. ते दक्षिणेस गेले. तिथे त्यांना सरस्वती पूजक श्री शंकराचार्य भेटले. तेथे त्यांनी पुरातन संस्कृतचा, खरा धर्म समजून घेण्यासाठी अभ्यास केला. आता ते आत्मविश्वासपूर्वक बोलू लागले की मूर्तीपूजा व जाती व्यवस्था ही वेदांच्या विरुद्ध आहे. त्यांनी भागवत पुराण अनैतिक आहे याचा धिक्कार केला. इ.स.१८६८ मध्ये त्यांनी अनेक पंडीतांना वेदांच्या मुद्द्यांसंदर्भात वादविवादास पाचारण केले. इ.स.१८७२ मध्ये ते कलकत्त्यास गेले. तिथे ते देवेंद्रनाथ टागोर व केशवचंद्र सेन यांच्या विचाराने प्रभावित झाले. त्यांनी अत्यंत साधे वस्त्र परीधान करावयास सुरुवात केली व धार्मिक विषयांवरचे पारायण हिदी भाषेत लिहावयास सुरुवात केली. त्यांनी त्यांचे पहिले पुस्तक 'सत्यार्थ प्रकाश'प्रकाशित केले. इ.स.१८७४ मध्ये ते मुंबईत आले आणि प्रार्थना समाजाच्या कार्यकर्त्यांच्या संपर्कात आले.

दयानंद सरस्वतीना, प्रार्थना समाजाच्या तत्त्वप्रणालीत काही त्रुटी आढळल्या. त्यांना प्रार्थना समाज आवडला नाही. कारण त्यांच्या अनुयायांचा वेदांच्या सार्वभौमत्त्वावर व श्रेष्ठतेवर विश्वास नव्हता. त्यांना असे वाटे की, त्यांच्यात राष्ट्रप्रेमाचा अभाव आहे. भारताचा भव्यदिव्य इतिहास विद्वानांनी पुन्हा शोधून काढला आहे आणि म्हणूनच भारतीयांनी वैदीक ज्ञानाचा उपयोग करुन घेणे, आवश्यक आहे. त्यांनी इ.स.१८७५ मध्ये मुंबईत आर्य समाजाची स्थापना केली.

११.४.१ आर्यसमाजाची प्रमुख तत्त्वे :

मूलतः आर्यसमाजाची अट्ठावीस तत्त्वे होती. तेव्हा त्यांनी आर्यसमाजाचे मुख्य स्थान लाहोरला हलविले तेव्हा ती तत्त्वे कमी करुन दहा करण्यात आली. त्यापैकी महत्त्वाची तत्त्वे म्हणजे :

१) परमेश्वरच्या साक्षात्कारावर विश्वास ठेवणे.
२) वैदांना हिंदूचे सर्वोच्च धर्मग्रंथ म्हणून मान्यता देणे.
३) शारीरिक, अध्यात्मिक आणि सामाजिक विकारासाठी कार्यरत राहणे किवा कार्य करण्याची गरज असणे यावर विश्वास.

आर्यसमाज मुंबईत स्थापन झाला परंतु पंजाबमध्ये वाढीस लागला.

११.४.२ तत्त्वांचे महत्त्व :

दयानंद सरस्वतीनीं सुशिक्षित, उच्चभ्रू भारतीयांचे लक्ष भारताच्या समृद्ध भूतकालाकडे वळविले. त्यांनी हे सिद्ध केले की हिंदू धर्म म्हणजे काही अंधश्रद्धांचा जुडगा नाही तर वेदाच्या सर्वोच्च तत्त्वज्ञानावर आधारीत आहे. कृती करण्याची गरज म्हणजे विद्येचा प्रसार आणि हिंदू समाजास राष्ट्रीयत्वाखाली एकत्र आणणे. ज्या अगतिक व्यक्तीने इस्लाम व ख्रिस्ती धर्म स्विकारला त्यांना शुद्धीकरणासारख्या साध्या पद्धतीने परत हिंदू धर्मात आणणे हे काम आर्य समाजाने सुरू केले. या असल्या कारवायांमुळे कर्मठ हिंदू, आणि ख्रिस्ती व मुस्लिम धर्मगुरुंचे डोके फिरले. दयानंद सरस्वतींना पुण्यात अनुयायी मिळणे थोडे कठीण गेले. पुण्यातील शैक्षणिक व वृतपत्रीय चळवळी टिळकांच्या मार्गदर्शनाखाली होत गेल्या. तसेच कर्मठ हिंदूंना, एकदा बाटलेल्या, धर्मांतरण केलेल्या व्यक्तिंना परत हिंदू धर्मात आणण्याची कल्पनाही विशेष रुचली नव्हती.

११.४.३ कोल्हापुरातील आर्य समाज :

इ.स.१८३३ मध्ये दयानंद सरस्वती वारले आणि आर्यसमाजाचे दोन तुकडे पडले एक कर्मठ आणि दुसरा पुरोगामी. त्यानंतर त्यांनी प्रार्थना समाज व थिआसोफिकल सोसायटीबरोबर संबंध संपुष्टात आणले. इ.स.१९१८ नंतर मात्र पुरोगामी विचारांच्या समूहाने मराठा समाजास शिक्षण व सामाजिक बदलाच्या निमित्ताने आकर्षित केले. कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी हिंदू धर्मात सुधारणा करण्याबाबत पुरोगामी विचारांच्या आर्यसमाजाच्या अनुयायांना पाचारण केले. त्यांनी सत्यशोधक समाजा ऐवजी आर्य समाजाची निवड केली कारण जबाबदारी त्यांच्यावर देण्यात येऊ शकेल. त्यांनी आधीच शाळा व वसतिगृह सुरु केले होते. आता शाहू महाराजांनी राजाराम कॉलेजचीही जबाबदारी त्यांच्यावर दिली. आर्यसमाजाने महाराष्ट्रात राष्ट्रवादी व क्रांतीकारी विचारांचे मंथन चालूच ठेवले.

आपली प्रगती तपासा :-

१) आर्य समाजाची मूख्य तत्त्वे थोडक्यात कार्य सांगा.

_____

_____

_____

_____

_____

११.५ थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्य

थिऑसॉफिकल सोसायटी न्यूयॉर्कमध्ये मादाम ब्लावटस्की आणि कर्नल ऑलकॉट यांनी इ.स.१८७५ मध्ये स्थापन केली. ह्या मागचे कारण हे होते की पाश्चिमात्य विद्वानांनी अभ्यास केल्याप्रमाणे हिंदू धर्माच्या वैदीक पवित्र पुस्तकांचे सर्वोच्च स्थान स्पष्ट झाल्याने त्यांचे कौतुक करावे या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. आर्य समाजाच्या अनुयायांनीही अनेक अमेरिकी अनुयायांना आकर्षित केले होते. परंतु थिआसॉफिकल गट हा आर्य समाजापेक्षा अधिक कर्मठ व गूढ होता. थिऑसॉफिकल सोसायटीचे संस्थापक जानेवारी १८७९ मध्ये भारतात आले. त्याच काळात अनेक सुशिक्षित मध्यम वर्गीय पुढारी उदा. दादोबा पांडुरंग, न्यायमूर्ती रानडे आणि

इतरांनी आर्य समाज व प्रार्थना समाजाचे एकीकरण मिळवणी करण्याच्या प्रयत्नात होते. थिऑसॉफिकल सोसायटीचे संस्थापक आर्य समाजाशी अत्यंत सहकार्याने वागले. तथापि स्वामी दयानंद सरस्वतींना प्रार्थना समाज आणि थिऑसॉफिकल सोसायटी कधीच पसंत पडली नाही. त्याना वाटे की प्रार्थना समाजास भारतीय संस्कृतीशी काहीही देणे घेणे नाही आणि थिऑसॉफिकल सोसायटीचा कल गुढत्वाकडे जास्त आहे.

११.५.१ थिऑसॉफिक्ल सोसायटीची उद्दिष्ट्ये.

१) वैश्विक बंधुभाव निर्माण करणे.
२) प्राचीन धर्माचा, तत्त्वज्ञानाचा आणि विज्ञानाचा पुरस्कार करणे.
३) निसर्गाच्या नियमांचा शोध लावणे आणि माणसातील दैवी शक्तींना प्रोत्साहन देणे.
४) थिऑसॉफिकल सोसायटीने त्यांचे तत्त्वज्ञान ब्राह्मणी व बौद्ध तत्त्वज्ञानातून घेतले होते. धर्म, तत्त्वज्ञान आणि गुढत्वाचे ते एक अजब मिश्रण होते. त्यांचे तत्त्वज्ञान व शिकवण, पुढील मुद्द्यांशी संबंधित असे.
१) एकेश्वरवाद.
२) देव, विश्वामध्ये तीन रूपांमध्ये आढळतो.
३) माणसाचे उच्चतम पातळी म्हणजे देव, देवदूत, आत्मा आणि मानव परातीत बुद्धीमत्ता अस्तित्वात आहे यावर विश्वास ठेवणे.

दयानंद सरस्वतींनी थिऑसॉफिकल सोसायटीच्या कार्याची स्तुती केली कारण त्यांनी अनेक सामाजिक कार्ये जशी शाळा उघडणे, पुस्तके छापणे इ. सुरु केली. परंतु निधीचा योग्य वापर न केल्याबद्दल आर्यसमाज थिऑसॉफिकल सोसायटी मध्ये दरी पडली. थिऑसॉफिकल सोसायटीचे मुख्य कार्यालय अडयार, मद्रास येथे इ.स.१८८२ मध्ये हलविण्यात आले आणि भारतात विविध ठिकाणी शाखा उघडण्यात आल्या.

मादाम ब्लाव्हाटस्की या प्रवचनासाठी दौऱ्यावर निघाल्या आणि मोठ्या प्रमाणावर, भारताच्या मुख्य शहरातून अनुयायी वर्ग त्यांना मिळाला. अनेक हिंदू नेत्यांची, धार्मिक बाबतीतल श्रद्धा डळमळीत झाली होती. हिंदू धर्मातील कर्मठ आणि दांभिकपणावर उघडपणे टीका करण्याचे धैर्य त्यांच्यात नव्हते. म्हणून थिऑसॉफिकल सोसायटीचा आश्रय त्यांनी घेतला. त्यांनी संदीग्धपणाने 'कर्म' व 'निर्वाण' या सोसायटीच्या दोन तत्त्वांना मान्यता दिली. परंतु त्यांचा खरा रस हा संस्थेच्या शैक्षणिक कार्यातच होता.

११.५.२ थिऑसॉफिकल सोसायटीचे महत्त्व :

थिऑसॉफिकल सोसायटीने शाळा उघडल्या, पुस्तके छापली आणि पुस्तिकांद्वारा हिंदू प्राचीन धर्म व संस्कृतीचे महत्त्व विशद केले. १९ व्या शतकाच्या शेवटच्या वर्षात हिंदू पुढारी परकीयांसमोर मान खाली घालत जेव्हा ते हिंदू धर्मातील गुंतागुंतीच्या जाती व्यवस्थेबद्दल बोलत असत. परंतु मादाम ब्लाव्हाटस्की व नंतर ॲनी बेझंट यांच्या इ.स.१८८९ मध्ये नेतृत्वाखाली, हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनाची प्रक्रीया सुरु झाली. दादाभाई नौरोजी, के.टी. तेलंग, लोकमान्य टिळक आणि न्यायमूर्ती रानडे यांनी त्यांच्या कार्याचे, विविध अंगांनी व दृष्टीकोनातून कौतुक केले. इ.स.१८९३ मध्ये मादाम ब्लाव्हाटस्की यांच्या निधनानंतर ॲनी बेझंट, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये अतिशय प्रसिद्ध झाल्या. इ.स.१८९१ मध्ये त्यांनी बनारस येथे हिंदू कॉलेज सुरु केले आणि हिंदू धर्मातील सुधारणांचा पुरस्कार केला. सोसायटीची तत्त्वप्रणाली व गूढवादी

भूमिका या कारणाने निर्भत्सना झाली. परंतु हे सत्यही नाकारुन चालणार नाही की सोसायटीने हिंदू समाजात आत्मविश्वास जागृत केला होता.

आपली प्रगती तपासा :-

१) थिऑसॉफिकल सोसायटीची उद्दिष्ट्ये व तत्वे सांगा.

११.६ गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव

इ.स.१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर अनेक पाश्चिमात्य शिक्षित तरुण व राजकीयदृष्ट्या जागृत झालेल्या वर्गाच्या, प्रामुख्याने हिंदू समाजाच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. परंतु त्यामुळे उच्चकुलीन मुस्लिम समाजाच्या व्यक्तींच्या मनात भीतीचे सावट निर्माण झाले. सय्यद अहमद खान आणि त्यांचे अनुयायी यांनी काँग्रेस सोडली. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्या परिस्थितीचा त्वरीत फायदा ऊचलला. अलिगढ विद्यापीठाची स्थापना ही काँग्रेसला एक नवीन कलाटणी देणारी ठरली. कारण इ.स.१८८८ मध्ये लॉर्ड डफरीनने काँग्रेसला 'सूक्ष्मदर्शीय अल्पसंख्यांक' असे संबोधून सरकारी पाठींबा काढून घेतला.

लोकमान्य टिळक जे खंबीर राष्ट्रवादी होते त्यांनी जनतेकडून पाठींबा उभा करायचा असा निश्चय केला. त्यांनी मराठ्यांच्या गतकाळातील कामगिऱ्या अभ्यासल्या. तसेच दयानंद सरस्वती यांच्या आर्यसमाजाची पुनरुज्जीवनवादी कार्य आणि शिखांच्या सिंग सभेचे कार्य त्यांना माहित होते. त्यांना वाटे की, महाराष्ट्रातील जनतेस उद्युक्त करुन, कार्यप्रवण बनविले पाहिजे.

इ.स.१८९२ मध्ये लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरु केले. गणपतीची पूजा ही महाराष्ट्रीयन लोक घरातच खाजगीरित्या करीत. हा उत्सव हिंदू वर्षानुसार भाद्रपद महिन्यात म्हणजे ऑगस्ट-सप्टेंबरच्या मध्ये व शिवजयंती एप्रिल-मे च्या दरम्यान येते. शिवजयंतीच्या बाबतीत,म्हणावयाचे झाल्यास, महात्मा फुलेंनी शिवाजी महाराजांच्या समाधीची स्वच्छता, डागडुजी व पुनर्स्थापना इ.स. १८७६ मध्येच केली होती. त्यांनी शिवजयंती उत्सव सुद्धा प्रथमच साजरा केला व शिवाजी महाराजांच्या स्तुतीप्रित्यर्थ कुळवाडी भूषण नावाचा पोवाडा रचला. टिळकांनी गणेश उत्सव व शिवजयंती हे दोन उत्सव इ.स.१८९० च्या दशकात सार्वजनिक केले व अत्यंत लोकप्रिय केले. लोकांनी एकत्रित करण्याची त्यांची ही योजना यशस्वी ठरली. लोकमान्यांनी शिवजयंती व गणेश उत्सव या दोहोंचा उपयोग राजकीय कारणांसाठी केला. तरुण-वृद्ध , स्त्री-पुरुष सर्वजणच उत्सवात सहभागी होऊ शकत होते, ज्याद्वारे जनजागृती सहज शक्य होती. लोकमान्यांवर धार्मिकतेला खतपाणी घातल्याचा आरोप झाला कारण मुंबईत हिंदू मुस्लिम दंगली उसळल्या. राष्ट्रवादाच्या पुनर्रुज्जीवनाऐवजी, 'द्विराष्ट्र सिद्धांतालाच' भविष्यात प्राधान्य मिळाल्याचे आपणास आढळते.

आपली प्रगती तपासा :-

१) गणेशोत्सव व शिवजयंतीची सुरुवात कशी झाली ते सांगा.

११.७ समारोप

पुनरुत्थानकारांनी समाजाची नवीन तत्त्वांवर व विचारांवर मांडणी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सद्य परिस्थितीच्या आराखड्यात राहूनच काम करावयाचे ठरविले. एकोणिसाव्या शतकातील काही बदल व सुधार हे त्यांच्या पारंपारिक मूल्यांमधूनच वर आले होते. ते जरी पुरोगामी विचारांचे असले तरी, बहुतेक वेळेला, मूल्यमापनाच्या प्रसंगी कारणमिमांसेपेक्षा, पुराण तत्त्वांनाच जास्त महत्त्व द्यायचे. लोकमान्य टिळकांनी त्यांची सामाजिक तत्त्वे, नैतिकता आणि समाजसुधारणेसाठी आवश्यक दृष्टीकोन हा वेदीक तत्त्वज्ञान व प्राचीन परंपरांमधूनच घेतला होता.

११.८ प्रश्न

१) हिंदू धर्माच्या पुर्नस्थापनेसाठी विष्णुबुवा ब्रह्मचारीचे योगदान स्पष्ट करा.
२) हिंदू धर्माच्या महानतेविषयी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या विचारांचे सटीक वर्णन करा.
३) आर्य समाजाच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.
४) टीपा लिहा :
   १) थिऑसॉफिकल सोसायटीचे महाराष्ट्रातील योगदान.
   २) गणेशोत्सव आणि शिवजयंती.

❖❖❖❖

१२

ब्रिटीशविरोधी प्रतिकार, बंड आणि उठाव

घटक रचना :

१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रस्तावना
१२.२ पुण्यातील रामोश्यांचे बंड
१२.३ भिल्लांचे बंड
१२.४ कोळी जमातीचे बंड
१२.५ इ.स.१८५७ च्या उठावातील महाराष्ट्र
१२.६ वासुदेव बळवंत फडके यांचा उठाव
१२.७ शेतकऱ्यांचा असंतोष
१२.८ दख्खनचे दंगे
१२.९ समारोप
१२.१० प्रश्न

१२.० उद्दिष्ट्ये

१) रामोशी, भिल्ल आणि कोळी या जमातीच्या बंडांचा अभ्यास करणे.
२) महाराष्ट्रातील इ.स.१८५७ च्या उठावा दरम्यानची परिस्थिती समजून घेणे.
३) वासुदेव बळवंत फडके यांच्या उठावाचे मूल्यमापन करणे.
४) शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा आढावा घेणे.

१२.१ प्रस्तावना

मुंबई, पुण्यामध्ये नवीन तंत्रज्ञानामुळे नवनवीन सुधारणा होऊ लागल्या आणि त्यामुळे सर्व क्षेत्रातील समाजाचे जीवनमान उंचावले. ह्या सुधारणांमुळे जीवनात आलेली सहजता अनुभवून जो समाज खूप सुधारीत नाही पण मेहनतीची कामे करुन आपले जीवन जगतो. उदा. शेतकरी कामगार, ग्रामीण भागातील शेतकरी असे लोक देवाला धन्यवाद आणि ब्रिटीश सरकारला चांगले शुभाशिर्वाद देऊ लागले. तळागाळातील दुर्बल जमातींना या परकीय कायद्याने मुळापासून उखडल्यासारखे वाटत होते. रामोशी, भिल्ल आणि कोळी या पश्चिम महाराष्ट्रातील जमातींनी या नवीन कायदे आणि सुधारणांचा जोरदार विरोध केला. त्यामुळे नुकसानदायी पण वरुन मात्र चांगल्या वाटणाऱ्या अशा सुधारणा ब्रिटीश सरकारने अंमलात आणल्या.

नवीन शाळा, साप्ताहिके, पुस्तके, वाफेवर चालणारी बोट सेवा आणि रेल्वे सेवा यांमुळे मुंबई ते कल्याण मधील सर्व उपनगरी जिल्हे यांना एक चांगले स्वरुप प्राप्त झाले. पण ग्रामीण भागामध्ये मात्र निष्ठूर, जुलमी जमिनदार आणि दडपशाही पद्धतीने करवसुली आणि त्याकरीता असलेले कायदे या सर्वामुळे त्यांचे भवितव्य अगदी रसातळाला गेले. जमिन ही बाजारातील वस्तू ठरली आणि मशिनवर बनविलेल्या विविध वस्तूंची आयात इंग्लंडहून आपल्या देशात सुरु केली. त्यामुळे हस्तकलेचा व्यवसाय संपुष्टात आला. सर्व ग्रामीण जनता, शेतकरी इतर हस्तकला व्यावसायिक यांचा विकास तर नाहीच पण रोजच्या जगण्याची सुद्धा मुश्किली निर्माण झाली. त्यांच्या जमिनी, त्यांचे वडिलोपार्जित व्यवसाय यावर त्यांचे जगणे मुश्किल झाले आणि अशा प्रकारे जगायचे असेल तर आपल्या व्यवसायाव्यतिरिक्त दुसरे काम व रोजगार करण्याची गरज निर्माण झाली. अशा प्रकारे हे लोक आपल्या व्यवसायापासून बाजूला फेकले गेले. ज्यांचा रोजगार नष्ट झाला असे लोक शेतीची लागवड करण्याकडे वळू लागले. सतत गरीबी, उपासमार आणि चलनी पिकांची मागणी यामुळे त्यांना निराशेच्या खाईत लोटल्यासारखे झाले. ग्रामीण लोकांचे सशस्त्र बंड झाल्यानंतरही शेतकरी वर्गाला शिक्षीत वर्गाकडून कुठल्याही प्रकारची दया किंवा मदत मिळू शकली नाही. इ.स.१८५७ चे महान सशस्त्र बंड दाबले गेले आणि तीच वर्षानुवर्ष चालत असलेली अन्यायी कार्यपद्धती ब्रिटीश शिक्षित लोकांनी चालू ठेवली. त्यात कोणताही बदल झाला नाही. छोटे शतकरी आणि हस्त व्यवसाय कारागीर यांना आपल्या जीवनांच्या सुरक्षेची समस्या भेडसावतच राहीली. या बंडापासून काहीही फायदा झाला नाही. परंतु त्यांना राजकर्त्यांकडून काही मदतीची अपेक्षा करण्याची प्रेरणा मिळाली.

हे सशस्त्र बंड दडपले गेले आणि रामोशी, भिल्ल आणि कोळी जमातीच्या बंडाचा विषय हा काही सोपा विषय नव्हता. इ.स.१८६० आणि १८७० च्या दशकातील शेतकऱ्यांचे बंड फार मोठ्या प्रमाणात दडपले गेले. मुंबई आणि पुण्यामध्ये राहणारा, विकसीत शहरात वाढणारा मध्यम वर्गाने सर्वांचे लक्ष आकर्षित केले. त्यामुळे जगण्याचा नवा अर्थ नवा मार्ग ग्रामीण भागातील लोकांना कळू लागला, समजू लागला. काही गोष्टींमध्ये काही आदर्श व्यक्तित्वे जी राष्ट्रीयत्वाने प्रेरित आणि भावपूर्ण लेखनातू सर्वांना समजावू पहात होती की ब्रिटीश सरकारला भारताची प्राचीन समाजव्यवस्था आणि संस्कृती ही खालसा करायची होती, ती उखडून टाकायची होती. अशा ज्वलंत धारणेतून बंडाचे प्रयत्न सुरु झाले असे वासुदेव बळवंत फडके यांचे बंड याच कारणावर आधारलेले होते.

१२.२ पुण्यातील रामोश्यांचे बंड (इ.स. १८२६-२९)

मराठा पोलीस प्रशासनामध्ये खालच्या स्तरावर असलेल्या रामोशी जमातीच्या लोकांचा खूप उपयोग होत होता. इ.स.१८१८ मध्ये मराठ्यांच्या अंतिम पराभवानंतर मुंबई विभागाच्या ब्रिटीश सरकारला आपल्या प्रांतात त्यांचे त्वरीत आदेश काढणे फारच कठीण होत होते आणि तेथील नवीन सरकार पोलीस प्रशासना मध्ये रामोशींना सामावून घेण्यास असमर्थ होते. परीणामी बेरोजगार पण सशस्त्र माणसे रामोशींसहीत पेशव्यांच्या शेती विभागाकडे फेकली गेली. आपल्याला रोजगार देणाऱ्या कोणत्याही व्यक्ति व संघटनेकडे हे लोक जायला तयार होते व ब्रटीशांची सत्ता उलथवून टाकण्यास मदत करण्यास तयार होते.

इ.स.१८२५ मध्ये आर्थिक मंदीमुळे स्थानीक पुणेरी सैन्यामध्ये दुष्काळ पडला आणि सैनिकांची संख्या कमी होऊ लागली. त्याचा रामोशींवर दुर्दैवी परीणाम झाला. म्हणून उमाजी

नाईक यांच्या नेतृत्त्वाखाली ते आणि त्यांचे सहकारी बापू त्रिंबकजी सावंत बंड करण्यास प्रेरित झाले. त्यांच्यावर हद्दपारीची वेळ आली. इ.स.१८२६ ते १८२९ या दरम्यान तोरणा किल्ल्याच्या सभोवतालच्या त्यांच्यापैकी अनेकांचे गुन्हे माफ करून त्यांना जमिनी कसण्यास दिल्या गेल्या व त्यांची पोलिस म्हणून नेमणूकही केली गेली. परंतु ब्रिटीशांनी त्यांचे बंड दडपले. पुढे अजुनही मात्र रामोश्यांनी अधूनमधून सावकार व दुष्ट अधिकाऱ्यांवर हल्ले चालूच ठेवले.

आपली प्रगती तपासा :-

१) पुण्यामधील रामोशींच्या बंडाची कारणे विषद करा.

१२.३ भिल्लांचे बंड

भिल्ल हे खानदेशमध्ये सर्वात जास्त होते. उत्तर आणि दक्षिण कडील सर्व पर्वताची पठारांची निगराणी ते करीत असत. देशाकडील बाजूस ते शेती करुन शांतपणे आपला उदरनिर्वाह करीत असत. तसेच त्यांच्या मालकीच्या जमिनी घेऊन राहत असत. तरीही पहाडी विभागात शेजारील गावांतील धनिक सावकारांना लुटून आपला निर्वाह ते करीत असत. मराठा आणि त्यांच्या बरोबर असलेले इतर दुष्काळग्रस्त (इ.स.१८०२-०४) यांच्या कडून त्यांची उपासमार होत असे. ह्या सर्व कारणामुळे खानदेशची परिस्थिती अतिशय बिकट झाली, अराजक माजले. भिल्ल लोकांनी जिथे त्यांना सुरक्षितता नव्हती त्यांनी आपल्या जमातीच्या मुख्य माणसाच्या नेतृत्त्वाखाली काही ना काही कारवाया सुरु केल्या, रोगराई पसरली आणि स्वभावाने मुळचे तापट असलेले हे लोक आपल्याच हातानी आपले जीवन धोक्यात आणू लागले. इ.स.१८१८ च्या सुमारास सहाजिकच या अराजकामुळे खानदेश भागावरील ब्रिटीशांचा ताबा डळमळीत झाला तेथील व्यवसाय वाढविणे अशक्य झाले. सातपुडा हे भिल्ल लोकांचे उत्तरेकडील महत्त्वाचे स्थान होते आणि सातमाळा आणि अजिंठा ही दक्षिणेकडील स्थाने होत. इथे भिल्लांच्या सुस्थापित अशा ३२ नेत्यांच्या टोळ्या होत्या.

इ.स.१८१७ मध्ये खानदेशात भिल्लांचे बंड जे बहुधा त्र्यंबकजीमुळे चेतविले होते, ते बंड त्र्यंबकजी ठाणे किल्ल्यातून निसटला तेव्हा फोल गेले. कारण त्यावेळेला दुसऱ्या बाजीराव पेशव्यावर त्र्यंबकजी पासून त्यांना सुरक्षा मिळविण्यासाठी त्याला पकडून अटक करावी याकरीता ब्रिटीशांनी दबाव आणला होता. भिल्ल ब्रिटीशांच्या कारवाया थांबविण्याकरीता त्यांच्याविरुद्ध बंड करण्याचे प्रयत्न करु लागले. त्यांचा हा बंडाचा भडका अचानक वाढला आणि त्यामुळे वादळी परीस्थिती निर्माण झाली. एस.बी.चौधरी यांच्या म्हणण्यानुसार ह्या बंडाने देशातील वातावरण ढवळून काढले. मुंबई सरकारने त्यांच्या विरोधात त्यांच्या कारवाया थांबविण्याकरीता लष्कराकडून उपाय करण्याचे तंत्र अवलंबले आणि त्याचबरोबर कायद्यानुसार कारवाई केली.

त्या चालू वर्षात सर्व बाजूने भिल्लांच्या बंडाला मोडून काढले आणि आजबाजूच्या पठाराचा नाश केला त्याना दाबून टाकण्यासाठी विविध ठिकाणी दूत पाठविले. तरी त्यांचा त्रास इ.स.१८३१ पर्यंत सुरुच राहीला. जरी लष्करी शक्तीचा वापर सरकारने केला तरीही हा त्रास सुरुच राहीला. भिल्लांचा त्रास होऊ नये म्हणून ब्रिटीश सरकार दोन्ही बाजूच्या कारवाया करत असत म्हणजेच त्यांना हवी असलेली गोष्ट करायला भाग पाडणे, त्याकरीता त्यांचे मन वळविणे ज्यामध्ये ब्रिटीश पूर्वीपासून वाक्बगार होते. तेच तंत्र वापरुन त्यांनी भिल्लांच्या कारवाया व बंड मोडून काढण्यात आणि त्यांना शांतपणे शेतीची लागवड करण्यास प्रवृत्त केले होते. इ.स.१८४६ मध्ये मावळ्यांमध्ये भिल्लांच्या विभागातील त्यांचे बंड पुन्हा एकदा मोडून काढले. जवळ-जवळ २५ वर्षे ब्रिटीशांबरोबर झगडल्यामुळे हा काळ त्यांना खूप महागात पडला. त्यांच्यातील फक्त नेते मंडळीच मारली गेली असे नाही तर त्यांच्यातील बरीच इतरही माणसे मारली गेली आणि त्यांच्या नवीन नेत्याबरोबर केलेले करार, बोलणी ठराव आपोआपच संपुष्टात आले.

आपली प्रगती तपासा :-

१) खानदेशातील भिल्लांच्या बंडाबद्दल माहिती द्या.

१२.४ कोळी जमातीचे बंड

कोळी हे भिल्लांचे शेजारी होते आणि ते देशाच्या ठाणे जिल्हा, सह्याद्रीवर आणि त्याच्या पायथ्याशी दोन्हीकडे राहत होते. कच्छच्या सीमेपासून पश्चिम घाटापर्यंत ते त्या भागात पसरलेले होते. ते स्वभावाने दंगेखोर किंवा बंडखोर असे होते. इ.स. १८२४ मध्ये कोळ्यांनी अतिशय भयानक असे बंड पुकारले होते. जाळपोळ, लुटालुट करीत गावागावातून बडोद्यापर्यंत हे बंड पसरले होते. पण त्यांच्या आतताईपणाच्या कृत्याला दाबून टाकण्यासाठी फक्त शक्तीचा वापर पूरेसा होता. इ.स.१८२८ मध्ये त्यांच्यातील बरेच जणाना ब्रिटीशांनी किल्ला खाली करताना नोकरीतून काढून टाकले. त्यामुळे गरीबी, उपासमार त्यांच्या आयुष्यात येऊ लागली. साताऱ्यामधील रामोशींच्या यशस्वी बंडाने प्रेरीत झालेल्या कोळ्यांनी रामजी भुगेरिया यांच्या नेतृत्त्वाखाली इ.स.१८२८ मध्ये पुन्हा बंड केले. रामजी भुगेरिया हा कोळी अधिकारी होता ज्याने पन्नास रुपये स्थगितीच्या सरकारी आदेशा विरुद्ध संरक्षणार्थ राजीनामा दिला होता. या बंडाची तीव्रता कमी करण्यासाठी, त्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी, त्यांच्या कारवाया थांबविण्यासाठी ब्रिटीशांनी कोकण आणि सह्याद्रीत असे बरेच पोलीसी गट तैनात केले.कोळ्यांनी स्वतःला या सर्व गोष्टीवरुन असे सिद्ध केले की ते ब्रिटीश सरकारच्या गळ्यातील काटा आहेत. ब्रिटीश सरकारही त्यांच्या इ.स.१८३९ मधल्या भितीदायक बंड ज्यामध्ये सह्याद्रीच्या खूप गावांची जाळपोळ होऊन नुकसान झाले होते. ते डोंगरावरील इतर बंडखोरांमध्ये सामील झाले. ह्या सर्वांतून आर.सी. मुझुमदार आणि एस. बी. चौधरी या दोघांनी असे नमूद केले की तीन ब्राह्मण म्हणजे भाऊ खरे, चिमणाजी जाधव आणि नाना धरभरे यांनी काही राजकीय हेतूने कोळ्यांना आश्रय दिला आणि त्यांना बंडास प्रेरित केले. मुजुमदार यांच्या मते, पेशव्यांना पुनःप्रस्थापित

करण्यासाठी त्यांची ताकद, काम पुरेसे होते. कारण पुण्यातील सैनिकांची शक्ती तेथून कमी झाली होती. बंडामुळे सरकारचा ताबा पेशव्यांच्या नावाने ब्रिटीशांना देणे गृहीत होते. पण ब्रिटीश चपळतेने वागले आणि त्यांची योग्य चाल यामुळे हे संकट टळले. ब्रिटीशांनी आपल्या सैन्याद्वारे कोळी लोकांवर हल्ला केला. त्यांपैकी चोपन्न जणांना विविध प्रकारच्या आरोपांखाली अटक करण्यात आली. काहींना फासावर चढविण्यात आले. अगदी ब्राह्मणांनाही सोडले नाही. त्यापैकी एकाचे नाव होते रामचंद्र गणेश गोरे.

कोळी लोक सुद्धा सहजतेने हार मानणारे नव्हते. त्यांनी इ.स.१८४४ मध्ये बंड पुकारले. त्यांचे नेते ह्या वेळेस होते, राघु बांगरीया व बापू बांगरीया. त्यांनी पुण्याच्या उत्तर पश्चिम दिशेकडील ग्रामीण भागातील मुख्य ठाण्यापासून सुरुवात करुन. नाशिक, अहमदनगर येथे लुटमारीस सुरुवात केली. पुढच्या वर्षी कोळ्यांचे बंड पुरंदर व साताऱ्यापर्यंत पसरले. परिस्थिती अगदी हाताबाहेर गेली होती. अखेर सैनिकांच्या मदतीने परिस्थिती आटोक्यात आणण्यात आली. बापू बांगरीया सापडला परंतु रघु बांगरीया पोलिसांची नजर चुकवून पळून गेला. त्यांचे जनतेच्या मनावर राज्य होते आणि पुणे व ठाणे गावांतून जो काळा बाजार होत असे, त्यावर तो गुजराण करीत असे. शेवटी २ जानेवारी, १८४८ मध्ये तो सापडला व त्याला फासावर देण्यात आले. इ.स.१८५० पर्यंत कोळ्याचे बंड मोडून काढण्यात आले.

येथे नमूद करण्यासारखे आहे की, इ.स.१८४५ मधील कोळी बंडाच्या वेळेस उमाजी जो इ.स.१८२५ मध्ये रामोशी बंडाचा नेता होता तो सुद्धा पुरंदर येथे कोळ्यांच्या अराजक कारवायांसाठी येऊन मिळाला होता. नंतर इ.स.१८७३ मध्ये होन्या, एक अतिशय प्रभावशाली कोळी, ज्यांनी एक प्रशिक्षित टोळी बनवून पुण्याच्या उत्तर-पश्चिम भागातील अनुयायाना गोळा करुन पहाडी भागातील जमातीतील लोकांना फसवून, गुन्हेगारी जगतात ढकलणाऱ्या सावकारांवर आक्रमक हल्ले करण्याची मोहीमच उचलली. जरी इ.स.१८७५ मध्ये होन्या पकडला गेला तरी क्रांतीचे वारे कोळ्यांपासून शांतताप्रिय घाटावरील कुणबी समाजापर्यंत पसरले. मे ते जून १८७५ मध्ये एक डझन पेक्षा जास्त हल्ले, बंडखोरांकडून सावकारांवर झाले. शेवटी कायदा व सुव्यवस्था स्थापित करण्यासाठी सरकारला लष्कराला पाचारण करावे लागले.

परंतु इ.स.१८७९ मधील, फडक्यांचे बंड घडून आले. पुण्याच्या आजूबाजूतील भागातील शांतता अजूनही दोन गटांमुळे बिघडली. एक गट होता कोळ्यांचा आणि दुसरा होता रामोश्यांचा. एकोणसाठपेक्षा जास्त दरोडे ह्या दोन गटांनी टाकले होते. पोलिस व लष्करांना ह्या गटांच्या अतेरिकी कारवाया मोडीत काढण्यासाठी फार कसोशीने प्रयत्न करावे लागले.

आपली प्रगती तपासा :

१) कोळी लोकांनी कशाप्रकारे बंड केले ?

_____

_____

_____

_____

_____

१२.५ इ.स.१८५७ च्या उठावातील महाराष्ट्र

इ.स.१८५७ मध्ये उत्तर भारतात महान क्रांतीचे पडघम वाजू लागले, जे मोठ्या प्रमाणावर जनतेचे बंड होते. त्यामुळे ब्रिटीशांच्या पायाखालची जमिन सरकली.अधिकारांची बदलाबदल होऊन, ईस्ट इंडीया कंपनीकडून अधिकार काढून घेऊन ब्रिटनच्या राजघराण्याला देण्यात आले. इ.स.१८५७ ते ५८ च्या उठावाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्र मात्र शांत राहीला. फक्त पुणे व आजूबाजूचा काही भाग सोडता, इतर महाराष्ट्र शांत होता हे मुंबईच्या आर्थिक प्रगतीवरुन कळते. कारण मुंबईतील वाढत्या व्यापारी घडामोडी, पाश्चिमात्यांचा प्रभाव व शिक्षित व्यक्तीमध्ये ब्रिटीश सरकार विषयी असलेला आदर इ. कारण पेशव्यांच्या अनागोंदी राज्यकारभारापेक्षा ब्रिटीशांचे शिस्तप्रिय राजकारण त्यांना जास्त पसंत होते.

आपण आधीच पाहिल्याप्रमाणे, जांभेकर, लोकहितवादी, गोपाळ हरी देशमुख, ज्योतिराव फुले, दादाभाई नौरोजी, आर.जी भंडारकर व एम.जी. रानडे ह्या व्यक्ती, ख्रिश्चन मिशनऱ्यानी जी हिंदू धर्मावर टिका केली होती त्या उत्तरा दाखल सामाजिक कार्यात गुंतल्या होत्या. अर्थात काही व्यक्ती उदा. आत्माराम पांडुरंग तर्खडकर अतिशय ब्रिटीश विरोधी होते. परंतु मुंबईने तसे पहाता ब्रिटीश राजवटीला एकदिलाने स्विकारले होते. खरे पहाता मोठ्या प्रमाणावर सुशिक्षित हुशार तरुण, व्यापारी वर्ग व नामवंत पुढारी हे मुंबई सरकार बरोबर समन्वय साधून विविध पातळयांवर काम करीत होते. तसेच त्यांचे सामाजिक आर्थिक व सामाजिक अपेक्षा तसेच सामाजिक व राजकीय विचार यामुळे अनेक गट समूह उदा. शेठजी लोक आणि बुद्धिजीवी तरुण एकत्र येऊन इ.स.१८५२ मध्ये त्यांनी बॉम्बे असोशिएशन स्थापन केली.

परंतु पुणे व महाराष्ट्रातील अंतर्गत भागाने एक वेगळेच चित्र दाखविले. मुंबई एक व्यापारी केंद्र म्हणून विकसित होत होते. परंतु पुणे हे मराठ्यांचे शहर होते. एस.आर.मेहरोत्रा लिहीतात, ''ब्रिटीशांना सगळ्यात जास्त भिती मराठ्यांची वाटत होती.'' मराठा हे अतिशय स्वाभिमानी व देश प्रेमी वृत्तीचे होते. शिवाजी महाराजांच्या शौर्याच्या कथा व मराठ्यांचा इतिहास, अजूनही त्यांच्या मनात ताजा होता. तसेच अनेक पारंपारिक ब्राह्मण व पाश्चात्य शिक्षित लोक ब्रिटीश पुण्यात कसे स्थिरावले ते विसरु शकले नव्हते. ब्रिटीशांकडे संशयाच्या नजरेतूनच बघितले जायचे. बॉम्बे टाईम्स व स्टॅण्डर्डमध्ये लिहले होते (१७ ऑक्टोबर इ.स.१८६०) :

''पुणे हे मराठ्यांचे, देश प्रेमाचे केंद्र आणि ब्राह्मणांचे प्रभाव क्षेत्र होते. मराठा-ब्राह्मण म्हणजे चित्पावन ज्यांनी पुण्यावर राज्य केले. ब्रिटीशांना ते फार महत्त्वांकाक्षी, मतलबी आणि ब्रिटीश राजवटीसाठी धोकादायक वाटत.'' सर रिचर्ड टेंपल, मुंबईचा गव्हर्नर, याने १८७९ मध्ये अशा प्रकारे तक्रार केली, ''भारतातील, राष्ट्रीय व राजकीय महत्त्वाकांक्षा एवढी सतत्यपूर्ण व जाज्वल्य आहे की तिचे दमन करणे अत्यंत कठीण आहे. पश्चिम भारतातील ब्राह्मणांचे समाधान करणे तर त्याहूनही कठीण.''

सहाजिकच, 'महान बंडाचा' प्रतिसाद मुंबई व पुण्याचा वेगवेगळा होता. तरी ब्रिटीशांचा दोन्ही शहरात हिंदू नेत्यांवर संशय होता. इ.स.१८५७ मध्ये, मुंबईतील सार्वजनिक जीवनावर उत्तरेतील उठावाने खळबळ माजली. कारण ऑक्टोबरमध्ये अशी अफवा पसरली की जगन्नाथ शंकर शेठ व भाऊ दाजी हे जनतेचे दिपस्तंभ आहेत, त्यांनी ब्रिटीशांचे सरकार उलथवून लावण्याचा कट केला आहे. तरीही त्या अशांत दिवसात, मुंबई शहर शांत राहीले आणि बॉम्बे

असोशिएशनने उत्तरेचे बंड शांत होईपर्यंत, स्वत:चे कार्यवाही थांबवली. अचानक मुंबईतील ब्रिटीशांनी शहरातील मुस्लिम नेत्यांची मदत घेऊन उत्तरेकडील बंडात जे मुस्लिम सामिल होते, त्यांना शांत करण्याचे प्रयत्न केले.

मुंबईतील अँग्लो इंडीयन वृत्तपत्राने बंडावर तीव्र टीका केली. उदा. डॉ. जॉर्ज बुइस्ट, बॉम्बे टाईम्सचा संपादक म्हणतो. ''उठावामधील रक्तपात पाहिल्यास भारतीयांनासुद्धा तसेच प्रत्युत्तर दिले जावे.''

भारतीयांविरुद्धच्या ह्या टीकेसंदर्भात सरकारने बुईस्ट विरोधी कोणतीही कारवाई केली नाही.

तथापि, इतर मुंबईच्या आघाडीच्या गुजराथी पेपरमध्ये उदा. बॉम्बे समाचार, जामे-जमशेद, रास्त गोफ्तार इ. नी. भारतीयांवर जो इंग्रजी प्रेसने हल्ला केला होता त्यास सडेतोड उत्तर दिले. बॉम्बे टाईम्सचे भागधारक श्री. नौरोजी फरदुनजींनी, संपादकावर कारवाई करा, असा आदेश दिला. त्यानंतर बुईस्ट यांना अशी हमी देण्यास सांगितले की, त्यांच्या लेखणीचा जोर ते सौम्य करतील.परंतु, त्यांनी यास नकार दिल्यावर त्यांना काढून टाकण्यात आले. बुईस्ट नंतर रोबर्ट नाईट आले. त्यांनी बॉम्बे टाईम्सला अँग्लो इंडिअन पेपर मध्ये रुपांतर करुन भारतीयांच्या हितासाठी वापरले.

दक्षिणेत, जिथे मध्य भारतात उसळलेल्या बंडाची लागण झाली होती मोठ्या प्रमाणावर असंतोष खदखदत होता ताराचंद म्हणतात, ''स्वातंत्र्याचा नाश, पेशवा राज्य नामशेष, पुण्याचे अवमूल्यन जे मराठ्यांचे महत्त्वाचे ठाणे होते, हे सर्व लोकांच्या मनात सलत होते.... इनाम कमिशन काढून घेऊन, मोठ्या प्रमाणावर पिढीजात इस्टेट जप्त करण्यात आली, तसेच दत्तक वारसा नामंजूर, तसेच नानासाहेबांचे कुटुंब व पटवर्धन यांच्या कटु संबंधांमुळे, परिस्थिती अधिकच तंग झाली.

ब्रिटीशांचे भारतीय सैनिक असिरगड, बुऱ्हाणपूर, औरंगाबाद, बेळगाव, कोल्हापूर व मुबंई यांनी त्या भागातील असंतुष्ट मुस्लिमांना बरोबर बंडाची आखणी केली. रंगो बापुजी गुप्ते जे शिवाजीच्या घराण्यातील अतिशय निष्ठावान व वृद्ध नोकर होते त्यांनी काही मराठा सरदार, तसेच रामोशी, मांग व कोळी समाजातील काही निवडक वीर यांना घेऊन, ब्रिटीशांचे राज्य उलथून, शाहू, प्रतापसिंहचा मुलगा यांस छत्रपतीच्या गादीवर बसविण्याचा मनसुबा प्रत्यक्षात उतरण्याची योजना आखली. महाराष्ट्राच्या अनेक भागातील प्रमुखांनी मदतीची आश्वासने दिली. परंतु, हा मनसुबा प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच विश्वासघात झाला. ब्रिटीशांनी अतिशय वेगाने पावले टाकून, कटकर्त्यांना यमसदनास पाठविले.

कोल्हापूर, बेळगाव व धारवाड येथे क्रांतीकारकांचे वारे जनतेमध्ये घुमू लागले व भारतीय सैनिकांमध्ये बंडाची लक्षणे दिसू लागली. त्यातच नानासाहेबांचे कानपूर येथील बंडाने त्यांना अधिकच स्फूरण चढले आणि त्यांनी उत्तरेकडील क्रांतीकारकांशी समन्वय साधून, एकत्रितपणे, एकाचवेळस बंड पुकारण्याचे ठरविले. याच असंतुष्ट मराठा सरदारांचा अदृश्य पाठीबां होता आणि मुस्लिमांनी उघडपणाने पाठींबा दिला होता. त्याप्रमाणे ३१ जुलै, १८५७ मध्ये कानपूर मध्ये बंड उसळले. सैनिकांनी कोल्हापूर काबीज करण्याचा दोनदा प्रयत्न केला परंतु तो प्रयत्न

फसला. कोल्हापूरच्या बंडाने अधिकच उग्र रुप धारण केले व सामान्यजनताही ब्रिटीशांच्या विरुद्ध ह्या बंडात उतरली.

ऑक्टोबर १८५७ रोजी क्रांतीकारकांनी कानपूरच्या शहरात प्रवेश केला, ते शहर बळकावले व शहराचे दरवाजे बंद केले. परंतु, ब्रिटीश सैन्य व त्यांच्या बंदुकांमुळे, त्यांनी क्रांतीकारकांना नामोहरम करुन, शहर परत मिळविले व राजाच्या महालही ताब्यात घेतला. एका दिवसात छत्तीस क्रांतीकारकांना ठार मारण्यात आले.

दक्षिण मराठा प्रांतातील लोक, इनाम कमिशन अंतर्गत जी जमिन जप्त झाली होती, त्यामुळे गंभीर झाले होते. ह्या असंतोषामागे नानासाहेबांचा हात असल्याचा संशय होता. ब्रिटीशाच्या विरुद्ध घाटाच्या वर व खाली दोन्ही भागात प्रतिकार झाला. नरगुंद (दक्षिण मराठा देशातील एक छोटीशी जागा) च्या प्रमुखाने ब्रिटीशांच्या राज्य खालसा करण्याच्या धोरणा विरोधात व इनाम कमिशनच्या विरोधात शेवटची रक्तरंजित विरोध केला.

नरगुंदचे प्रमुख बाबासाहेब, यांनी २७ मे १८५८ मध्ये युद्ध घोषित केले त्यामुळे दक्षिण मराठा देशाचे, रक्त खवळले. परंतु क्रातीकारकांचे ब्रिटीशांनी हाल केले. शेवटी ते ११ जून १८५८ त्यांना ठार करण्यात आले.

अशा प्रकारे ब्रिटीशांनी महाराष्ट्राच्या काही भागातील बंड मोडून काढले. महाराष्ट्रातील लोकांमध्ये एकजूटीने काम करण्याची पद्धत नसल्याने हे शक्य झाले. अशा प्रकारे दक्षिण महाराष्ट्रातील बडं हे इ.स.१८५७च्या महान बंडाचे हे लहानसे प्रकरण ठरले. महाराष्ट्रातील बंडे ही प्रामुख्याने जमिनी जप्त झालेले जमिनदार, असंतुष्ट मराठा सरदारव काही उत्तर भारतीय शिपाई यांच्यापुरतेच मर्यादीत होते. ताराचंद म्हणतात, ''इ.स.१८५७-५८ मध्ये मराठा व महार व पूर्वेचे सैनिक यांच्यात फारच कमी संबंध होते. तसेच ब्रिटीशांनी घेतलेली दक्षता व डावपेच यामुळे हे बंड अधिक पसरण्यापूर्वीच शमवले.''

वीर सावरकर हे मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टनला हे बंड मोडून काढण्याचे श्रेय देतात व लिहीतात, ''शिपायांचे पहीले धोरण असे होते की मुंबई मध्ये प्रथम बंड घडवून आणायचे व नंतर पुण्याच्या दिशेने कूच करावयाचे. पुणे काबीज करून, मराठा राज्याचा झेंडा तिथे फडकावायचा आणि नानासाहेबांना पेशवा म्हणून घोषित करावयाचे. परंतु हे सर्व सत्यात उतरण्यापूर्वीच, फॉरेस्ट प्रमुख पोलिस अधिकारी याने हा कट उधळून लावला.''

आपली प्रगती तपासा :

१) नरगुंद उठावाविषयी माहिती लिहा.

_____

_____

_____

_____

_____

१२.६ वासुदेव बळवंत फडके यांचा उठाव

वासुदेव बळवंत फडके हे महान क्रांतीकारी होते. ब्रिटीशांच्या कचाट्यातून महाराष्ट्राला मुक्त करण्याची, त्यांची जाज्वल्य इच्छा होती. त्यासाठी त्यांनी स्वतःचे भवितव्य व आयुष्य दोन्ही पणाला लावले. व्ही. एस. जोशी म्हणतात, ''फडकेंनी असे कार्य उचलले की, परकीयांच्या जोखडातून संघटनात्मक व क्रांतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविणे.'' न.चि. केळकर म्हणतात, ''नानासाहेब पेशव्यांनंतर केवळ फडकेंच्यामुळे, ब्रिटीशांच्या हृदयात भीतीने घर केले होते.'' त्यांनी अत्यंत एकत्रीतपणाने ब्रिटीशांचे राज्य उलथून लावण्याचा विडा उचलला.

इ.स.१८४५ मध्ये कुलाबा तालुक्यात एका गरीब चित्पावन कुटुंबात त्यांच्या जन्म झाला होता. फडकेंना फार शिक्षण घेता आले नाही. इ.स.१८६३ मध्ये त्यांनी लष्करी अर्थ विभाग, मुंबई सरकार येथे नोकरी पत्करली आणि पुढील पंधरा वर्षे सेवेत राहीले. त्यांच्या चरित्रकारानुसार, इ.स.१८६९ मध्ये, त्यांच्या आजारी आईस भेटण्यासाठी सुट्टी न देणाऱ्या त्याच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांमुळे ब्रिटीश सरकारविषयी अत्यंत घृणा त्यांच्या मनात निर्माण झाली. इ.स.१८७६-७७ च्या भयानक दुष्काळामुळे पश्चिम भारतात हालाखीची परिस्थिती निर्माण झाली. त्यांस त्यांनी ब्रिटीशांना दोषी ठरविले. दख्खनच्या बदलत्या राजकीय मंचावर इ.स.१८७० नंतर पुणे सार्वजनिक सभेचे एम.जी. रानडे व गणेश वासुदेव जोशी ज्यांना लोक प्रेमाने 'सार्वजनिक काका' म्हणायचे, यांच्या चळवळीने त्यांच्या क्रांतीकारी मनात अधिकच धगधग निर्माण झाली. रानडेंना भारताच्या आर्थिक पिळवणुकीबाबत ब्रिटीशांची अतिशय चीड होती. या कारणाने त्यांचे आंदोलनही तीव्र झाले.

सार्वजनिक काकांनी जानेवारी १८७१ मध्ये जाहीर शपथ घेऊन कपड्यांसकट स्वदेशी वस्तुच, वापरायच्या असे आवाहन जनतेला केले. या कारणाने प्रभावित होऊन फडकेंनी परदेशी वस्तूंचा त्याग केला. तसेच ऐक्यवर्धिनी या महाराष्ट्रीय लोकांमध्ये एकीसाठी निर्माण झालेल्या संस्थेचा स्वदेशीचा पुरस्कार करण्यासाठी व त्यानिमित्ताने राष्ट्रवादास उचलून धरण्यासाठी त्यांनी पुरस्कार केला. २८ जून १८७९ मध्ये, बॉम्बे गॅझेटचा अंक लिहितो की, पुण्यामध्ये एक वर्ग ब्राह्मणांचा असा होता की फक्त देशी वस्तू खरेदी करायच्या वापरायच्या अशी शपथ घेतली होती. वासुदेव बळवंत फडके त्यापैकीच एक होते. अर्थ विभागाच्या कार्यालयातील लोकांना त्यांच्या त्या स्वदेशीच्या अट्टाहासाची चांगलीच माहीती होती.

इ.स.१७८५ मध्ये ब्रिटीश रेसिडेंटला विष दिले असा घृणास्पद आरोप ठेऊन, बडोद्याच्या महाराजा मल्हारराव गायकवाड यांना बळजबरीने राज्यत्याग करावयास लावला. त्यामुळे दख्खनेत ब्रिटीश विरोधी दंगली उसळल्या. भूक व भूकबळी, दुष्काळाने ग्रस्त हजारो, लाखो शेतकरी, कॉलरा व देवीच्या साथीने मरणारी तितकीच जनता, हेच दृश्य सोलापूर व अन्य ठिकाणी बघायला मिळे. ह्या सर्वांच्या उपायासाठी सुसंस्कृत व सर्वज्ञानी ब्रिटीश सरकारने जे प्रयत्न केले, ते प्रयत्न अगदीच अपूरे पडत होते. दुष्काळाचे तांडवनृत्य व सरकारचा नाकर्तेपणा, यामुळे फडके व त्यांच्या सारख्या अनेक देशप्रेमीना असा विश्वास पटला की ब्रिटीशांना भारतातून हाकलून दिल्या शिवाय हे चित्र बदलणार नाही. त्यामुळे त्यांनी ब्रिटीशांविरुद्ध सशस्त्र लढा पुकारायचे ठरविले आणि स्वराज्य स्थापन करावयाचे असेही ठरविले. फडकेंनी ह्या कार्यासाठी मनुष्यबळ, धन व शस्त्र साठा जमा करण्याचे ठरविले.

पुण्याचे नैसर्गिक वातावरण, किल्ले, डोंगर व नद्या हे सशस्त्र उठावासाठी उपयुक्त असे वातावरण होते. परंतु सुशिक्षित वर्गाला सशस्त्र क्रांतीचा मार्ग परवडेसा वाटेना म्हणून फडकेंनी ह्या कार्यासाठी निगरगट्ट अशा रामोशींना घ्यावयास सुरुवात केली. त्यांनी त्यांना ब्रिटीशांच्या अन्यायाविरुद्ध गोष्टी सांगून, सशस्त्र लढ्यासाठी मानसिकरित्या तयार केले आणि त्यात त्यांना यशही आले.

फडके व त्यांच्या अनुयायांनी एक गुप्त क्रांतीकारी संघटना उभारली आणि नियुक्त केलेल्यांना शस्त्रांस्त्रांचे कठोर प्रशिक्षण सुरु केले. सोसायटीचे सर्व सदस्य एका शपथेने बांधले होते की, देशासाठी, मातृभूमीसाठी वाट्टेल तो त्याग करण्याची माझी तयारी आहे. अशा प्रकारे २२ फेब्रुवारी १८७९ मध्ये वासुदेव बळवंत फडके व त्यांच्या अनुयायांनी पहिला महाराष्ट्रीयन लोकांनी घडून आणलेला सशस्त्र लढा पुकारला. महाराष्ट्रीयन लोकांचा लढा इ.स.१८१८ पासून चालू होता. त्यांच्या शेकडो स्वयंसेवकांपैकी अनेक जण गरीबी व भूकबळीचे शिकार होते. रामोशी, कुणबी, धनगर, चांभार व ब्राह्मण यांपैकी प्रामुख्याने होते. परंतु त्यापैकी अनेकजण लुटीचे लालसेपोटी सहभागी झाले होते तर काही जण खरोखरच देशभावनेने सामील झाले होते.

जेव्हा फडकेंच्या लढ्याबद्दल वर्तमानपत्रात बातम्या झळकू लागल्या तेव्हा संपूर्ण भारतात, दख्खनमधील परिस्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु झाले. सरकारसुद्धा अचंबित झाले व सद्य परिस्थिती गंभीर बनत चालल्याचे त्यांच्या लक्षात आले. परंतु फडके यांचा भर दरोडे व पोलिसांबरोबरच्या छोट्यामोठ्या लढाया यावर होता. त्यामुळे लोकांची सहानुभुती त्यांच्याबरोबरच होती. सरकारला फक्त वित्त व जीवीत हानीची भीती वाटू लागली, असे नाही तर, हा लढा त्यांच्या राजवटीला एक आव्हान आहे, याची त्यांना जाणीव झाली. सर रिचर्ड टेंपल, मुंबईचे गव्हर्नर म्हणतात की.....

''फडकेंच्या राजकीय लढ्याचे स्वरुप लक्षात घेता मुंबई सरकारने भराभर पावले उचलून, उठावातील अनेक कार्यकर्त्यांना पकडले. फडक्यांना पकडतांना अनेक सापळे रचले. परंतु फडक्यांना गरीब-श्रीमंत, उच्च व कनिष्ठ जातीतील लोकांचा पाठींबा व आश्रय असल्याने ब्रिटीशांना त्यांना पकडणे कठिण जात होते. अशा भटकंतीच्या दिवसांत त्यांनी गावागावात प्रबोधन केले व आपल्या लष्करी बंडासाठी माणसे गोळा करावयास सुरुवात केली. त्यांचे लक्ष्य हे सरकारी तिजोरी लुटण्याचे होते. जेणेकरुन ५०० च्या वर जमलेल्या कार्यकर्त्यांना सशस्त्र करता येईल. परंतु त्यांच्या ह्या इच्छेवर रामोश्यांनी पाणी फिरविले कारण त्यांच्यात कोणतीही राष्ट्रभक्ती नव्हती केवळ लुटीच्या लालसेने ते आले होते.

२९ मार्च १८७९ मध्ये फडकेंनी दोन दरोडे घातले व थोडे पैसे मिळविले. परंतु त्यावरुन त्यांच्या सदस्यांमध्ये भांडणे होऊ लागली. कारण रामोश्यांनी त्यांना न कळविता, मिळकतीचा मोठा भाग उडविला होता. ह्या कारणाने निराश होऊन, फडकेनी रामोशींना सोडून दिले. २४ एप्रिलला ते लिहितात,

''आता फक्त माझ्या आयुष्याचे सातच दिवस राहील्याने, हे भारतीयांनो मी तुमच्यापुढे आता शरण येतो आणि तुमच्यासाठी आयुष्याचा त्याग करतो आणि देवाच्या दरबारात तुमच्यासाठी सदैव प्रार्थना करेन.''

परंतु ते आजारातून बरे झाले व सोलापूरला गेले. व्ही. एस. जोशी म्हणतात, (फडकेंचे चरित्रकार), मे १८७९ च्या पहील्या आठवड्यात, फडकेंनी त्यांचा पहिला जाहीरनामा काढला. ज्यात त्यांनी गरीब शेतकऱ्यांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करणाऱ्या ब्रिटीश सरकारची निंदा नालस्ती केली. त्यांनी सरकारला ताकीद दिली की, जर सरकारने वेळीच योग्य ती कार्यवाही केली नाही तर, देशाच्या वेगवेगळ्या भागात बंड होईल व ठिकठिकाणी ब्रिटीश अधिकाऱ्यांना ठार केले जाईल. परंतु, सरकारनेही हे बंड पूर्णपणाने मोडून काढायचा विडा उचलला होता. फडक्यांच्या अटकेसाठी ३०००/- रु. चे बक्षिस जाहीर करण्यात आले आणि संवेदनशील भागात लष्कर तैनात करण्यात आले. जेव्हा सरकार बंडखोरांचा घाटात शोध घेत होते तेव्हा फडके व त्यांच्या सहकाऱ्यांनी ब्रिटीशांशी समोरासमोर हल्ला टाळण्यासाठी कसारा घाट पार केला होता. ते कोकणात गेले, दरोडे घातले आणि अनेक मौल्यवान खडे, मोती, माणिक, दागिने इ. तसेच महागड्या नथी व कानातले डूल, गळ्यातील हार इ. चा ऐवज त्यांच्या हाती लागला.त्यांच्या अचानक दरोड्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. जिल्हा पाठोपाठ जिल्हा, त्यांच्या दरोड्याचा शिकार होऊ लागला. त्यांच्या त्या सततच्या दरोड्याच्या त्रासाला कंटाळून लोक मुंबई पुण्यासारख्या शहरात स्थलांतर करु लागले.

मुंबई सरकारला शंका आली की फडक्यांचे सक्रीय सहाय्यक व कार्यकर्ते पुण्यात आहेत. त्यासाठी त्यांनी कठोर पावले उचचली, जेणेकरुन त्यांना सापळ्यात पकडता येईल. त्याचा परिणाम असा झाला की पुण्यातील स्थानिक लोकांचे भयंकर हाल झाले व संपूर्ण शहर म्हणजे एक तुरुंगच झाला.

पुण्यावरची सरकारची कडक नजर व फडक्यांचे बंड हे लंडनच्या राजकीय वर्तुळातील चर्चेचे महत्त्वाचे मुद्दे बनले. 'टाईम्स' या वृत्तपत्राने ब्रिटीशसरकारने भारताविषयी सध्याचे मवाळ धोरण सोडून अतिशय कठोर पावले उचलण्याविषयी सुचविले. २३ मे १८७९ मध्ये, भारताच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटला शेवटी मान्य करावे लागले की गेल्या काही आठवड्यापासून, दख्खन प्रांत असंतोषाने धुमसत आहे. सरकारी यंत्रणा वेगात फिरु लागली. शेवटी २१ जुलै, १८७९ मध्ये तीन वाजता सकाळी देवेर नाडीगी गावात, हैदराबादच्या कालाडमी तालुक्यात, देवळामध्ये झोपलेल्या अवस्थेत वासुदेव फडकेंना पकडण्यात आले.

ब्रिटीश सरकारविरुद्ध युद्ध करण्याच्या हेतुने मनुष्यबळ, वित्त व शस्त्रास्त्रे गोळा करण्याचा आरोप वासुदेव फडकेंवर ठेवण्यात आला. तसेच जनतेमध्ये सरकारविरुद्ध असंतोष निर्माण करणे व दरोडे घालणे हे सुद्धा आरोप त्यांच्यावर लावण्यात आले. ३ जानेवारी १८८० मध्ये, त्यांना एडन जेल मध्ये काळ्यापाण्याची शिक्षेसाठी पाठविण्यात आले. त्यांनी १३ ऑक्टोबर १८८० मध्ये जेलमधून पळून जाण्याचा प्रयत्न केला. शेवटी १७ फ्रेब्रुवारी १८८३ मध्ये त्यांचा देहांन्त झाला.

आर. सी. मुजुमदार म्हणतात, ''फडके यांचे बंड म्हणजे बलाढ्य अशा ब्रिटीश सरकारविरुद्ध फक्त एका माणसाचे शक्ती प्रदर्शन होते. परंतु त्यांनी क्रांतीची बीज या मातीत रोवली. त्याचा पुढे जाऊन मोठा वटवृक्ष झाला व संपूर्ण देशभरात त्याची वाढ झाली आणि त्यांनी हे केवळ पाव शतकाच्या कालावधीत साध्य केले. त्यांचे देशप्रेम व निर्भिड राष्ट्रवादाची प्रेरणा, चाफेकर बंधूंनी घेतली आणि त्यानंतर विसाव्या शतकात भारतीयांचा क्रांतीकारक विचारांचा एक वेगळा वर्गच तयार झाला. त्यांच्या तरुणांना गुप्तपणे लष्करी प्रशिक्षण देणे, शास्त्र साठा गोळा

करणे, त्यासाठी राजकीय दरोडे टाकणे या पद्धतीचा अवलंब अनेक जणांनी केला आणि त्यामुळेच त्यांना भारताच्या 'क्रांतीकारी राष्ट्रवादाचे जनक' असे संबोधले जाते. परंतु, जो मार्ग त्यांनी अवलंबला होता आणि ज्या पद्धतीने त्यांच्या माणसांनी, असहाय्य लोकांवर अत्याचार केले. याच विचार करता, वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडाचा नेमका अर्थ स्पष्ट करणे कठिण जाते.''

१२.६.१आपली प्रगती तपासा :-

१) वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडाविषयी थोडक्यात सांगा.

१२.७ शेतकऱ्यांचा असंतोष

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्र हा प्रामुख्याने शेती प्रधान प्रांत होता. मुंबई व पुणे सोडले तर, इतर भाग हा प्रामुख्याने शेती प्रधान होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोक शेती व्यवसायातच गुंतले होते. आर. डी. चोकसींच्या मतानुसार, संपूर्ण लोकसंख्येपैकी इ.स.१८१८ मध्ये ब्रिटीशांनी व्यापलेल्या मराठा राज्यात, मराठ्यांचे प्रमाण सत्तर टक्के तर उरलेले ब्राह्मण, मुस्लिम, राजपुत व इतर होते. (एकूण लोकसंख्या होती ४०,००,०००) मुंबई शहराच्या बाहेर ब्राह्मण, मुस्लिम हे प्रामुख्याने पुणे, सातारा व धारवाड येथे होते. बहुतेक मराठा हे रयत किंवा गरीब शेतकरी होते. शहरी भागातील ब्राह्मण व्यवसाय करीत होते आणि त्यांची तुलना बुद्धिवंत वर्गात होत असे.

पेशव्यांच्या कालखंडात शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती जरी चांगली नसली तरी होती. काहींची स्वतःची जमीन होती, मोठ्या प्रमाणावरील रयत हे शेत जमीन भाड्याने घेऊन कसणाऱ्यांपैकी होते. तसेच उर्वरिते महाराष्ट्रात भूमीहीन शेतमजूर होते जे दुसऱ्याच्या शेतात काम करीत. फारच कमी प्रमाणावर, ग्रामीण भागात लोक, घरगुती नोकर म्हणून काम करीत. देशमुख, देशपांडे, पाटील व इतर श्रीमंत जमीनदार हे गरीब भूमीहीन लोकांचे शोषण करीत. मजूरांना देण्यात येणारी मजूरी ही अत्यंत अल्प असे व त्यातून कामगारांचे काहीही हित साधणे कठीण होते. ही पद्धत अगदी इ.स.१८५० मध्ये ब्रिटीश राजवट आल्यानंतरही टिकून राहीली. इ.स.१८५० पासून मजुरीमध्ये वाढ होऊ लागली. कारण रेल्वे, रस्ते बांधणी व इतर सार्जनिक कामात अगदी शेतीच्या कामातही मजूरांची मागणी वाढू लागली.

महाराष्ट्रावर राज्य स्थापन झाल्यावर ब्रिटीशांनी जमिन महसूलाच्या रयतवारी पद्धतीचा अवलंब केला. ह्या पद्धतीमध्ये सरकार व जमिन धारक (भाड्याने कसणारा नव्हे) यांच्यामध्ये सरळसरळ महसूलांची रक्कम ठरविली जायची. हीच पद्धत दुसरे बाजीराव पेशव्याच्या काळापर्यंत अवलंबली गेली होती. एल्फिन्स्टन दख्खनचा कमिशनरने त्यांच्या अधिकाराखाली राबविली गेलेली ही पद्धतद्वारे महसूल अधिकाऱ्यांना वारेमाप अधिकार दिले होते. परंतु काही

वर्षातच अशी जाणीव झाली की ही पद्धत समाधानकारक नाही. अपुऱ्या पावसामुळे शेतीचे बऱ्याच भागात नुकसान झाले होते. शेतीमालाच्या घसरलेल्या किंमती यामुळे शेतकऱ्यांचे अजून हाल झाले व महसूलात घट झाली. तसेच शेतीवर वाढता बोजा, शेती महसूलांचे वाढते दर, परदेशी मालाबरोबर स्पर्धा या कारणांनी, शेतकरी अगदी कर्जबाजारी झाला. परंतु उत्साही अधिकाऱ्यांनी आहे त्याच प्रमाणात महसूल गोळा करण्याचा प्रयत्न केल्याने अनेक जण संकटात सापडले.

इ.स.१८२७ मध्ये सरकारने, जमिन महसूलाच्या पद्धतीत बदल करण्याचे ठरविले जी पूर्वीच्या महसूल पद्धतीपेक्षासुधारीत होती. परंतु लंवकरच त्यातील त्रुटी दिसून येऊ लागल्या काही वर्षाच्या अभ्यासानंतर, सुधारीत पद्धती अवलंबण्यात आली. इ.स.१८३६ मध्ये नवीन पद्धती अवलंबल्यानंतर शेती महसूलात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. कारण यावेळी आकारण्यात आलेले दर पूर्वीपेक्षा कमी होते. महसूलाच्या दरात घट झाल्याने शेतकऱ्यांनी अधिक जमिन कसावयास घेतली. इ.स.१८६१-६५ दरम्यानच्या अमेरिकन यादवी युद्धामुळे इंग्लंडमध्ये भारतीय कापसाला मागणी वाढली. त्याच काळात खानदेशामध्ये सुगीचा हंगाम चांगला गेला. त्यामुळे इ.स.१८५० ते १८६६ चा कालखंड हा आर्थिक सुबत्तेचा कालखंड म्हणून ओळखण्यात येतो. परंतु ही आर्थिक सुबता तात्पुरत्या स्वरुपाची होती.

मुंबई प्रांताच्या सरकारने ह्या सर्व अनुकुल परिस्थितीचे श्रेय स्वतःकडे घेतले. गतकाळातील भयंकर आर्थिक प्रश्न विसरण्यात आले आणि सध्याची सुबत्ता ही तात्पुरती असून पूर्वीचे आर्थिक संकट कधीही ओढवू शकते याची पुसटशी जाणीवही त्यांना राहीली नाही. लवकरच अमेरिकन यादवी युद्ध संपले. अमेरिकन लोकांनी त्यांची बाजार पेठ काबीज केली व भारतामध्ये जी आर्थिक उलाढाल चालली होती, ती थंडावली. शेतकरी तर पूर्वीच्याच कर्जाच्या ओझ्याखाली दबला होता. आता तर तो अगदी अगतिक झाला. सावकारांच्या हातात गावाची अर्थव्यवस्था आली आणि रयत पुन्हा एकदा सावकाराच्या कचाट्यात सापडली.

दरम्यानच्या काळात महाराष्ट्राची लोकसंख्या झपाट्याने वाढत होती. एका पहाणीनुसार इ.स.१८३२ ते १८७२ च्या दरम्यान दख्खन प्रांतातील लोकसंख्या २० लाखाने वाढली. इ.स.१८५० पर्यंत वाढलेल्या लोकसंख्येने शक्य तेवढ्या प्रमाणात जमिन ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न केला व त्यानंतरच्या काळात सार्वजनिक बांधकामे व समाजहिताच्या प्रकल्पांवर कामगारांची मागणी वाढल्याने त्याकडे कामगार ओढले जाऊ लागले. परंतु अर्थव्यवस्थेतील चढाव उतार आणि इ.स.१८५०-६५ च्या काळातील शेतीमालाची वाढती किंमत यामुळे कामगारांना मजुरी वाढून देखील. म्हणावा तसा फायदा झाला नाही. तसेच सरकारनेही कोणतेही देशाच्या विकासाचे औद्योगिक धोरण अवलंबले नाही. याउलट इंग्लडवरुन यंत्रसामुग्री आयात करण्यात अधिक पुढाकार घेतला. त्यामुळे भारतातील हातमाग उद्योग धोक्यात येऊन ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली. जसे मुंबईसारख्या शहरात लोकांचे स्थलांतर होऊन सुद्धा जमिनीवरील भर मात्र कमी झाला नाही.

स्वार्थी सावकारांमुळे तर गरीब शेतकऱ्यांचे हाल नकोसे झाले. तथापि, इ.स.१८२७ मध्ये सावकारांवर नियंत्रण आणण्यासाठी काही सुधारणा अंमलात आणल्या तरी दख्खनच्या भागातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा काही कमी झाला नाही, उलट तो वाढला. तसेच ब्रिटीश संसदीय नियमानुसार, जमिनीहक्काच्या कायद्यामुळे शेतकरी अधिकच सावकाराच्या कचाट्यात सापडला. उदा. जमिनीला विनिमय मूल्य दिल्याने शेतकरी जमिनी गहाण ठेऊ लागले व विहित रक्कम परत न केल्यास सावकार गरीब शेतकऱ्याच्या जमिनी हडप करु लागले. पूर्वी केवळ नैसर्गिक आपत्ती उदा. दुष्काळ, युद्ध यासारख्या कारणाने शतकरी जमिन सोडून जायचे. आता

तर नवीन नियमानुसार सावकारच शेतकऱ्यांना हुसकावून लावू लागले. इ.स.१८५९ च्या सिव्हील प्रोसिजर कोड व लिमिटेशन ॲक्टने तर शेतकऱ्यांच्या विरोधात सावकारांचे हात मजबूत केले. पर्यायाने इ.स.१८७५ मध्ये महाराष्ट्रातील गरीब शेतकरी हे कर्जबाजारी, भूकेकंगाल वर्गाचे प्रतिनिधी होऊन बसले. त्यांची अवस्था अजूनही खालावली. पुणे सार्वजनिक सभा व बॉम्बे असोसिएशनच्या गरीब शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी सरकारला देण्यात येणाऱ्या निविदा सुचनांचा काहीही विशेष परिणाम झाला नाही. याउलट सरकारला, शेतकऱ्यांनी कर न भरण्याच्या प्रकरणात सार्वजनिक सभेचा हात आहे, असा संशय येऊ लागला.

आपली प्रगती तपासा :-

१) अमेरिकन यादवी युद्धाचा भारतातील बाजारपेठेवर काय परिणाम झाला ?

१२.८ दख्खनचे दंगे

इ.स.१८६७ मध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण भागात खराब हवामान निर्माण झाले. शेतमालाच्या किंमती धडाधड घसरु लागल्या. इ.स.१८७० मध्ये गरीब शेतकऱ्यांवर कर्जाचे ओझे अधिकच वाढले. त्यांना कर्जावर व्याज न भरता आल्याने त्यांना कोर्टापर्यंत खेचण्यात आले. परिणाम असा झाला की, बहुतांश शेतकरी सावकारांचे गुलाम झाले. फक्त पोटापाण्यापुरतेच अन्न त्यांना मिळू लागले व वरील रक्कम सावकारांचे कर्ज फेडण्यासाठी वापरण्यात आली. तसेच शेत मालाच्या किंमती घसरल्याने, शेतीचे प्रमाणही कमी झाले. काहींनी जमिनी विकून टाकल्या तर काहींनी गहाण टाकल्या. आर.सी. मुझुमदार लिहीतात, ''चढ्या दराने व्याज देण्याचा मारवाड्यांचा धंदा अगदी तेजीत चालू होता.'' दख्खनच्या दंगलीचा अहवाल तयार करण्यासाठी जे कमिशन आले होते, त्यांना असे आढळले की सरकारी जागेपैकी १/३ जागा ही कर्जबाजारी आहे आणि कर्जाचा बोझा हा त्यांच्या आर्थिक उत्पन्नापैकी अठरापट जास्त आहे. काही सावकारांनी तर अशा कर्जबाजारी व असहाय्य शेतकऱ्यांना विशेषत: कुणबीस्त्रियांबरोबर कर्जाच्या बदल्यात तडजोड करण्यास भाग पाडले.

अशा ह्या भयंकर अन्यायग्रस्त वातावरणात, गरीब शेतऱ्यांचा संयम सुटण्याची वेळ आली. इ.स.१८७४ च्या दख्खन अखेरीस, त्यांच्या सहनशक्तीचा बांध तुटल्याने पुण्यातील, शिरूर तालुक्यातील कारदे गावात भयंकर दंगल उसळली. गावातील सावकारांना गावातून सामाजिक व आर्थिकरित्या बहिष्कृत करण्यात आले. त्यांच्यावर गाव सोडून पळून जाण्याची वेळ आली. हळूहळू ह्या दंगलीने पुण्यात इतरत्र उग्ररुप धारण करावयास सुरुवात केली. पोलिसांनी तातडीने कार्यवाही करुन ९५१ लोकांना जवळजवळ ३१ गावातून पकडले.

आर.सी. मुजुमदार दख्खनच्या दंगलीचे वर्णन करताना लिहितात, ''सावकारांवर प्राणघातकी हल्ले झाले. मालमत्तेची लुटालुट झाली परंतु, प्रत्यक्षात मात्र कोणाचीही हत्या झाली नाही. दंगलखोरांचा असा प्रयत्न होता की सावकारांच्या विळख्यांतून एकदाची सुटका करुन घ्यायची. जेव्हा सावकारांनी कागदपत्रे द्यावयास नकार दिला तेव्हाच शारीरिक पातळीवर

हाणामारी झाली. ह्या दंगलीत प्रामुख्याने मारवाडी व गुजर सावकार बळी पडले. काही तुरळक घटनांमध्ये ब्राह्मण सावकारांवरही दंगलीची लाट उसळली. एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, कोळी, भिल्ल, रामोशी यांचे बंड, तसेच इ.स.१८७० च्या सुमारास, सावकारांविरुद्धचे गरीब जनतेचे बंड हे सुद्धा आपल्यावरील अन्यायाविरुद्ध दिलेली एक प्रतिक्रिया होती.

अशा प्रकारच्या दंगलीवर नियंत्रण ठेवण्यासाठी व राज्यात सुव्यवस्था आणण्यासाठी सरकारने एक कमिशन नियुक्त केले ज्याद्वारे पुणे, सातारा, अहमदनगर व सोलापूर येथील दंगलीचा इत्यंभूत अहवाल सरकारला मिळेल. दख्खनच्या दंगलीबाबतचा कमिशनचा अहवाल स्विकारल्यानंतर, इ.स.१८७९ चा कायदा पारित केला गेला. त्याद्वारे सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत तटस्थ राहीले. तो बदलण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की महाराष्ट्रात नंतर आलेल्या दुष्काळात, पुना सार्वजनिक सभेसारख्या खाजगी संस्थाच नव्हे तर खुद्द सरकारसुद्धा सक्रीय झाले. तसेच सरकारविरुद्ध धडक कार्यवाही करुन असे हे दाखवून दिले की यापुढे असले अत्याचार सहन होणार नाहीत. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षात राजकीय संस्था शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या मागण्या यांना महत्त्व देताना दिसून येतात.

लोकमित्र या गुजराथी साप्ताहीकाने असे लिहिले की, दख्खनची दंगल ही व्यवसायाने लुटारु असलेल्यांकडून नव्हे तर परिस्थितीने गांजलेल्या रयते करवी घडवून आली होती. दख्खनची रयत ही गरीबीने गांजलेली होती, जिच्यावर अन्यायकारक महसूल कर लादण्यात आला होता. आधीच ह्या बाबतीत त्यांची नाराजी होती. त्यात भर म्हणून त्यांच्यावर अन्यायकारक नवीन जंगल कायदा लागू केला. त्यामुळे दरोडा घालण्याची त्यांच्यावर वेळ आली. त्यांना काही व्यावसायिक दरोडेखोरही येऊन मिळाले.

१२.९ समारोप

अशा प्रकारे, आदिवासी व गरीब शेतकऱ्यांनी घडवून आणलेल्या बंडाचा, सुशिक्षित प्रस्थापितांवर काडीचाही परिणाम झाला नाही. अगदी इ.स.१८५७ चा उठाव सुद्धा त्यांच्या दृष्टीने नगण्य वा नाममात्रच होता. रामोशी, कोळी व भिल्लांच्या बंडाला दाबून टाकणे अगदीच सोपे काम नव्हते. इ.स.१८६० मधील शेतकऱ्यांचे बंड कठोर पावले उचलून मोडून टाकण्यात आले. ह्यामुळे मुंबई-पुण्याच्या सुशिक्षित लोकांचे त्याकडे लक्ष वेधले गेले.

१२.१० प्रश्न

१) ब्रिटीश राजवटीविरुद्ध रामोशी, भिल्ल व कोळ्यांनी का बंड पुकारले ? त्याबाबत सविस्तर लिहा.

२) इ.स.१८५७ च्या उठावाच्या वेळची महाराष्ट्रातील परिस्थिती विशद करा.

३) वासुदेव बळवंत फडक्यांचे बंड व त्यांच्या कारवायांची माहिती द्या.

४) टिपा लिहा :

१) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा उठाव

२) दख्खनच्या दंगली.

❖❖❖❖

१३

महाराष्ट्राचा आर्थिक विकास (इ.स. १८६१ - इ.स. १९२०)

घटक रचना :

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ शेती विकास
१३.३ वाहतूक व दळणळणाच्या सोयी
१३.४ उद्योगधंद्याचा विकास
१३.५ वाणिज्य व व्यापार
१३.६ कामगार चळवळींचा उदय
१३.७ समारोप
१३.७ प्रश्न

१३.० उद्दिष्ट्ये

१) महाराष्ट्रातील शेतीची परिस्थिती समजून घेणे.
२) वाहतूक व दळणवळणाची परिस्थिती अभ्यासणे.
३) औद्योगिक परिस्थिती समजून घेणे.
४) व्यापार-उदीम यांचा विकास अभ्यासणे.
५) कामगार चळवळींचा उदय समजून घेणे.

१३.१ प्रस्तावना

मागील अध्यायात आपण असे पाहिले की महाराष्ट्रातील सामान्य जनतेमध्ये ब्रिटीश नीतीविरूद्ध असंतोष खदखदत होता आणि संपूर्ण एकोणिसाव्या शतकात शेतकऱ्याची परिस्थिती हलाखीची झाली होती. दख्खनच्या दरोड्यामागचे कारण ही हा 'असंतोषच' होता. या पाठात, आपण तत्कालीन महाराष्ट्रातील आर्थिक घडामोडी अभ्यासणार आहोत. सुरुवातीलाच, तुम्हाला समजल्याप्रमाणे, फक्त काही पानांतच, संपूर्ण विषयाचे व मुद्द्याचे विवरण होऊ शकत नाही. तरीही इ.स. १८६१ ते इ.स. १९२० च्या दरम्यानची, महाराष्ट्रातील वाहतूक व दळणवळणाची काय स्थिती होती, ती थोडक्यात मांडण्याचा शक्यतो प्रयत्न केला आहे. इ. स. १८६१ पूर्वीचा थोडक्यात सारांश, तुम्हाला परिस्थितीचा अंदाज यावा अशा उद्देशाने दिलेला आहे.

१३.२ शेती विकास

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत आधीच नमूद केल्याप्रमाणे, शेती व्यवसायामध्ये सातत्याने मंदी असे. किंमती व उत्पादन दोन्ही कमी असल्याने मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातील गरीब शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून दिले होते. इ.स.१८३५ पर्यंत, रयतवारी पद्धतीने ग्रामीण भागाची स्वयंशासित पद्धती मोडून काढली आणि गावातील प्रमुख व इतर अधिकाऱ्यांच्या पदाचेही अवमूल्यन झाले. सर्व अधिकाऱ्यांना आता खात्री पटली होती की गेल्या दोन दशकांपेक्षाही अधिक कालखंडा पासून दख्खनचे जास्त कर आकारणीमुळे आर्थिक शोषण झाले आहे. जनता दारीद्र्यरेषेखाली गेली आहे, ग्रामीण जीवन कोलमडले आहे आणि जमिन कसायला निकृष्ट झाली आहे. नवीन योजनेत इ. स. १८३५च्या भू सर्वेक्षणानुसार काही बदल घडून आले. उदा. शहरांचा विकास, वाहतुकीमध्ये सुधारणा, लागवडीखालील अधिक जमिन आणि अन्नधान्याच्या वस्तूंसाठी वाढीव बाजार इ.स.१८५० नंतर, दोन दशके महाराष्ट्रातील शेतीचे चित्र समाधानकारक होते.

इ. स. १८५० व १८६० च्या दशकांत शेतीचा हंगाम चांगला होता. जमिन महसूलात घट झाल्याने जमिन कसण्याचे प्रमाण अनेक जिल्ह्यात वाढले. इ. स. १८६१ च्या अमेरिकन यादवी युद्धाने शेतीच्या प्रमाणात वाढ झाली. भारतीय कापसाची मागणी वाढली आणि त्यापैकी बऱ्याच प्रमाणावर पुरवठा खानदेशातून झाला. पश्चिम भारतात, रेल्वे व पाणीसिंचन योजनेमुळे, निर्यातीच्या प्रमाणात वाढ झाली. कापसाचे उत्पादन दुप्पटीने वाढले आणि अन्नधान्याचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर इ. स.१८६० ते १८६९ च्या दरम्यान वाढले.

तथापि, शेतीच्या उत्पादनातील वाढीचा पहिला फायदा व्यापाऱ्यांना आणि सावकारांना झाला. तसेच शेतकऱ्यांनाही झाला. कारण जास्त काळ पर्यंत समृद्धीचा काळ टिकून राहीला. जिल्ह्यापाठोपाठ जिल्ह्यामध्ये उत्पादनात वाढ झाली. नांगर, बैलगाडी व शेती व्यवसायास आवश्यक सामुग्री इ. स.१८७० पर्यंत मोठ्या प्रमाणावर वाढली. सोलापूरच्या सरकारी गॅझेट मध्ये म्हटल्याप्रमाणे इ. स.१८३९ च्या प्रमाणात इ. स.१८७१ मध्ये जास्त लोक समृद्ध व स्वतंत्र होते. त्यापैकी बहुतेकजण सावकाराच्या देण्यामधून मुक्त झाले होते. यापैकी फक्त तेच अपवाद होते ज्यांनी १० लाखांच्या खाली जमिन महसूल भरला. मुंबई प्रांताचा एकूण महसूल इ. स.१८५७ ते १८७१ च्या दरम्यान ३७ टक्के वाढला.

इ. स.१८७० नंतर मात्र शेती व्यवसायाने कलाटणी घेतली. जागतिक पातळीवरील घडामोडींचाही भारतीय शेती व्यवस्थेवर परिणाम झाला. अमेरिकन जनतेचे यादवी युद्ध आतापर्यंत संपले होते आणि अमेरिकन लोकांनी त्यांचा शेतीचा बाजार परत ताब्यात मिळविला होता. शेतमालाच्या किंमती इ. स.१८६० च्या पातळीवर खाली घसरल्या.

सरकारवर कमी कर आखणीसाठी, दबाव टाकण्यात आला. तरी विशेष फायदा झाला नाही. पुन्हा एकदा गरीब शेतकरी स्वार्थी सावकारांच्या तडाख्यात कर्जासाठी अडकले. (कारण धान्याच्या सुरक्षिततेसाठीही जमिन महसूल भरावा लागे. परंतु सावकारांचेही मंदीमुळे नुकसान झाल्याने, तेही कर्ज देण्यास तयार नव्हते.

आधीच म्हटल्याप्रमाणे शेती व्यवसायातील नुकसानीमुळे, इ. स.१८७५ मध्ये दख्खन प्रांतात दंगली उसळल्या. त्याचा गंभीर परिणाम सावकार व वाण्यांवर झाला. सरकारने शेतकऱ्यांचे बंड दख्खन शेती सवलत कायदा इ. स.१८७९ मध्ये आणून शांत करावयाचा प्रयत्न केला. कायद्यानुसार, त्यात दोन उपाय होते. एक म्हणजे कायदेशीर शेतकऱ्यांना सावकारांकडून संरक्षण व दुसरा उपाय म्हणजे, सावकारांऐवजी पैश्याची व कर्ज मिळण्याची अन्य व्यवस्था. या कायद्यास अल्प प्रमाणात यश आले. कोर्टाच्या अनेक प्रकरणांत घट झाली. त्यापैकी अनेक प्रकरणे वाटाघाटीसाठी घेण्यात आली. सावकार व वाण्यांच्या विरुद्ध बंड व त्यांच्यावर लादण्यात आलेले नियम व अटी यामुळे अनेक सावकार ग्रामीण भागातून, मुंबईच्या दिशेने वळले. परंतु त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न कमी झाले नाही. आतापर्यंत शेतीसाठी कर्ज मिळत नव्हते. पण आता ते अन्य मार्गाने मिळू लागल्याने, नवीन प्रश्न उपस्थित झाला. आता त्यांना त्यांच्या जमिनी गहाण ठेवाव्या लागल्या व प्रसंगी विकाव्या लागल्या.

इ. स.१८८० च्या सुमारास, रेल्वेबांधकामास जोर आला, त्यामुळे शेती उत्पादन व निर्यातीत भर पडली. महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात, अनेक कारागीरांनी शेती व्यवसायाकडे पाठ फिरवून धंद्यामध्येच भवितव्य करावयाचे ठरविले. परंतु अगदीच गरीब व लहान स्वरुपाचे कारागिर स्वदेशी व परकीय उत्पादकांना आव्हान न देऊ शकल्याने, परत शेती व्यवसायात गेले. नगदी पिकाच्या उत्पादनात निर्यातीच्या दृष्टीने वाढ झाली. तसेच जिथे जिथे जल सिंचनाची सोय आहे, तिथेही नगदी पिके घेण्यात येऊ लागली. उदाहरणार्थ, दख्खनमध्ये ऊसाचे उत्पादन, साताऱ्यामध्ये भूईमूग, खानदेश मध्ये कापूस आणि इतरत्र इतर नगदी पिकांची मागणी शेतकऱ्यांकडून होऊ लागली. काही शेतकऱ्यांनी यापासून मोठ्या प्रमाणावर फायदा मिळवून, त्यांची पुनर्पेरणी केली. तसेच, ज्या बाजारात त्यांना चांगली किंमत मिळेल, तिथे त्यांनी बैलगाड्या न्यावयास सुरुवात केली. त्यामुळे स्थानिक सावकारांना उत्पादन देण्याची पद्धती बंद झाली. उदाहरणार्थ, दक्षिण महाराष्ट्र रेल्वे सुरु झाल्यानंतर (इ. स.१८८० च्या दरम्यान साताऱ्यामध्ये) आणि इ. स.१८९० च्या नवीन सुधारणानंतर, शेतकऱ्यांच्या, रयतेच्या, बैलगाड्यांच्या प्रमाणात अनेक पटीने वाढ झाल्याचे आढळून आले. याचा अर्थ, सावकार व वाणी यांची इतक्या वर्षांची मक्तेदारी संपुष्टात आली होती.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात, जमिनीच्या किंमती वाढल्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन दशकात, त्या वाढतच राहील्या. नव्याने श्रीमंत झालेल्या शेतकऱ्यांकडून ज्यांनी बाजारात नव्याने निर्माण झालेल्या संधीचा फायदा घेतला, त्यांच्याकडून जमिनी विकत घेतल्या जाऊ लागल्या. खरेतर हे नवीन शेतीचे मालक, सावकारांची जागा घेऊ लागले आणि ग्रामीण भागात वित्त व कर्ज देण्याचे काम करु लागले.

इ. स.१८९२ च्या दख्खनमधील ओल्या दुष्काळाने त्रस्त झालेल्या ३७ गावांची अधिकृत चौकशी करता असे आढळले की, तेथील सावकार हे नव्याने श्रीमंत झालेले शेतकरीच आहेत. इ. स.१८९९ च्या अधिकृत अहवालानुसार केवळ एक चतुर्थांश जमिन, शेतकरी नसलेल्या लोकांकडे होती. परंतु, अशा प्रकारच्या भूधारकांपैकी अनेक इनामदार होते. इ. स.१८९० च्या सुमारास सावकारांच्या ताब्यात १५इ जमीन होती. इ. स.१९११ मध्ये सरकारने जाहीर केले की, शेतकरी नसलेले, भूधारक केवळ १/६ प्रमाणात आहेत. जरी हा भूभाग जास्त सुपिक होता आणि एकूण महसूलापैकी १/५ टक्के महसूल भरीत.

तथापि महाराष्ट्र सदैव प्लेग आणि दुष्काळाच्या छायेखाली राहीला. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात, अनेक जिल्हे ओल्या दुष्काळाने व प्लेगमुळे हैराण झाले. ओल्या दुष्काळाच्या काळात (इ. स.१८९९- इ. स.१९०२) सरकारने १/३ पर्यंत महसूलाच्या मागणीत घट केली आणि इ. स.१९०४ च्या सुमारास आपसूक करमाफीची योजनाही पास केली.

विसाव्या शतकातील पहिली दोन दशके ही शेतीसाठी संमिश्र ठरली. अनेक वर्षे साथीच्या प्रादुर्भावामुळे जनता व गुरे मृत्युमुखी पडली. तसेच दुसऱ्या घटनेत, शेतमालासाठी वाढीव मागणी, उत्तम हंगाम व कापसाला मागणी, यामुळे शेतकऱ्यांस थोडासा दिलासा मिळाला. पहिल्या महायुद्धाच्या सुमारास धान्यांच्या किंमतीत वाढ होऊन, जमिनीच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या. परंतु युद्धानंतरच्या पुन्हा नव्याने आकारण्यात आलेल्या दरांच्या तडजोडीमुळे नवीन प्रश्न निर्माण झाले. कारण युद्धाच्या काळात, जमिनीच्या किंमती अवास्तव वाढल्या होत्या. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, महाराष्ट्रात फारच कमी प्रमाणावर शेतीविरहीत जमिन होती. परंतु इ. स.१९२१ पर्यंत रोग व दुष्काळाने लोकसंख्येवर नियंत्रण ठेवले.

काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते, नमूद केलेल्या काळाचे अवलोकन करता श्रीमंत शेतकऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली त्यामुळे शेतकऱ्यांचे विसाव्या शतकात वर्गिकरण करावे लागले. त्यांच्या मते, बाजाराचे विस्तारीकरण आणि शेती व्यवसायाचे बाजारीकरण यांमुळे, ज्यांच्याकडे आधीच साधनसामुग्री होती, त्यांनी लहान शेतकऱ्यांच्या जमिनी घ्यावयास सुरुवात केली. परंतु, काहींच्या मते, ही पद्धत, महाराष्ट्रात सर्वत्र सारखीच नव्हती. उदा. इ. स.१८८० मध्ये अहमदनगर मध्ये, काही माणसांनी ४०० एकर जागा एकट्याच्या ताब्यात घेतली होती आणि १२ ते २० बैल दिमतीला होते परंतु बहुतेकांकडे २० एकरपेक्षा कमी जमिन व जास्तीत जास्त एक बैल जोडी असे चित्र होते. इ. स.१९१७ च्या सर्व्हेनुसार, पाहणीनुसार, दख्खनमध्ये, २० एकरच्या वरील जमिनीत, मोठ्या प्रमाणावर घट झाली आणि लहान व मध्यम स्वरुपांच्या शेतकऱ्यांमध्ये वाढ झाली. याचा अर्थ, शेतकऱ्यांचे वर्गीकरण प्रदेशानुसार वेगवेगळे होते.

१३.२.१ जलसिंचन व शेती

साठच्या दशकापासून, दख्खनच्या जलसिंचनाच्या गरजेकडे, सरकारने लक्ष पुरवावयास सुरुवात केली. इ. स.१८६८ ते १८८५ च्या दरम्यान, कालवा बांधण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले. पहीली आणि सगळ्यात मोठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित जलसिंचन योजना पुण्यात मुठा नदीवर घेण्यात आली. त्यात खडकवासला धरण, तसेच मुठानदीच्या उजवी व डावी कडील कालव्यांचा समावेश होता. हा प्रकल्प इ. स.१८७९ मध्ये पार पडला. प्रवरा जलसिंचन प्रकल्प ज्यामध्ये ओझर कालवा योजना व ओझर बंधारा यांचा समावेश होतो, इ. स.१८९३ मध्ये पार पाडली. भाटगर धरण (पुण्यानजिक) व निरा नदीच्या डावीकडील किनाऱ्यावरील कालवा इ. स.१८९६ मध्ये पूर्ण झाला. त्यानंतर इतर जलसिंचनाच्या योजना हाती घेण्यात आल्या उदा. गोदावरी प्रकल्प जो इ. स.१९१६ मध्ये पूर्ण झाला. इतर लहान स्वरुपाचे प्रकल्प उदा. काडवर नदीचे काम जे एकोणिसाव्या शतकाच्या पहील्या दशकात पार पडले.

त्या सगळ्या सुधारणां होत असल्यातरी, विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा ग्रामीण महाराष्ट्र हा आर्थिक दृष्ट्या खालावलेला होता. निसर्गाचे अनियमित चक्र त्यामुळे शेतीवर होणारा अनिष्ठ

परीणाम, किंमतीमधील चढ उतार, इ. स.१८९९ ते १९०९ च्या दरम्यान निर्माण झालेली टंचाई, यामुळे गरीब शेतकऱ्यांचे हाल टोकास जाऊन पोहचले. आर. डी. चोकसी लिहितात, ''इ. स.१९१० मध्ये संपलेले दशक हे अनियमित पावसाचेच होते. परंतु अन्नधान्याचा अति तुटवडा व किंमतीमध्ये अमर्याद वाढ मात्र झाली नाही. कामगार जास्त प्रमाणावर स्थानांतर करु लागले व अधिक प्रमाणावर स्वतंत्र झाले. उद्योग करायचे, स्वत:चा व्यवसाय करायचा, ही सूप्त इच्छा, हळूहळू लहान शेतकऱ्यांच्या मनातही जागृत होऊ लागली. जर निकृष्ठ हंगामामुळे स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध नसेल, तर कामगार गावाच्या बाहेर पडू लागले. अशा वृत्तीमुळे, शेतकरी व कामगार, टंचाईच्या काळातही, सरकारवर कमी प्रमाणावर निर्भर राहू लागले. ही त्या दशकातील सर्वात मोठी बदलाची घटना होती.''

विसाव्या शतकात, सरकारी अधिकारी, ग्रामीण गरीबांसाठी सहानभूती व्यक्त करु लागले. जमिनीशी संबंधित प्रश्नांचे निवारण करण्यासाठी, खास लक्ष देण्यात येऊ लागले. त्यासाठी विशेष विभागांची, खात्यांची स्थापना होऊ लागली. परंतु या सगळ्या सुधारणा, काळाच्या गरजेपेक्षा खूप अपुऱ्या पडत होत्या. गरीबी आणि आर्थिक तुटवडा ही महत्त्वाची अडचण, प्रगती व विकासाच्या मार्गात येत होती. त्यामुळे सगळे प्रयत्न हे केवळ प्रयोगच होते. दख्खनची शेती ही अविकसित व मागासलेली राहीली. शेतकरी हा कर्जबाजारी, अज्ञानी, गरीब व त्यामुळे सुस्त व आळशी झाला.

आपली प्रगती तपासा :-

१) इ. स.१८५०-६० च्या दशकांत शेतीच्या स्थितीचे वर्णन करा.

_____

_____

_____

_____

_____

१३.३ वाहतुक व दळणवळणाच्या सोयी

पश्चिम भारतात, ब्रिटीश राजवटीनंतर पन्नास वर्षानंतर सुद्धा वाहतुकीच्या सोयी या अत्यंत कमी प्रमाणात व महागड्या होत्या. देशांच्या इतर भागांचा विचार करता याचा परीणाम फक्त कापूस उत्पादनावरच नव्हे तर संपूर्ण अर्थकारणावर झाला. हे खरे आहे की पेशवा सरकारने, महाराष्ट्राच्या दळवळण व वाहतुकींवर अधिक लक्ष दिले नाही. त्यामुळे, महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान झाले. त्यामुळे रस्त्याशिवाय, दुसरे कोणतेही वाहतुकीचे साधन नव्हते. ब्रिटीशांनी राजकीय व लष्करी हालचाली सोप्या होण्याकरता महाराष्ट्रात वाहतुक व दळणवळणाच्या कामात रस घेतला. लोकांचे आर्थिक प्रश्न सोडवावेत हा त्यामागचा उद्देश नव्हता.

१३.३.१ बैलगाडी :

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत, वस्तुंचे दळणवळण प्रामुख्याने व्यावसायिक वाहतुकदारांकडून जनावरांच्या मदतीने होई. १८१६ पर्यंत बैलगाडी ही अतिशय वजनदार असे.

त्यांची चाके चांगल्या प्रतीचे लाकूड व दगड यापासून ती बनविण्यात येत. त्याच वर्षी एका ब्रिटीश महसूल अधिकाऱ्यांने लाकडी चाकांची आरी असलेली बैलगाडी तयार केली, ती अजूनपर्यंत वापरात आहे. एका पारशी व्यापाऱ्याने, सोलापूर टेंभूर्णी येथे बैलगाडी बनविण्याचा कारखानाच सुरु केला. त्या दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात जड बैलगाडीची जागा हलक्या बैलगाडीने घेतली. जेव्हा रस्त्याचे काम सुरु झाले तेव्हा इ. स.१८५०च्या दशकात रेल्वेमार्गसुद्धा सुरु करण्यात आला आणि हळूहळू बैलगाडी वा तत्सम स्वरुपाच्या वाहतुकीच्या साधनांचा वापर कमी कमी होऊ लागला. कारण नवीन बैलगाडी ही कमी खर्चाची, वेगवान आणि जास्त सामान वाहून नेणारी असल्याने, बैलगाडी ओढण्यासाठी जे जादा बैल लागायचे ते शेतीच्या कामासाठी वापरण्यात येऊ लागले.

१३.३.२ रस्तेबांधणी :

ही एक गोष्ट लक्षात घेतली पाहीजे की इ. स.१८५० च्या दशकात आधुनिक पद्धतीचे रस्ते अस्तित्त्वात नव्हते तर फक्त पायवाटाच होत्या. तसेच वाहतुकीसाठी नदीचा पर्यायही उपलब्ध नव्हता. इ. स.१८३० पर्यंत, केवळ एकच रस्ता सह्याद्रीमध्ये होता, जो बैलगाडीस उपयुक्त होता. रामखिंडीमध्ये बेळगांव व वेंगुर्ल्याच्या मध्ये इ. स. १८४० मध्ये रस्त्याचे काम सुरु झाले जेव्हा मुंबई आग्रा रस्त्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला. व्ही. डी. दिवेकर यांच्या मते इ. स.१८५० पर्यंत, १६ कोटी जनतेसाठी आणि ३,५०,००० कि.मी. जागेसाठी फक्त २००० कि.मी. रस्ता पश्चिम भारतात, बैलगाडीसाठी उपयुक्त होता.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून, युरोपियन व लँकेशायर येथील व्यापारी धोरणांमुळे, सरकारवर वाहतुक व दळणवळणाची साधने सुधारण्यासाठी दबाव आणण्यात येऊ लागला. त्यांचा खरा रस हा कापूस उत्पादन करणारे जिल्हे व समुद्रकिनारा यांत होता. या सगळ्याचा परिपाक म्हणून व सरकारच्याही बदलत्या सामाजिक धोरणाचा परिणाम म्हणून अंतर्गत वाहतूक व दळणवळणाची साधने सुधारू लागली. त्यामुळे इ. स.१८६० च्या दशकापर्यंत नमूद करण्यासारखे फक्त काहीच मार्ग होते. मुंबई - आग्रा रोड जो नाशिक मधून सोलापूर पर्यंत जाई, दुसरा खंडाळ्यामधून, पूणे जिल्ह्यातून सोलापूर पर्यंत आणि इतर दोन, अहमदनगर व साताऱ्याच्या दिशेने जाणारे होते. परंतु त्यांचे किनाऱ्यांना कठडे किंवा पुल बांधले नव्हते. तसेच रस्त्याच्या डागडुजीसाठी नियमित वित्तपुरवठाही केला जात नसे.

इ. स.१८८० च्या दशकांत रस्ता बांधणीचे कार्य वाढीस लागले. त्यानंतर १९१२ मध्ये, एकूण चांगल्या प्रतीचा रस्ता बॉम्बे डेक्कन मध्ये १०,६६४ कि.मी. पैकी ४०४९ अतिशय चांगल्या पद्धतीचा होता. परंतु शहर व ग्रामीण भागातील दळणवळणाच्या गरजेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले. याचा अर्थ स्पष्ट होता. ब्रिटीशांचा ग्रामीण भागातील गरीब जनतेच्या प्रश्नांशी काडीमात्र संबंध नव्हता.

१३.३.३ रेल्वेमार्गांचा विकास :

इ. स. १८५३ मध्ये वाहतुक व दळणवळणाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. ३२ कि.मी. लांबीचा मुंबई ते ठाणे हा पहिला रेल्वे मार्ग तयार झाला. त्यानंतर, रेल्वे मार्गांचा झपाट्याने विकास झाला. उर्वरित महाराष्ट्रात रेल्वे मार्गाची सुरुवात इ. स.१८५८ पासून झाली. इ. स.१८९९ पर्यंत दक्षिण महाराष्ट्र व मद्रास रेल्वेने ९०० कि.मी. चे अंतर व्यापले. दुसरी रेल्वेलाईन मार्ग ज्यास G.I.P. म्हणत तो तयार झाला. त्यामुळे दख्खन ते संयुक्त प्रांत, बिहार

आणि ओरीसा हे भाग जोडले गेले. कालांतराने, त्याचा विस्तार बंगाल, हैदराबाद आणि मद्रासपर्यंत झाला. त्यानंतर इतर रेल्वेमार्ग अस्तित्त्वात आले. त्यात बंगाल, बिहार आणि मध्य भारत यांचाही समावेश होता. पहिल्या महायुद्धाच्या अंतापर्यंत, चार इतर रेल्वेमार्ग सुरू करण्यात आले. त्याद्वारे २४,००० कि.मी. अंतर व्यापण्यात आले. रेल्वेमार्गांनी दख्खनचे अहमदनगर सोडून सर्व जिल्हे जोडले गेले.

अशा प्रकारे, महाराष्ट्रातील महत्त्वाची शहरे व ठिकाणे रेल्वेमार्गाने जोडली गेली. तसेच महाराष्ट्राबाहेरचीही शहरे जोडण्यात आली. त्यामुळे वाहतुक अधिक सोपी, जलद, स्वस्त झाली. जरी दळणवळण व वाहतुकीच्या साधनाची उपलब्धता झाली तरी सुरुवातीला लष्करी कामासाठी सरकारी अधिकारी व उप-दर्जाचे अधिकारी व त्यांचे कुटुंबिय, युरोपियन व्यापारी व त्यांचे सहकारी व चीजवस्तू यांसाठी वापरण्यात येई. त्याचा उपयोग देशी व्यापार, मुख्यत्वे कापूस व धान्याचा व्यापार यांसाठी झाला. परंतु काही वर्षानंतर, रेल्वे ही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी अतिशय खर्चिक ठरू लागली. मागासलेली अर्थव्यवस्था व गरीब औद्योगिक सुधारणा यामुळे ग्रामीण भारताचा विकास होऊ शकला नाही व दळणवळणाच्या साधनांचाही काही उपयोग करता आला नाही.

भारतातील रेल्वेचा अजून एक गौण मुद्दा असा की, रेल्वेचे प्रशासन काही भागात सरकार, तर काही भागात संस्थानिक, तर काही भागात जिल्हा बोर्ड चालवित असे. या सगळ्यांचा परिपाक म्हणजे गुंतागुंतीचे गोंधळाचे व्यवस्थापन त्यामुळे काही रेल्वेमार्गाने फायदा मिळविला तर काहींना नुकसान सोसावे लागले. मुख्यत्वेकरुन ज्यामध्ये दक्षिण भारत, पुणे व नागपूर आणि दख्खनचा काही भाग यांचा समावेश होता. इ. स. १९०२ मध्ये, भारतीय रेल्वे ही तेहतीस वेगवेगळी व्यवस्थापकीय मंडळी व चौविस खाजगी कंपन्या सहित चार सरकारी मंडळे व पाच संस्थाने चालवित होते.

१३.३.४ टपाल आणि तारायंत्र :

अनेक शतकांसाठी, काही ठराविक प्रकारची पोष्टाची यंत्रणा भारतात कार्यरत होती. परंतु, खऱ्या अर्थाने इ. स.१८३४ चा इंडीयन पोस्टल ॲक्ट नंतरच, आधुनिक तत्त्वावर भारतीय पोस्टल यंत्रणा कार्यरत झाली. इ. स.१८५८ पर्यंत मुंबई प्रेसिडेंसीचे सर्व महत्त्वाची ठिकाणे टेलिग्राफीक पद्धतीने जोडण्यात आली. सुएज कालवा व्यापारासाठी उघडल्यानंतर, वेळेची व पैश्यांची बचत झाली. त्यामुळे अनेक सागरसफरी व आयात-निर्यातीच्या कामास वेग आला. तसेच, त्यामुळे पाश्चिमात्य जगताशीही त्याचा संबंध वाढला. उद्योग, व्यापार व धंदा यांसर्वांना, या विकास कामांचा खूप फायदा झाला आणि मुंबई शहर हे उद्योगधंद्याचे, कापड उद्योगाव्यतिरिक्त नावारूपास आले.

आपली प्रगती तपासा :-

१) महाराष्ट्रातील वाहतुकीच्या व्यवस्थेमध्ये रस्तेबांधणीचे महत्त्व थोडक्यात सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१३.४ उद्योगधंद्याचा विकास

१३.४.१ पारंपारिक उद्योगधंद्याचा ऱ्हास

पश्चिम भारतातील ब्रिटीश राजवटीपूर्वी शहरी भागात लहान-मोठे उद्योगधंदे स्वतंत्ररित्या चालवले जात होते. तेव्हा, साहजिकच कोणी मोठा भांडवलदार व उद्योगपती नव्हता. पण अत्यंत हुशार कारागीर होते. त्यांच्या हाताखाली अनेक कामगार शिकत होते. पुणे, सोलापूर, पंढरपूर आणि इतर ठिकाणे कपड्यासाठी प्रसिद्ध होत्या. तथापि परकीय स्पर्धेमुळे जुने, सुसंघटीत आणि मोठ्या प्रमाणावर पसरलेले भारतीय उद्योगधंदे एकोणिसाव्या शतकात कोलमडू लागले . अगदी ग्रामीण भागातील शेती संबंधित उद्योग हस्तोद्योग हळूहळू कमी होऊ लागले . इंग्लिश व्यापाऱ्यांच्या यंत्रांवर बनविलेल्या धोतर व इतर कपड्यांमुळे भारतीय कापडउद्योग संकटात आला. भारतात मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्ग हे परदेशी कपडे वापरू लागल्याने, भारतातील विणकर व कपडाउद्योगातील लोकांवर बेरोजगारीचे संकट कोसळले. पारध्यांसारख्या काही जमातींनी तर विणकामाचा धंदा पूर्णवेळ सुरू केला.

एकोणिसाव्या शतकात पूर्वार्धात पुण्यातील व इतर भागात रेशीम उद्योगावर सारखेच संकट, कोसळले. रेशमाची मागणी घसरण्याचे एक कारण म्हणजे मंदी आणि दुसरे म्हणजे अनेक संस्थाने खालसा झाली जेथे रेशमाला मोठ्या प्रमाणावर मागणी होती. तसेच कच्च्या रेशमाची किंमत वाढली आणि परकीय स्पर्धेमुळे मुख्यतः स्त्रियांनी चीनी साड्यांना विशेष पसंती दाखविल्यामुळे, भारतीय रेशीम उद्योगावर उपासमारीचे संकट ओढवले. तसेच इंग्रजी व्यापाऱ्यांनी काही चुकीच्या पद्धतीचा वापर केला व भारतीय वस्तू अत्यंत स्वस्त भावात विकल्या, त्यामुळे भारतीय उद्योगव्यवसाय पूर्णपणे कोलमडला व भारतीय उद्योगजकांवर बेरोजगारीचे संकट कोसळले.

१३.४.२ कापडद्योग :

कापड उद्योग हा एक अपवाद होता. आधुनिक कापड उद्योगाची स्थापना मुंबईत झाली. त्यांचे धागेदोरे प्रामुख्याने भारतीय भांडवलदारांकडे होते आणि स्थानिक व्यवस्थापक व तंत्रज्ञांकडूनच त्यांचे व्यवस्थापन होई. भारतीय कापड उद्योग मोठ्या प्रमाणावर विकसित झाला, त्यास आंतरराष्ट्रीय पातळीवरुन राजकीय व आर्थिक दृष्ट्या शक्तीशाली अशा ब्रिटनच्या उद्योगाशी स्पर्धा करावी लागत होती. महाराष्ट्रातील इतर शहरांपेक्षा मुंबईची बाजू खूप वेगळी होती. मुंबई हे अठराव्या शतकापासून, ब्रिटीशांचे व्यापारी केंद्र होते आणि पूर्व व पश्चिमेचा समुद्री व्यापार हा स्थानिक व्यापारी शेठ व युरोपियन व्यापारी यांच्यामध्ये विभागला गेला होता. व्यापाराबरोबरच अनेक सुविधा आल्या, विकसित झाल्या. अनेक प्रकारच्या संस्था निर्माण झाल्या. त्यामुळे विकासाचा वेग टिकवून ठेवता आला. तसेच एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, एक नवा सुशिक्षित वर्ग निर्माण झाला होता.

या सगळ्या अनुकुल गोष्टींमुळ दहा भारतीय व पंधरा युरोपियन व्यापाऱ्यांनी १८३६ मध्ये 'बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स' ही संस्था सुरू केली होती. उदा. मॉडर्न बँकिंग, स्टिमिंग शिपिंग, स्टिम जिनिंग व हायड्रॉलिक प्रेसिंग इ. तसेच मोठ्या प्रमाणावर कच्चा कापूस व अफूची निर्यात होत असे. प्रामुख्याने चीन बरोबर ब्रिटीश वस्तूंची फेर निर्यात ही भारतीयांकडून, प्रामुख्याने पॅरीस वरून होत असे.या सगळ्या गोष्टींचा फायदा त्यांना व्यापाराची, धंद्याची तत्त्वे

समजण्यासाठी झाला. ज्यामध्ये त्यांना देशातील कापूस, आंतरराष्ट्रीय बाजारात कसा विकला जातो, तसेच लँकेशायर येथील कापडगिरण्या व कापडाच्या प्रकाराबद्दलही माहीती मिळाली.

आवश्यक ज्ञानाची व साधनांची माहीती व तसेच मुंबईत वातावरणाची अनुकुलता मिळाल्यानंतर यशस्वी व उत्साही व्यापाऱ्यांना मुंबईत कापडाच्या गिरण्या उघडायला वेळ लागला नाही. त्यापैकी एक होते सी.एन. दावर जे मुंबईच्या अनेक व्यवसायांमध्ये कार्यरत होते इ. स.१८५१ मध्ये त्यांना कापडाची गिरणी स्थापन करावयाची होती. परंतु त्यासाठी आवश्यक पैसा ते जमा करु शकले नाहीत. शेवटी जुलै इ. स.१८५४ मध्ये त्यांनी स्पिनींग कंपनी सुरु केली. ती फेब्रुवारी १८५४ मध्ये खऱ्या अर्थाने सुरु झाली. शेवटी जुलै १८५४ मध्ये इतर दोन गिरण्यांसाठी पुढाकार घेण्यात आला. इ. स.१८६० पर्यंत, दहा गिरण्या शहरामध्ये स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यापैकी सर्वच बांधण्यात आल्या नव्हत्या. अमेरिकन यादवी युद्ध व इ. स.१८६१-६५ च्या दरम्यान अमेरिकन कापूस उपलब्ध नसल्याने, अनेक मुंबईतील व्यापाऱ्यांनी परिस्थितीचा फायदा घेऊन कापडगिरण्या सुरु केल्या. परंतु जेव्हा इ. स.१८६५ मध्ये अमेरिकेचे कापड उद्योगावरील संकट उठल्यावर, मुंबईत फक्त १० कापड गिरण्या राहील्या. परंतु इ. स.१८७० च्या सुमारास कापडउद्योगाला तेजी आली आणि मुंबईतील गिरण्यांनी इ. स.१९१४ पर्यंत चांगला जम बसविला. त्यावेळस ८५ कंपन्या अस्तित्वात होत्या. मॅचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्स ने इ. स.१८६५ मध्ये रिपोर्ट केल्या प्रमाणे ७५ टक्के मुंबई बाजारातील गिरणीचे कापड हे स्थानिक गिरणी मालकांकडून बनविले गेले होते. अतीपूर्वेकडील बाजार विकसित झाल्याने मुंबईच्या कापड उद्योगास तेजी आली होती.

इ. स.१८८० मध्ये, सोलापूर, मालेगाव, अहमदनगर, भिनेर व इतर शहरांमधील हातमाग उद्योग सुधारू लागला. सोलापूर हे रंगीबेरंगी साड्यांचे सर्वात मोठे केंद्र होते. खरं तर हातमागावर कापड विणण्याचा, दख्खनकडील शेतकऱ्यांचा परंपरागत व्यवसाय होता. इ. स.१८८० ते इ. स.१८९० हा काळ स्वावलंबनाचा काळ होता. हातमागावरील कापडास अत्यंत मागणी होती. तसेच रेशमासही मागणी वाढली. त्यामुळे इ. स.१८८३-८४ मध्ये ९०० पेक्षा जास्त हातमाग येवला व ८०० पर्यंत हातमाग पुण्यात होते.

१३.४.३ रेशीम उद्योग :

दख्खनचे रेशीम विणकर, रेशमाचे कापड बाजारात उपलब्ध करीत राहीले कारण परकीय उद्योजकांना ते जमले नाही. परंतु त्यांना कोईमतूर, बनारस, लुधीयाना व इतर भागातून स्पर्धेचा सामना करावा लागला. तसेच एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस मागणीमध्ये घट झाल्याने दख्खनकडील रेशीम उत्पादकांचे खूप नूकसान झाले. त्यामुळे गरीब रेशीम उद्योग, धंद्यामधील नुकसानीमुळे, सावकार व भांडवलदारांच्या तडाख्यात सापडले. भांडवलशाही च्या प्रभावामुळे कारखाना पद्धत अस्तित्वात आली. त्यामुळे कंत्राटी म्हणजे कामानुसार वेतन मिळण्याची पद्धत बळावली. तसेच या पद्धतीमुळे साठेबाजार गुंतवणुकदार हा नवा वर्ग निर्माण झाला. त्यास ते 'पदमशाली' म्हणत. जे कारखान्यासाठी स्वतंत्रपणे काम करीत त्यांना निश्चित वेतन मिळे किंवा उत्पादीत वस्तूंची ठराविक रक्कम मिळे. त्यामुळे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला, स्वतंत्रपणे काम करणारे रेशीम उद्योजक गायब झाले. पुण्यातील लहानमोठी दुकाने, कारखाने, बनिया लोक तर नाशिक मध्ये कासार सांभाळू लागले.

विसाव्या शतकातील दुसऱ्या दशकाच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये, महाराष्ट्रात लहान स्वरूपाच्या यंत्रमागांच्या कंपन्या सुरु झाल्या. त्यामुळे हातमागावर काम करणारे कारागीर व कारखानदार यांना नवीन स्पर्धेला तोंड द्यावे लागले. जपानी कापड उद्योगही बाजारात दाखल झाला होता. काही काळासाठा खानदेशातील व सोलापुरातील कापड उद्योग व पुण्यातील रेशमी उद्योगाने, खळबळ माजवली होती. तसेच सोलापूर व बार्शी येथे नवीन कारखानेही सुरु केले होते. परंतु पहिल्या जागतिक महायुद्धानंतर कंपन्यांना उत्पादन परवडेनासे झाले. संपूर्ण बाजार, कापूस व सूताच्या गाठ्यांनी ओथंबून वाहत होता व त्यासाठी अजिबात मागणी नव्हती. युद्धाच्या काळात भारतीय कापडासाठी मागणी वाढली होती कारण आयात बंद होती. परंतु काही कापडाच्या व रेशमाच्या गिरण्या बंद करण्यात आल्या. परंतु थोडक्यात पुणे, सोलापूर , मुंबई व खानदेशातील कापडगिरण्यांनी युद्ध काळात बऱ्यापैकी फायदा मिळविला. परंतु कामगारांना मात्र या फायद्याचा लाभांश देखिल मिळू शकला नाही.

१३.४.४ इतर उद्योग :

नाशिक व पुण्यात, तांबे व पितळेचे उद्योग वाढीस लागले होते. मुख्यत्वे करुन रेल्वे झाल्यानंतर, उद्योजकांना कच्चा माल व तयार वस्तू, कमी किमतीत व योग्य भावात विकता येऊ लागल्या. धातू उद्योग सोडले तर इतर उद्योगांमध्ये चामड्याच्या हाताने बनविलेल्या वस्तू, लोकरीच्या वस्तू, पेपर,डाईंग व कापड छपाई ह्यांचे उद्योग होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस यांत्रिकीकरणामुळे या उद्योगांवर संकट ओढवले. २० व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात दख्खनच्या चामड्याच्या उद्योगाने, मुंबई, कानपूर व कलकत्ताच्या वस्तूंना स्पर्धा करावयास भाग पाडले. कागद, कापड, रंगकाम उद्योगही डबघाईला आले.

'जहाज बांधणी' उद्योग मात्र संपूर्ण एकोणिसाव्या शतकात वाढीस लागला. खोल समुद्रातील व्यापारी जहाजे व युद्धबोटी फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर मुंबई व संपूर्ण पश्चिम भारतात, बांधण्याचे काम सुरू झाले. मुंबईने मात्र भारतातील मुख्य जहाजबांधणी केंद्राचे स्थान कायम ठेवले. कारण चांगल्या प्रकारचे सागाचे लाकूड, जहाज बांधणारे पारशी कुशल कामगार व उत्कृष्ट बंदरे यामुळे ते शक्य होते.

इ.स. १९१४ मध्ये, टाटा जलविद्युत वितरण कंपनी मुंबईमध्ये विद्युत निर्मिती व पुरवठा करण्यासाठी निर्माण झाली. सुरुवातीला, भारतीय गुंतवणुकदार तसेच स्थानिक राज्ये, या प्रकल्पासाठी उत्साही नव्हते. जेव्हा मुंबईचे गव्हर्नर स्वतः या प्रकल्पासाठी लोकांसमोर आले तेव्हाच स्थानिक गुंतवणुकदार व स्थानिक राज्यांनी पाठींबा दिला. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत व किंमतीत कमी टाटा विद्युत पुरवठा कंपनीने लवकरच मोठ्या प्रमाणावर विद्युत निर्मिती सुरु केली व विद्युतपुरवठ्याचे ते महत्त्वाचे केंद्र बनले.

आपली प्रगती तपासा :-

१) पारंपारीक कापड उद्योग डळमळीत होण्याची कारणे सांगा.

२) जहाजबांधणी उद्योगविषयी थोडक्यात लिहा .

१३.५ वाणिज्य व व्यापार

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर इ.स. १८१८ पर्यंत पुणे महाराष्ट्रातील एक समृद्ध शहर होते. परंतु ब्रिटीशांनी ते काबीज केल्यानंतर त्याचे महत्त्व कमी झाले. इ.स. १८५० नंतर इतर शहरांबरोबर नाशिक व सोलापूर च्या बरोबरीने त्यांनी स्वतःचे महत्त्व परत मिळविले आणि लवकरच महाराष्ट्राचे उद्योगधंद्याचे केंद्र बनले. मुंबईचे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र व ईस्ट इंडिया कंपनीचे राजकीय मुख्य ठाणे म्हणून महत्त्व पश्चिम भारतात टिकून राहीले. भारतीय व्यापाऱ्यांनी चीनाला होणारा कापूस व अफूचा ब्रिटीश निर्यात व्यापार चांगल्या प्रकारे हाताळला. ब्रिटीशांचा फेरनिर्यातीचा व्यापार संपूर्ण आशियामध्ये हाताळला. तसेच, रेल्वे मार्गाची सुरुवात, सुएझ कालवा त्यांच्यासाठी खुला केला. कापडगिरण्याची उभारणी तसेच नवनवीन प्रकारची यंत्रसामग्री कंपन्यांमध्ये आल्यामुळे मुंबईसारख्या अनेक शहरांचा एकोणिस व विसाव्या शतकाच्या दरम्यान विकास झाला.

अंतर्गत व्यापारामध्ये, सगळ्यात महत्त्वाच्या वस्तू म्हणजे धान्य, डाळी, कच्चा कापूस, तेलबिया आणि तूप यांचा समावेश होता. तसेच महाराष्ट्राच्या अंतर्गत व्यापारात, कापसाच्या वस्तू, सूत, रेशम, हातमागावरच्या वस्तू, पितळ्याच्या वस्तू व इतर धातूंच्या वस्तू यांचा व्यापार चाले. साडी, लुगडे व धोतर यांना महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर मागणी होती. सोन्याच्या तारा बनविणारा उद्योग व रेशीम उद्योग, पुणे व नाशिक येथे कार्यरत होता. त्यांना संपूर्ण देशात तयार बाजारपेठ होती. परंतु ब्रिटनच्या यंत्रमागावर बनविण्यात येणाऱ्या कपड्यांमुळे भारतीयांचे कापड व्यवसाय बंद पडले. परंतु, रेल्वे मार्गामुळे अनेक नाशिवंत वस्तूंचा उदा. पान, भाज्या, ताजी फळे, बटाटे यांचा व्यापार सुधारला. मुंबईला, महाराष्ट्राच्या विविध राज्यातून जनावरांचे चामडे, शिंगे व हाडे मिळत. पहील्या महायुद्धाच्या वेळेला निर्यातीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. निर्यातीत भूईमुग हे महत्त्वाचे पिक होते जे दख्खन मधुन पुरवण्यात येत होते.

साप्ताहीक व वार्षिक जत्रा या महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या व्यवसायाचा एक महत्त्वाचा भाग होत्या. अशा प्रकारच्या जत्रांमध्ये, अनेक प्रकारची शेती व उद्योग संबंधी वस्तू या वस्तूंविनिमय स्वरुपात खरेदी विक्री व्हायची. वार्षिक जत्रेला देशाच्या विविध भागातून व्यापारी त्यांच्या वस्तू घेऊन यायचे. कपडे, तांबे व पितळेची भांडी, मिठाई, फळे इ. चा व्यापार मोठ्या प्रमाणावर चाले. सगळ्यात मोठी जत्रा ही पंढरपुरला भरे जे तिर्थक्षेत्रही आहे. तिथे लोक तिर्थयात्रा व व्यापार दोहोंसाठी येत असत.

रेल्वेच्या बांधणी नंतर महाराष्ट्राची विविध शहरे जोडली गेली आणि विविध भागांना व्यापारी महत्त्व प्राप्त झाले. उदा. नंदूरबार, चाळीसगाव, जळगाव, इगतपूरी, कोपरगाव व अहमदनगर या इतर रेल्वे स्थानकाशी संबंधित शहरांमधून व्यापार व धंदेविषयक घडमोडी वाढीस लागल्या. अशा प्रकारे, गेल्या एकोणिसाव्या शतकाच्या दळणवळण व वाहतूकीच्या साधनात सुधारणा झाल्याने, मोठ्या प्रमाणावर विकास व देशी व्यापार वाढला.

शेती, वाहातूक आणि दळणवळण, व्यापार व धंदा याबाबतील इ.स.१८६१ ते इ.स.१९२० च्या दरम्यानचा महाराष्ट्र अवलोकला तर असे आढळते की शेती व्यवसाय जास्त सुधारला नाही. स्थानिक व पारंपारीक ग्रामीण व शहरी उद्योगांना हलाखीचे दिवस आले आणि ग्रामीण भागातील लोकांचे अजून हाल झाले. तथापि वाहतूक व दळणवळणाची माध्यमे सुधारली,

आधुनिक उद्योग, मुख्यत्वे कापड उद्योग वाढीस लागला आणि मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाली होऊ लागल्या. परंतु ब्रिटीश जमिन महसूल कायदा, त्यांचे औद्योगिक धोरण व आयातीवरील कर या साऱ्या योजना, भारताच्या विकासाच्या विरुद्ध होत्या. त्यामुळे ग्रामीण भागातील गरीबी व परदेशी मालावर अधिक भर व मागणी अशी परिस्थिती निर्माण झाली. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक तुटवडा भासू लागला व आधुनिक उद्योगांची कमतरताही जाणवू लागली. कापड उद्योग सोडला तर परदेशी लोकांना भारतात व्यापार करण्यास परवानगी दिल्यामुळे फार मोठी किंमत भारतास मोजावी लागत होती.

एकोणिसाव्या शतकात इंग्लंड जगातील सगळ्यात श्रीमंत राष्ट्र बनले आणि भारत हा ब्रिटनच्या मुकुटातील मौल्यवान मणी होऊन बसला. परंतु ब्रिटीशांच्या महानतेसाठी, भारतीयांना फार मोठी किंमत भरावी लागत होती. ब्रिटीश सरकारने दुकानदारांचा देश या संकल्पनेतून देशाच्या पद्धतशीर शोषणाची योजनाच बनवली होती. भारताच्या शोषणासंदर्भात, पुण्यावरुन प्रसिद्ध होणारे 'डेक्कन स्टार' हे इंग्लिश नियतकालीक लिहते की :

''अगदी पूर्वीपासून इंग्लंड हे एक गरीब राष्ट्र होते. त्यामुळे शेजारील राष्ट्राकडील साधन संपदा लुबाडण्यावर त्यांचा जास्त भर होता आणि या कारणानेच त्यांचे फ्रान्स, स्कॉटलंड व इतर राष्ट्रांशी युद्ध झाले. जशी लोकसंख्या वाढली तशी इंग्लंडवर लोकसंख्येच्या अन्नधान्याची जबाबदारी अधिक वाढली. त्यामुळे इंग्लंडने पूर्वेकडील राष्ट्रांवर लक्ष केंद्रीत केले कारण आर्थिक भरभराटीला त्या देशांत वाव होता. हे ब्रिटीशांनी १७ व्या शतकात केले.

जेव्हा पासून इंग्लिश लोकांनी भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाय ठेवला तेव्हा पासून भारताच्या लुटालुटीला सुरुवात केली. भारत हा सर्वात श्रीमंत देश होता आणि इंग्लंडच्या सर्व मागण्या पूर्ण करणारी, सोन्याची अंडी देणारी कोंबडी होती. भारताचे जेवढे होऊ शकेल तेवढे शोषण झाल्यानंतर दुध देणारी दुभती गाय, आता दुधाचा शेवटचा थेंब दिल्यावर, ब्रिटीशांना भारताची अअडचण वाटू लागली. आता अशा भूकेकंगाल, भिकार देशाला सोसणार कोण? असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहीला. हळूहळू भारतावर राज्य करण्याचा स्वार्थी हेतू उजेडात येऊ लागला.''

दुसरे एक साप्ताहीक 'अरुणोदय' हे ठाण्यावरुन प्रसिद्ध होते, त्यात लिहिले होते की, ''.....भारतात, उद्योगाचे मार्ग खरे पाहता कमी झाले होते कारण लोकसंख्येच्या प्रमाणात अतिशय वाढ झाली होती. भारत सरकार अतिशय व्यवहारीपणाने वागत होते. भारताचा प्रत्येक बाबतीत फायदा उचलित होते. केवळ ब्रिटीश व्यापाऱ्यांचा संबंध असेल, तर हस्तक्षेप होत नव्हता. परकीय भांडवलदारांचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल यावर सगळ्या योजना आखल्या जात होत्या. सरकारची सारखी ओरड असे की महसूलाची वाढ, लोकसंख्येच्या प्रमाणात होत नाही. परंतु, लोकांसाठी व्यवसायाच्या नवीन योजना आखाव्यात अशी इच्छा काही राज्यकर्त्यांच्या मनात निर्माण झाली नाही. खरे पाहता, ही सरकारची जबाबदारी आहे की जनतेच्या व्यवसायनिर्मिती प्रक्रीयेत काही प्रश्न तर नाहीत ना ? याची पाहणी करणे.''

सरकारच्या करांच्या योजनांसंबंधी खरडपट्टी काढताना, 'अरुणोदय' पुढे लिहते की.... ''लोकांचे हाल रसातळाला पोहोचले होते. आयात निर्यातीचा, देशाच्या प्रगतीसाठी काहीही उपयोग होत नव्हता. या व्यापाराचा फायदा फक्त ब्रिटीशांना होत होता, ज्यांच्या हातात सर्व व्यापार-धंद्याचे धागेदोरे होते.''

साप्ताहीक शेवटी लिहीते की, '' हे सरळसरळ उघड होते की भारताची संपत्ती दिवसागणिक कमी होत होती आणि त्यामुळे कराचा बोजा वाढतच होता.''

दादाभाई नौरोजी लिहीतात :'' गरीबी आणि पिळवणूक या दोघांमध्ये, भारतीय जनता भरडली जात होती आणि त्याला जबाबदार भारतात आणि ब्रिटन मध्ये होत असलेला मोठ्या प्रमाणावरचा खर्च व हा खर्च भागविण्यासाठी स्थानिक लोकांना स्थलांतरीत करण्यात येत होते. त्यांच्या मूलभूत हक्कांचे शोषण होत होते आणि हे सगळे त्यांच्याच देशात होत होते.''

भारतीय राष्ट्रीय पुढारी नौरोजी, गोपाल कृष्ण गोखले, न्यायमूर्ति रानडे, फिरोजशहा मेहता, के.टी. तेलंग यांनी भारताच्या उद्योगाच्या ऱ्हासाला भारतीयांची गरीबी हेच मूळ कारण आहे असे सांगितले. त्या सर्वांनी एकमताने मान्य केले की, औद्योगिकरणाशिवाय देशाच्या विकासाला पर्याय नाही. त्यांनी सरकारला आवाहन केले की या बाबतीत लवकर पावले उचलून, भारतीय विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञानाचे शिक्षण देऊन कार्यप्रवण बनवावे.

आपली प्रगती तपासा :-

१) महाराष्ट्रातील वाणिज्य व व्यापारविषयक माहिती द्या.

१३.६ कामगार चळवळींचा उदय

रयतवारी जमिन महसूल पद्धत अतिशय निर्दयीपणाने ब्रिटीश व काही लालची भारतीयांकडून राबवली गेल्याने, अत्यंत स्वार्थी अशा सावकारांचा वर्गच निर्माण झाला. या प्रकाराने कोर्टामध्ये खटल्यांचेही प्रमाण वाढले. अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या जागा विकून, शहराकडे स्थलांतर करावे लागले. हे भूमीहीन कामगार मुंबई व तत्सम शहरांमध्ये, रस्त्यावर वणवण फिरु लागले. यंत्र मागामुळे अनेक हातमाग व्यवसाय बंद पडले. लोकांची चव बदलण्याने, आयातीला मागणी वाढली. त्यामुळे कामगारांवर कंपनी मध्ये काम करण्याची वेळ आली.

१३.६.१ कापड उद्योगातील कामगारांचे प्रश्न :

१) कामाची अनिच्छितता : कामगारांना सातत्याने काम मिळेलच याची काहीही खात्री नव्हती. काम फक्त कंत्राटी स्वरुपाचेच मिळे व तेही अल्पकाळासाठी.

२) कमी वेतन : अशिक्षित व अनुभवी कामगारांना गुलामासारखे वापरले जाई आणि अतिशय कमी वेतन दिले जाई. कामगारही काही तक्रार करु शकत नव्हते कारण बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर होती.

३) काम करण्याची अधिक वेळ : 'काम करण्याचे तास' यावर नियंत्रण ठेवणारा कोणताही कायदा नव्हता.

४) आरोग्यास अपायकारक अशी परिस्थिती : फॅक्टरी व कापड गिरण्या चांगल्या प्रकारे ठेवण्यात आले नव्हते. कंपनीमध्ये अतिशय कमी प्रकाश व हवा खेळती राहत नसे. कामाचे तास जास्त व अशा वातावरणात काम करुन, कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागला. अनेकांना श्वसनाचे विकार झाले. प्रामुख्याने क्षय रोगाची बाधा झाली.

५) अपघताविरुद्ध विमा नव्हता - कामगारांच्या सुरक्षितेविषयी कंपनीच्या व्यवस्थापनाची तर नकारात्मक भूमिका होती. जर गिरणी कामगारावर कोणते संकट ओढवले वा अपघात झाला तर कोणत्याही प्रकारची मदत करण्यात येत नव्हती.

कामाचे असे भयानक स्वरूप सोडले तर, राहण्याची परिस्थितीही समप्रमाणात भयावह होती. अनेक अशा प्रकारच्या भूमीहीन कामगारांचे कुपोषणामुळे व वाईट चालीरीतींमुळे हाल झाले. त्यामुळे त्यांना अनेक प्रकारच्या मानसिक त्रासांना सामोरे जावे लागले. त्यामुळे अनेक जण अत्यंत गलिच्छ अशा वस्त्या व चाळीतून राहू लागले व लवकरच वाईट सवयींची लागण झाली.

कंपनी सरकारने, कामगारांचे हाल कमी करण्याच्या दृष्टीकोनातून काही कायदे पास केले. परंतु प्रत्यक्षात मात्र भारतीय उद्योजकांची आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा कमी करण्याच्या दृष्टीने हे कायदे पास झाले होते. इ.स.१८८१ च्या फॅक्टरीॲक्ट नुसार, स्त्रियांचे काम करण्याचे तास अकरा, बाल कामगारांचे सात तर मोठ्या पुरुषांचे बारा पेक्षा जास्त होते. तसेच साप्ताहीक सुट्टी व कंपनी निरीक्षक ह्या नियमांचे पालन होत आहे की नाही, त्यावर लक्ष ठेवण्यात आले.

१३.६.२ कामगार संघटना :

कामगार संघटीत नव्हते आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत एकत्र येऊन अधिकारासाठी भांडण्याची त्यांना माहिती नव्हती. इ.स.१८७७ मध्ये नागपूरच्या कामगारांकडून चांगल्या वेतनासंबंधी मागणी करण्यात आली. परंतु इ.स.१८९५ मध्ये बंगाल येथे कलकत्ता ज्युट मिलच्या कामगारांनी दिड महीन्याचा बंद पुकारुन कामगारांच्या बंडाची सुरुवात केली. मुंबई गिरणी कामगारांनी इ.स.१८९० मध्ये संघटना स्थापना केली. नारायण मेघाजी लोखंडे यांनी ही संघटना स्थापन केली व कामगारांचे प्रश्न सोडविले. इ.स.१८९७ मध्ये रेल्वेकामगारांनी संघटना स्थापित केली आणि इ.स.१९०७ मध्ये पोष्टातील कामगार व वृत्तपत्र कामगारांनी त्यांच्या संघटना स्थापन केल्या. इ.स.१९०५ ते इ.स.१९११ च्या दरम्यान, बंगालच्या फाळणीच्या वेळेस, कामगार चळवळींना वेग आला. पहिल्या महायुद्धामुळे कामगार चळवळींना लगाम बसला परंतु बोल्शेविक क्रांतीनंतर, (इ.स.१९१७), परत एकदा कामगारांचे हक्क व कल्याणाच्या गोष्टींनी वेग पकडला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने व जी. के. गोखलेंच्या अध्यक्षतेखाली, साऊथ आफ्रिका, मलाया, बर्मा, श्रीलंका येथे कंत्राटीस्वरुपाचे काम करणाऱ्या कामगारांच्या प्रश्नांकडे लक्ष घातले. गांधीजींनी त्यांना दक्षिण आफ्रिकेमध्ये संघटीत केले. इ.स.१९१९ मध्ये, भारताला जागतिक कामगार संघटनेचे सदस्यत्व मिळाले आणि इ.स.१९२० मध्ये ऑल इंडीया ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना झाली. त्यानंतर मात्र राष्ट्रीय अध्यक्षतेखाली कामगार चळवळींना जोर आला.

आपली प्रगती तपासा :-

१) कापड उद्योगातील कामगारांचे प्रश्न थोडक्यात सांगा.

१३.७ समारोप

लोकांच्या हालाचे कारण सामाजिक किंवा राजकीय नसून आर्थिक होते. दूरच्या टप्प्यातील विचार करता मोठ्या प्रमाणावर शेती व जमिनीची मालकी असलेल्या व श्रीमंत व्यापाऱ्यांनी सरकारच्या कामात अधिकाराची मागणी केली व त्याकाळात सुशिक्षितांनीही त्यास पाठींबा दिला. नवीन उद्योग उदयास आल्यामुळे मोठे व अवजड उद्योग महाराष्ट्रात सुरु झाले. वाहतुकीची व दळणवळणाच्या साधनात वाढ झाली. वाणिज्य व व्यापारातील वाढीमुळे आर्थिक प्रगतीला हातभार लागला. परंतु कामगारांचे शोषणही विविध फॅक्टरी, कंपन्या व मिलमध्ये सुरु झाले. कामगारांचे प्रश्न सोडविण्याकरिता अनेक संघटना स्थापन करण्यात आल्या. त्यांनी कामगारांचे प्रश्न हाताळले.

१३.८ प्रश्न

१) महाराष्ट्राची १९व्या शतकातील आर्थिक परिस्थिती सांगा.
२) आधुनिक महाराष्ट्रातील शेती विषयक प्रगतीचे विश्लेषण करा.
३) आधुनिक महाराष्ट्रातील दळणवळण व वाहतुकीचा विकास कसा झाला ? चर्चा करा.
४) व्यापार उद्योगातील महाराष्ट्रातील महत्त्वाचे टप्पे सांगा.
५) गिरणी कामगारांचे काय प्रश्न होते व त्यांच्या संघटीत प्रयत्नांविषयी थोडक्यात लिहा.

❖❖❖❖

१४

स्वराज्याच्या दिशेने वाटचाल

घटक रचना:

१४.० उद्दिष्ट्ये
१४.१ प्रस्तावना
१४.२ गोपाळ कृष्ण गोखले
१४.३ बाळ गंगाधर टिळक आणि जहालमतवादी राजकारण
१४.४ विनायक दामोदर सावरकर आणि क्रांतीकारी राष्ट्रवाद
१४.५ समारोप
१४.६ प्रश्न

१४.० उद्दीष्ट्ये

१) गोपाल कृष्ण गोखले व इतर मवाळमतवाद्यांचे स्वराज्याच्या दिशेने योगदान अभ्यासणे.
२) बाळ गंगाधर टिळक व जहालमतवादी राजकारणाचा अभ्यास करणे.
३) सावरकरांचे क्रांतीकारी चळवळीतील योगदान समजावून घेणे.

१४.१ प्रस्तावना

आपल्या पूर्वजांनी, भारताच्या विविध भागात राज्य केले होते ही आठवण अजूनही महाराष्ट्रीयन लोकांच्या मनात ताजी होती. त्यांचे पूर्वज हिंदवी स्वराज्यासाठी झगडले होते. गोपाल कृष्ण गोखले व बाळ गंगाधर टिळकांनी, सर्वांना स्वराज्याच्या दिशेने नेले. त्यांचे ध्येय एक होते परंतु पद्धती मात्र वेगवेगळ्या होत्या. गोखलेंना घटनात्मक मार्गाने जावयाचे होते. टिळकांना घटनेच्या चौकटीत राहून सरकारच्या काम करण्याच्या पद्धतीतील चुका दाखवून द्यायच्या होत्या व दडपशाहीचे जे धोरण अवलंबले होते त्यांच्या विरुद्ध आवाज उठवायचा होता. त्यांच्या राष्ट्रवादाचे पर्यवसान अनेक क्रांतीकारी तरुण पुढाऱ्यांमध्ये झाले. आता आपण या पुढाऱ्यांनी स्वराज्य प्राप्तीसाठी, विविध मार्गाने केलेले प्रयत्न अभ्यासू या.

१४.२ गोपाळ कृष्ण गोखले (इ.स.१८६६- इ.स.१९१५)

गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात, चिपळूण तालुक्यात इ.स. १८६६ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण कोल्हापूर, पुणे व मुंबई येथे झाले. तसेच रानडे व दादाभाई

नौरोंजीप्रमाणे त्यांचेही एलफिन्स्टन कॉलेजमधून शिक्षण झाले. ते वयाच्या विसाव्या वर्षी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नियुक्त झाले. ७ जून १८८६ मध्ये ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे निवडून आलेले आजीवन सदस्य ठरले. लोकमान्य टिळकांनी त्यांचे फर्ग्युसन कॉलेजमध्ये स्वागत केले फर्ग्युसनमध्ये असताना गोखले आणि आगरकरांचे विचार जास्तीत जास्त जुळून येऊ लागले. परंतु, रानडेंचे शिष्य असलेल्या गोखलेंना, टिळकांचे जहाल विचार परवडेनासे झाले. टिळक व गोखले यांचे डेक्कन सोसायटीमध्ये योजनांसंबंधी खटके उडाले आणि टिळकांनी इ.स. १८९० मध्ये सोसायटीचे आजीवन सदस्यत्व रद्द करविले. गोखले आणि टिळकांच्या विचारांतील संघर्षाचा परिणाम देशाच्या राजकारणावर झाला आणि एकाच ध्येयाच्या प्राप्तीसाठी, दोन वेगवेगळे विचार प्रवाह निर्माण झाल्याने, अडचणी येऊ लागल्या.

गोपाळ कृष्ण गोखले, रानडेंना आपले राजकीय गुरु मानायचे आणि विविध सामाजिक, राजकीय व आर्थिक बाबतीत त्यांचा सल्ला घ्यावयाचे. डेक्कन सभेचा जाहीरनामा रानडेंनी तयार केला होता. त्याचा गोखलेंच्या एकूण विचार सरणीवर, त्यांच्या आधुनिक व मुक्त विचार पद्धतीवर फार मोठा प्रभाव पडला.

१४.२.१ उदारमतवाद व गो. कृ. गोखले :

गोखले यांनी राजकीय ध्येय प्राप्त करण्याच्या दृष्टीने घटनात्मक मार्गाचा अवलंब केला. त्यांनी त्यांच्या एका भाषणात नमूद केले की सर्व मार्ग हे घटनात्मक आहेत. फक्त तीन सोडून -

अ) प्रस्थापित राजवटीविरुद्ध क्रांतीकारी लढा व बंड.

ब) परकीय आक्रमणाला पाठींबा.

क) लोकांवर अत्याचार करणे.

१४.२.२ मवाळमतवादी व गोखले :

डब्ल्यू. सी. बॅनर्जी यांनी एक खास मागणी केली होती ती म्हणजे राष्ट्रीय एकतेचे दृढीकरण होय. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे दुसरे अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांनी इ.स. १८८६ च्या कलकत्यातील अधिवेशनात, मवाळमतवादी धोरणे व त्याच्या सीमारेषा यांचा एक साचाच तयार करुन दिला. ते त्यांच्या भाषणात म्हणाले, ''आज आपण इथे का जमलो आहोत ? काँग्रेस म्हणजे ब्रिटीशांच्या विरुद्ध बंड पुकारणाऱ्यांची बालवाडी आहे का ? (जमाव : नाही नाही) की काँग्रेस म्हणजे स्थिर सरकार वा शासन प्राप्ती साठी उचललेले एक पाऊल आहे ? (जमाव हो. हो...) चला तर मग खऱ्या माणसासारखे आपण बोलूया व घोषणा करूया की, आम्ही सरकारशी एकनिष्ठ आहोत.'' ह्या सगळ्या गोष्टींचा व योजनांचा, आपल्याला बंगालच्या फाळणीपर्यंतच्या, काँग्रेसच्या धोरणांचा अंदाज येतो. आपण फक्त महाराष्ट्रापूरतेच राष्ट्राचा इतिहास अभ्यासणार आहोत आणि महाराष्ट्रात राष्ट्रवाद वाढविण्याची गोपाळ कृष्ण गोखलेंनी केलेले प्रयत्न व भारतीय स्वातंत्र्यवादाचे युवराज म्हणून काय काय विचार मांडले, ते अवलोकन करणार आहेत.

रानडे, दादाभाई नौरोजी आणि फिरोजशहा मेहता हे ब्रिटीशांच्या उदारमतवादी इंग्रजी शिक्षणाने अतिशय प्रभावित झाले होते. एकोणिसाव्या शतकाच्या ह्या विद्वानांबरोबर, गोखलेंचे घनिष्ठ संबंध होते. तसेच, ब्रिटीश स्वातंत्र्यवादी विचारसरणीच्या लोकांबरोबरही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. एडमंड बर्क व जॉन स्टुअर्ट मिलच्या लिखाणातून त्यांना मानवतेचे व मुक्ततेचे धडे मिळाले होते. गोखलेंचे सामाजिक जीवन लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश

आगरकरांच्या विचारांपासून प्रेरित झाले होते. त्यांचे महादेव गोविंद रानडेंशी, फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे शिकवत असतांना, घनिष्ठ संबंध निर्माण झाले.

इतर विचारवंताप्रमाणेच, गोखलेंना सुद्धा टप्प्याटप्प्याने सुधारणा हव्या होत्या. त्यांना राजकारणातील व्यवस्थापनात संसदीय प्रतिनिधित्व, कार्यकारी व न्यायिक कारभाराचे विभाजन अपेक्षित होते. काँग्रेसच्या कार्यक्रमाचे उच्च व मध्यम वर्गीयांकडून स्वागत झाले. कॉंग्रेसला कार्यकारी मंडळात, इंडीअन सिव्हिल सर्विर्सेस, स्थानिक संस्था व लष्करी फौजा ह्यांमध्ये हळूहळू बदल अपेक्षित होते. त्यांनी घटनेवर अत्यंत विश्वास दाखविला. गोखलेंनी जनतेचे प्रश्न सरकार समोर मांडण्याचा अटीतटीचा प्रयत्न केला. त्यांना विश्वास होता की, ब्रिटीश न्यायप्रिय आहेत आणि जनतेचे प्रश्न जर त्यांच्या पर्यंत पोहचले तर जनतेस नक्कीच न्याय मिळेल. त्यांनी जनता व सरकार यांच्यामधील मध्यस्थांचे काम केले.

गोखलेंनी रानडे व इतर विचारवंतांप्रमाणे, ब्रिटीशांवर नि:संकोच विश्वास ठेवला. मवाळमतवाद्यांचा विश्वास होता की, ब्रिटीश सरकार भारतीयांच्या भल्यासाठीच आहे. ही देवाचीच इच्छा आहे की ब्रिटीश योग्य वेळी भारतात आले. भारतीयांनी त्यांच्या शांततामय व स्थिर सरकारासाठी प्रार्थना केली पाहीजे. त्यांना इ.स.१८५७ चे वाईट स्वप्न विसरायचे होते आणि इंग्लिश साहित्य, शिक्षण व न्याय पद्धती दळणवळण व वाहतुकीच्या साधनांत सुधारणा व इतर गोष्टींवर लक्ष केंद्रीत करावयाचे होते.त्यांच्या दृष्टीने, हे सर्वकाही दैवी देणगी होती.

सरकारच्या न्यायप्रियतेवरील विश्वासाची परीक्षा, इ.स. १८९२ चा इंडीयन कॉन्सिल ॲक्ट पास झाला, तेव्हा द्यायची वेळ मवाळमतवाद्यांवर आली. मवाळमतवाद्यांना जबरदस्त विश्वास होता की सरकार सध्याच्या प्रांतिय कायदे मंडळात, मोठ्या प्रमाणावर सुधारणा व विस्तार करणार आहे. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने पहील्या अधिवेशनात असा मसुदा पास केला की ज्यात निर्वाचित सदस्यांची मोठ्या प्रमाणावर भरती शासनाच्या सर्व शाखांमधील, सदस्यांना कार्यवाही करण्याचे अधिकार इ. परंतु जेव्हा इ.स.१८९२ चा इंडीयन कॉन्सिल ॲक्ट पास झाला, तेव्हा ह्या सगळ्यांचा अपेक्षा भंग झाला. कायदेमंडळाच्या अधिकारावर व कार्यावर अनेक बंधने होता. घटनात्मक मार्गाने विनंती व निविदा पाठवण्याचा काहीही उपयोग झाला नव्हता. लोकांचा ब्रिटीशांच्या न्यायप्रियतेच्या बाबतीत विश्वास उडाला होता.

भारतीय तरुण आता, भारताच्या इतिहासाची समृद्धी व प्रतिभा आणि सध्याचे ब्रिटीश सरकार यांबाबत तुलना करू लागले. हिंदू पुनरुत्थानाची चळवळ वेग पकडू लागली. परंतु, गोखलेंचा मात्र सरकारच्या सद्विचारांबाबतचा विश्वास ठाम होता.

१४.२.३ गोखले आणि भारतीय खर्च आयोग :

लॉर्ड वेल्बीच्या अध्यक्षतेखाली २४ मे १८९५ मध्ये भारताच्या खर्चासंबंधी माहीती काढण्यासाठी रॉयल कमिशन नियुक्त केले गेले. इ.स. १८९६ मध्ये कमिशनने, आर्थिक व्यवस्थापनासंबंधी माहीती काढावयास सुरुवात केली. त्यावर्षी दख्खनमध्ये भीषण दुष्काळ पडला. रानडेंनी दख्खन सभा स्थापून दुष्काळग्रस्तांसाठी मोठ्या प्रमाणावर मदत कार्य हाती घेतले. ज्या प्रमाणे सार्वजनिक सभेने समाजकार्य पूर्वी केले होते.

वेल्बी कमिशनमध्ये सर्व मुरलेले मुत्सददी होते. त्यात वेडरबर्न व केन यांच्याबरोबर दादाभाई नौरोजी हे भारतीयांचे मत मांडण्यासाठी होते. भारतातून पुराव्यादाखल साक्षीदारांना बोलविण्यात आले होते. परंतु मुंबई सरकारने रानडेंना सोडले नाही. त्याऐवजी गोंखलेची निवड झाली. त्यांच्यासोबत दिनशा वाच्छा होते. गोखलेंसाठी ती महत्त्वाची पायरी होती. वाच्छांना गोखलेंचा खूप आदर होता आणि ही जबाबदारी घेण्यासाठी गोखले पुढे आले याचा त्यांना आनंद होता. रानडेंनी गोखलेंना, भारतीय आर्थिक कारभाराच्या धोरण्यासंबंधी अनेक आठवडे प्रशिक्षण दिले. रानडेनी वेडरबर्नला, गोखलेंना मार्गदर्शन करण्यासंबंधी, पत्र लिहीले. गोखलेंनी भारताची बाजू अतिशय आत्मविश्वासाने मांडली. वेडरबर्नने गोखलेंचे तोंड भरुन कौतुक केले. त्यात त्यांनी म्हंटले की, ''गोखलेंनी मांडलेली भारताची बाजू अतिशय निरपेक्षपणाने मांडली आहे. स्वतःच्या देशाची ते अत्यंत चांगल्या प्रकारे सेवा करीत आहेत व आमचा अहवाल हा तुम्ही दिलेल्या पुराव्यावरच आधारीत असेल.''

१४.२.४ प्लेग आणि दुष्काळाचे व्यवस्थापन इ.स.१८९७ :

इ.स.१८९६ मध्ये ओला दुष्काळ पडला व दुसऱ्या वर्षी प्लेगची साथ मुंबई व पुण्यात पसरली. शाळा व कार्यालये बंद करण्यात आली आणि सरकारने डब्ल्यु. सी. रॅण्डला पुण्याचा प्लेग कमिशनर म्हणून नियुक्त केले. त्याला आरोग्य विषयक सूचना अंमलात आणावयाच्या होत्या व प्लेगच्या निवारणासाठी प्रत्येक घराची पहाणी करावयाची होती. रोगाची काही लक्षणे असणाऱ्या व्यक्तिंना तपासणीसाठी स्वतंत्र अशा इस्पितळात हलविण्यात आले. तसेच अधिकाऱ्यांनी रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी तसेच रोगांवर नियंत्रण मिळविण्यासाठी अधिकृत पथके सुद्धा पाठविली. स्थानिक जनतेचा मात्र अशा इस्पितळांना विरोध होता. त्यांची अशी समजुत असे की ही इस्पितळे म्हणजे मरणाचे ठिकाण होय.स्त्रियांच्या रहावयाच्या जागेच्या पवित्रतेचा पोलिसांकडून अनादर होत असल्याची अफवा सर्वत्र पसरण्यास सुरुवात झाली. लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली लेखी स्मरणीका यादीच मुंबई सरकारला पाठविण्यात आली. पोलिसांच्या दडपशाहीचा उघडपणे निषेध करण्यात आला.

प्लेग व्यवस्थापन व त्याचा कमिशनर रॅण्ड यांच्यावर कडवट टिका झाली. वेल्वी कमिशनच्या संदर्भात इंग्लंडमध्ये असताना दुष्काळी पोलिसांकडून होणाऱ्या क्रूर कृत्याचा अहवाल असणारी पत्रे गोखलेंना त्यांच्या पुण्यातील मित्रांकडून मिळाली. त्या पत्रांत पुण्यातील बहुतांश महिलांचा छळ होत असल्याचे चित्र स्पष्ट केले होते. इंग्लंडच्या संसदेच्या कनिष्ठ सभागृहाच्या सदस्यांच्या लघु समितीला गोखलेंनी या अत्याचारांचा पाढा वाचला. 'मॅन्चेस्टर गार्डिअन' ने ही बातमी पुढे आणली. तर मुंबई सरकारने ही दृष्टकृत्ये फेटाळून लावली. गोखलेंजवळ असलेले पुरावे त्यांना सिद्ध करण्याचे आव्हान देण्यात आले आणि गोखलेंना माघार घेणे भाग पडले. या आरोपांबाबत त्यांनी जाहीर माफी मागितली.

गोखलेंना खरी भीती त्यांच्या माहीतीदारांच्या पोलिसांकडून छळ होईल याची होती. गोखलेंचे विश्वासु सल्लागार रानडे यांनी गोखलेंना पूर्णपणे सरकारच्या विरोधात न जाण्याच्या सल्ला दिला.. पुण्यातील जीवघेणा संघर्ष टाळण्यासाठी रानडेंनी गोखलेंना सार्वजनिक जीवनात धोका पत्करण्यास सांगितले. आज्ञाधारक अनुयायाप्रमाणे गोखलेंनी रानडेंचे म्हणणे जसेच्या तसे ऐकले. ब्रिटीश आणि भारतीयांमधील संबंध ढासळु नयेत यासाठी रानडेंनी अथक प्रयत्न केले. मुख्यतः त्यांना जेव्हा कळले की, दुष्काळ व्यवस्थापनेवरील टिका हेच 'डेक्कन कॉलेज' चे प्राध्यापक वेल्बी यांच्या राजीनाम्याचे कारण होते. ही एक अतिशय दुखःद घटना होती. अशा

वेळी गोखले ब्रिटिश अधिकाऱ्यांना उघडे पाडू शकले असते आणि रानडेंनी साहसी पवित्रा स्विकारला असता. परंतु येणाऱ्या काळात यांचा वाईट परिणाम झाला असता.

अति उत्साहाने राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्यांची मने वळविण्यात रानडेंना अपयश आले. 'राणी विक्टोरियाच्या अधिकार प्राप्तीचे साठवे वर्ष देशात साजरे होत होते. २२ जून १८९७ रोजी सरकारने पुण्यामध्ये या सोहळ्याची जय्यत तयारी केली. दुष्काळ आणि प्लेग व्यवस्थापनेच्या वादळाची तीव्रता मंदावल्याचे दिसून येऊ लागले. कमिशनर आणि लेफ्टनंट आयर्स्ट सोहळ्यातून बाहेर पडताच चाफेकर बंधुनी गणेश खिंडीत त्यांवर हल्ला चढविला आणि त्यांचा खून करण्यात आला. पाच दिवसांनी लोकमान्य टिळकांना त्यांच्या केसरी मधील संतापजनक अग्रलेखामुळे तसेच राजकीय असंतुष्टतेच्या आरोपाखाली अटक झाली. गोखले आणि त्यांच्या नेमस्त पुढाऱ्यांनी महाराष्ट्रातील राष्ट्रभक्तीच्या भावनेने आता वेगळेच वळण घेतले, असे सांगितले.

१४.२.५ गोपाळ कृष्ण गोखले यांचे काँग्रेसमधील कार्य :

गोखलेंनी जाहिर माफी मागितल्यामुळे काही जहाल मतवाद्यांमधे असंतोष निर्माण झाला. काही अंधश्रद्धाळु जहाल मतवाद्यांनी गोखलेंच्या परदेश दौऱ्याबद्दल त्यांच्यावर बहिष्कार टाकला. गोखलेंनी त्यांच्या मार्गात अडचणी व पराभव यांवर विजय मिळविला. इ.स. १९०१ साली रानडेंच्या मृत्यूमुळे गोखलेंच्या जीवनात पोकळी निर्माण झाली. राष्ट्राच्या कार्यात त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून घेतले होते. इ.स.१९०२ मध्ये त्यांची 'इंपिरीअल लेजीस्लेटीव काऊनसिल' चा सदस्य म्हणून नेमणुक करण्यात आली आणि जनतेच्या जीवनात त्यांनी एक उंच पातळी गाठली. राजकीय अधिकाराच्या मुदतीच्या पहिल्या चार वर्षात ते लॉर्ड कर्झनच्या अरेरावी धोरणाविरुद्ध झगडले. गोखले त्यांच्या पिढीचा एक सच्चा विशाल दृष्टीकोन असणारा अर्थशास्त्रज्ञ ठरले. असे मानणे आहे की, त्या काळी भारतातील सार्वजनिक अर्थव्यवस्थेचे ते उच्च विद्वान ठरले.

ब्रिटीशांच्या राजनितीत विश्वास असणाऱ्या मवाळ मतवाद्यांसाठी इ.स. १९०५ मधील बंगालची विभागणी हा एक प्रखर धक्का होता. याच वर्षी गोखले यांची काँग्रेसच्या बनारस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. ठराविक परिस्थितीत बहीष्काराचा वापर हा राजकीय शस्त्रासारखा असतो हे मोठ्या धैर्याने त्यांनी दाखवून दिले. ब्रिटीश जनतेला आणि ब्रिटीश अधिकाऱ्यांना भारतातील लोकांच्या मतांचे प्रदर्शन करण्यासाठी गोखलेंनी येणाऱ्या काही वर्षात इंग्लंडला भेट दिली. जपानच्या रशिया वरील विजयामुळे भारतभर राष्ट्रभक्तीची एकच लाट उसळली. लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल, लाला लजपत रॉय, अरविंद घोष हे बहिष्कार चळवळीचे नेतृत्व करीत होते. इ.स. १९०७ मध्ये जहाल मतवाद्यांनी सुरतमध्ये काँग्रेसमध्ये फूट पाडली व नेमस्त मतवाद्यांनी इ.स. १९१६ पर्यंत काँग्रेस टिकवून ठेवली.

१४.२.६ गोपाळ कृष्ण गोखले व भारत सेवक समाज :

आपल्या लोकांच्या सेवेसाठी गोखलेंनी कधी काहीच कमी पडू दिले नाही. त्यांना आत्मनिर्भर कार्यकर्ते आणि देशभक्त यांचे पथक तयार करावयाचे होते. त्यातूनच 'भारत सेवक समाजाची' निर्मिती झाली. ब्रिटिश साम्राज्यात आपली सत्ता असेल असा त्यांचा विश्वास होता. भारताच्या स्वातंत्र्यानंतर व सार्वभौमत्वा नंतरही ब्रिटीशांबरोबर संबंध टिकून राहावेत असा त्यांनी सल्ला दिला. हे भारताच्या प्रगतीच्या दृष्टीने गरजेचे होते. त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी ते घटनात्मक मार्गाचा अवलंब करीत. भारत सेवक समाजाचे नियम अतिशय कडक शिस्तीचे

होते आणि ते तसेच सोसायटीच्या सदस्यांकडून पाळले जावेत अशी त्यांची अपेक्षा होती. प्रस्तावनेतील मुख्य उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे होती.

१) भारत सेवक समाजाच्या प्रत्येक सदस्याने स्वानुभवाच्या जोरावर जनजागृती करणे आवश्यक आहे.
२) त्यांना जनतेसाठी राजनितीक शिक्षण शिबीरांत प्रोत्साहन देणे आवश्यक होते.
३) जनसामान्यांमधील सहकार्य आणि सामंजस्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
४) समाजाच्या औद्योगिक आणि वैज्ञानिक शिक्षणाकडे भर दिला पाहिजे.
५) औद्योगिक चळवळींना प्रोत्साहन मिळावे याकडे सदस्यांचा कल असावा.
६) सदस्यांनी मागासवर्गियांची परिस्थिती सुधारणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे असे समजावे.

गोखले त्यांच्या शिस्तप्रिय स्वभावामुळे भारतापुढे एक समर्पक कार्यकत्यांचे मोठे उदाहरण ठरले. त्यांना नकार वा मान्यतेची काळजी नसे. त्यांनी देशासाठी स्वतःच्या सुखदुःखाकडे अथवा भवितव्याकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यांनी बहिष्कार चळवळीला पाठींबा दिला आणि दडपशाही धोरणात अहिंसेला प्रतिकार केला. इ.स.१९०९ च्या मौर्ले मिंटो सुधारणांत देशाच्या हितासाठी ब्रिटीश सरकारला त्यांनी सहकार्य केले. गांधीजींच्या विनंतीनुसार इ.स.१९१२ मध्ये त्यांनी साऊथ आफ्रिकेला भेट दिली. वर्णद्वेषा विरुद्ध चळवळीत त्यांनी गांधीजींना पाठिबा दिला. गोखलेंनी इ.स. १९१४ मध्ये गांधीजींना भारतात परतण्याची विनंती केली. ज्यामुळे त्यांच्यासारख्या समर्पक कार्यकर्त्याची भारताला गरज होती. येणाऱ्या वर्षात गोखले सुधारणेची योजना आखणी करीत होते. इ.स.१९१५ मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर ती योजना प्रकाशित करण्यात आली आणि 'गोखलेंचा राजकीय करार' म्हणून प्रसिद्ध झाली.

१४.२.७ गोखलेंचे योगदान :

मवाळ मतवाद्यांच्या पद्धतीस जहालवादी कुत्सितपणे 'राजकीय भिकारी' म्हणत. गोखले, दादाभाई, फिरोजशहा मेहता, वाच्छा, बॅनर्जी हे अपुऱ्या सुधारणा आणि घटनात्मक मार्गांचे पुरस्कर्ते होते. ब्रिटीश राजवटीत 'वसाहती स्वराज्या'सारख्या उद्दात्त धेय्याकडे गोगलगाईच्या चालीने भारतीय काँग्रेसला पोहचवणारे ते महान नेते होते. गोखलेंची आपल्या मातृभूमीविषयी नितांत भक्ती होती. ब्रिटीशांची न्याय्य पद्धती त्यावरील निखळ आस्था अनेकांना मान्य नव्हती. त्यांच्या मवाळ मतांविरुद्ध समाजातील लोकांचा दबाव वाढत असतानाही हटवादी ब्रिटीश प्रशासनासोबत त्यांचे संबंध कायम होते जे युवा पिढीला अमान्य असे होते. गांधीजींच्या धोरणांवरील त्यांचा खोल प्रभाव व त्यांच्या संकुचीत वृत्तीपासून राष्ट्रीयत्वाच्या मुक्ततेच्या कार्याने त्यांना प्रदेशाच्या तसेच राज्याच्या इतिहासात उच्च स्थान मिळाले. लोकमान्य टिळकांकडून गोखलेंना 'भारताचा हिरा' आणि 'महाराष्ट्राचा अलंकार' अशा पदव्या मिळाल्या.

आपली प्रगती तपासा :-

१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये गोखलेंनी कोणते कार्य केले ?

_____

_____

_____

_____

_____

१४.३ बाळ गंगाधर टिळक (इ.स.१८५६-१९२०) आणि जहाल मतवादी राजकारण

'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' तिच्या स्थापनेच्या दिवसापासूनच देशाच्या प्रशासनामध्ये भारतीयांच्या परिणामकारक आवाजाची मागणी करीत असे. काँग्रेसने आपल्या वार्षिक बैठकीत अशा मागणींचा निर्धार केला. ब्रिटीश सरकारने अशा कित्येक मागण्यांकडे दुर्लक्ष केले. ज्यामुळे काँग्रेसमधील युवा सदस्यांच्यात असंतोष निर्माण होऊ शकेल आणि ज्यामुळे राज्यकर्त्यांच्या हेतुवर संशय येईल. 'इंडीयन काऊंसील ॲक्ट' इ.स. १८९२ ने मवाळ मतवाद्यांची देखील निराशा केली. लोकमान्य टिळकांनी प्रवृत्त केलेल्या अशा अस्वस्थ युवकांना गोखले आणि इतर मवाळ मतवादी नेते 'जहाल मतवादी' असे म्हणत. काँग्रेसमध्ये अधिक धैर्याची अपेक्षा होती. टिळकांच्या बरोबरीनेच आणखी तीन व्यक्ति होत्या ज्यांनी इतरांचे लक्ष वेधुन घेतले. त्या व्यक्ति म्हणजे पंजाबचे लाला लजपत राय आणि बंगालचे बिपीनचंद्र पाल व अरविंद घोष होत. देशाच्या प्रशासनात भारतीयांना त्यांच्या हक्काचा वाटा मिळवून देण्यात ब्रिटीश सरकारचा मंद गतीने चालणारा आणि चालढकली कारभाराने हे तरूण नेते असंतुष्ट होते.

१४.३.१ जहाल मतवादी राजकारण :

इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या संस्थापकांनी केलेल्या कार्यक्रमाच्या आखणीचे मुख्य उद्दिष्ट होते जनता आणि सरकार यांमधील सामंजस्य टिकवून ठेवणे. काँग्रेस स्थापनेच्या घटना अनुसरणाने उदारमतवादी नेत्यांचा अपेक्षित असा कृती कार्यक्रम विस्कळीत झाला. इंडीयन काऊँसिलस् ॲक्ट इ.स.१८९२ ने अनेक युवा सदस्यांची झालेली भ्रमनिराशा निदर्शनास आणली.

स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, बिपीन चंद्र पाल आणि अरबिंद घोष यांसारख्या चैतन्यपूर्ण व्यक्तिरेखा भारताच्या पुरातन काळाच्या अभिमानास्पद गोष्टींना जोडणाऱ्या दुवा ठरल्या. स्वामी विवेकानंदांनी भारतीय संस्कृतिचा पट उघड केला. यामुळे भारताच्या गतकाळास पुन्हा उजाळा मिळाला. 'स्वातंत्र्य हे जीवनाचे उद्दिष्ट आहे आणि केवळ हिंदुत्वच आपल्या आकांक्षा पूर्णत्वास नेईल'' असे अरबिंद घोष यांनी जाहिर केले.

इ.स. १८९६ मध्ये दुष्काळास झालेली सुरूवात आणि प्लेगची साथ महाराष्ट्रात उदारमतावाद्यांच्या राजनितीला उत्तेजन देणारी ठरली. एक जबाबदार सरकार बनवू इच्छिणाऱ्या तरुणांमध्ये मवाळमतवाद्यांच्या विनवण्या आणि अर्जाच्या धोरणांनी संताप निर्माण केला.

बंगालच्या विभागणीसाठी लॉर्ड कर्झन ने केलेल्या हट्टाने जहाल मतवादींनी राजकारणात आगीत तेल ओतण्याचे काम केले. इ.स.१९०५ मध्ये युरोपियन राष्ट्र रशिया वरील जपानच्या विजया मागोमाग ब्रिटीश श्रेष्ठत्वावरील अयोग्य टिकेची संधी लोकमान्य टिळकांनी सोडली नाही. लॉर्ड कर्झन च्या दडपशाही धोरणाने टिळकांच्या जहाल मतवादी राजकारणांस तसेच 'स्वराज्य चळवळी' साठी मैदान मोकळे केले.

१४.३.२ टिळकांचे पूर्वायुष्य :

२३ जुलै १८५६ साली लोकमान्य टिळकांचा जन्म झाला. देशभरात आणि विशेष करून महाराष्ट्रांत हिंदु समाजात जागृती करण्यात त्यांचा फार मोठा सहभाग होता. गोखलें प्रमाणे त्यांना

रत्नागिरी जिल्ह्यातून प्रचंड प्रतिसाद मिळाला व त्यांनी १८७३ साली पुण्यात राजकीय पक्षात प्रभाव निर्माण केला. पुण्यातील डेक्कन कॉलेजात त्यांनी शिक्षण घेतले. इ.स. १८७६ साली गणित विषय घेऊन टिळक बी.ए. झाले आणि इ.स. १८७९ साली वकिलीची परीक्षा पास झाले. पुढे आगरकर आणि टिळकांनी समाजहिताची कामे करण्याचा निश्चय केला आणि राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना १८८० मध्ये पुण्यात केली ती इ.स.१८८० मध्ये. इ.स.१८८४ साली फॅर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. इ.स.१८८१ मध्ये टिळक आणि आगरकर यांनी मिळून 'केसरी' हे मराठी आणि 'मराठा' हे इंग्रजी साप्ताहिक सुरु केले. ह्या दोन्ही वृत्तपत्रांनी राष्ट्रात जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. कालांतराने आगरकर-टिळक यांच्यात सामाजिक सुधारणेवरुन मतभेद झाले. आगरकर 'केसरी'तून बाहेर पडले आणि त्यांनी स्वतःचे 'सुधारक' वृत्तपत्र सुरु केले. मग टिळकांनी वरील दोन्ही वृत्तपत्रांच्या संपादनाची भूमिका स्विकारली.

लोकांना संघटित करण्यासाठी इ.स.१८९३ मध्ये टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली. इ.स.१८९६ मध्ये शिवाजी महाराजांच्या जयंतीचा उत्सवही सुरू केला. सर्व समाजाने जातीभेद विसरुन एकत्र यावे व राष्ट्राचा उद्धार करावा, हा उदात्त हेतु त्यांच्यामागे होता. हिंदू मुसलमानांच्या दंगलीलाही याच वर्षी सुरवात झाली. इ.स.१८९७ साली पुण्यात दुष्काळ आणि प्लेगने थैमान घातले. टिळकांनी सरकारवर वर्तमानपत्रातून जोरदार टिका केली. इ.स.१८९७, इ.स.१९०२ आणि इ.स.१९०८ मध्ये त्यांना देशद्रोहाच्या नावाखाली कैद झाली. इ.स. १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबईतील सरदारगृहात त्यांची जीवनयात्रा संपली.

१४.३.३ टिळकांचा प्रखर राष्ट्रवाद :

टिळक मुळातच लढवय्ये होते. देशभक्तीसाठीचा त्यांचा दृष्टीकोन देखील झुंजार असे. रानडे, गोखले आणि दादाभाई प्रमाणेच टिळकांनी पाश्चात्यीकरणाच योगदान आणि ब्रिटीश शिक्षण पद्धती आणि व्यवस्थापनाचे महत्त्व ओळखले. परंतु ब्रिटीशांचे आपल्यावरील वर्चस्व त्यांना मान्य नव्हते. कारण टिळकांच्या मनात 'स्वराज्याची' कल्पना होती. इ.स.१८८७ रोजी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मिळवणारच' असा उपदेशात्मक मंत्र टिळकांनी दिला. नेमस्त मतवाद्यांनी घटनात्मक सरकार मागणीत केलेली दिरंगाई ते कधीच सहन करु शकत नव्हते.

'केसरी' मध्ये नमुद केलेली त्यांची स्वराज्या बाबतची कल्पना काही अशी होती.

''स्वराज्य म्हणजे दुसरे तिसरे काही नसून माझा देश कारभार मीच पाहणे होय. स्वराज्य म्हणजे लोकशाहीने परकीय नोकरशाहीस बदलून टाकणे. कलेक्टर, कमिशनर, गव्हर्नर असे कुशल अधिकारी आवश्यक असून ते आमच्या अखत्यारित असावेत. त्यांनी नोकरासारखे काम करावे मालकासारखे नाही.'' जहाल मतवादी असून देखील टिळकांना ब्रिटिश साम्राज्याशी संबंध हवे होते परंतु ते मालक नोकर असे नको होते.

टिळक कर्तव्यनिष्ठ राजकारणी होते. तसेच स्वातंत्र्याच्या धेयप्राप्तीसाठी त्यांनी घटनात्मक पद्धतीचा अवलंब केला. त्यांचे जीवन सतत परकीय सत्ते विरुद्ध लढण्यात गेले. इतर कोणताही महाराष्ट्राचा नेता किंवा संपुर्ण भारताने आपल्या देशासाठी जे भोगले नाही ते टिळकांनी या काळांत भोगले. इ.स. १८९७ साली पुण्याचा प्लेग कमिशनर रॅड आणि ले. आयर्स्ट च्या भीषण खूनाबाबत चिथावणी दिल्याच्या आरोपाखाली अठरा महिने कारावासाची शिक्षा झाली.

त्यांना मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड सँडहर्स्ट चा धिक्कार करणारा ठराव पुढे मांडावयाचा होता. बंगालच्या फाळणीमुळे टिळकांच्या ब्रिटीश सरकारवरील टिकेला अधिकच धार प्राप्त झाला आणि जहाल मतवाद्यांच्या नंतरच्या फळीचे टिळकांनी नेतृत्व स्विकारले. टिळकांची राजकारणातील पातळी आता उंचावू लागली.

इ.स. १९०६ रोजी जहाल मतवाद्यांनी त्यांच्या दबावाने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षणाच्या क्रांतीकारी कार्यक्रमाचा ठराव पास करण्यास भाग पाडले. इ.स. १९०८ रोजी टिळकांवर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला दाखल करण्यात आला. ब्रिटीश सरकारचे मानणे होते की टिळक हे त्यांच्या भारतातील सत्तेसाठी खूप मोठा धोका आहेत. मंडाले येथे त्यांना सहा वर्षे कडक कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. इ.स. १६ जुन १९१४ साली त्यांची मंडाले येथून सुटका झाली.

१९०८ साली राजद्रोहाच्या खटल्यात टिळकांना दोषी जाहीर करण्याअगोदर १९०७ मध्ये सुरत येथे काँग्रेस मध्ये फुट पडली. कारण नेमस्त मतवादी त्यांच्या सोबत काम करु शकत नाही अशी समज त्यांना देण्यात आली होती. जहाल मतवाद्यांच्या चतु:सूत्री कार्यक्रमाने त्यांना भयभित केले. टिळकांच्या जहाल मतवादी राजकारणामुळे नऊ वर्ष काँग्रेस पासून त्यांना वेगळे ठेवण्यात आले. परंतु इ.स. १९१६ रोजी त्यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि काही नेमस्त मतवाद्यांनी काँग्रेस सोडली. इ.स. १९१४ मध्ये सुटके नंतर श्रीमती ॲनी बेझंट यांच्या 'होम रुल' चळवळीत त्यांनी सहभाग घेतला आणि पुन्हा इ.स.१९१६ साली टिळकांना कैद झाली.

१४.३.४ टिळक आणि गोखले यांची मते :

टिळक आणि गोखले यांच्या वयामध्ये दहा वर्षाचे अंतर होते. काँग्रेस मध्ये आणि बाहेर असताना दोघांनाही वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांसोबत काम करावे लागे. गोखलेंना ब्रिटीश सत्तेचे राज्यमान्य असा दर्जा मिळाला. तर टिळकांना जनसामान्यांचा नेता 'लोकमान्य' अशी पदवी बहाल केली. होम रुल चळवळी नंतरच्या काळांत टिळकांना महाराष्ट्राचे अनभिषिक्त सम्राट असे मानले जाऊ लागले. त्या दोघांमध्ये उदारमतवादी धोरणाची भुमिका होती आणि देशसेवेचा निर्धार करण्याची हिंमत त्यांनी दाखवली. ब्रिटीश साम्राज्यांतर्गत वसाहती दर्जा प्राप्त करण्यासाठी त्या दोघांनी घटनात्मक पद्धतीचा अवलंब केला. एकाने सत्ताधाऱ्यांचा पाठपुरावा करण्यावर जोर दिला तर दुसऱ्याने आपल्या धैय्य सिद्धीसाठी सत्तेविरुद्ध लढण्याची तयारी दर्शविली. हा विरोधाभास त्या दोहोंच्या वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्व घडवणूकीतून दिसून येतो.

टिळकांचा ब्रिटीश न्याय व्यवस्थेवरील विश्वास उडाला व कायद्याच्या राज्यावरील त्यांनी नेमस्तांवर टीका करताना सांगितले, ''नेमस्त मतवाद्यांनी चळवळीसाठी घटनात्मक पद्धतीशी एकरुप असल्याचे सांगितले जाते. आम्ही गोंधळलेल्या लोकांना त्यांच्या विचारार्थ असणाऱ्या भारताच्या राज्यघटनेबाबत आम्ही थेट प्रश्न करीत आहोत. ब्रिटीश सत्तेच्या संक्रमणानंतरच्या काही नोंदींचा उल्लेख भारताच्या इतिहासात नमुद असतील असा शोध आम्ही घेतला. परंतु भारतासाठी ब्रिटिश राज्यघटने सारखी घटना शोधण्यात आम्ही अपयशी ठरलो. गोखलें ती त्यांच्या 'सर्व्हंटस ऑफ इंडीया सोसायटी' मध्ये ते शोधून दाखवावे. टिळकांच्या वाद विवादाचे तत्त्व आणि प्रखर भाषा शैली नी त्यांच्या विरोधकांना नेस्तनाबूत केले.

महाराष्ट्राला लाभलेल्या या दोन देशभक्तांनी निखळ देश सेवा केली. गोखलेंना ब्रिटिश सत्ताधाऱ्यांची मर्जी जिंकायची होती तर टिळकांना ब्रिटिशांच्या सत्तेत बदल घडवून आणावयाचा होता. संसदीय कामामध्ये गोखले तज्ञ होते आणि त्यांनी रॉयल कमिशन प्रभावित केले. तर टिळकांनी जनमानसाला प्रभावी आवाहन केले. ह्यांचे व्यासपिठ म्हणजेच लोकांच्या प्रश्नांवर चर्चा अगर निर्णय होण्याचे लोकपीठ होते. टिळकांचा लोकांची मने जिंकण्याकडे कल होता. आपल्या प्रक्षोभक भाषणांतून लेखणीतून वा कार्यातून निर्माण झालेल्या अडचणींना ते स्वतः तोंड देत. कायद्याच्या चौकटीत राहूनच कोणत्याही गोष्टीचा त्याग करण्याची गोखलेंची तयारी होती. टिळकांना सुद्धा त्याच चौकटीत राहून कार्याला हातभार लावणे पसंत होते. परंतु जेव्हा न्यायी, नीतीवान आणि पुरोगामी विचार त्यांच्या कार्याला पाठींबा देत आहेत असे त्यांना वाटले तेव्हा ते ब्रिटिशांच्या मर्यादेला अजिबात जुमानित नसत. परंतु कायदेभंगावर शिक्षा ही असतेच असे माहित असले तरी टिळक पूर्णतः वाटेल ती शिक्षा भोगण्यास तयार असायचे.

महाराष्ट्राच्या या दोन सुपुत्रांच्या दृष्टीकोन व व्यक्तिमत्वाची तुलना करताना डॉ. पट्टाभाई सितारामय्या म्हणतात, ''अस्तित्वात असलेल्या राज्यघटनेमध्ये सुधारणा करणे अशी गोखलेंची योजना होती. तर राज्यघटनेची पुनर्रचना करणे ही योजना टिळकांची होती. प्रेम आणि त्याग हे गोखलंचे आदर्श होते. तर सेवा आणि दुःख हे टिळकांचे आदर्श होते. 'स्वशासन' असे गोखलेंचे लक्ष्य होते. तर टिळकांचे लक्ष्य होते 'स्वराज्य' जो प्रत्येक भारतीयांचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि परकियांच्या हस्तक्षेप किंवा अडथळ्या शिवाय तो त्यांस मिळाला पाहिजे.''

टिळक व इतरांनी जो हिंदू समाजाच्या पूनरूज्जीवनाचा प्रयत्न केला त्याने अनेकांना प्रेरणा मिळाली. त्यामुळे अनेक तरुण त्यांच्या अधिकारासाठी ब्रिटीश राज्यकर्त्याविरुद्ध लढण्यास प्रवृत्त झाले. टिळकांनी ब्रिटीश राजवटीविरुद्ध लढण्याची एकही संधी सोडली नाही. मग तो प्लेगचा मुद्दा असो वा दुष्काळाचा वा महसूल आयुक्त क्रॉफर्डची पैश्याची अफरातफर असो. टिळक प्रत्येक वेळा ब्रिटीशांवर कडाडले. ब्रिटीशांची निर्भत्सना करण्याची एकही संधी टिळकांनी दवडली नाही. परंतु ब्रिटीशांविरुद्ध त्यांनी कधीही सशस्त्र बंडाचा पुरस्कार केला नाही. सरकारलाही टिळकांविरुद्ध कधीही सशस्त्र बंडाचा आरोप लावता आला नाही. त्यांनी सदैव कायदा व घटनेच्या चौकटीत राहूनच सरकारच्या दुष्ट योजनांचा यथेच्छ समाचार घेतला.

१४.४ विनायक दामोदर सावरकर आणि राष्ट्रवाद (इ.स.१८८३-इ.स. १९६६)

इ.स. १८८३ साली नाशिक जिल्ह्यात विनायक दामोदर सावरकरांचा जन्म झाला. त्यांना आपला धर्म, प्राचीन संस्कृति आणि परंपरांचा अभिमान होता. शालेय जीवनात असताना देशसेवेसाठी त्यांनी आपल्या मित्रांसोबत देशसेवेसाठी एका संघटनेची स्थापना केली आणि त्याला 'राष्ट्रभक्ती मंडळ' असे नाव देण्यात आले. शि. म. परांजपेंच्या राष्ट्रवादाने ते अत्यंत प्रभावित झाले होते. खरं तर हर्बट स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाकडे ते विशेष आकर्षित झाले होते. संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आणि एक सच्चा देशभक्त म्हणून शि.म. परांजपे आणि त्यांच्या अनुयायींनी सावरकरांना प्रेरित केले आणि त्यांचे साथीदारही यात सहभागी झाले. सावरकरांनी इ.स.१९०४ साली महाराष्ट्रात क्रांतिकारक कार्याची हमी देणाऱ्या 'अभिनव भारत' या संघटनेची स्थापना केली आणि इतर प्रांतियांना देखील यांसारख्या चळवळी सुरू करण्यास प्रेरित केले.

बी.ए.च्या परीक्षेनंतर श्यामजी कृष्ण वर्मा यांनी शिवाजी शिष्यवृत्तीसाठी सावरकरांची निवड केली. ते भारताबाहेर राहूनही देशाच्या स्वातंत्र्यासाठी झगडत होते. जोसेफ मॅझिनीच्या 'रिसॉर्जिमेंटो' आणि इटलीच्या एकीकरणात गॅरिबाल्डी यांनी केलेले कार्य व त्याग (इ.स.१८७०) याने ते अत्यंत प्रभावीत झाले होते. तसेच 'राष्ट्रीय एकता' आणि 'स्वातंत्र्य लढा' विषयांना समर्पित अशी तीन पुस्तके त्यांनी लिहीली. '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्य समर' हे त्यांचे पहिले पुस्तक मराठीत लिहीले गेले. पुढे 'गदर' संस्थेने त्याची अनेक भाषांत भाषांतरे केली. तसेच सुभाषचंद्र बोस व सरदार भगतसिंग यांनी या पुस्तकांच्या प्रकाशनाचे काम भारतात गुप्तपणे पार पाडले.

सावरकरांनी 'शिखांचा इतिहास' सुद्धा लिहिला व 'जोसेफ मॅझिनी'चे चरित्र लिहिले. 'रामदास' आणि 'मॅझिनी' यांच्या शिकवणीतील साम्य त्यांनी स्पष्ट केले.

१४.४.१ सावरकरांचे क्रांतीकारी कार्य :

फ्रांसमध्ये काही काळ वास्तव्यानंतर सावरकर जेव्हा स्वदेशी परतले तेव्हा ब्रिटीशांनी सावरकरांवर कडक पाळत ठेवली होती. नाशिकच्या नाट्यगृहात झालेल्या कलेक्टर जॅक्सनच्या खुनाच्या बातमीने नाशिक कटाची कसून चौकशी करण्यात आली. अवघ्या अठरा वर्षाच्या अनंत लक्ष्मण कान्हेरेंनी १२ डिसेंबर १९०९ च्या रात्री विजयानंद नाट्यगृहामध्ये नाशिकचे कलेक्टर जॅक्सनचा खून केला. आरोपीने आपला गुन्हा मान्य केला आणि कोर्टास सांगितले 'मी केलेली हत्या ही कोणत्याही प्रकारच्या वैयक्तिक वैमन्यासातून केलेली नसून त्याचे खरे कारण कलेक्टरची ब्रिटिश सरकारप्रमाणे जुलमी कारभार आहे. मी माझे काम पूर्ण केले आहे आणि आता कोणत्याही क्षणी मरणास तयार आहे.'

इ.स.१९१० मध्ये कर्नल लर्खनवायली ह्या इंग्रजी अधिकाऱ्यास मारण्यामध्ये सावरकर यांनी मदनलाल धिंग्रा यांना मदत केली असे समजून ब्रिटीश सरकारने लंडनमध्ये त्यांना पकडून भारतात पाठविले. भारतात आणले जात असताना सावरकरांनी फ्रान्सच्या मार्सेलिस या ठिकाणी नौकेतून समुद्रात उडी मारली व किनाऱ्यास लागले. परंतु फ्रेंच अधिकाऱ्यांनी त्यांना पकडून ब्रिटीशांच्या ताब्यात दिले. (सावरकरांना जन्मठेपेची म्हणजे ५० वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा झाली.) त्यांना मुंबईमध्ये आणल्यानंतर त्यांच्यावर 'देशद्रोह' आणि 'नाशिक कटात' सामिल झाल्याचा खटला चालवला. ती शिक्षा भोगण्यासाठी त्यांना अंदमानात पाठवण्यात आले. तिथे त्यांना अतिशय कठोर तुरुंगवास भोगावा लागला. त्यांनी खूप हालअपेष्टा सहन केल्या. इ.स.१९२४ मध्ये अंदमानातून सुटका होऊन इ.स.१९२४ ते १९३७ या काळांत १३ वर्षे त्यांना रत्नागिरीत स्थानबद्ध केले गेले. त्यावेळी त्यांना राजकारणात सहभागी होण्याची परवानगी नव्हती. सावरकर १० मे इ.स.१९३७ ला बंधमुक्त झाले आणि पुन्हा एकदा सार्वजनिक जीवनात त्यांचा प्रवेश झाला.

१४.४.२ सावरकरांचा प्रखर राष्ट्रवाद :

तुरुंगवासातील जीवन आणि प्रखर राष्ट्रवादाची भावना सावरकरांनी आपल्या लेखनातून व्यक्त केली. सावरकरांनी 'माझी जन्मठेप' आणि 'हिंदुत्व' ही विचारप्रवर्तक पुस्तके लिहीली आणि आपल्या लेखणीतून आपले विचार जगासमोर आणले. हे त्यांचे विचार कोणत्याही राजकीय पक्षाकडे कल असणाऱ्या प्रत्येक मराठ्यांची मने जागृत करणारे ठरले.

सावरकरांना, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मवाळमतवादी किंवा जहालमतवादी ज्याप्रमाणे लढा देत होते, ती पद्धतच विशेष रुचली नव्हती. त्यांच्या मते, टिळकांची राजकीयदृष्ट्या अत्यंत प्रखर व कडवी भूमिकाही तितकीशी परिणामकारक योग्य नव्हती. त्यांच्या मते, फक्त सशस्त्र लढाच ब्रिटीशांच्या जोखडातून भारतास मुक्त करू शकतो. त्यासाठी म्हणजे सशस्त्र लढ्यासाठी त्यांनी वैचारीक, बौद्धिक पातळीवर समीकरणे मांडण्यास सुरुवात केली. सावरकर व इतर क्रांतीकारी बॉम्ब बनविण्याच्या दिशेने प्रेरित झाले.

सावरकरांना अंदमानला धाडण्यात आले, परंतु त्यामुळे भारतातील क्रांतीकारी राष्ट्रवाद थोपविता आला नाही. जागतिक युद्धाच्या वेळी परकीय क्रांतीकारकांमुळे भारतातील क्रांतीकारकांना अजूनच प्रोत्साहन मिळत होते. परंतु भारताला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य तेव्हाच मिळाले जेव्हा ब्रिटीश संसदेने भारतीय स्वातंत्र्याचा कायदा जुलै १९४७ मध्ये पास केला.

१४.५ समारोप

महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांनी शिवजयंती व गणेशचतुर्थी हे उत्सव सुरु केल्यामुळे मुंबई व पुणे येथील मुस्लिम बांधवांमध्ये अस्वस्थता पसरली. इ.स.१८९३ मध्ये मुंबई येथे प्रथम हिंदू मुस्लिम दंगे उसळल्यानंतर धार्मिक दंगली हे नित्याचेच चित्र झाले. मुंबईतील काही मुस्लिम पोलिस अधिकाऱ्यांनी सरळसरळ भेदभाव करण्यास सुरूवात केली. शिया, इमामी इस्माइल, सीव प्रमुख एच.एच. आगा शहाबुद्दीन शहा यांची मन:स्थिती बिघडली होती. फाळणीनंतर हिंदू, मुस्लिम तेढ अधिकच वाढली होती. संबंधात वितुष्ट आले होते. त्यामुळे गैरसमजाला अजूनच पेव फुटले. वीर सावरकरांचे 'हिंदू राष्ट्र' या भाषणानंतर गांधीजींसारख्या, सर्वधर्मसमभाव निर्माण करू पाहण्याच्या मवाळमतवादी काँग्रेस व्यक्ती अधिकच धर्मसंकटात सापडल्या. त्यानंतर राष्ट्रभावनेच्या प्रक्रीयेवर ही अनिष्ट परिणाम होऊ लागले.

गोखलेचे मातृभूमी विषयीचे प्रेम नितांत होते. परंतू ब्रिटीशांवरील त्यांची वादातीत श्रद्धा अनेकांना रुचली नाही. टिळकांनी त्यांना भारतरत्न आणि महाराष्ट्रभूषण असे योग्यच संबोधले आहे. टिळकांना महाराष्ट्राचा अनभिषिक्त सम्राट व होमरुलच्या काळामध्ये भारताचा अनभिषिक्त सम्राट असे संबोधण्यात आले. त्यांना भारतीय असंतोषाचे जनक म्हणून ओळखले जाते.

वीर सावरकरांच्या 'हिंदु राष्ट्र' या संकल्पनेने सर्वधर्म समभाव जागृत करु पाहणाऱ्या गांधीजी व अन्य मवाळवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचे स्वप्न भंग पावले. १९४७ ला भारत स्वतंत्र झाला व भारत व पाकिस्तान हे दोन स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आले.

१४.६ प्रश्न

१) गोपाळ कृष्ण गोखलेंचे भारतातील ब्रिटीश राजवटीसंबंधित विचार मांडा व त्यांच्ये कार्य विशद करा.

२) जहालमतवादी लोकमान्य टिळकांचे कार्य स्पष्ट करा.

३) वि.दा. सावरकरांच्या महाराष्ट्रातील क्रांतीकारी कारवाया विशद करा.

❖❖❖❖

१५

महाराष्ट्रातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगती-(अ)

घटक रचना :

१५.० उद्दिष्ट्ये
१५.१ प्रस्तावना
१५.२ आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षणातील नवप्रवाह
१५.३ मराठी साहित्यामधील प्रवाह
१५.४ ऐतिहासिक संशोधन
१५.५ समारोप
१५.६ प्रश्न

१५.० उद्दिष्ट्ये

१) आधुनिक महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती अभ्यासणे.
२) आधुनिक महाराष्ट्रातील मराठी साहित्यातील प्रकार समजून घेणे.
३) ऐतिहासिक संशोधन व त्यातील महाराष्ट्राचे योगदान समजून घेणे.

१५.१ प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षण, साहित्य, ऐतिहासिक संशोधन आणि ललित अशा विविध पैलूंच्या माध्यमातून आपण सांस्कृतिक नवीन प्रवाहांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. पाठाचे निवेदन तत्त्वज्ञानी कल्पना आणि धार्मिक प्रतिक्रियांवर आधारित आहे. सांस्कृतिक जीवनशैलीच्या सुधारणेसाठी धार्मिक व तात्विक विकासाने महत्वपूर्ण बैठक तयार केली होती. त्या अनुषंगाने बौद्धिक, साहित्यिक, संशोधनपर प्रवाहांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

पेशवा आणि मराठा राज्यकर्त्यांच्या पराजयानंतर महाराष्ट्राला आधुनिक काळाच्या उदया पर्यंत अत्यंत बिकट परिस्थितीला सामोरे जावे लागले. महाराष्ट्र आता तात्काळ बदलांच्या उंबरठ्यावर उभा होता आणि हा बदल राष्ट्राची उन्नती करणारा अथवा राष्ट्राच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरणारा असेल याचे भाकित कुणीही त्यावेळी करु शकले नाही.

समाजसुधारणेच्या दृष्टीकोनातुन तीन अंगानी विचार करण्यात यावा.

१) कवी आणि तत्त्वज्ञ देशासंबंधीची माहीती स्वतःच्या एखाद्या उत्फूर्त निर्मितीमधून व्यक्त करतात.

२) कायदा आणि धोरण या व्यवस्था, व्यापार व उद्योग, कला व विज्ञान यांचे उपयोग व फायदे कायमस्वरुपी व दीर्घकालीन असतात. त्यांच्या ठराविक स्थानांना प्रोत्साहन देणारे शिक्षण आणि शिस्त यांमुळे व्यक्ति शिक्षित होऊ शकतो, प्रगती करु शकतो.

'ईस्ट इंडीया कंपनी' यांच्या वाढत्या दबावामुळे जाचक नियमांमुळे मराठी राजकिय आणि लष्करी सत्तेला ग्रहण लागले. महाराष्ट्राची सत्ता ब्रिटीश ईस्ट इंडीया कंपनीच्या ताब्यात गेली. तरीही अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची संस्कृती कशीबशी टिकून राहीली.

दुसऱ्या बाजूने पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की संस्कृतीतील काही प्रथा धुसर होऊन पाश्चिमात्यांचा त्यावर प्रभाव पडू लागला. आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षण, साहित्य, ऐतिहासिक संशोधन आणि अभिजात कला यांमधुन बदलत्या युगाचे आपण ओझरते दर्शन घेऊ शकतो.

१५.२ आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षणातील नवप्रवाह

इंग्रजांनी ज्यावेळी त्यांचे शासन महाराष्ट्रात चालू केले त्यावेळी महाराष्ट्र अशिक्षित किंवा अडाणी नव्हता. त्यावेळी जागोजागी पाठशाळांतुन शिक्षण देण्याची प्रथा होती. माऊंट स्टुअर्ट म्हणतात, ब्रिटीश राज्य सोडून जाण्यापूर्वी येथे अनेक शहरांत आणि गावांत अनेक शाळा होत्या यात शंकाच नाही कि ब्राह्मण, बनीया आणि शेतकरी वर्गाला दैनंदिन हिशोब ठेवण्यापुरतेच शिक्षण येत होते. मराठा आणि त्यांच्या राज्यकर्त्यांच्या मनात शिक्षणाच्या उपयोगांचा विचार सर्वात जास्त होता. त्यांच्या पारंपारिक व्यवसायांप्रमाणे वाचन, लिखाण आणि दैनंदिन अंकगणित यामुळे बहुसंख्य लोकांच्या गरजा कमी असत. धर्मक्षेत्रातील उच्चशिक्षण तसेच वैद्यकीय शिक्षण, खगोलशास्त्र व फलज्योतिष यांत ठराविक वर्गाचे प्रभुत्व असे. पेशव्यांच्या या अनिर्बंध अध्यात्मिक शिक्षणाच्या अवलंबित्वामुळे सुस्त विद्वानांचा एक वर्ग तयार झाला. ब्राह्मण समाजात जन्मलेल्या व्यक्तिसाठी वार्षिक मेजवानी आणि भेटवस्तू देण्याच्या पद्धतीमुळे पेशवे सरकारची अप्रतिष्ठा झाली. इ.स. १८२१ मध्ये पुण्यात सुरु झालेल्या संस्कृत पाठशाळांनी फार थोड्या प्रमाणात विद्यार्थी आकर्षित केले हे लक्षात येते. त्यासाठी इंग्रजी वर्ग जोडले पाहिजेत म्हणजे विद्यार्थी संख्येत वाढ होईल असा प्रस्ताव समोर आला. जास्तीतजास्त ब्राह्मण पारंपारीक वर्गात पाश्चात्य शिक्षण लोकप्रिय झाले. इंग्रजी भाषा शिक्षणाकडे नवा कल वाढु लागला तसेच मराठी आणि संस्कृतच्या मदतीने पाश्चात्य विज्ञान शिक्षण दिले जाऊ लागले.

१५.२.१ इंग्रज राज्यकर्त्यांची धोरणे

ईस्ट इंडिया कंपनीच्या अनेक गव्हर्नर पैकी माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन हा लोकांच्या शैक्षणिक गरजांकडे लक्ष देणाऱ्यांपैकी एक होता. तो श्रेष्ठत्त्वाच्या कल्पनेने ग्रासलेला नव्हता. स्थानिक पातळीवर त्याला शिक्षणासाठी शाळांची निर्मिती करावयाची होती आणि धर्माची उपयोगी तत्वेच फक्त समाविष्ट करावयाची होती. कंपनीच्या संचालकांचे मत होते की शिक्षण महत्त्वाचे आहे आणि हिंदु आणि मुस्लिम माध्यमांतून ते दिले जाईल. महाराष्ट्रात व्यवस्थापनेच्या अगोदरची अडचण म्हणजे शिक्षणासाठी आवश्यक असणारी अर्थव्यवस्था आणि कुशल कामगार.

इ.स. १८३३ रोजी ईस्ट इंडीया कंपनीचे पुनर्वसन झाले. महाराष्ट्रीयन लोकांच्या पारतंत्र्याच्या १५ वर्षानंतर या चार्टर मध्ये सुधारणा करण्यात आली. या चार्टर ॲक्ट मध्ये भारतातील व्यवस्थापन पद्धतीतील सुधारणेचे धोरण नमूद करण्यात आले.

सरकारी नोकरदार वर्गाला, त्यांच्या आकांक्षांना यामुळे प्रेरणा मिळाली.

हे आता स्पष्ट झाले की प्रशासनाचे काम इंग्रजी भाषेत चालवावे लागणार होते. भारताच्या पारंपारिक भाषेतील शिक्षण जबाबदारीच्या कामांसाठी योग्य व्यक्तिची तयारी करून घेऊ शकत नव्हते. अशी समजूतच केवळ उच्च शिक्षण प्रामुख्याने इंग्रजी भाषेतच दिले जावे हे सिद्ध करण्यास पुरेशी होती. ७ मार्च १८३५ रोजी गव्हर्नर जनरल ने एक करार मांडला. करारामध्ये असे नमूद केले होते, ''युरोपियन संस्कृति आणि साहित्याचा प्रसार करणे हा ब्रिटीश सरकारचा मुख्य उद्देश होता. तसेच गोळा झालेला निधी फक्त इंग्रजी शिक्षणासाठी उपयोगात यावा.'' परंतु 'फक्त' हा शब्द अनेकांना रुचला नाही आणि त्या बरोबरीच्या कायद्यात अशी विदेशी देशी विविध भाषा आणि पौर्वात्य सांस्कृतिक भाषांना प्रोत्साहन देण्यात आले.

इ.स. १८५३ च्या चार्टर ॲक्टने एक पाऊल पुढे जाऊन ब्रिटिशांपुरतीच मर्यादित असलेल्या इंडियन सिव्हिल सर्विस आता सगळ्यांसाठी खुल्या केल्या आणि त्यासाठी स्पर्धा सर्वांना खुली केली. सर चार्ल्स वुडने इ.स. १८५४ मध्ये शैक्षणिक फतवा पाठविल्याने सुशिक्षितांच्या अपेक्षा आकांक्षा अजून उंचावल्या. देशी भाषांच्या शास्त्रांच्या शिक्षणव्यवस्थेचा पाया या फतव्याने घातला. गावांमध्ये देशी शाळांची स्थापना झपाट्याने होत गेली आणि मुंबई विद्यापीठ, इ.स.१८५७ ची स्थापना शैक्षणिक दृष्ट्या फार प्रेरणादायी ठरली. व्ही. ए. स्मिथच्या नुसार ''कानपुर हत्याकांड आणि दिल्ली हस्तगत झाली. त्याच वर्षी तीन विद्यापीठांची स्थापना झाली. घटनांना नवभारत निर्मितीचे प्रतिक मानण्यात आले.''

१५.२.२ ब्रिटीश सम्राज्ञी अंतर्गत भारत :

इ.स.१८५७ चे शिपायांचे बंड हा एक भारतातील संरंजामशाही पुन्हा नव्याने स्थापन करण्याच्या दृष्टीने अधोगामी पाऊल होते, असे महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपुर्ण देशातील उच्चभ्रु सुशिक्षितांना वाटत होते. इ.स.१८५७ च्या उठावापर्यंत भारतात पाश्चात्य शिक्षणाचा बराच प्रसार झाला होता. शिक्षणाचा पाया विस्तृत करण्याकडील नवा कल इ.स.१८५० मध्ये स्पष्ट दिसून आला. स्त्री शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त होऊ लागले. ज्योतिराव फुलेंनी मुलींसाठी आणि अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी शाळा उघडल्या. शैक्षणिक कार्यात भविष्यात हे अत्यंत परिणामी ठरले.

शिक्षकांच्या कार्यशाळा व ग्रॅन्ट इन एड संहितेची मदत खाजगी शाळांना देण्यात आली. वैयक्तिक प्रेरणा या महाविद्यालयाकडून मिळाल्या.

मुंबई सरकारने माहिती संपादन खाते आणि संचालकांची नेमणूक केली. नियतकालिक पहाणीसाठी आणि योग्य शाळा आणि महाविद्यालयाच्या निवडणुकीसाठी मार्गदर्शन म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. ब्रिटीश राजवटीतून भारत सरकारची बदली होऊन सुद्धा शैक्षणिक जगतात एक नवी चेतना जागृत होती.

बदली नंतर देखील शिक्षण संस्थेत कोणत्याही प्रकारचे फेरबदल करण्यात आले नाहीत. मुंबई विद्यापीठाकडून मिळणारी पदवी तरुण पदवीधरांमध्ये आशा आणि अपेक्षां निर्माण करत असे. आई. सी.एस्. च्या नवीन परिक्षा आता भारतीयांसाठी सुद्धा स्पर्धा परिक्षांच्या रुपात खुल्या करण्यात आल्या. श्री एस. बी. ठाकुर हे महाराष्ट्रापासून इंग्लंडपर्यंतचा सागरीप्रवास पार पाडणारे पहिले विद्यार्थी ठरले. इ.स. १८६८ मध्ये ज्या वेळी बऱ्याच खाजगी शाळा खुल्या झाल्या केवळ मुंबई आणि पुण्यातच नव्हे तर अनेक जिल्हे आणि शहरांतून अशा शाळा नावारुपाला आल्या. सरकार खाजगी शाळांशी स्पर्धा करत नसे. सरकारी शाळे प्रमाणे खाजगी शाळांना सुद्धा समान वागणूक दिली जाई.

१५.२.३ राष्ट्रीय शाळा :

इ.स.१८८२-८३ च्या हंटर कमिशन ने असे सुचविले की, स्थानिक केंद्रांनी आपल्या अधिकारातील शाळांच्या बांधणीची जबाबदारी घ्यावी. शाळा आणि महाविद्यालयांमधून देशभक्तीच्या भावनांची निर्मिती व्हावी. इ.स.१८८० मध्ये न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली. विष्णुशास्त्री चिपळुणकर, गोपाळ गणेश आगरकर आणि बाळ गंगाधर टिळक असे काही हाडाचे शिक्षक या शाळांतून शिकवत असत. इ.स.१८८४ मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. त्यानंतरच फर्ग्युसन कॉलेज अस्तित्वात आले. अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे आणि आर्यन एज्युकेशन सोसायटी, बॉम्बे यांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीला सुरुवात केली. आकर्षक सरकारी नोकऱ्या मिळविण्यापेक्षा खाजगी शाळा आणि महाविद्यालय उभारण्याचे नवे पर्व सुरु झाले. या संस्थांनी तरुण पदवीधरांना राष्ट्राला सर्वांगाने उंचावण्यासाठी प्रोत्साहित केले.

१५.२.४ वकीली व्यवसायाकडे कल :

राणी सरकार कडे भारत सरकारचे व्यवस्थापन आल्या नंतर शिक्षणाचे दोन प्रवाह प्रगतीच्या दिशेने वेगाने वाहू लागले ते म्हणजे शास्त्रीय आणि सामान्य शिक्षण पद्धती सामान्य पद्धतीच्या शिक्षणात वैद्यकिय शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण प्रसिद्ध होऊ लागले. भव्य वैद्यकिय महाविद्यालयांच्या स्थापनेने मुंबईत हिंदू नसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये देखील आवड निर्माण केली. हळूहळू ब्राह्मण विद्यार्थी आपल्या भावनीक तत्त्वांवर अडून राहू लागले. जसे मृत प्राण्यांच्या स्पर्शाने आपण अशुद्ध होऊ, अपवित्र होऊ या भावनेने त्यांनी शिक्षण घेणे टाळले.

कायद्याच्या अभ्यासासाठीची जी खरी आवड निर्माण झाली ती म्हणजे 'इंडीयन हायकोर्ट ॲक्ट' इ.स.१८६१ च्या अंमलानंतरच व क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या प्रथम प्रकाशनानंतर १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला जे भारताचे राजकिय नेते होते, त्यांचा व्यवसायी पेशा कायदा असे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. इ.स. १८६६ रोजी एम. जी. रानडे हे मुंबईतुन प्रथम एल.एल.बी. ची परिक्षा उत्तीर्ण झाले. हे ताजे उदाहरण होते. वकिलीच्या सरावासाठी तरुण पिढी मध्ये महत्वाकांक्षा निर्माण करण्यासाठी त्यांचा वकिली पेशा उपयोगी ठरला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतरच्या सुधारणेने कायदा अभ्यासाला प्रोत्साहन दिले.

१५.२.५ भारतीय विद्यापीठ कायदा, १९०४ :

तीन महत्त्वाच्या विद्यापिठांची स्थापना ज्या वर्षी झाली त्याच वर्षी बंड उसळले. या बंडाचे वर्णन इतिहासकार असे करतात कि राज्यकर्त्यांनी त्यांच्या विरुद्ध बंड करणाऱ्यांच्या विरोधात

कोणत्याही प्रकारचा द्वेष न दाखवून एक प्रकारे शौर्याचे कृत्य केले आहे. परंतु खरी परिस्थिती अशी होती की या उच्च शिक्षणाची केंद्रे असलेल्या मुंबई, कलकत्ता आणि मद्रास या ठिकाणी उत्तर भारतातील गंगेच्या प्रदेशात जी खळबळ माजली त्याचा काहीही परिणाम झाला नव्हता. या उलट येथील सुशिक्षित व्यक्तिना हे बंड म्हणजे केवळ एक विनाकारण प्रतिकार असल्याचे वाटत होते.

एक स्पष्टीकरणाजोगी बाजू म्हणजे समारंभपूर्वक असे ठासून सांगणे कि इस्ट आणि वेस्ट यांमधील दुवा विद्यापिठ यांत आणखी सुधारणा घडून यावी. या विद्यापिठांची रचना लंडन विद्यापिठांप्रमाणेच पण त्या केवळ परिक्षक बनुन राहिल्या होत्या. या विद्यापिठांचा मुख्यकार्यभाग होता शिक्षण आणि संशोधन. ही कमतरता विद्यापिठ पदवीधरांच्या उच्च इच्छा आणि अपेक्षांना रेंगाळत ठेवणारी होती. परंतु ब्रिटीश सरकार मात्र येथील पदवीधर विविध पदावर काम करण्यास योग्य असून देखील त्यांना वरील हुद्यावर रुजु होऊन देऊ इच्छित नसत.

एकसंध शिक्षण पद्धतीत वैज्ञानिक शिक्षणा ऐवजी वाङ्मयीन शिक्षणाला महत्त्व दिल्यामुळे तरुण वर्गात निराशा निर्माण झाली. विद्यापिठाच्या स्वतंत्र कारभारावरील मर्यादेच्या इ.स. १९०४ च्या 'युनिवर्सिटी ॲक्ट' ने या तरुण वर्गाच्या नाराजीत भर घातली. विद्यापिठांचा उपयोग जास्तीत जास्त संशोधन आणि शिक्षण केंद्रात व्हावा या मागाची लॉर्ड कर्झनची कळकळ आक्षेप घेण्याजोगी नव्हती.

कर्झनच्या अरेरावी धोरणाला विरोधकरण्याच्या आरोपी हेतूने त्याने भारतीय शिक्षित वर्गाचा केलेला अनादर हा मात्र आक्षेपार्ह आहे. हा भारतीयांच्या भावनांचा मोठा तिरस्कार ज्यामुळे त्याला हिंदू वकिल आणि बौद्धिक वर्गाच्या प्रभावाला धोका पोहचवण्यासाठी बंगालची फाळणी करण्यास भाग पाडले.

सरकार लोकांना अत्यानंदाच्या भ्रमाखाली ठेऊ इच्छित आहे. हे ब्रिटीश सरकारच्या शिक्षण पद्धतीवर केलेले वाईट भाष्य अशिक्षितपणा दूर करण्याच्या तसेच औद्योगिक प्रगतीसाठी तरुण पिढीला सर्वोत्तम शिक्षण देण्याच्या जिकीरीच्या कामासाठी लागू होत नसे. अर्थात यामुळे विदेशी सरकार देखील असे उपक्रम स्विकारण्यास तयार होत नसत. पहिल्या महायुद्धाने महाराष्ट्रातील लोकांचा रोख बदलला. वैचारिक देवाण घेवाणही, सामाजिक संपर्काच्या प्रभावी साधनामुळे वाढू लागली आणि तरुण वर्ग राजकारणाकडे आकर्षित झाला.

आपली प्रगती तपासा :-

१) महाराष्ट्रातील शिक्षणातील प्रवाहांचे वर्णन करा.

_____

_____

_____

_____

_____

१५.३ मराठी साहित्यातील प्रवाह

वृत्तपत्रांचे महत्त्व चर्चीतांना पत्रकारांचे लक्ष वेधून घेणारे असे अनेक विषय आपण पाहिले, लक्षात घेतले. ख्रिस्ति धर्मप्रसारकांनी आपल्या धर्माच्या प्रसारासाठी धार्मिक पुस्तकांचा प्रसिद्धिचा मार्ग अवलंबला. जसे त्यांनी शब्दकोशाचे जतन केले, भाषांतरे लिहिली आणि व्याकरण पुस्तिका तयार केल्या तसेच त्यांनी मराठी साहित्याच्या विस्ताराला सुद्धा मदत केली. पी.जी. सहस्त्रबुद्धेंनी ख्रिस्ती धर्मप्रचारकांचे मराठी साहित्याच्या विस्तारा पर्यंतचे कर्तव्य जाणून घेताना असे दिसून आले की ख्रिस्तिधर्मावर ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी ६९ पुस्तके लिहिली. त्यातील १५ ते २० पुस्तके हिंदू धर्माच्या टिकेवरील होती. जवळपास पंधरा माहितीपर पुस्तिका आणी वीस धर्मातील विषयांवर मराठीत पुस्तके लिहिली आणि तीही अत्यंत कमीवेळात. यावरुन स्पष्ट होते की, ख्रिस्ती हे आधुनिक मराठी साहित्याचे पहिले मार्दगदर्शक ठरले.

ब्रिटीश राज्याच्या सुरुवातीच्या काळात एम.के.चित्रे, एच.के.पाठारे, बी.जी.जांभेकर, आणि जी.एन्. माडगांवकर सारख्या अनेक लेखकांनी काही सामान्य विषयांवर लेखन केले. माहिती पुरविणे हा त्यामागील दृष्टीकोन होता. काही मराठी वाचकांसोबत इंग्रजी साहित्यातून मिळवलेल्या कल्पनांची देवाण-घेवाण या आशेने, जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहीतवादी, आर.जी.भंडारकर आणि इतर काही लेखकांनी गंभीर विषयांवर अग्रलेख लिहिले. या वर्तमान पत्राला शोभेशी लिखाण शैली, (काव्य) कविता, नाटक, कथा आणि लघुकथा अशा पारंपारिक लिखाण शैलीवर फारसा परिणाम झाला नाही. ही शैली जशीच्या तशी राहीली.

महात्मा जोतिराव फुले यांनी अनेक ग्रंथ लिहिले व समाजसुधारणेचा पाया रोवला. त्यांनी 'ब्राह्मणांचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसुड' हे ग्रंथ लिहिले. या ग्रंथाद्वारे समाजातील शोषीत वर्गाचे प्रश्न मांडले व ब्राह्मणवादाच्या विरोधात आपल्या साहित्यातून आवाज उठविला. त्यांनी लिहिलेले 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ जागतिक मानवतावादावर आधारित आहे. ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली 'स्त्रीपुरुष तुलना' हे पुस्तक प्रसिद्ध केले व स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. त्यांनी त्यांच्या या ग्रंथात स्त्री जातीचे दु:ख त्याच्यावर होणारा अन्याय दूर व्हावा व त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळावे अशी मांडणी केली आहे. स्त्री-पुरुष समानता व त्यांचे समाजातील स्थान याविषयी त्यांनी लिहिले आहे.

१५.३.१ पद्य लेखनातील नवप्रवाह

परिक्षणाखाली असलेल्या काळात सुद्धा कविची काही कमतरता नव्हती. या कवींची एक जबरदस्त यादी तयार होईल परंतु त्यातील एखाद्याची आपण निवड करु शकतो. जसे भक्तिमय काव्य लिहिणारे भास्कर दामोदर पालांडे, परशुराम बल्लाळ गोडबोले ज्यांनी महाकाव्यातील विषयांवर लिहिले, तसेच शिवराम कृष्णा निजसूरे ज्यांनी कथनात्मक पद्य लिहिल्या आणि काही कवींनी संस्कृत आणि प्राकृत साहित्याचे अनुकरण केले. भावनांच्या स्वाभाविक उद्रेकापासून ते पूर्णपणे विरहीत होत असत. त्यांचे भावनिक आकर्षण कमी होते. कवी आपल्या काव्यातून कधी नितितत्व कथन करीत तर कधी विषयांचे पुसटसे वर्णन करीत असत. त्यांची भाषा बोजड असे. तसेच ते विविध नियम व ताल यांच्या बंधनात असत. त्यापैकी कुणीही सामाजिक आशयाचा विषय निवडला नाही की कुणी भावनात्मक गीते लिहिली नाहीत.

केवळ कवी 'केशवसुत' हे पाश्चात्य कल्पनांनी प्रेरीत झालेले कवी होय. त्यांनी मराठी काव्यात पूर्ण क्रांति घडवून आणली आणि ते 'आधुनिक मराठी काव्याचे जनक' मानले जाऊ लागले. आविर्भावावर त्यांचे पूर्ण लक्ष केंद्रित होते. या मराठी काव्याच्या मार्गदर्शकाने तुतारी, स्फूर्ति, गोफण, नवा शिपाई अशी स्फोटक पद्ये लिहिली. काव्यरचनेवरील मर्यादा त्यांनी स्पष्ट केल्या. या पारंपारिक काव्यलेखनाला फाटा देण्याचा पद्याचा अनेक कवींवर परिणाम झाला. या जाणीवेचे काही प्रसिद्ध कवी म्हणजे टिळक, विनायक, गोविंदाग्रज, बी.आर. तांबे, कवी बी, बालकवी ठोंबरे आणि वीर सावरकर. इ.स.१९२० पर्यंत ही केशवसुतांची शाळा संपुष्टात आली आणि रवाकिरण मंडळींचा नवा कालखंड सुरु झाला. या शाळेचे प्रसिद्ध कवी माधव जुलिअन, यशवंत आणि गिरीश यांनी सामाजिक अडी-अडचणींऐवजी वैयक्तिक जीवनाकडे अधिक लक्ष केंद्रीत केले.

१५.३.२ कादंबरी वाङ्मयातील प्रवाह :

शतकाच्या पूर्वार्धात कल्पिक कथा संस्कृत आणि नेहमीपेक्षा निराळ्या मार्गावरुन चालत होत्या. इ.स.१८५७ मध्ये प्राकृत लेखकाच्या बाबा पद्मजीनी 'यमुना पर्यटन' हि विधवांच्या दुख:कारक जीवनाचे वर्णन करणारी पहिली सामाजिक कादंबरी लिहिली. हे वर्णन म्हणजे या रचनेची एक जमेची बाजू होती. नाहीतर तिच्यामध्ये वाङ्मयीन सौंदर्य शास्त्राचा अभाव होता. सामाजिक कादंबरीची खरी सुरुवात झाली ती हरी नारायण आपटे यांच्या मुळेच. 'पण लक्षात कोण घेतो' आणि 'मी' या कादंबऱ्या मराठी साहित्यात अजरामर ठरल्या. पहिल्या कादंबरीत त्यांनी विधवा स्त्रियांच्या शोक कळा प्रतिबिंबित केल्या तर 'मी' या कादंबरीत त्यांनी उच्च ध्येयवाद आणि त्यांच्या जीवनातील संपूर्ण सत्यघटनांचे वास्तव चित्रण मांडले. मध्यमवर्गियांच्या समाज जीवनाला त्यांनी आपले लिखाण अर्पण केले. ह.ना. आपटे यांच्या या लिखाणाने सामान्य पुरुषांच्या आंतरीक जीवनाला आविर्भाव प्राप्त झाला. वामन मल्हार जोशी हे पुढचे महत्त्वाचे लेखक. भौतिकवाद,संन्यासवाद, अध्यात्मिकवाद आणि सर्वशक्तीमान परमेश्वर अशा गंभीर विषयांवरील प्रत्येकी पाच कादंबऱ्या लिहील्या. इ.स.१९३० च्या दशकातील त्यांच्या बरोबरीचे लेखक म्हणजे फडके व खांडेकरांप्रमाणे जोशींची लिखाण शैली तितकी सुंदर नसे परंतु तरीही त्यांच्या कांदबऱ्या सुप्रसिद्ध होत्या कारण त्या लोकहिताच्या विषयांवर आधारित होत्या.

१५.३.३ नाट्य आणि नाटककार :

'नाटक' म्हणजे आजप्रमाणेच १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातील साहित्याचा लोकप्रिय भाग. इतिहासकार राजवाडे यांनी इ.स.१६०४ मध्ये 'लक्ष्मीनारायण कल्याण' हे नाटक शोधून काढले. सांगलीच्या संस्थानचे प्रमुख या राज्यांचे मुख्य नाटकांच्या सादरीकरणाचे आश्रयदाते ठरले. त्यांच्या कृपाछत्राखाली असलेले विष्णुपती भावे यांनी इ.स.१८४३ साली मराठी नाटक 'सिता स्वयंवरा' ची रचना केली. त्यानंतर सहावर्षांनी अनेक काल्पनिक नाटके लिहीली गेली आणि त्यांचे सादरीकरणे ही होऊ लागले. इ.स.१८५७ रोजी आधुनिक परंपरांचे दर्शन घडवणारे मराठी नाटक प्रथमच लिहीण्यात आले. तोवर जास्तीत जास्त संस्कृत नाटकांचे अनुकरण केले जात असे. मोठ्या प्रमाणावरील नाटकांच्या निर्मितीला व सादरीकरणाला इतर कोणतेही त्या साहित्यप्रकारापेक्षा अधिक प्रोत्साहन असे. केवळ असे काही लहान-मोठी नाटकच प्रभावी नसत तर अनेक विषय आणि वर्गांचे विभाग आकर्षण आणि मन मोहून टाकणारे असतं.

इ.स.१८५७ ते १८६० या काळांत संस्कृत भाषांतून मराठी भाषांवरील केली गेली. तसेच इ.स.१८६१ ते १८७९ इंग्रजी किंवा संस्कृतातून वीस नाटके भाषांतरीत झाली. ती

पौराणिक तसेच कल्पनिक ते वर आधारीत नाटके होती. इ.स.१८७१ ते १८८० या दहा वर्षांच्या काळांत ३८ नाटके लिहिली गेली. त्या पुढील दहा वर्षे नाटक निर्मितीमध्ये गेली. त्यावेळी दोनशेहून अधिक नाटके लिहीली गेली. गद्यरुप, प्रहसन संगितमय आणि ठराविक विषयांवरील नाटके असे या नाटकांचे प्रमुख वर्ग असत.

इ.स.१८८० पासून लोकप्रिय नाटकांचे दर्जेदार सादरीकरण होऊ लागले. ते किर्लोस्करांनी स्थापन केलेल्या कीर्लोस्कर नाटक कंपनी च्या मदतीने इ.स.१८८० ते १९२० या संपूर्ण मराठी रंगभूमीच्या इतिहास काळात एवढी नाटके प्रदर्शित झाली नसतील, तेवढी इ.स.१८८० ते इ.स.१८९० या दहा वर्षाच्या काळात बरीच नाटके रंगभूमीवर सादर करण्यात आली. किर्तने एस.एम. रानडे, एन.के.कानीटकर, प्रा. वासुदेव केळकर, के.पी. खाडीलकर, व्ही.आर.शिवाळकर, व्ही.एस.खरे, न.चि. केळकर यांनी गद्यरुपी नाटकांतून प्रसिद्धी मिळवली. त्यांपैकी खाडीलकर आणि केळकर हे मराठी नाटकाचे दिपस्तंभ होते.

त्यानंतर त्रिलोकेकर, किर्लोस्कर, डोंगरे, देवल आणि कोल्हटकर तसेच त्यानंतरच्या काळात राम गणेश गडकरी यांच्या संगीत नाटकांनी, गद्यरूपी नाटकांची जागा घेतली. २० शतकाच्या सुरवातीच्या वीस वर्षे पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक आणि रोमांचक नाटकाच्या सादरीकरणाची साक्ष ठरली.

इ.स.१८९६ व १९१० मध्ये किर्लोस्करांनी निर्माते आणि दिग्दर्शकांमधील मानाचे स्थान मिळविले. खाडीलकरांच्या नाटकाच्या 'भाऊ बंदकी' ने राजकारणी विषयामुळे नवे युग तयार केले. 'किच्चक वध' या त्यांच्या पौराणिक कथेच्या नाट्याने लॉर्ड कर्झनच्या दडपशाहीवर थेट आणि निष्ठुर आघात केले. सुप्रसिद्ध नाटककार गडकरी यांनी आपल्या लेखणीतून विनोदी तसे अनुकंपाच्या सहाय्याने प्रेक्षकांमध्ये भुमिकेबद्दल एकाच वेळी प्रेम आणि द्वेष निर्माण केले. सामाजिक विषयाला पुरक असे 'एकच प्याला' हे त्यांचे प्रसिद्ध नाटक.

१५.३.४ इतर साहित्य प्रकार - निबंधलेखन :

साहित्याचा सर्वांत लोकप्रिय वर्ग हा १९ व्या शतकातील इंग्रजी साहित्याच्या प्रभावाने निबंध लेखन हा झाला. विषयांच्या विविध स्वरुपाची मुद्देसूद आणि तर्कशुद्ध मांडणी निबंध लेखनात असे. अशा चर्चांतून उघडकीस आलेल्या सत्यांवरुन लेखक एक ठराविक उद्दिष्टांवर मतप्रदर्शन करीत. आपला दृष्टीकोन व्यक्त करण्यासाठी या प्रकाराची निवड होत असे. अपूर्व घटनांचे अथवा काही घटनांनाचे मुलभुत तत्त्व आणि सिद्धांत व्यक्त करण्यास या निबंध लेखनाचा उपयोग होत असे. १६ व्या शतकात फ्रांसमधील 'मायकल मॉन्टेन' ने हा निबंध प्रकार रुढ केला आणि संपूर्ण युरोपात लोकप्रिय झाला. बाळ शास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देखमुख, आणि भाऊ महाजन अशा एल्फीन्स्टन कॉलेजच्या पदवीधरांनी या प्रकाराला महाराष्ट्रात आणले. विष्णु शास्त्री चिपळुणकरांच्या 'निबंधमाला' मालिकेत या प्रकाराचा उपयोग त्यांनी प्रभावीपणे केला. 'केसरी' मधील टिळकांचा अग्रलेख आणि आगरकरांच्या 'सुधारक' मधील लेखनी हे त्यांच्या दृष्टीकोनाच्या वेगवान सादरीकरणाचे सर्वोत्तम नमुने. एन. सी. केळकर त्यांच्या अनुकरणीय पद्धतीने समस्यांच्या दोंन्ही बाजू सादर करतात आणि वाचकांसाठी तात्पर्य मागे ठेवतात. निबंधलेखन हे वाचकांच्या अनुमानाकरीता अत्यंत योग्य आहे. निबंध लेखन गंभीर विषयांच्या चर्चेला अनुरूप आहे. लेखक वर्गाची खरी परीक्षा या साहित्य प्रकारावर अवलंबून आहे. या निबंध प्रकाराच्या परिणामकारक अंगीकरणाने लोकमान्य टिळकांनी त्यांच्या

समयवस्करांना देखिल मागे टाकले. अनेक निबंधकारांवरील त्यांचा प्रभाव नाकारता येत नाही. मेकॉलचा त्यांच्यावरील प्रभावही नाकारता येत नाही. असे फारच कमी लेख आढळून आले की, ज्यांच्या हातून निबंधलेखन झाले नाही. अशी निबंध लेखनाची एकूण प्रसिद्धी होती. वि.का. राजवाडे, चि.वि. वैद्य, वि. वि. मिराशी, डॉ. एस. व्ही. केतकर आणि एस. एम. परांजपे असे त्यांच्या क्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या लेखकांनी त्यांच्या गंभीर लेखनासाठी निबंध पद्धतीचा चांगलाच वापर केला. विठ्ठल रामजी शिंदे, वि.दा. सावरकर एम. एस्. साठे आणि इतर ही निबंधकारकांची तिसरी पीढी. सावरकरांच्या लेखन पद्धती, भाषाशैली, आणि कठोर वादविवाद यांनी अनेकांना मागे टाकले.

१५.३.५ लघु निबंध आणि लघुकथा :

गंभीर समस्यावरील चर्चा करण्यास ज्यांनी नापसंती दर्शवली आणि थोड्या गंभीर प्रकारांचा अवलंब करीत बौद्धिक कसरती ज्यांनी सादर केल्या ते कोणत्याही गंभीर उपदेश किंवा सिद्धांतांच्या पलिकडे नसत. वाचकांसोबत मैत्रीच्या नात्याने जीवनातील अनुभव ते व्यक्त करु इच्छित असत. अशा कल्पनेने लघुकथा लिहिल्या जात. काही प्रमुख तात्पर्याचा उल्लेख त्यांत नसे. अशा लघुकथा वाचकांना मार्गदर्शन करत. त्या सोबत जीवनातील अनेक घडामोडी आणि अनुभवांतून त्यांची करमणूक करीत. ना.सि. फडके, वि.स.खांडेकर यांनी अशा लघुकथांच्या पद्धती रुढ केल्या. नंतरच्या काळांत फडकेंच्या लघुकथा म्हणजे वाचकांसाठी एक वेड होते.

निबंध, आत्मचरित्र, संशोधन, अग्रलेख यांसारख्या गंभीर लेखनाच्या उदयानंतर हलके-फुलके साहित्य सुद्धा प्रसिद्ध होऊ लागले. श्री.कृ.कोल्हटकरांनी 'सुदाम्याचे पोहे' हे प्रहसन लिहिले. विनोदबुद्धिने भरलेल्या कथाकथनाचा वाचकांनी मनसोक्त उपभोग घेतला. हा प्रकार फार थोड्याच वेळांत प्रसिद्ध होऊ लागला. कोल्हटकर, गडकरी आणि बाळकराम यांच्या अनुयायींनी या प्रकारच्या कलेला सर्वोत्तम पातळीवर पोहचवले. चिं.वि. जोशी आणि नंतर एन. डी. ताम्हणकर यांनी महाराष्ट्रीयन मध्यमवर्गीयांच्या बौद्धिक जीवनात या साहित्य प्रकाराला उच्च स्थान मिळवून दिले.

काव्य, कादंबरी, निबंध, नाटक आणि इतर अनेक साहित्य प्रकारांच्या वैयक्तिक दृष्टिकोनाने मध्यम तसेच उच्च वर्गीय आणि शिक्षित जनतेच्या सुप्त कलागुणांना समोर आणले. या प्रकारांतून पाश्चात्य साहित्याचा प्रभाव होता. भारतीयांच्या पूर्वजांचे जगाच्या संस्कृतीत भरपूर योगदान होते. त्यावेळी प्रबंध आणि तत्त्वज्ञानी ग्रंथांचे लेखन भारतीयांसाठी नवीन नव्हते. इतर संस्कृतींमधून घेण्यात आलेले साहित्य मर्यादित मान्यतेत राहिले आणि लेखकांच्या अनुभवाचा कल अज्ञानापासून मुक्त वर्गाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जिवनाकडे झुकला. यावेळी सामान्य जनतेकडून ही या साहित्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही.

साहित्याचे इतर काही प्रकार जसे पर्यटन खाते, अध्यात्मिक मुद्द्यांवरील व्याख्याने अनुयायी आणि त्यांचे गुरु यांमधील संवाद किंवा साहस कथांचे कथन जितके रुढ झाले नाही तितके निबंधलेखन आणि नाटके रूढ झाली.

आपली प्रगती तपासा :-

१) महाराष्ट्रातील विविध साहित्यप्रकारावर टीप लिहा.

१५.४ ऐतिहासिक संशोधन

बाळ गंगाधर टिळकांनी दोन प्रबंध प्रसिद्ध केले आणि भारताच्या अभ्यासाचे आणि ऐतिहासिक संशोधनाच्या अभ्यासाचे नवे दालन खुले केले. 'ओरीयन' आणि 'आर्किट होम इन द वेदाज' या त्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाला नवी प्रेरणा मिळाली. बहुदा त्यांचे संशोधन भाषाशास्त्र आणि खगोलशास्त्रीय घडामोडींवर आधारीत होते. भारतीय विद्वान आणि संशोधकांना त्यांनी नवी दिशा दिली. सामान्य वाचकांसमोर प्राचीन काळातील जीवन पद्धतींवर त्यांनी लिखाण केले. त्यांचे भाषाशास्त्राच्या अभ्यासावरील विल्सन मेमोरीअल व्याख्यान त्यांच्या स्मृतीस कायमस्वरूपी आदरांजली आहे. 'अर्ली हिस्टरी ऑफ डेक्कन' हे त्यांचे नर्मदेचा दक्षिण भारत या ऐतिहासीक अभ्यासासाठी अस्सल योगदान असलेले पुस्तक. त्यांचे शैव आणि वैष्णव संप्रदायावरील पुस्तक हे त्या विषयाचे उत्तम पुस्तक मानले जाऊ लागले. त्यांचे ऐतिहासीक संशोधनातील योगदान इ.स.१९१७ साली स्थापन झालेल्या 'भांडारकर ओरिएंट्ल रिसर्च इन्स्टीट्यूट'ने मान्य केले. प्रा.आर.डी.रानडे, डॉ. गुणे, डॉ. बेलवलकर आणि प्रा. वि.का. राजवाडे हे या संस्थेचे सुप्रसिद्ध विद्वान संस्थापक होते. या संस्थेच्या स्थापनेनंतर त्यांनी 'इतिवृत्त ॲनाल्स' हे वार्षिक सुरू केले. संशोधनाचे काम सुरु रहावे हा या मागील उद्देश होता.

१५.४.१ मराठ्यांचा इतिहासात भर :

इ.स.१८२४ मध्ये पहिला पद्धतशीर मराठ्यांचा इतिहास हा तीन खंडांमधून प्रसिद्ध झाला. या इतिहासाचे लेखक होते ग्रॅन्ट ड्फ (Grant Duff) त्या नंतर ब्रिटीश लेखकांनी आपल्या शोधकार्याचे केंद्रबिंदू शिवाजी महाराजांना ठेवले. त्यांनी शिवाजी महाराजांच्या भूमिकेचे वर्णन 'लुटारू संधिसाधु' असे केले. बहुदा त्यांनी शिवाजींचे मराठा स्वराज्य हे सह्याद्रिच्या तात्कालिन स्फुर्तिने लागलेला वणवा होय. जो दरोडेखोरांच्या राज्या सारखा असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न होता असे काही प्रबंध लिहिले. मराठा इतिहासाच्या विद्वानांनी 'मराठ्यांच्या इतिहासाचा' पद्धतशीर संग्रह करण्याचे काम सुरु केले. महाराष्ट्रीयन लोकांच्या परंपरेशी लोकांमध्ये आवड निर्माण करुन देण्याचे एम.जी. रानडे यांचे प्रयत्न होते. अतिशय विस्कळीत अवस्थेत असलेल्या रायगडावरील शिवाजींच्या समाधीची त्यांनी सुधारणा केली. त्यांनी सरकार पुढे आपले विचार मांडले तसेच सरदार आणि पुढारलेल्या नागरीकांची भेट घेतली परंतु त्याचा प्रतिसाद निराशजनक होता.

लोकमान्य टिळक या इतिहासाच्या तळाशी असलेल्या मराठ्यांच्या देशभक्तीला पुनरुज्जीवित करु इच्छित होते. मे इ.स.१८९५मध्ये त्यांनी नागरीकांची सभा भरविली. त्यात टिळकांनी समाधीच्या दुरुस्तीसाठी निधी उभारण्याची मागणी केली. लोकमान्य टिळकांनी

गणेशोत्सवासारखे वार्षिक उत्सव सुरु केले. काही सरकारी अधिकाऱ्यांमध्ये भय निर्माण झाले. टिळकांनी सुरु केलेल्या शिवकालीन प्रथांमुळे यामुळे मराठा इतिहासाच्या अभ्यासासाठी शैक्षणिक कष्ट उचलण्याचे सामर्थ्य रानडेंना मिळाले आणि स्वराज्य आणि शिवाजी या भोवती एकवटलेले अज्ञान दूर करण्यास मदत झाली. इ.स.१९००मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'मराठी सत्तेचा उदय' या सुप्रसिद्ध ग्रंथात त्याचे परिणाम दिसुन आले. नैतिक महत्त्व आणि राजकीय गोष्टीचा बोध यांमधून कमी करण्यात आलेले अनेक गैरसमज दूर करण्याचे उद्दीष्ट घोषित करुन स्थानिय प्रदेशाचा प्रांतिय इतिहास लिहीण्याचा मराठी माणसाचा हा पहिलाच प्रयत्न होय.

रानडे लिखित 'मराठ्यांचा इतिहास'च्या गुणवत्तेवर चर्चा होणे सहाजिकच होते. त्यामुळे इतिहासशास्त्राच्या कठोर परिक्षांना सामोरे जावे लागले नाही. पण त्याच वेळच्या पिढीमध्ये इतिहासाच्या मुळाशी असलेली देशभक्ति पुनरुज्जीवित करण्यात त्यांना यश आले. वि.का.राजवाडे आणि त्यानंतर गो.स. सरदेसाई यांच्या कार्याने मराठा इतिहासशास्त्राच्या नव्या कालखंडाचा शुभारंभ केला.

१५.४.२ राजवाडे आणि सरदेसाई यांचे ऐतिहासिक कार्य :

म.गो. रानडे यांनी त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या अठरा वर्षात ऐतिहासीक वस्तुंचा पुरेसा संग्रह केला आणि आजवर अज्ञात असलेल्या मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश पाडला. 'महाराष्ट्र धर्म' हे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यांचे अंतिम लक्ष होते. या त्यांच्या प्रबंधाला प्रचंड प्रसिद्धी मिळाली. शिवराय आणि त्यांच्या अनुयायींनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेली कार्ये यावर त्यांनी भर दिला. याने बंगाली इतिहासकार जदुनाथ सरकार आणि एस.एन. सेन यांना आपले जास्तीतजास्त लक्ष मराठ्यांच्या इतिहासाकडे केंद्रीत करण्यास प्रवृत्त केले. महाराष्ट्रात विरोधी गटातील वि.का.राजवाडे यांनी रानडेंच्या संयम आणि ब्रिटीश सरकारच्या हाताखालील सेवेवर केलेल्या टिकेने रानडेंचे कार्य सुरु ठेवल्याची प्रेरणा दिली. रँके आणि मॉम्सेन या जर्मन इतिहासकारांच्या अधिक योग्य पीढी सारखे राजवाडेंचे ऐतिहासीक लेखी पुरावे गोळा करण्यामधले आश्चर्यकारक कौशल्य आणि संशोधन साधनांचे बावीस ग्रंथांच्या संपादनाचे बुद्धिमान प्रयत्न हा मराठी विद्वानांसाठी ऐतिहासिक संशोधनाचा अमुल्य ठेवा आहे. बावीस खंडांना प्रस्तावना त्यांनी लिहील्या. त्यांची प्रस्तावना म्हणजे एक स्वतंत्र खंडच म्हणावा लागेल. तिथेच आपल्याला त्यांनी संग्रहीत केलेल्या ऐतिहासीक पुराव्यांचे निर्णायक सूक्ष्म अभ्यास दर्शन होते. तर एका बाजूस महाराष्ट्रातील संत कवींची भुमिका या संबंधी रानडेंवर केलेल्या टिकेची त्यांनी स्पष्ट कबूली दिली होती.

इ.स. १६०० ते १८४६ पर्यंत तीन ग्रंथमालिकांतून महाराष्ट्राचा इतिहास घडविणारे मोठे नावलौकिक मिळविणारे इतिहासकार गो.स. सरदेसाई यांनी शोधून काढलेल्या आणखी काही लेखी पुराव्यांच्या प्रकाशात त्यांनी आपल्या ग्रंथ मालिकांत सुधारणा केली. त्यांनी आपले ग्रंथ प्रथम मराठीत लिहीले आणि नंतर त्यांचे इंग्रजीत भाषांतर केले. वाङ्मयीन दर्जामध्ये सरदेसाईंची पद्धती अपूर्ण असू शकेल परंतु त्यांच्या सत्यस्थितीवरील प्रकाश निर्विवाद आहे. अनेक कर्ते विद्वान द.वा.पोतदार, वासुदेव शास्त्री खरे, डी.व्ही.पारसनिस, डी.व्हि. आपटे आणि इतर यांनी ऐतिहासीक संशोधन अंमलात आणले. भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे ची स्थापना आणि इ.स.१९२० मधील त्यांचे त्रैमासिकाची प्रसिद्धी यांनी महाराष्ट्राच्या इतिहासात संघटित संशोधन कार्याची सुरुवात नोंदविली.

आपली प्रगती तपासा :-

१) महाराष्ट्रातील मराठ्यांच्या इतिहासविषयक ग्रंथ कोणी लिहीले आहेत ते सांगा ?

१५.५ समारोप

एकसारख्या शिक्षण पद्धतींनी विज्ञान क्षेत्रापेक्षा अधिक भर वाङ्मयावर दिल्याने निराशा निर्माण झाली. जरी पाश्चात्य शिक्षणाचा पाया ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी घातला आणि परोपकारी ब्रिटीशांनी महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार करण्यात योगदान केले तरीही निरक्षरता निर्मूलनासारख्या गोष्टींवर ब्रिटीश ईस्ट इंडीया कं. आणि राणी सरकार यांनी लक्ष घातले नाही. धार्मिक आणि धार्मिके तर पुस्तकांच्या प्रसिद्धीचा मार्ग खुला करुन देणारे ख्रिस्ती धर्मप्रसारक मराठी साहित्याचे मार्गदर्शक ठरले. इतिहासकार राजवाडे आणि सरदेसाईंनी महाराष्ट्राचा इतिहास लिहीला आणि ऐतिहासिक संशोधनात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

१५.६ प्रश्न

१) आपल्या अध्ययन काळातील महाराष्ट्रात झालेल्या शैक्षणिक तसेच वाङ्मयीन प्रगतीचे वर्णन करा.

२) महाराष्ट्रातील ऐतिहासीक संशोधन आणि राजवाडेंचे विशेष योगदान यांचा थोडक्यात परामर्श द्या.

३) आधुनिक महाराष्ट्रातील ऐतिहासीक संशोधनाचे परिक्षण करा.

❖❖❖❖

१६

महाराष्ट्रातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगती-(ब)

घटक रचना :

१६.० उद्दिष्ट्ये
१६.१ प्रस्तावना
१६.२ कृतीशील कलांचा विकास
१६.३ वृत्तपत्रांचा विकास
१६.४ समारोप
१६.५ प्रश्न

१६.० उद्दिष्ट्ये

१) महाराष्ट्रातील कृतीशील कलांचा अभ्यास करणे.
२) महाराष्ट्रातील वृत्तपत्रांच्या विस्ताराचे मूल्यमापन करणे.

१६.१ प्रस्तावना

मराठेशाहीच्या काळातील महाराष्ट्राचे योगदान अजून निश्चित नाही. त्यानंतरच्या काळात पेशवे आणि त्यांचे व्यवस्थापक 'ललित कला' आणि 'संगीत' कलेचे आश्रयदाये म्हणून ओळखले जाऊ लागले. नारो अप्पाजी भावे व बालाजी पंत हे महाराष्ट्राचे प्रसिद्ध वाद्य वादक आहेत. त्या पुढील वर्षात राजा रवी वर्मा मूळचे केरळचे परंतु महाराष्ट्रात स्थायिक झाले. प्रसिद्ध वीणा वादक 'अल्लादिन खान'सारखे दिग्गज स्वत:ला महाराष्ट्रातील एक असल्याचे सांगतात. मराठेशाही दरम्यान मानवी कला ही तमाशा, ललित, गोंधळ आणि पोवाडे या पुरतीच सिमीत असे. लोकनृत्य आणि 'दशावतार' केवळ धार्मिक सणावाराच्या वेळीच रंगभूमीवर प्रदर्शित होत असत.

१६.२ कृतीशील कलांचा विकास

१६.२.१ नाटक :

ब्रिटीश सत्ता मुंबईत स्थिर झाल्यानंतर जे इंग्रजी नट भारत भेटीसाठी आले, त्यांच्याकडून काही नाटके सादर होत असत. एल्फीन्स्टन कॉलेजचे विद्यार्थी अशा इंग्रजी नटांना त्यांची प्रसिद्ध नाटके लोकांसमोर सादर करण्यास आमंत्रित करत. सुरुवातीला लहानशा समूहासमोर शेक्सपियर सारख्या लोकप्रिय साहित्यिकाची नाटके भाषांतरित करुन अनेकांनी ती सादर केली.

इ.स.१८८० मध्ये प्रथमच आण्णासाहेब किर्लोसकर यांनी नाट्यसंगीत सादर केले. संगीत नाटकातील गायकांची नोंद असणारी किर्लोस्कर नाटक मंडळी ही पहिली नाटक कंपनी प्रसिद्ध नट तसेच गायक, बाल गंधर्व उर्फ नारायणराव राजहंस हे या नाटक कंपनीचे संचलन करत होते. नंतर त्यांनी स्वत:ची 'गंधर्व नाटक मंडळी' सुरु केली. इ.स.१८८० मध्ये शंकरराव पाटकर व देवल यांनी नाट्य संस्था स्थापन केली आणि इ.स.१९०४ मध्ये 'महाराष्ट्र नाटक मंडळी' ची स्थापना झाली. काही नाटक कंपन्या आपले नाट्यगृहासंबंधीचे म्हणजे पडदे, दृश्य, संगीत, वाद्य यांबाबत ज्ञान संपादन करु इच्छित होते. तसेच ते आपल्या नटांना कौशल्यपूर्ण बनवू पहात.

प्रत्येक नाटककार हा त्यांच्या कुठल्या ना कुठल्या भूमिकेसाठी प्रसिद्ध होता. 'हॅमलेट'च्या भूमिकेत गणपतराव जोशी आणि 'किचक' च्या भूमिकेत गणपतराव भागवत यांनी रंगभूमी गाजवली. १९ व्या शतकाच्या अखेरीस आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीचे प्रसिद्ध नाटककार म्हणजे गणपतराव बोडस, नानासाहेब फाटक, दिनकर कामण्णा, केशवराव दाते, आणि अर्थात बाल गंधर्व. इ.स.१८८० नंतरच्या पन्नास वर्षांच्या कालावधीत अनेक नाटक कंपन्यांनी आपल्या कलेच्या अभूतपूर्व शैलीने महाराष्ट्राच्या श्रोत्यांचे भरपूर मनोरंजन केले. बाल गंधर्वांनी अनेकदा आपल्या नाटकात स्त्री पात्र साकारले. अभिनेत्रीचे पात्र ते इतके चोख उठवत की स्त्रियांमध्ये फॅशनची लाटच त्यांनी निर्माण केली.

बाल गंधर्व, केशवराव भोसले, मास्टर कृष्णराव आणि दिनानाथ मंगेशकर यांसारख्या दिग्गज गायकांनी नाट्यसंगिताची प्रथा रुढ केली. तसेच त्यांनी रंगभूमीवरील काही विशेष पद्धतींचा अवलंब केला. दृश्य, पडदे आणि नाटककारांच्या रंगभूषा, वेशभूषा, साहित्यात सुधारणा घडवून आणली. जुनी नाटके रंगभूमीवर आणण्याची प्रथा त्यांनी सुरु केली आणि एखाद्या सुखद घटनेवर अथवा एखाद्या दु:खद घटनेवर आधारलेल्या सार्वजनिक विषयांना धरून नविन नाटके त्यांनी सादर केली. इ.स.१९२० मध्ये सुद्धा मराठी रंगभूमी सर्वात विकसित रंगभूमी ठरली. आज भारतात ही ती सर्वोत्तम अशा रंगभूमीतील एक आहे.

१६.२.२ चलतचित्र (बोलपट) :

दादासाहेब फाळकेंनी भारतात चलतचित्राद्वारे चित्रपट क्षेत्राचा पाया घातला. 'राजा हरिश्चंद्र' हा मराठीतील त्यांचा पहिला 'बोलपट'. ते रातोरात जगप्रसिद्ध झाले. 'भस्मासूर मोहीनी' हा त्यांचा दुसरा चित्रपट प्रदर्शित झाला. 'वेस्टर्न फिल्म मेकर्स' कडून त्यांना अधिकृत मान्यता मिळाली. त्यावेळचे आणखी एक चित्रपट निर्माते कोल्हापुरचे भाऊराव पेंन्टर यांचा 'सैरंध्री' बोलपट इतका प्रचलित झाला कि लोकमान्य टिळकांकडून त्यांना 'सीने केसरी' असे नाव मिळाले. त्यापुढील काळात 'प्रकाश मोशन' कंपनी ने भारतात इतिहास घडवला. परंतु आज मराठी चित्रपटसृष्टीची परिस्थिती हलाखीची आहे.

१६.२.३ शास्त्रीय संगीत (गायन व वाद्य) :

रंगभूमी आणि चित्रपटांप्रमाणेच हिंदुस्तानी संगीताचा पाया ही महाराष्ट्रानेच रचला. उत्तरेकडील हिंदुस्तानी संगीताला ज्यांनी दक्षिणेत प्रसिद्ध केले असे अनेक जण आहेत. पंडीत बालकृष्णबुवा इचलकरंजीकर, पंडीत विष्णु दिगंबर पलुस्कर, पंडीत विष्णु नारायण भातखंडे, पंडीत भास्करबुवा बखले, खानसाहेब, अब्दुल करीम खान, रामकृष्णबुवा वझे आणि अल्लादीया खान. त्यांमधीलच बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांनीच मुख्यत: महाराष्ट्रात हिंदुस्तानी संगिताची

मुलभूत पायाभरणी केली. नजीकच्या काळात याच सुप्रसिद्ध गायकांच्या अनुयायांचा प्रभाव वाढला.

अब्दुल करीम खान यांना गायनाची अनेक तंत्रे अवगत होते. आपल्या सुमधुर गायनाने जगभरातील श्रोत्यांना ते मोहुन टाकत. इ.स.१९९३ साली ते महाराष्ट्रात आले. कोल्हापुरात शाहुमहाराजांच्या दरबारी ते गायक होते. अब्दुल करीम खान हे किराणा घराण्याचा एक भाग होते. त्यांना महाराष्ट्राबद्दल नितातं प्रेम वाटे. तसेच महाराष्ट्रातील लोकांनी त्यांच्या कलेला प्रोत्साहन दिले, दाद दिली आणि त्यांच्या कलेवरही प्रेम केले.

महाराष्ट्र केवळ आपल्या गायकी मुळेच प्रसिद्ध नसुन वाद्य संगितातही प्रसिद्ध होता. पेटीवादनामध्ये गोविंदराव टेम्बे आणि तबला वादक अहमद जान तिरखवा हे महाराष्ट्राचे अग्रेसर कलाकार होते. इ.स.१९२० पर्यंतचे महाराष्ट्राचे देशाच्या संमिश्र संस्कृतितील योगदान नेत्रदिपक आहे.

आपली प्रगती तपासा :-

१) महाराष्ट्राच्या कृतिशाली कलेची थोडक्यात माहिती द्या.

१६.३ वृत्तपत्रांचा विकास

दुसऱ्या पाठात आपण बाळ शास्त्री जांभेकर आणि भाऊ महाजन यांच्या मराठी पत्रकारीतेमधील पायाभरणीच्या कार्याचा संदर्भ घेतला. 'मुंबई दर्पण' व 'प्रभाकर' यांनी सामाजिक विषयांवर मत उभारणी करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. केवळ माहीती पुरविणे एवढेच त्यांचे कार्य नव्हते. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातील ह्या वृत्तपत्राची प्रमुख भूमिका ही समाजात जिज्ञासू वृत्ती जागृत करणे आणि आधुनिक विज्ञानासंबंधी जागरुकता आणणे ही होती.

१९ व्या शतकाच्या मध्यात प्रामुख्याने काही बदल होत गेले. पूरक माहिती मिळवून, ताज्या घडामोडींवरील विचारांना उत्पन्न केले. या पाठात आपण प्रामुख्याने तीन नियतकालिकांचा आढावा घेऊ ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश आणि इंदुप्रकाश ही नियतकालिके आता दैनिक वृत्तपत्रांच्या स्वरुपात आपणास पहावयास मिळतात. १९ व्या शतकाच्या मध्यानंतर वृत्तपत्रांची भूमिका व त्यांचे कार्य आपण लक्षात घेऊ.

१६.३.१ 'ज्ञानोदय' :

अहमदनगरच्या अमेरिकन ख्रिस्त धर्मप्रचारकांनी प्रसिद्ध केलेले ज्ञानोदय नियतकालिक म्हणजे महाराष्ट्राच्या स्वस्थ झोपलेल्या जनते साठी एक आव्हान ठरले. इ.स.१८४२ मध्ये त्यांनी याची प्रसिद्धी सुरु केली. ख्रिस्ती धर्मप्रसारासाठीच हे नियतकालिक समर्पित होते. त्यांनी अनेकदा हिंदु समाजाच्या पराभवाची कारणे उघडकीस आणली. हिंदुच्या चाली आणि रीतींवर

त्यांनी टिका केली. या आव्हानाने हिंदुत्वाच्या रक्षणकर्त्यांना आपल्या धर्माविरुद्ध वा समाज रचनेवर प्रहार करणाऱ्यांना विरोध करण्यास भाग पाडले. इ.स.१८४४ मधील 'उपदेशचंद्रीका' हे नियतकालिक प्रचाराच्या विरोधात प्रसिद्ध करण्यात आले. अगोदर दोन किंवा तीन नियतकालिकांनी नैतिक, सामाजिक आणि धार्मिक प्रगतीसाठी प्रयत्न केले. 'ज्ञानसिंधु, मित्रोदय, सद्भक्तीरत्न आणि 'ज्ञानचंद्रोदय' अशी काही नियतकालिके प्रसिद्ध आहेत. यांमधील काही हिंदु संस्कृती, हिंदू धर्म संरक्षणांच्या कल्पनेने प्रेरित होते. महाराष्ट्रात हिंदूधर्म आणि सामाजिक पुनर्रचनेतील या झटापटीमुळे नवी दृष्टी आणि नवे दर्शन मिळाले.

१६.३.२ 'ज्ञानप्रकाश' :

पत्रकारितेचा प्रभाव मुंबई बाहेर मुख्यतः पुण्यात जाणवला. पुण्यात इ.स.१८४९ साली 'ज्ञानप्रकाश' च्या प्रसिद्धिस सुरुवात झाली. कृष्णाजी त्रिंबक रानडे हे 'ज्ञानप्रकाश' चे पहिले संपादक. बाळ शास्त्रींच्या 'दर्पण' या अँलो-मराठी नियतकालिका सारखेच हे नियतकालिक होते. सुरुवातीला दर सोमवारी याची प्रत वाटली जात असे. मग कालांतराने आठवड्यातून दोनदा म्हणजे सोमवारी आणि गुरूवारी या प्रतिचे वाटप होत असे. श्री कृष्णशास्त्री चिपळूणकर, देखमुख, तात्या छत्रे, न्यायमुर्ती म.गो. रानडे आणि काही उच्चभ्रु विद्वानांप्रमाणेच या नियतकालिकांच्या लेखकांची लेखणी सुद्धा सुप्रसिद्ध होती. 'ज्ञानप्रकाश' या नियतकालिकेने फारच थोड्या वेळात वाचकांची मने जिंकली. अशाने वाचकांच्या संख्येतही वाढ झाली. मुंबईत प्रसिद्ध असलेल्या समकालीन नियकालिकांच्या तुलनेत ज्ञानप्रकाश ने उच्च दर्जाचे स्थान मिळविले. हे नियतकालिक अंतर्गत घडामोडीच्या बातम्यांशी निगडीत नसून ते जगभराच्या घडामोडींची माहीती पुरवत असे.

'ज्ञानप्रकाश' चा प्रसार फारच मोठ्या प्रमाणावर व दूरवर पसरलेला होता. यात स्त्री शिक्षण, उद्योगधंदे, व्यापार, कर आणि असेच काही समाजाच्या आवडीचे विषय यांसाठी प्रामुख्याने काही सदरे राखून ठेवलेली असत. 'ज्ञानप्रकाश' या नियतकालिकेच्या शीर्षकावर त्यांनी अधिक भर दिला. इ.स.१९०४ मध्ये या नियतकालिकाला दैनिक वृत्तपत्राचा दर्जा प्राप्त झाला. हे वृत्तपत्रात बदणारे दुसरे नियतकालिक होय. मुंबईत प्रसिद्ध झालेल्या 'इंदुप्रकाश' या नियतकालिकाला वृत्तपत्रांचा प्रथम दर्जा प्राप्त झाला.

१६.३.३ 'इंदुप्रकाश' :

इ.स.१८६२ पासून मुंबईत या नियतकालिकाच्या प्रसिद्धी सुरुवात झाली. त्यावेळी विष्णुशास्त्री पंडीत हे या नियतकालिकेचे संपादक होते. हे द्विभाषिक साप्ताहिक म्हणून छापण्यात आले. यात समाजाच्या पुनर्रचनेवर अधिक भर देण्यात आला. लोकांच्या मनात ताजे असणारे 'बालविवाह', स्त्री-शिक्षण, विधवा स्त्रीयांचे मुंडन यांसारख्या विषयांवरील चर्चेसाठी एक विशेष सदर या नियतकालिकात राखून समाजकंटकाच्या विचारांना चेतावणी देणे आणि पुनर्रचनेसाठी अनुकूल अशी जनजागृती करणे हा या मागील उद्देश होता. त्याने प्रचंड लोकप्रियता मिळविली. इ.स.१९०२ मध्ये या नियत कालिकेचे दैनंदिन प्रकाशन सुरु झाले आणि इ.स.१९३५ पर्यंत याची कारकीर्द सुरु राहिली.

१६.३.४ स्थानिक नियतकालीके :

मुंबई व पुणे येथून प्रकाशित होणारी नियतकालिके व पुस्तिका ह्या प्रामुख्याने इंग्रजी व मराठी या दोन भाषांमधून असत. त्यांचे मुख्य उद्दिष्ट मराठी व अमराठी वाचकांना आकर्षित

करण्याचे होते. त्यात त्यांनी अनेक मुद्द्यांना हात घातला. परंतु मुख्य ध्येय मात्र जनतेला जागृत करण्याचे होते. आर्थिक फायदा कमविणे हे दुय्यम ध्येय होते. लगतच्या ग्रामीण भागांमधेही आता नियतकालींकाचे प्रकाशन होणार होते. याचाच अर्थ आता ज्ञानाची गंगा शहराच्या बाहेर पडू पाहत होती. याचा परिणाम देशात व देशाबाहेर अनेक घटनांना ऊत येऊ लागला.

इनाम कमिशन, इ.स.१८५७ चे शिपायांचे बंड, ईस्ट इंडिया कंपनीकडे अधिकारांचे स्थलांतरण, अमेरिकेचे स्वातंत्र्य युद्ध या अशा अनेक घटनांनी आतापर्यंत शांत बसलेल्या जनतेला हलवून सोडले होते. आता नवनवीन घटनांसाठी मार्गदर्शनासाठी ते उत्सुक झाले होते. इ.स.१८६६ मध्ये ठाण्यात सुरु झालेले अरुणोदय व हिंदू पंच यांमध्ये जागतिक घडामोडींचा सखोल अभ्यास असे. ही दोन्ही नियतकालीके काशिनाथ धोंडी फडके या राजकीयदृष्ट्या जहालमतवाद्यांकडून संपादित होत असत. कदाचित हा इ.स.१८५७-५८ मध्ये फसलेल्या स्वातंत्र्ययुद्धाचा परिणाम असेल. इ.स.१८६८ मध्ये 'विद्याकल्पतरु' हे अतिशय गंभीर स्वरुपाचे नियतकालिक ठाण्यामध्ये सुरु झाले. अर्थात तो एक प्रकारचा छोटासा ज्ञानकोष होती.

शहरालगतच्या भागातून नियतकालीके व पुस्तिका छापण्याचा महत्त्वाचा हेतू हा ज्ञानवर्धन होता. केवळ राजकीय घडामोडींवर प्रकाश टाकणे हा नव्हता. या संदर्भात ठाण्याच्या 'स्त्रीज्ञानप्रदीप' याचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. तसेच इ.स.१८७२ मध्ये गोव्यातून प्रकाशित झालेले पहीले मराठी मॅगझीन व वऱ्हाड येथून प्रकाशित होणारे 'ज्ञानसंग्रह' यांचाही उल्लेख अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच इ.स.१८६८ मध्ये, रत्नागिरीहूनही 'सुमार्गदर्शक' ही पुस्तिका प्रकाशीत होत असे. अशा प्रकारे इ.स.१८६० ते १८७० च्या दरम्यान नियतकालीके व वर्तमानपत्रे यांच्याविषयीची जागृती वाढीस लागली.

१६.३.५ सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान :

शहरांत अनेक वृत्तपत्रे आणि नियतकालिके प्रसिद्ध होती. ग्रामीण भागातही त्यांच्या प्रती उपलब्ध होत असत. पुणे-मुंबईपासून काही अंतरावरील जिल्ह्यांत स्थानिक भाषिक नियतकालिके उपलब्ध होत ज्यामुळे लोकप्रियता टिकून रहाण्यास मदत होई. परंतु इ.स.१८०४ मध्ये 'मुंबई वाङ्मयी समाज' नावारुपास आला आणि इ.स.१८३० रोजी 'बॉम्बे ब्रांच ऑफ दी रॉयल सोसायटी'ने त्यास समाविष्ट केले. मुंबईतील बऱ्यापैकी आर्थिक स्थिती असलेल्या लोकांसाठी ती एक प्रेरणा ठरली. ७ जून, १८४५ रोजी धोबी तलाव येथे पहिल्या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना झाली. अर्थात राघोबा जनार्दन गवाणकर-वसईकर, लष्करी बोर्ड ऑफिसचे कार्यकारी अधिकारी आणि सरकारी अधिकारी मुंबई तसेच आणखी काही हितचिंतकांच्या मदतीनेच हे पूर्ण होऊ शकले. वृत्तपत्र आणि मासिके जे विकत घेऊ शकत नाहीत अशांसाठी या ग्रंथालयात आता मोफत प्रती उपलब्ध होत. अशा सोई सुविधांची बातमी फार काळ लपून राहिली नाही. इ.स.१८४८ मध्ये पुण्यात नगर वाचन मंदिराची स्थापना झाली. इ.स.१८५० मध्ये सार्वजनिक ग्रंथालय कोल्हापूरातील वाचकांसाठी उपलब्ध झाले आणि इ.स.१८६७ मध्ये शहरी वाचनालयाची अमरावती येथे स्थापना झाली. अनेक जिल्ह्यांमधून वाचनालये उदयास येऊ लागली. कोकण, अलिबाग, रत्नागिरी, वेंगुर्ला, सावंतवाडी आणि मालवणांत अनेकांनी सार्वजनीक वाचनालय आणि वृत्तपत्र प्रसारात रस दाखविला. विदर्भात अमरावती जिल्हा या क्षेत्रात कार्यरत होती. पूर्व जिल्ह्यांतील अहमदनगर अमेरिकन ख्रिश्चन मिशनऱ्यांनी बौद्धिक कार्याच्या खुणा दर्शविल्या.

१६.३.६ वृत्तपत्रसंस्थेचे योगदान :

वृत्तपत्रांसंबंधी जी जागरुकता महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गामध्ये हळूहळू पसरत चालली होती त्यानुसार, महाराष्ट्रात पुनरुत्थानाचे एक नवे पर्व सुरु झाल्याची जाणीव निर्माण होत होती. परंतु महाराष्ट्रातील लोक संपूर्णपणे परकीय युरोपियन संस्कृतीच्या आहारी गेले नव्हते. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोक हे अजूनही अशिक्षितच होते. त्यामुळे मुंबई, पुणे येथील सुशिक्षितांची जागृती व सरकारविरोधी भूमिका हे केवळ चहाच्या प्याल्यामधीलच वादळ होते. यामुळे ज्योतिबा फुल्यांच्या सत्यशोधक मंडळींचे आणि प्रमुख शहरामधील उच्च जातीतील पुरोहीत वर्गाचे खटके उडू लागले. सामान्य अज्ञानी जनतेच्या मनावर जो जुन्या रुढी-परंपरांचा विळखा घट्ट बसला होता, तो केवळ वर्तमानपत्र व पुस्तिकांच्या काही स्तंभांनी वा वाक्यांनी कमकुवत पडणार नव्हता. वृत्तपत्र व त्यांच्या विचारांचे अत्यंत उत्त्साहीपणाने स्वागत झाले. परंतु जुनाट विचारांनी पछाडलेल्या लोकांवर त्यांचा वरील परिणाम होण्याची शक्यताही अत्यंत कमीच होती.

१६.३.७ 'पत्रकारिता' महाराष्ट्रातील एक नवीन प्रवाह :

शिक्षण आणि ग्रंथालयाच्या विस्तारामुळे ग्रामीण भागातील शिक्षित जनता केवळ हिंदू पौराणिक कथा ऐवजी धर्मोपदेशक कथा आणि किस्से वाचण्यात उत्सुक झाले. इ.स.१८५७ साली ए.बी. गुंजीकरांनी सुरु केलेल्या 'विविधज्ञान विस्तार' मासिकाने महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात वाचकवर्ग तयार केला. इ.स.१८७४ ते इ.स.१८८१ या सात वर्षात लोकहितवादिंच्या 'शतपत्रे' आणि विष्णु शास्त्री चिपळुणकरांच्या निबंधमालेने महाराष्ट्रातील शिक्षित समाजात खळबळ उडविली. त्यांनी पश्चिमात्य सुधारकांना विरोध करुन मराठी साहित्य सुशोभित केले. भारताच्या पुनरुस्थानाचा केंद्रबिंदू म्हणजे हिंदू संस्कृती या कल्पनेचा विस्तार त्यांनी आपल्या निबंधात केला. ब्रिटीश पूर्व शिक्षक आणि समाज सुधारक ज्योतिराव फुले यांच्या विरोधात त्यांनी वैर ओढवून घेतले. ते ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या हाताखालचे बाहुले आहेत असा त्यांचा समज होता. ब्रिटीश व्यवस्थापनासोबत पाश्चात्य अनुकरणावर चिपळुणकरांची तीव्र प्रतिक्रिया पाश्चात्य संस्कृतिचे कौतुक असणाऱ्या ना चिथावणारी ठरली. त्यांची भाषाशैली नेहमीच तर्कशुद्ध वा खात्री पटवून देणारी नव्हती. आपल्या लेखनशैलीने ते सर्वांचे लक्ष वेधून घेत असत. त्यांच्या प्रथम दर्जाच्या लेखन पद्धतीमुळे 'मराठी भाषेचा शिवाजी' म्हणून ते स्वतःस म्हणवून घेऊ लागले. इ.स.१८८० मध्ये विष्णुशास्त्रींच्या 'संस्कृत आणि मराठी' भाषेतील वाङ्मयाच्या पुनःशोधाचे उद्दीष्ट असणाऱ्या 'काव्येइतिहास संग्रहाची' स्थापना झाली. राष्ट्रभक्तीला प्रेरणा देणाऱ्या कामांना प्रसिद्धी देणाऱ्या चित्रशाळा प्रेस ची स्थापना झाली तीही याच वर्षी. त्यांच्या मजबूत लेखणीने समाज सुधारकांची हिंमत खचून जाई आणि त्यांच्या टिकारूपी निबंधांनी बहुजन समाजात आणि ब्राह्मण समाजात तणाव निर्माण केले. इ.स.१८८२ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. परंतु त्यांची देशभक्ति बद्दलची कळकळीने बुद्धीवान वर्गास असेच आवाहान केले. 'केसरी' च्या स्थापनेत गो.ग. आगरकर आणि बाळ गंगाधर टिळकांप्रमाणेच विष्णुशास्त्री चिपळुणकरांचे देखिल योगदान होते. त्यांनी हिंदु संस्कृतीबद्दल आदर आणि स्वाभिमान अशा दोन गोष्टींचा अमूल्य ठेवा आपणास दिला.

इ.स.१८८५ मध्ये ज्योतिराव फुलेंनी 'सरिता' नियतकालिक प्रसिद्ध केले. ज्या कल्पनेमुळे ज्योतिरावांना सत्यशोधक समाज च्या रचनेसाठी मदत झाली. नियतकालिक फार काळ टिकले नाही. फुलेंच्या 'गुलामगिरी' या पुस्तकातून घेतलेल्या त्यांच्या विचारसरणीचा वारसा या नियतकालिकाने पुढे चालविला. परंतु इ.स.१८८० च्या दशकातील नियतकालिकांद्वारे

तसेच निबंध मालिकांमधून लेखकांच्या विचारांबाबत परस्परांतील कट्टरपणा दिसून येत असे. इ.स.१८७७ मध्ये कोल्हापुरात 'दिनबंधु' हे एकमेव मासिक भालेकर या ब्राम्हणेत्तर व्यक्तिने संपादित केले. हे वृत्तपत्र तळागाळातील शोषित वंचिताचे प्रश्न समाजासमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले व पुढे जाऊन दलित चळवळीचे मुखपत्र बनले. 'दिनबंधू' हे वृत्तपत्र पुढे जाऊन बंद पडले व ते पुन्हा सुरु करण्याचे काम नारायण मेघाजी लोखंडे यांनी केले. त्यांनी दिनबंधूचे मुंबईतून संपान करुन कामगारांचे प्रश्न मांडले व हे वृत्तपत्र कामगार चळवळीचे मुखपत्र बनले.

१६.३.८ प्रादेशिक भाषा पत्रकारिता व वृत्तपत्र नियंत्रण कायदा, इ.स.१८७८ :

इ.स.१८७६-७७ च्या महाराष्ट्रातील दुष्काळामुळे भारतातील अनेक भागांत स्फोटक परिस्थिती निर्माण झाली. लॉर्ड लिटनने चिंता व्यक्त करतांना अफगाणिस्तानच्या अमिराला ब्रिटीश प्रतिनिधीला नेमण्यास आग्रह केल्यामुळे नोव्हेंबर इ.स. १८७८ मध्येच अफगाणिस्तानसोबत लवकर युद्ध झाले. दुष्काळाबाबत आलेल्या अपयशामुळे असंख्य जनता दुष्काळात भुकेने आणि रोगाने मरत होते. तरीही मोठ्या प्रमाणात भरवून आणलेल्या भव्य दरबाराने जो राणी विक्टोरियाच्या वर्चस्वाच्या चाळीसाव्या वर्षी भरविण्यात आला होता तीला 'कैसर-ए-हिंद' पदवी देण्यात आली. अफगाणिस्तानविषयक ब्रिटीशांच्या धोरणांमुळे जनतेत सरकारविरुद्ध असंतोषाची भावना निर्माण झाली.

इ.स.१८७७ रोजी भारतात पत्रकारितेने बरीच प्रगती केली. त्यावेळी भारतात ६४४ वृत्तपत्रे प्रसिद्ध होत होती. त्यातील जवळ जवळ शंभर वृत्तपत्रे महाराष्ट्रात प्रचलित होती. इ.स.१८५८ चा राणीचा जाहिरनामा आणि भारत सरकारचे नियंत्रणाने जबाबदार सरकारच्या नव्या कालखंडाचा आरंभ झाला. भारताच्या जनतेसाठी ब्रिटिश सरकार एका पालकाप्रमाणे होती. परंतु राजकारणांत आळशी आणि अज्ञानी लोकांना हे सरकार मान्य होते. इ.स.१८३५ पासून पत्रकारीता स्वतंत्र होती. त्यामुळे सरकारच्या अंतर्गत व्यवस्थापन आणि परदेशी धोरणाच्या मुद्यात सरकारची कमतरता जगापुढे आणण्यात ते कधीही मागे पडले नाहीत. लॉर्ड लिटनने त्याच्या धोरणा विरुद्धच्या मुद्यांना खोडून पटवून, शांतता निर्माण करण्याच्या उद्देशाने इ.स.१८७८ मध्ये देशी भाषांच्या वर्तमानपत्राचा कायदा सभेत पास केला. हा कायदा इंग्रजी वर्तमानपत्रांना लागू नव्हता. भारतीय राष्ट्रावादास वर्तमानपत्रातूनच खतपाणी मिळत असल्याने, देशी वर्तमानपत्रांना बऱ्याच प्रमाणात संघर्ष करावा लागला. लॉर्ड लिटनचा नियम इंग्रजी वृत्तपत्रांना लागू नव्हता. ह्या संदर्भात, संपूर्ण देशातून असंतोष व्यक्त करण्यात आला.

१६.३.९ प्रादेशिक भाषा पत्रकारिता कायदा, इ.स. १८७८ ला विरोध :

लॉर्ड लिटनच्या देशी वृत्तपत्रांच्या विरोधी कायद्याने सर्व भारतात सर्व स्तरावर खळबळ माजली. दादाभाई नौरोजी यांनी इ.स.१८७६ मध्ये भारताच्या दारिद्र्यासंबंधी आधीच लेख लिहीला होता आणि ब्रिटीशांचे खरे रुप, ईस्ट इंडिया कंपनीच्या शोषणाचा सिद्धांत प्रेक्षकांसमोर स्पष्ट केला होता. इ.स.१८७६-७७ च्या ओल्या दुष्काळाने अनेकांना विचार करावयास भाग पाडले. फेब्रुवारी १८८१ मध्ये महाराष्ट्रात सार्वजनिक सभेने भारत सरकारला स्मरणिका पाठवली. सार्वजनिक सभेने भारत सरकारला उद्देशून देशी वर्तमानपत्राच्या विरुद्ध जो अविश्वास व्यक्त केला आहे आणि त्यामुळे सरकारी पातळीवर त्यात काहीही सुधारणा करता येऊ शकत नाही या विषयी खंत व्यक्त केली. त्यांनी ब्रिटीश सरकारला याची जाणीव करुन दिली की, राज्यकर्ते व प्रजा यांच्यातील संबंध जर सुधारायचे असतील तर अशा प्रकारच्या अन्यायी कायद्यामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. भारतीयांचे मनोबल त्यामुळे खच्ची होईल.

दुष्काळ व व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्टनंतर इ.स.१८८३ मध्ये इल्बर्ट बिल वादाला तोंड फुटले. ब्रिटीशांचे खरे रुप त्यामुळे उघडकीस आले. ब्रिटीश व भारतीयांची वांशिक बरोबरी वा समानता हे या वादाचे मूळ कारण होते. ईल्बर्ट बिलाने भारतीय न्यायमूर्तींचे युरोपियन गुन्हेगाराचा खटला चालवण्याचे अधिकार काढून घेतले.

युरोपियन लोकांनी यास प्रखर विरोध केला. भारतीय वृत्तपत्रांनी या बिलाला संमती दर्शविली. टाईम्स ऑफ इंडीयाने या बिलास प्रखर विरोध केला आणि भारतीय न्यायमूर्तीवर टीका करणारी लेखांची मालिकाच सुरु केली. देशी वृत्तपत्रांचा वाढता विरोध व देशी कर्मचारी वर्गाकडून निंदा नालस्ती होईल ह्या भीतीने शेवटी लॉर्ड रिपनने युरोपियन लोकांसमोर मान तुकविली. ह्या वादग्रस्त बिलने, भारतीयांची एकी अधिकच वाढली. लॉर्ड रिपनने भारतीय देशी वर्तमानपत्राचा कायदा अखेर बरखास्त केला आणि भारतीय राष्ट्रवादास अधिकच प्रेरणा मिळाली.

१६.३.१० जहाल पत्रकरीता :

इ.स. १८७० मध्ये निबंधमालाने भारतीय राष्ट्रवादास प्रोत्साहन दिले. हा सकारात्मक वाद होता. नकारात्मक नव्हता आणि त्याकाळातील युरोपियन लोकांच्या वाईट सवयींपासून मुक्त होता. तो पाश्चिमात्य बुद्धीवादापासून नव्हे तर पुरातन साहीत्यापासून प्रेरित झाला होता. टिळक आणि आगरकर हे, महाराष्ट्राचे आघाडीचे पत्रकार विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या प्रभावाखाली आले. ह्या तिघांनी इ.स.१८८१ मध्ये दोन नियतकालीके सुरु केली. पहिले म्हणजे मराठीतून 'केसरी' व दुसरे म्हणजे इंग्रजीतून 'मराठा' होय. इ.स.१८८२ मध्ये चिपळूणकरांचे निधन झाले आणि इ.स.१८९१ मध्ये आगरकरांनी वेगळे होऊन 'सुधारक' नावाचे नवीन वृत्तपत्र काढले. त्यानंतर टिळक हे 'केसरी' व 'मराठा' एकमेव संपादक बनले व वृत्तपत्रकारीतेचा मध्यबिंदू मुंबईपासून पुण्यात सरकला.

'केसरी' व 'मराठा'च्या पहील्या वर्षीच्या प्रकाशनाच्या वेळीस, टिळक व आगरकरांवर बदनामीचे अनेक आरोप करण्यात आले. दोघांच्याही मनात राजकीय देशभक्तीचे प्रेम ओथंबून वाहत होते आणि राज्यकर्त्यांस त्यांनी वर उचलून धरले, बडोद्याच्या मल्हारराव गायकवाड यांना सार्वजनिक सभेने वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु इ.स.१८७५ मध्ये, ब्रिटीशांनी कटकारस्थानाने त्यास गादीवरून उतरविले. ह्या सगळ्यांचा परिणाम या दोन तरुण संपादकांवर झाला, जेव्हा ते कोल्हापूरच्या गादीसंदर्भात विवादात गुंतले होते. केसरी व मराठास काही पत्रे मिळाली जी. एम. व्ही. बर्वे या दिवाणाने, कोल्हापूरचा राजा मानसिकरित्या दुर्बल व वेडा असल्यासंदर्भात, कारस्थाने करुन लिहली होती. ह्या दोन तरुण संपादकांनी, राजपुत्रास वाचविण्यासाठी फंड गोळा केला. सार्वजनिक सभेच्या माध्यमातून, बर्वेवर वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य हिरावून घेतल्याच्या आरोपावरुन टिका करण्यात आली. ह्या संदर्भातील पत्रे, महत्त्वाच्या अंकात प्रकाशित करण्यात आली. त्यात बर्वेने केलेल्या फसवणुकीवर ताशेरे ओढण्यात आले. या बाबतीत, दिवाणाने ह्या दोन संपादकांच्या विरुद्ध बदनामीचे व अब्रुनुकसानीचा दावा ठोकला. त्यांना यासंदर्भातच दोषी ठरविण्यात आले. कारण पत्रे खरी नव्हती व त्या विषयीचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे नव्हता. ह्यासाठी त्यांना चार महिन्यांची साधी शिक्षा सुनावण्यात आली. या प्रकारानंतर ते जनतेच्या गळ्यातील ताईत बनले. परंतु, दुर्दैवी राजा मात्र अहमदनगरच्या किल्ल्यात खितपत पडला व तिथेच त्याचा दुर्दैवी अंत झाला. लोकांना दिवाणाच्या निरागसपणावर अजिबात विश्वास नव्हता व टिळक आगरकर हे जनतेचे प्रवक्ते झाले.

१६.३.११ दुष्काळ आणि प्लेगची साथ, इ.स. १८९६-९७ :

इ.स.१८९६-९७ दख्खनमध्ये पडलेल्या दुष्काळग्रस्तांसाठी देण्यात आलेली मदत अगदीच अपुरी होती.परंतु प्लेगच्या साथीने लोकांचे मरणाचे हाल झाले. टिळकांनी ह्या कठीण काळास कसे तोंड द्यायचे यासाठी लोकांना शिबिरांच्या माध्यमातून संघटीत करावयास सुरुवात केली. टिळकांनी सरकारच्या नाकर्तेपणाविषयी व अपुऱ्या सोयींच्या विरोधात सरकारने काय करावयास हवे, या विषयी लेखांची मालिकाच सुरु केली.

इ.स.१८९७ च्या सुरुवातीला गव्हर्नरने जाहीरनामा काढून, सार्वजनिक सभेस लोकांच्या प्रश्नांविषयी, सरकारविरुद्ध आवाज उठविण्याचे अधिकार कायद्याने बरखास्त केले. पोलिस आणि पुण्याच्या प्लेग कमिशनवर अनेक आरोप करण्यात आले. प्रत्येक घराघरात, रोग्यांना शोधून काढणाऱ्यांच्या दृष्टीने जी लोकांना अमानुष वागणूक देण्यात आली. सावधानतेच्या दृष्टीने बळजबरीने प्लेगची लस देण्यात आली. ह्या सगळ्या अघोरी प्रकाराबद्दल टिळकांनी आवाज उठविला. लसीसंबंधी व्यवस्थित अभ्यास ही झाला नव्हता. त्यांच्या दूष्परिणामासंदर्भात काहीही माहीती अस्तित्वात नव्हती.

सरकारच्या ह्या अन्यायी धोरणाविषयी टिळकांनी आवाज उठविला. डब्ल्यू.सी.रॅण्डचा खून झाल्यानंतर, कारस्थान करणाऱ्यांविरुद्ध सरकारने कडक पावले उचलली. टाईम्स ऑफ इंडियाने रॅण्डचा खून म्हणजे पुण्याच्या ब्राह्मणांचे मोठे कटकारस्थानच आहे असे नमूद केले. पुण्याच्या तालुका कलेक्टरने एक सार्वजनिक सभा आयोजित करुन अशाप्रकारची अहिंसा म्हणजे काही उपद्रवी लोकांच्या नवनवीन कल्पना, जे नवीन शिक्षणाने माथेफिरु झालेले आहेत आणि गणपतीसारखे सार्वजनिक उत्सव व प्रतिगामी लिखाणाने डोकी फिरल्याची कामे आहेत असे स्पष्ट केले. त्यांच्या दुसऱ्याच दिवशी सरकारने पुण्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने अतिरिक्त पोलिस दल, दोन वर्षासाठी म्हणून नियुक्त केले. याचा अर्थ आता जनतेवर अधिक कर लादण्यात येणार होता त्याखाली सामान्य जनता भरडली जाणार होती आणि महानगर पालिकेचा कारभाराचा बोजवारा उडणार होता.

लोकमान्य टिळकांनी वर्तमानपत्राच्या स्वातंत्र्यासाठी आणि जनतेचे प्रवक्ते म्हणून ह्या अशा योजना व धोरणांची जाहीर टीका केली. इ.स.१८९७ च्या जुलै ६ च्या केसरीच्या अंकात ते संपादकीय लिहीतात, ''सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?'' प्लेग कमिशनरच्या खूनानंतर, खून्यांची माहीती देणाऱ्यांना २००० रु. चे इनाम जाहीर करण्यात आले. ह्या संदर्भात ते लिहीतात की, ''संपूर्ण जनतेला शिक्षा करण्याचेच हे धोरण आहे.'' त्यांनी असे स्पष्ट केले की, रौप्य महोत्सवी दिवशीच एका गाझीने दिवसाढवळ्या एका युरोपियनास गोळी झाडून ठार केले. पंजाब सरकारने ह्या गुन्ह्यास, कटकारस्थानाचे स्वरुप दिले नाही. त्यांच्या हे लक्षात आले की रॅण्डच्या खूनाने, सरकारचे डोके फिरले होते. २७ जुलै १८९७ रोजी सरकारने, टिळकांवर जनमत चिथावण्याचा व भडकविण्याचा आरोप ठेऊन त्यांना दीड वर्षाच्या गंभीर कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. ही देशद्रोहाची पहीली घटना होती. नातू बंधूंना चौकशीशिवायच अटक करण्यात आली. 'मोदवृत्त,' 'पूणे वैभव,' 'प्रतोद' व इतर नियतकालिकांवर देशद्रोहाचे खटले भरण्यात आले. संपादकांना अटक करण्यात आली आणि पूणे वैभवचा संपादक सोडला तर इतरांना वेगवेगळ्या स्वरुपाच्या शिक्षा करुन कारावासात पाठविण्यात आले. वृत्तपत्राच्या स्वातंत्र्यासाठी ह्या लोकांनी स्वत:चे स्वातंत्र्य धोक्यात आणले.

शतकाची सुरुवातच दडपशाहीने झाली जेव्हा लॉर्ड कर्झनने कलकत्ता कॉरपोरेशन ॲक्ट, इ.स.१८९९ अंमलात आणला तसेच इंडियन युनिव्हसिटीज् ॲक्ट, इ.स.१९०४ व ऑफिशअल सिक्रेट ॲक्ट संमत झाल्यानंतर, दडपशाहीत अधिकच वाढ झाली. त्याची हुकमशाही व दडपशाही इ.स.१९०५ च्या बंगालच्या फाळणीच्या दरम्यान अधिकच वाढली. त्यांनी भारतीयांसममोर मोठे आव्हान उभे केले.

ह्याच काळात रानडेंचे 'मराठा सत्तेचा उदय' हे पुस्तक प्रकाशित झाले आणि लोकमान्य टिळकांना लॉर्ड कर्झनच्या दडपशाहीच्या धोरणाविरुद्ध लढा देण्यासाठी मनोबल वाढले. त्यांनी बंगाल व भारताच्या मोठमोठ्या शहरांमध्ये भेटी देऊन, ब्रिटीश वस्तूंवर बहिष्कार हाकून, भारतीय वस्तूंचा पुरस्कार करावा, स्वदेशीचा पुरस्कार करावा, असे लोकांना आवाहन केले. ह्याच काळात, इ.स.१९०४-०५ च्या दरम्यान रुसो-जापनिज युद्धात जपानच्या विजयानंतर अनेक आशियाई राष्ट्रांमध्ये आनंदाची लाट उसळली आणि लॉर्ड कर्झनच्या 'गोऱ्या माणसाचे वर्चस्व' या सिद्धांताला तडाखा बसला.

१६.३.१२ राष्ट्रवादाची परिसिमा :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात मुख्यत्वे इ.स.१९०५ व इ.स.१९१० च्या काळात लॉर्ड कर्झनच्या विरोधात स्थानिक वृत्तपत्रांनी टीकेची झोड उठवली. राष्ट्रवादाची भावना अगदी वरच्या टोकाला जाऊन पोहचली होती आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी इंच इंच भूमी लढवली जाऊ लागली होती. केसरी मधील लेख हे पत्रकारितेचे उत्तम नमुने म्हणून सिद्ध होऊ लागले. टिळकांची टिका ही नकारात्मक नव्हती. तसेच ते सकारात्मक, विधायक सूचनाही देऊ इच्छित होते. ५ सप्टेंबर १९०५ च्या केसरीच्या अंकात त्यांनी बहिष्कारासंबंधीची कल्पना मांडली. त्यांचे शीर्षक होते 'बहिष्कार योग' आणि दुसऱ्या एका लेखात 'सूताचा व विणकामाचा धंदा' यासारख्या विधायक सूचनाही दिल्या. त्यांनी स्वदेशीच्या विरोधातील सर्व बंधनांचा धिक्कार करुन स्वदेशीचा प्रखर पुरस्कार केला. सुरेद्रनाथ बॅनर्जीना, 'बंगाल'चा विदूषक राजा' असे संबोधणाऱ्या टाईम्स ऑफ इंडीयाच्या संपादकाबाबत, केसरीच्या ११ सप्टेंबर १९०६ च्या अंकात 'मुंबईच्या टाईम्सचा बेशरमपणा' असो जळजळीत लेख लिहीला त्यांच्या केसरीच्या २९ ऑगस्ट १९०६ च्या अंकात कर्झनच्या राजकारभारासंबंधीच्या लेखात, त्यांचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकारणाचा गूढ अभ्यास लक्षात येतो. तसेच त्यांच्या विरोधकांच्या न्यूनगंडावर त्यांनी अचूक वार केला. त्यांनी त्यांच्या संदर्भातील लेखाच्या शेवटी लिहीले, आपल्या सूर्य मालिकेत अनेक ग्रह, उपग्रह व उल्का असतात. तसेच अधिकारी व मंत्र्यांची मंडळे ही सम्राट व राजाभोवती फिरत असतात. त्याचप्रमाणे लॉर्ड कर्झन हा एक उल्का समान आहे. ज्याचे अस्तित्व क्षणभंगूर आहे.

१६.३.१३ वृत्तपत्रस्वातंत्र्याचे दमन :

इ.स.१९०७ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसचे दोन गट पडले. त्यापैकी जहालमतवाद्यांना नोकरशाहीच्या शत्रुत्वाला तोंड द्यावे लागले. आता तरुण राष्ट्रप्रेमींना कळून चुकले होते की, मवाळमतवाद्यांच्या मागण्यांचा एकाधिकारशाही सरकारवर काडीचाही परिणाम होणार नाहीये. काही जहालमतवादी तर बॉम्ब बनविण्याच्या विचारांनी प्रभावित झाले. सरकारने ह्या परिस्थितीत बंगालची फाळणी करुन विजय मिळविला व लवकरच जहालमतवाद्यांची मते दडपून टाकण्याविषयी वेगाने पावले उचलली. मे १९०७ च्या सुरुवातीला लाला लजपतराय व सरदार अजित सिंग यांना मंडालेला कोणतीही चौकशी न करता स्थानबद्ध करण्यात आले. इ.स.१९०८

च्या वर्तमानपत्र (गुन्हास प्रवृत्त करण्याचा) कायदा पास करून, सरकारच्या प्रतिमेला तडा पोहचविणाऱ्या वर्तमानपत्रांवर दडपण आणण्यास सुरुवात झाली. इ.स.१८१८ च्या रेग्युलेशन III च्या अंतर्गत अनेक भारतीय तरुणांना देशाबाहेर स्थानबद्ध करण्यात आले. इ.स.१९०८ मध्ये लोकमान्य टिळकांवर लोकमत भडकविणे व राजद्रोहाचा आरोप ठेवून सहा वर्षाची काळ्यापाण्याची शिक्षा झाली. त्यासाठी त्यांना मंडालेला पाठविण्यात आले.

टिळकांच्या स्थानबद्धतेनंतरही दुष्ट सरकार विरोधात आवाज कमी झाला नाही. इ.स.१९०८ मध्ये अनेक नियतकालिकाचे संपादक व मालक यांना जनतेला चिथावण्याच्या आरोपावरुन पकडण्यात आले. त्यापैकी पुण्याच्या 'काळ,' 'विहारी,' मुंबईच्या 'अरुणोदय,' इस्लामपूरच्या 'प्रतोद,' सोलापूरच्या 'स्वराज्य', यवतमाळच्या 'हरकीशोर' व नागपूरच्या 'हिंदू केसरी' या वर्तमानपत्रांच्या संपादकांचा समावेश होता. जॅकसनच्या मृत्यूनंतर सरकारच्या दडपशाहीत अधिकच वाढ झाली. महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांचे कार्य, सिंहाचे काळीज असलेल्या लोकमान्य टिळकांना अटक होऊनही तसूभर थांबले नव्हते. हे सर्व ब्रिटीशांचा अपेक्षाभंग करणारे ठरले. टिळकांप्रमाणेच, पंजाब व बंगालच्या जनतेच्या प्रवक्त्यांना त्याची खात्री पटली की, ब्रिटीश राज्यकर्त्यांविरुद्ध आता निकराची झुंज देणे गरजेचे आहे. देशाच्या स्वातंत्र्याची बरोबरी व तडजोड आता कशाही बाबतीत होऊ शकत नाही. ब्रिटीश सरकारने त्यांचे साम्राज्य आबाधीत ठेवण्यासाठी जे नियम बनविले आहेत ते तोडण्यात कोणताही अपराध नाही. प्रत्येक राष्ट्रीय पत्रकाराने एक पाय तुरुंगात ठेऊनच कार्य केले पाहीजे आणि देशांच्या हितासाठी असे करणे अपरिहार्यच आहे.

१६.३.१४ वृत्तपत्रसंस्थेचा अराजकीय चेहरा :

विसाव्या शतकातील पहील्या दशकातील तर उडलेली खळबळ ही केवळ महाराष्ट्रातील वृत्तपत्रांमुळे निर्माण झाली होती. इतकेच नव्हे तर ती फक्त नाण्याची एक बाजू होती. दुसरी बाजू ही मराठी वर्तमानपत्राची संपूर्ण प्रतिमा दर्शवणारी होती.

आपण आधीच 'विविध ज्ञान विस्तार' या विषयासंबंधी बोललेलो आहोत. इ.स.१८९०मध्ये हरीभाऊ आपटेनी 'करमणुक' हे साप्ताहीक सुरु केले ज्याचे स्वरुप हे कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रे, महत्त्वाचे निबंध, आणि विविध विषयांवरील उपयुक्त माहीती यांनी युक्त होते. इ.स.१८९१ ते १९०० च्या दरम्यान अनेक व्यक्ती व संस्थांनी विविध मासिके सुरु केली. त्यापैकी कोल्हापूरचे विजापुरकरांनी संपादीत केलेली ग्रंथमाला याचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. अनेक विचारवंतांनी या मासिकासाठी मोलाचे योगदान दिले. इ.स.१९०८ मध्ये 'इतिहास संग्रह' हि पुस्तिका मुंबईमध्ये सुरु झाली. इ.स. १९१० मध्ये 'भारत-गौरव ग्रंथमाला' तर इ.स.१९११ मध्ये 'श्रुती-बोध' ही पुस्तिका छापण्यात आली.

विचार करावयास प्रवृत्त करणारे निबंध विविध विषयांवरील लेख याच काळात अनेक वर्तमानपत्रे व नियतकालीकांमधून प्रसिद्ध झाले. जनतेला जागृत करण्याचे जे कार्य वृत्तपत्रसंस्थेने विविध मार्गाने केले ते उल्लेखनीय आहे. त्यामुळे आपण असे म्हणू शकतो की, मराठी वृत्तपत्रांनी केवळ वाचकांची ज्ञानवृद्धीच केली नाही तर भाषा समृद्ध करण्याचे तसेच, जनमत सुदृढ करण्याचेही मोलाचे कार्य केले.

आपली प्रगती तपासा :-

१) महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची थोडक्यात माहिती द्या.

१६.४ समारोप

मराठ्यांच्या काळापासून, महाराष्ट्रामध्ये अनेक प्रसिद्ध लोककलांचा विकास झाला. उदा. तमाशा, गोंधळ, पोवाडा, दशावतार. इंग्लिश मंच व कलाकार यांनी प्रभावित झालेल्या लेखकांनी उत्कृष्ट इंग्लिश साहित्याकृतीचे देशी स्थानिक भाषांमध्ये रुपांतर केले. साहित्याचा वापर महाराष्ट्रामध्ये सामाजिक जागृतीसाठी करण्यात आला व समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. वृत्तपत्रसंस्था हा जनतेचा तिसरा डोळा होता. प्रेसने जनतेमध्ये जागृती निर्माण केली आणि केवळ स्वातंत्र्य लढ्यातच नव्हे तर सर्वार्थाने मोलाचे योगदान दिले. वृत्तपत्रसंस्थेने महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षराने पान लिहले. अनेक व्यक्तिंनी महत्त्वपूर्ण वृत्तपत्रे सुरु करुन भारतिय राष्ट्रीय चळवळ तळागाळापर्यंत पोहाचविली व लोकांच्या मनात ब्रिटिशांच्या विरोधात राष्ट्रवाद निर्माण केला.

१६.५ प्रश्न

१) महाराष्ट्राची साहित्य व कलेच्या क्षेत्रातील कामगिरी विशद करा.
२) राष्ट्रभावना व स्वातंत्र्यवाद जागृत करण्यामागे, वृत्तपत्रसंस्थेने जे कार्य केले, त्याचा उहापोह करा.
३) राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यात वृत्तपत्र संस्थेचे महत्त्वाचे कार्य स्पष्ट करा.

❖❖❖❖